# मालगुडी डेज़

आर. के. नारायण



अनुवाद

मधुकर धर्मापुरीकर

मालगुडी डेज़्

# आर. के. नारायण

## अनुवाद : मधुकर धर्मापुरीकर

मालगुडी डेज्
कथासंग्रह
आर. के. नारायण
अनुवाद : मधुकर धर्मापुरीकर

प्रकाशन क्रमांक – 1273

प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - 431 005,
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com

पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. 02, ‘ए’ विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

चि. तनय यास...
अनुवादाचं काम हाती घेतलं,
तेव्हा तुझा जन्म झाला.
अनुवाद हातावेगळा केला,
त्या वेळी तुझ्या रडण्या-हसण्याला
शब्दांचे आकार येत होते...

- आजोबा

# Table of Contents


लेखकाचे मनोगत
अनुवादाचं गाणं
ज्योतिषाचा दिवस
चुकलेलं टपाल
डॉक्टरचा शब्द
पहारेकऱ्याची भेट
आंधळा कुत्रा
अनुकंपा
वाघाचा पंजा
ईश्वरन
परिपूर्ण कलाकृती !
बाबांची मदत
नागाचे गाणे
इंजिनचा वैताग
महिना पंचेचाळीस रुपये
व्यवसायाबाहेर
अॅटिला
कुऱ्हाड
लॉली  रोड
हिरव्या ब्लेझरच्या मागावर
बळीचा कोपरा
बायकोची सुटी
छाया
इच्छेने झालेली गुलाम
लीलाचा मित्र
आई अन्  मुलगा
नाग
सेल्वी
दुसरं मत
मांजर-घरात
धार

ईश्वर आणि चांभार
भुकेला पोरगा
एमडेन

# लेखकाचे मनोगत

लघुकथा ही, लेखकाला कष्टाच्या अशा कामातून छान असा विरंगुळा मिळवून देते. कादंबरी, मग ती चांगली असो वा वाईट, छापण्यायोग्य असो-नसो, त्यात बरेचसे कष्ट समाविष्ट असतात. साधी साठ हजार शब्दसंख्येपासून लाखापर्यंतच्या शब्दसंख्येची कादंबरी ही सुरुवातीलाच दमछाक करून टाकणारी वाटत राहते; कारण अनिश्चित काळासाठी आपली एकाग्रता ताणून धरण्याची तिची मागणी असते. सध्याच्या परिमाणानुसार माझ्या कादंबऱ्या तशा लहान असतात. असे असले, तरी जेव्हा एखाद्या कादंबरीचं काम हाती असतं, त्यावेळी मला नेहमीच अवघडल्यासारखे आणि बेचैन वाटते. कारण महिनोन् महिने एकाच कामाला स्वत:ला बांधून ठेवावे लागते. अशा वेळेस एखाद्याची मन:स्थिती, जणू शिक्षा भोगणाऱ्यासारखी होते. लिहिलेले अन् लिहावयाचे शब्द कानात घुमत असतात, बाहेरचे इतर आवाज आणि संवेदना त्यामुळे बाजूला सारल्या जातात. पहिलं लेखन (खर्डा) जेव्हा आकाराला येतं, तेव्हा मोठाच भार हलका झाल्यासारखा वाटतो; पण ते समाधान अल्पजीवी असतं. पहिलं लेखन पुन्हा एकदा लिहून काढावं लागतं. पुन्हा तिसऱ्यांदा, चौथ्यांदा- ते परिपूर्ण होईपर्यंत (ही परिपूर्णता एक काल्पनिक प्रक्रियाच असते.) चालू राहतं आणि एखाद्या दिवशी काहीतरी- लहरीपणाने म्हणा, निर्णय घेवून ही लेखनप्रक्रिया थांबवायची अन् ते हस्तलिखित प्रकाशनाकडे पाठवून द्यायचं!

प्रत्येक कादंबरीलेखन हातावेगळं करताना, आता यानंतर पुन्हा दुसरी लिहायची नाही, अशी शपथ घेतो- एकदोन कथा लिहिण्याच्या प्रयत्नासाठीचा तो अनुकूल असा क्षण असतो. कथा लिहिण्याचा मला मोठा आनंद होतो. कादंबरीत जसं, बारकाईने अन् तपशिलाने उतरून ती कादंबरी उभी केली जाते, तसं गोष्टीच्या बाबतीत अजिबात नसतं. तपशील सूचित करायचा, केंद्रस्थानी लक्ष ठेवून किंवा कथेचा शेवट ध्यानात ठेवून लिहिलं, की झालीच कथा तयार!

कथालेखकासाठी भारतात अगणित विषय उपलब्ध आहेत. परंपरेतून मिळालेल्या संस्कृतीच्या विशाल वातावरणात असणारी अमर्याद अशी विविधता... प्रत्येकजण दुसऱ्यापासून एकदम भिन्न असा. केवळ आर्थिक स्तराचीच ही भिन्नता नसून राहणीमान, दैनंदिन जीवनातील व्यवहारज्ञान, दृष्टिकोन - या बाबतीतीलही विविधता. प्रमाणबद्धता, यांत्रिकता नसलेल्या आणि एकसुरीपणापासून मुक्त असलेल्या अशा समाजात रहाणं लेखकासाठी मोठं आव्हान देणारं असतं. अशा स्थितीत एखाद्या पात्राच्या (म्हणजे कथेच्या) निवडीसाठी लेखकानं नुसतं खिडकीतून पाहायचं असतं, बस.

कथा ही छोटीच असायला हवी, याबद्दल कुणाचंही दुमत नाही; तथापि लघुकथेची व्याख्या विविध पातळयांवर विविध तऱ्हांने हिशेबात घेतली जाते. अगदी वर्तमानपत्राच्या 'न्यूज स्टोरी'पासून वाङ्मयीन पातळीच्या गांभीर्याने - कथेचा पट, शेवट, तिची रचना आणि पोत, लेखकाने काय करावं, काय करू नये इथपर्यंत या चर्चा असतात. माझ्यापुरतं सांगायचं झाल्यास, एखादी व्यक्ती जेव्हा एखाद्या समस्येतून जाते- ती त्याच्या मनातली असो वा परिस्थितीतली- तिथे मला कथा सापडते. या संग्रहातल्या तीसएक

कथांमध्ये तुम्हाला दिसेल, की प्रत्येक कथेतलं मुख्य पात्र हे कुठल्यातरी समस्येला तोंड देत आहे अन् शेवटी एक तर ती समस्या सुटते किंवा समस्येसोबतच ते पात्र जगत राहतं; तथापि काही कथांत, एखाद्याच्या आयुष्यातले विशेष किंवा वैशिष्ट्यपूर्ण क्षण किंवा त्याच्या जगण्याची तऱ्हा दर्शविण्याशिवाय वेगळे काही नाही.

या संग्रहाला 'मालगुडी डेज' असं नाव देण्याचा माझा हेतू असा, की त्याला एक विशिष्ट भौगोलिक असं परिमाण मिळावं. मला अनेक वेळा विचारण्यात येतं - 'हे मालगुडी कुठे आहे?' यावर मला एवढंच सांगायचं असतं, की ते एक काल्पनिक असं नाव असून कोणत्याही नकाशात ते सापडणार नाही. (तरीही, शिकागो विद्यापीठाच्या प्रेसने प्रसिद्ध केलेल्या एका साहित्यविषयक नकाशात मालगुडी हे ठिकाण दाखविलेलं आहे!) मी जर म्हटलं, की मालगुडी हे गाव दक्षिण भारतात आहे, तर मी केवळ अर्धसत्य सांगितलं असं होईल; कारण मालगुडीतली ही स्वभाववैशिष्ट्यं तर मला जगात सर्वत्र दिसत असतात.

मालगुडीतली माणसं तर मी न्यूयॉर्कमध्येसुद्धा पाहू शकतो. उदाहरण द्यायचं तर, 'वेस्ट ट्वेन्टी थर्ड स्ट्रीट' इथे मी काही महिने राहिलो होतो, तिथलं देता येईल. 1959 पासून माझं इथे नेहमी जाणं-येणं राहिलं आहे. ही जागा मालगुडीची सगळी वैशिष्ट्यं सांभाळून होती. रस्ते आणि माणसं यात काहीच बदल झालेला नव्हता. सिनॅगॉनच्या रस्त्यावर रेंगाळणारे तेच दारुडे, चमकदार अक्षरांच्या, दुकानांवरच्या त्या पाट्या - या दुकानांतली प्रत्येक वस्तू आठवड्यातच संपून जाते! सगळया मालावर पन्नास टक्के सूट, केव्हाही! - असे फलक, तो न्हावी, तो दातांचा डॉक्टर, वकील आणि मासेमारीचे हूक्स-जाळी-काठ्यांचे ते जाणकार, मांस-चीज विक्रीची दुकानं. (एकाने तर माझं स्वागत केले होतं. 'अरे! एवढी दिवस तुम्ही कुठे होता? आणि सध्या तुम्ही दूध-तांदूळ कुठून घेत असता?' खरं म्हणजे, त्या ट्वेन्टी थर्ड स्ट्रीटचा, इतकेच काय, अमेरिकेचाही काही कायमचा रहिवासी नव्हतो, याची त्याला पुसटशीदेखिल जाणीव नव्हती.)... ही सगळी जशी होती, तशीच राहिली होती; आपल्या अविचलीत आणि शाश्वत अशा परिचयाचं ते वातावरण त्याहीपेक्षा, जेव्हा मी चेल्सिया हॉटेलला फार वर्षानंतर पुन्हा एकदा गेलो, तेव्हा त्या मॅनेजरने मिठी मारून माझं उत्स्फूर्त असे स्वागत केलेच, शिवाय त्याच्या सहकाऱ्यांची माझ्याशी ओळख करून दिली. (जे हयात होते -) त्यांची भेट करून दिली. त्यांत एक गृहस्थ- एकशे सोळा वर्षांचे होते, ते इथले कायमचे रहिवासी होते. ज्यावेळी मी इथे आलो होतो, तेव्हा ते नव्वदीचे असावेत.

मालगुडी हे अशा तऱ्हेने कल्पनेतलं असलं, तरी माझ्या लेखनकामासाठी फार उपयोगी ठरलेलं आहे; तथापि मला कितीही वेळा विचारलं तरी मी यापेक्षा जास्त असं मूर्त स्वरूप देऊ शकत नाही. जेव्हा लंडनच्या एका उत्साही टीव्ही निर्मात्याने मला गाठले आणि मालगुडीला नेऊन त्याला तो परिसर दाखवावा, कादंबरीतल्या त्या सगळया पात्रांची ओळख करून द्यावी, असं सांगू लागला- त्याला त्यावर तासाभराची एक डॉक्युमेंटरी करायची होती- त्यावेळी मला क्षणभर धक्काच बसला. मी मोठ्या नम्रतेने म्हणालो,

''मी एका कादंबरीच्या लेखनात व्यस्त आहे.''

''मालगुडीवर आणखी एक कादंबरी?'' त्याने विचारले.

''होय.'' मी म्हणालो.

‘‘ती कशाबद्दल आहे?’’
‘‘मानवी आत्मा असलेल्या वाघाबद्दल.’’
‘‘वा! फारच इंटरेस्टिंग! मला असं वाटतं, की मी सध्या थांबावं. माझ्या डॉक्युमेंटरीमध्ये या वाघाचा समावेश करणं फारच छान राहील...’’

- आर. के. नारायण
सप्टेंबर 1981

# अनुवादाचं गाणं

एखाद्या पुस्तकाचा अनुवाद करणं म्हणजे मोठ्या गायकाने गायिलेलं गाणं आपल्या आवाजात म्हणून दाखविणं. ते गाणं आपल्या आवाजात, आपल्या तऱ्हेनं म्हणताना मनात त्या गाण्याचं भान असतं अन् त्याचबरोबर आपली तऱ्हा, आपली मर्यादा याचंही. वाचणारासुद्धा हे भान ठेवूनच वाचतो. 'मालगुडी डेज्'च्या अनुवादाच्या दरम्यान मला हा अनुभव सारखा येऊ लागला. हिंदी कथांचे अनुवाद केले होते; पण हा अनुभव पहिलाच. आर. के. नारायण आणि आर. के. लक्ष्मण हा नातेसंबंध, मग आर. के. लक्ष्मण यांचा व्यंगचित्रकलेशी संबंध अन् त्यानंतर माझं व्यंगचित्रांशी असलेलं नातं- या अशा गमतीदार मार्गाने 'मालगुडी डेज्'च्या अनुवादाबद्दल मला विचारणा झाली. 'मालगुडी डेज्' ही सीरियल मी पाहिली होती. आवडलेलीही होती. तो संग्रह वर्षापूर्वीच प्रसिद्ध झालेला होता.

संग्रह वाचला आणि जाणवल्या त्या गोष्टी. माडगूळकरांच्या कथांशी कुठेतरी नातं सांगणाऱ्या या गोष्टी. त्यांतला साधेपणा... मालगुडीतल्या माणसांचं सरळ सरळ वागणं आणि सरळपणाने अनुभवलेलं सुखदु:ख जाणवलं आणि अनुवादाचं हे गाणं मी म्हणायला घेतलं.

'ऍस्ट्रॉनॉमर्स डे', 'लॉली रोड' या संग्रहातल्या. आणि काही नवीन अशा मिळून एकूण 32 गोष्टींचं संकलन 'मालगुडी डेज्' या संग्रहात आहे. या सगळ्या गोष्टींचं वैशिष्ट्य म्हणजे, त्या लहान अशा पाच ते बारा- तेरा पृष्ठांच्या गोष्टी आहेत. अपवाद फक्त एका गोष्टीचा - 'सेकंड ओपिनियन' या कथेचा. अठ्ठावीस पृष्ठांची ही दीर्घकथा.

या गोष्टींचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अघळपघळ तऱ्हेने - गोष्टीवेल्हाळ पद्धतीने मालगुडीमधल्या माणसांच्या सुखदु:खाच्या सांगितलेल्या या हकिकती. काही गोष्टी, या गोष्टीवेल्हाळ माणसाने स्वत:च सांगितल्या आहेत. हा गोष्टीवेल्हाळ माणूस (टॉकेटिव्ह मॅन) आर. के. नारायण.

अनुवाद करताना आठवलं, की वीसपंचवीस वर्षांपूर्वी, आर. के. नारायण यांचं, आर. के. लक्ष्मण यांनी रेखाटलेलं एक कॅरिकेचर 'स्पॅन' मासिकात प्रसिद्ध झालं होतं - 'टॉकेटिव्ह मॅन' या शीर्षकाने. हे चित्र माझ्या संग्रहात असल्याचं आठवलं अन् शोधाशोध केली. चित्र सापडलं अन् वाटू लागलं, या संग्रहाच्या 'ब्लर्ब'साठी यापेक्षा सुरेख असं काय असणार? मग काय, हे कॅरिकेचर 'ब्लर्ब'वर वापरायची परवानगी मिळावी म्हणून आर. के. लक्ष्मण यांचा पत्ता मिळविला. त्यांना फोनवर बोललो. 'यूज इट, यूज इट, डोंट वरी!' अशा शब्दांत त्यांनी परवानगी दिली. एका भावाच्या कथांचा अनुवाद करताना, दुसऱ्या तेवढ्याच मोठ्या भावाचा संपर्क आला, हा अनुभव मला अद्भुत असा होता. साकेतने मला ही संधी दिली, त्याबद्दल त्याचे मन:पूर्वक आभार.

'साकेत'चे आर्टिस्ट श्री. संतुक गोलेगावकर. 'मालगुडी'च्या हिंदी-इंग्रजी संग्रहांच्या मुखपृष्ठांचा विचार करून, त्याने जे स्वतंत्र मुखपृष्ठ तयार केले, त्याचाही सहभाग या अनुवाद-प्रयत्नात आहेच.

- मधुकर धर्मापुरीकर

# ज्योतिषाचा दिवस

नित्यनेमाने दुपारच्या वेळेस तो आपली पडशी उघडायचा. त्यातून त्याच्या व्यवसायाच्या वस्तू काढून मांडायचा- त्यात असायच्या डझनभर कवड्या, गूढ-अगम्य आकृत्या असलेले चौकोनी कापड, एक टिपणवही आणि हस्तसामुद्रिक लिखाणाचे मांडलेले कपटे. त्याची चमकदार तीक्ष्ण नजर सतत आपल्या गिऱ्हाइकाच्या शोधात राहायची. हीच नजर, त्याच्याकडे येणाऱ्यासाठी मात्र मोठी आशादायक आणि आध्यात्मिक अशी वाटायची. कपाळभर भस्म, लाल गंधाने रंगविलेले असे कपाळ, काळयाभोर मिशा, यात गुंतलेल्या त्याच्या डोळयांची चमक अधिक जाणवायची इतकेच काय, त्याच्या अर्धमिटल्या डोळयांतून अद्‌भुत असं काहीतरी जाणवायचं आणि या सगळयांवर ताण म्हणजे डोक्यावर बांधलेला त्याचा केशरी फेटा. चेहऱ्याची अन् पेहरावाची ही रंगसंगती कधीही फसली नव्हती. एखाद्या गेंदेदार फुलाकडे मधमाशांनी आकर्षित व्हावे, तशी माणसं त्याच्याकडे ओढली जायची. टाऊन हॉल पार्ककडून येणाऱ्या रस्त्यात भरगच्च चिंचेच्या झाडाखाली तो बसलेला असायचा. ही जागा मोठी महत्त्वाची होती, त्याच्या दृष्टीने. रात्रंदिवस या अरुंद रस्त्यावरून येणाऱ्याजाणाऱ्यांची वर्दळ असायची. विविध धंदेवाल्यांनी हा रस्ता भरलेला असायचा. जडीबुटी विक्रेते, भंगार विक्रेते, जादूगार, कपड्यांचा लिलाव करणारे, गावातल्या लोकांचं लक्ष वेधून घेणाऱ्या निरनिराळया आवाजांचा नुसता कोलाहल राहायचा. त्याच्या शेजारी मसाला-शेंगदाणे मोठ्या आवाजात विकणारा तो विक्रेता; दररोज आपल्या मालासाठी नवीन नाव देऊन पुकारा करायचा- कधी बॉम्बे आईस्क्रिम, कधी दिल्लीचे बदाम, तर कधी राजाचा खुराक अशा तऱ्हेने त्याची विक्री व्हायची आणि लोकही त्याच्याकडे ओढले जायचे.

बरेच जण या ज्योतिषासमोर बसून असायचे. शेजारच्या शेंगदाणेवाल्याच्या ढिगाजवळून भणभणणाऱ्या दिव्याच्या प्रकाशात या ज्योतिषाचा धंदा-व्यवहार चालायचा. या जागेवर म्युनिसिपाल्टीचे दिवे नसायचे. इथे असायचा आजूबाजूच्या दुकानांतून येणारा, उघड्यावर विक्री करणाऱ्यांच्या दिव्यांचा प्रकाश. कुणाकडे फरफरणाऱ्या गॅसबत्त्या, तर कुणाकडे पेटलेले चुडे, एक दोघांकडे सायकलला लावल्या जाणाऱ्या दिव्यांसारखे दिवे. ज्योतिषाकडे स्वत:ची अशी प्रकाश-व्यवस्था नसायची. वेड्या-वाकड्या छायाप्रकाशांचा असा गोंधळ ज्योतिषासाठी खरं म्हणजे फारच सोईचा होता. त्याला हे सगळे वातावरण अगदी योग्य; किंबहुना अधिकच सोईचे होते, त्याचे कारणही तसे साधेच : व्यवसायाची सुरुवात केली, तेव्हा ज्योतिषाला या शास्त्राची काही एक माहिती नव्हती. त्याचा तसा इरादाही नव्हता. समोरच्या गिऱ्हाइकाच्या आयुष्यात पुढे काय घडणार हे जसं त्याला माहीत नव्हतं, तेवढंच स्वत:च्या भविष्याबद्दल तो चक्क अनभिज्ञ होता. त्याच्याकडे येणाऱ्या अजाण अशा माणसांच्या ग्रहांबद्दल त्याला जेवढे अज्ञान, तेवढेच स्वत:च्या आयुष्यातल्या ग्रहांबद्दल होते. तरीही, त्याच्याकडे येणारा माणूस त्याच्या बोलण्यात गुंतून जायचा. चकित व्हायचा. त्याचं समाधान व्हायचं. हे सगळं ज्योतिषाने साधलं ते केवळ सवयीने, अभ्यासाने आणि धूर्तपणाने अंदाज बांधायच्या त्याच्या चलाखीने. खरं सांगायचं म्हणजे रोजंदारी करणाऱ्या एखाद्या प्रामाणिक माणसाइतकंच त्याचंही काम मेहनतीचं

होतं आणि रोजगाराच्या मिळकतीच्या लायकीचं होतं.
कसलीही योजना वा विचार न करताच ज्योतिषाने आपले गाव सोडले होते. तो गावातच राहिला असता तर वडिलोपार्जित शेतीवाडीत त्याने काम केले असते. संसार केला असता अन् वडिलोपार्जित घरात आयुष्य काढले असते; पण तसं होणार नव्हतं. कुणालाही न सांगता त्याला घर सोडावं लागलं होतं- आणि शंभर मैलांवर येईपर्यंत दमही घेता आला नव्हता. एखाद्या खेडुताला एवढा प्रवास म्हणजे समुद्रापार पोहून जाण्यासारखा.
मानवी जीवनाच्या व्यथा, विवाहसंबंध, पैशाचे व्यवहार अन् आयुष्याचं त्रांगडं या सगळयांबद्दल ज्योतिषाकडे एक व्यावहारिक पातळीवरचं विश्लेषण असायचं. अनुभवही होता. या दीर्घ अनुभवामुळे त्याचं निरीक्षण अधिक तीक्ष्ण झालेलं होतं. पाचच मिनिटांत तो ओळखायचा - काय गडबड आहे, काय विवंचना आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी तीन पैसै तो आकारीत असला, तरी समोरचा माणूस दहा मिनिटं बोलेपर्यंत तो स्वत:चं तोंड उघडायचा नाही. त्या माणसाच्या सांगण्यातूनच ज्योतिषाला त्याच्या समस्येची उत्तरं मिळायची; सल्लाही सुचायचा. तळहाताच्या रेषांवर लक्ष केंद्रित करून समोरच्या माणसाला जेव्हा तो सांगायचा- तुम्ही केलेल्या कष्टाचे चीज सहसा होत नाही...तेव्हा दहापैकी नऊजण त्याच्याशी सहमत व्हायचेच. त्यांना पटायचं किंवा कधी तो विचारायचा- तुमच्या कुटुंबातली किंवा नात्यातली एखादी स्त्री आहे का, ती तुमच्याकडे म्हणावे तसे लक्ष देत नाही... किंवा तो व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषणही करून दाखवायचा - बऱ्याचशा समस्या या तुमच्या स्वभावामुळे उद्‌भवल्या आहेत. त्याच्यामुळेच तुमच्यामागे शनी लागून आहे. तुम्ही बाहेरून कठीण वाटता; पण आतून भाबडे अन् उत्साही असे आहात. धडाडीचे आहात... असं ऐकलं, की माणूस बदलून जायचा. इतकेच काय त्याला असंही वाटून जायचं - आपल्यात न आवरता येण्यासारखी धडाडी आहेच!
आपल्यासमोरचा दिवा विझवून शेंगदाणेवाला उठला अन् घराकडे जाण्यासाठी निघाला. ज्योतिषासाठी हा इशारा होता, की त्यानेही आता आवरावे. कारण आता कुठून तरी येऊन त्याच्यासमोरच पडलेली फिकट प्रकाशाची तिरीप वगळता तिथे अंधारच राहिलेला होता. त्याने आपल्या कवड्या व इतर साहित्य आवरले. आपल्या पडशीत तो ते टाकू लागला अन् समोरच्या प्रकाशात सावली दिसली. त्याने वर पाहिले. एक माणूस त्याच्यापुढे उभा होता. त्याला लक्षात आले, भविष्य विचारण्यासाठी हा आलेला आहे. ज्योतिषी म्हणाला, ''तुम्ही चिंताग्रस्त दिसत आहात. खाली बसून मला सांगा काय ते, मी मदत करतो...'' माणसानं अर्धवट असं पुटपुटल्यासारखं उत्तर दिलं. ज्योतिषाने आग्रह धरला, तसा त्या माणसाने आपला तळवा नाकाखाली फिरवीत सावकाश विचारले, ''तू स्वत:ला ज्योतिषी म्हणवतोस?'' ज्योतिषाला हे एक प्रकारचे आव्हान वाटले आणि माणसाचा तळवा उजेडाकडे धरून तो सांगू लागला -
''तुमचा स्वभाव...''
''थांब! मला काही मुद्देसूद असं सांगा.''
आपला ज्योतिषी थोडा चिडला मनातून. म्हणाला, ''मी एका प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी तीन पैसे घेतो.''
माणसाने पटकन आपला तळवा मागे घेतला. एक आणा काढला अन् ज्योतिषासमोर

टाकला. म्हणाला,
‘‘मला काही प्रश्न विचारायचे आहेत. तू काहीतरी खोटंनाटं सांगितल्याचं सिद्ध झालं, तर हा आणा व्याजासहित मला परत द्यावा लागेल.’’
‘‘अन् जर माझी उत्तरं खरी असली, तर मला पाच रुपये देशील?’’
‘‘नाही.’’
‘‘बरं आठ आणे देशील?’’
‘‘ठीक आहे; पण तुझं जेवढं चुकलं, तेवंढ दुप्पट मला द्यावं लागेल’’ अनोळखी माणूस म्हणाला. थोडी घासाघीस झाली अन् ठरलं. ज्योतिषाने मनात देवाचे नाव घेतले आणि माणसाने चिरूट पेटविला. त्या प्रकाशात ज्योतिषाचे लक्ष त्याच्या चेहऱ्याने वेधून घेतले. रस्त्यावरून कार निघून गेली. टांग्याच्या घोड्यावर टांगेवाल्याचे कातावणे, संध्याकाळच्या छाया-प्रकाशात रस्त्यावरचा, चौकातला वर्दळीचा आवाज... यामुळे व्यत्त्यय आला. चिरूट ओढत माणूस आडमुठेपणाने बसला होता. ज्योतिषाला कसे असुरक्षित वाटून गेले.
‘‘घेऊन जा हा आणा परत. मला अशा कामाची सवय नाही. आधीच वेळ झालीय मला परतायला.’’ ज्योतिषी सांगू लागला अन् सामान आवरू लागला. माणसाने त्याचे मनगट धरले. ‘‘नाही, तू नाही जाऊ शकणार. मी रस्त्याने जात होतो, तर तुझ्यामुळेच मी आलो इकडे!’’ माणसाच्या पकडीने ज्योतिषाला कंप सुटला. तो घाबरला.
‘‘आज मला जाऊ दे. उद्या मी तुला सांगेन तुझे भविष्य.’’
माणसाने त्याचा पंजा ज्योतिषासमोर धरला. ‘‘नाही, ठरलं ते ठरलं. तू वचन दिलेस. सांग आता!’’ ज्योतिषाचा घसा सुकून गेला. घोगऱ्या आवाजात तो बोलू लागला- ‘‘तुमच्या आयुष्यात एक स्त्री...’’
‘‘चूप बस! मला ते काही ऐकायचे नाही. मी जो शोध घेतो आहे, त्यात मी यशस्वी होईल का नाही, एवढेच सांग आणि जा. नाही तर दिलेले सगळे पैसे वसूल करूनच मी निघेन, लक्षात ठेव!’’ ज्योतिषाने काही मंत्र पुटपुटले आणि तो सांगू लागला-
‘‘ठीक आहे. मी सांगेन; पण एक सांग, माझे म्हणणे तुला पटले तर मला तू एक रुपया देशील? तसं नसेल, तर मी माझे तोंड उघडणार नाही. मग तुला जे वाटेल ते कर!’’
थोडी घासघीस केल्यावर माणूस तयार झाला. ज्योतिषी मग सांगू लागला-
‘‘तू मेलास म्हणून तुला टाकून देण्यात आले होते...बरोबरय ?’’
‘‘हो... पुढे सांग!’’
‘‘एकदा तुझ्या पोटात चाकू भोसकलेला होता.’’ ज्योतिषी सांगू लागला.
‘‘वा! बरोबरय’’ माणसाने त्याची छाती उघडून जखम दाखवली.
‘‘...आणि त्यानंतर तुला जवळच्या विहिरीत ढकलून देण्यात आले होते, मेलास समजून...’’
‘‘खरंच... बाजूने जाणाऱ्या एका माणसाने विहिरीत डोकावले नसते, तर माझा प्राण गेलाच असता.’’ माणूस उत्साहाने आणि उत्तेजित होऊन बोलू लागला. मूठ आवळून त्याने मग विचारले - ‘‘मी त्या माणासला कुठे गाठू शकेन सांग. मला बदला घ्यायचा आहे.’’
‘‘पुढच्या जन्मात...’’ ज्योतिषाने उत्तर दिले- ‘‘चार महिन्यांपूर्वीच एका दूरच्या शहरात त्याला मरण आले आहे. तुला आता तो कधीच भेटू शकणार नाही...’’ हे ऐकून माणूस

हळहळला. ज्योतिषी सांगू लागला-
‘‘गुरू नायक!’’
‘‘अरे! तुला माझे नावही माहीत आहे!’’ माणसाला धक्का बसला.
‘‘मला सगळंच माहीत आहे, गुरू नायक! लक्षपूर्वक ऐक आता. इथून उत्तरेकडे दोन दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर तुझे गाव आहे. आता गाडी गाठ आणि जा गावाकडे. घरापासून दूर आलास आणि मला पुन्हा तुझ्या आयुष्यात धोका दिसतो आहे...’’ ज्योतिषाने चिमूटभर राख काढून त्याच्यासमोर धरली. ‘‘तुझ्या कपाळाला लाव आणि नीघ. आणि इथून पुढे पुन्हा दक्षिणेकडे प्रवास करू नकोस तू. शंभर वर्षांचं आयुष्य आहे तुला...’’
‘‘मी काय उगीच घर सोडले होते - मी केवळ त्या माणसाच्या शोधात इथे तिथे फिरत होतो. तो सापडला असता, तर त्याचा सूड घेणार होतो...’’ निराशेने माणसाने आपली मान हलविली.
‘‘... तो निसटला बेटा माझ्या हातून ... त्याला सुखाचं मरण आलं नसावं, नक्कीच...’’
‘‘होय.’’ ज्योतिषी सांगू लागला- ‘‘एका ट्रकखाली त्याचा चेंदामेंदा झाला!’’ माणसाला हे ऐकून आनंद झाला.
रस्ता आता निर्मनुष्य झाला होता. ज्योतिषाने आपले सामान आवरले. परिसरात आता अंधार आणि शांतता भरून राहिली होती. त्या अनोळखी माणसाने मूठभर नाणी दिली होती अन् तो आता अंधारात दूर निघून गेला होता.
ज्योतिषी घरी परतला, तेव्हा बरीच रात्र झाली होती.
त्याची बायको दारात येऊन त्याची वाट पाहत होती. ती रागावली. ज्योतिषाने तिच्यापुढे नाणी टाकली अन् म्हणाला, ‘‘मोज ती! एका माणसाने दिलीत.’’
‘‘साडे बारा आणे!’’ मोजून बायकोने सांगितले. तिला फार आनंद झाला होता. ‘‘उद्या आता मी गूळ-खोबरे आणते. काही गोडधोड करावं म्हणून फार दिवसांपासून पोरं मागे लागली आहेत. त्यांच्यासाठी मी आता काही चांगलं करते.’’
‘‘हरामखोराने फसविलं मला! त्याने एक रुपया कबूल केला होता मला!’’ ज्योतिषी म्हणाला. बायकोने त्याच्याकडे पाहिले -‘‘तुम्ही बेचैन दिसता आहात, काही बिघडलं का...’’
‘‘काही नाही...’’
रात्री जेवण झाल्यावर चटईवर बसून ज्योतिषी सांगू लागला- ‘‘डोक्यावरून मोठं ओझं उतरलं बघ माझ्या! मला इतके दिवस वाटत होतं, की माझे हात रक्ताळलेले आहेत. माणसाच्या रक्ताने माखलेले आहेत... त्याच कारणामुळे मी माझ्या गावापासून एवढ्या दूरवर निघून आलो, इथं राहिलो, तुझ्यासोबत संसार केला... तो-तो जिवंत आहे..’’
बायकोने श्वास रोखून विचारले- ‘‘तुम्ही त्याला ठार मारायचा प्रयत्न केला होता नं...’’
‘‘होय... आमच्या गावात... जेव्हा मी तरुण वयातला, नादान असा होतो... त्या दिवशी आम्ही दारू प्यालो... जुगार खेळला आणि भरपूर भांडून घेतले... जाऊ दे! आता त्याचा कशाला विचार! झोपेची वेळ झालीय...’’
ज्योतिषाने जांभई दिली आणि चटईवर आता मोकळया अंगाने ताणून दिली.

# चुकलेलं टपाल

विनायक मुदाली गल्ली आणि त्या गल्लीशी समांतर चार गल्ल्या एवढाच भाग त्याच्या बिटमध्ये असायचा; पण तेवढं संपवून मार्केट यार्डच्या आपल्या मुख्य कार्यालयात हिशेब द्यायला जाईपर्यंत जवळपास सहा तास लागायचे. ज्यांना पत्रं पोचवायची त्यांच्या सुख-दु:खातसुद्धा सहभागी व्हायची त्याची सवयच होती. क्रमांक तेरा- कबीर गल्लीतला तो माणूस; आयुष्यभराची त्याची सवय-पत्राच्या चौकशीसाठी तो स्वत:च अर्ध्या रस्त्यापर्यंत यायचा. थनप्पाने त्याला अगदी तरुण वयापासून पाहिलेलं आहे. दररोज पाहतो आहे. घराबाहेर ओट्यावर बसून असतो दिवसभर. आता वय झालेलं आहे आणि दररोज त्याची आशा असते- शब्दकोड्यांच्या स्पर्धेत एखादं मोठं बक्षीस लागेलच, एखादे दिवशी! ‘‘नाही, काही बक्षीस नाही’’ थनप्पा त्याला सांगतो दररोज आणि सांगून जातो- ‘‘जाऊ द्या, नाराज होऊ नका. लागेल बक्षीस तुम्हाला.’’ कुण्या बाईला पत्र देताना तो सांगायचा, ‘‘हैदराबादच्या तुमच्या मुलाचं पत्र आलं पहा... आता किती मुलं आहेत त्याला बाई?’’ ‘‘अं! मला माहीतच नाही, तुम्ही नोकरीसाठी मद्रासला अर्ज टाकला ते. मला सांगावंसुद्धा वाटलं नाही, अं! हरकत नाही, जेव्हा मी नियुक्तीचे आदेश आणून देईन, तेव्हा तुम्ही मला खोबऱ्याचं पायस दिल्याशिवाय जाऊ देणार नाहीत, माहितंय मला!’’ ...आणि अशा प्रत्येक घरी तो बोलत थांबायचा. विशेषत: कुणाची मनीऑर्डर आली, की त्या वेळी तो प्रशस्त बैठक मारून बसायचा. बॅग उघडून पैसे मांडायचा. मिळालेल्या या पैशाचा काय काय खर्च होणार हे विचारल्याशिवाय उठायचा नाही. उन्हाचे दिवस असतील तर त्याला कुणाकडे लोटाभर ताक मिळायचे आणि तो बसून ताकाचा सावकाश आस्वाद घ्यायचा. बिटमधला प्रत्येकजण त्याच्याबद्दल आस्था बाळगायचा. प्रत्येकाच्या अस्तित्वाचा, आशा-आकांक्षांचा, कृतिशीलतेचा जणू तो एक भागच होता - थनप्पा.

बिटमधल्या सगळया घरांपैकी तो जादा गुंतून असायचा, एका घरात- क्रमांक दहा, विनायक मुदाली गल्ली. रामानुजम, महसूल खात्यातला वरिष्ठ लिपिक. एका पिढीपासून थनप्पा या पत्त्यावर पत्रव्यवहार पोहोचता करतो आहे. रामानुजम यांच्याशी थनप्पाचे भावनिक संबंध किती वर्षांपासून गुंतलेले आहेत! रामानुजम यांची बायको त्या वेळी गावाकडे गेलेली होती. एक पोस्टकार्ड रामानुजम यांच्या पत्त्यावर आले होते. सवयीने थनप्पाने सॉर्टिंग टेबलावरच पत्रावरून नजर फिरविली आणि बटवड्यासाठी तो बाहेर पडला. त्याने सरळ विनायक मुदाली गल्ली गाठली. आपल्या बिटातली जवळपास दीडशे घरं ओलांडून तो सरळ रामानुजम यांच्या घरी आला. दारावर टकटक करून त्याने मोठ्याने आवाज दिला होता- ‘‘पोस्टमन. सर, पोस्टमन! ‘‘रामानुजमनी दार उघडताच तो म्हणाला होता- ‘‘सर, आधी तोंड गोड करा माझं; पत्र आणलंय! अभिनंदन! बाप झाला तुम्ही; एवढ्या वर्षांची प्रार्थना! आता मुलगी झाली म्हणून तक्रार करू नका. मुलगी म्हणजे, तुम्हाला माहीत आहे नं, मुलगी म्हणजे लक्ष्मी असते!... कामाक्षी... किती गोड नाव आहे...’’

‘‘कामाक्षी’’- काही वर्षांनंतर थनप्पाने हाक मारली - ‘‘तुझा फोटा तयार ठेव! अरे, लाजायला काय झालं? हे बघ, आजोबांचं पत्र आहे तुझ्या. कशाला पाहिजे बरं तुझा फोटो

त्यांना, अं...''
''आजकाल आजोबांची फार पत्रं यायलीत, नाही का?'' रामानुजमकडे पत्र देत तो म्हणाला आणि पत्र उघडून वाचून होईपर्यंत थांबला. पत्र वाचून रामानुजम काळजीत पडल्यासारखे दिसू लागले.
''काय... शुभ वर्तमान आहे काही...'' व्हरांड्याच्या खांबाच्या आधाराने थनप्पाने विचारले. टपालाचा गठ्ठा अजून वाटायचा राहिलेला होता.
''माझ्या सासऱ्यांना वाटत आहे, की मुलीसाठी स्थळं पाहण्यात माझ्याकडून टाळाटाळ होत आहे.'' रामानुजम सांगू लागले-
''... त्यांनी दोनतीन वेळा प्रयत्न केला. जमलं नाही. त्यांना वाटतं- मी अगदी निष्काळजी आहे...''
''वडिलधाऱ्या माणसांना धीर नसतो. चालायचंच...'' पोस्टमन म्हणाला.
''खरी अडचण अशी आहे, की त्यांनी पोरीच्या लग्नासाठी पाच हजार रुपये काढून ठेवलेले आहेत आणि माझ्याकडून त्यांची एवढीच अपेक्षा आहे, की मी लवकरात लवकर स्थळ पाहावं, सोपं आहे ते... पण पैशाने सगळंच काही जमतं असं नाही...'' रामानुजम सांगू लागले.
''नाही, नाही, जोपर्यंत दैवात लिहिलेली वेळ येणार नाही, काही होऊ शकत नाही. धीर धरावा...'' पोस्टमन म्हणाला.
दिवसामागून दिवस गेले. थनप्पा पत्र टाकू लागला. चांगल्या बातमीची वाट पाहू लागला. ''नवं काही नाही थनप्पा'', ''टिपण काही जमलं नाही थनप्पा...'' ''त्यांच्या फार अपेक्षा आहेत...'' ''त्यांना पोरगी पसंत नसल्याचं दिसत आहे...'' रामानुजम सांगायचे.
''पसंत नाही...! पोरगी राणीसारखी आहे आपली... एखादा आंधळाच नापसंत म्हणू शकेल पहा तिला.'' पोस्टमन म्हणायचा. नापसंती सांगणाऱ्या स्थळांवर नाराज व्हायचा. त्यांना टोमणे मारायचा.
लग्नाच्या तिथ्या आता संपत आल्या होत्या. आता केवळ तीन तिथ्या राहिल्या होत्या. त्यांपैकी, वीस मे - ही एक होती. पोरगी आता सतरा वर्षांची होणार. तिकडून आजोबांच्या पत्रांतून आता नाराजी व्यक्त होऊ लागली. स्थळांसाठी केलेले सगळे प्रयत्न निष्फळ ठरू लागले. रामानुजम निराश होऊ लागले, थकून जाऊ लागले. हतबल झाले.
''पोस्टमन, मला जावई मिळणारच नाही असं वाटतं बघ...'' रामानुजम म्हणाले.
''असं काही अशुभ बोलू नका सर. ईश्वर पाठीशी असला तर...'' विचारात पडलेला पोस्टमन सांगू लागला, ''दिल्लीला एक मुलगा आहे पहा लग्नाचा! महिना दोनशे रुपये पगार आहे त्याला! मंदिराच्या गल्लीतल्या मुकुंदाने त्याच्यासाठी प्रयत्न केला होता. मुकुंदा अन् तुम्ही एकाच गोत्रातले नं?''
''हो...''
''अनेक महिन्यांपासून ते प्रयत्नात होते पहा. शे-दीडशे तरी पत्रं त्यांनी एकमेकांना पाठविली असतील; पण परिणाम काही झाला नाही. परवाच्या पत्रात त्यांनी शेवटचा प्रस्ताव मांडला अन् हे नाराज झाले! का, तर एवढा महत्त्वाचा प्रस्ताव त्यांनी साध्या कार्डावर पाठवावा! आता पहा! आजकाल मी पाहतो, कितीतरी महत्त्वाचे निरोप साध्या

कार्डावर कळविले जातात, त्यात काय एवढं! तो राजप्पा नाही का, दोन वर्षांपूर्वी अमेरिकेला गेला होता, तर दर आठवड्याला आपल्या पोरांना पत्र पाठवायचा, तो साध्या पिक्चर कार्डावर!'' थोडं थांबून थनप्पाने विषयांतर आवरले आणि म्हणाला, ''मी मुकुंदाकडून टिपण आणतो, आपण पाहू...'' दुसऱ्या दिवशी थनप्पा टिपण घेऊन आला. ''मुलाचे आईवडीलसुद्धा दिल्लीलाच आहेत. तुम्ही सरळ तिकडेच पत्र पाठवा आणि आता वेळ घालवू नका.''

आशेच्या किरणाने रामानुजमच्या घराला स्पर्श केला.

''शंभर पत्रं वाटायची राहिलीत; पण या पत्त्यावर मी दिल्लीचा स्टॅम्प पाहिला, अन् सरळ आलो पहा तुमच्याकडे! पहा बरं, काय लिहिलंय त्यांनी- सांगा मला!'' थनप्पा म्हणाला. उत्सुकतेमुळे त्याची घाई जाणवत होती.

''वा! फोटो पाहून त्यांनी पसंती दिली की! किती पटकन् कळविलं बघ त्यांनी!''

''हंऽऽ'' थनप्पा खुशीत बोलू लागला, ''आता दररोज एक पत्र राहील! मला तर आता कामाक्षीच्या लग्नापर्यंत सुटीच घ्यावी लागणार बरं का!'' घरातले सांगू लागले-

''तुम्ही असं बोलत आहात, की ती माणसं उद्याच येणार आहेत वरात घेऊन! आणखी किती अडथळे येतील, देवाला ठाऊक! फोटो पसंत पडला म्हणजे सगळं काही जमलं असं थोडंच आहे!''

आता घरात एकाच प्रश्नाची चर्चा होऊ लागली - एका दिवसासाठी मुलाकडची मंडळी मद्रासला येणार आहेत. तेव्हा, रामानुजम यांनी कामाक्षीला घेऊन तिथे जावं अन् भेटून यावं. असं करावं का... या प्रश्नाची एवढी चर्चा झाली, की रामानुजम व त्यांची आई अन् बायको यांच्यात काही एकमत होईना. प्रत्येकजण आपापले मुद्दे हिरिरीने मांडू लागला. ''मुलीला बाहेर घेऊन दाखवायला नेलं, तर सगळ्या गावाला हसायला निमित्त होईल ते!'' रामानुजमची बायको सांगायची ''काय विक्षिप्तपणा हा! अशा विचित्र रीतीरिवाजात आपण अडकलो, तर आपण लग्नाचा कधी विचारच करू शकणार नाहीत. मुलीला घेऊन दिल्लीला जावं लागलं, तरी जावं आपण - ते आपलं कर्तव्यच आहे!''

''तुम्हाला जावं वाटतं, तर जा की खुशाल! मग मला काय विचारता?''

वाद-चर्चा वाढतच गेली अन् काही उपाय सुचेना. पोस्टमनला, आजकाल त्याचं काम आटोपलं, की घरात डोकावून जायची सवय लागली होती. ''मी तिऱ्हाईत माणूस आहे; पण साहेब, तुम्ही माझं ऐकावं असं वाटतं. तुम्ही सरळ गाडी गाठा अन् कामाक्षीला घेऊन ताबडतोब जा मद्रासला! वर्षभराच्या पत्रव्यवहारानं जे साधलं गेलं नाही ते केवळ तासाभराच्या भेटीतून साधूनही जाईल, कुणी सांगावं!''

''पत्र आलंय पहा बाईसाहेब, मद्रासहून! नक्कीच साहेबांचं असेल, काय वर्तमान आहे?'' थनप्पाने दिलेले पत्र बाईसाहेब वाचू लागल्या. ''मी एवढी पत्रं देऊन येतो, तोपर्यंत'' थनप्पा पुढे गेला, अन् थोड्या वेळाने परतलाही.

''त्यांची भेट झाली का बाईसाहेब?''

''हो! कामाक्षीच्या बाबांनी लिहिलंय, भेट झाली अन् लिहिलंय, की जमूनही जाईल सगळं!''

''वा! आनंदाची बातमी! आज संध्याकाळी मी विनायकासमोर नारळ फोडणार!''

''पण-'' आनंदासोबत काळजीचाही आवेग थांबवून बाईसाहेब सांगू लागल्या- ''अडचण अशी आली, की पुढल्या मोसमात लग्न करायचा आमचा विचार आहे. आता इतक्या तातडीनं उरकणं आम्हांला तर शक्य नाही अन् त्यांचं म्हणणं, लग्न येत्या वीस मेच्या मुहूर्तालाच करावं. जर ते लांबलं तर मग तीन वर्षे शक्य नाही, कारण मुलाला मग ट्रेनिंगसाठी जायचंय म्हणे...''

''आजोबा त्यांच्या शब्दाला जागले पहा! फार सज्जन माणूस...''

पोस्टमनने इन्श्युरन्स इन्व्हलप हातात ठेवीत म्हटले - ''त्यांनी सगळी रक्कम दिलीय पहा. आता पैसे नसल्याची तक्रार तुम्ही करू शकणार नाहीत! आता मागे पाहूच नका. आजोबांना हे स्थळ पटल्याचं ऐकून मला फार बरं वाटलं पहा. मोठ्या माणसांचे आशीर्वाद पाहिजे असतात, साहेब. त्यांनी आपले आशीर्वादसुद्धा कळविले असतील बघा.''

''हो हो, आमचे सासरे या स्थळावर फार खूश आहेत'' रामानुजम म्हणाले.

पाच हजारांचा लग्नसोहळा म्हणजे मालगुडी गावासाठी विशेष बातमीच होती. वेळेची घाई, व्यवस्थेसाठी माणसांची कमतरता; यामुळे रामानुजम मोठे अडचणीत आले होते. थनप्पा आता फावल्या वेळेत इकडेच राहू लागला. पत्रवाटपाच्या कामातला अनावश्यक वेळ तो वाचवू लागला. आता पत्र देताना, तो थांबत नव्हता. सरळ खिडकीतून किंवा दारातून पत्र टाकून 'पोस्टमन' म्हणत पुढे जाऊ लागला. कुणी त्याला विचारलंच, की काय घाई आहे - काही विशेष? तर तो सांगायचा, ''वीस मेपर्यंत आता कुणी मला बोलू नका. नंतर मी घरी येऊन बैठक मारूनच बसेन तुमच्याकडे!'' आणि तो गायब व्हायचा. रामानुजम मोठ्या काळजीत होते. लग्नतिथी जवळ येऊ लागली तसा काळजीने- तणावाने त्यांचा धीरही सुटू लागला. सगळं व्यवस्थित व्हायला पाहिजे, कसलीही अडचण, अडथळा येता कामा नये.''

''काहीच काळजी करू नका साहेब. ईश्वरकृपेने सगळं छान होईल. त्यांना जे काही पाहिजे होतं, हुंडा-मानपान सगळं तुम्ही दिलेलं आहे. ते लोकही चांगले आहेत.''

''ती नाही, माझी काळजी दुसरीच आहे थनप्पा - ही जी तिथी आहे नं, वर्षातली ही शेवटची तिथी आहे. काही अडचण आली अन् लग्न लांबलं, तर सगळंच खलास होणार! कारण मुलगा त्यानंतर तीन वर्षांसाठी बाहेर ट्रेनिंगला जाणार आहे. मग ठरलेलं लग्न तसंच तीन वर्षांपर्यंत ताणून ठेवणं काही खरं नाही होणार!''

लग्न सोहळा आटोपला होता. चार तास झालेले होते. लग्नाची धांदल आता ओसरू लागली. मांडवात प्रशस्त खुर्चीत दिल्लीचा सुरेख तरुण नवरदेव विसावला होता. चंदनाचा-फुलांचा दरवळ, धूप चहुबाजूंना पसरलेला होता. नवऱ्या मुलाच्या आसपास माणसं बोलत होती, वावरत होती. हातात पत्रांचा गठ्ठा घेऊन थनप्पा गेटमधून आला, तसं काही माणसं पुढे आली- ''पोस्टमन, आमचं काही पत्र?'' त्यांना थनप्पा म्हणाला, ''बाजूला व्हा! कुणाला पत्रं द्यायचीत हे मला माहीत आहे.'' तो नवरदेवासमोर आला. आदराने झुकून त्याने पत्रांचा गठ्ठा समोर धरला. ''ही सगळी शुभेच्छा पत्रं, मला माहीत आहे! तुमच्या सगळ्या हितचिंतकांकडून आलेली आहेत आणि त्यांतल्या प्रत्येक पत्रासोबत माझ्याही शुभेच्छा त्यात जमा आहेत बरे का!'' असं करताना मोठ्या अभिमानाने अन् गांभीर्याने थनप्पा बोलू लागला होता. नवरदेवाने मोठ्या आश्चर्याने अन् हर्षाने वर पाहिले आणि तो

म्हणाला - ‘‘थँक्स!’’

‘‘तुमच्यासारखा नामांकित तरुण या घराला जावई म्हणून लाभला, याचा मोठा अभिमान वाटतो आम्हाला! या मुलीला - कामाक्षीला मी लहानपणापासून ओळखतो आणि मी नेहमीच सांगायचो, की तिला कर्तबगार असा पती मिळणारच!’’ पोस्टमनने मोठ्या कृतज्ञतेने नमस्कार केला आणि इतर पत्रं देण्यासाठी, चहा फराळासाठी तो घराच्या आतल्या भागात शिरला.

दहा दिवसांनंतर थनप्पाने दरवाजावर थाप मारली आणि प्रसन्न अंत:करणाने त्याने कामाक्षीकडे तिचे पत्र दिले - ‘‘घे! सुवासिक पत्र आहे तुला आलेलं! टपालाची रेल्वे इथे पोचायच्या आधीच हा सुगंध पोचला बरं! अशी बरीच पत्रं मी वाटली आहेत. घे लवकर- आणखी आता त्याची दहा पत्रं येणार आहेत, तो तुला आता सामान आवरून सोबत चलायला सांगणार आहे आणि तुला आता दोन पंख उगवतील, त्याच दिवशी तू उडून जाशील भुर्ऽऽकन् अन् या थनप्पाला, या गल्लीला- रस्त्याला विसरूनही जाशील; नाही का?’’ कामाक्षी लाजली. पत्र घेऊन ती घरात पळाली. ‘‘आता पत्रात काय लिहिलं आहे, ते विचारण्यासाठी मला काही थांबायची गरज नाही, नाही का?’’

एका सुटीला - त्या दिवशी रामानुजम घरी असणार याची खात्री असल्याने - थनप्पाने दारावर थाप मारली आणि त्यांच्याकडे एक कार्ड दिले.

‘‘अरे! वाईट बातमी! सालेमचे माझे काका, वडिलांचे भाऊ फार आजारी आहेत. पटकन् भेटायला यायला लिहिलंय त्यांनी’’ रामानुजमना धक्का बसला होता.

‘‘फारच वाईट झालं साहेब...’’ थनप्पा म्हणाला आणि नंतर त्याने टेलिग्राम दिला.‘‘.. हा आणखी एक निरोप...’’

‘‘टेलिग्राम?’’ त्यावर नजर टाकली अन् दु:खाने रामानुजम उद्गारले - ‘‘काका गेले!’’ दु:खाच्या अनावर धक्क्याने रामानुजम चटईवर बसले. थनप्पालाही दु:ख झाल्याचे दिसत होते. शोकातून रामानुजम सावरले आणि घरात जाऊ लागले. थनप्पा म्हणाला, ‘‘एक मिनिट साहेब! मला माफी मागायचीय तुमची... तुम्ही पत्रावरची तारीख पाहिली का?...’’

‘‘एकोणीस मे... म्हणजे पंधरा दिवसांपूर्वीचं हे पत्र!’’

‘‘होय साहेब, अन् टेलिग्राम दुसऱ्या दिवशीचा आहे - म्हणजे लग्नाच्या दिवशीचा. मला मोठं वाईट वाटलं होतं साहेब... पण जे घडलं, ते घडलं असं म्हणून मी गप्प राहिलो आणि तुमच्या लग्नात व्यत्यय येईल या भीतीने बाजूला ठेवून दिलं.’’

रामानुजम पोस्टमनकडे पाहत राहिले - ‘‘काका मृत्युशय्येवर असल्याचं कळाल्यावर मी लग्नाचीही फिकीर केली नसती. सरळ निघून गेलो असतो.’’

थनप्पा मान खाली घालून उभा होता. तोंडातल्या तोंडात बोलावं तसं तो सांगू लागला...

‘‘माझी तक्रार तुम्ही करू शकता साहेब. ते मला नोकरीतून काढूनही टाकतील. तो एक गंभीर असा अपराध आहे, याची कल्पना आहे मला.’’ थनप्पा वळला अन् पायऱ्या उतरून तो निघाला. रामानुजम निस्तेज चेहऱ्याने पाहत राहिले आणि मग पटकन त्यांनी आवाज दिला- ‘‘पोस्टमन!’’

थनप्पा मागे वळला. रामानुजम दु:खद अंत:करणाने सांगू लागले... ‘‘मी तक्रार करेन असं

समजू नकोस. मी तसं करणार नाही. तुझ्याकडून हे झालं, याचं फक्त मला दु:ख झालं...''

''मला तुमच्या भावना समजू शकतात साहेब...'' थनप्पाने उत्तर दिले अन् जड अंत:करणाने तो निघून गेला.

♦♦♦

# डॉक्टरचा शब्द

रुग्ण जेव्हा शेवटच्या टप्प्यावर यायचा, त्याच वेळेस लोक त्यांच्याकडे यायचे. मग डॉ. रामन चिडायचे - "एक दिवस आधी तरी यायला पाहिजे की नाही? का एवढा उशीर केला?"

कारण तसं स्पष्टच असायचं - पंचवीस रुपये किंवा अधिक अशी डॉक्टरची फीस असायची. त्यामुळे डॉक्टरकडे जायला ते टाळाटाळ करायचे. त्यांच्याकडे जायची वेळ येणं म्हणजेच, रुग्णाचं आता काही खरं नाही असं वाटायचं. परिणामी, जेव्हा या डॉक्टर साहेबांकडे रुग्णाचा प्रवेश व्हायचा, तेव्हा 'हो' किंवा 'नाही'चा त्वरित निर्णय घ्यायची वेळच आलेली असायची. आपल्या दीर्घ अशा प्रॅक्टिसमुळे डॉक्टरांची संक्षेपाने अन् स्पष्टपणे बोलण्याची जी वृत्ती तयार झाली होती, त्याची जाणीव सगळयांना असायची आणि त्याच कारणामुळे डॉक्टरांचे मत म्हणजे दगडावरची रेघ अशी श्रद्धा तयार झालेली! त्याचे मोल असायचे. रामन म्हणजे आजाराचे केवळ निदान करणारे डॉक्टर, एवढेच नसून निवाडा देणारे न्यायाधीश वाटायचे सगळयांना. डॉक्टरांच्या शब्दावर जणू रुग्णाचा जीव अडकून असायचा. डॉ. रामन यांना त्याची पर्वा नसायची. आशेचे चार शब्द कधी जीव वाचवू शकतात यावर त्यांचा भरवसा नव्हता. यथाकाळ नियती खरं ते सांगणारच आहे, अशा वेळी आपण काही जुजबी किंवा खोटी आशा दाखविणे हे आपलं काम नाही, असं डॉक्टरांचं म्हणणं. एवढं असलं, तरी जर डॉक्टरांना स्वत:ला रुग्णाच्या प्रकृतीत सुधारण्याचं काही चिन्ह जाणवलं, तर मग पाहावं! बाह्या सरसावून ते उपचाराच्या जणू आखाड्यात उतरत. तासांचा प्रयत्न असो की दिवसाचा; डॉक्टर सोडायचे नाहीत. यमदूताच्या हातून रुग्णाचे प्राण हिसकावून घेईपर्यंत त्यांना चैन नसायची.

आज मात्र एका रुग्णाशेजारी उभं असताना, डॉक्टरांना असं वाटू लागलं, की त्यांनाच कुणीतरी आशादायक असं सांगायला पाहिजे. धीर द्यायला पाहिजे. हातरुमालाने त्यांनी आपलं कपाळ पुसलं आणि पलंगाशेजारच्या खुर्चीवर ते बसून राहिले. या पलंगावर निजून होता डॉक्टरांचा जगातला सगळयात प्रिय मित्र गोपाल. शाळेत असल्यापासून चाळीस वर्षांची त्यांची मैत्री होती. अर्थात कौटुंबिक आणि व्यावसायिक अडचणींमुळे इच्छा असूनही त्यांच्या भेटी व्हायच्या नाहीत. क्वचित कधी गोपाल रुग्णालयात यायचा. डॉक्टर मोकळे होईपर्यंत एका कोपऱ्यात बसून वाट पाहायचा आणि मग ते दोघं जेवायचे, एखादा सिनेमा पाहायचे आणि मग आयुष्यातली सुखं-दुखं, योजना यांबद्दल त्यांच्या गप्पा व्हायच्या. काळ बदलला, वातावरण बदलले, कार्यक्षेत्रं बदलली, तरी दोघांची मैत्री ही कायम राहिली; आदर्श अशी राहिली.

आपल्या व्यापात बुडाल्याने डॉक्टरांना लक्षातही राहिलं नव्हतं, की गेले तीन महिने गोपालची- त्यांची भेट झाली नाही ते. एका सकाळी आपल्या रुग्णालयात गर्दीतून त्यांनी जेव्हा गोपालच्या मुलाला पाहिले, त्या वेळी हे त्यांच्या लक्षात आलं. तासाभरापर्यंत तर डॉक्टर त्याला बोलूही शकले नाहीत. ऑपरेशन थिएटरमध्ये जाण्यासाठी डॉक्टर जाऊ लागले, तेव्हा त्यांनी त्या तरुणाला बोलावून विचारले- "काय, कसा काय आलास?" पोरगा थोडा काळजीत अन् थोडा बुजलेला दिसत होता. "आईने पाठविले..."

‘‘काय काम आहे...’’
‘‘वडील आजारी आहेत...’’
ऑपरेशनचा तो दिवस होता अन् दुपारी तीनपर्यंत डॉक्टरांना सवड नव्हती; पण दवाखान्यानंतर डॉक्टर सरळ निघाले अन् गोपालच्या घरी हजर झाले. गोपाल बेडवर निजून होता- झोपल्यासारखा. त्याच्याजवळ उभं राहून डॉक्टरांनी गोपालच्या बायकोला विचारले, ‘‘केव्हापासून हा आजारी आहे?’’
‘‘महिन्या- दीड महिन्यापासून डॉक्टर...’’
‘‘कुणाला दाखविलं होतं?’’
‘‘पलीकडच्या गल्लीतले एक डॉक्टर आहेत. ते दर तीन दिवसांनी येतात अन् औषध देतात.’’
‘‘काय नाव आहे त्यांचं?’’
या डॉक्टरचं नाव कधी ऐकण्यात असं नव्हतं. ‘‘असेल, मला माहिती नाही; पण मला तुम्ही सांगायला पाहिजे होतं नं? मला आधीच का सांगितलं नाही तुम्ही?’’
‘‘तुम्ही एवढे व्यस्त असता अन् अशा स्थितीत तुम्हाला विनाकारण त्रास द्यायचा...’’ गोपालच्या बायकोच्या चेहऱ्यावर पश्चात्ताप दिसत होता, दु:ख जाणवत होतं. आता वेळ गमावण्यात अर्थ नव्हता. डॉक्टरांनी कोट उतरविला, आपली बॅग उघडली. इंजेक्शन ट्यूब, निडल काढून स्टोव्हवर उकळायला ठेवली. कोपऱ्यात उभी राहून गोपालची बायको घाबरलेल्या आवाजात काही विचारायचा प्रयत्न करीत होती.
‘‘काही विचारू नका आता!’’ डॉक्टर पटकन् म्हणाले. उकळणाऱ्या इंजेक्शनकडे पाहत पोरं उभी होती. त्यांना पाहून डॉक्टर म्हणाले- ‘‘या सगळयांना पाठवा इथून. फक्त मोठ्या मुलाला राहू द्या.’’
इंजेक्शन देऊन डॉक्टर खुर्चीत विसावले. तासभर ते सारखं रुग्णावर लक्ष ठेवून होते. रुग्ण अजूनही निश्चल असा पडून होता. डॉक्टरांच्या कपाळावर घामाचे थेंब चमकत होते. थकव्याने डोळे जड झाले होते. कोपऱ्यातून गोपालची बायको शांतपणे पाहत होती. तिने अडखळत विचारले- ‘‘डॉक्टर, कॉफी करू का?...’’
‘‘नको’’ त्यांनी उत्तर दिले. खरं म्हणजे जेवण राहिल्याने त्यांना भूक लागली होती. ते उठले अन् म्हणाले, ‘‘मी आलोच थोड्या वेळात. त्यांना कसल्याही प्रकारचा व्यत्यय होणार नाही, ते पहा.’’ त्यांनी आपली बॅग घेतली. कारकडे गेले. पंधरावीस मिनिटांतच एक मदतनीस अन् नर्सला सोबत घेऊन ते परतले. गोपालच्या बायकोला त्यांनी सांगितले, ‘‘मला ऑपरेशन करावे लागणार आहे.’’
‘‘का? का-कसं काय?’’ तिने अस्पष्ट अशा आवाजात विचारले.
‘‘मी सांगेन तुम्हाला नंतर. आता तुमच्या मुलाला इथे मदतीला ठेवा अन् तुम्ही शेजारच्या घरी जाऊन बसा. मी बोलावीन नंतर.’’
बाईला भोवळ आली. तणाव सहन न झाल्याने ती पटकन् जमिनीवर बसली. नर्सने मग तिला धरून घराबाहेर नेले.
रात्री आठच्या सुमारास पेशंटने डोळे उघडले आणि सावकाश हालचालही केली. डॉक्टरांच्या मदतनिसाला हर्ष झाला. तो उत्साहाने उद्गारला - ‘‘वा! आता पेशंट वाचणार

सर!'' डॉक्टरांनी त्याच्याकडे पाहिले आणि शांतपणे म्हणाले, ''तो वाचावा यासाठी मी काहीही करायला तयार आहे; पण त्याच्या छातीचे ठोके...''

''त्यात आता सुधारणा आहे सर...''

''ठीक आहे, पण त्यावर भरवसा ठेवता येणार नाही. अशा केसेसमध्ये अशी प्रगती ही भ्रामक असते. तात्पुरती असू शकते'' - डॉक्टर म्हणाले. काही क्षण विचार करून ते सांगू लागले- ''सकाळी आठपर्यंत ही प्रगती अशीच राहिली तर तुला सांगतो, चाळीस वर्षांपर्यंत याच्या प्रकृतीला धोका राहणार नाही; मात्र रात्री दोननंतर सगळंच संपेल की काय अशी भीती आहे बघ मला...''

डॉक्टरांनी आता आपल्या मदतनिसाला परत पाठविले आणि स्वत: पेशंटच्या शेजारी बसून राहिले. रात्री अकराच्या सुमारास पेशंटने डोळे उघडले आणि आपल्या मित्राकडे पाहिले. क्षीणसा हसला. प्रकृतीत थोडी सुधारणा झालेली होती. थोडं अन्न खाता आलं त्याला. तणाव कमी झाल्याचं आणि आनंदाचं असं एक वातावरण घरात भरून राहिलं. सगळेजण डॉक्टर- पेशंटच्या भोवती जमले. आपली कृतज्ञता व्यक्त करू लागले; पण डॉक्टरांचं त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. पेशंटच्या प्रकृतीकडे निश्चल अशी दृष्टी लावूनच ते त्याच्याशेजारी बसून राहिले. गोपालच्या बायकोने विचारले- ''आता काही धोका नाही ना डॉक्टर...'' तिच्याकडे न पाहताच डॉक्टर म्हणाले- ''दर चाळीस मिनिटांनी त्यांना थोडं ग्लुकोज अन् ब्रँडी देत चला. दोन चमचे पुरेत.'' बाई स्वयंपाकघरात गेली. ती अस्वस्थ झाली. प्रकृतीत नेमका कोणता बिघाड आहे हे तिला जाणून घ्यायची तीव्र इच्छा झाली. डॉक्टर स्पष्ट का सांगत नाहीत? का टाळाटाळ करीत आहेत? संशय- शंकाकुशंकांनी ती त्रस्त झाली. तिला हा तणाव सोसेना. कदाचित नवऱ्यासमोर बोलायला त्यांना संकोच वाटत असेल म्हणून डॉक्टरांना तिने खुणेनेच स्वयंपाकघराच्या दाराशी बोलावले. डॉक्टर उठले. दाराशी गेले. ''त्यांना नेमकं काय झालंय डॉक्टर? कसे आहेत ते आता?'' डॉक्टरांनी ओठ मुडपले. खाली पाहत त्यांनी उत्तर दिले - ''धीर सोडू नका. जोपर्यंत निश्चित काही कळणार नाही तुम्हांला, काही विचारू नका.'' भयाने बाईचे डोळे विस्फारले होते. तिने हात जोडले. विनंती करू लागली - ''मला खरं काय ते सांगा.'' डॉक्टरांनी उत्तर दिले- ''आता ते सगळं सांगणं योग्य नाही'' ते वळले आणि परत आपल्या खुर्चीवर बसले. स्तब्ध झालेल्या त्या घरात आता मोठ्या हुंदक्यांचा आवाज येऊ लागला. ते ऐकून पेशंटच्या हालचाली वाढल्या, गोंधळून तो पाहू लागला. डॉक्टर पुन्हा उठले. स्वयंपाकघराकडे जाऊन त्यांनी दार ओढून घेतले आणि आवाज बंद केला.

डॉक्टर खुर्चीवर बसताच पुटपुटल्यासारख्या आवाजात पेशंटने विचारले, ''कुणी रडत आहे का...''

''तू आता स्वस्थ रहा. अजिबात बोलू नकोस.'' डॉक्टरांनी त्याची नाडी तपासली. एवढ्याच श्रमाने ती वाढली होती.

''डॉक्टर, मी जगेन का?... लपवू नकोस, खरं ते सांग.''

डॉक्टरने नाराजीनेच नुसतंच 'च्' केलं अन् खुर्चीवर स्वस्थ बसून राहिले. अशी स्थिती यापूर्वी कधीच त्यांनी अनुभवली नव्हती. काहीतरी भरमसाट बोलणं त्यांच्या स्वभावातच

नव्हतं. त्यामुळेच तर समाजात डॉक्टरांच्या शब्दाला किंमत होती. डॉक्टरांनी एक कटाक्ष टाकला, तसं त्यांच्या लक्षात आलं, पेशंटने हातानेच खूण करून त्यांना जवळ बोलावले होते. तो पुटपुटला, "मी आणखी किती काळ जगणार आहे, ते मला कळायला पाहिजे. मला माझ्या मृत्युपत्रावर सही करावीच लागणार आहे. ते सगळं तयार आहे. माझ्या बायकोला ते आणायला सांग. तुला साक्षीदार म्हणून त्यावर सही करायची आहे." "छे! तू स्वत:ला थकवून टाकीत आहेस असं बोलून. गप्प रहा." तेच तेच सांगायला डॉक्टरांना आता वैताग येऊ लागला. "कुणाच्या चौकशीला कसलंही उत्तर न देता, सगळा व्यवसाय, व्याप-ताप सोडून निघून जाणं खरंच किती चांगलं असतं नाही." गोपालने डॉक्टरांचे मनगट हातात घेतले. म्हणाला, "रामू, या क्षणाला तू इथे आहेस हे माझे किती भाग्य आहे! तुझ्या शब्दावर माझा विश्वास आहे. माझ्या जायजादीची व्यवस्था लावल्याशिवाय मला जाता येणार नाही. तसं झालं, तर माझ्या बायको अन् मुलांसाठी ते मोठं दुर्दैवाचं अन् संकटाचं होऊन बसेल. तुला तो सुब्बय्या अन् त्याच्या गोतावळ्याबद्दल माहीत असेलच... उशीर व्हायच्या आधी मला मृत्युपत्रावर स्वाक्षरी करायचीय... मला सांग, मी किती काळ आता जगणार आहे..."

"थांब. सध्या तरी..." डॉक्टरने उत्तर दिले. ते आपल्या कारकडे गेले. मागच्या सीटवर बसून राहिले. घड्याळाकडे पाहिले, तर मध्यरात्र झालेली. जर मृत्युपत्रावर स्वाक्षरी व्हायची असेल, तर ती या दोन तासांतच होणे गरजेचे आहे. नाहीतर- कधीच नाही. तसं झालं तर पुढच्या समस्या- गोंधळाला डॉक्टर जबाबदार राहिले नसते. त्यांना गोपालच्या कौटुंबिक समस्या- व्यवहारांची पूर्ण माहिती होती आणि त्या लांडग्यांची- सुब्बय्या आणि ते सगळे; पण डॉक्टर काय करू शकणार? जर त्यांनी गोपालला मृत्युपत्रावर स्वाक्षरी करायचा सल्ला दिला असता, तर त्याचा स्पष्ट अर्थ झाला असता- मृत्यूचा... मृत्यूच्या शिक्षेचा निकाल! आणि त्याचबरोबर हजारात एक असलेली - गोपालच्या जगण्याच्या शक्यतेची संधी खलास झाली असती.

डॉक्टर कारमधून उतरले. परत आले. गोपालजवळ येऊन बसले. गोपाल मोठ्या आशेने पाहू लागला. डॉक्टर स्वत:शीच म्हणाले, "माझ्या शब्दाने जर याचे प्राण वाचत असतील... तर तो मरणार नाही... मृत्युपत्र गेलं खड्ड्यात!" डॉक्टर सांगू लागले- "हे पहा गोपाल -"

एखाद्या पेशंटसमोर आत्मविश्वासाचा असा अभिनय करायची डॉक्टरांची पहिलीच वेळ होती. स्वत:चा निर्णय लपवून पेशंटला विश्वास द्यायचा हा अभिनय. डॉक्टर आले. गोपालजवळ वाकून उभे राहिले आणि जाणीवपूर्वक - दृढतेने ते म्हणाले - "मृत्युपत्राची आता काळजी करू नकोस. तुला काही होणार नाही. तुझं हृदय एकदम चांगलं आहे. तू जाणार नाहीस."

हे ऐकताच आशेची- आनंदाची एक नवीन चमक आता गोपालच्या चेहऱ्यावर पसरली. सुटकेच्या मोठ्या सैल अशा भावनेने गोपालने विचारले, "खरं सांगतोस तू? तुझ्या तोंडून येणारा शब्द नक्कीच खरा ठरणार..."

डॉक्टर म्हणाले, "एकदम बरोबर! प्रत्येक सेकंदाला सुधारणा होते आहे. आता शांत झोप. कुठल्याही परिस्थितीत आता दगदग नको. श्रम नको. तू आता शांत चित्ताने झोपी जा. मी

सकाळी येतो तुला भेटायला.'' गोपालने डॉक्टरकडे कृतज्ञतेने पाहिले आणि डोळे झाकले. डॉक्टरने आपली बॅग घेतली आणि हलकेच दार लोटून आता ते बाहेर पडले.
घराकडे परतताना डॉक्टर आपल्या दवाखान्यापाशी थोडं थांबले. मदतनिसाला आवाज दिला. सांगू लागले- ''गोपालची केस! तू जा तिथे. ऑक्सिजनची नळी तयार ठेव. कोणत्याही क्षणाला वाईट होईल हे लक्षात ठेव. गंभीर स्थिती झाली, तर ऑक्सिजन लाव, जा, लवकर!''
दुसऱ्या दिवशी दहा वाजता डॉक्टर गोपालकडे परतले. कारमधून उतरल्या उतरल्या धावतच पेशंटकडे आले. गोपाल आता उठलेला होता आणि मोठा प्रसन्न वाटत होता. मदतनिसाने हृदयगती व्यवस्थित असल्याचे सांगितले. डॉक्टरांनी स्टेथॅस्कोप त्याच्या छातीला लावला, क्षणभर पाहिले अन् गोपालच्या बायकोला आता ते सांगू लागले -
''काळजी करू नका बाई आता! तुमच्या पतीला आता वयाच्या नव्वदीपर्यंत काही होणार नाही.''
दवाखान्यात परत जाताना कारमध्ये त्यांच्याशेजारी बसलेल्या मदतनिसाने विचारले- ''पेशंट खरंच दीर्घ आयुष्य जगणार आहे?''
आणि डॉक्टर सांगू लागले- ''मी पैज लावायला तयार आहे - तो नव्वद वर्षे जगणारच. त्याने धोका ओलांडला आहे. या अॅटॅकमधून तो सावरलाच कसा, हे मात्रं मोठं कोडं राहणार आहे माझ्यासाठी कायमचं!''

♦♦♦

# पहारेकऱ्याची भेट

जेव्हा डझनभर माणसं सरळसरळ किंवा आडमार्गाने एखाद्याच्या शहाणा असल्याबद्दल शंका उपस्थित करतात, तेव्हा तो 'एखादा' कावराबावरा होतो. स्वत:बद्दल शंका घेवून तोसुद्धा गंभीर होतो. सेवानिवृत्त झालेल्या गोविंद सिंघ या पहारेकऱ्याच्या बाबतीत असंच झालं. आणि तसं पाहिलं, तर लोकांची काय चूक आहे - एखादा माणूस रजिस्टर्ड पत्राचा बंद लिफाफा घेऊन तुम्हाला विचारू लागला, की या लिफाफ्यात काय आहे, सांगा बरं; तर तुम्ही काय म्हणाल त्याला? सरळ उत्तर राहील त्याला - 'ते उघड आणि पहा!' नाही का? पण अशा उत्तराने गोविंद सिंघ दचकून जायचा. "नाही, नाही. तसं नको!" असं म्हणत तो निघून जाऊ लागला. इतरांना भेटू लागला, विचारू लागला. प्रत्येकाने असंच उत्तर दिलं, तसं त्याला वाटू लागलं - सगळ्यांना वेड लागलं आहे. मग एकाने त्याला सांगितले, "तुला हे उघडावे वाटत नसेल अन् तरीही त्यात काय आहे हे पाहायचे असेल, तर दवाखान्यात जाऊन त्याचा एक्स रे काढून पाहा!" पलीकडच्या गल्लीत राहणाऱ्या एका सेवानिवृत्त कंपाउंडरने हा सल्ला दिला.

"म्हणजे ते काय असतं?" गोविंद सिंघने विचारले. त्याला ते समजावून सांगण्यात आले.

"कुठे आहे ते?" मग त्याला गावातल्या एक्स रे इन्स्टिट्यूटचा पत्ता देण्यात आला.

पण गोविंद सिंघची पुढची हकिकत सांगण्यापूर्वी, त्याच्या आयुष्यातल्या त्याही पूर्वीच्या हकिकती सांगणे जरूरीचे आहे. 1914 ते 1918 या युद्धकाळात सैन्यातल्या सेवेनंतर 'इंग्लडिया' कंपनीच्या ऑफिसचा पहारेकरी म्हणून गोविंद सिंघच्या नावाची शिफारस झाली. त्याला ही नोकरी फार आवडली. त्याला एक खाकी गणवेश, खांद्यावर लावायचा चकचकीत पट्टा देण्यात आला आणि एक लहानशी सुरेख छडी. कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर हातात छडी धरून गोविंद सिंघ बसून असायचा. जेव्हा जनरल मॅनेजर साहेब आपल्या कारमधून उतरायचे, तेव्हा 'अटेंशन' होऊन त्यांना गोविंद सिंघ सॅल्यूट द्यायचा. शंभरावर कर्मचारी होते त्या कार्यालयात. सर्वजण येताना- जाताना त्याची सावध नजर सर्वांवर असायची. संध्याकाळी जनरल मॅनेजरची पावलं पायऱ्यांवर वाजायची, त्याचं लक्ष असायचं आणि पटकन् तो उठायचा. अटेंशनमध्ये उभा रहायचा. साहेब गेले, की त्यांच्या मागोमाग सगळा स्टाफ भरभर बाहेर पडायचा. कार्यालय रिकामे व्हायचे. गोविंद सिंघ मग आपला स्टूल पायऱ्यांखाली ठेवायचा. त्याची ती छडी ठेवायचा. कार्यालय बंद व्हायचे; मग मुख्य दरवाजा कुलूपबंद- सीलबंद व्हायचा.

अशा प्रकारे गोविंद सिंघने पंचवीस वर्षे नोकरी केली आणि मग पेन्शनसाठी त्याने अर्ज केला. खरं म्हणजे सेवानिवृत्तीचा त्याचा विचार नव्हता; पण आता आपले कान अन् नजर धोका देत आहे हे त्याच्या लक्षात आले होते. मॅनेजरसाहेबांच्या पावलांचा आवाज त्याला चटकन लक्षात येत नव्हता. इतकेच काय, दहा यार्डांपुढचं आता व्यवस्थित दिसत नव्हतं. गोविंद सिंघने मग साहेबांची भेट घेतली. कागदपत्रांवर नजर टाकून साहेब म्हणाले,

"आमच्यासाठी तू केलेल्या कामाबद्दल आम्ही सर्वजण समाधानी आहोत. कंपनी आता तुला आयुष्यभर महिना बारा रुपये पेन्शन देईल..." गोविंद सिंघने टाचा उंचावल्या, सॅल्यूट केला आणि टाचांवर तो वळला, बाहेर आला. त्याचे हृदय कृतज्ञतेने आणि

अभिमानाने भरून आले होते. ही त्याच्या आयुष्यातली केवळ दुसरी वेळ होती, ज्या वेळी एवढा मोठा माणूस - जनरल मॅनेजर - गोविंद सिंघशी बोलला होता. पहिली वेळ होती, ती नोकरीच्या पहिल्या दिवशीची. त्या दिवशी तो त्याच्या जागी उभा असताना, ऑफिसमध्ये येताच मोठ्या साहेबांनी विचारले होते -

''कोण आहेस तू?''

''मी नवीन पहारेकरी आहे साहेब.'' त्याने उत्तर दिले होते आणि त्या दिवसानंतर मोठे साहेब आत्ताच त्याला बोलले होते. साहेबांचं एवढं संक्षिप्त बोलणं असलं, तरी तेवढ्या बोलण्याने गोविंद सिंघमध्ये जणू चैतन्य आले होते. त्याच्या दृष्टीने त्याचे साहेब म्हणजे देवत्व लाभलेला माणूस होता आणि देवाशी संवाद आयुष्यात एकदा किंवा दोनदाच व्हायला पाहिजे, नाही का! तेवढ्या त्या मंतरलेल्या संवाद-क्षणांत गोविंद सिंघच्या मनात मोठ्या साहेबांचं व्यक्तिमत्त्व व त्यांचे चार शब्द जणू कोरले गेले होते.

गोविंद सिंघच्या आयुष्यात मग कसल्या अडचणी आल्या नाहीत. पेन्शन आणि बायकोने चार घरांची धुणीभांडी करून मिळविलेले चार पैसे यात त्याची गुजराण होऊ लागली. जेवणखाण करून, चार मित्रांना भेटायचं, झोप घ्यायची अन् फावल्या वेळात त्याच्या चुलतभावाकडे पानपट्टीवर बसायचे असा त्याचा दैनंदिन कार्यक्रम ठरलेला होता. या दिनक्रमात, महिन्यातून एक तारखेला जेव्हा तो पेन्शन घ्यायला जायचा, तेवढ्या दिवसापुरता व्यत्यय यायचा. या दिवशी तो त्याचा खाकी गणवेश पुन्हा चढवायचा, ऑफिसमध्ये जाऊन लेखापालाला सॅल्यूट करायचा व आपली पेन्शन उचलायचा. कधी संध्याकाळ तिथेच झाली तर गोविंद सिंघ थांबायचा - जनरल मॅनेजर साहेब निघाले, की त्यांना सॅल्यूट द्यायचा.

गोविंद सिंघला मग अथांग असा भरपूर निवांत वेळ - रिकामपण असायचे. अशा स्थितीत त्याला अचानक एक शोध लागला. त्याला लक्षात आलं, की चिकणमाती आणि लाकडाचा भुसा, चुरा घेऊन त्याला फार सुरेख वस्तू बनविता येतात. हे सगळं त्याच्या लक्षात आलं, ते अगदी योगायोगाने. शेजारच्या मुलाने एकदा बिघडलेलं खेळणं दुरुस्तीसाठी त्याच्याकडे आणलं होतं. त्या वेळी गोविंद सिंघने ते केवळ दुरुस्तच केलं नाही, तर त्यातून नवीन वस्तू बनविली. आपल्या या कामगिरीवर तो एवढा खूश झाला, की त्यात रंगून गेला. त्याच्या घरामागेच भरपूर चिकणमाती होती आणि चुलतभावाच्या दुकानाशेजारीच लाकडाचा भुसा-चुरा पडलेला असायचा. चार पैशांचा रंग मग त्याने विकत आणला आणि मग काय, त्याचा वेळ छान जाऊ लागला. घरासमोरच तो चिखल वगैरे मांडून बसायचा आणि मग तयार व्हायचे, लहान लहान आकाराचे त्याचे असे स्वतंत्र विश्व. तिथे सर्व रंगांची जणू जत्राच भरलेली असायची- बोटांच्या आकाराची; पण सगळ्या प्रकारची. सगळ्या तऱ्हेची. तिथे गाव असायचं, शहर असायचं. नोकरीच्या वेळेस पाहण्यात आलेली विविध माणसं - दुपारच्या वेळेस येणारी ती भिकारीण, काकडी विकणारा- असायची. गोविंद सिंघकडे माणसांचे चेहरेमोहरे ओळखायची एक नजर होती. सगळं सगळं कसं चिकणमातीतून रूपांतरित व्हायचं. ती जगाची एक अद्भुत अशी प्रतिकृती असायची. एका पातळशा लाकडी चकतीवर तो ही पात्रं उभी करायचा अन् ती मोठी छान दिसायची. या चिजा तो आपल्या चुलतभावाच्या दुकानात ठेवायचा अन् त्या पाहता पाहता विकल्याही जायच्या.

सगळयांसाठी ते मोठं आकर्षणच बनलं होतं. या प्रतिकृतींच्या विक्रीव्यवहारापेक्षा, गावातली माणसं तो कामात असताना त्याच्याभोवती गोळा होऊन कौतुक करायची, याचाच गोविंद सिंघला मोठा आनंद व्हायचा.
पुढल्या महिन्यात पेन्शनसाठी गोविंद सिंघ कार्यालयात गेला, त्या दिवशी त्याने तयार केलेला रस्त्याचा एक देखावा भेट देण्यासाठी घेतला होता. त्याच्या दृष्टीने हे एक उत्तम जमलेलं काम होतं. काउंटरवर लेखापालाकडे त्याने हा देखावा सुपूर्द केला व तो म्हणाला-
''मोठ्या साहेबांना हे द्याल का...''
''हो देईन की!'' लेखापाल म्हणाला. कार्यालयात सगळयांना हा देखावा आवडला होता. अर्धाएक तास सगळे याच विषयावर बोलत होते.
दुसऱ्या महिन्याच्या पेन्शनसाठी येताना, गोविंद सिंघने आणखी एक कलाकृती भेट दिली - खेळणाऱ्या मुलांची. आणि काउंटरवर त्याने विचारले-
''साहेबांना ती भेट आवडली होती का?''
''हो हो, त्यांना आवडली ती!''
''मग, ही भेटसुद्धा त्यांना द्याल का?''
आणि मग प्रत्येक पेन्शनच्या दिवशी गोविंद सिंघ साहेबांसाठी भेट घेऊन जाऊ लागला आणि त्याने विचारलेल्या प्रश्नावर लेखापालाचं तसंच उत्तर राहायचं. हे उत्तर म्हणजे गोविंद सिंघला मोठा पुरस्कार वाटू लागला-
''साहेब काय म्हणाले?''
''फारच छान आहे म्हणाले.''
आणि एकदा गोविंद सिंघने एक अद्वितीय कलाकृती तयार केली. - त्याच्या ऑफिसच्या दर्शनी बाजूची प्रतिकृती. ऑफिसचे प्रवेशद्वार, तिथे तो स्वत: उभा, कार आलेली आहे, मोठे साहेब उतरले आहेत... एक अप्रतिम अशी कलाकृती! गोविंद सिंघ त्याकडे पाहत राहिला तसं त्याला त्याच्या नोकरीचे दिवस आठवले. त्या दिवसांत तो परत हरवून गेला, एवढी ती कलाकृती जिवंत वाटत होती.
पेन्शनच्या दिवशी जेव्हा गोविंद सिंघने साहेबांसाठी ही भेट काउंटरवर ठेवली, तेव्हा कार्यालयात उत्साहाचे जणू वारे संचारले. ''वा! बेट्या, तू स्वत:लासुद्धा सोडलं नाहीस दाखवायचं, वा!'' प्रत्येकजण कौतुकाने पाहू लागला, बोलू लागला आणि अचानक एका अनामिक अशा भयाने गोविंद सिंघचा ताबा घेतला. त्याने विचारले, ''मोठ्या साहेबांना हे काही विचित्र तर वाटणार नाही नं... ते रागावतील तर...''
''नाही, नाही. का रागावतील बरं ते?'' लेखापाल म्हणाला.
गोविंद सिंघने पेन्शन घेतले. घरी गेला.
एका आठवड्यानंतरची ती घटना. गोविंद सिंघ घरी चटईवर माती कालवीत बसला होता. त्या वेळी पोस्टमन आला. म्हणाला- ''तुझ्यासाठी रजिस्टर्ड पत्र आहे.''
''माझ्यासाठी?'' कोणतं पत्र म्हटलं, की गोविंद सिंघला धडकीच भरायची. आयुष्यात त्याला फक्त दोनतीन पत्रं आलेली होती आणि प्रत्येक वेळी पत्रातला मजकूर समजेपर्यंत अस्वस्थता तीव्र व्हायची. अन् आता तर रजिस्टर्ड पत्र! बाप रे!
''वकीललोकंच रजिस्टर्ड पत्र पाठवीत असतात, नाही का!''

‘‘हो, सहसा तेच पाठवितात’’ पोस्टमन म्हणाला.
‘‘नको नको ते पत्र. तू परत घेऊन जा बाबा!’’ गोविंद सिंघ गयावया करीत म्हणाला.
‘‘घ्यायला नकार दिला, असं लिहून परत नेऊ का?’’ पोस्टमनने विचारले. तसं गडबडून जाऊन गोविंद सिंघने उत्तर दिले-
‘‘नाही, नाही. तसंच घेऊन जा अन् सांग, मी भेटलो नाही म्हणून.’’
‘‘असं करता येत नाही’’ पोस्टमन रागावून म्हणाला.
आता ते पत्र सही करून घेण्याशिवाय गोविंद सिंघकडे पर्याय नव्हता. पत्र घेऊन खिन्न होऊन गोविंद सिंघ बसून राहिला. जमिनीवर नजर लावून तो बसला. कामावरून परतलेल्या त्याच्या बायकोने पाहिले अन् विचारले- ‘‘काय झालं? काय आहे ते?’’ गुदमरलेल्या आवाजात तो म्हणाला, ‘‘मला कसं माहीत असणार? बहुतेक आता आपला सत्यानाश...’’ हताश होऊन तो पडून राहिला. बायको घरात गेली. पुन्हा बाहेर येऊन तिने पाहिले, तर गोविंद सिंघ तसाच पडून राहिलेला. तिने विचारले, ‘‘ते उघडून पाहत का नाहीत? कुणाकडून वाचून घ्या ना!’’ गोविंद सिंघने कमालीच्या भयाने हात जोडले. ‘‘बाई, तुला माहीत आहे का, तू काय सांगते आहेस? हे पत्र उघडणं शक्यच नाही. त्यात कदाचित लिहिलं असेल, की माझी पेन्शन आता बंद करण्यात आलीय्. देवाला ठाऊक, मोठे साहेब काय म्हणत असतील...’’
‘‘मग तिकडे ऑफिसला जाऊन का विचारीत नाहीत तुम्ही?’’
‘‘नाही. नाही. मी आता माझे तोंड दाखविणार नाही त्यांना.’’
गोविंद सिंघ सांगू लागला - ‘‘आजपर्यंत मी कसल्याही तक्रारीशिवाय आयुष्य काढलं. नोकरी केली. कुणी नाव असं ठेवलं नाही मला.’’ त्या विचाराने गोविंद सिंघला जणू हुडहुडी भरली - ‘‘मला वाटूच लागलं होतं, मी अडचणीत येणार आहे म्हणून... त्या दिवशी ऑफिसचा जो देखावा मी तयार केला होता...’’ खोलवर उसासा टाकून गोविंद सिंघ सांगू लागला - ‘‘प्रत्येक वेळेस मी एखादी वस्तू घेऊन गेलो, की ऑफिसची माणसं त्याभोवती जमायची. कितीतरी वेळ काम थांबवून बोलत राहायची. हे सगळं नक्कीच मोठ्या साहेबांना कळलं असणार...’’
गोविंद सिंघ आता ते पत्र खिशात ठेवून अशाच प्रकारचं बरळत राहू लागला. मिलिटरीच्या नोकरीमुळे त्याच्यात जो रुबाब, व्यवस्थितपणा आलेला होता, तो आता निघून गेला. आता त्याची अन्नावरची वासना उडून गेली होती. पिंजारलेले केस, हरवलेली नजर घेऊन तो आता वावरू लागला. त्याची बायको अस्वस्थ झाली. त्याच्याबद्दल तिला फार चिंता वाटू लागली. हातात ते पत्र धरून आता गोविंद सिंघ रस्त्यात उभा राहू लागला. ज्याला त्याला विचारू लागला - ‘‘या लिफाफ्यात काय पत्र आहे, सांगा ना!’’ पण तो लिफाफा उघडायचा सल्ला मात्र त्याने कुणाचा ऐकला नाही.
तेव्हा, आणखी विलंब न लावता गोविंद सिंघने एक्स-रे इन्स्टिट्यूटसाठी रेसकोर्स मार्ग धरला. तिथे गेटपाशी पोहोचल्यावर त्याला डझनभर गाड्यांची रांग दिसली. गेटपाशी उभा असलेला गुरखा दिसला. काही माणसं बोलत बसलेली होती; काही मासिक वगैरे वाचीत होती. गोविंद सिंघकडे एक नजर टाकून प्रत्येकजण आपापल्या कामात व्यस्त झाला. गोविंद सिंघ दारात रेंगाळत असल्याचे पाहून एक मदतनीस आला. त्याने

विचारले- ‘‘काय पाहिजे?’’
गोविंद सिंघने त्याला सॅल्यूट केला; मग थरथरत्या हातात तो लिफाफा धरून पुटपुटला, ‘‘यात काय आहे, ते कळेल का मला?’’ त्या मदतनिसाने पुन्हा तोच सल्ला दिला. सर्वसाधारण तर्काचा. यावर गोविंद सिंघने म्हटले, ‘‘त्यांनी सांगितलंय, की लिफाफा न उघडता तुम्ही त्यात लिहिलेलं सांगू शकता...’’
‘‘तू कुठून आलास?’’ मदतनिसाने विचारले, तसं मग गोविंद सिंघने त्याचा सगळा वृत्तांत कथन केला आणि शेवटी म्हणाला-
‘‘आयुष्यभर मला कुणीही एका शब्दाने नाव ठेवलं नाही; पण संकटाची चाहूल मला लागली होतीच...’’ गोविंद सिंघच्या गालावर अश्रू ओघळले. मदतनिसाने मोठ्या जिज्ञासेनं त्याच्याकडे पाहिलं, समजुतीने तो हसला आणि इतरांचं लक्ष जाण्यापूर्वीच तो म्हणाला, ‘‘जा. घरी जा आणि आराम कर. तुझी तब्येत ठीक नाही. जा, घरी जा.’’
‘‘यात काय आहे - तुम्ही नाही सांगू शकणार?’’ गोविंद सिंघने मोठ्या अजिजीने विचारले. मदतनिसाने त्याच्या हातून लिफाफा घेतला. पाहिला आणि विचारले - ‘‘मी उघडू का?’’
‘‘नको, नको, नको!’’ गोविंद सिंघ ओरडला अन् पटकन् त्याने तो परत घेतला. त्याच्या नजरेत आता भय गोळा झाले होते. लोक त्याच्याकडे आश्चर्याने पाहत होते. त्याच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवून मदतनिसाने त्याला बाहेर घेतले. ‘‘तू आधी चांगला हो, मग ये. मी सांगतो, तुझी प्रकृती ठीक नाहीय.’’
घराकडे परतताना गोविंद सिंघ विचारात पडला. हे सगळेजण माझ्याशी असं का वागत आहेत - मी वेडा असल्यासारखं?
- आणि असा विचार मनात आला, की गोविंद सिंघ अचानक रस्त्यातच थबकला आणि ओरडला- ‘‘हां! असं काय! वेडा? वेडा!’’
एखादं सत्य गवसल्याचा आनंद गोविंद सिंघला झाला. आता त्याला सगळया लोकांच्या बोलण्याचा, पाहण्याचा अर्थ स्पष्ट झाला. ‘‘आ हा!’’ तो मोठ्याने ओरडला. मोठ्याने हसू लागला. या अशा साक्षात्काराने गोविंद सिंघला मोठं समाधान वाटू लागलं. ‘‘मला वेड लागलं आहे अन् त्याचा मलाच पत्ता नाही, अं!’’ त्याने आठवून पाहिले - गेल्या काही दिवसांतल्या क्षुल्लक घटनासुद्धा वेड्यासारख्या वाटू लागल्या. विशेषत: मातीच्या प्रतिकृती बनवायच्या आपल्या उपद्व्यापाची ती घटना. पंचवीस वर्षे सन्मानाने नोकरी करणाऱ्या एखाद्या सज्जन माणसाने कुठं मातीची खेळणी बनवावीत? हूं: आता त्याच्या हातापायांत प्रचंड बळ आले. मोकळेपण आले. आता साध्या वेगात चालणे त्याला अशक्य वाटू लागले. त्याला चक्क हवेत उडावे वाटू लागले. आता हातवारे करीत अन् हूप हूप करीत गोविंद सिंघ रस्त्याने धावू लागला. मार्केट रोडवरून तो धावला. माणसं त्याच्याकडे थबकून पाहू लागली, तसा तो ओरडून सांगू लागला- ‘‘वेड्या माणसाला हसू नका हं! मातीची खेळणी तुम्ही बनवायला घेतली, तर तुम्हालाही वेड लागेल!’’ आणि मोठ्या आवेशाने ओरडत तो लोकांमध्ये फिरू लागला. शाळेतली पोरं त्याला दिसली अन् त्याला वाटू लागलं, या मुलांना वाघाची नक्कल करून दाखविली, तर किती मजा येईल! आणि तो रस्त्यावर रांगू लागला. गुरकावू लागला.
अशा अत्यंत विचित्र अवस्थेत गोविंद सिंघ घरी आला. घरात मिरच्या कांडीत असलेली

त्याची बायको बाहेर आली. तिने घाबरून विचारले, ‘‘काय झालं? काय हा अवतार!’’ धुरळयाने त्याचे डोके माखले होते. चिखलाने अंग बरबटले होते. हर्षातिरेकाने गोविंद सिंघला बोलणे अवघड झाले होते. ‘‘जे घडलं, ते विचित्रच होतं!’’
‘‘काय?’’
‘‘मी वेडा आहे, वेडा!’’ गोविंद सिंघचे लक्ष कोपऱ्यातल्या टोपलीकडे गेले. खेळण्याच्या साहित्याची ती टोपली. त्याने पटकन ती पालथी घातली, त्याचे हेल्मेट केले अन् डोक्यावर घातले. जमिनीवर मातीच्या प्रतिकृतींची रांग होती. एका महत्त्वाच्या कामात तो व्यस्त झालेला होता - एका गावाची प्रतिकृती तयार करण्याच्या कामगिरीत तो गुंतलेला होता...
...तो गावाचा एक सुरेख देखावा होता. चकचकीत रंगाचा, रस्ते-दगड, हिरवी नारळाची झाडी, डोक्यावर भांडी घेऊन पाण्याला जाणाऱ्या रंगीबेरंगी कपड्यांतल्या स्त्रिया... गोविंद सिंघने त्याच्या स्वत:च्या गावाची प्रतिकृती आठवणींतून जिवंत उभी केली होती. हे काम आजवरच्या कामात सर्वांत अधिक आनंददायक होतं. काम करताना अतिशय उत्साहाने तो सांगायचा, ‘‘हे मी माझ्यासाठी म्हणून ठेवणार आहे - माझ्या वडिलांच्या गावाची स्मृती म्हणून.’’ त्याने जाहीर केले होते, की एखाद्या प्रदर्शनात मी ही प्रतिकृती ठेवीन. मला त्यासाठी मेडलही मिळेल. एखाद्या खजिन्याला सांभाळावं, तसं त्याने ही प्रतिकृती सांभाळली होती. एवढी काळजी घेतली होती, की ते मातीकाम कच्चं असताना बायकोला तो दहा यार्ड दूरच ठेवायचा - दूर रहा! तुझ्या पायांची धूळ या गावावर नको!’’
आता आपल्या वेडेपणाच्या भरात गोविंद सिंघने या कामाकडे पाहिले आणि ते सगळं गाव आपल्या पायांनी तुडवून काढले. अर्धवट ओलसर असलेलं ते काम. त्याचा रंगीत चिखल झाला. गल्लीतल्या गाढवाचं ओरडणं त्याच्या कानावर आलं, तसं त्याने तो सगळा चिखल गाढवावर फेकला अन् म्हणाला, ‘‘खा हे तुला आवडलं तर! ते एक सुंदर गाव होतं बरं!’’
आणि गोविंद सिंघ पुन्हा फिरायला बाहेर पडला. आता तो धडपडत जाऊ लागला. डोक्यावर मातीचं हेल्मेट तसंच होतं. त्यातून करडे-भुरे विस्कटलेले केस बाहेर आलेले होते. खांदे जणू मागे बांधलेले होते. बोटांच्या हालचाली चालू होत्या- त्यांत पत्र धरलेलं होतं. आभाळाकडे पाहून तो चालू लागला होता. मार्केट रोडवरून तो अशा तऱ्हेने चालत होता, की जणू तो या विश्वातला एकमेव असा आहे. त्याच्या वेडेपणाने असं अमर्याद स्वातंत्र्य त्याला दिलं होतं, शक्ती दिली होती, उल्हास दिला होता.
अशा तऱ्हेने चालत जाताना खांबावरच्या दिव्याकडे गोविंद सिंघची नजर गेली. ‘‘पपईएवढ्या आकाराचा बल्ब? अं!’’ तो पुटपुटला, गालातल्या गालात हसलादेखील. अशा बल्बकडे दगड फेकण्याची त्याची फार दिवसांपासूनची सुप्त इच्छा होती. आता अशा आनंदाच्या अन् मुक्त स्थितीत त्याला कसलेही बंधन नव्हते आणि इच्छा दाबून ठेवण्याची आवश्यकताही नव्हती. त्याने एक दगड उचलला आणि नेम धरून बल्बला मारला. खळळकन् फुटलेल्या बल्बचा आवाज गोविंद सिंघला संगीतासारखा वाटून गेला; पण जेव्हा पोलिसाने त्याच्या खांद्यावर हात ठेवून दरडावले - ‘‘का रे, तसं का केलंस?’’ - तेव्हा गोविंद सिंघ लाचार झाला. तो म्हणू लागला- ‘‘पपईएवढे ते बल्ब मला फोडून टाकावे वाटले...’’
‘‘चल ठाण्यात!’’

‘‘हां हां, मी जेव्हा मिसोपोटेमियाला होतो ना, तेव्हा त्यांनी मला अर्ध्याच मजुरीवर ठेवलं होतं पहा... गोविंद सिंघ म्हणाला आणि ठाण्याकडे पोलिसासोबत निघाला. मध्येच तो थांबू लागला. वाकून पाहू लागला. म्हणू लागला - ‘‘हा रस्ता काही सरळ नाही पहा...’’ काही वाहनं आणि सायकलस्वार त्याच्याकडे येत असल्याचे त्याला जाणवले. त्याला लक्षात आले, प्रत्येक जण चुकतो आहे. त्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. तो रस्त्याच्या मध्यभागी थांबला. त्याने हात पसरले आणि ओरडला- ‘‘थांबा!’’ वाहनं थांबली. सायकलस्वार उतरले आणि गोविंद सिंघने जणू भाषण सुरू केले - ‘‘मी जेव्हा मिसोपोटेमियाला होतो- मी सांगतो तुम्हाला - तुम्हाला कशाचीही अन् कसलीही माहिती नाही... ‘‘पोलिसाने त्याला बाजूला ओढले आणि थबकलेली रहदारी सुरू केली. सायकलस्वारांपैकी एकजण तसाच पुढे आला- ‘‘अरे! हा तर गोविंद सिंघ आहे! सिंघ, अरे काय अवतार झालाय तुझा! काय झाले?’’
भ्रमिष्ट अवस्थेत धूसर असं दिसत असतानाही गोविंद सिंघने आवाजावरून ओळखले- ऑफिसचा लेखापाल होता तो. गोविंद सिंघने पटकन् टाचा जुळवल्या. सॅल्यूट दिला. ‘‘माफ करा साहेब, तुम्हाला थांबवायचं नव्हतं मला, तुम्ही जाऊ शकता-’’ त्याने रस्त्यावर हात करून मार्ग दाखविला; तसं लेखापालाची नजर गोविंद सिंघच्या हातातल्या पत्राकडे गेली. चिखलाने अन् चुरगळल्याने खराब झालेले असले तरी लेखापालाने ते ओळखले.
‘‘गोविंद सिंघ, तुला आमचे पत्र मिळाले?’’
‘‘हो साहेब - पण कुणाला त्याच्याबद्दल सांगू नका, जा.’’
‘‘काय झालंय?’’ लेखापालाने त्याच्या हातून पत्र हिसकावले.
‘‘ते का उघडलं नाहीस?’’ असं म्हणत तो लिफाफा त्याने फोडून मोठ्याने पत्र वाचू लागला - ‘तुम्ही पाठविलेल्या प्रतिकृती जनरल मॅनेजर साहेबांना अतिशय आवडल्या आणि तुम्हाला शंभर रुपयांचे बक्षीस दिले आहे. तुमचा हा छंद चालू राहावा, तुम्हाला उत्तेजना मिळावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.’
एक एक शब्दाचा अनुवाद होऊन गोविंद सिंघच्या कानावर येऊ लागला आणि पत्रासोबतचा शंभर रुपयांचा चेक त्याच्या हातात लेखापालाने दिला. हे सगळं पाहायला मोठा जमाव जमला होता.
गोविंद सिंघने ते पत्र आपल्या डोळ्याला लावले आणि आता तो कपाळावर मारून घेऊ लागला. ओरडून विचारू लागला -
‘‘सांगा साहेब आता, मी वेडा आहे का नाही, वेडा!’’
‘‘तू चांगला दिसतोस, वेडा नाहीस.’’ लेखापाल सांगू लागला, तसं गोविंद सिंघ त्याच्या पायाशी वाकला. डोळे भरून आले होते. गळा भरून आला होता. ‘‘तुम्ही देवासारखे आहात साहेब, मी वेडा नाही हे तुम्ही सांगता - मला... मला फार फार बरं वाटलं पहा.’’
दुसऱ्या पेन्शनच्या दिवशी गोविंद सिंघ नेहमीप्रमाणे कडक गणवेशात कार्यालयात आला. पेन्शन घेताना कार्यालयातल्या लोकांनी चौकशी केली- ‘‘आता कोणती खेळणी बनवीत आहेस?’’
‘‘छे, छे! आता हे सगळं बंद. शहाण्या माणसाचं ते काम नाही’’ असं म्हणत गोविंद सिंघने आपली पेन्शन घेतली आणि ताठ मानेने तो कार्यालयाच्या बाहेर पडला.

# आंधळा कुत्रा

मोठा रुबाबदार किंवा जातिवंत असा तो कुत्रा नव्हता. सर्वसाधारणपणे सगळीकडे आढळणाऱ्या कुत्र्यांसारखा भुरकट आणि कुणाकडून कोण जाणे, शेपूट कापलेला असा. रस्त्यावर पैदा झालेला, भाकरतुकडा किंवा बाजारातल्या उकिरड्यावर जगणारा असा तो होता. डोळयांत ठिपके होते, वागायला विचित्र होता आणि विनाकारण भुंकायला तयार असणारी प्रकृती. दोन वर्षांचा असतानाच त्याच्या अंगावर झगड्याच्या कितीतरी खुणा झाल्या होत्या. दुपारच्या वेळेस त्याला विश्रांती घ्यायची असली, की तो सरळ मार्केटच्या पूर्वेला गटारात अंगाचं मुटकुळं करून ताणून द्यायचा. संध्याकाळी नेहमीप्रमाणे भटकायला निघायचा. जवळपासच्या रस्ते- गल्ल्यांतून उगीचच कुणावर तरी गुरकावत फिरायचा, रस्त्यावरचं पडलेलं ते खायचा आणि अंधार पडला, की मार्केट गेटमध्ये यायचा.

त्याचा असा दिनक्रम तीन वर्षे चालला आणि नंतर त्याच्या या आयुष्यात बदल झाला. दोनही डोळयांनी आंधळा असलेला एक भिकारी मार्केट गेटला आला. एक म्हातारी त्याला सकाळीच तिथे येऊन गेटजवळ बसवून जायची; दुपारी थोडं अन्न घेऊन यायची आणि अंधार पडला, की भिकेचे पैसे गोळा करून त्याला परत घेऊन जायची.

...कुत्रा जवळच झोपायचा. एकदा अन्नाच्या वासाने त्याची भूक चाळवली. तो उठला आणि जेवत असणाऱ्या त्या आंधळया भिकाऱ्याकडे येऊन समोर उभा राहिला. त्याच्या कटोऱ्यातल्या खरकट्याकडे आशाळभूतपणे पाहत शेपटी हलवीत उभा राहिला. भिकाऱ्याने हवेतच हात फिरवीत आवाज दिला- "कोण आहे?" आणि कुत्र्याने पुढे येऊन त्याचे हात चाटले. आंधळया भिकाऱ्याने शेपटीपासून कानापर्यंत त्याला गोंजारले अन् म्हणाला, "वा! काय सुरेख आहेस तू! ये माझ्यासोबत रहा." भिकाऱ्याने टाकलेले अन्न कुत्र्याने आधाशासारखे खाल्ले. मैत्रीसाठी तो एक अनुकूल असा क्षण होता. आता ते दोघे दररोज भेटू लागले. आपले भटकणे सोडून कुत्रा आता आंधळया भिकाऱ्याच्या बाजूला बसून राहू लागला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत मिळणाऱ्या भिकेकडे लक्ष ठेवू लागला. लवकरच कुत्र्याच्या लक्षात आले, की समोरून जाणारी-येणारी माणसं पैसे टाकून जात आहेत आणि मग, जो कुणी पैशाशिवाय पुढे जाऊ लागला- त्याच्या मागे जाऊन आता हा कुत्रा त्याचे कपडे ओढू लागला; त्याला परत मागे आणू लागला आणि कटोऱ्यात पैसे टाकल्यावरच अशा जाणाऱ्या-येणाऱ्यांची सुटका होऊ लागली. रस्त्यावरच्या वर्दळीत एक आगाऊ असा पोरगा होता. तो, 'ए आंधळया!' असं म्हणून भिकाऱ्याला चिडवायचा. कधी समोरची नाणी उचलायचा प्रयत्न करायचा. आंधळा भिकारी त्याच्यावर वैतागून ओरडायचा. हातातली काठी स्वत:भोवती फिरवायचा. प्रत्येक गुरुवारी डोक्यावर केळी किंवा काकड्या घेऊन हा पोरगा यायचा.

गुरुवारची दुपार म्हणजे आंधळया भिकाऱ्याला एक संकटच असायचं. तो बसायचा, त्याच कमानीजवळ काही विक्रेतेही जमायचे. चाकांच्या गाडीवर स्वस्तातली अत्तरं विकणारा, पोत्यावर पुस्तकं मांडून बसणारा पुस्तक विक्रेता, बांबूच्या चौकटीला रिबिनी वगैरे लावून विकणारा... अशा माणसांची तिथे वर्दळ असायची. एका गुरूवारी तो आगाऊ पोरगा तिथे आला. तेव्हा विक्रेत्यांपैकी एकाने आवाज दिला- "अरे आंधळया, आलं पहा तुझं संकट!"

“अरे देवा! आज गुरुवार!” आंधळा भिकारी वैतागला. त्याने हात फिरवून कुत्र्याला आवाज दिला- “यू यू! कुठे आहेस?” त्याने वैशिष्ट्यपूर्ण आवाजात दिलेली हाक ऐकून कुत्रा जवळ आला. त्याने कुत्र्याच्या डोक्याला गोंजारले आणि म्हटले, “या बदमाशाला रोखून ठेव!” याच वेळी पोरगा चहाटळासारखा पुढे आला- “आंधळया! तू अजूनही आंधळा असल्याचे सोंग करतोस ना! तू खरेच आंधळा असशील, तर पहा मी आता काय करतो” - थांबून त्या पोराने भिकेच्या कटोऱ्याकडे हात केला. कुत्र्याने लागलीच उडी मारून त्याचे मनगट धरले. घाबरलेल्या पोराने मनगट सोडवून धूम ठोकली. मार्केटच्या बाहेर जाईपर्यंत कुत्र्याने त्याचा पाठलाग केला.
“पाहा! मुक्या प्राण्याचं केवढं प्रेम आहे म्हाताऱ्यावर!” अत्तर विक्रेता मोठ्या कौतुकाने सांगू लागला.
एका संध्याकाळी भिकाऱ्याला घेऊन जाण्यासाठी म्हातारी आलीच नाही. अंधार पडेपर्यंत भिकाऱ्याने तिची वाट पाहिली. चिंतेत बसून राहिलेल्या त्या भिकाऱ्याला मग एका शेजाऱ्याने सांगितले, “आता म्हातारीची वाट पाहण्यात अर्थ नाही. ती कधीच येणार नाही. आज दुपारीच ती मरण पावली...”
आंधळया भिकाऱ्याचं एकमेव घर आणि जगात त्याची काळजी घेणारं एकमेव माणूस आता राहिलं नव्हतं. रिबिन विक्रेत्याने एक पांढरी रिबिन त्याला दिली. “ही घे रिबीन तुला. फुकटच घे. बांध ती तुझ्या कुत्र्याला. कुत्र्याचं तुझ्यावर खरंच प्रेम असेल, तर तो तुला घेऊन जाईल.”
आता कुत्र्याच्या आयुष्याला नवं वळण लागलं. म्हातारीची जागा कुत्र्याला मिळाली. आता कुत्र्याचे स्वातंत्र्य पूर्णपणे संपले. रिबिन विक्रेत्याने दिलेल्या रिबिनीच्या परिघाएवढेच कुत्र्याचे विश्व मर्यादित झाले. आता त्याला त्याचे जुने आयुष्य - ते भटकणे... सगळे विसरून जावे लागले. त्याला नेहमीसाठी त्या दोराच्या टोकाशी बद्ध राहून बसावे लागणार होते. दुसरा कुत्रा किंवा कुणी वैरी दिसला, की अभावितपणे तो झेप घालायचा; मग गळयातली रिबिन ओढली जायची आणि आंधळया भिकाऱ्याकडून- त्याच्या मालकाकडून - त्याला मार बसायचा, “हरामखोरा, मला पाडतोस काय? काही लाज तुला?”
थोड्याच दिवसांत, आपल्या उपजत वृत्ती आणि आवेशाला शिस्त लावायला कुत्रा शिकला. कुणी कुत्रा त्याच्याजवळ येऊन गुरकावू लागला तरी आता तो त्याची दखल घेईनासा झाला. आपल्या जातभाईंसोबत वावरणं, संपर्क ठेवणं याचासुद्धा त्याला विसर पडला.
जेवढं कुत्र्याचं नुकसान झालेलं होतं, त्याच प्रमाणात त्याच्या मालकाचा मात्र फायदा झाला होता. आयुष्यात कधी झाली नव्हती, एवढी प्रगती आंधळया भिकाऱ्याची झाली होती. दिवसभर आता तो आपल्यासमोर कुत्र्याला धरून उभा असायचा. एका हातात छडी आणि दुसऱ्या हातात कुत्र्याची ती दोरी धरून तो आपल्या घरून निघायचा. त्याचं घर - मार्केटपासून काही यार्डांवर असलेल्या धर्मशाळेचा तो व्हरांडा. म्हातारीच्या मृत्यूनंतर आता त्याने या जागेचा कब्जा घेतला होता. सकाळीच तो निघायचा. त्याला लक्षात आलं होतं, की एका ठिकाणी बसून जेवढी भीक मिळते, त्याच्या तिप्पट उत्पन्न फिरत राहण्याने मिळते. धर्मशाळेची गल्ली आणि जिथे जिथे म्हणून माणसांची वर्दळ-

आवाज असेल, तिथे तो थांबायचा, हात पसरायचा, भीक मागायचा. दुकानं, शाळा, दवाखाने, हॉटेल - आता त्याने काही शिल्लक ठेवले नव्हते. कुत्र्याला थांबवायचे असले, की तो रिबिन ओढायचा आणि निघायचे असले, की एखाद्या गाडीवानासारखा तो ओरडायचा. कुत्रा त्याला जपायचा. चालताना कुठे ठेच लागू नये, नालीत कुठे पाऊल पडू नये, याची काळजी पावला-पावलावर घ्यायचा. त्यांची अशी मैत्री पाहून लोक पैसे द्यायचे. मुलं भोवती जमायची, काही खायला द्यायची. कोणताही कुत्रा आपली विश्रांती आणि पोटापाण्याची कामं याचा चांगला मेळ घालू शकण्याइतका कार्यक्षम असतोच. कामाच्या दरम्यान विश्रांती घेण्याची त्याची प्रकृती असते; पण आता या कुत्र्याचं (आता तो 'टायगर' झाला होता.) सगळं स्वास्थ्य हरवलं होतं. हा आंधळा म्हातारा भिकारी जेव्हा कुठे बसेल, तेव्हाच आता या कुत्र्याला विश्रांती मिळायची. म्हातारा रात्री झोपताना आपल्या हाताला रिबिनीची ती दोरी गुंडाळूनच झोपायचा. "मला धोका पत्करायचा नाही, बेट्या!" असं तो म्हणायचा. जास्तीत-जास्त पैसे मिळवायच्या इच्छेने त्याचा आंधळा मालक एवढा झपाटला होता, की कुठं विश्रांती घेणं म्हणजे पैशाची संधी सोडून देणं असं त्याला वाटायचं. परिणामी कुत्र्याला सतत उभं राहावं लागायचं, चालत राहावं लागायचं. कधी त्याचे पाय दुखायचे; पण तो सावकाश चालू लागला, की मालक ओरडायचा त्याला हातातल्या छडीने ओरडून पुढे ढकलायचा. त्यामुळे कुत्रा केकाटायचा, विव्हळायचा. "ओरडू नको बेट्या! तुला खायला घातलं ना मी! तुला लोळायला पाहिजे फुकट, नाही का?" आंधळा भिकारी रागवायचा. अशा जुलमी धन्याशी बांधलेला कुत्रा बाजारात हळूहळू पावलं टाकीत, धडपडत, कण्हत-कुंथत चालत राहायचा. बाजारातली वर्दळ थांबून गेल्यावर रात्री दूरवर कुत्र्याचे विव्हळणे ऐकू यायचे. त्याच्या अशा ओरडण्याचे मूळ स्वरूपही बदललेले असायचे. काही महिन्यांतच कुत्र्याच्या कमरेची हाडं वर आली; कातडीतून फासळ्या उठून दिसू लागल्या.

रिबिन विक्रेता, अत्तर विक्रेता आणि पुस्तकं विकणारा- यांनी हे एकदा पाहिले. गिऱ्हाइकांची वर्दळ नसताना ते बोलायचे - "कुत्र्याची अशी अवस्था पाहून मला फार वाईट वाटते बघा. आपण काही करू शकणार नाही का त्याच्यासाठी?" रिबिन विक्रेता म्हणाला, "या हरामखोर भिकाऱ्याने आता व्याजाने पैसे द्यायला सुरवात केलीय म्हणे, मला त्या फळवाल्याकडून कळलं! आवश्यकतेपेक्षा जास्त पैसे मिळवायच्या मागे तो लागला आहे. पैशासाठी तो सैतान बनलाय!" याच वेळी अत्तर विक्रेत्याची नजर रिबिन स्टँडवरच्या कात्रीवर गेली. "आण ती इकडे" असं म्हणून त्याने ती कात्री काढली.

पूर्वेकडच्या बाजूने आंधळा भिकारी जात होता. कुत्रा दोर ओढीत होता- त्याला रस्त्यावर हाडूक पडलेले दिसत होते, त्याच्यासाठी कुत्रा तिकडे ओढत होता. दोर ओढला गेला अन् हाताला हिसका बसला, तसं भिकाऱ्याने खसकन् दोर परत ओढला अन् कुत्र्याच्या पाठीत लाथ घातली. कुत्रा केकाटला. हाडूक मिळाले नाही तसा तो विव्हळला. भिकाऱ्याने पुन्हा एक धक्का दिला अन् आता तो त्याला शिव्या-शापही देऊ लागला. अत्तरवाला पुढे आला, त्याने हातातल्या कात्रीने कुत्र्याचा दोर कापला, तसं कुत्र्याने झेप मारून हाडूक उचललं. आंधळा भिकारी आता थबकला. हातात दोर फिरवीत तो उभा राहिला. "टायगर! टायगर! कुठे आहेस?" तो ओरडला. अत्तरवाला गुपचूप बाजूला झाला. पुटपुटत तो म्हणू

लागला, "राक्षसा! आता तुला तो कधीच भेटणार नाही! तो आता स्वतंत्र झालाय!" कुत्रा मोठ्या वेगाने पळाला. मोठ्या खुशीत तो आता माती उकरू लागला, मार्केट चौकाभोवती फेऱ्या घालू लागला, दुसऱ्या कुत्र्यांच्या अंगावर पडू लागला, लोळू लागला, ओरडू लागला, भुंकू लागला. त्याच्या डोळयांत आनंदाची चमक दिसू लागली. खाटकाची टपरी, चहाची टपरी, बेकरी - आता सगळीकडे तो नेहमीप्रमाणे उड्या मारू लागला.

रिबिन विक्रेता आणि त्याच्या दोन मित्रांनी हे सगळं पाहिलं अन् त्यांनी या सगळयाची मजा घेतली. आता रस्त्याने धडपडणाऱ्या आंधळया भिकाऱ्याकडे पाहून त्यांना हसू आवरेना झाले. आंधळा भिकारी आता रस्त्यावर खिळलेला होता. हातातली छडी फिरवीत होता. अधांतरी झाल्यासारखा तो वाटत होता. तो ओरडू लागला होता - "माझा कुत्रा कुठाय्, माझा कुत्रा कुठाय? त्याला कुणीतरी माझ्याकडे द्याल का?... पुन्हा हाताला आला, तर त्याला ठारच मारणार आहे मी..." तो चाचपडू लागला. रस्ता ओलांडायला गेलं, तर वाहनांच्या आवाजाने गोंधळू लागला, परतू लागला. त्याला धाप लागली. आंधळया भिकाऱ्याकडे पाहत विक्रेते बोलू लागले - "या हरामखोराला असंच पाहिजे!"

आंधळया भिकाऱ्याने कुणाची तरी मदत घेऊन धर्मशाळेचा व्हरांडा गाठला. आपल्या तरटावर आता तो थकून पडून राहिला.

दहा दिवस झाले, पंधरा झाले, वीस दिवस झाले, आंधळा भिकारी कुणाला दिसला नाही. त्याचा कुत्राही कुठे दिसला नाही. नेहमीचे ते विक्रेते म्हणू लागले, "कुत्रा आता मजेने कुठेही भरकटत असेल आणि आंधळा भिकारी कायमचाच गेला असेल..."

पण असं बोलणं संपतं न् संपतं तोच त्यांना आंधळया भिकाऱ्याच्या काठीचा- नेहमीचा ओळखीचा - आवाज येऊ लागला. आंधळा भिकारी आपल्या कुत्र्याला घेऊन येत असल्याचे त्यांनी पाहिले. "पहा, पहा!" ते बोलू लागले - त्याने कुत्र्याला पुन्हा गाठलेच अन् बांधला दोर त्याच्या गळयात, अं!" रिबिन विक्रेत्याला राहवले नाही. तो पुढे सरसावला "कुठे गेला होतास इतके दिवस?"

"सांगू, काय झालं ते?" आंधळा भिकारी मोठ्याने म्हणाला, "हा कुत्रा पळून गेला. मी तिथं बसल्या जागीच एक-दोन दिवसांत मरून गेलो असतो - भीक नाही, अन्न नाही. जणू कैदेत बसल्यासारखा; त्या धर्मशाळेत! असाच बसून राहिलो असतो, तर संपून गेलो असतो; पण दुसऱ्या दिवशी हा परतला."

"केव्हा- कसा काय?"

"काल रात्री! मी झोपलो असताना मध्यरात्री हा आला अन् माझं तोंड चाटू लागला. असं वाटलं, त्याला मारून टाकावं! मी त्याला असा मार दिला, की आयुष्यभर तो विसरणार नाही." आंधळा भिकारी सांगू लागला- "पण मी माफ केलं त्याला! किती झालं तरी कुत्राच तो! काहीतरी सटरफटर खायला मिळेपर्यंत तो भटकत होता, पण जेव्हा उपाशी रहायची वेळ आली, तसा परतला माझ्याकडे! आतामात्र तो मला केव्हाच सोडून जाऊ शकणार नाही. पहा!"

"मी काय केलंय-" आणि त्याने हातातली दोरी दाखविली. या वेळी ती मजबूत साखळी होती. धातूची.

आता पुन्हा त्या कुत्र्याच्या डोळयातली चमक हरवली, त्यात निराशा दिसू लागली.

''चल, मूर्खा चल!'' आंधळा भिकारी ओरडला... बैलावर ओरडणाऱ्या माणसासारखा. त्याने साखळी ओढली, काठीने त्याला ढकलले आणि कुत्रा सावकाश चालू लागला. काठीचा, पावलांचा आवाज दूर जाताना विक्रेते पाहू लागले...
''आता मृत्यूच या कुत्र्याला मदत करू शकेल'' उसासा सोडत रिबीन-विक्रेता बोलू लागला - ''स्वत: होऊनच आपल्या विनाशाकडे परतणाऱ्याला आपण तरी काय मदत करू शकणार, नाही का!''

♦♦♦

# अनुकंपा

मद्रास- बेंगलोर एक्सप्रेस काही मिनिटांतच सुटण्याच्या तयारीत होती. ट्रंका-वळकट्यांनी भरलेल्या ट्रॉलीज, हातगाड्यांचा खडखडाट यांची धामधूम चालू होती. फळविक्रेते, पान-विडी विक्रेते यांची कर्कश ओरड चालूच होती. उशिरा येणारे धक्काबुक्की करीत होते, ओरडत होते, घामाघूम झाले होते. इंजिनच्या बॉयलरचा कंटाळवाणा अन् सारखा सारखा तोच आवाज या वातावरणात भर घालू लागला. पहिली घंटा झाली आणि गार्डने आपल्या घड्याळात पाहिले. मि. राजम अय्यर प्लॅटफॉर्मवर मोठ्या विचित्र अशा घाईत आले. लहान वळकटी एका बगलेत, तर कळकट दिसणारी पिवळसर ट्रंक दुसऱ्या, असा त्यांचा अवतार होता. समोरच्याच थर्डक्लासच्या कंपार्टमेंटकडे त्यांची नजर गेली. दाटीमुळे डब्याचा दरवाजा उघडणं शक्य नसल्याचं पाहून त्यांनी मग खिडकीतूनच स्वत:ला आत घुसविले.

पंधराच मिनिटांत खिडकीतून दिसणारी, उन्हात चमकणारी घरं, शेती गाडीने ओलांडली अन् मद्रास मागे पडलं. मंधकम या दुसऱ्या स्टेशनवर बरेच प्रवासी उतरले. रेल्वेचा हा डबा ‘8 प्रवाशांसाठी, 4 ब्रिटिश ट्रूप्स किंवा 6 भारतीय ट्रूप्स’ अशी व्यवस्था नोंदविलेला होता, त्यात आता केवळ नऊच प्रवासी उरले. राजम अय्यर यांना, एका दुबळया काटकुळया प्रवाशासमोरची जागा मिळाली आणि ते विसावले. या प्रवाशाने घाईतच अंगातला कोट काढला होता, त्याची घडी करून तो डोक्याखाली घेऊन अंगाचं मुटकुळं करून तो निजूनही गेला. बसलेल्या जागी निजण्यासाठी त्याने शरीराचा संकोच करून गुडघे आवळून घेतल्याने चेंडूसारखा गोलाकार त्या प्रवाशाला आला होता. राजम अय्यर यांनी त्याच्याकडे एक सौम्य आणि स्नेहपूर्ण दृष्टीने पाहिले, आपला चष्मा सावरला आणि खिशातून एक लहानशी पुस्तिका काढली. तामीळ भाषेतली मोठ्या अक्षरांतली ती जीर्ण पुस्तिका, ‘संध्या’ विधीची होती. प्रत्येक ब्राह्मण दररोज तीन वेळा ती वाचतो.

काटपडी या स्टेशनवरून चढलेल्या एका प्रवाशाच्या अरेरावी आणि वादावादीमुळे निवांत अन् समाधानाच्या मन:स्थितीत असलेले अय्यर दचकले. नवा आलेला हा प्रवासी सीटवर निजलेल्या त्या दुबळया प्रवाशावर वैतागला होता- त्याला रेल्वेचे नियम बजावून सांगत होता. तिसऱ्या वर्गाचे नियम.

त्याच वेळेस तो त्या दुबळया माणसाला बाजूला ढकलून, त्याची अडचण करून बसला होताच; शिवाय त्यालाच शहाणपणाच्या गोष्टी सांगू लागला. या गोष्टी अविवेकीपणापासून उद्धटपणाच्या आणि इतकेच काय अभद्र स्वरूपाच्या होत्या.

राजम अय्यर यांनी आपल्या चष्म्याच्या वरून त्याच्याकडे नजर टाकली. त्याचे डोळे तारवटलेले- भयंकर असे वाटत होते. अय्यर पुन्हा आपल्या पुस्तिकेत लक्ष देऊ लागले; पण त्यांना ते शक्य होईना. त्या दांडगट माणसाचं बोलणं अधिकच जोर धरू लागलं.

‘‘काय चाललंय हे?’’ अचानकच राजम अय्यर यांनी दरडावले.

‘‘काय चाललंय म्हणजे?’’ त्या माणसाने राजम अय्यरकडे वळून उद्धटपणाने विचारले.

‘‘थोडं व्यवस्थित बोला,’’ राजम अय्यर ठामपणे म्हणाले-

‘‘तुम्ही आधी व्यवस्थित बोला.’’ त्याने उत्तर दिले.

थोडी शांतता.
‘‘हे पहा,’’ राजम अय्यर आपुलकीने सांगू लागले- ‘‘अशा प्रकारचं वागणं केव्हाच चांगलं नसतं.’’
नवीन माणूस गप्प बसला. राजम अय्यर यांना हुरूप आला आणि ते त्याला नीती-नियमांकडे घेऊन गेले- ‘‘थोडं विचार करा आणि रीतीने वागा. ते आपलं कर्तव्य आहे.’’
‘‘तुम्ही आपलं पहा.’’ नवीन माणसाने उत्तर दिले.
राजम अय्यर यांनी असहमतीने मान हलविली आणि एक प्रकारचा हेल काढून ते म्हणाले, ‘‘नाही.’’ नवीन माणूस त्यांच्याकडे काही वेळ पाहत राहिला आणि अचानक ज्ञान प्राप्त झाल्यासारखा म्हणाला,
‘‘तुम्ही ब्राह्मण आहात, होय! हंऽ ऐका महाराज, आता तुमचे दिवस संपले बरे का! वर्षोन् वर्षे तुम्ही ज्या तऱ्हेने दांडगाई केली, आता तसं करता येणार नाही, लक्षात ठेवा!’’
राजम अय्यर किंचीत हसले. ‘‘त्याचा, या तुझ्या निष्ठूर वागण्याशी काय संबंध आला इथे बाबा?’’
नवीन माणसाला, हे साधूसारखं बोलणं लक्षात आलं अन् तो म्हणाला, ‘‘हे ब्राह्मण महाराज, तुमच्या पायाची धूळ लावू का हो मी? ब्राह्मण महाराजऽ महाराज!’’
एखाद्या चालीत बोलावे तसे तो बोलला- ‘‘तुमचे दिवस आता संपले बरं का महाराज! आता आमच्यावर तुम्ही कसा अधिकार गाजविता, ते पाहतोच मी’’
‘‘कोण कुणाचा अधिकारी असतो बाबा!’’ राजम अय्यर एखाद्या तत्त्वज्ञासारखे बोलले.
नवीन माणूस आता एकदम असंबद्ध बोलू लागला-
‘‘मटनाची जी किंमत वाढलीय भयंकर; जवळपास दुप्पट झालीय ती आता-’’
‘‘असं का’’ राजम अय्यर यांनी विचारले.
‘‘हो- आणि का माहिताय का?’’ तो सांगू लागला, ‘‘ब्राह्मणांनी मटन खायला सुरुवात केली आणि चोरून विकत घेण्यासाठी जादा किंमत देतात ते!’’ तो मग इतर प्रवाशांकडे वळून सांगू लागला, ‘‘आणि आपणा ब्राह्मणेतर लोकांनाही तीच किंमत द्यावी लागतेय... उघड्यावर खरेदी करूनसुद्धा!’’
राजम अय्यर सीटवर मागे टेकून बसले. एक म्हण त्यांना आठवली आणि स्वत:शीच त्या म्हणीचा उच्चार करून ते गप्प राहिले- चिखलात तुम्ही दगड फेकला, की शिंतोडे तुमच्या अंगावर उडणारच. ‘‘आणि’’ - तो माणूस म्हणाला, ‘‘आधी मटनाची किंमत पौंडाला पाच आणे होती, मला ते दिवस चांगले आठवतात. आता तेवढ्याचसाठी बारा आणे द्यावे लागतात. का? कारण ब्राह्मण जादा पैसै द्यायला तयार असतो म्हणून; मात्र त्याला ते चोरून घ्यायला मिळालं तर! अहो, गळयात जानवं घातलेल्या भट-ब्राह्मणांना, आपल्या बगलेत टॉवेलमध्ये मासे गुंडाळून घेऊन जाताना मी स्वत: माझ्या डोळयांनी पाहिलेलं आहे! त्यांना तुम्ही विचारलं, ते काय आहे- तर सांगतील केळी आहेत म्हणून! हूं: केळी, जिवंत केळी! एकदा असंच मी एकाला गाठून त्याला गुदगुदल्या केल्या - तर त्याच्या बगलेतून एवढा मोठा मासा पडला! हॅं! अन् म्हणे ब्राह्मण!’’ आणि राजम अय्यरकडे वळून त्याने विचारले, ‘‘तुम्ही सकाळी काय काय जेवला सांगा बरं?’’
‘‘कोण? मी?’’ राजम अय्यरनी विचारले- ‘‘तुला काय करायचंय?’’

“पहा!” नवीन माणूस दुसऱ्या प्रवाशांना सांगू लागला-
“सकाळी काय जेवलो हे सांगायला याला का बरं भीती वाटते?” आणि परत राजम अय्यरकडे वळून त्याने विचारले,
“सकाळी काय जेवण घेतले, हे एखाद्याला कुणी विचारू शकत नाही की काय?”
“वा! अवश्य विचारावं की! मी आज दही-भात, तूप, वांग्याची आमटी, उसळ खाल्ली जेवणात.”
“एवढंच?” नवीन माणसाने अभावितपणाने विचारले.
“हो.” राजम अय्यरनी उत्तर दिले.
“खरंच, एवढंच?”
“हो. किती वेळा मी तेच तेच सांगायला पाहिजे?”
“हां हां, चिडू नका, चिडू नका!”
“तुला काय वाटतं, मी खोटं बोलतोय?” राजम अय्यरनी विचारले.
“होय.” त्याने उत्तर दिले. “तुमच्या यादीतून तुम्ही काही गोष्टी विसरला आहात. आज सकाळीच मार्केटमधून केळी- ती पाण्यातली केळी!- घेऊन जाताना मी तुम्हाला का पाहिलं नाही? अं?- टॉवेलात गुंडाळून जाताना? कदाचित तो तुमच्यासारखाच दिसणारा दुसरा कुणी असेल मग. शक्य आहे. माझी बायको माशाची आमटी फार उत्तम करते. तुम्हाला पत्ताही लागणार नाही, दाळीची आमटी कोणती अन् माशाची कोणती ते! तुमच्या पत्नीला- किंवा तुमच्यासारख्या दिसणाऱ्या त्या माणसाच्या पत्नीला माझ्या बायकोकडे पाठवा, अशी आमटी करायला शिकण्यासाठी. आमच्याकडे तयार होणाऱ्या अशा आमटीची चव शेकडो ब्राह्मणांनी अगदी ओरपून घेतलेली आहे. माझ्या बोलण्यात थोडं जरी खोटं असेल तर मला तुम्ही महारोगी म्हणू शकता!”
“तू आहेसच-” राजम अय्यरनी दातओठ खात म्हटले-
“पिसाळलेला महारोगी!”
“कुणाला म्हणालास तू महारोगी?”
“तुला!”
“मला-मला तू महारोगी म्हणतोस?”
“महारोगी नाही, पिसाळलेला महारोगी!”
“तू मला महारोगी म्हणालास?” स्वत:ची छाती ठोठावत त्या माणसाने विचारले.
“तू एक गलीच्छ असं जनावर आहेस!” राजम अय्यर म्हणू लागलो-” तुला पोलिसाच्या हवाली करायला पाहिजे.
“हूं:” नवीन माणसाने म्हटले पोलिस म्हणजे काय हे मला माहित नाही वाटतं की काय!
“अरे हो! तुला पोलिस म्हणजे काय हे पहाण्याचे अनेक प्रसंग आले असतील की! आणि बेवारशासारखा जोपर्यंत मरेपर्यंत मार खाणार नाहीस, तोपर्यंत तुझ्या हलकट आयुष्यात असे अनेक प्रसंग येतील.” राजम अय्यर मोठ्या त्वेषाने म्हणाले, “आणि तुझ्या या खोटारड्या थोबाडाचा असाच शेवट व्हायची तुझी लायकी आहे!”
“काय म्हणालास?” नवीन माणूस धमकावणीच्या स्वरात ओरडला- “हलकटा, काय म्हणालास?”

“गप्प बस!” राजम अय्यर किंचाळून म्हणाले.
“तू गप्प बस!”
“तुला माहीत आहे, कुणाला बोलतोस तू?”
“कोण बेवारशी आहेस तू, मला काय करायचंय?”
“माझ्या चपलेनं तुला झोडपून काढीन!” राजम अय्यर म्हणाले.
“मी तर तुटक्या सँडल्सनी झोडपून तुझा राडा करीन!”
“मी लाथेने उडवीन तुला” राजम अय्यर म्हणाले.
“लाथेने मारशील मला?” नवीन माणसाचा आवाज कर्कश झाला-
“ये बरे! पाहतोच आता.”
दोघंही एकदाच उभे राहिले.
रेल्वेच्या त्या डब्यात ते दोघं एकमेकांसमोर उभे राहिले आणि राजम अय्यर यांना स्वत:च्या कमतरतेची जाणीव झाली. तो नवीन माणूस चक्क नऊ इंचाच्या अंतरावर उभा होता. आता स्वत:ला ते हास्यास्पद वाटू लागले- ठेंगणे अन् लठ्ठ, सैलसर धोतर आणि हिरवा कोट; त्याच्या उलट तो नवीन माणूस त्यांच्यापेक्षा उंच होता, ग्रीसचे धब्बे पडलेल्या खाकी गणवेशात तो उभा होता. डोळ्याच्या कोपऱ्यातूनच राजम अय्यरनी पाहिले, की डब्यातल्या प्रवाशांचे लक्ष आपल्याकडेच लागून आहे- हे प्रकरण आता कसं मिटेल, याची ते वाट पाहत आहेत. या बाबतीत मध्यस्थी करायच्या तयारीत मात्र कुणीही नव्हता.
“आता का तोंडात चिखल भरून असल्यासारखा उभा आहेस?”
त्या नवीन माणसाने विचारले.
“गप्प बस!” त्याच्या आडदांडपणाकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करीत राजम अय्यर ओरडले.
“महाशय, मला लाथ मारणार होता ना तुम्ही?” नवा माणूस मोठ्या ढोंगीपणाने आव आणून विचारू लागला.
“मी काय तुला मारू शकणार नाही?” राजम अय्यरनी विचारले.
“प्रयत्न तर करून पहा.”
“नाही.” राजम अय्यर म्हणाले- “मी त्याहीपेक्षा वाईट करून दाखवितो.”
“करूनच दाखव.” बाह्या सरसावून आणि छाती पुढे काढून तो माणूस म्हणाला.
राजम अय्यरनी कोट काढला. सदऱ्याच्या बाह्या मुडपल्या. आपले हात जोराने घासत त्यांनी अचानक म्हटले, “गप्प उभा रहा!” तो माणूस थोडा मागे सरला. क्षणभरासाठी गोंधळूनही गेला. राजम अय्यरनी त्याला विचार करायची उसंतही दिली नाही. मोठ्या आवेशाने त्यांनी आपला उजवा हात फिरविला, त्याच्या गालाच्या अगदी जवळ आणला; पण थोबाडीत मारायच्या क्षणालाच ते थांबले.
“एक मिनिट थांब. मला वाटतं, तुला आणखी एक संधी द्यावी.”
राजम अय्यर म्हणाले.
“कसली संधी?” त्याने विचारले.
“तुला संधी न देता असं करणं चांगलं राहणार नाही.”

‘‘कसं करणं?’’
‘‘तू तिथेच थांब अन् एकाच सेकंदात ते होऊन जाईल.’’
‘‘एका सेकंदात? काय करणार आहेस तू?’’
‘‘छे! फार गुंतागुंतीचं नाही’’ राजम अय्यरनी अगदी शांतपणाने उत्तर दिलं - ‘‘असं फार अवघड नाही. मी तुझ्या उजव्या गालावर थापड मारीन अन् त्याच वेळेस तुझा डावा कान ओढून धरेन आणि तुझं तोंड, जे आता नाकाखाली आहे, ते चटकन डाव्या कानाखाली जाऊन बसेल आणि - आणखी काही नाही. थांब तिथेच, तुला कसल्याही वेदना होणार नाहीत, मी सांगतो.’’
‘‘तू काय सांगतो आहेस?’’
‘‘- आणि हे सगळं, तू ‘श्री राम’ असं म्हणायच्या आधीच होऊन जाईल बघ.’’
‘‘मी नाही विश्वास ठेवीत असल्या गोष्टींवर.’’
‘‘फारच चांगलं! तू ठेवूच नको त्यावर विश्वास’’ राजम अय्यर निष्काळजीपणाने म्हणाले, ‘‘मला कुणी खिजवल्याशिवाय मीसुद्धा कधी एवढं टोकाला जात नाही.’’
‘‘मला काय लहान बाळ समजतोस की काय!’’
‘‘माझं तर म्हणणंच आहे गृहस्था- माझ्यावर विश्वास ठेवूच नकोस. तू कधी ‘जुजित्सू’बद्दल ऐकलंस का?’’ हां, ‘जुजित्सू’मधला तो एक अगदी साधा डाव आहे, आणि पुऱ्या दक्षिण भारतात तो प्रकार केवळ अर्धा एक डझन लोकांनाच माहित असणार!’’
‘‘तू म्हणाला होतास, मला लाथ मारीन म्हणून...’’ नवीन माणसाने आठवण करून दिली.
‘‘होय, पण हे तर अधिक वाईट आहे नं! नाही का?’’ राजम अय्यरनी विचारले. त्यांनी त्या माणसाच्या चेहऱ्यावर डाव्या कानापासून तोंडापर्यंत एक रेषा काढली. असं करताना राजम पुटपुटू लागले, ‘‘तुझा चेहरा बऱ्यापैकी देखणा आहे हे मला मान्य करावंच लागेल. शरीरही धडधाकट आहे; पण कल्पना कर- तू रस्त्यावरून आपल्या-डाव्या कानाखाली असलेल्या तोंडाचा चेहरा घेऊन चालला आहेस...’’ राजम गालातल्या गालात हसले, ‘‘जलारपेट स्टेशनवर आपल्या डब्याच्या बाहेर तुला पाहण्यासाठी भरपूर गर्दी जमणार असं मला वाटत आहे...’’
नवीन माणसाने आपला गाल कुरवाळला, तो विचारात पडला. राजम अय्यर बोलतच होते- ‘‘हे सगळं तुला आधीच सांगावं, हे माझं कर्तव्य समजतो मी. मी काय तुझ्यासारखा माथेफिरू नाही. तुझी बायको, तुझ्या मुलांबद्दल मला आपुलकी आहे. आपलं असं तोंड घेऊन घरी परतणाऱ्याच्या मुलांना आपल्या बाबांना ओळखायला थोडा वेळही लागेल... किती मुलं आहेत तुला?’’
‘‘चार.’’
‘‘आणि मग विचार कर’’ राजम अय्यर सांगू लागले, ‘‘तुला आपल्या डाव्या कानाखालून जेवण घ्यावं लागणार आणि पाणी पिण्यासाठी तुला तुझ्या बायकोची मदत घ्यावी लागणार. तिला ते तोंडात ओतावं लागणार.’’
‘‘मी एखाद्या डॉक्टरकडे जाईन.’’ नवीन माणूस म्हणाला.
‘‘जरूर जा’’ राजम अय्यरनी उत्तर दिले, ‘‘आणि यावरचा डॉक्टर तुला मिळाला, तर मी तुला हजार रुपये देईन! तू युरोपियन डॉक्टर्सचीसुद्धा चौकशी करू शकतोस.’’

नवीन माणूस चिंतातुर होऊन उभा होता ''हं, आता तयार रहा!'' राजम अय्यर ओरडले, ''उजव्या गालावर एक थापड, मग डाव्या कानाला एक हिसका आणि तुझं तोंड...''

तो नवीन माणूस अचानकच खिडकीकडे धावला. खिडकीतून पार बाहेर वाकला. आता जलारपेट आलं, की हा डबा सोडायचा असं राजम यांनी ठरविलं.

...पण जलारपेट स्टेशनवर रेल्वे थांबता क्षणीच, त्या नवीन माणसाने आपली बॅग आवरली आणि डब्याच्या बाहेर त्याने उडी मारली.

वेडवाकडं धावत जाताना त्याने एका नारळ विकणाऱ्याला अन् खेळण्याचं स्टँड घेऊन फिरणाऱ्या विक्रेत्याला धक्का देऊन जवळजवळ पाडलंच होतं खाली. राजम अय्यरना वाटलं, आता दुसऱ्या डब्यात जाऊन बसायची काही गरज नाही. खिडकीतून वाकून ते ओरडले, ''हे पहा.'' तो नवीन माणूस वळला.

''तुझी जागा ठेवू का?'' राजम अय्यरनी विचारले.

''नको. माझं तिकीट जलारपेटचंच आहे.'' त्या नवीन माणसाने उत्तर दिलं, अन् आणखी घाई करून तो धावला.

रेल्वे आता जलारपेट सोडून जवळपास मैलभर पुढे आली होती. तो अशक्त प्रवासी अजूनही सीटच्या कोपऱ्यात अंगाचं मुटकुळं करून बसला होता. राजम अय्यर यांनी चष्म्यातून वर नजर करून त्याला म्हटले, ''तुला वाटलं, तर झोप ना!''

दुबळा प्रवासी पुन्हा चेंडूसारखा गोल होऊ लागला.

राजम अय्यर त्याला सांगू लागले, ''त्या दांडगटाने, त्याचं तिकीट जलारपेटपर्यंतच आहे, असं म्हटल्याचं तू ऐकलस ना?''

''होय.''

''पण त्याने खोटे सांगितले. तो इथून चवथ्या डब्यात बसलेला आहे. गाडी सुटतानाच तो डब्यात चढल्याचे मी पाहिले.''

त्या दुबळ्या प्रवाशाने एवढ्या कृतज्ञतेने राजम यांचे बोलणे ऐकले; त्याला कसलीही शंका नव्हती; मात्र रेल्वेच्या त्या डब्यातले एकदोन प्रवासी मात्र राजम अय्यर यांच्याकडे संशयाने पाहू लागले.

♦♦♦

# वाघाचा पंजा

नरभक्षकाची काळीकुट्ट कारकीर्द आता संपलेली होती. ज्या माणसांनी त्याला लोळविले होते, ते आजच्या दिवसाचे हिरो झाले होते. शरद ऋतूमध्ये फुलणाऱ्या फुलांचे हार त्यांच्या गळयात घातलेले होते. उंचशा बैलगाडीच्या कडेवर त्यांना बसविलेले होते. त्यांची ही मिरवणूक रस्त्याने जात होती अन् त्या गाडीच्या मागेच बैलांची एक उघडी गाडी होती. या गाडीत त्या वीरांची ट्रॉफी - निस्तेज डोळयांनी, गाडीच्या प्रत्येक बाजूतून बाहेर येणारी आणि धुळीत त्याचं शेपूट लोंबत असलेलं जू पडून होती. गावाने दिवसाची सगळी कामं थांबविली होती. स्त्रीपुरुष आणि पोरासोरांनी मुख्य रस्त्यावर गर्दी केली होती, मिरवणुकीत दाटी झाली होती आणि वाघाबद्दलच्या चर्चेला उधाण आलेले होते.

मेम्पी जंगलाने घेरलेल्या त्या गावावर जवळपास पाच वर्षे वाघाने आपली दहशत बसविली होती.

आम्ही हे दृश्य पाहिलं. भारावून जाऊन मिरवणुकीसोबत जाताना तो गोष्टीवेल्हाळ माणूस आमच्या पाठीवर थाप मारून तो मोठ्या आवाजात सांगू लागला - ‘‘हंऽ, भारावले नं तुम्ही! पण ते धूड तुम्ही लक्षपूर्वक पहा आणि इकडे बाजूला या, ऐका मी काय सांगतो ते...’’ गर्दी पुढे निघून गेल्यावर त्याने आम्हाला मार्गोसा वृक्षाखाली, एका खडकावर बसविले, आणि त्याची हकिकत सांगायला सुरूवात केली :

एकदा मी कोप्पलला मुक्कामाला होतो. मेम्पी परिसरातलं हे सगळयांत दुर्गम असं गाव. जगातल्या कोपऱ्यातल्या तशा निर्जन ठिकाणी माझं काय काम पडलं याचं तुम्हाला नवल वाटेल. मी सांगतो, तुम्हाला आठवत असेलच, की माझ्या कामाविषयी तुम्हाला सांगितलं होतं- एका फर्टिलायझर कंपनीचा मी एजंट होतो. माझ्या आयुष्यातला तो सगळयांत त्रासदायक असा कालावधी होता. कंपनीच्या उत्पादनाचा प्रसार करण्यासाठी महिन्यातले पंचवीस दिवस मला, देशातल्या कोपऱ्यान् कोपऱ्यात जावं लागायचं... असंच एकदा मला कोप्पल या गावी यावं लागलं. त्याला खरं म्हणजे गावही म्हणता येत नव्हतं. भोवताली वेढलेल्या जंगलात साफसूफ करून वसलेल्या चाळीस एक घरांची, एकदोन गल्ल्यांची ती वस्ती होती. गलीच्छ आणि निरुत्साही वाटावी अशी.

आपल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी कंपनीने हे असं गाव का निवडलं असावं हे मला समजतच नव्हतं. फक्त हे रेल्वे स्टेशनचं गाव होतं म्हणूनच त्यांना हे कळलं असावं; अन्यथा या गावाचं स्वरूप त्यांना माहीत नव्हतं. होय, इथनं काही दुर्गम भागात जाणाऱ्या रेल्वे-लाईन्स होत्या; पण त्यापैकी बऱ्याच ट्रेन्स इथे थांबायच्याही नाहीत. गावाच्या वर्दळीचं हे एकमेव ठिकाण होतं. याचा कार्यभार निळया कपड्यातला एक पोर्टर आणि लाल-हिरवे झेंडे नेहमी बगलेत धरून वावरणारा, हिरवा फेटा घातलेल्या सुरकुतल्या चेहऱ्याच्या एका म्हाताऱ्या स्टेशन मास्तरकडे होता. या स्टेशनबद्दल मी तुम्हाला सांगतो. ती काही इमारत नव्हती. आयुष्य मर्यादा पूर्णपणे संपून गेलेला, मालगाडीचा तो एक डबा होता, त्याची चाकं काढून रेल्वे लाईनच्या शेजारीच बसवून दिलेला - असं ते कार्यालय होतं. त्याला एक दोन खिडक्या होत्या, त्यांतून स्टेशन मास्तर तिकीट-विक्री करायचा आणि क्वचित या जंगलात कुणी प्रवासी आले, तर त्यांना बोलायचा. जाड, वळ असलेली एक वेल डब्याच्या

प्रवेशद्वारावरून विस्तारलेली होती. मालगाडीच्या डब्याचा, यापेक्षा चांगला उपयोग कुठे पाहण्यात नव्हता.

नोव्हेंबरच्या एका सकाळी एका मिक्स-ट्रेननं मला इथे सोडलं अन् धूर सोडीत ती जंगलात निघून गेली. बगलेत झेंडे धरलेल्या स्टेशन मास्तरला, मला पाहून मोठा आनंद झाला. इथे उतरणारे फारच कमी प्रवासी असायचे. त्यामुळे नवीन चेहरे पाहिले, की स्टेशन मास्तरच्या आनंदाला सीमा राहायची नाही. त्याने माझ्या यजमानपदाची जबाबदारी घेतली. मला त्या मालगाडीच्या ऑफिसमध्ये घेऊन गेला, एका स्टुलावर बसविले. मला म्हणाला, ‘‘थांबा हं, एका मिनिटात मी माझं हे काम आवरतो...’’ खाकी कागदांवर त्याने घाईने काही लिहीले अन् मला घरी घेऊन आला. त्याचं घर म्हणजे दगडी बांधकामाची एक छोटी खोली, एक स्वयंपाकघर अन् परस असं होतं. हा स्टेशन मास्तर इथे आपली बायको अन् सात पोरांना घेऊन रहायचा. त्याने मला जेवू घातलं. मी तयार झालो आणि त्याने माझ्यासोबत गावात जाण्यासाठी त्याच्या पोर्टरला पाठविले. गाव जवळपास मैलभर आत असं होतं. त्या चाळीस घरातून, माझ्याशी संबंधात असलेल्या सगळ्या कास्तकारांना मी, त्या गावाच्या प्रमुखाच्या घरी बोलावून घेतले. तिथे चटईवर बसून सर्वांना एक प्रकारचे भाषणच दिले. सगळ्यांनी मोठं लक्षपूर्वक ऐकलं. मी दिलेले सॅम्पल्स घेतले, त्यांच्या वापराबद्दल तपशील जाणून घेतले. आपापल्या घरांकडे परत जाताना, खतपाण्याच्या माझ्या सूचनांच्या अनुषंगाने आपापसात त्यांनी उपहासाने प्रतिक्रियाही दिल्या. अंधारू लागले, तसं मी आवरलं आणि स्टेशन मास्तरच्या घराकडे निघालो. माझा घसा दुखायला लागला होता अन् मी बोललेले शब्द माझ्याच कानात घुमू लागले होते. एकदोन गाड्या यायची ती वेळ असली, तरी इथे थांबणारी गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी 5.30 वाजता होती. रात्रीच्या जेवणानंतर मला लक्षात आलं, माझी निघायची वेळ झाली आहे. खोलीत आपापली अंथरुणं टाकायला सगळं कुटूंब वाट पाहू लागलेलं अन् तशा स्थितीत माझं तिथं राहणं योग्य नव्हतं. सकाळी गाडी येईपर्यंत मी प्लॅटफॉर्मवर थांबतो, असं मी म्हणालो...

‘‘नको, नको हा मुलूख फार वाईट आहे- तुमच्या शहरासारखा नाही. वाघांचा वावर असलेला हा भाग.’’ स्टेशन मास्तर म्हणाला. विशेष सवलत देऊन त्याने मला त्या स्टेशनच्या कार्यालयात झोपायला दिले. या खोलीचा अर्धा अधिक भाग एक भक्कम टेबल, खुर्ची आणि स्टूल यांनीच व्यापला होता. मी ते बाजूला ढकललं आणि कोपऱ्यात माझ्यासाठी एक जागा तयार केली. किमान आठ तासांचा वेळ होता माझ्याकडे. मी आडवा झालो. त्या नि:शब्द रात्री सगळ्या प्रकारचे आवाज- सळसळ, खडखड, गूंऽऽ गूंऽऽ असे- येऊ लागले. टेलिग्राफच्या खांबांचे, रातकिड्यांचे आवाज, तसेच बांबूच्या बनांची सळसळ... मी उठलो आणि त्या लहानशा स्टेशनच्या दाराचे बोल्ट लावून घेतले अन् निजलो. मला मोठं एकाकी वाटू लागलं. उष्मा वाढल्यामुळे मला काही झोप येईना. मग पुन्हा उठलो. दरवाजा अर्धवट उघडून तिथे खुर्ची व्यवस्थित ठेवून दिली; थोडी हवा यावी म्हणून. आणि पुन्हा अंथरुणावर पडलो.

मला झोप लागली अन् मी स्वप्नात हरवलो... मी एका उंच टेकडीच्या माथ्यावर उभा आहे आणि सौम्य अशा चंद्रप्रकाशात दरीचे सौंदर्य न्याहळतो आहे... दूरवरून मांजरासारख्या

प्राण्यांची एक रांग उतारावरून चालली आहे. अर्धवट सावल्या... आणि मी मोठ्या कौतुकाने तिकडे पाहत उभा आहे, कारण त्यांची ही हालचाल मोठी मोहक वाटत होती. मी त्या वातावरणात एवढा भान हरपून उभा राहिल्याचे मला लक्षात आले नाही. मी वळून पाहिले, तर काय- मांजरांच्या आकाराचे ते प्राणी नव्हते, ती पूर्ण वाढ झालेल्या वाघांची रांग होती! मी दचकलो अन् स्टेशनच्या त्या भिंतीला माझा धक्का लागला.
याच वेळेला स्वप्नातून मला जाग आली. कारण दाराला आडकाठी म्हणून ठेवलेली खुर्ची धप्पकन् आवाज करून माझ्या अंगावर पडली. मी डोळे उघडून पाहिलं, तेव्हा मला दिसले, की एक वाघ आत घुसायची धडपड करतो आहे! तो क्षण माझ्यासाठी गोंधळाचा होता. मला कळेना, की मला जाग आलीय की ते स्वप्नच चालू आहे अजून! मला आधी वाटले, माझा तो मित्र स्टेशन मास्तरच आत येतो आहे की काय; पण स्वप्नामुळे माझं मन पूर्ण तयार झालं होतं- चंद्र ताऱ्यांच्या प्रकाशात मला स्वच्छ दिसू लागलं... वळवळणारी शेपटी, गुरगुर आणि सगळयात महत्त्वाचं म्हणजे अंधारात चमकणारे डोळे... मला लक्षात आलं, माझ्या फर्टिलायझर कंपनीला आता माझ्याशिवायच पुढली शिबिरं घ्यावी लागणार. तो वाघसुद्धा खुर्चीच्या आवाजाने गोंधळून गेला होता आणि अडखळत उभा होता. मी कोपऱ्यात असलेलं त्याने स्पष्ट पाहिलं होतं आणि स्वत:शीच तो जणू म्हणत होता. माझे 'डिनर' तयार आहे. पण हा विचित्र आवाज कशाचा असावा बरं... वन्य प्राणी मनुष्यप्राण्यांना एकवेळ घाबरणार नाहीत पण खुर्च्या-टेबल्ससारख्या फर्निचरला घाबरतात. सर्कसमधली माणसं, अशा प्राण्यांच्या समूहाला केवळ खुर्चीच्या साहाय्याने आवरतात हे मी पाहिलेलं होतं. देवानं अशी आपल्याला स्मृती दिलेली असते पहा, ज्याच्यामुळे संकटाच्या प्रसंगी आपला निभाव लागतो. वाघ माझ्याकडे पाहत खुर्चीकडे लक्ष ठेवून होता आणि मी पटकन् हात पुढे करून जिवाच्या आकांताने तो टेबल माझ्याकडे ओढला आणि स्टूलसुद्धा. कोपऱ्याकडे पाठ करून मी बसलो. टेबल माझ्यासमोर कोपऱ्यात अगदी फिट्ट बसलं होतं. मी त्या टेबलाखाली बसलो आणि स्टुलाची भिंत समोर धरली. जेव्हा मी टेबल ओढलं होतं, तेव्हा टेबलावरच्या बऱ्याच वस्तू खाली पडल्या होत्या - टेबल लॅम्प, एक मोठा चाकू आणि पिना. माझ्या या सुरक्षा व्यवस्थेतून मी वाघाकडे पाहू लागलो. तोसुद्धा माझ्याकडे मोठ्या कुतूहलाने पहात होता. आपलं अन्न दृष्टीसमोरून निघून जावं हे त्याला आवडलं नाही हे स्पष्टच दिसत होतं. त्याने काळजीपूर्वक एकदोन पावलं पुढे घेतली, घशातून अशी डरकाळी दिली, की ते छोटं स्टेशन ऑफिस हलू लागलं. माझा शेवट जवळ येवू लागला. जिच्या नशिबात माझी पत्नी व्हायचं लिहून ठेवलं होतं, अशा त्या बाईबद्दल- माझ्या बायकोबद्दल- मला दया येऊ लागली.
मी ती खुर्ची, ढाल घेऊन फिरवावी तशी फिरविली आणि वाघाने अडखळत एकदोन पावलं मागे घेतली. आता पुन्हा आम्ही काही वेळ एकमेकांच्या हालचालींवर लक्ष ठेवून होतो. श्वास रोखून मी पाहू लागलो. वाघ तिथे उभा होता, त्वेषाने शेपटी हलवीत होता, ती शेपटी कधी भिंतीवर आपटून तिचा बद्द आवाजही येत होता. तो अचानक वाकून बसला. नजर माझ्यावर रोखलेली होतीच आणि आपल्या पंजांनी जमीन उकरायला त्याने सुरूवात केली. तो आपली नखं पारजतोय माझ्यासाठी... मी स्वत:शीच म्हणालो. त्या ओबडधोबड स्टेशन कार्यालयाच्या खोलीत प्राणिसंग्रहालयासारखा वास भरून राहिला. मला कससंच

वाटू लागलं. त्याचं पुढच्या पावलांनी जमीन उकरणं चालूच होतं. आपण कल्पनाही करू शकणार नाही, असा मोठा कर्कश आवाज त्याचा होऊ लागला.
वाघाने अगदी अचानक उडी घेतली अन् आपलं सगळं वजन या फर्निचरच्या ढिगावर झोकून दिलं. मला वाटलं, सगळ्या फर्निचरची आता काड्याच्या पेटीसारखी अवस्था होणार! पण सुदैवाने आपल्या रेल्वेखात्याने दूरदृष्टी ठेवलेली होती, त्यांनी या फर्निचरसाठी भक्कम लाकूड निवडलेलं होतं. त्यामुळे मी वाचलो. आता टेबलावर पक्ष्याप्रमाणे झुलण्याशिवाय वाघाला काही करता येईना झाले. पंजे खाली घेऊन मला तडाखे मारायचा त्याचा प्रयत्न होता; पण मी ते खुर्ची आणि स्टुलाच्या आधाराने चुकविले. टेबल पहाडासारखा वाघाला तोलून होता. मला गुदमरल्यासारखं झालं. माझ्यावर त्याचा चालू असलेला श्वासोच्छवास मला जाणवत होता. सगळा पृष्ठभाग व्यापून तो बसला आणि माझ्या दिशेने पंजे मारू लागला - माझा एखादा लचका त्याने तोडून घेतलाही असता त्याच्यासाठी; पण सुदैवाने मी अगदी मध्यभागी बसलेलो होतो- कोणत्याही बाजूने अगदी केसाच्या अंतरावर म्हणा ना. माझ्या डोक्यावर त्याचे हिंस्र आवाज आणि हालचाली चालूच होत्या. जर तो खाली उतरला, तर खुर्ची एका बाजूला ढकलून त्याने मला बाहेर ओढलेही असते; पण त्याला काही वेळ त्या खुर्चीचं भय वाटत असावं. खुर्चीपासून दूर राहणंच त्याला बरं वाटू लागलं. अशी आमची लढाई काही काळ चालली, किती वेळ चालली मी नाही सांगू शकणार. माझ्यासाठी वेळ पूर्णपणे थांबली होती.
वाघाने खाली उडी मारली आणि टेबलाभोवती तो फिरू लागला, एखादी फट-सांद दिसते का पाहू लागला. एकदोन वेळा मी खुर्ची खडखड वाजविली; पण लवकरच त्याचे खुर्चीचे भय निघून गेले. त्याने खुर्चीवर पंजा मारून पाहिला अन् त्याला लक्षात आले, की ती निरुपद्रवी आहे. हे लक्षात आल्यावर त्याने ती बाजूला झुगारून द्यायचा प्रयत्न केला; पण मी त्यासाठी तयारच होतो. मी चपळाईने ती माझ्याकडे खेचून घेतली आणि टेबलाच्या कडेतून घट्ट बसवून धरून ठेवली. दुसऱ्या बाजूने मला स्टुलाचं संरक्षण होतंच. मला या फर्निचरच्या पायांच्या आधाराने भक्कम बंदोबस्त करता आला. माझ्यासमोरच तो वाघ आता मागचे पाय दुमडून बसला होता, मला कसं गाठावं पाहू लागला. आता टेबल, खुर्ची अन् स्टुल यामुळे तयार झालेल्या संरक्षक जागेच्या मध्यावर मी होतो आणि वाघाच्या कोणत्याही युक्त्यांना तोंड द्यायला ही जागा सज्ज होती. त्याने माझी ही सगळी व्यवस्था मोठ्या लक्षपूर्वक तऱ्हेने पाहिली, यात एक जागा त्याला दिसली आणि त्यातून वाघाने आपला पंजा आत सारला. वळलेल्या नखांचा तो पंजा माझ्या डोळ्यासमोर लटकत होता आणि ते पाहून मला भयंकर राग आला. त्याला अशा हल्ल्यासाठी मी का बरं संधी द्यावी? मी फारच संतापलो. स्टेशन मास्तरचा तो लांब असा चाकू तिथेच पडलेला होता. मी तो उचलला अन् त्याच्या पंजात खुपसला! त्याने पंजा चटकन् काढून घेतला आणि वेदनेने तो जणू पिसाळलाच. त्याने उडी मारली अन् आता सगळी खोलीच खाली घेतो की काय असं वाटावं, तसा त्याचा धिंगाणा चालू झाला. माझ्या संरक्षणव्यवस्थेचे तुकडेकरून टाकायच्या प्रयत्नाला तो लागला. त्याला यश मिळाले नाही. पुन्हा त्याने आपला पंजा आत सारला. आता मी त्या चाकूचा चांगलाच वापर करून त्याचं एक बोटच कापून टाकलं- नखासहित! त्याने पुन्हा पुन्हा हल्ला केला आणि मी कबूल करतो, की त्याच्याशी लढाई

संपेपर्यंत मी त्याची तीन नखं कापून टाकली होती! आता जणू आम्ही दोघंही एकमेकांच्या रक्ताचे तहानलेले झालो होतो. (ती तीन नखं आता माझ्या तीनही मुलींच्या गळ्यातील सोन्याच्या कोंदणात आहेत. तुम्हाला कधी वाटलं तर तुम्ही येऊन पाहू शकता.)

सकाळी पाचच्या सुमारास स्टेशन मास्तर आणि पोर्टर आले आणि नेहमीप्रमाणे सहज आत आले. त्यांचे पाऊल आत पडताच क्षणभरात वाघाने माझा नाद सोडून त्यांच्याकडे झेप घेतली. दोघंही मोठ्या गतीने पळाले. स्टेशन मास्तर आपल्या घरात गडप झाला आणि त्याने दार लावून घेतले. पोर्टर झपाट्याने निसटून एका झाडावर चढला, वाघ त्याच्यामागेच अर्ध्यावर गेला. अशा प्रकारे एकमेकांकडे पाहत ती दोघं थांबली असतानाच तिकडून सकाळी 5.30 ची मालगाडी धडधडत आली. इंजिनचे फूत्कार, त्या शिट्ट्या आणि कोळशाच्या ठिणग्या चालू होत्या अन् वाघ मग खाली उतरून रूळ ओलांडून जंगलात निसटून गेला.

वाघाने या भागात पुन्हा भेट दिली नाही; पण तरीही त्याने केलेल्या नासधुशीच्या वार्ता येतच राहिल्या. मलाही तो पुन्हा दिसला नाही. आताच त्याला मी इथे पाहिले- बैलगाडीवर पडलेलं ते धूड. त्याच्या पुढच्या उजव्या पायाकडे पाहताच मी त्याला ओळखलं - त्याची तीन बोटं अन् नखं निघून गेलेली होती. स्वत:ची सुरक्षा आणि हातात बंदुका घेऊन त्याला मारलेल्या त्या माणसांबद्दल तुम्हाला फारच कौतुक वाटल्याचे दिसले. त्यामुळेच मी ही हकिकत सांगितली. कदाचित, ज्या माणसाने याच प्राण्याला, हातात काहीही नसताना तोंड दिले, त्या माणसाला थोडं तरी श्रेय तुम्ही द्याल, असं मला वाटलं.

तो गोष्टीवेल्हाळ माणूस निघून गेला आणि आम्ही चौकाकडे आलो. तिथे ती वाघाची ट्रॉफी सर्वांना पाहण्यासाठी म्हणून ठेवण्यात येत होती, त्या शिकाऱ्यांचा गौरव चालू होता. शहराकडून येणाऱ्या ट्रकची ते वाटही पहात होते. आम्ही त्या गर्दीत घुसलो आणि त्या वाघाचा उजवा पाय दाखविण्याची त्यांना विनंती केली. कुणीतरी गॅसबत्ती खाली केली आणि त्या प्रकाशात आम्ही पाहिलं. होय, तीन बोटं नव्हती आणि त्या जागी खोल जखमेचा व्रण होता. त्या माणसाने नक्कीच एखाद्या हातोडीच्या जोराने चाकूचे वार केले असतील.

आमच्या प्रश्नाला त्या शिकाऱ्यांनी उत्तर दिले-

''ते कसं झालं असावं सांगता नाही येणार. आम्हाला अशी काही प्रकरणं यापूर्वी पाहायला मिळालेली आहेत. असं म्हणतात, जंगलातल्या काही आदिवासी जमातीत जेव्हा एखादं वाघाचं पिलू पकडलं जातं, त्यावेळी त्याचा पंजा कापून ताईत करण्यासाठी ते नखं घेतात अन् पिलाला सोडून देतात. ते सहसा वाघाच्या पिलाला ठार मारत नाहीत.''

♦♦♦

# ईश्वरन

मालगुडीमधल्या विद्यार्थीजगतामध्ये जून महिन्याच्या एखाद्या विशिष्ट दिवशी - खरं म्हणजे संध्याकाळी, इंटरमिजिएट परीक्षेच्या निकालाच्या निमित्ताने जी खळबळ असते, जी उत्तेजना असते, त्या वेळी ईश्वरनमात्र त्या सगळयांकडे पाठ फिरवून त्याच्याशी काही संबंध नसल्यासारखा वागत असतो. आपल्याच अशा कामांत व्यस्त असतो.

इंटरमिजिएटच्या वर्गातला वरिष्ठ विद्यार्थी, असा मान त्याने मिळविलेला होता. ओठांवर मिसरूड फुटायच्या वयात त्याने अल्बर्ट मिशन कॉलेजच्या इंटरमिजिएट वर्गात प्रवेश घेतला होता. आताही तो तिथेच आहे. त्याची शरीर-प्रकृती धडधाकट झालेली आहे, गाल कसे वर आलेले अन् चेहऱ्याला मजबुती देणारे झालेले आहेत. काहीजण त्याला म्हणतातसुद्धा - तुझ्या डोक्यावरचे केस पिकल्याचे दिसत आहे! पहिल्या वेळी तो नापास झाला, तेव्हा त्याच्या आईवडिलांनी काळजी केली. त्याच्याबद्दल सहानुभूती दाखविली. दुसऱ्या वेळी अशाच प्रकारची सहानभूती मिळविण्यात ईश्वरनला यश आले म्हणा; मात्र थोडी टीका अन् नाराजी पत्करावी लागलीच... आणि वारंवारच्या अपयशामुळे आईवडिलांची त्याच्या अभ्यासातली, त्याच्या परीक्षेतली रुचीच कमी झाली. आता ते सारखं सारखं म्हणू लागले होते, “आता अभ्यास सोडून देऊन दुसरं काही उपयोगाचं असं तू का पाहत नाहीस?” अशा वेळेस ईश्वरन नेहमीच आपली बाजू मांडायचा, ती या शब्दांत : “आता एवढी संधी घेऊ द्या मला.” त्याला विद्यापीठाच्या परीक्षेबद्दल एक प्रकारची आसक्तीच निर्माण झालेली होती म्हणा ना! वेड्या भक्तासारखा भक्तिभावाने तो भारलेला होता.

आणि आता संध्याकाळच्या सुमारास सगळं गाव निकालाच्या उत्सुकतेपायी उतावीळ असं झालेलं होतं. पोरांचा घोळका गल्लीगल्लीने जाऊ लागला होता आणि शरयूच्या वाळूवर काहीजण गप्पांत दंग होते. उत्सुकता, कुतूहल, भय, उत्कंठा अशा भावनांमुळे ते अस्वस्थ झाले होते. काहीजण सिनेट हाऊसच्या गेटवर चढून उतावीळ होऊन पाहू लागले होते- आत निकालाच्या संदर्भात मीटिंग चालू होती.

निकालामुळे केवळ विद्यार्थ्यांतच नाही, तर पालकांतसुद्धा खळबळ माजलेली होती. अपवाद होता, फक्त ईश्वरनच्या पालकांचा. शेजारीपाजारी जेव्हा परीक्षेच्या निकालाची चर्चा होऊ लागली, तेव्हा ईश्वरच्या आईवडिलांनी उसासा टाकून म्हटले होते, “ईश्वरनबद्दल आम्हाला अशी काही काळजी नाही. त्याचा निकाल आधीच लागलेला असतो अन् सगळयांना माहीतही झालेला असतो!” ईश्वरन गमतीने म्हणायचा, “बाबा, कुणी सांगावं मी पास झालेलो असेन! मी फार अभ्यास केला होता. ”

“तुझ्यासारखा आशादायी माणूस आज अख्ख्या भारतात नसेल! अन् एवढी तुझी गाढ श्रद्धा असेल, तर तुला एकच परीक्षा वारंवार द्यायची वेळ येऊ नये!”

“ ‘लॉजिक’मध्ये मी अगदी थोडक्यात गेलो, मागच्या वर्षी.” ईश्वरन स्वत:ची बाजू मांडायचा आणि घरातल्या सगळयांना हसायला यायचे. “ते काहीही असो. तू सगळया पोरांसोबत जाऊन निकाल का पाहून येत नाहीस?” आई विचारायची.

“काही गरज नाही” ईश्वरन म्हणायचा, “मी पास झालो, तर ते घरी येतील सांगायला!

गेल्या वर्षी मी निकाल पाहायला गेलो होतो असं तुला वाटतं का? मी सिनेमाला गेलो होतो. त्यावेळी मी एकापाठोपाठ दोन शो पाहिले होते!''
स्वत:शी गुणगुणत ईश्वरनने हातपाय धुतले. कपडे घालून तो बाहेर जाण्यासाठी तयार झाला. त्याला माहीत होतं- आज निकालाचा दिवस आणि नापास होणारा विद्यार्थी म्हणून जो तो आपल्याकडे पाहत राहणार. म्हणूनच त्याने आपले केस काळजीपूर्वक विंचरले. त्याला याचीही कल्पना होती, की घरात आपल्या माघारी सगळे हसतात; इतकेच काय सगळं गावसुद्धा. ईश्वरनला असं वाटलं, की ते आपसात अशीही चर्चा करीत असतील, की याला काय करायचाय एवढा नट्टापट्टा? केसांचा भांग, इस्त्रीचे कपडे, शानशौकीनं त्याचं राहणं हे जरा अतीच होतंय. नापास मुलाला एवढा रुबाब काय कामाचा? एक बेशरम अन् निर्ढावलेला अशी त्याची ख्याती झालेली होती; पण ईश्वरनला या सगळयांची पर्वा नव्हती. आपल्या अशा शानशौकीनं राहण्यातून तो जणू त्यांना एक तऱ्हेने जवाबच द्यायचा.
ईश्वरनने नेहमीचा व्यायाम केला. बाहू फिरविले, वर-खाली केले, रुबाबात तयार होऊन तो सिनेमाला निघाला... पण ईश्वरनचं हे करणं-वागणं, शानशौक हा सगळा मुखवटाच होता. या मुखवट्याखाली अपयशाने खचून गेलेलं एक तरुण मन होतं; जे अतिशय तळमळीने, उत्कंठेने प्रार्थना करीत होतं - यशासाठी, उत्तीर्ण होण्यासाठी. निकालाच्या दिवशी घरातून निघताना ईश्वरन आईशी बोलला होता, ''आई, माझ्यासाठी वाट पाहू नको. मी हॉटेलमध्ये काहीतरी खाणार आहे अन् पॅलेस टॉकिजमध्ये दोनही शो पाहणार आहे.'' ईश्वरनच्या आवाजात त्या वेळी एक प्रकारची गूढ वाटावी अशी अस्वस्थता होती.
विनायक गल्लीतून बाहेर पडताना, मार्केट रोडने जाणाऱ्या पोरांचा घोळका कॉलेजला चाललेला त्याने पाहिला. एकाने विचारलेसुद्धा -
''ईश्वरन, कॉलेजला येतोस- निकाल पाहायला?''
''हो, हो येणारच; पण थोडं अर्जंट काम आहे मला.''
''कुठं?''
''पॅलेस टॉकिजला!'' पोरं हसली. ''म्हणजे, तुला तुझा रिझल्ट माहीत झालाय, नाही का!''
''हो, म्हणूनच तर जातोय मी. नाहीतर कुणी जाईल का, आं?''
''तुझा परीक्षा क्रमांक काय आहे?''
''सात-आठ- पाच'' जे मनात आलं, ते ईश्वरन बोलून गेला. पोरं हसू लागली. ''आम्हाला माहीत आहे, तुला या वेळी फर्स्टक्लास मिळणार!''
सिनेमा टॉकिजला, चार आण्यांच्या क्लासमध्ये ईश्वरन दूर जाऊन बसला. त्याने पाहिले - सगळ्या थिअटरमध्ये शाळेतला एकही विद्यार्थी नव्हता. सगळ्या गावातले विद्यार्थी सिनेट हाऊसकडे गेलेले होते, निकाल पाहण्यासाठी. या थिअटरमध्ये आपण एकटेच असे विद्यार्थी आहोत, हे लक्षात आले आणि ईश्वरनला मोठे वाईट वाटू लागले. त्याच्या नशिबाने अशा तऱ्हेने त्याला त्याच्या मित्रमंडळीतून एकटे केले होते. तो अतिशय निराश झाला. त्याला आणखी वाईट वाटू लागले. स्वत:बद्दलच्या कडवट भावना मनात उद्‌भवल्या.
लवकरच दिवे विझले आणि सिनेमा सुरू झाला - देवदेवता असलेला तमीळ सिनेमा. त्यांचं

राजकारण आणि भांडण यात ईश्वरन पाहता पाहता रंगून गेला. दिग्दर्शकाने स्वर्गाची जी दृश्ये या वर्तमानात उभी केली होती, त्यांत तो तल्लीन होऊन गेला; पण विस्मृतीचा त्याचा हा आनंद फक्त अर्धा एक तास होता. मग त्यातली ती नायिका जी स्वर्गातल्या वृक्षाच्या उतरत्या फांदीवर बसलेली होती, जागची उठेना. ती तिथेच बसून अर्ध्या तासाएवढे लांबलचक गाणे म्हणू लागली. हा भाग ईश्वरनला कंटाळवाणा वाटू लागला. त्याचबरोबर त्याची निराशा, जुनी ठसठस परतू लागली. ‘‘ए बाई’’ ईश्वरन जणू सांगू लागला तिला, माझ्या अडचणी आणखी का वाढवितेस, प्लीज उठून जा आता! आणि ती नायिका - जणू काही तिला ते ऐकायला आलं- उठून गेली आणि पुन्हा सुरेख अशी दृश्यं सुरू झाली. युद्ध, प्रलय, महापूर, कुणी आभाळातून खाली झोकून देत आहे. विड्या-सिगारेटच्या धुरांच्या ढगांतून त्या पांढऱ्या पडद्यावर प्रकाशमान होणाऱ्या चित्तथरारक घटना... पडद्यावर अन् पडद्याच्या बाहेर असलेले संवाद, बडबड... संगीत, आरडाओरडा, सोडा विकणाऱ्याचे किंचाळणे, प्रेक्षकांची शेरेबाजी... हा सगळा कोलाहल अन् गडबड यात ईश्वरन बुडून गेला. सिनेट हाऊस आणि विद्यार्थिजीवनाचा त्याला काही तासांसाठी का होईना, विसर पडला.

सिनेमा रात्री दहाला सुटला. दुसऱ्या शोसाठी गेटवर गर्दी झालेली होती. पॅलेस टॉकिजच्या समोरच असलेला हॉटेलचा मालक त्याच्या ओळखीचा होता. त्याने विचारले, ‘‘ईश्वरनसाब, निकाल आज जाहीर झालाय, तुमचं काय झालं?’’

‘‘मी या वर्षी परीक्षाच दिली नाही.’’ ईश्वरन म्हणाला.

‘‘असं का... मला वाटतं, तुम्ही तर परीक्षा फीस भरलेली होती ना?’’

ईश्वरन हसला. ‘‘बरोबरंय तुमचं. आजच मी इंटरमिजिएट परीक्षा पास केलीय - संध्याकाळी!’’

‘‘वा! फार छान! हुशार आहात हं! हनुमानाची प्रार्थना केली, की तो यश देतोच पाहा. आता यापुढे काय करणार आहात?’’

‘‘आता वरच्या वर्गात जाईन, आणखी काय!’’ ईश्वरन म्हणाला.

त्याने थोडा फराळ करून कॉफी घेतली अन् निघाला. बिल देऊन जाऊ लागला, तसं हॉटेल मालक म्हणाला, ‘‘तुमच्या सेलिब्रेशनच्या डिनरला मला बोलवायला विसरू नका बरं!’’

ईश्वरनने पुन्हा तिकीट काढले अन् सिनेमाला बसला. पुन्हा एकदा देवतांची ती कपटकारस्थाने- झगडे त्याच्यापुढे येऊ लागले. तो पुन्हा त्या सगळयांत हरवला. पडद्यावर त्याच्याएवढी मुले जेव्हा स्वर्गातल्या त्या सरोवरात-पाण्यात खेळत असलेली, मौज करीत असलेली दिसली, तेव्हा ईश्वरन म्हणाला, ‘‘वा! तुम्ही जिथे आहात तिथे परीक्षाच नसतील कुठल्याही; म्हणून तुम्ही अशी मौजमस्ती करू शकता, अं!

आणि त्या तशा जगाची अभिलाषा मनात उमटली. त्या अभिलाषेने जणू ईश्वरनच्या मनाचा ताबा घेतला. आता ती नायिका वृक्षाच्या उतरत्या फांदीवर बसून गाणं म्हणू लागली आणि मग ईश्वरनचं मन सिनेमातून उठलं. त्याने पहिल्यांदाच आजूबाजूला नजर टाकली. टॉकिजमधल्या त्या छाया-प्रकाशात ईश्वरनने पाहिले- पोरांचे बरेच घोळके आलेले होते. खुषीतली सगळी पोरं. सगळयाच पोरांनी आपले निकाल पाहिलेले असतील अन् आता ते आपला आनंद साजरा करायला आले असतील... ईश्वरनच्या लक्षात आले.

पन्नासएक तरी असतील सगळी मिळून. त्याला हेही वाटू लागलं, की सगळीजण भरपूर आनंदात आहेत. पानं खाऊन आपले ओठ रंगवून मस्त बसली आहेत सिनेमाला. ईश्वरनने विचार केला, आता इंटरव्हल झाली, की सगळयांचं लक्ष आपल्याकडे जाईल. निकालावरून पोरं आपल्याला चिडवतील. तेच जुने वैतागाचे थट्टा-विनोद करतील, त्याच वाह्यात तऱ्हेने हावभाव करतील... ईश्वरन मनातून या सगळयांवर नाराज झाला. त्या तशा यशस्वी रंगेल चेहऱ्यांचे भयही वाटू लागले त्याला. त्याला असेही वाटू लागले, की ती सगळीजणं आपल्याकडे अशा तऱ्हेने पाहतील, जणू ईश्वरनसारख्या नापास विद्यार्थ्याला अधिकारच नाही आज सिनेमा पाहायचा!

टॉकीजमधल्या एका दूरच्या कोपऱ्याकडे ईश्वरन सटकला.

त्याने पडद्याकडे एक नजर टाकली. फांदीवरची ती नायिका गाणं म्हणत होती, त्यात त्याला काही रस नव्हताच आणि ईश्वरनला खात्री होती, की आपलं हे अद्वितीय गाणं ती असंच आणखी वीस मिनिटं गात राहणार आहे. वैतागून तो उठला अन् सावकाश कडेकडेने दाराकडे आला आणि टॉकीजच्या बाहेर पडला. उत्तीर्ण झालेल्या त्या सगळया पोरांकडे पाहून आता ईश्वरनला स्वत:बद्दल तिटकारा वाटू लागला. 'जो माणूस परीक्षेत पास होऊ शकत नाही, त्याला जगायचा अधिकार नाही...' असा विचार ईश्वरनच्या मनात उद्भवला. सगळ्या अडचणी- समस्यांवर एक दैदीप्यमान वाटावा असा उपाय- मरून जाऊया आणि निघून जाऊ... त्या तिकडे... जिथे-स्वर्गात ती पोरं कमळांच्या तळयात खेळत असतील, तिथे कसल्याही परीक्षा द्याव्या लागणार नाहीत. काळज्या नाहीत... दरवर्षी त्या सिनेट हाऊसकडे तोंड लटकावून पाहायची गरज नाही.

हा असा उपाय ईश्वरनच्या मनात उद्भवला अन् त्याला फार निवांत वाटू लागलं. थोडी गंमतही वाटली. तो हॉटेलकडे गेला. हॉटेल मालक आता झोपायला जाण्याच्या तयारीत होता. ईश्वरन त्याला म्हणाला, ''सेठजी, एक काम आहे... मला एक कागद अन् पेन्सिल देता का प्लीज... एवढं एक करा बुवा... तुम्हाला त्रास देतो आहे... मला एक तातडीचा निरोप लिहून ठेवायचा आहे...''

''एवढ्या उशिरा...'' असं म्हणत मालकाने त्याला कागद-पेन्सिल दिले.

ईश्वरनने आपल्या वडिलांना पत्र लिहिले अन् त्याची व्यवस्थित घडी घातली. आपल्या कोटाच्या आतल्या खिशात काळजीपूर्वक ते ठेवले.

कागद-पेन्सिल परत करून ईश्वरन आता निघाला. आता त्याला वेध लागले होते रेसकोर्स रोडचे. तिथून उजव्या बाजूला वळले, की अर्धा मार्केट रस्ता चालायचा आणि मग इलॅमन स्ट्रीट आणि नंतर तिथून शरयू नदी... तिचे चमकदार गूढ पाणी ईश्वरनला कवेत घेणार होते अन् त्याच्या सगळ्या समस्या मिटवून टाकणार होते... माझा हा कोट तिथं पायऱ्यांवर काढून ठेवायचा आहे, त्यात ठेवलेले ते पत्र... ईश्वरन स्वत:ला बजावू लागला.

लवकरच इलॅमन स्ट्रीटमधून ईश्वरन बाहेर पडला. आता नदीच्या वाळूत त्याची पावलं रुतू लागली. नदीच्या पायऱ्यांवर तो आला. आपला कोट त्याने घाईने काढला आणि पायऱ्या उतरू लागला. हात जोडून आकाशातल्या ताऱ्यांकडे पाहत तो म्हणू लागला, ''देवा, जर माझ्या दहाव्या प्रयत्नातही मी परीक्षा पास होत नसेन, तर माझ्या जगण्याचा उपयोग काय आणि जगाला मी भार म्हणून का राहू?'' त्याची पावलं पाण्यात होती. मान वळवून

त्याने विद्यापीठाच्या त्या इमारतीकडे पाहिले. सिनेट हाऊसच्या पोर्चमध्ये दिवे दिसत होते. मध्यरात्रीचा सुमार असावा. पंधरा- मिनिटांच्या चालण्यातले ते अंतर असेल. तिकडे जाऊन रिझल्टच्या बोर्डावर नजर टाकूया का... कसंही करून आपण मरणार आहोतच, तर त्या बोर्डाकडे एक नजर टाकून पाहायला काय हरकत आहे; का टाळावं आपण- कशाची भीती आता?

ईश्वरन पाण्याच्या बाहेर आला. पायऱ्यांवर ठेवलेला कोट तिथेच राहू दिला अन् वाळूतून चालत गेला. कुठेतरी बाराचे टोल वाजत होते. वर तारे चमकत होते. नदीच्या प्रवाहाला काठावरच्या झुडपांचा, रात्रीच्या वातावरणाचा गूढ-गंभीर असा स्वर लाभलेला होता. पाण्याने भिजलेल्या, वाळूने माखलेल्या त्याच्या पायांना थंड वाऱ्याची जाणीव होऊ लागली. सिनेटच्या पोर्चमध्ये त्याने आता एक प्रकारच्या उद्दामपणाने प्रवेश केला. “आता मला कशाची भीती नाही” तो पुटपुटला. सिनेट हाऊस सुनसान होते. कसलाही आवाज नव्हता. अंधारात असलेल्या इमारतीत अपवाद होता, तो पायऱ्यांवरच्या झगमगत्या मोठ्या बल्बचा... आणि भिंतीवर लावलेला रिझल्टचा तो बोर्ड.

पाय उंचावून रिझल्टचे तपशील शोधताना ईश्वरनची छाती धडधडत होती. दिव्याच्या प्रकाशात तो परीक्षा क्रमांक तपासू लागला. घशाला कोरड पडली होती. तिसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या क्रमांकांवरून त्याची नजर फिरू लागली. त्याचा क्रमांक 501 होता. त्याच्या नजरेसमोर क्रमांक होता 498 आणि त्यानंतर 703. “हं... माझ्या आजूबाजूला काही मित्र आहेत म्हणायचं!” तो कुत्सितपणे हसला.

सिनेट हाऊसमध्ये त्याने प्रवेश केला होता, त्या वेळी एका तीव्र अशा इच्छेने उसळी मारली होती- कसंही करून आपला नंबर त्या पास झालेल्या पोरांच्या यादीत असावाच! तेवढ्याच वेळात ईश्वरनने तर्क केला होता... पास झालो, तर मी धावत जाईन घरी. सगळयांना सांगेन, की तुम्ही आता माझी क्षमा मागा - मला मूर्ख म्हणत होता नं!

... पण आता नोटीस बोर्डाकडे लक्षपूर्वक पाहिल्यावर, अपयशाचे तेच कठोर वास्तव- त्याचा परिणाम ईश्वरनच्या चेहऱ्यावर पसरला. त्याचा क्रमांक कुठेही नव्हता. “नदीकडे...” तो पुटपुटला. फाशी जाहीर झालेल्या अपराध्याला, त्याची फाशी रद्द झाल्याचे कळावे अन् ताबडतोब ती अफवा असल्याचे लक्षात यावे, तसं ईश्वरनचं झालं. “नदीकडे... मला जायचं आहे...” तो निकालपत्राकडे पाहून बोलला आणि काही पायऱ्या उतरला. “आणखी किती जण पास झाले बरं...” असं म्हणत परतून ईश्वरनने नोटीस बोर्डाकडे पाहिले. आता तो निकालपत्राच्या वरच्या बाजूकडून रिझल्ट पाहू लागला. प्रथम श्रेणी - एक सर्वप्रथम, तर इतर सहाजण प्रथम श्रेणीत...

“हुशार पोरं... कसं जमत असेल यांना...” ईश्वरन कौतुकाने म्हणाला. आता त्याची नजर द्वितीय श्रेणीच्या निकालाकडे गेली. क्रमांक 98 पासून दोन ओळींनी भरलेला निकाल होता तो. जवळपास पंधराजण. एकेक क्रमांक लक्षपूर्वक पाहत तो पुढे जाऊ लागला. क्रमांक 350... नंतर क्रमांक 400 त्यानंतर ... क्रमांक 501 आणि नंतर 600.

“पाचशे एक! द्वितीय श्रेणीत! असं शक्य आहे?” ईश्वरनने जणू चीत्कार केला. त्या क्रमांकाकडे तो सारखं सारखं पाहू लागला. होय, ते खरं होतं. त्याला सेकंडक्लास मिळाला होता. “हे खरंच असेल तर आता पुढल्या महिन्यात मी बी.ए. च्या वर्गाला बसेन.” तो

ओरडलाच. सुनसान अशा त्या इमारतीत आता त्याचा आवाज घुमू लागला. ‘‘आता जर का मला कुणी मूर्ख म्हणेल, तर त्याची चामडी काढतो!...’’ तो उद्गारला. त्याला भोवळ आल्यासारखे वाटले. भिंतीवर तो थोडा टेकला. एवढ्या वर्षांची चिंता आणि अनिश्चितता अकस्मात निघून गेली होती. आता या मोकळेपणाची उत्तेजना त्याला सोसेना झाली. धमन्यांमधून रक्तप्रवाह वेगात धावू लागले अन् मेंदूपर्यंत धडका देऊ लागले. मोठ्या प्रयासाने ईश्वरन स्थीर झाला. त्याने स्वत:शीच हळुवार अशी शीळ दिली. आता सगळे जग आपल्या एकट्याच्या मालकीचे झाले आहे आणि त्या जगाचे राजाधिराज आपण आहोत, असं ईश्वरनला वाटू लागलं. नोटीस बोर्डाकडे पाहून त्याने स्वत:च्या छातीवर मूठ मारली आणि आव्हान दिले - ‘‘माहिताय, मी कोण आहे?’’ मग स्वत:च्या काल्पनिक मिशांवर पीळ देत ईश्वरन रुबाबाने हसला आणि त्याने आवाज दिला- ‘‘कोण आहे रे तिकडे, माझा घोडा तयार ठेव!’’ त्याने मान वळवून मोठ्या मिजाशीने नोटीस बोर्डाच्या रिझल्टकडे नजर टाकली आणि राजाच्या डौलाने तो चालू लागला. क्षणभर थांबून त्याने जरबेने आवाज दिला, ‘‘मूर्खा! घोडा जवळ घे, ऐकलंस का?’’

.... घोडा मग जवळ आणला गेला. ईश्वरन घोड्यावर स्वार झाला. त्याने त्वेषाने चाबूक मारला आणि निघाला. घोडेस्वाराचा आवाज आता त्या अंधाऱ्या नदीकिनाऱ्यावर घुमला. ईश्वरनने आपले बाहू फैलावले आणि वाळूवरून तो धावू लागला. टिपेतल्या आवाजात तो ओरडूही लागला - ‘‘बाजूला व्हा! राजा येतो आहे! वाटेत जो कुणी येईल, त्याला तुडविले जाईल, सांगून ठेवतो!’’

‘‘... माझ्याकडे पाचशे एक घोडे आहेत...’’ त्याने रात्रीच्या काळोखाला सांगितले. हा क्रमांक त्याच्या मनात

उद्‌भवला आणि सारखं त्याची आवर्तनं होऊ लागली. सगळ्या नदीकिनाऱ्यावर त्याने धावून घेतले. तरी त्याचे म्हणावे तसे समाधान झाले नाही. ‘‘प्रधानजी! हा घोडा काही चांगला नाही. माझ्यासाठी आता पाचशे एक घोडे घेऊन या! आणि ते सगळे सेकंडक्लासचे पाहिजेत- सांगून ठेवतो!’’ ईश्वरन पुन्हा घोड्यावर बसला. टाच दिली आणि तो पुन्हा धावला. लवकरच प्रधानजीने त्याच्यासाठी नवीन घोडा आणला. आता ईश्वरन मोठ्या रुबाबात नव्या घोड्यावर स्वार झाला आणि म्हणाला - ‘‘हां! हा चांगला आहे!’’ आता तो भरधाव निघाला. तो परिसर नवा होता. अंधूक चंद्रप्रकाशात, त्या तशा वेळी तोंडाने टप टप आवाज करीत घोडेस्वाराचे धावणे चालू होते. एका हाताने लगाम खेचत, दुसऱ्या हाताने मिशीवर रुबाबात ताव देत, ईश्वरन घोड्याला सारखा पळवीत होता - वादळाच्या वेगाने. वाऱ्याच्या प्रभावाने त्याला विजयी झाल्याची भावना होऊ लागली. लवकरच त्याने वाळूचा सगळा विस्तार पार केला. तो पाण्याच्या प्रवाहापाशी आला. क्षणभर गोंधळला आणि घोड्याच्या कानात सांगू लागला, ‘‘तुला पाण्याची भीती वाटते आहे? तुला पोहून जावंच लागणार आहे; नाही तर मी तुला पांचशे एक रुपयांना घेणारच नाही!’’ त्याला वाटलं, घोड्याने पाण्यात छलांग मारलीय...

दुसऱ्या दिवशी नदीच्या पात्राच्या पाव एक मैल अंतरावर ईश्वरनचा मृतदेह सापडला. दरम्यान काहीजणांनी नदीच्या पायऱ्यांवर ठेवलेला ईश्वरनचा कोट उचलून घेतला होता. कोटाच्या खिशात त्यांना ईश्वरनची चिठ्ठी सापडली होती. त्यात लिहिलेलं होतं - ‘प्रिय

बाबा, ही चिठ्ठी तुम्हाला जेव्हा मिळेल, त्या वेळी शरयूच्या तळाशी मी असेन. मला जगायचं नाही. माझं दु:ख करू नका. तुमची इतर मुलं हुशार आहेत. माझ्यासारखी ‘ढ’ नाहीत.’

♦♦♦

# परिपूर्ण कलाकृती !

पाच वर्षांची आपली तपश्चर्या आता फळाला येते आहे याची जाणीव होताच सोमाला मोठं कृतार्थ असं वाटू लागलं. आयुष्यभरात एवढ्या मूर्ती हातून घडल्या; पण असं काम त्याने यापूर्वी कधीही केलेलं नव्हतं. तो नेहमीच म्हणायचा, 'महाप्रलयाने सगळं जग होईल एक वेळ; पण त्याही स्थितीत हा नटराज आपल्या पायावर असाच उभा राहील.' अद्याप ही मूर्ती कुणीही पाहिलेली नव्हती. दारेखिडक्या बंदोबस्ताने लावून स्वत:ला कोंडून घेऊन सोमाने झटून काम केले होते. मातीच्या दिव्याच्या स्थिर प्रकाशात छन्नी हातात घेऊन सोमा झटत होता. बाहेर भक्क सूर्यप्रकाश असला, तरी दिव्याच्या या उजेडात तो झपाटून मेहनत करीत राहिला. त्याने घामाची पर्वा केली नाही, श्रमाची पर्वा केली नाही. नसत्या चौकशा, कुतूहलाच्या नजरा, सगळं त्याने दूरच राहू दिलं. एका आवेशाने कामात तल्लीन राहून तो मूर्ती घडवीत राहिला. कुणाची दखल त्याने घेतली नाही; कुणाला कामाबद्दल बोलू दिले नाही.

... आणि अखेरीस त्याचे श्रम सार्थकी लागले. तो आता निवांत बसला आणि घाम पुसून त्याने आपल्या हातून तयार झालेल्या त्या अद्‌भुत कलाकृतीकडे मोठ्या समाधानाने पाहिले - तो पाहत राहिला आणि त्या मूर्तीच्या भव्यतेने थक्क होऊन गेला! त्याने मूर्तीला साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली... "तुला घडविण्यात मी पाच वर्षे घालविली. आता तू आमच्या मंदिरात स्थानापन्न हो आणि सगळया मानवजातीवर तुझी कृपादृष्टी राहू दे." दिव्याच्या मंद ज्योतीचा अंधूक असा प्रकाश मूर्तीच्या चेहऱ्यावर होता. प्रकाशाच्या त्या थरथरीने मूर्तीच्या ओठांवर जणू मंद स्मित जाणवू लागले होते. मूर्तिकार देहभान विसरला- आणि एक आवाज आला, "मित्रा, ही मूर्ती इथून कधीच हलवू नको. ती एक परिपूर्ण कलाकृती झालेली आहे." सोमा दचकला. त्याला भय वाटले. आजूबाजूला त्याने पाहिले. खोलीच्या अंधाऱ्या भागात एक आकृती दिसली. वाकून उभी असलेली. तो एक माणूसच होता. सोमाने त्याच्याकडे धाव घेतली अन् त्याचा गळा धरला- "तू का आलास इथे?"

गळा सोडवून घ्यायचा प्रयत्न करीत माणसाने सांगितले, "तुझं काम पाहायला. मला तुझं काम अतिशय आवडतं. पाच वर्षे मी पाहत होतो."

"तू इथं- आत आलास कसा पण?"

"तू जेवायला आत जायचास तेव्हा... आणखी एक चावी होती माझ्याकडे..."

सोमाने त्वेषात दातओठ चावले. "तुझा गळा घोटून तुला या देवतेसमोरच बळी देतो आता..."

"हरकत नाही," माणसाने म्हटले. "त्याच्यामुळे तुझं समाधान होत असेल तर... मला शंका आहे मित्रा, माझा बळी दिलास तरी ही मूर्ती तू बाहेर घेऊन जाऊ शकत नाहीस. ती एक परिपूर्ण अशी कलाकृती आहे. दैवी सामर्थ्य लाभलेली! आणि अशा प्रकारची कोणतीही परिपूर्ण कलाकृती आपल्यासारख्या मर्त्य मानवांसाठी नसते, लक्षात ठेव!"

मूर्तिकाराला आता रडू फुटलं. "नको... असं म्हणू नकोस. एवढी गुप्तता बाळगून मी ही कलाकृती तयार केली आहे, ती अद्वितीय होण्यासाठी परिपूर्ण होण्यासाठीच; आणि हे

सगळं केलंय ते आपल्या लोकांसाठीच. तो एक प्रकारचा देवांचा प्रवेश आहे आपल्या सगळयांमध्ये- देवाचा अवतार! लोकांसाठी ही मूर्ती नाकारणे योग्य नाही.'' माणसाने नटराजापुढे उभं राहून प्रार्थना केली - ''देवा, तुझं अस्तित्त्व सोसण्यासाठी आम्हाला बळ दे.''

याच माणसाने ही बातमी गावात सांगितली आणि त्या कलाकृतीचं रहस्य आता उघड झालं. गावातल्या माणसांमध्ये एक प्रकारची दहशत पसरली. एका चांगल्या तिथीला मूर्तिकार मंदिराच्या पुजाऱ्याकडे गेला आणि त्याला विचारले, ''येत्या पौर्णिमेला माझ्या नटराजाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करायची आहे. मंदिरात त्यासाठी जागा तयार केलीय का?'' पुजारी म्हणाला, ''मला आधी ती मूर्ती तर पाहू दे...'' पुजारी मूर्तिकाराच्या घरी गेला. मूर्तीकडे त्याने नजर टाकली आणि पाहतच राहिला. म्हणाला, ''एवढी अद्वितीय कलाकृती... ही देवता... खरंच मानवी नजरेत न मावणारी ही कलाकृती आहे. ती आपल्याला अंध करणार! प्रार्थनेच्या पहिल्याच चरणापासून ही मूर्ती नृत्य करणार आणि पहा, आपला सर्वनाश होणार!'' मूर्तिकार निराश झाल्याचे पाहून पुजारी त्याला म्हणाला, ''तुझ्या छन्नीने या मूर्तीच्या कोणत्याही भागाला थोडा तडा जाऊ दे, थोडी क्षती पोचव... मग ती मूर्ती आपल्यासाठी सुरक्षित होईल.''

''हूं! त्यापेक्षा, आता तो माणूस भेटू दे, त्याची कवटीच मी फोडेन!''

मूर्तीकाराने उत्तर दिले.

गावातले प्रमुख नागरिक मूर्तिकाराला भेटले. ''कृपा करून गैरसमज करून घेऊ नकोस... पण आम्ही तुझ्या मूर्तीला गावातल्या मंदिरात काही जागा देणार नाहीत. कृपया रागावू नकोस; पण आम्हाला गावातल्या नागरिकांची सुरक्षा अधिक महत्त्वाची वाटते आणि इत:पर एक करता येईल... तू जर का या मूर्तीची करंगळी तरी...''

''निघून जा, तुम्ही सगळेजण!'' सोमा ओरडला- ''मला माझा नटराज तुमच्या मंदिरात ठेवायचाच नाही. मी त्यासाठी स्वतंत्र मंदिर बांधणार, मूर्ती जिथे आहे तिथेच... आणि जगातलं ते सगळयात महत्त्वाचं मंदिर होईल, पाहा तुम्ही!'' दुसऱ्या दिवशी सोमाने त्या खोलीची भिंत पाडून तिथे मंदिराचे एक प्रशस्त प्रवेशद्वार बांधले. दवंडी देणाऱ्या रामाला त्याने एक चांदीचे नाणे देऊ केले आणि सूचना दिली, ''जा, अन् सगळया आसपासच्या गावांत जाहीर कर, येत्या पौर्णिमेला नटराजाची प्रतिष्ठापना आहे म्हणून! जर भरपूर माणसं आली, तर शाल-श्रीफळाने मी तुझा सत्कारही करीन!''

पौर्णिमेच्या दिवशी आसपासच्या गावांतून, खेड्यांतून स्त्री-पुरुषांची, मुलांची मोठी गर्दी झाली. इंचभर जागा रिकामी नव्हती, एवढी दाटी झाली. रस्ते-गल्ल्या माणसांनी भरून गेल्या. जमावामध्ये मग खेळणी विक्रेते, फुलं-फळांची विक्री करणारे - सगळयांचे ओरडणे भरून गेले. सामूहिक प्रार्थना, मंगल वाद्ये, मुलांचे मजेत ओरडणे, माणसांच्या भेटीगाठी - या सगळयांमुळे गावात मोठा जल्लोष होऊ लागला. फुलांच्या माळा, उदबत्त्यांनी सुशोभित- सुगंधित झालेलं ते वातावरण, सर्व जगाला आपल्या चंदेरी प्रकाशाने न्हाऊन काढणाऱ्या पौर्णिमेच्या चंद्रामुळे प्रकाशमय झालेले होते.

आता मूर्तीभोवतालचा पडदा बाजूला झाला- मूर्तीचे अनावरण झाले. मूर्तीसमोर कर्पुरज्योत प्रज्वलित झाली. घंटानाद होऊ लागले. सर्व जमावात एक प्रकारची शांतता

पसरली. प्रत्येकाची नजर मूर्तीवर खिळून राहिली. दरवळणाऱ्या कर्पुराच्या प्रकाशात नटराजाचे डोळे चमकले. हातापायांत हालचाल झाली. पैंजण रुणझुणले. ते पाहून सगळया जमावाला एक प्रकारचा धक्का बसला. नटराजाने आता एक पाय जमिनीवर रोवला, नृत्याच्या लयीत दुसरा पाय उचलला- टाचेखालची जमीन नष्ट होते की काय असे झाले! स्वत:च्या अंगावर नटराजाने राख फासली, हातातले डमरू वाजू लागले आणि त्या सगळया तालसंगीताने सर्व जीवनालाच गती मिळाली! सगळा जमाव थक्क झाला. या दृश्याने दिपून जाऊन सगळयांनी हात जोडले.

याच वेळी पूर्वेकडून वारा सुटला. चंद्रप्रकाश हळूहळू अंधूक होऊ लागला. वाऱ्याने जोर पकडला. काळया ढगांनी चंद्राला गिळून टाकले. सगळी माणसं आभाळाकडे पाहू लागली. काळयाकुट्ट ढगांनी अंधारून आले होते. पाहता पाहता विजेचा लखलखाट झाला. ढगाच्या गडगडाटाने आसमंत व्यापला. विजेचे लोळ आकाशातून पडले. एक वीज गवताच्या गंजीवर पडली आणि तिने पेट घेतला. सगळं गाव प्रकाशाने झळाळलं. भयाने लोक सैरावैरा पळू लागले. निवारा शोधू लागले. दुसरी वीज एका घरावर पडली. बायकामुलांचा आक्रोश, ओरडणे यामुळे सगळीकडे गोंधळ झाला. मोठा वादळी पाऊस सुरू झाला आणि विजेचा कडकडाट वाढला. असा भयंकर वादळी पाऊस यापूर्वी कधीच झाला नव्हता. गावातली दोन तळी - ज्यामधून गावाचा रस्ता जायचा - तुडुंब भरली, त्याचे पाणी आता रस्त्यांवर येऊन ती एक व्हायची परिस्थिती झाली. सगळया गल्ल्या-रस्त्यांवरून पाणी वाहू लागले. सोसाट्याचा वारा झाडे गदगदा हलवू लागला, घराघराला नुकसान पोहोचवू लागला. वादळवाऱ्यांतून लोकांचे चीत्कार ऐकायला येऊ लागले - ‘‘जग बुडणार आता!’’

दुसऱ्या दिवशीसुद्धा दिवसभर पाऊस होता. मूर्तीसमोर बसून खाली मान घालून सोमा विचारात बुडाला होता. भिजलेली हार-फुलं, प्रसादाची ताटं सगळं सगळं मूर्तीच्या भोवती विस्कळीत पडलेलं होतं. सोमाचे काही मित्र चिखल पाण्यातून वाट काढीत आले. त्यांनी विचारले, ‘‘आता झालं का तुझं समाधान?’’ शिक्षेची अंमलबजावणी करणाऱ्या शिपायांसारखे उभं राहून ते सारखं विचारीत होते - ‘‘तुला माहीत आहे, किती जण जिवाला मुकले, किती घरं वाहून गेली आणि किती उद्ध्वस्त झाली; माहीत आहे का तुला?’’

‘‘नाही; अन् मला ते जाणूनही घ्यायचे नाही.’’ सोमा म्हणाला-

‘‘जा तुम्ही. इथं थांबू नका, सांगू नका मला.’’

‘‘देवाने आपल्या सामर्थ्याची एक झलक दाखविलीय आपल्याला; त्याला पुन्हा जागं करू नकोस. काहीतरी कर- आमचे प्राण आता तुझ्या हातात आहेत, सोमा! आम्हाला सांभाळ. ही मूर्ती अधिकच परिपूर्ण झालीय; त्यामुळेच-’’

माणसं निघून गेली आणि सोमा पुन्हा त्याच स्थितीत कितीतरी तास चिंतनात मग्न होऊन बसला. मित्रांचे शब्द सारखे आठवत होते अन् अस्वस्थ करीत होते... आमचे प्राण तुझ्या हातात आहेत... त्याचे गांभीर्य सोमाला जाणवू लागले. त्याच्या डोळयात पाणी भरून आले... मी या मूर्तीला विद्रूप कसा करू... जाऊ दे, सगळं जग जळून जाऊ दे... मी या मूर्तीला स्पर्श करू शकणार नाही... देवासमोर दिवा लावून अन् त्याकडे दृष्टी लावून सोमा

बसून राहिला. दूरवर ढगांचा गडगडाट सुरू झाला. पुन्हा अतिवृष्टी होणार... गरीब बिचारी माणसं... आतामात्र सगळी मरणार... सोमाचे लक्ष मूर्तीच्या पायाकडे गेले... बोटांकडे गेले... छन्नीचा एकच मार, हलकासा असा... अन् मग सगळं संकट दूर होईल... त्याने मूर्तीच्या बोटांकडे दृष्टी लावली. त्याच्या हातांना थरथर सुटली. माझ्याने कसं शक्य आहे ते... बाहेर वादळी वारा घोंघावू लागला. माणसं आता त्याच्या घरापुढे जमू लागली आणि त्याला मदतीचे आवाहन करू लागली.

देवाला साष्टांग नमस्कार घालून सोमा बाहेर आला. तुडुंब भरलेली दोन तळी रस्त्यावर मिळालेली होती, तिथे तो उभा राहिला. पाहू लागला. पूर्वेकडच्या क्षितिजाकडून काळेकुट्ट ढग गर्दी करून जमू लागले होते. जेव्हा ढग जवळ येतील, तेव्हा सर्वनाश ठरलेला! ''नटराजा, मी तुझ्या रूपाला धक्का लावू शकत नाही. वाटल्यास मी माझे बलिदान देईन.'' त्याने पुरात उडी मारायचे ठरविले; मात्र पुन्हा विचार करून तो परत निघाला. ''मरण्यापूर्वी देवाचं अखेरचं दर्शन मला घ्यायला पाहिजे...'' वादळी पावसातून त्याने निर्धाराने मार्ग काढला. घोंघावणाऱ्या वाऱ्याने झाडे वाकू लागली, फांद्या थरथरू लागल्या. माणसं, जनावरं भयभीत होऊन सैरावैरा धावू लागली.

सोमा घरासमोर येताच, एक वृक्ष कोसळून त्याच्या घरावर पडला. ''बाप रे! माझं घर!'' तो ओरडला आणि घरात धावला. तुटलेल्या फरशा आणि फळयांतून अडकलेली नटराजाची मूर्ती सोमाने बाहेर काढली. एक अपवाद वगळता सगळी मूर्ती शाबूत होती - काही अंतरावर मूर्तीची करंगळी तुटून पडलेली होती.

''देवाने स्वत: होऊनच असं केलंय... आपल्याला वाचविण्यासाठी'' जमलेले लोक ओरडून सांगू लागले.

दुसऱ्या पौर्णिमेला या नटराजाच्या मूर्तीची समारंभपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात आली. सोमाला संपत्ती अन् सन्मान प्राप्त झाले. पंच्याण्णव वर्षांपर्यंतचे आयुष्य सोमाला लाभले.

...पण त्याने नंतर छन्नी-हातोड्याला कधीही स्पर्श केला नाही.

♦♦♦

# बाबांची मदत

अंथरुणात लोळत असतानाच अचानक स्वामी दचकला. त्याला लक्षात आले, सोमवारची सकाळ आहे ही. त्याला असं वाटलं, की शुक्रवारी शाळेचा शेवटचा तास संपला अन् ताबडतोब आता सोमवार उगवला. भूकंप व्हावा अन् त्या सगळ्या शाळेचा भुगा होऊन जावा, असं त्याला फार मनातून वाटलं; पण ती चांगली इमारत- अल्बर्ट मिशन स्कूल - अशा प्रकारच्या वाटण्याला इच्छांना तोंड देत गेल्या शंभराहून अधिक वर्षं उभीच आहे.
नऊच्या सुमारास स्वामिनाथन विव्हळला- ''अगं आई गं! डोकं फार दुखतंय!' त्याच्या आईने सांगितले, ''मग तू टांगा करूनच जा नं शाळेला!''
''म्हणजे मी तिथं जाईपर्यंत माझा मृत्यूच होऊन जाऊ दे, नाही का! टांग्यातला हिसक्यांची तुला कल्पना तरी आहे का?''
''तुला आज काही महत्त्वाचं शिकविणार आहेत का?''
''महत्त्वाचं? हूं : भूगोलाचे शिक्षक एकच धडा वर्षभरापासून शिकवीत आहेत आणि आम्हाला गणित आहे, म्हणजे काय, तर सगळ्या पिरियडभर सरांच्या छड्या खा! महत्त्वाचं शिकविणार म्हणे! हूं :''
आणि आईने मोठ्या मनाने सल्ला दिला, ''ठीक आहे; तू थांब आज घरीच.''
साडेनऊ वाजता, ज्या वेळेस त्याने शाळेत प्रार्थना किंचाळायला हवी होती, त्याऐवजी स्वामी आईच्या खोलीत लोळत पडला होता. बाबांनी त्याला विचारले,
''का रे, आज शाळा नाहीय का?''
''डोकेदुखी!'' स्वामीनं मोठ्या गांभीर्याने उत्तर दिलं.
''मूर्ख कुठचा. जा, ड्रेस घालून जा!''
''डोकं दुखतंय...''
''रविवारी जरा कमी हुंदडत जा, म्हणजे सोमवारी डोकेदुखीशिवाय जाता येईल शाळेत! - मूर्ख कुठचा! जा ड्रेस घाल अन् जा!''
स्वामीला लक्षात आलं, आपले बाबा म्हणजे मुलखाचे दुराग्रही आहेत; मग त्याने आपला पवित्रा बदलला.
''उशीर झालाय शाळेला... एवढ्या उशिरा मी वर्गावर जाऊ शकणार नाही.''
''मला माहिताय ते; पण उशीर तुझ्याच चुकीमुळे झालाय् नं? अन् शाळेला जाणार नाहीस, ते मला आधी सांगायला पाहिजे होतं का नाही?''
''पण एवढ्या उशिरा गेलं, तर सर काय म्हणतील?''
''सांग त्यांना, की डोकं दुखत होतं, म्हणून उशीर झाला.''
''तसं सांगितलं, तर ते मला मार देणार.''
''मारतील? पाहू बरं, काय नाव आहे त्यांचं?''
''सॅम्युअल सर.''
''ते मुलांना मारतात?''
''मग? ते फार तापट आहेत. उशिरा येणाऱ्यांसाठी तर फारच. परवाच एक मुलगा उशिरा आला होता, तर सरांनी त्याला सगळ्या पिरियडभर एका कोपऱ्यात गुडघ्यावर उभं ठेवलं

होतं अन् तेसुद्धा आधी सहा छड्या मारून अन् कान पिळून; माहिताय का? मला सॅम्युअल सरांच्या पिरियडला जायला भीतीच वाटते.''

''सर एवढे मारणारे असतील, तर तुम्ही पोरांनी मुख्याध्यापकाकडे तक्रार का केली नाही?''

''अं! आमचे एच.एम.च सॅम्युअल सरांना भीतात म्हणे! फार भयंकर आहेत हे सर!''

आणि स्वामीने सॅम्युअल सरांच्या छळाचा एक भडक असा वृत्तांतच बाबांपुढे सादर केला. पोरांच्या हातावर एकदा का छड्या मारायला त्यांनी सुरुवात केली, तर रक्त निघेपर्यंत ते कसे मारत राहतात अन् पुन्हा बोटांवरचे ते रक्त पोराला स्वत:च्या कपाळावर भस्मासारखे लावायला सांगतात...

स्वामीला आपल्या अशा सांगण्यावरून वाटू लागले, की बाबा आता निश्चितच त्याला सांगतील - ''उशीर झालाय, तर जाऊ नको, घरी बस;'' पण बाबांचं वागणं अनपेक्षितरीत्या बदललं. ते भडकले. ''पोरांना एवढं मारतो काय तो हरामखोर? अशी माणसं नोकरीतूनच हाकलून लावली पाहिजेत. मी पाहतोच आता...''

आणि या प्रकरणाचा निकाल असा लागला, की बाबांनी ठरविलं - स्वामीला उशिराच पाठवावं आता, एक आव्हान म्हणून. बाबांनी आणखी असं ठरविलं, की स्वामीसोबत एच.एम. सरांना एक तक्रारही लिहून द्यायची... स्वामीला आता कसलीही सबब कामी येणार नव्हती. त्याला आता शाळेत जावंच लागणार होतं; प्रश्नच नाही.

स्वामी शाळेला जायला तयार होईपर्यंत बाबांनी एच.एम. सरांच्या नावाने एक तक्रारअर्ज लिहून, पाकिटात टाकून सीलबंद करून ठेवला होता!

''काय लिहिलंय बाबा तुम्ही त्याच्यात?'' स्वामिनाथनने मोठ्या काळजीने विचारले.

''तुझ्याबद्दल काही नाही. तू फक्त हे एच.एम सरांना दे अन् वर्गावर जा- जा!''

''तुम्ही आमच्या सॅम्युअल टीचरबद्दल काही लिहिलंय का?...''

''त्यांच्याचबद्दल लिहिलंय पुष्कळ. तुझे एम.एम. सर वाचतील, तर ते सॅम्युअल सराला शाळेतून डिसमिस करतीलच अन् पोलिसांच्या हवाली करतील, तू पाहाच आता.''

''पण त्यांनी काय केलंय बाबा?''

''त्याने काय केलंय त्याचा सगळा हिशेबच दिलाय या पत्रात. तू हे तुझ्या एच.एम. सरांना दे अन् जाऊन बस आणि या पत्राची पोच आणायला विसरू नकोस. काय?''

स्वामीला शाळेत जाताना वाटू लागलं, की जगात सर्वांत खोटारडं जर कुणी असेल, तर ते आपणच. आता त्याचं मन सांगू लागलं, की आपण वर्णन केलं, तेवढं काही सॅम्युअल सर वाईट आहेत का... आता त्याला ठरविता येईना, की आपण जेवढं सांगितलं, त्यात खरं किती अन् खोटं किती होतं? चालताना तो रस्त्यावर थोडा वेळ थांबला अन् सॅम्युअल सरांबद्दल विचार करू लागला. काही झालं, तरी सॅम्युअल सर काही तेवढे वाईट नाहीत. उलट बाकी मुलांच्या तुलनेत ते स्वामीसाठी अधिकच चांगले होते, मनमिळावू होते. इतकेच काय एकदोन वेळा तर सरांनी स्वामीची थट्टाही केली होती; अशी थट्टा, की स्वामीला ती प्रतिष्ठेची वाटली होती; पण एवढं खरं, की सॅम्युअल सर पोरांना फारच वाईट वागणूक द्यायचे... त्यांच्या छड्यांनी हातावर वळ उमटायचे. स्वामी आता एखादं उदाहरण आठवू लागला, ज्यामुळे त्याला धीर यावा; पण त्याला माहीत असलेली अशी

एकही घटना नव्हती. फार फार वर्षांपूर्वी पहिल्या वर्गातल्या एका पोराची बोटं सरांनी फोडून काढली होती अन् तशी रक्ताळलेली बोटं चेहऱ्यावर फासायला लावली होती; पण ही घटना प्रत्यक्ष कुणीच पाहिलेली नव्हती अन् असं असलं तरी वर्षोन्वर्षे ही कहाणी पोरांमध्ये प्रचलित झालेली होती. सॅम्युअल सरांच्या वर्तनाबद्दलच्या गोंधळामुळे आता स्वामीचे डोके गरगरू लागले - खरंच, सॅम्युअल सर चांगले होते का वाईट? त्यांच्याबद्दल या अर्जात केलेल्या तक्रारीसारखेच ते आहेत का नाहीत...? एकदा असं वाटून गेलं स्वामीला, की धावत जावं परत घरी अन् बाबांना विनंती करावी, की हे पत्र परत घ्या. रद्द करा.
पण बाबा कमालीचे हट्टी आहेत, ठाम आहेत हेही स्वामीच्या लक्षात आलं. त्या पिवळया इमारतीपाशी पोहोचेपर्यंत स्वामीची खात्री झाली, की आपण स्वत: खोटारडे होतो अन् आता सरांचं वाटोळं करायला निघालो. कदाचित आता एच.एम. सर त्यांना डिसमिसही करतील अन् पोलिस त्यांना हातकड्या घालून जेलमध्ये घालतीलही. या सगळया अपमान, मानहानी, त्रासासाठी कुणाला जबाबदार धरले जाईल? स्वामीला हुडहुडी भरली. जसजसं सॅम्युअल सरांबद्दल स्वामी विचार करू लागला, तसतसं त्याला पश्चात्ताप होऊ लागला, दु:ख होऊ लागलं. काळा वर्ण, बारके चमकदार डोळे, ओठांवरची त्यांच्या मिशांची रेषा, अर्धवट वाढलेल्या दाढीचा चेहरा अन् हनुवटी, त्यांचा पिवळा कोट- सगळं सगळं स्वामीच्या दु:खाने भरून गेलं. पाकिटामुळे फुगलेला खिसा जाणवला, तसं त्याला वाटलं; आपण शिक्षेची अंमलबजावणी करणारे अंमलदार आहेत. क्षणभर त्याला बाबांचा भयंकर राग आला अन् त्याला वाटलं, अशा हट्टी अन् दुराग्रही माणसाचं पत्र आपण नालीत फेकून का नाही दिलं, आं!
स्वामी जसा शाळेच्या गेटवर पोहोचला, तशी त्याला एक कल्पना सुचली- उपायच म्हणा ना. एच.एम. सरांना हे पत्र आताच नाही द्यायचं. उशिरा- शाळा सुटल्यावर द्यायचं. म्हणजे बाबांच्या आदेशाला झुगारून देण्याचं स्वातंत्र्य तात्पुरतं का होईना, उपभोगता येईल. त्यात काहीच वावगं नव्हतं अन् बाबांना ते कळायचं कारणही नव्हतं. जर हे पत्र शाळा सुटताना दिलं, तर आणखी एक शक्यता आहे, की सॅम्युअल सर आज तरी असं काही वागतील, की तक्रार खरी ठरावी, नाही का!
वर्गाच्या दाराशी स्वामी उभा राहिला. सॅम्युअल सर अंकगणित शिकवीत होते. त्यांनी स्वामीकडे क्षणभर नजर टाकली. सर आता अंगावर धावून यावेत अन् आपली चामडी सोलून काढावी अशा आशेने स्वामी उभा राहिला; पण सॅम्युअल सरांनी फक्त विचारले, ‘‘तू आता येतो आहेस का शाळेला?’’
‘‘होय सर.’’
‘‘तुला अर्धा तास उशीर झालाय.’’
‘‘मला कल्पना आहे त्याची -’’ स्वामीला वाटलं, आता आपल्यावर हल्ला होणार! त्याने प्रार्थना केली मनात- तिरुपतीच्या देवा, प्लीज सरांना मला मारायची बुद्धी दे!
‘‘का उशीर केलास?’’
स्वामीला वाटून गेलं, की सांगावं - ‘तुम्ही काय करू शकता, ते पाहण्यासाठी...’ पण तो एवढंच म्हणाला- ‘‘माझं डोकं दुखत होतं सर.’’

''अरेरे, मग तू शाळेला का आलास, अं?''
सॅम्युअल सरांचा एकदम अनपेक्षित असा प्रश्न!
''माझे बाबा म्हणाले, की मी शाळा बुडवू नये'' स्वामी ने सांगितले. सॅम्युअल सर या उत्तराने खूश झाले. ''तुझे बाबा बिलकुल योग्य बोलले. फारच संवेदनक्षम माणूस! आम्हांला असेच पालक हवे आहेत.''
'अरेरे... गरीब बिचारा...' स्वामी विचार करू लागला-
'तुम्हांला काय माहित आहे, माझ्या बाबांनी काय करून ठेवलं आहे तुमच्यासाठी...' सॅम्युअल सरांच्या चारित्र्याबद्दल आता स्वामीचा गोंधळ अधिकच वाढला.
''हरकत नाही. जा बैस जागेवर. अजूनही डोके दुखते आहे का?''
''थोडं-थोडं सर.''
भळभळत्या हृदयाने स्वामी आपल्या जागेवर बसला. सॅम्युअलएवढा सज्जन माणूस स्वामीला दुसरा कुणी भेटला नव्हता.
सर मुलांचे होमवर्क तपासत होते. ही तपासणी, सहसा वर्गात भयंकर दृश्यांच्या मालिकेत रूपांतरित व्हायची. कमीत कमी स्वामीला तरी तसं वाटतं. वह्या तोंडावर फेकल्या जायच्या, पोरांवर दोष लादले जायचे, छड्या मारल्या जायच्या. बाकावर उभं केलं जायचं.
...पण आज सॅम्युअल सरांमध्ये बरीच सोशिकता अन् सौम्यपणा आलेला दिसत होता. त्यांनी वाईट होमवर्क बाजूला सारले, चुकांसाठी सौम्य छड्या मारल्या आणि पाच मिनिटांपेक्षा अधिक वेळ कुणालाही बाकांवर उभं केलं नाही. स्वामीची बारी आली. या संधीबद्दल त्याने देवाचे आभार मानले.
''स्वामीनाथन, तुझं होमवर्क कुठे आहे?''
''मी होमवर्कच केलं नाही सर.'' स्वामी मोठ्या नम्रतेने म्हणाला.
क्षणभर शांतता होती.
''का- डोकेदुखी?'' सॅम्युअल सरांनी विचारले.
''होय सर.''
''ठीक आहे. खाली बस.'' स्वामी खाली बसला. काय झाले आज सरांना... पिरियड संपायला आला आणि उद्ध्वस्त झाल्यासारखा स्वामी बसून राहिला.
शेवटचा पिरियडसुद्धा सॅम्युअल सरांनीच घेतला. पिरियड सुरू झाला 3.45 वाजता आणि संपला 4.30 वाजता. मागच्या सगळ्या पिरियड्स पासून स्वामिनाथन बारकाईने विचार करू लागला होता- सॅम्युअलसरांना खिजविण्यासाठी आता कोणती उपाययोजना करावी, त्याला सुचेना. घड्याळात चारचे टोल पडले आणि स्वामी निराश झाला. आता फक्त अर्धा तास राहिला. सॅम्युअलसर आता साहसवीरांचा धडा शिकवीत होते. वास्को-द-गामाचे भारतातल्या आगमनाचं प्रकरण होतं ते. पोरं अर्धवट सुस्तीत ऐकत होती. स्वामीने अचानक मोठ्या आवाजात विचारले, ''कोलंबस भारतात का आला नाही सर?''
''त्याचा रस्ता चुकला होता.''
''मला खरं वाटत नाही सर, विश्वास बसण्यासारखं नाही ते.''
''का?''

''एवढा मोऽऽठा माणूस, तो रस्ता कसा चुकणार?''
''मोठ्याने ओरडू नकोस. मला ऐकायला येतंय व्यवस्थित.''
''मी ओरडत नाही सर. माझा हा नेहमीचा आवाज आहे, देवाने दिलेला! मी काय करू शकतो सर?''
''सिट डाऊन!''
स्वामिनाथन खाली बसला. आपल्या यशाबद्दल त्याला थोडा आनंदही झाला. सरांनी गोंधळाने अन् संशयाने त्याच्याकडे पाहिले आणि परत शिकवायला सुरुवात केली.
जेव्हा समोरच्या बाकावरच्या शंकरने उठून प्रश्न केला, तेव्हा स्वामीला दुसरी संधी मिळाली-
''सर, वास्को-द-गामा ही भारतात येणारी पहिलीच व्यक्ती होती का?'' या प्रश्नाला सरांनी काही उत्तर द्यायच्या आधीच स्वामी मागनं ओरडला,
''असंच त्यांचं म्हणणं आहे!''
सर आणि सगळी पोरं स्वामीकडे पाहू लागली. आज स्वामीच्या अशा व्यत्यय आणणाऱ्या वागण्याने सर गोंधळले होते.
''स्वामिनाथन, तू पुन्हा ओरडतो आहेस.''
''मी ओरडत नाही सर. देवाने दिलेल्या आवाजाला मी काय करू शकतो सर?''
शाळेच्या घड्याळात सव्वाचारचा ठोका पडला. आणखी पंधरा मिनिटं. स्वामीला वाटलं, आता काहीतरी नाट्यपूर्ण असं करायलाच पाहिजे. एवढ्या पाव-तासात. सॅम्युअल-सरांनी रागात पाहिले होते, दटावलेही होते. हे खरं असलं, तरीपण ते तेवढं पुरेसं नव्हतं. स्वामीला वाटलं, आता आणखी थोडा प्रयत्न आपण केला, तर सर नोकरीतून काढून टाकण्यासारखं आणि जेलमध्ये घालण्यासारखं काहीतरी कृत्य करतील.
धड्याचा शेवट करून सर थांबले. आता उरलेली काही मिनिटं काही प्रश्न विचारण्यासाठी त्यांनी ठेवली. सगळयांनी आता पुस्तकं बाजूला ठेवून द्या असं सांगून, दुसऱ्या रांगेतल्या कुणाला तरी त्यांनी प्रश्न विचारला-
''वास्को-द-गामाच्या भारतातल्या आगमनाची तारीख कोणती?''
स्वामिनाथनच कर्कश आवाजात ओरडला- ''वीस डिसेंबर सोळाशे अठ्ठेचाळीस!'' नेम धरून गोळी मारावी, त्या आवेशाने तो ओरडला होता.
''तू ओरडू नकोस'' सर रागावले, ''डोकेदुखीमुळे तुझं डोकं फिरलं की काय?''
''माझं डोकं आता दुखत नाही सर!'' 'क्रांतिकारक' बाणेदारपणाने उत्तरला.
''मूर्खा! बस खाली!'' आपल्याला मूर्ख म्हटल्याचे ऐकून स्वामी रोमांचित झाला.
''पुन्हा जागेवरून उठशील, तर छडीने फोडून काढीन!'' सर म्हणाले. आणि सरांच्या अशा आश्वासनाने आनंदित होऊन स्वामी बसून राहिला. सर मग म्हणाले, ''तुम्हाला मी आता मोगल साम्राज्याबद्दल काही प्रश्न विचारणार आहे. सांगा बरं, मोगल राजांपैकी तुम्ही कुणाला सर्वश्रेष्ठ म्हणाल- कुणाला सामर्थ्यवान आणि कुणाला धर्मनिष्ठ?''
स्वामी उठला. तो उठल्याचे दिसताच सर जोराने ओरडले, ''सिट डाऊन!''
''मला उत्तर द्यायचंय सर.''
''सिट डाऊन!''

"नाही सर, मला उत्तर द्यायचंय."

"तू पुन्हा उठलास तर मी काय करणार आहे, लक्षात आहे का?"

"तुम्ही म्हणाला, की तुम्ही माझ्या बोटांवर छड्या मारून रक्त काढणार आहात अन् ते रक्त माझ्या कपाळावर फासायला सांगणार आहात!"

"ठीक आहे. ये इकडे."

स्वामिनाथनने मोठ्या आनंदाने आपली जागा सोडली आणि डायसवर उडी मारून तो उभा राहिला. ड्रॉवरमधून छडी काढून सर रागात ओरडले, "हात कर- राक्षस कुठला!" सरांनी त्याच्या एकेका तळहातावर जोरदार छड्या मारल्या. तीन वेळा. स्वामीने काही गयावया न करता मार खाल्ला. अर्धा डझन छड्या झाल्यावर सरांनी विचारले, "पुरे- का आणखी आहे खुमखुमी?"

स्वामीने फक्त हात पुढे केला अन् आणखी दोन छड्या खाल्ल्या. इतक्यात घंटा झाली. हुळहुळत्या हातांनी; पण समाधानाने स्वामीने डायसवरून उडी मारली. त्याने दप्तर उचलले. खिशातले पाकीट काढले आणि तो एच.एम. सरांच्या ऑफिसकडे धावला.

ऑफिसच्या दाराला कुलूप होते.

"अरे! एच.एम. सर कुठे गेले?" त्याने शिपायाला विचारले.

"कशाला पाहिजेत ते तुला?"

"माझ्या बाबांनी त्यांच्यासाठी एक पत्र दिलंय"

"त्यांनी दुपारची सुटी घेतलीय आणि ते आता आठवडाभर येणार नाहीत. तू हे पत्र असिस्टंट एचएमना दे. ते येतील थोड्या वेळात."

"कोण आहेत ते ?"

"तुझेच सर - सॅम्युअल. ते येतीलच इतक्यात."

स्वामिनाथनने तिथून पळ काढला; ते थेट घरीच. हातात पाकीट घेऊन आल्याचे पहाताच बाबांनी टोमणा मारला-

"मला वाटलंच, तू देणार नाहीस ते पत्र. डरपोक कुठला!"

"एच.एम. सर रजेवर होते- शप्पथ!" स्वामिनाथन म्हणू लागला, तसं बाबांनी त्याला गप्प केले-

"वर आणखी खोटं बोलू नकोस!" स्वामीने हातात पाकीट धरून म्हटले, "एच.एम. सर रजेवरून परत आल्या आल्या मी त्यांना हे पत्र देतो."

बाबांनी ते पाकीट हिसकावून घेतले; फाडले अन् टेबलाखालच्या कचरा पेटीत फेकलेसुद्धा. बाबा मग पुटपुटले, "सॅम्युअलने तुझा गळा दाबला, तरी आता मी तुझी मदत करणार नाही. तुझ्यासाठी सॅम्युअलच योग्य आहेत."

♦♦♦

# नागाचे गाणे

संगीत सभा ऐकून मोठ्या तृप्त मनाने आम्ही त्या सभागृहातून बाहेर पडत होतो. अतिशय उत्तम असं ते संगीत- सादरीकरण होतं, असं आम्हाला वाटलं; पण असं आमचं वाटणं, आमच्यातल्या त्या माणसाशी गाठ पडेपर्यंत राहिलं. तो बडबड्या माणूस असा वाटला, की जणू तो संगीताच्या कार्यक्रमातून नाही, तर एखाद्या यातनाघरातून बाहेर पडतो आहे. आम्ही त्याच्याकडे चिडून पाहिले आणि म्हणालो, ‘‘दक्षिण भारतीय संगीताचा शंभर वर्षांपूर्वीच अंत झालाय असं समजणाऱ्यांपैकी तुम्ही आहात का! तुम्हाला वाटतं का, की प्राचीन संगीतकारांशी तुमची जवळीक होती आणि त्यामुळे आजचं आधुनिक संगीत तुम्हाला पोरकट आणि पोकळ वाटतंय? की तुम्ही सतत अस्वस्थ असणारे आणि ज्यांना संगीताच्या अणूरेणूची फोड केल्याशिवाय ते ऐकवतच नाही, असे तत्त्वज्ञ आहात?’’

‘‘असं काहीही नाही.’’ तो बडबड्या माणूस सांगू लागला- ‘‘मी एक साधा माणूस आहे अन् काय बोलतो, त्याचं भान ठेवून मी असतो. मला संगीताबद्दल थोडंफार ज्ञान आहे, आवडही आहे- किंबहुना इथल्या सर्वांपेक्षा थोडं जास्त आहे आणि त्यामुळेच आज संगीताची आवड कोणत्या थराला गेलीय, ते पाहून धडकी भरलीय मला!’’

त्याची प्रतिक्रिया आम्हाला विक्षिप्त वाटली, ती आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करून आपसात बोलून दाखविली; पण तो आमच्यामागेच राहिला, बोलतच राहिला, आम्हाला त्याचं ऐकावंच लागलं :

‘‘माझ्याकडे पाहून तुम्हाला वाटत असेल, (आता तो माणूस सांगू लागला) की खेड्यामध्ये खत-औषधांची विक्री करणाऱ्या माझ्यासारख्याला, त्याच्यापेक्षा अधिक ‘कलात्मक’ बाबींशी काही घेणंदेणं नसावं! पण मी सांगतो तुम्हाला, एके काळी चांगला संगीतकार- म्हणजे वादक व्हायची माझी महत्त्वाकांक्षा होती आणि ती जवळजवळ पूर्णही झालेली होती. त्याला फार वर्षं झाली. त्या वेळी मी मालगुडीपासून ऐंशी मैलांवर असलेल्या कुंभम या छोट्या खेड्यात राहायचो. एक मोठा कलावंत तिथे राहायचा. जेव्हा तो बासरी वाजवायचा, त्या वेळी लोक सांगायचे, की गावातली जनावरं त्याच्या मागे यायची. खरं म्हणजे, या शतकातला तो सर्वांत मोठा असा बासरीवादक असेल; पण तो प्रसिद्धीपासून दूर राहणारा होता. गावाबाहेर कुणाला त्याची माहिती नसलेला, गावातल्या मंदिरातच संगीत सेवा करून वडिलोपार्जित शेतीवाडीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नात समाधान मानणारा तो होता. मी त्याच्याकडे कपडे धुवायचो, घराची झाडझूड, चिल्लर पत्र-व्यवहार, हिशेबाची कामं करायचो आणि जेव्हा त्याला वाटायचं, तेव्हा तो मला संगीत शिकवायचा. त्याचं स्वत:चं व्यक्तिमत्त्व अन् तपश्चर्या एवढी समर्थ होती, की त्याचं एक तासाचं शिकविणं हे इतरांच्या वर्षभराच्या शिकवणीपेक्षा जास्त मोलाचं असायचं; त्याचं अस्तित्व माणसाला बरंच काही शिकवून जायचं...

...तीन वर्षांच्या कठीण परिश्रमानंतर माझ्या गुरूला वाटले, माझ्या संगीत साधनेला काही आकार आला. गुरूने मला सांगितलं, एखाद्या वर्षात तू तुझ्या शहरात जाऊ शकतोस आणि तुला योग्य वाटले, तर तिथे जनतेसाठी कार्यक्रम घेऊ शकतोस... तुम्हाला लक्षात आलं असेल, मला ते योग्य वाटले. प्रसिद्धी नसलेला मोठेपणा मला नको होता. मला संपत्तीही

पाहिजे होती अन् मान्यताही. दुसऱ्या वर्षी मद्रासला जाऊन संगीत सभेत कार्यक्रम घ्यायचे स्वप्न होते माझे अन् त्यामुळे सगळया जिल्ह्यात माझे नाव गाजणार होते...

... हातातल्या वेळूच्या त्या बासरीकडे मी अशा तऱ्हेने पाहिले, जसं काही माझ्या हातात जादूची कांडी आहे. त्या बासरीमुळे माझ्यासाठी एक नवं जग खुलं होणार होतं.

... रस्त्याच्या टोकाला एका लहानशा झोपडीत मी राहायचो. एका ठिकाणी बसून रात्री उशिरापर्यंत रियाज करायची माझी सवय होती. एकदा रात्री मी भैरवी राग आळवीत होतो. त्यात स्वत:ला विसरून गेलो होतो. तेवढ्यात दारावर टकटक झाली. व्यत्ययामुळे मी चिडलो.

"कोण आहे?" मी विचारले.

"एक साधू ज्याला मूठभर अन्न हवं आहे."

"या वेळी? जा, पुढे जा अन् अशा अवेळी लोकांना छळू नकोस, जा!"

"पण भुकेला वेळेचं भान नसतं..."

"जा इथून! इथे माझ्याकडे काही नाही. मी स्वत:च इथे माझ्या गुरूच्या दयेवर राहतो."

"पण, काशी-रामेश्वरहून आलेल्या साधूला एखादं नाणं तू देऊ शकत नाहीस- चार चांगले शब्दही तू बोलू शकत नाहीस..."

"गप्प बस." मी ओरडलो- दाराकडे पाहूनच आणि पुन्हा मी माझ्या भैरवीत गुंतलो.

पंधरा मिनिटांनी दारावर पुन्हा टकटक झाली. आता मला राग आवरता आला नाही.

"तुला काही अक्कल आहे का? मला का त्रास देत आहेस?"

"तू बासरी मोठ्या भक्तिभावाने वाजवितो आहेस. मला आत घेणार नाहीस का? माझ्या पोटाला अन्न देऊ नकोस. ठीकय; पण तुझ्या संगीतापासून मला दूर ठेवू नकोस..."

माझी साधना चालू असताना कुणी समोर बसलेलं मला मुळीच आवडायचं नाही अन् असा सारखा सारखा व्यत्यय तर संतापजनक होता.

"तिथं उभा राहून वाद घालू नकोस. आता ताबडतोब निघाला नाहीस, तर दार उघडून धक्के मारून काढून देईल तुला."

"अरेरे... वाईट भाषा. तू मला काढून द्यायची गरज नाही. मी जातो; पण लक्षात ठेव, हा तुझा संगीत साधनेचा शेवटचा दिवस आहे. उद्या तुझी ही बासरी मूठभर खारकांच्या मोबदल्यात तुला द्यावी लागेल!"

त्याच्या खडावांचा आवाज पायऱ्यांवरून दूर गेलेला मी ऐकला. मी निश्चिंत झालो अन् दहा मिनिटांपर्यंत मी बासरी वाजविली; मग माझी मन:स्थिती विचलित झाली. त्या साधूची ती तशी भाषा... त्याला काय सांगायचं होतं? खुंटीवरचा कंदील काढून मी बाहेर पडलो. खालच्या पायरीवर उभं राहून मी कंदिलाच्या प्रकाशात दूरवर पाहिले - अंधारातल्या त्या रस्त्यावरून... मी आत परतलो. अशी धूसर आशा होती, की तो पुन्हा येईल; म्हणून मी दार अर्धवट उघडे ठेवले. कंदील अडकवून मी आता बसून राहिलो. भिंतीवरच्या देवांच्या तसबिरींकडे पाहून मी प्रार्थना केली, त्या शापवाणीपासून माझे संरक्षण करा... आणि मी पुन्हा माझ्या संगीत साधनेत हरवून गेलो.

...त्या नाजूक वेळूतून आता गाण्यामागून गाणी उमटू लागली आणि माझ्या एकांत अशा झोपडीचे वातावरण बदलले. या वेणुवादनामुळे मी आता मर्त्यजगातला रहिवासी राहिलो

नाही; देवांमध्ये मी जाऊन बसलो. भिंतीवरचा कंदील आता स्वर्गीय दरबारातला लखलखता तारा झाला होता... आणि मग 'पुनागा वराळी' रागातली ती नाग-धून मी घेतली, तिचे सूर छेडले. मला चक्क नागराज दिसू लागला... त्याच्या विषारी जिव्हा चमकू लागलेल्या... तो आता मला शंकराच्या मस्तकावर मुकुटासारखा दिसू लागला. पवित्र... पार्वतीने त्याचे कंकण केलेले, सुब्रमण्या त्याच्याशी खेळत असलेला आणि तो विष्णूचे आसन बनलेला... पाहता पाहता सगळे वातावरण त्या नागराजाच्या जरबेने अन् त्याच्या पवित्र अशा दर्शनाने भारावून गेले...

- आणि मी काय पाहावं! झोपडीचे दार आणि मी; यात होता एक काळा नागराज! त्याने आपला फणा काढलेला आणि त्याचा तो फूत्कार. मी बासरीवादन थांबविलं अन् झोपेत तर नाही याची खात्री करण्यासाठी डोळे चोळले; पण माझं संगीत थांबलं त्याच क्षणी नागराज पुढे झेपावला, माझ्याकडे पाहून त्याने फूत्कार सोडला. अशा तऱ्हेचा काळसर्प अन् एवढ्या लांबीचा- मी आयुष्यात कधी पाहिला नव्हता. माझ्या आतून जणू आवाज आला. वाजव-वाजव! थांबवू नकोस! मी ताबडतोब बासरी ओठाला लावली अन् ती धून चालू ठेवली. नागराज आता माझ्यापासून तीन यार्डांवर होता अन् फणा काढून त्याने आपले तीन चतुर्थांश शरीर उभे केले होते! दहाचा आकडा त्याच्या मस्तकावर... माझ्यावर त्याचे रोखलेले डोळे आणि विलक्षण स्तब्धतेने धून ऐकण्यात मग्न झालेला! वेटोळा घालून बसलेला, तो जणू काळ्या दगडात कोरल्याप्रमाणे स्तब्ध होता...

...आणि त्याच्यावर नजर ठेवूनच मी बासरीवादनात गुंतलो. त्या नागाचा रुबाब, तो आवेश पाहून मी प्रभावित झालो. तशाही स्थितीत मला वाटून गेले, अशा सर्पाला डोक्यावर घेण्याचा मोह सोडणे देवालाही शक्य नसावे... तीन वेळा ती धून मी वाजविली आणि मग नवी धून घेतली; पण नागाचा फणा झेपावला आणि अशा नजरेने त्याने पाहिले, जणू काही तो सांगतो आहे- ए, काय करतो आहेस? आणि एक फूत्कार सोडला. हालचालही केली. मी पटकन् पुन्हा नागधून सुरू केली आणि परत वेटोळा घालून तो स्तब्ध झाला...

... अशा प्रकारे ती धून मी सारखी वाजवीत राहिलो; पण ती कितीही अलौकिक धून असली, तरी दहाबारा वेळा सारखी वाजविल्याने आता मला थकवा येऊ लागला. मी ती धून बदलायचा पुन्हा एकदोन वेळा प्रयत्न करूनही पाहिला; पण नागराजाच्या दहशतीच्या हालचालीने मला खिळवून ठेवले. मी एकदोन वेळा जागेवरून उठायचा अन् पळायचा प्रयत्नसुद्धा करून पाहिला, तेव्हा तो आपल्या शेपटीवर जवळपास उभा राहून मला संपविण्याच्या तयारीतच आला होता आणि म्हणून मी तीच नागधून रात्रभर वाजवीत राहिलो. माझा हा भयंकर श्रोता निघून जायचं काही नावच घेईना. हळूहळू मला थकवा आला. चक्कर येऊ लागली. गाल दुखू लागले आणि सततच्या वाजविण्यामुळे- फुंकण्यामुळे माझी छाती रिकामी झाल्यासारखी वाटू लागली. श्वास संपल्यासारखे वाटू लागले. कोणत्याही क्षणी मी कोसळणार असे वाटू लागले. आता त्या नागाने मलाच वेटोळा घातला काय किंवा त्याचं सगळं जहर माझ्यात उतरवून टाकलं काय, त्याचं मला काही वाटेनासं झालं...

... हातातली बासरी फेकली अन् मी नागासमोर साष्टांग नमस्कार घातला; विनवणी करू

लागलो, ‘‘देवा नागराजा! ‘‘तू आता मला ठार कर; पण आता माझ्याने शक्य नाही...’’
जेव्हा मी डोळे उघडले, नागराज निघून गेला होता. खुंटीवरचा कंदील आता सकाळच्या उजेडात क्षीण वाटत होता. माझी बासरी दारात पडली होती.
दुसऱ्या दिवशी माझ्या गुरूला जेव्हा हा वृत्तांत मी सांगितला, तेव्हा गुरूने विचारले-
‘‘रात्रीच्या वेळेस ‘पुनागा वराळी’ धून वाजवायची नसते, हे तुला ठाऊक नव्हतं का? आणि आता, तू पुन्हा बासरी वाजविशील, तर तो नागराज पुन्हा येऊन तुला तीच धून वाजवायला लावणार नाही, हे कशावरून? तुझी आहे का तशी तयारी?’’
‘‘नाही, नाही, त्रिवार नाही!’’ मी ओरडलो. त्या धूनची आठवणसुद्धा क्लेशकारक होती. मरेपर्यंत ती धून मी वाजविली होती त्या वेळी; मरायचंच बाकी राहिलं होतं!
‘‘तसं असेल, तर ही तुझी बासरी बाजूला टाक अन् तुझं सगळं संगीत विसरून जा. सर्पांसोबत तू बासरी वाजवू शकणार नाहीस. तसं केलंस तर ते देवाशी खेळल्यासारखं होईल. फेकून दे ती वेळूची नळी! ती तुझ्या उपयोगाची नाही आता.’’
संगीताच्या त्यागाच्या विचाराने मला रडू आलं. माझ्या गुरूला माझी दया आली. गुरूने सांगितले, ‘‘कदाचित तुला तुझी संगीतसाधना परत मिळेलही; पण त्यासाठी रात्रीच्या त्या साधूला शोधून त्याच्याकडून उ:शाप घेशील तर... तू शोधशील का त्याला...’’
मी माझी बासरी बाजूला ठेवली. तेव्हापासून मी त्या अज्ञात साधूला शोधतो आहे. आताही तो भेटला, तर त्याच्या पायावर मी लोटांगण घालीन. क्षमायाचना करीन. त्याने क्षमा केली, तर मग माझी बासरी मी पुन्हा वाजवायला लागेन.

♦♦♦

# इंजिनचा वैताग

काही वर्षांपूर्वी आमच्या गावी मोठं प्रदर्शन घेऊन एक माणूस आला. (तो गोष्टीवेल्हाळ माणूस हकिकत सांगू लागला-) त्याच्या मालकीचा एक ग्रूप होता- जत्रा होती म्हणा ना! 'मौजेची दुनिया' असं त्या प्रदर्शनाचं एकच नाव होतं. त्यांच्या जाहिरातीचे बॅनर्स, रंगीत लाईट्स या सगळ्यांमुळे आमचं जिमखाना मैदान झगमगलेलं असायचं. यातल्या कार्यक्रमांसाठी सगळ्या जिल्ह्यातून आलेल्या माणसांची नुसती झुंबड उडायची. एका आठवड्यात केवळ प्रवेश शुल्कापायीच त्यांनी दररोज पाचशे रुपये कमविलेले होते. या मौजेच्या दुनियेत अनेक प्रकारच्या गमती, जुगाराचे खेळ, प्रदर्शन यांची रेलचेल होती. पोपटाच्या खेळापासून ते मोटारसायकलच्या चित्तथरारक खेळापर्यंत कोणताही खेळ आम्हाला प्रत्येकी केवळ दोन आण्यांना बघायला मिळायचा. याशिवाय तिथलं आणखी एक आकर्षण होतं - लॉटरीचं आणि नेमबाजीचं. तिथे एक आणा लावायचा अन् शंभर रुपयांपर्यंतच्या बक्षिसाची शक्यता अजमावयाची, बस!

त्या जत्रेतल्या एका कोपऱ्यातला तो कार्यक्रम विशेष लोकप्रिय झाला होता. इथे केवळ आठ आण्यांत तुम्हाला अनेक प्रकारच्या बक्षिसांची खैरात होती - टाचण्यांच्या कुशन्सपासून ते शिलाई मशिन्स, कॅमेरा; इतकेच काय चक्क रोड रोलरसुद्धा!

एका संध्याकाळी त्यांनी लॉटरीच्या सोडतीत क्र. 1005 चे तिकीट काढले, त्याचा अर्धा भाग माझ्याकडे होता अन् मला बक्षीस लागले होते! मी निकाल पाहतो तो काय - त्यांनी माझ्या नावे चक्क रोड इंजिन - रोड रोलर मंजूर केले होते! आता त्या बक्षिसांच्या यादीत त्या अजस्त्र यंत्राचा समावेश कसा काय केला होता त्यांनी, हे मला विचारू नका. ते माझ्या सांगण्याच्या पलीकडचे प्रकरण आहे.

मला धक्का बसला. लोक माझ्याभोवती गोळा झाले. एखाद्या विचित्र प्राण्याला पाहावे, तसे ते माझ्याकडे पाहू लागले. कुणाला रोड रोलरचे बक्षीस लागावे म्हणजे विचित्रच! एक दोघे आपसात बोलले, कुणी हसूही लागले.

घरी सहजासहजी घेऊन जाण्यासारखं ते बक्षीस नव्हतं. मी त्या मालकाला विचारलं, की बाबा, मला हे इंजिन घेऊन जायला मदत करशील का... त्याने नोटीस बोर्डावरच्या त्या अटींकडे माझे लक्ष वेधले : सर्व विजेत्यांनी आपापल्या बक्षिसाची वस्तू स्वत: आणि ताबडतोब घेऊन जावी; तथापि माझ्यासाठी त्यांनी थोडा अपवाद केला. हे इंजिन तिथेच - जिमखाना ग्राउंडवर हे सगळं प्रदर्शन (जत्रा) संपेपर्यंत - ठेवावे अन् त्यानंतर मी ते तिथून हलविण्याची व्यवस्था करावी. त्या मालकाला मी इंजिन ड्रायव्हरविषयी विचारले, तर तो हसला. म्हणाला, "ज्याने हे इंजिन येथे आणले त्या ड्रायव्हरला मला शंभर रुपये द्यावे लागले, वर पाच रुपये भत्ता! त्याला मग मी परत पाठविले आणि ठरवून टाकले, की जर का लॉटरीत हे कुणाला बक्षीस म्हणून लागले नाही, तर ते मी इथेच टाकून जाणार होतो. फार वैताग आला होता बुवा मला या इंजिनमुळे!"

"मी ते म्यूनिसिपाल्टीला विकू शकणार नाही का?" मी विचारले, अजाणतेपणाने. आणि तो खदखदून हसला. "या जत्रेचा मालक या नात्याने मला त्या म्युनिसिपाल्टीवाल्यांनी फार त्रास दिला आहे. त्यांच्यापासून मी चार हात दूरच राहतो..."

माझ्या या ''प्राप्ती'बद्दल माझे मित्र, आप्तेष्टांनी माझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला; पण कुणालाही नेमकेपणाने ते सांगता येईना, की हे इंजिन आणायचे कसे? प्रत्येकाला एवढंच वाटू लागलं, की मोठ्या किमतीची, भारीची वस्तू मला लाभलेली आहे. ''तू नुसतं हे भंगार म्हणून विकलेस तरी काही हजारांची मिळकत होईल तुला,'' माझ्या काही मित्रांनी सांगितले. जिमखाना ग्राउंडवर आता मी दररोज माझं इंजिन पाहण्यासाठी चक्कर मारू लागलो. मला आता ते फार आवडू लागलं होतं. त्या इंजिनाचे काही चकाकते पितळी भाग तर मला विशेष आवडू लागले. दररोज मी इंजिनापाशी घुटमळू लागलो, त्याला मोठ्या प्रेमाने थोपटू लागलो आणि रात्रीचे कार्यक्रम संपल्यावरच मग घरी परतू लागलो. मी तसा आर्थिकदृष्ट्या गरीबच होतो. मला वाटलं होतं, काही का होईना आता माझ्या विवंचना कमी झाल्या... पण मी किती अडाणी होतो! माझ्या विवंचना कशा सुरू झाल्या होत्या, त्याची मला खबर नव्हती!

जेव्हा ती सगळी जत्रा संपली, उठून निघून गेली तेव्हा मला म्युनिसिपाल्टीकडून एक पत्र आले; माझं रोड इंजिन सांभाळा म्हणून. दुसऱ्या दिवशी मी जाऊन पाहिले. सगळया रिकाम्या मैदानावर एखाद्या अनाथ मुलासारखे माझे इंजिन एकटे उभे होते. सगळीकडे फाटलेले बॅनर्स, पोस्टर्स, रंगीत कागदांचा सडा पडलेला. तो जत्रेचा मालक- हे इंजिन जिथे आहे तिथे सोडून निघून गेला होता. कुठेही सुरक्षित राहू शकणारं ते रोड रोलर.

त्याचं काय करावं हे न समजल्याने मीसुद्धा ते तसंच, तिथेच काही दिवस राहू दिलं; मग मला म्युनिसिपाल्टीकडून नोटीस आली. माझं हे इंजिन जिमखाना मैदानातून त्वरित हलवावं अन्यथा त्यासाठी तुम्हाला ग्राउंडचे भाडे भरावे लागेल, अशी सूचना त्यात होती. मी खोलवर विचार केला आणि मैदानाचे भाडे द्यायला तयार झालो आणि मी दरमहा दहा रुपयांनुसार तीन महिन्यांचे भाडे भरले. पहा साहेब, मी गरीब माणूस. मी ज्या घरात भाड्याने राहायचो त्याचे भाडेसुद्धा केवळ चार रुपये महिना होते आणि रोड इंजिनसाठी मात्र मला दहा रुपये भाडे द्यावे लागले, किती विचित्र नाही का? माझ्या पगारातला खर्च मला आवरता घ्यावा लागला. इतकेच काय, या भाडेखर्चापोटी मला माझ्या बायकोचे एकदोन दागिने गहाण ठेवावे लागले. या भयंकर मालमत्तेचं तुम्ही काय करणार असं माझी बायको सारखं विचारू लागली अन् माझ्याकडे तरी काही उत्तर नव्हतं. ते इंजिन विकण्यासाठी गावात मी सगळया फुटकळ विक्रेत्यांकडे फिरलो. काही जणांनी सुचविलं, की कॉस्मोपॉलिटन क्लबचे सेक्रेटरी कदाचित हे रोड इंजिन विकत घेतील. मी त्यांना भेटलो अन् विचारलं, तर ते हसू लागले. ''मी हे घेऊन काय करू?''

''मी तुम्हाला सवलतीच्या किमतीत देईन. तुम्हाला तुमच्या टेनिस ग्राउंडला दररोज रोलिंग करण्यासाठी याची आवश्यकता असेलच की'' मी असं म्हणालो, अन् त्या सेक्रेटरीला पुन्हा हसू यायच्या आधी मलाच माझ्या बोलण्यातला वेडेपणा लक्षात आला. पुन्हा कुणी मला म्युनिसिपाल्टीच्या अध्यक्षांना भेटायला सांगितले. म्युनिसिपाल्टीलासुद्धा रोड रोलरची गरज असतेच ना, ते खरेदी करतील. मनात मोठी धास्ती ठेवून मी म्युनिसिपाल्टीच्या कार्यालयात गेलो. कोटाची बटनं वगैरे व्यवस्थित लावून मी अध्यक्षांच्या चेंबरमध्ये प्रवेश केला आणि माझ्या व्यवहाराची कल्पना दिली. रोड इंजिन विक्रीसाठी फार मोठी सवलत देण्याच्या तयारीत मी होतो. त्यांच्यासमोर मी ताबडतोब

एक भाषणच केले - म्यूनिसिपाल्टीची कर्तव्ये, या अध्यक्षांची कारकीर्द आणि त्यांची धडाडी आणि अर्थात रोड रोलर खरेदीचं त्यांच्या दृष्टीनं महत्त्व... पण त्यांच्या भेटीत मला लागलीच कळून चुकलं, यांच्यापेक्षा एखाद्या लहान मुलाला रस्त्यावर खेळण्यासाठी म्हणून जर मी ते विकायला काढलं असतं, तर विक्रीची अधिक शक्यता आहे!

आता त्या जिमखाना मैदानाचं भाडं देता देता दिवाळं वाजायची वेळ आली. मला अगदी मनातून वाटू लागलं, एखाद्या दिवशी कुणी तरी यावं, एकरकमी व्यवहारात ही पिडा घेऊन जावी अन् माझ्या सगळया कर्जातून, विवंचनांतून माझी सुटका करावी! आता एका नव्याच संकटाची चाहूल लागली- या मैदानावर लवकरच एक पशुप्रदर्शन भरणार होतं. मला माझं इंजिन मैदानातून हलविण्यासाठी चोवीस तासांची मुदत देण्यात आली. प्रदर्शन एका आठवड्यात लागणार होतं; पण त्यांची माणसं येऊन इंजिनसाठी सारख्या सूचना देऊ लागली. मी निराश झालो. या रोड रोलरबद्दल काही - थोडी तरी माहिती आहे असा, एकही माणूस पन्नास मैलांच्या परिसरात नव्हता. मी जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येक बसच्या ड्रायव्हरला चक्क विनवण्या केल्या; पण परिणाम झाला नाही. इतकेच काय, मी रेल्वे स्टेशन मास्तरची भेट घेतली आणि मालगाडी ड्रायव्हरकडे माझ्यासाठी शब्द टाकावा अशी विनंती केली; पण त्या रेल्वे ड्रायव्हरने स्पष्ट केले, की तो वाफेच्या इंजिनाशी संबंधित आहे, असं कुणाच्याही सांगण्याने भलत्याच फंदात पडणं योग्य नाही. दरम्यान म्युनिसिपाल्टीवाले मागे लागले होतेच. मी विचार केला आणि एका स्थानिक देवस्थानाच्या पुजाऱ्याची सहानुभूती मिळविण्यात यशस्वीही झालो. देवस्थानाच्या हत्तीची मदत देण्यासाठी तो कबूल झाला. रोड इंजिनला मागनं ढकलण्यासाठी, मीसुद्धा पन्नास मजूर लावले; माझं सगळं उत्पन्न यात खलास झालं असेल याची तुम्हाला आता खात्री पटली असेलच. मजुरांना प्रत्येकी आठ आणे तर देवस्थानाच्या हत्तीसाठी मला सात रुपये मोजावे लागले; त्याशिवाय त्या हत्तीसाठी एकवेळचा आहार द्यावा लागला. माझी योजना अशी होती, की मैदानातून ते इंजिन बाहेर काढायचे आणि रस्त्याच्या बाजूला असलेल्या माझ्या मित्राच्या शेतात एक फर्लांगभर आत नेऊन ठेवायचे! तिथे ते इंजिन एकदोन महिन्यांसाठी ठेवायला त्याची काहीच हरकत नव्हती आणि त्या दरम्यान मद्रासला जाऊन मी त्यासाठी गिऱ्हाईक शोधणार होतो.

त्याशिवाय नोकरीतून बडतर्फ झालेला एक बस ड्रायव्हर - जोसेफ; त्याने मला सांगितले, की त्याला जरी रोड रोलरबद्दल काही माहिती नसली, तरी स्टिअरिंग व्हील सांभाळून थोडं नियंत्रण मिळविता येईल. त्यामुळे जोसेफलाही मी मदतीला घेतले.

ते एक छान असे दृश्य होते : देवस्थानाच्या हत्तीला इंजिनशी दोरखंडाने बांधण्यात आले. मागनं पन्नास माणसं ढकलायला उभी असलेली आणि माझा मित्र, जोसेफ स्टिअर्ग सांभाळीत बसलेला, मोठा जमाव भोवती जमलेला, मोठ्या उत्साहाने पाहत असलेला... इंजिनने हलायला सुरवात केली, तो क्षण माझ्या आयुष्यातला फार मोलाचा असा क्षण होता. जेव्हा ते इंजिन जिमखाना मैदानातून बाहेर येऊन रस्त्यावर आले, तेव्हा ते विचित्र वागायला लागले. झोकांडी खायची, वाकडंतिकडं चालायची त्याची तऱ्हा होऊ लागली. हत्ती त्याला एका दिशेने ओढू लागला आणि तो कुठे चाललाय याची तमा न बाळगता जोसेफ स्टिअरिंग व्हील जीव खाऊन फिरवू लागला आणि ती पन्नास माणसं इंजिनच्या

मागे कशाही तऱ्हेने झटू लागली आणि त्यांना जिकडे वाटले तिकडे ढकलू लागली. अशा गोंधळलेल्या ओढाओढीच्या प्रयत्नांचा परिणाम असा झाला, की ते रोड इंजिन सरळ धावत गेलं; ते समोरच्या एका कंपाउंड वॉलला धडकलं. कंपाउंड वॉलच्या बऱ्याचशा भागाचा चुराच करून टाकला त्या इंजिनने! सगळ्या जमावाने मोठ्या हर्षाने आरडाओरडा केला. हत्तीला जमावाचं असं वागणं आवडलं नाही. त्याने मोठ्याने चीत्कार केला. दोरखंड ओढून ते तोडून टाकले आणि त्या कंपाउंड वॉलला धडक देऊन आणखी एक हिस्सा पाडून टाकला. पन्नास मजुरांनी भीतीने पळ काढला. जमावात एकच गोंधळ उडाला. कुणीतरी मला थप्पड मारली - त्या कंपाउंड वॉलचा तो मालक होता. मग पोलिसांचा इथे प्रवेश झाला अन् त्यांनी मला ठाण्यात नेले.

जेव्हा मी पोलिस ठाण्याच्या लॉकअपमधून सुटलो, तेव्हा बाहेर माझी वाट पाहणाऱ्या; आता उद्भवलेल्या समस्या अशा होत्या :

1. कितीतरी यार्डांची कंपाउंड वॉल मला बांधून द्यायची होती.
2. पळून गेलेल्या मजुरांची मजुरी. (खरं म्हणजे काम अर्धवट टाकून दिल्याने त्यांना मजुरी कशी देय होईल, हे काही त्यांना सांगता येणार नव्हते.)
3. भिंतीवर इंजिन चालवून नेल्याबद्दल जोसेफची फी.
4. भिंतीला लाथ मारताना हत्तीच्या गुडघ्याला जखम झाल्याबद्दल त्याच्या औषधपाण्याचा खर्च. (इथेसुद्धा मी स्पष्ट केलेल्या मुद्द्याकडे - मी काही हत्तीला भिंत पाडण्यासाठी ठरविलेले नव्हते - देवस्थानाच्या लोकांनी दुर्लक्ष केले असते.)
5. आणि शेवटी, तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे, रोड इंजिन आता ज्या स्थितीत, जिथे आहे तिथून ताबडतोब हलविण्याची मागणी.

मी फार गरीब माणूस होतो साहेब - माझ्याकडे खरंच, एवढी बिलं देण्याएवढी रक्कम कुठून येणार? जेव्हा मी घरी पोहोचलो, तेव्हा बायकोने विचारले, ‘‘जो तो मला सांगत आहे, काय झालं नेमकं?’’ मला एक प्रकारची संधी मिळाली; माझ्या सर्व अडचणी तिला मी सविस्तर सांगितल्या; पण ते ऐकून तिला वाटले, की मी आता आणखी दागिन्यांची मागणी करणार. तिला राग आवरला नाही आणि तिला माहेरी घेऊन जाण्यासाठी वडिलांना पत्र लिहायचा इरादा तिने ओरडून स्पष्ट केला.

आता माझी मती कुंठित झाली. रस्त्यात कुणी भेटलं, की ते माझ्याकडे पाहून हसायचे. मला आता प्रकर्षानं वाटू लागलं, की आपल्या गावाकडे पळून जावं. मी माझ्या बायकोला सांगायचं ठरविलं, की तुझ्या बाबांना पत्र टाक अन् माहेरी जा. माझी योजना काय आहे याचा मी कुणाला पत्ता लागू देणार नव्हतो. माझ्या कर्जदारांना तसंच सोडून मी एका रात्री निघूनच जाणार होतो, कुठेतरी.

अशा वेळी स्वामीजांच्या रूपाने एकदम अनपेक्षित असा सुखद धक्का मला बसला. आमच्या म्युनिसिपाल्टीच्या अध्यक्षांच्या आश्रयाने एका सुरेख सायंकाळी आमच्या टाऊन हॉलमध्ये एक कार्यक्रम ठेवण्यात आला. सर्वांना मोफत प्रवेश असलेल्या या कार्यक्रमाला लोकांची प्रचंड गर्दी झाली होती. मी गॅलरीत बसलो होतो. स्वामीजींच्या यौगिक सामर्थ्याचे प्रयोग पाहून आम्ही दिपून गेलो. काचेच्या भांड्याचे तुकडे करून, त्यांनी मोठ्या निश्चिंतीने चावून खाल्ले, काटेरी शय्येवर त्यांनी निजून दाखवले, सगळ्या प्रकारच्या अॅसिड्सच्या

गुळण्या भरून दाखविल्या; गिळूनही दाखविले. तप्त लोखंडी कांबी वाकवून दाखविली, अणकुचीदार खिळे चावून खाल्ले, हृदयाची गती थांबवून दाखविली, स्वत:ला जमिनीत गाडूनही घेतले. ते सगळं पाहताना आम्ही अगदी दंग होऊन गेलो. शेवटी त्यांनी उठून सर्वांना एक प्रवचन दिले. आपल्या गुरूचा संदेश अशा पद्धतीने सांगण्याच्या त्यांच्या या उपक्रमाबद्दल सांगितले. त्यांचे हे सगळे प्रयोग फार महत्त्वाचे होते, कारण त्यांतून त्यांना काहीही मिळवायचे नव्हते. मानवजातीची सेवा हेच त्यांचे खरे समाधान होते आणि सर्वांत शेवटी त्यांनी आपल्या 'मास्टर पीस' अशा प्रयोगाची तयारी केली. म्युनिसिपाल्टीच्या अध्यक्षांकडे वळून स्वामीजींनी विचारले - "तुमच्याकडे रोड इंजिन आहे नं! मला ते माझ्या छातीवरून चालवून दाखवायचे आहे!" अध्यक्ष ओशाळले आणि असं इंजिन नसल्याबद्दल त्यांना विलक्षण शरम वाटल्याचे दिसू लागले; पण स्वामीजींनी आग्रह धरला, "मला हे इंजिन पाहिजेच आहे!"
म्युनिसिपाल्टीच्या अध्यक्षांनी एक सबब पुढे केली - "आमच्याकडे त्याचा ड्रायव्हर नाही..."
"काही हरकत नाही. माझे शिष्य आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचं इंजिन चालवायला येतं!"
- आणि त्याच वेळी मी गॅलरीत उभं राहून आवाज दिला- "त्यांना काही विचारू नका, मला विचारा!" काही क्षणांतच मी स्टेजवर होतो आणि जसा काही अग्निभक्षण करणारा मी स्वत:च आहे, अशा तोऱ्यात उभा होतो. सगळ्या सभागृहातून माझ्याकडे ज्या उन्मादाने- आदराने पाहिले गेले; त्यामुळे मला हर्ष झाला. म्युनिसिपल अध्यक्ष जणू फिके पडले.
मी इंजिन उपलब्ध करून दिलं, त्याच्या मोबदल्यात आता, ते मला वाटेल तिथे ते इंजिन पोचवून द्यायला तयार झाले आणि जरी मी मोबदला द्यायची तयारी दर्शविली, तरी मला लक्षात आलं, की धर्मार्थ काम करणाऱ्यांकडे असं काही बोलणं गैरजरुरी असतं.
लवकरच सगळा जमाव जिमखाना मैदानासमोरच्या कंपाउंड वॉलपाशी आला. स्वामींचा शिष्य इंजिन चालविण्यात निष्णात असा होता. थोड्याच वेळात माझे रोड इंजिन वाफ सोडून मोठ्या दिमाखात तयार झाले. स्वामीजींनी दोन उशा मागविल्या. एक डोक्याजवळ तर एक पायावर ठेवून हे इंजिन त्यांच्यावरून कसं जाणार आहे याची तपशीलवार माहिती त्यांनी दिली. त्यांनी स्वत:च्या छातीवर खडूच्या खुणाही केल्या. "ते याच खुणांवरून जाणार. एका इंचानेही इकडे तिकडे होणार नाही."
इंजिनने आवाज काढला अन् ते निघायची वाट पाहू लागले. सगळ्या जमावाचा उत्साह अन् आनंद अचानकच मावळला. खिन्नता पसरली. काहीतरी अघटित होणार असं वाटू लागलं. स्वामी उशा घेऊन त्यावर निजले आणि त्यांनी आदेश दिला, "मी जेव्हा ओम म्हणेन, तेव्हा चालू कर इंजिन!" त्यांनी डोळे झाकले. जमावात तणाव पसरला. मीमात्र सगळ्या प्रयोगाकडे मोठ्या उत्साहाने पाहू लागलो; शेवटी माझं रोड इंजिन आता जागेवरून हलणार होतं.
याच वेळी जमावात एक पोलिस इन्स्पेक्टर घुसला. त्याच्या हातात खाकी रंगाचा लिफाफा होता. त्याने हात उंचावून स्वामीजींच्या शिष्याकडे खूण केली, आणि म्हणाला,

''सॉरी, तुम्हाला हे काही करता येणार नाही. मॅजिस्ट्रेट साहेबांनी, हे इंजिन त्यांच्या शरीरावरून घालवायला मज्जाव केला आहे.'' स्वामीजी उठले. सगळीकडे गोंधळ गडबड होऊ लागली. स्वामीजी रागात ओरडले ''मी आजवर शंभर ठिकाणी असे प्रयोग केले आहेत, कुणीही मला असं विचारलं नाही - मला जे आवडतं, ते करण्यापासून मला कुणीही थांबवू शकत नाही. देशातल्या नागरिकांना योगसामर्थ्य काय असतं, ते दाखविण्याचे माझ्या गुरूंचे आदेश आहेत अन् तुम्ही कोण मला विचारणारे?''

''पण मॅजिस्ट्रेट विचारू शकतो'' पोलिस इन्स्पेक्टर म्हणाला आणि त्याने ऑर्डर दाखविली.

''अशा तऱ्हेने कामात व्यत्यय आणण्याचा तुम्हाला अन् त्यांना काय अधिकार आहे?''

''मला ते काही माहीत नाही. ही ऑर्डर आहे. त्यांनी तुम्हाला काहीही करण्याची मुभा दिलेली आहे, फक्त पोटॅशिअम सायनाईड खाणं अन् हे इंजिन छातीवरून चालवायचं, या दोन कृतींचा अपवाद आहे. या न्यायालयीन कार्यक्षेत्राबाहेर जाऊन मात्र तुम्ही काहीही करू शकता.''

''ही शापित भूमी सोडून मी आताच निघून जात आहे'' स्वामीजी मोठ्या क्रोधाने म्हणाले आणि आपल्या शिष्याला घेऊन निघालेसुद्धा. मी पटकन त्या शिष्याचे दंड धरले आणि म्हणालो, ''तुम्ही ते चालू केलंच आहे, तर त्या शेतापर्यंत घेऊन चला नं आता! मग तुम्ही जा!'' त्याने माझ्याकडे तीव्र कटाक्ष टाकून माझे हात झटकले - ''माझे गुरू एवढे नाराज झालेले असताना, हे इंजिन चालवावं असं म्हणायची हिंमतच कशी करू शकता?'' तो पुटपुटला. तो निघून गेला. ''त्यांच्या छातीशिवाय तुम्हाला ते चालविताही येत नसेल!'' मीपण पुटपुटलो.

आता हे रोड इंजिन अन् त्या निमित्ताने आलेल्या सगळया अडचणी अशाच इथेच टाकून एकदोन दिवसांत हे गाव सोडून जाण्याची मी तयारी केली. तथापि, निसर्गच आता एकदम अनपेक्षित अशा तऱ्हेने माझ्या मदतीला धावून आला. उत्तर भारतात आलेल्या त्या प्रलयंकारी भूकंपाबद्दल तुम्ही ऐकलं असेलच. त्याचा परिणाम आमच्याही गावावर झाला. त्या रात्री आम्ही आमच्या अंथरुणावरून चक्क फेकले गेलो, दारे-खिडक्या खडखडू लागल्या. दुसऱ्या दिवशी माझ्या रोड इंजिनकडे अखेरचं पाहून घ्यावं म्हणून मी गावात चक्कर मारली आणि माझा माझ्या डोळयांवर विश्वास बसेना! माझे रोड इंजिन जागेवर नव्हते. मी मोठ्याने आरडाओरडा केला. लोकांनी शोधाशोध केली. जवळच्याच एका पडीत विहिरीत हे रोड इंजिन पडलेले दिसले. 'आता या नवीन संकटातून मला वाचव' अशी प्रार्थना मी देवाला करू लागलो; पण त्या घराचा मालक काय घडले ते पाहायला जेव्हा आला, तेव्हा खूष होऊन गेला! हसत हसत त्याने माझे आभार मानले : ''वा! तुम्ही माझं मोठं काम केलं बुवा! अत्यंत गलीच्छ सांडपाण्याने भरलेली माझी ही विहीर होती. म्युनिसिपाल्टी मला दर आठवड्याला नोटिसा पाठवीत होती, ती बुजवून टाका म्हणून. विहीर बुजविण्याच्या खर्चाने मला धास्ती बसली होती; पण तुमचं हे इंजिन बाटलीला बूच बसावं तसं गच्च बसून गेलं बघा विहिरीला, वा! आता हे असंच राहू द्या.''

''पण, पण...''

''आता पण नको अन् काही नको. मी तुमच्याविरुद्ध केलेल्या सगळया तक्रारी आणि आरोप मागे घेतो, - ती पडलेली कंपाउंड वॉल मी बांधून टाकतो. पण ते इंजिन राहू द्या बुवा

तिथंच.''
''ते झालंच म्हणा, पण...'' असं म्हणून त्या इंजिनमुळे झालेल्या माझ्या इतर खर्चाचा तपशील मी सांगितला. त्यांनी तो सगळा खर्च द्यायचा कबूल केला.
काही महिन्यांनी मी जेव्हा त्या रस्त्याने गेलो, तेव्हा मी चोरट्या नजरेने त्या भिंतीवरून पाहिले...
विहिरीचे तोंड सिमेंटने व्यवस्थित बंद करून टाकलेले होते. सुटकेच्या भावनेने मला उचंबळून आले...

♦♦♦

# महिना पंचेचाळीस रुपये

शांता तिच्या वर्गात अधिक वेळ थांबू शकली नाही. तिने मातीच्या बाहुल्या करून दाखविल्या. संगीत कवायत आणि थोडी उजळणी हे पण केलं आणि आता ती रंगीत कागदाच्या आकृत्या कापून दाखवीत होती. हे तिचं कात्री-काम शाळेची घंटा होईपर्यंत चालणार होतं अन् मग टीचर म्हणणार होती - ‘‘आता तुम्ही घरी जाऊ शकता’’ किंवा ‘‘हां, आता तुमच्या कात्र्या बाजूला ठेवा आणि बाराखडी घ्या लिहायला.’’ किती वाजले ते पाहण्यासाठी शांता उतावीळ झाली होती. शेजारच्या मैत्रिणीला तिने विचारले, ‘‘पाच वाजले का गं?’’

‘‘हो वाटतं’’ तिने उत्तर दिले.

‘‘की सहा वाजले?’’

‘‘नसतील’’ मैत्रीण म्हणाली- ‘‘कारण सहा वाजले, की रात्र नाही का होणार?’’

‘‘मग पाच वाजले असतील का?’’

‘‘हो.’’

‘‘अरे बापरे, मग मला जायलाच पाहिजे. माझे बाबा घरी येतीलच आता. त्यांनी मला पाच वाजता तयार राहायला सांगितलंय. आज बाबा मला सिनेमाला घेऊन जाणार आहेत. मला घरी जायचंय.’’ शांताने कात्री टाकून दिली अन् ती टीचरकडे घाईने आली.

‘‘मॅडम, मला घरी जायचंय’’

‘‘का बरं, शांताबाई?’’

‘‘कारण- पाच वाजले आहेत!’’

‘‘कुणी सांगितलं तुला, पाच वाजलेत म्हणून?’’

‘‘कमलाने!’’

‘पाच नाही वाजले अजून.’ आता- तुला घड्याळ दिसतं का, ते पहा. सांग बरं मला, किती वाजले ते. घड्याळ कसं पाहायचं हे शिकविलंय ना मी तुम्हाला एकदा?’’

हॉलमधल्या घड्याळाकडे पाहत शांता उभी राहिली. मोठ्या कष्टाने तिने आकडे मोजले अन् म्हणाली, ‘‘नऊ वाजलेत आत्ता.’’ टीचरने दुसऱ्या मुलींना बोलावले आणि विचारले, ‘‘घड्याळ पाहून मला कोण सांगेल बरं वेळ?’’ बऱ्याच जणींनी शांताचीच री ओढली आणि त्यांनीही सांगितले, ‘‘नऊ वाजले.’’ मग टीचरने सांगितले, ‘‘तुम्ही फक्त मोठा काटा पाहून सांगत आहात. लहान काटा कुठे आहे सांगा बरं?’’

‘‘दोनच्या पुढे.’’

‘‘मग किती वाजले सांगा बरं?’’

‘‘दोन वाजून अर्धा तास.’’

‘‘नाही, दोन वाजून पंचेचाळीस मिनिटे. समजलं? चला, आता सगळया जणी बसा जागेवर.’’

दहा मिनिटांतच शांता टीचरकडे परत आली आणि तिने विचारले, ‘‘पाच वाजले का मॅडम? कारण मला पाचला तयार व्हायचं आहे. नाहीतर माझे बाबा माझ्यावर फार रागावतील, त्यांनी सांगितलंय, की घरी लवकर ये म्हणून.’’

''केव्हा यायला सांगितलंय त्यांनी?''
''आता!'' टीचरने तिला परवानगी दिली. शांताने दप्तर उचलले आणि आनंदाने ओरडतच ती वर्गाबाहेर पडली. ती घरी धावत आली, तिने जमिनीवर तिची पुस्तकं फेकली अन् मोठ्याने हाक मारली, ''आई, आई!'' आणि शेजारी गप्पा मारायला गेलेली तिची आई घाई घाईतच आली.
''तू एवढ्या लवकर का आलीस?'' आईने विचारले.
''बाबा घरी आले का?'' शांताने विचारले. तिला आता कॉफी नको होती, खाऊ नको होता. तिचा आग्रह एकच होता- तिला तयार करण्याचा. तिने ट्रंक उघडून पातळ मलमलचा तोकडा फ्रॉक घालण्याचा आग्रह धरला, तर आईला वाटू लागले, तिने मोठा स्कर्ट अन् जाडसर ब्लाऊज आता संध्याकाळसाठी घालावा.
एका खोक्यातून तिने भडक रंगाची रिबिन काढली. या खोक्यात शांता ठेवायची ते पेन्सिल, खडूचे तुकडे, रिबिनी... मग आईचा अन् शांताचा, ड्रेसवरून बराच वाद झाला अन् आईला हार खावी लागली. शांताने तिच्या आवडीचा गुलाबी फ्रॉक घातला. केस विंचरले, वेणीच्या शेपटीला छान हिरवी रिबिन बांधली. पावडर लावले. कपाळावर छान तांबडे गंधही लावले. ती म्हणाली, ''आता बाबा म्हणतील, काय छान पोरगी आहे ही! कारण मी तयार झाले नं अन् तूसुद्धा येणार आहेस नं?''
''आज नाही.''
घराच्या छोट्या गेटमधून गल्लीच्या रस्त्याकडे शांता पाहू लागली. आईने सांगितले, ''बाबा पाच वाजल्याशिवाय येणार नाहीत. उन्हात उभं राहू नको, आता फक्त चार वाजले आहेत.''
गल्लीतल्या समोरच्या घरामागे आता सूर्य लपत होता आणि शांताला वाटू लागले, आता रात्र होणार. ती घरात धावत आली अन् तिने आईला विचारले, ''अजून बाबा कसे आले नाहीत गं आई?''
''मला काय माहीत! ऑफिसमध्ये त्यांना थांबावं लागलं असेल.''
शांताने तोंड वाकडे करून म्हटले, ''मला ऑफिसचे लोक बिलकूल आवडत नाहीत. ते वाईट आहेत सगळे.''
शांता पुन्हा गेटकडे गेली अन् बाहेर पाहू लागली. तिची आई घरातून ओरडली, ''आत ये शांता! आता अंधार पडलाय, तिथे थांबू नकोस.''
पण शांता आत जाणार नव्हती. ती गेटमध्येच उभी राहिली आणि एक भलतीच कल्पना तिच्या मनात आली- आपण ऑफिसमध्येच जाऊन बाबांना घेऊन यावे अन् सिनेमाला घेऊन जावे; काय हरकत आहे! हे ऑफिस कुठे आहे, हा प्रश्न तिला पडला. तिला त्याची कल्पना नव्हती. तिने एवढेच पाहिले होते, की तिचे बाबा दररोज गल्लीच्या त्या टोकापासून वळतात अन् ऑफिसला जातात. जर कुणी त्या तिथून वळला, तर सरळ बाबांच्या ऑफिसला जाईल की! आई समोर आहे का, ते शांताने पाहिले. ती नसल्याचे पाहून शांता बाहेर पडली अन् गल्लीच्या रस्त्याने निघाली.
संध्याकाळची वेळ होती. रस्त्यावरचा प्रत्येक जण कसा राक्षसासारखा प्रचंड वाटू लागला. घराच्या भिंती उंचच उंच वाटू लागल्या अन् सायकली, गाड्या रस्त्याने अशा धावत

होत्या, की अंगावर येत आहेत असे वाटावे. रस्त्याच्या अगदी एका कडेने ती चालू लागली. लवकरच दिवे लागले अन् बाजूने जाणारी माणसं सावलीसारखी दिसू लागली. शांता दोन ठिकाणी वळली अन् आता तिला कळेना झाले, की आपण कुठे आहोत? रडवेली होऊन शांता आता रस्त्याच्या कडेला बसली. आता घरी कसे जावे, याची काळजी तिला पडली. शेजारच्या घरातला एक नोकर तिकडून जात होता, त्याला पाहिलं अन् शांता उठून स्वत: त्याच्यासमोर जाऊन उभी राहिली. ‘‘अरे! तू इथे एकटी काय करते आहेस?’’ त्याने विचारले. शांता म्हणाली, ‘‘मला माहीत नाही. मी इथं आले. आमच्या घरी मला तुम्ही घेऊन जाता का?’’ ती त्याच्यासोबत निघाली आणि लवकरच घरी परतली.

शांताचा पिता, वेंकट राव जेव्हा सकाळी ऑफिसला जायला निघाला, तेव्हा गल्लीतून सिनेमाची हॅन्डबिले वाटणारा टांगा गेला होता. शांता पळाली होती अन् तिने एक हॅन्डबिल उचलून आणले होते. बाबांना ते दाखवून तिने विचारले होते, ‘‘बाबा, आज तुम्ही मला सिनेमाला घेऊन चला ना!’’ तिच्या बोलण्यावर रावला मोठे वाईट वाटले. आपली ही पोरगी- तिला कसल्याच प्रकारच्या सुविधा मिळत नाहीत... साध्या साध्या बाबींनाही ती मुकली आहे बिचारी. आतापर्यंत केवळ एकदोन वेळा रावने तिला सिनेमाला नेले होते. त्या मुलीसाठी रावला सवडच नव्हती. त्याच्या उलट शांताच्या वयाच्या इतर मुलींना बाहुल्या, कपडे मिळायचे, पाहिजे तेव्हा त्यांचे आईवडील त्यांना बाहेर घेऊन जायचे. आपली पोरगीमात्र एखाद्या अडाणी-खेडवळ मुलासारखी एकटीच राहते. रावला आपल्या ऑफिसची चीड आली. चाळीस रुपये पगाराच्या मोबदल्यात जणू ऑफिसने त्याला विकतच घेऊन टाकले आहे.

बायकोकडे आणि मुलीकडे आपल्याकडून दुर्लक्ष होत आहे याबद्दल रावला स्वत:चा तिरस्कार वाटू लागला. बायकोला तरी तिच्या मैत्रिणी आहेत. शिवाय ती मोठी आहे. मोठ्या माणसांचं तेवढं काही वाटत नाही; पण लहान मुलीचं काय? किती नीरस, कंटाळवाणं जिणं आहे तिचं! दररोज रावला ऑफिसमध्ये संध्याकाळी सात-आठ वाजेपर्यंत थांबावं लागायचं आणि घरी येईपर्यंत पोरगी झोपून गेलेली असायची. रविवारीसुद्धा ऑफिसला जावं लागायचं. आपल्यालाही खासगी आयुष्य आहे, वैयक्तिक सुखदु:ख आहे, असं त्यांना का वाटत नाही? मुलीला पार्कमध्ये किंवा सिनेमाला घेऊन जाण्यासाठी रावला या ऑफिसमुळे क्वचित संधी मिळाली होती. आता आपण काही त्यांच्या हातचं बाहुलं नाही हे राव दाखवून देणार होता. होय, रावने आता ठरविले, की गरज पडली तर तो मॅनेजरशी भांडेलसुद्धा.

म्हणून रावने शांताला खात्री देऊन सांगितले, ‘‘तुला मी संध्याकाळी सिनेमाला घेऊन जाणार आहे. संध्याकाळी पाचला तयार राहा.’’

‘‘खरंच? आईऽऽ’’ शांता ओरडली. आई स्वयंपाकघरातून बाहेर आली.

‘‘बाबा मला संध्याकाळी सिनेमाला घेऊन जाणार आहेत!’’

शांताची आई कुत्सितपणे हसली -

‘‘पोरीला असे चूकीचे आश्वासन देऊ नका.’’ वेंकट रावने रागाने तिच्याकडे पाहिले. ‘‘काही मुर्खासारखं बोलू नकोस. तुला वाटतं, की जगात फक्त तूच केवळ शब्द पाळणारी आहेस!’’ तो शांताला म्हणाला- ‘‘पाचला तयार रहा. मी येईन आणि तुला नक्की घेऊन

जाईन आणि जर का त्या वेळी तू तयार नसशील तर पहा बरं - मी रागावेन!''
एका निश्चयानेच राव ऑफिसला गेला. नेहमीची कामं करून तो पाचच्या ठोक्याला बाहेर पडणार होता. जर त्यांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने अडथळे आणायला सुरवात केली, तर तो मॅनेजर साहेबांना भेटून सांगणार होता,
''हा घ्या माझा राजीनामा! इथल्या भयंकर कागदपत्रांपेक्षा मला माझ्या मुलीचा आनंद अधिक महत्त्वाचा आहे!''
दिवसभर नेहमीच्या कामाचा ओघ टेबलवर येत राहिला, जात राहिला. पत्रव्यवहार तपासणे, सह्या करणे, मजकूर लिहिणे... दरम्यान, नेहमीप्रमाणे त्याच्या कामात सुधारणा करण्यात आल्या, त्याची खरडपट्टीसुद्धा झाली, अपमानितही व्हावे लागले. दुपारच्या वेळेस कॉफीसाठी केवळ पांच मिनिटांची सुटी त्याला मिळाली.
जेव्हा ऑफिसच्या घड्याळात पाचाचे ठोके पडले अन् इतर कारकून मंडळी निघू लागली, तेव्हा वेंकटराव मॅनेजर साहेबांकडे गेला आणि त्याने विचारले,
''मी जाऊ का सर?'' मॅनेजरने हातातल्या कागदांतून वर नजर केली ''तू? ऑफिसचा कॅशियर आणि अकाउंटच्या माणसाने पाच वाजता काम बंद करावे म्हणजे अशक्य बाब! तुला जाणं कसं शक्य आहे? मला काही तातडीचे खासगी काम आहे सर...'' तो म्हणाला. सकाळपासून मनात घोकून ठेवलेलं वाक्य त्याने दाबून ठेवले- हा घ्या माझा राजीनामा! घराच्या गेटपाशी शांता उभी असल्याचं त्याला दिसू लागलं - नवा फ्रॉक घालून, अस्वस्थ होऊन वाट पाहणारी.
''ऑफिसच्या कामापेक्षा महत्त्वाचं असं काहीच नसतं. जा, जागेवर बस. मी किती वेळ काम करतो, ते तुला ठाऊक आहे का?'' साहेबांनी विचारले. साहेब दररोज सकाळी तीन तास आधीच यायचे अन् ऑफिस सुटल्यावरही तीन तासापर्यंत काम करायचे; रविवारीसुद्धा. ऑफिसमधली मंडळी आपसात बोलायची, त्याची बायको, तो घरी समोर दिसला, की संतापत असेल. कजाग बायकोपासून सुटका मिळावी म्हणून या म्हाताऱ्या घुबडाला ऑफिसच बरं वाटत असेल...''
''तो आठ-दहाचा फरक शोधून काढलास का?'' साहेबांनी विचारले.
''त्याच्यासाठी मला दोनशे व्हाउचर्स तपासावे लागणार आहेत सर,
मला वाटलं, ते उद्या तपासू...''
''नाही, ते चालणार नाही. तुला ते ताबडतोब तपासून सर्टिफाय करावे लागेल!''
वेंकट राव पुटपुटला, ''ठीकय् सर...'' आणि आपल्या खुर्चीत त्याने स्वत:ला झोकून दिले.
घड्याळात 5:30 झाले होते. आता इथनं दोन तास त्या तापदायक व्हाऊचर्सच्या तपासणीत गुंतून जाणे हा त्याचा अर्थ. सगळं ऑफिस रिकामं झालं होतं. तो आणि आणखी एक कारकून कामात गुंतून होते आणि अर्थातच त्यांच्यासोबत केबिनमध्ये बसलेले मॅनेजर साहेब. वेंकट राव चिडला. त्याच्या मनाने उचल खाल्ली. तो काही गुलाम नव्हता- स्वत:ला चाळीस रुपयांना सगळा विकला गेलेला. एवढे पैसे कुठेही सहज कमविता येतील आणि जर का ते शक्य नसले, तर त्यापेक्षा उपासमारीने मरून जाणे केव्हाही चांगले!
रावने कागद घेतला आणि लिहिले - 'मी माझा राजीनामा सादर करीत आहे. जर चाळीस रुपड्यांवर माझे शरीर अन् आत्मा आपण विकत घेतला, असे तुम्हाला वाटत असेल, तर ती

तुमची चूक आहे. तुम्ही मला वर्षोन्वर्ष चाळीस रुपड्यांवर गुलामासारखे राबवीत आहात, त्यापेक्षा मला असं वाटतं, की मी आणि माझे कुटुंबीय उपासमारीने मरून गेलेलं बरं राहील! मला एखादं इन्क्रिमेंट देण्याचीसुद्धा तुमच्याकडे माणुसकी नाही. तुम्ही प्रत्येक वेळी स्वत:ला मोठी वाढ मंजूर करून घेता आणि एखाद्या वेळीसुद्धा माझ्याबद्दल तुम्ही विचार नाही करीत. आता ते काही असो, आता मला त्यात रुची राहिली नाही. माझा आता हा राजीनामा. मी आणि माझे कुटुंबीय - उपासमारीने आम्ही मेलो, तर आमची भुतं होऊन तुम्हाला आयुष्यभर झपाटून टाकतील.'

त्याने पत्राची घडी केली. पाकिटात टाकले. चिकटवून त्यावर साहेबांचा तपशील लिहिला. खुर्चीतून उठून तो साहेबांसमोर आला. पाकीट पुढे केले. साहेबांनी यांत्रिकपणे ते पाकीट घेतले अन् ते पॅडमध्ये ठेवले.

"वेंकट राव," साहेब सांगू लागले, "मला खात्री आहे, ही बातमी ऐकली की तू खूष होणार - मोठ्या साहेबांनी आजच इन्क्रिमेंटबद्दल चर्चा केली आणि मी तुझ्या नावाची शिफारस केली आहे! पाच रुपयांचे इन्क्रिमेंट. अद्याप आदेश निघाले नाहीत. तू ही बातमी तूर्त तुझ्याजवळ ठेव. कुणाला सांगू नको."

वेंकट रावाने हात पुढे करून पॅडमधून ते पाकीट काढून घेतले.

"ते कोणते पत्र आहे?"

"मी किरकोळ रजेसाठी अर्ज केलेला आहे सर. पण मला वाटतं..."

"किमान पंधरवड्यासाठी तरी आता तुला कसलीही रजा मिळणार नाही."

"होय. मला त्याची कल्पना आहे सर. त्याच्यामुळेच मी हा अर्ज मागे घेतो आहे सर."

"छान. ती चूक तू शोधलीस का?"

"मी व्हाऊचर्स तपासतो आहे सर. तासाभरात शोधेन मी."

राव घरी पोहोचला, तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. शांता केव्हाच झोपून गेली होती. तिची आई म्हणाली, "तुम्ही कोणत्याही क्षणी याल, म्हणून तिने फ्रॉकही बदलला नाही. पोटभर जेवलीसुद्धा नाही. इतकंच काय, फ्रॉक खराब होईल अशा भीतीने ती कुठे बसलीही नाही..."

आपली मुलगी त्याच गुलाबी फ्रॉकवर तशीच झोपून राहिलेली - केस विंचरलेले, पावडर लावलेले, निघण्यासाठी तयार अशा स्थितीत - पाहून वेंकट रावचे हृदय भरून आले. रात्रीच्या शोला का नको हिला घेऊन जायला? त्याने तिला हलविले, उठवू लागला - "शांता, शांता ऽ" शांताने आपले पाय झाडले, झोपेत व्यत्यय आल्याने ती चिडली, ओरडू लागली. तिच्या आईने हलकेच म्हटले, "उठवू नका तिला" आणि शांताला पाठीवर ती थोपटू लागली.

क्षणभर आपल्या पोरीकडे वेंकट राव पाहत राहिला. "तिला बाहेर घेऊन जाणंच आता मला शक्य होईल की नाही, सांगू शकत नाही... मला त्यांनी एक इन्क्रिमेंट द्यायचं ठरविलं आहे, बघ." वेंकट रावचा गळा भरून आला.

♦♦♦

# व्यवसायाबाहेर

एखादं वर्ष झालं असेल, रामा राव ज्या ग्रामोफोन कंपनीचे, मालगुडीतले एजंट होते, ती कंपनी बंद पडली आणि अर्थातच रामा रावांवर बेकारीचे संकट आले. त्यांनी या कंपनीकडे एजन्सीसाठीची म्हणून काही रक्कम सुरक्षा अनामतीपोटी जमा केलेली होती. पाच वर्षं रामा रावांचा व्यवसाय छान चालला. उत्तम आर्थिक प्राप्ती झाली. एवढी, की त्यातून बायको, मुलांना सुखात ठेवता आले. नवीन वसाहतीत त्यांनी बंगला बांधला होता अन् स्वत:साठी एक जुनी आटोपशीर कारसुद्धा घेण्याच्या विचारात ते होते.

आणि एके दिवशी आकाशच कोसळलं. व्यवसाय, बँकिंग, राजकारण अशा सर्वच क्षेत्रांतल्या घटनांची मालिका या अघटितासाठी कारणीभूत झाली. उत्तर भारतात कुठेतरी या ग्रामोफोन कंपनीचा कारखाना होता, तो आपोआप बंद पडला. त्याचे कारण लाहोरमधल्या बँकेचे दिवाळे वाजण्याशी संबंधित होते अन् त्याचा परिणाम मुंबईच्या फायनान्सरच्या अपघाती मृत्यूत झाला. हा फायनान्सर घाटरस्त्यावरून कार चालवीत असताना, गाडीवर त्याचा ताबा राहिला नाही आणि रस्ता सोडून ती गाडी तीनशे फुटांवरून कोसळली. याबद्दल अशीही चर्चा होती, की आधीच्या रात्री त्याची बायको त्याच्या कॅशियरसोबत निघून गेल्याने त्या फायनान्सरने आत्महत्या केली होती.

आणि पाहता पाहता रामा राव चक्क रस्त्यावर आले. सुरवातीला या सगळया अघटिताचे गांभीर्यच त्यांच्या लक्षात आले नव्हते. काही पैसे बँकेत होते, थोडा साठा दुकानात शिल्लक होता; पण विक्री व्यवहार मंदावले, किमती उतरल्या आणि मोठ्या मुश्किलीने हजाराच्या आत उत्पन्न झाले. जेव्हा त्यांनी सुरक्षा अनामत परत मिळावी म्हणून इकडून अर्ज पाठविला, तेव्हा तिकडे अर्ज स्वीकारायलासुद्धा कुणी नव्हते. बँकेतले पैसे वेगाने सरत होते. रामा रावांच्या बायकोने मग काही काटकसरीचे उपाय शोधले. तिने नोकराला, स्वयंपाक्याला काढून टाकले. फॅशनेबल अशा नर्सरी स्कूलमधून मुलांची नावं काढली अन् त्यांना मोफत अशा प्राथमिक शाळेत टाकले. त्यानंतर आपला बंगला भाड्याने देऊन ते मार्केटच्या मागे एका छोट्या घरात राहू लागले.

रामा रावांनी नौकरीसाठी दररोज डझनभर अर्ज पाठविले आणि नोकरी शोधण्यासाठी चपला झिजविल्या. चाळिशीला पोहोचलेल्या एखाद्या माणसाला नोकरी मिळविणं सोपं काम नव्हतं; विशेषत: एक स्वतंत्र अन् नफ्याच्या व्यवसायातून बाहेर पडलेल्या माणसासाठी. रामा रावांच्या बोलण्यातसुद्धा एक व्यावसायिक तऱ्हा असायची. राव आपलं कार्ड आत पाठवायचे, मग म्हणायचे,

“तुम्ही माझ्यासाठी काय करू शकता याचं मला कुतूहल आहे सर. माझी कसलीही चूक नसताना माझा व्यवसाय बंद पडला. तुमच्या ऑफिससाठी काहीतरी करण्याची संधी तुम्ही मला द्याल तर फार आभारी राहीन सर मी!”

“काय दुर्दैवाची बाब आहे! खरंच, मला अतिशय वाईट वाटतं पहा... सध्या काही नाही, काही काम निघालं तर नक्कीच तुम्हाला बोलावीन मी.”

असाच अनुभव सगळीकडे आला. राव संध्याकाळी घरी परतायचे. मार्केटच्या मागे असलेल्या आपल्या घरी मोठ्या जड अंत:करणाने ते परतायचे. मुलांना घेऊन त्यांची

बायको न चुकता दारात थांबलेली असायची - रस्त्यावर डोळे लावून उभी असलेली त्यांची बायको. किती उत्सुक, किती आतुर असे त्यांचे चेहरे असायचे! आशाळभूत नजर असलेले. दररोज त्यांना आशा असायची, की एखादी जादू व्हावी अन् काहीतरी घेऊन त्यांनी परतावं. सततच्या प्रयत्नातले अपयश आणि ज्या तऱ्हेने तिथून नकार मिळायचे ते पाहून, आता बायको- मुलांचा आपल्यावर विश्वास राहिला नसावा असे रावांना वाटायचे. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहूनच रावांची बायको काय ते ओळखायची अन् काही न बोलता आत वळायची. मुलंसुद्धा समजून घ्यायची अन् आईच्या मागनं गुपचूप जायची. रामा राव विषय बदलायचे अन् उसन्या उत्साहाने बोलायचे, ‘‘आज आपण कसे आहोत?’’ पण या त्यांच्या बोलण्याला बायकोकडून मुलांकडून प्रतिसाद मिळायचा तो पुटपुटण्याचा- क्षीण असा प्रतिसाद. हे असं पाहून रावांचं मन विध्द व्हायचं. या नव्या कॉलनीत रावांची बायको चांगले कपडे घालून, गजरे माळून काय करणार? तिकडे- जुन्या घराकडे महिला मंडळ होतं; चांगला शेजार होता. प्रत्येक गोष्ट तीला आनंदाची होती; पण आता क्वचितच तिची कुणाशी मैत्री झाली. आपण कपडे बदलून तयार व्हावं असंही तिला वाटेना. सगळा वेळ ती स्वत:ला स्वयंपाकघरात कोंडून घ्यायची. मुलांचंही तेच. त्या वसाहतीतल्या बंगल्याला कंपाउंड होतं अन् डझनवारी पोरं तिथं खिदळायची. फॅशनेबल नर्सरी स्कूलमध्ये नवीन मित्र मिळविणं शक्य असायचं; पण इथं पोरांना मित्र नव्हते आणि ते घराच्या मागे आपसातच खेळत. आता त्यांचे कपडे फाटलेले, मळके राहू लागले. पूर्वी तीन महिन्यांतून कधीतरी त्यांना नवीन कपडे मिळायचे... रामा राव अंथरुणावर निजल्यावर याच बाबतीत रात्रभर विचार करीत राहायचे, त्यांची झोप हरवायची.

आता जवळचा सगळा पैसा खर्च झाला. आता फक्त त्या बंगल्याचं जे भाडं यायचं तेच उत्पन्न राहिलं होतं. हा भाडेकरू, जर अचानक घर सोडून गेला, तर आपलं कसं व्हावं या विचाराने ते नेहमीच चिंतित असायचे.

अशा दिवसांत असताना, ज्युबिली वाचनालयामध्ये रावांच्या वाचनात एक नियतकालिक आले- कॅप्टन नावाचे. ते चार पानांचे होते आणि संपूर्णपणे शब्दकोड्यांसाठीच वाहिलेले होते. दर आठवड्याला चार हजार रुपयांचे बक्षीस त्यात जाहीर झालेले असायचे.

पुढचे काही दिवस रावांना घरातल्या विवंचनांचा विसर पडला होता. आता त्यांच्या विचारांची तीव्रता केवळ एकाच प्रकारच्या उत्तराशी केंद्रित झाली होती-‘टॅलो’ पाहिजे की ‘फॉलो?’ ‘अशी माणसं टाळायला हवी.’ या विधानासाठी ‘बॅड’ योग्य का ‘मॅड’ का ‘सॅड’? घरी परत आलं, की आता दारात उभ्या असलेल्या बायको-मुलांना बोलायची रावांना सवड नव्हती.

प्रत्येक आठवड्याला त्यांनी शब्दकोड्यांची उत्तरं पाठविली, थोडे पैसे त्यात खर्च केले आणि धडधडत्या अंत:करणाने प्रत्येक वेळी त्यांच्या निर्णयाची वाट पाहिली. ज्या दिवशी शब्दकोड्याच्या उत्तराचा निकाल राहायचा, त्या वेळी ‘कॅप्टन’चा अंक फुकटात पाहायला भेटेल का, याच धडपडीत ते गुंतलेले असायचे. ‘ज्युबिली’ वाचनालयात तो अंक उपलब्ध होईपर्यंत त्यांना धीर नसायचा. कधी पेपरवाला कुरकुर करू लागला, तर राव त्याला म्हणायचे, ‘‘थोडं थांब. मला या शब्दकोड्यात बक्षीस लागू दे; मी एकदाच तीन वर्षांची पेपरची वर्गणी तुला अॅडव्हान्स देईन!’’ बक्षीस विजेत्यांचा तपशील असलेले पृष्ठ काढून

वाचताना तर रावांची धडधड वाढायची. कुण्यातरी बलुचिस्तानचा, तर कुणी ढाक्याचा तर एखादा सिलोनमधला- त्यांनी योग्य शब्दांनी ते कोडे सोडविलेले असायचे; पण रामा रावांनी नाही. अशा वेळी या धक्क्यातून सावरायला रामा रावांना तीन तास लागायचे. यातून सुटायचा एकच मार्ग राहायचा तो म्हणजे, दुसऱ्या आठवड्याच्या शब्दकोड्यात स्वत:ला झोकून द्यायचा; त्यामुळे त्यांची आशा आणखी काही दिवसांसाठी पल्लवित राहायची.

या सगळ्या आशा-निराशेच्या बदलांनी, लवकरच रावांचे मानसिक संतुलन बिघडवून टाकले. आता घरी क्वचितच ते कुणाशी बोलायचे. डोक्यात नेहमीच विचारांची गर्दी झालेली असायची. शब्दकोड्यासाठी दर आठवड्याला बायकोकडून रुपया मिळेना झाला, की ते तिच्याशी भांडायचे. सौम्य प्रकृती अन् व्यवस्थित राहायच्या सवयीची ती असल्याने, हे भांडण लांबायचे नाही आणि त्यामुळे रावांना नेहमीच त्यांनी मागितले ते पैसे मिळत. कधी अशा खर्चामुळे घरातल्या काही खर्चावर बंधनंही यायची.

एके दिवशी या लोकप्रिय नियतकालिकाने खास योजना जाहीर केली- आठ हजारांच्या बक्षिसाची. ते वाचून रामा राव उत्तेजित झाले. भविष्याची अनेकपदरी दृश्यं त्यांना दिसू लागली. या शब्दकोड्याचा त्यांनी चांगला अभ्यास केला. फक्त एका विधानाचे चारही पर्याय त्यांना योग्य वाटले आणि आता त्यामुळे त्यांना कमीत कमी चार उत्तरं पाठवावी लागणार होती. मोठं बक्षीस वाट पाहू लागलेलं...

''या वेळी तू मला पाच रुपये द्यायलाच पाहिजेत...'' राव बायकोला म्हणाले आणि ती गृहिणी अवाक् होऊन गेली. आजकाल या प्रकरणात राव थोडे निर्ढावून गेले होते आणि आता या वेळी तर पैशासाठी राव चक्क आक्रमक झाले होते. पाच रुपये म्हणजे आठवड्याच्या अन्नधान्याची रक्कम. काही क्षणांसाठी राव विचलित झाले; पण त्यांचे सगळे लक्ष लागले होते, केवळ एका तर्काकडे - 'होप' का 'डोप' का 'रोप'... कोणता शब्द अधिक पर्यायी राहील... (काही माणसं निराशेपेक्षा याला प्राधान्य देतात हे ते विधान होते.) आणि त्यांचं मन एकदम निश्चिंत झालं होतं.

शब्दकोड्याची उत्तरं रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्यावर रावांच्या मनाने मोठे मोठे इमले बांधायला सुरवात केली. बक्षीस विभागून जरी मिळालं, तरीही त्यांना चांगलीच रक्कम मिळणार होती. मग भाडेकरूला काढून बायकोमुलांसहित ते परत आपल्या बंगल्यावर जाणार होते. सगळे पैसे बायकोच्या हवाली करून अन् स्वत:कडे शंभर रुपये ठेवून ते मद्रासला एकदोन वर्षांसाठी नशीब अजमावयाला जाणार होते आणि बायकोजवळचे हे पैसे संपण्यापूर्वीच भल्यामोठ्या नफ्याचा व्यवसाय त्यांना मद्रासला मिळाला असता.

आणि तो दुर्दैवी दिवस! 'द कॅप्टन'चा अंक रामा रावांनी उघडला आणि योग्य उत्तराचा तपशील पाहताच खाडकन् त्यांचे डोळे उघडले. त्यांनी मोठ्याच चुका करून ठेवलेल्या होत्या. अनेक चुका. आता, पाठविलेल्या पैशांतून एक आणाही परत मिळण्याची शक्यता राहिली नव्हती. संध्याकाळपर्यंत राव खिन्न बसून राहिले. जेवढा विचार केला, तेवढं आयुष्य अधिकाधिक कठीण वाटू लागलं... सगळे नुकसान, सगळे नैराश्य, सगळे पराभव आता नव्या जोमाने त्यांच्या मनात जमू लागले. संध्याकाळी घराकडे परतण्याऐवजी रावांची पावलं आता रेल्वे स्टेशन रोडकडे वळली. लेव्हल क्रॉसिंगवर ते गेले अन् तसंच

समांतर दूरवर चालत राहिले. एकदोन मैल. आता अंधार पडला होता. दूरवर शहराचे दिवे चमकत होते. काही फर्लांगांवर रेल्वेचे लाल, हिरवे सिग्नल्स लुकलुकत होते. रावांनी विचार केला, की आता जगण्यात काही अर्थ नाही. जर एखाद्याच्या जन्मात दुर्दैवच ठरलेलं असेल तर त्याला उत्तम उपाय म्हणजे त्याने एक तर रेल्वेखाली किंवा फाशी घेऊन प्रकरण मिटवून टाकावे, बस! राव परत विचारात गुंतले. बायको, मुलं... त्यांना काहीच महत्त्वाचे वाटेना. एकच बाब महत्त्वाची वाटू लागली - संपून जाणे. संपवून टाकणे.

रेल्वेच्या रुळावर रामा राव निजले. रुळ अजूनही गरम होते. दिवसभर गर्मीच होती. दहाच मिनिटांत आता त्रिचनापल्ली ट्रेन येईल हे लक्षात आलं अन् रावांना बरं वाटलं.

रुळावर ते निजून राहिले. किती वेळ - हे त्यांनाही कळले नाही. रेल्वेच्या आवाजाकडे त्यांनी कान लावले; पण दूरवरून वाजणारी अर्धवट खडखड, गुंजन याशिवाय काहीच नव्हते... आता त्यांना रुळावर निजून राहायचा कंटाळा आला... ते उठले अन् स्टेशनकडे परत आले. प्लॅटफॉर्मवर चांगलीच गर्दी होती. कुणाला तरी त्यांनी विचारले-

"गाडीला काय झाले?"

"तीन स्टेशन पलीकडे एक मालगाडी रुळावरून घसरलीय, त्यामुळे रस्ता बंद झाला आहे. दुरुस्तीसाठी माणसं गेलेली आहेत; पण आता सगळ्या गाड्या किमान तीन तास उशिरा येणार आहेत."

"देवा! तू माझ्यावर दया केलीस!" रामा राव म्हणू लागले. असं म्हणताना त्यांचा गळा भरून आला होता. आता राव घराकडे धावतच निघाले.

रावांची बायको रस्त्याकडे नजर लावून दारातच उभी होती. रावांना पाहताच तिला आनंद झाला आणि तिने सुटकेचा नि:श्वास टाकला. तिने केलेले आनंदाने असे स्वागत - वर्ष झाले राव विसरून गेले होते.

"आज एवढा उशीर का झाला बरं तुम्हाला?" तिने विचारले-

"संध्याकाळपासूनच मला फार काळजी वाटू लागली पहा. पोरंसुद्धा रडवेली झाली होती अन् आता झोपून गेली बिचारी..."

जेव्हा रामा राव जेवायला बसले, तेव्हा ती म्हणाली- "वसाहतीतल्या आपल्या बंगल्यातले भाडेकरू संध्याकाळी आले होते. बंगल्याची चांगली किंमत द्यायला ते तयार आहेत. त्यांना घाईपण आहे." पुन्हा ती म्हणाली, "अन् मला वाटतं, आपण बंगला विकायला हरकत नाही."

"वा! उत्तम कल्पना!" अत्यानंदाने रामा राव म्हणाले. "या वेळी आपल्याला बंगल्याचे साडेचार हजार मिळतील. मला पाचशे रूपये दे. मग मी मद्रासला जाऊन तिथे काहीतरी करीन. उरलेली रक्कम तुझ्याकडेच राहू दे, घर चालवायला. सर्वांत आधी एका चांगल्या वसाहतीत राहायला जाऊ आपण."

"तुम्ही हे पाचशे रुपये शब्दकोड्यात गुंतविणार आहात का - अधिक पैशांसाठी?" बायकोने शांतपणे विचारले.

क्षणभर रामा रावांना निराशेने घेरले; पण पुन्हा ते सावरले आणि निश्चयपूर्वक आवाजात त्यांनी शपथ घेतली -

"नाही. आता अजिबात नाही."

♦♦♦

# अॅटिला

एक प्रकारच्या आशावादी भावनेनेच त्यांनी त्याचे नाव ‘अॅटिला’ असे ठेवले होते. त्यांना कुत्र्याने कसं ताकदवान, भीतिदायक, लढाऊ असं असावं वाटलं आणि ‘युरोपचा आसूड’ अशी प्रतिमा असलेलं हे नाव त्यांनी ठेवलं.

हे कुत्र्याचं पिलू दोन महिन्यांचं असतानाच त्याचे जबडे चौकोनी दिसायचे. डोळे तांबडे, उंच नाक आणि मजबूत असं मस्तक पाहून ते आपलं नाव सार्थक करणार अशी खात्री वाटायची. खरं म्हणजे, कुत्रा तातडीने खरेदी करायचं एक कारण होतं. चोऱ्या आणि घरफोड्यांची मालिकाच शेजारीपाजारी सुरू होती. त्यामुळे घरच्यांनी ठरविले, की पोलिसांपेक्षा विश्वास ठेवावा तो कुत्र्यावर. त्यांनी कुत्र्यासाठी जवळपास शोध घेतला आणि कुत्र्यांच्या एका छंदिष्टाशी त्यांची भेट झाली. त्याने त्यांना एका महिन्याचे काळे-पांढरे पिलू दाखविले आणि म्हटले, ‘‘एका महिन्यासाठी घेऊन जा आणि पहा. मी सांगतो, हा सहा महिन्यांतच असा दिसेल, की त्याच्याकडे पाहूनच दहशत वाटावी!’’ त्यांच्यासमोर त्याने या कुत्र्याची वंशावळ मांडून दाखविली अन् ते सगळे थक्कच झाले. कुत्र्याचं हे पिलू - त्याच्या शरीरात मोठ्या हिंस्र आणि निवडलेल्या जातीच्या कुत्र्याचं रक्त सळसळत होतं.

त्यांना फार आनंद झाला. महिन्यासाठी अॅडव्हान्स दिला; एका महिन्यात पंच्याहत्तर रुपये मोजून कुत्रं घरी घेऊन आलेसुद्धा. मी आधीच सांगितल्याप्रमाणे कुत्रं असं पाहताक्षणी उचलून घ्यावं असं नव्हतं. ते खेळकरही नव्हतं; पण घरातल्या सगळयांना याची पर्वा नव्हती. सगळीजण त्याच्याभोवती बसून त्याचं कौतुक करण्यात गुंतली होती. त्याचं नाव काय ठेवावं या विषयावर तर दीर्घ असा परिसंवादच झाला. घरातल्या सगळयांत लहान सभासदाने म्हटले, ‘‘आपण त्याचं नाव टायगर ठेवूया!’’

‘‘अं! प्रत्येक गल्लीत एक तरी टायगर असतोच’’ त्यावर हे उत्तर आलं. ‘‘मग सिझर?’’

‘‘सिझर! कुत्र्यांची गणना करायला घेतली, तर केवळ दक्षिण भारतातच कमीत कमी पंधरा हजार सिझर सापडतील! आपण ‘फायर’ ठेवू या का?’’

‘‘ते विचित्र वाटतं.’’

‘‘मग ‘थंडर’ ठेवू या का?’’

‘‘ते अधिकच उथळ होईल.’’

‘‘ग्रीप?’’

‘‘असंच उथळ... पोरकट वाटतं.’’

आणि चर्चा थांबली. पुढेच जाईना. कुणीतरी ‘अॅटिला’ हे नाव सुचविलं अन् घरातला जल्लोष चक्क आभाळापर्यंत जायचा बाकी राहिला! माणसाला किंवा जनावराला एवढं समर्पक नावच दुसरं नसणार.

... पण काही दिवस गेले अन् असं दिसू लागलं, की अॅटिलाला मानवजातीबद्दल जिव्हाळा आहे अन् हे खरं म्हणजे त्याच्या नावाशी विपरीत वाटू लागलं. ‘युरोपचा आसूड’ काय त्याच्या लहानपणी एवढा मवाळ असेल? याच वयातल्या त्या ‘आसूडाची’ आणि या कुत्र्याची तुलना करायला सुरुवात झाली. लहानपणात सगळयांनाच प्राणिमात्राबद्दल कुतुहल आणि आपुलकी राहणारच ना! उत्साहाच्या भरात सगळयांनी इतिहासाची

सखोल चौकशी केली- ‘यूरोपचा आसूड’ हा त्याच्या लहानपणात कसा होता?... असं म्हटलं जायचं, की लहानपणात हा यूरोपचा आसूड त्याच्या अन् त्याच्या आईवडिलांच्या मित्रांशी एवढं लगटून राहायचा, की पुष्कळ वेळा त्याला मार मिळायचा अन् त्याला स्वतंत्र ठेवलं जायचं; पण वयाच्या चौदाव्या वर्षी त्याने आपल्या भविष्याची चुणूक दाखविली होती- गोट्या खेळताना कुणी खोडी केली अन् याने त्या सवंगड्याला एका दणक्यात खाली पाडले होते अन् खंजीर खुपसला होता! वा! हे नक्कीच आशादायक प्रकरण होतं. आपल्या कुत्र्यालाही चौदा वर्षांचं होऊ द्या; मग लोकांना त्याचं खरं स्वरूप कळेल.
... पण हा सगळा पोकळ आशावाद होता. अॅटिलाची उंची वीस इंचांपर्यंत वाढली. त्याचं शरीर भक्कम झालं. दिसायलाही तो भयकारी असा वाटू लागला; पण तेवढंच. सतरा प्रकारची माणसं दररोज घराचं गेट उघडून यायची. बिल कलेक्टर, पोस्टमन, जडीबुटीवाले, फुटकळ विक्रेते अन् कुटुंबाची मित्रमंडळी. सगळयांचं स्वागत अॅटिला करायचा, ते आपुलकीनेच. गेट वाजलं, की तो सावध व्हायचा. गेटकडे पाहत उभं राहून तयार व्हायचा. गेटमधून कुणी आत आलं, की अॅटिला भुंकतच पुढे यायचा; पण एवढंच. येणारं माणूस थांबलं अन् त्याने ‘यू यू’ केलं, की बस. अॅटिला जणू विरघळूनच जायचा. त्याचं वागणं एवढं दबलेलं व्हायचं, की वाटायचं, भुंकल्याबद्दल तो क्षमा मागतो आहे! शेपूट घालून, मान खाली घालून, शरीराची कमान करून असा कुंई कुंई आवाज करायचा, की जणू तो सांगतो आहे - माझ्याकडे पाहून तुम्ही गैरसमज करून घेतला, केवढं वाईट, अं! खरं म्हणजे तुमच्या स्वागतासाठी मी धावलो होतो... जोपर्यंत अॅटिलाला थोपटलं जायचं नाही- की बुवा तुला माफ केलं, जा!- तोपर्यंत तो तसाच शोकमग्न राहायचा.
हळूहळू अॅटिलाच्या लक्षात आलं, की आपलं उड्या मारीत धावणं लोकांत विचित्र गैरसमज पसरवीत आहे आणि म्हणून मग तो काय करायचा- गेट वाजलं, की तो क्वचितच उठायचा. जागेवरूनच त्या दिशेला पाहून शेपटी हलवायचा, बस. घरातल्या लोकांना असं वागणं अजिबात आवडायचं नाही, त्यांना उलट याची शरम वाटायची.
“याचं नाव बदलून आता ‘ब्लाइंड वॉर्म’ असंच ठेवायला पाहिजे!” घरातलं कुणीतरी म्हणालं.
“एखाद्या हत्तीएवढा आहार आहे त्याचा” -आई म्हणाली, “तो जेवढा भात अन् मटन खातो तेवढ्या किमतीत तर दोन वॉचमन ठेवता येतील! रोज सकाळी कुणीतरी येवून बागेतली फुलं तोडून जातं अन् अॅटिला काहीच करीत नाही. नुसता बसून राहतो!”
या वेळी अॅटिलाचा घरातलाच एक शुभचिंतक म्हणायचा,
“अशा फुलचोरांना पकडण्यापेक्षा त्याला इतर काही महत्त्वाचं वाटत असेल!”
“इतर काय असतं महत्त्वाचं?”
“अं! जर कुणी अगदी पहाटेच फुलं तोडून घेऊन जात असेल, तर अॅटिलानं काय त्यावेळीसुद्धा राखण करावी, असं वाटतं का तुला?”
“मग? एवढं खाऊपिऊ घातल्यावर कुत्र्यानं एवढं काम करायलाच पाहिजे, नाही का? नुसता झोपून राहतो- तुला उलट, तुझ्या कुत्र्याची लाज वाटायला पाहिजे!”
“आई, तो रात्रभर झोपत नाही. मी पाहिलंय त्याला- रात्रभर घराभोवती फिरून गस्त घालतो तो!’

“खरंच? तो पाळतीवर असतो का रात्रभर?”
“प्रश्नच नाही, तो असतोच.” अॅटिलाची बाजू घरात मांडली जाते.
“मी तर त्याचं भुंकणं ऐकायला उत्सुक असते.” आई म्हणायची-
“तू त्याला रात्री खोलीत बांधून ठेव. नाही तर काय व्हायचं, घर फोडायला चोर यायचे अन् हा त्यांना उलट आत बोलावून सगळं दाखवायचा! चोर जर एकटाच शोधू लागला, तर त्याला तेवढं यश मिळणार नाही! अॅटिलानं जर नुसतं भुंकलं तरी पुरे... पण असा एवढा मुका कुत्रा मी माझ्या आयुष्यात पाहिला नाही, बाई!”
हे ऐकून मग घरातला तो पोरगा- अॅटिलाची बाजू घेणारा- चिडायचा. त्याला वाटायचं, असं बोलणं म्हणजे, अत्यंत निष्ठूर अशी टीका आहे त्याच्यावर.
- अन् अॅटिलाने त्याच रात्री याचं समर्थन करून दाखविलं.
शहरापासून तीन मैलांवर एका झोपडीत रंगा राहायचा. तो तसा गँगकुली होता; पण कधी रस्ता दुरुस्तीच्या कामावरही राहायचा. कधी कधी रात्री घरफोड्या करण्याचा रोमहर्षक अनुभव (अन् फायदासुद्धा!) घ्यायचा. त्या दिवशी रात्री एक वाजता घराच्या पूर्वेकडील खिडकीचे गज तोडून त्याने घरात प्रवेश केला. भिंतीच्या कडेकडेने फिरून त्याने ट्रंका, कपाटं शोधली आणि सगळया सोन्या-नाण्यांचं एक डबोलं व्यवस्थित बांधून घेतलं.
रंगा आता घरातून निघण्याच्याच तयारीत होता. खिडकीत केलेल्या जागेत त्याने पायच ठेवला होता अन् त्याची नजर खाली उभ्या असलेल्या अन् आशाळभूतपणे त्याच्याकडे पाहत राहणाऱ्या अॅटिलाकडे गेली. रंगाला वाटलं, आपला शेवट जवळ आला, झालं! कुत्रा आता भुंकेल असे त्याला वाटले; पण अॅटिला? छे,छे! तो तसाच उभा!
अॅटिलाने वाट पाहिली, मग कंटाळून तो उभा राहिला; आणि आपले पंजे त्या घरफोड्या रंगाच्या मांडीवर ठेवले. आपले कान खाली पाडले. रंगाचे हात तो चाटू लागला. डोळे फिरवू लागला. रंगा पुटपुटला...
“तू भुंकणार नाहीस असं वाटतं...”
“छे,छे काही काळजी करू नका. मी काही ‘तसा’ कुत्रा वाटतो की काय तुम्हाला?” अॅटिला सांगायचा प्रयत्न करू लागला. “थोडं थांब, मला खाली उतरू दे” रंगा घरफोड्या म्हणाला.
अॅटिलाने आज्ञाधारकपणे आपले पंजे उचलले अन् खाली वाकला.
“ती बघ!” घराच्या मागे बोट दाखवून रंगा म्हणाला, “तिथे एक मांजर आहे!” अॅटिलाने कान टवकारले अन् दाखविलेल्या दिशेकडे त्याने झडप घातली. कुणालाही वाटले असते, की हा आता मांजराला फाडून टाकणार; पण खरं म्हणजे, अॅटिलाला मांजराचा सहवास लाभला असता, तर त्याने ही आनंददायक संधी सोडली नसती.
अॅटिलाने रंगाला सोडले अन् रंगाने गेटकडे धाव घेतली. एका क्षणातच तो गेटवरून आता उडी मारणार होता; पण काय घडतं आहे, हे अॅटिलाच्या लक्षात आले आणि एका झपाट्यात तर तो गेटपाशी आला. अॅटिला दुखावला. “हे बरोबरंय का, आं?” तो जणू विचारीत होता- “मला सोडून जायचा विचार आहे तुमचा?” आपली झुपकेदार शेपटी त्याने अगदी ढिली सोडली अन् मोठा कारुण्यपूर्ण तो दिसू लागला. एवढा, की घरफोड्या रंगा क्षणभर थबकला. अॅटिलाच्या मस्तकावर त्याने थोपटले; मग गेट उघडून त्याने

पोबारा केला आणि अॅटिला त्याच्यामागे पळाला. अॅटिलाचं आयुष्यातलं एक मोठं स्वप्न होतं, ते हे की गल्ली-रस्त्यावरून मोकळेपणाने हिंडावं-फिरावं आणि आता त्यानुसारच सुरेख अशा घटना घडू लागल्या.

अॅटिलाला हा नवीन मित्र फारच आवडला. एवढा, की क्षणभरही तो त्याला सोडून राहेनासा झाला. रंगा जेवायला बसला, की त्याच्यासमोरच हा बसायचा. झोपडीत रंगा चटईवर झोपला, की चटईच्या कडेलाच अॅटिलाची बैठक असायची. अंघोळीला कधी गेला रंगा, की तो येईपर्यंत तिथेच हा थांबून राहायचा. कामात रंगा व्यस्त असला, की हा रस्त्याच्या कडेलाच निजून राहायचा.

अशा तऱ्हेचा अॅटिलाचा सहवास रंगाला त्रासदायक वाटू लागला. तो काकुळतीला येऊन म्हणायचा, ‘‘अरे बाबा, मला काही मोकळा राहू देतोस का नाहीस?’’ अॅटिला मात्र याचं उत्तर द्यायचा नाही. मित्रावर नजर रोखून तो त्याच्याजवळच बसून राहायचा.

अॅटिलाचं असं गायब होऊन जाणं ही बंगल्यातली एक खळबळजनक घटना होती.

‘‘मी सांगत नव्हते-’’ आई म्हणू लागली, ‘‘त्याला खोलीत कोंडून ठेव म्हणून? कुण्या चोराने त्याला चोरून नेलं की काय? आता चार लोकांना हे सांगायलाही लाज वाटेल आपल्याला.’’

‘‘तुझी गफलत होतेय आई’’ घरातल्या त्या ‘अॅटिला-समर्थका ने’ सांगितले- ‘‘तो निव्वळ योगायोगही असेल. तो सहज म्हणून बाहेर गेलेला असेल बरं! तो इथं असता, तर कुण्या चोराची हिंमत झाली असती बंगल्यात यायची?’’

‘‘ते तसं काही मला माहीत नाही. उलट मी तर म्हणेन, कुत्र्याला घेऊन जाण्याबद्दल त्या चोराचे आभारच मानायला पाहिजेत. राहू देत म्हणावं ते दागिने चोरलेले, त्याला बक्षीस म्हणून! आपण पोलिसांतली तक्रार मागे घेऊ या का?’’

एका आठवड्यातच ही सगळी टिंगल-टवाळी थांबली आणि नंतर पाहता पाहता अॅटिला एकदम शूरवीराच्या पंक्तीत जाऊन बसला! घरातला मोठा मुलगा एके दिवशी बाजारात चालला होता. त्याने पाहिले- अॅटिला कुणाच्या तरी मागे लगबगीने चालला होता.

‘‘एऽऽ’’ घरातल्या त्या मुलाने आवाज दिला. ते ऐकून रंगाने मागे पाहिले अन् रंगा चक्क धावत सुटला! आणि अॅटिला- त्याला सतत भीती असायची, की आपला नवा मित्र आपल्याला कधी ना कधी एकटा टाकून निघून जाणार. आणि हा काय, तो जातो आहे धावत! छे, छे! अॅटिला जोराने धावत सुटला. रंगाच्या मागे.

‘‘एऽऽ अॅटिलाऽ’’ घरातला तो तरुण मुलगा ओरडला अन् तो पण धावत सुटला. मित्र जवळ आला, की अॅटिलाला घरच्या या माणसाला उत्तर द्यायचं होतं आणि म्हणून त्याने फक्त मागे वळून क्षणभर पाहिलं; पण पुन्हा तो आणखीनच वेगाने धावत सुटला. रंगाने जीव खाऊन आपला वेग दुप्पट केला. पण अॅटिलाने ठरविलेच होते- कुण्याही परिस्थितीत त्याची साथ सोडायची नाही. त्याचा परिणाम असा झाला, की अॅटिला एवढ्या जोराने धावला, की रंगाला त्याने ओलांडले अन् चक्क त्याच्यापुढेच येऊन थांबला की! रस्ताच अडला आणि रंगा त्याच्यावर धडपडून खाली पडला. रस्त्यावर तो पडला आणि चोरीचे दागिने (जे तो चोरीचा माल विकत घेणाऱ्याकडे घेऊन चालला होता.) त्याच्या हातातून निसटून पडले! तरुण पोराने ओळखले- आपल्या बहिणीचे, चोरीला

गेलेले हेच ते दागिने! अन् तो रंगाच्या उरावर बसला. लोक जमले अन् अर्थातच या नाट्यात पोलिसांचा प्रवेश झाला.

- त्या दिवसाचा हिरो बनला अॅटिला. इतका, की घरातली ती कर्ती बाईसुद्धा आता मवाळ झाली. ती म्हणाली- ‘‘कुणाला काही का वाटेना! पण अॅटिला म्हणजे एक धूर्त गुप्तहेर आहे, हे मानावेच लागेल. शब्दांतून सांगताच येणार नाही असं आहे त्याचं व्यक्तिमत्त्व.’’

आणि ते बरंच झालं, की अॅटिलाला वाचाशक्ती नव्हती. नाही तर त्याने असा विलाप, असा आक्रोश केला असता, की त्याच्या दु:खावेगाने पायाखालची जमीन दुभंगली असती.

♦♦♦

# कुऱ्हाड

गावात आलेल्या ज्योतिषाने एकदा सांगितले होते, की वेलन तीनमजली घरात राहील आणि या घराला कितीतरी एकरांची बाग राहील. यावर प्रत्येकाने वेलनची थट्टामस्करी केली होती. वेलनचे कुटुंब म्हणजे गावातले सगळयांत दरिद्री असे होते. त्याच्या वडिलांनी त्यांच्या मालमत्तेचा कणन् कण गहाण ठेवलेला. सगळं कुटुंब आठवड्याला काही आण्यांच्या मजुरीवर इतरांच्या शेतावर राबायचे - आणि तीनमजली बंगला, वेलनसाठी? पण जर का तीस-चाळीस वर्षांनी खरंच त्या वेलनला पाहिलं असतं, तर गावातल्या चकाट्या पिटण्याऱ्यांनी खरंच त्या ज्योतिषाचे अभिनंदन केले असते! मालगुडी गावाबाहेर असलेल्या कुमारबागेतल्या त्या राजवाड्यासारख्या बंगल्याचा एकमेव रहिवासी झाला होता वेलन!

अठरा वर्षांचा असतानाच वेलनने घर सोडले होते. दुपारच्या जेवणासाठी यायला वेलनला एकदा उशीर झाला होता आणि त्यामुळे शेतावर चार लोकांसमक्षच वेलनच्या बापाने त्याच्या थोबाडीत मारली होती. वेलनने टोपली खाली ठेवली; बापाकडे रागातच पाहिले आणि तो निघून गेला. वेलनने त्याच भरात गावही सोडले, तसाच चालत राहिला आणि शहरात दाखल झाला. एकदोन दिवस त्याची उपासमार झाली. इथे-तिथे भीक मागून पाहिली आणि मालगुडीला तो आला. इथे पुष्कळ प्रयत्न केल्यावर एका म्हाताऱ्याने त्याला बागकामासाठी मदतीला ठेवून घेतले. आता त्याला बाग म्हणायची, ते केवळ माळी म्हणतो आहे म्हणून. खरं म्हणजे ती एक बऱ्याच एकरांची तणकट वाढलेली जमीन होती. वेलनचं एकच कामं होतं, ते म्हणजे दिसेल तिथली सगळी झुडपं साफ करून टाकायची. दिवसेंदिवस वेलनचं हेच- मोकाट वाढलेली झुडपं काढायचं काम चालू होतं. लवकरच सगळं मैदान सफाचट होऊन फुटबॉलच्या मैदानासारखं दिसू लागलं. या जमिनीचा तीन चतुर्थांश हिस्सा बागेसाठी राखून ठेवण्यात आला आणि उरलेल्या जागेत बंगला बांधायचा होता. आंब्याला बहर आला, तेव्हा त्यांनी बंगल्याचं पाया-बांधकाम सुरू केलं होतं आणि मार्गोसाची रोपं काही यार्डांच्या अंतरावर उगवू लागली, तेव्हा तर घराच्या भिंती उभ्या राहू लागल्या.

जास्मिन, गुलाब, कॅना अशा कितीतरी फुलांनी बागेची दर्शनी बाजू फुलून गेली. आता ही बाग म्हणजे एक अद्भुत उपवन झाले होते. वेलन त्या गवंडीकामाची देखरेख करू लागला. ज्या म्हाताऱ्याने त्याला मदतनीस म्हणून कामावर ठेवलं होतं, तो अचानक आजारी पडला आणि आता वेलनच मुख्य माळी झाला होता. आपली नोकरी आणि जिम्मेदारी याचा आता वेलनला अभिमान वाटू लागला. बंगल्याच्या बांधकामाची प्रगती तो मोठ्या उत्साहाने पाहू लागला अन् इकडे पाणी घालताना फुलांच्या रोपांना तो जणू सांगू लागला, “हे पहा, दररोज बंगल्याचं काम वाढतं आहे. तुम्हीही लवकर मोठे व्हा. फुलं येऊ द्या. नाहीतर काय होईल - बंगला तयार होईल अन् तुम्ही मागे राहाल तर सगळं गाव हसेल आपल्याला, नाही का?” वेलनने रोपांना खत टाकले, मुळापाशी छान आळे केले, अनावश्यक पानं, देठं खुडून टाकली, दररोज दोनवेळा पाणी दिलं. या सगळया प्रयत्नांना निसर्गानेही प्रतिसाद दिला, रोपं भराभर वाढू लागली. अशा प्रकारे बंगल्याचा मालक अन्

त्याचे कुटुंबीय राहायला आले तेव्हा वेलनने त्यांना उत्तम बागेची जणू भेटच दिली.
बंगल्याला एक दिमाखदार घुमट होतं. भोवती लाकडाचे सुरेख नक्षीकाम असलेल्या बाल्कनी होत्या. गुळगुळीत, गोल असे खांब, प्रशस्त व्हरांडा, आडव्या-उभ्या रेषांची सुरेख अशी संगमरवरी फरशी, एका मागे एक असलेले भव्य, प्रशस्त हॉल, या सगळयांमुळे बंगल्याला एवढे ऐश्वर्य प्राप्त झाले होते, की वेलन स्वत:शीच म्हणायचा, ‘‘खरंच, माणसांसाठी हे राहायचं ठिकाण आहे? मला तर वाटलं, फक्त स्वर्गातच अशी घरं असतात...’’ जेव्हा बंगल्यातले स्वयंपाकघर आणि डायनिंग हॉल त्याने पाहिले, तेव्हा तर तो म्हणाला, ‘‘बाप रे! आपलं सगळं गाव एवढ्या जागेत तर सहज बसून जाईल की!’’ पण बंगल्याच्या कॉन्ट्रॅक्टरचा मदतनीस तर म्हणत होता, ‘‘अं! आम्ही तर यापेक्षा मोठे बंगले, दोन-दोन लाखांच्या किमतीचे - बांधले आहेत! हे तर काय तुझ्या मालकाला एका लाखाला पडलं असेल! सर्वसाधारण बंगल्यापेक्षा थोडा चांगला आहे हा बंगला, एवढंच!’’
आपल्या झोपडीत परतल्यावर वेलन विचार करायचा. त्या बिल्डरचे आडाखे, हिशेब आणि त्याच्या दृष्टीतला बंगला काय असावा - आणि त्याला झोप यायची. तो मार्गोसाच्या रोपट्यांपाशी जायचा. रोपट्यांभोवती मूठ धरायचा आणि रोपट्यांना बोलायचा, ‘‘एवढा काटकुळा राहणार का तू? माझ्याएवढी उंची केव्हा होणार तुझी? तुझा शेंडा धरून मी वर ओढू का, अं? मोठे व्हा, पोरांनो मोठे व्हा. मजबूत व्हा. दोनही हातांनी तुम्हाला उपटायचा प्रयत्न केला, तरी जमू नये, असं भक्कम व्हा तुम्ही आणि उंच होऊन तुमचा विस्तार वाढवा. राजवाड्याला शोभेल असं तुम्ही दिसा नाही तर सगळी रोपटी उपटून टाकेन!’’
जेव्हा हे मार्गोसा वृक्ष तेवढे वाढले, त्या वेळी बंगल्याला एक परिपक्व असं रूप आलं.
उन्हाळा-पावसाळयाच्या सारख्या माऱ्याने बंगल्याच्या दारे-खिडक्या, लाकूडकामाची चमक निघू लागली. भिंतीचे मूळ रंग निघून जाऊ लागले. कुठेही भिंतीचे टवके निघू लागले, भेगाही पडू लागल्या. बंगल्याचा तो चकचकीतपणा निघून गेला. राजेशाही रूप गेलं, तरी उलट आता तो बंगला अधिकच मानवी असा वाटू लागला. मार्गोसा वृक्षावर आता शेकडो पोपट, मैना, कितीतरी वेगवेगळे पक्षी यायचे. राहायचे अन् त्या वृक्षाखाली बंगल्याच्या मालकाची नातवंडं- लहान मोठी- खेळायची, भांडायची. आता बंगल्याचा मालक काठी घेऊन वाकून चालायचा. बंगल्याच्या उद्घाटनाच्या वेळेस प्रफुल्लित दिसलेली मालकीण आता वाकली होती, फिकी झाली होती. आता व्हरांड्यात ती झुलत्या खुर्चीवर बसून क्षीण नजरेने बागेकडे पाहत राहायची. वेलन स्वत: बराच बदलला होता. आता बागकामासाठी तो त्याच्या मदतनिसावर अवलंबून राहू लागला. त्याचे आईवडील वारले. बायको आणि चौदा मुलांपैकी आठ मुलं वारली. वडिलोपार्जित मालमत्ता, जी त्याने मिळविली, ती आता त्याची मुलं पाहायची, जावई पाहायचे. पोंगल, दिवाळी अशा सणांसाठी तो गावाकडे जायचा. येताना आपल्या अत्यंत आवडत्या अशा नातवांना सोबत घेऊन यायचा.
वेलन अत्यंत समाधानी व आनंदात होता. आयुष्याकडून त्याला कसलीही अपेक्षा नव्हती. बंगल्यातली माणसंसुद्धा तितकीच समाधानी असल्याचे त्याने पाहिले. हे सगळं चांगुलपण कायमच- सातत्याने राहील याबद्दल कुणालाही शंका नव्हती; पण मृत्यू चाहूल घेत जवळ आला होता. बंगल्याचे मालक फार आजारी आहेत आणि खाली, त्यांच्या खोलीत आता

पडून असतात अशी कुजबूज नोकरांच्या क्वार्टर्समधून माळयाच्या झोपडीपर्यंत पोहोचली होती. (वरच्या मजल्यावरच्या बेडरूममध्ये आता वय झाल्याने राहणं शक्य नव्हतं.) डॉक्टर्स आणि भेटायला येणारी मंडळी यांची सारखी वर्दळ राहायची. त्यामुळे फुलं तोडणाऱ्या अनाहूत लोकांकडेच वेलनला अधिक लक्ष ठेवावं लागायचं.

एका मध्यरात्री वेलनला झोपेतून उठविण्यात आले. मालकाचे निधन झाले होते अन् त्या वेळी वेलनच्या मनात विचार आला होता- ''आता माझं कसं होईल आणि या बागेचं काय होईल? मालकाची पोरं तर काही चांगली नाहीत...''

वेलनची ही भीती खरी ठरली. खरंच, मालकाची पोरं कर्तृत्वशून्य होती. ती फारतर वर्षभर बंगल्यात राहिली. आपसात भांडत राहिली अन् मग दुसऱ्या घरात राहायला निघून गेली. एका वर्षानंतर एक कुटुंब तिथे भाड्याने राहायला आलं. वेलनकडे पाहताच त्यांनी म्हटले, ''इथं तू काही स्वत:चं डोकं लढवू नकोस. आम्हाला माहीत आहे- म्हातारा आहेस, कोणत्या प्रकारचा आहेस, सगळं ओळखून आहोत. जास्त हुशारी करशील तर नोकरीतून घालवून देऊ; समजलास? सांभाळून राहा!'' वेलनला जगणं अशक्य झालं. या लोकांना बागेशी काही देणंघेणं नव्हतं. ते फुलं-कळया तुडवून जायचे. पोरं झाडावर चढून कच्ची फळं ओरबडून घ्यायची. त्यांनी बागेतल्या वाटांवर खड्डे खणले. त्यांना मज्जाव करायची वेलनमध्ये हिंमत राहिली नाही. ते वेलनला कोणतंही काम सांगू लागले- निरोप देण्यासाठी बाहेर पाठव, गाय-जनावर धुवायला लावायचे आणि वर बागकाम कसं करावं यावर भाषणही द्यायचे. वेलनला आता या सगळयाचा वीट आला. हे सगळं सोडून देऊन गावाकडे जाऊन राहावं असं सारखं वाटू लागलं. पण असं असलं, तरी ही गावाकडे जाऊन राहायची कल्पनाच सोसणारी नव्हती. कारण वेलन बागेतल्या रोपांना, फुलझाडांना सोडून राहूच शकत नव्हता; तथापि लवकरच वेलनच्या नशिबाने साथ दिली. हे भाडेकरू बंगला सोडून निघून गेले. काही वर्षं तर बंगल्याला कुलूप राहिले. एखादे वेळेस बंगल्याच्या मालकाचा एखादा मुलगा यायचा. बागेत चक्कर टाकून पाहणी करायचा. हेसुद्धा हळूहळू थांबलं. त्यांनी मग बंगल्याच्या चाव्या वेलनच्या हवाली केल्या. कधी कुणी इच्छुक भाडेकरू यायचे. वेलन बंगला उघडून त्यांना दाखवायचा आणि ती माणसं काहीतरी नावं ठेवून निघून जायची. भिंतीचं प्लास्टर निघालं आहे, खिडक्या-दारांचे रंग जुनाट झाले आहेत. कपाटांना, फडताळांना वाळवी लागली आहे... अशा त्या तक्रारी. एका वर्षानंतर आणखी एक भाडेकरू आला, दुसरा आला, तिसरा आला. कुणीही काही महिन्यांपेक्षा अधिक राहिले नाहीत आणि मग तर बंगल्याला जणू भूतबंगल्याची अवकळा आली.

बंगल्याचे मालकसुद्धा आता बंगल्याकडे फिरकेनासे झाले. आता वेलनच त्या बंगल्याचा मालक झाल्यासारखा होता. बंगल्याच्या चाव्या त्याच्याकडेच होत्या. तो आता थकत चालला होता. तरी त्याच्या परीने तो काम करायचा; पण आता बागेतल्या वाटांवर गवत वाढले. समोरच्या बागेतली फुलांची रोपटी आता वेली, माजलेल्या गवताने वेढली गेली होती. झाडांना फळं मात्र नियमित यायची; पण ही फळझाडं तीन वर्षांसाठी मालकाने विकली होती.

वेलन आता फार थकून गेला होता. जीर्ण झालेल्या झोपडीचे छत बदलण्याएवढीही शक्ती

त्याच्यात राहिली नव्हती. त्याने आता बंगल्याच्या समोरच्या व्हरांड्यात आपला निवारा केला. तीन बाजूंनी पसरलेला प्रशस्त असा तो व्हरांडा चौकोनी फरशांनी बनलेला होता. इथे राहायला काहीच हरकत नव्हती. तिथे वावरणाऱ्या उंदरांइतकाच, तिथे वावरणाऱ्या पाकोळ्यांइतकाच त्यालाही अधिकार होता की तिथे राहायचा.

वर्षातून कधी हुरूप आला, की वेलन बंगला उघडायचा आणि फरशा धुवायचा. पुसायचा; पण तेही हळूहळू थांबलं. आता या सगळ्यांची काळजी करण्याएवढं बळ राहिलं नव्हतं. वेलन थकला होता.

कसल्याही बदलाशिवाय, सुधारणेशिवाय वर्षं निघून गेली. आता हा बंगला 'भूतबंगला' म्हणूनच ओळखला जाऊ लागला. लोक इकडे फिरकत नव्हते. वेलनला तक्रार करायचं कारणही नव्हतं. त्याला हे सगळं वातावरण अनुरूप झालं होतं. तीन महिन्यांतून एखाद्या वेळी तो आपल्या मुलाला शहरात जुन्या मालकाकडे पाठवून त्याचे वेतन घेऊन यायचा. हे असंच चालत राहायलाही खरं म्हणजे काही हरकत नव्हती; पण एके दिवशी बंगल्यासमोर कर्कश हॉर्न वाजवीत एक कार थांबली. वेलन धडपडत उठला. त्याने चाव्या घेतल्या.

''चाव्या आहेत का तुझ्याकडे - गेट उघड!'' कारमधल्या एकाने आदेश दिला.

''बाजूला छोटं गेट आहे'' वेलन पुटपुटला.

''कारसाठी मोठं गेट उघड मुकाट्याने!'' वेलनला मग गेटच्या मागे-पुढे गच्च होऊन बसलेली झुडपं काढावी लागली. गंजलेल्या बिजागऱ्यांतून कुरकुर आवाज करीत गेट उघडलं गेलं.

त्यांनी सगळी दारं-खिडक्या उघडली. सगळ्या बंगल्यात बारकाईने पाहून घेतलं आणि म्हणू लागले, ''पहा- ते पाहिलंत का छताला तडे पडलेले? भिंतीलापण पडले आहेत. त्याला पर्यायही नाही. आपण हे सगळं काळजीपूर्वक पाडलं, तर काही चीजवस्तूंचा उपयोग होईलही; पण तरीही मला हे लाकडी काम पोखरलेलं नसेल याची खात्री नाहीच... छे! अशी घरं बांधायचा वेडेपणा या लोकांनी का केला, देव जाणे!''

त्यांनी बागेतही फेरा टाकला. ''आपल्याला या जंगलातलं सगळं सगळं उपसून टाकावं लागणार आहे. सगळं साफ करावं लागणार आहे.'' एका दांडग्या माणसाने वेलनला आपादमस्तक पाहून घेतलं. म्हणाला, ''तू माळी आहेस वाटतं! आम्हाला आता बागेची गरज नाही. कुंपणावरची पाचसहा झाडं सोडली, तर आता सगळ्या जागेवरची झाडी-झुडपं काढायची आहेत. ती फुलझाडं... कशी जुनाट वाटतात अन् त्याशिवाय समोरच्या महत्त्वाच्या जागेत तर चक्क अनावश्यक आहेत.''

आठवड्यानंतरच जुन्या मालकाचा मुलगा आला अन् वेलनला म्हणाला, ''बाबा, आता तुम्हाला गावाला परत जावं लागेल. ही जागा आता एका कंपनीला विकली आहे. त्यांना बाग नको आहे. फळझाडांचा मोबदला देऊन ती ही झाडं तोडून टाकणार आहेत. ही बाग अन् हा बंगला सगळा पाडून टाकून साफ करणार आहेत. या जागेत ते छोटीछोटी घरं बांधणार आहेत. गवताच्या पात्यासाठीसुद्धा ते जागा रिकामी ठेवणार नाहीत.''

आता तिथे कामाची धामधूम वाढली. वर्दळ वाढली आणि वेलन झोपडीत बसून राहिला. थकवा वाटला, की तो पडून राहायचा. झोपून राहायचा. एरवी तो बागेत येऊन आपल्या रोपांकडे पाहत बसायचा. त्याला पंधरा दिवसांची नोटीस देण्यात आली होती.

त्याच्यासाठी आता प्रत्येक क्षण अमूल्य होता आणि तो शेवटच्या क्षणापर्यंत या रोपट्यांच्या सहवासात राहणार होता; पण...

...नोटिसीच्या दोन दिवसांतच दुपारच्या वेळेस वेलनला कुऱ्हाडीच्या आवाजांनी जाग आली... मजबूत बुंध्यावर पडणारे कुऱ्हाडीचे घाव त्याच्या कानावर पडले. तो उठला अन् बाहेर धावला. चार माणसं मार्गोसा वृक्षाच्या भक्कम बुंध्यावर घाव घालीत होती. वेलन मोठ्याने ओरडला, ‘‘थांबवा ते!’’ काठी घेऊन त्या माणसांवर वेलन धावला होता. त्यांनी वेलनच्या रागाकडे दुर्लक्ष केले. ‘‘काय झालं?’’ त्यांनी विचारले.

वेलनला रडू कोसळले. ‘‘ही झाडं माझ्या मुलांसारखी आहेत. त्यांना मी वाढविलं, जोपासलं आहे. त्यांना वाढताना- मोठं होताना पाहिलं आहे. त्यांना तोडू नका.’’

‘‘पण कंपनीचे तसे आदेश आहेत आम्हाला. आम्ही काय करू शकतो? आणि आम्ही झाडं तोडली नाहीत, तर आम्हाला ते काढून टाकतील अन् दुसरं कुणी ते काम करणारच!’’

काही क्षण वेलन विचार करीत तिथेच थांबला.

‘‘मग माझ्यासाठी एवढी तरी दया दाखवाल का...

मला थोडा वेळ द्या. मी माझं सामान आवरतो आणि निघून जातो. मी गेल्यावर तुम्हाला जे करायचं ते करा.’’ मजुरांनी कुऱ्हाडी बाजूला ठेवल्या अन् थांबले.

डोक्यावर गाठोडे घेऊन वेलन झोपडीतून बाहेर आला. झाड तोडणाऱ्या मजुरांकडे त्याने पाहिले आणि म्हणाला, ‘‘माझ्यासारख्या म्हाताऱ्यावर तुम्ही दया केली. तुम्ही थांबला माझ्यासाठी, तुमचे उपकार आहेत...’’ मार्गोसा वृक्षाकडे नजर लावून वेलनने डोळे पुसले. ‘‘भाऊ, इथून जोपर्यंत मी दूर दूरवर जाणार नाही, तोपर्यंत तुम्ही कृपा करून झाडांवर कुऱ्हाड चालवू नका...’’

दूरवर जाणाऱ्या म्हाताऱ्याकडे पाहत मजूर बसून राहिले. अर्ध्या तासानंतर अस्वस्थ असा- व्याकूळ असा आवाज मजुरांना ऐकू आला- ‘‘तोडू नका. अजून मी दूर गेलेलो नाही. मला ऐकू येईल... मी आणखी दूर जाईपर्यंत कृपा करून थांबा...’’

♦♦♦

# लॉली रोड

तो गोष्टीवेल्हाळ माणूस सांगू लागला-
आपल्या गावात म्युनिसिपाल्टी आहे, याची मालगुडीवासीयांना कल्पना नव्हती आणि त्यांना कल्पना नसल्यामुळे गावाची दुर्दशा झाली असं मात्र नाही. गावात रोगराई पसरायची अन् आपोआपच सरून जायची. शेवटी आजारांनाही एक दिवस संपावंच लागतं ना! धूळ आणि दुर्गंधी वाऱ्याने उडून जायची, गटारं भरायची, तुंबून जायची अन् आपोआपच मोकळीही व्हायची आणि आपली काळजी स्वत:च घ्यायची. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळालं, तेव्हापर्यंत मालगुडीची म्युनिसिपाल्टी अशीच नामानिराळी राहिली होती; पण या स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अगदी हिमालयापासून ते केप कॉमोरिनपर्यंत ज्या तऱ्हेने जल्लोषात साजरा झाला, त्या प्रकारचे फार थोडे प्रसंग इतिहासात जमा आहेत. आमच्या म्युनिसिपाल्टीलासुद्धा त्यामुळे स्फूर्ती आली. त्यांनी रस्ते झाडले, नाल्यागटारं साफ केली आणि गावात जिथे-तिथे झेंडे लावले. गावातल्या गल्ल्यांतून मिरवणुका जाऊ लागल्या. समरगीतांनी परिसर दणाणून जाऊ लागला आणि लोकांचं हृदय देशभक्तीने उचंबळून येऊ लागलं.
म्युनिसिपाल्टीच्या अध्यक्षांनी मोठ्या संतोषाने गॅलरीतून या सोहळ्याकडे पाहिलं अन् स्वत:शी पुटपुटले, ‘‘आम्ही आमच्या परीने या दिवसासाठी थोडंबहुत केलं आहे.’’ मला खात्री आहे, त्या वेळी त्यांच्यासोबत असलेल्या म्युनिसिपालटीच्या एकदोन सदस्यांनी अध्यक्षांच्या डोळयांत पाणी आल्याचंही पाहिलं असेल. अध्यक्ष हे एक असे सद्‌गृहस्थ होते, ज्यांनी युद्धाच्या दिवसात लष्कराला ब्लँकेट पुरवण्याचा व्यवसाय करून भरपूर ‘माया’ कमवली होती... आणि याच कमाईचा मोठा हिस्सा, म्युनिसिपाल्टीचं अध्यक्षपद मिळवण्यासाठी खर्च केला होता! अर्थात ती एक स्वतंत्र महागाथाच आहे, तिचं आता इथे प्रयोजन नाही. मी सांगतो आहे, ती हकिकत वेगळी आहे. अध्यक्षांना स्वातंत्र्य समारंभाचं जे समाधान वाटलं होतं, ते मात्र अल्पजीवी ठरलं. सगळीकडे लावलेले झेंडे जेव्हा उतरवले गेले, तेव्हा अध्यक्षांना एक प्रकारची बेचैनीच आली म्हणा ना! मी सहसा दररोज त्यांना भेटायला जायचो. ग्रामीण भागाच्या एका दैनिकाचा मी वार्ताहर होतो ना! छापलेल्या बातम्यांच्या, दर इंचाचे दोन रुपये मला मिळायचे. तेच माझ्या चरितार्थाचं साधन होतं. महिन्याभरात दहा इंचाच्या आकाराच्या माझ्या बातम्या छापायच्या आणि बहुतेक वेळा या बातम्या म्युनिसिपाल्टीच्या कामांची चांगली बाजूच दाखवणाऱ्या असायच्या. अर्थातच त्यामुळे अध्यक्षांचा मी हितचिंतक समजला जायचो. तिथे माझी चांगली पत होती. म्युनिसिपाल्टीत अध्यक्षांच्या कार्यालयात माझं सतत जाणं-येणं असायचं.
आता ते एवढे उदास दिसू लागले, की मला त्यांना विचारावं लागलंच, ‘‘काय अध्यक्षसाहेब, काय झालं?’’
‘‘मला वाटतं, आपण म्हणावं तितकं काम केलं नाही.’’
त्यांनी उत्तर दिलं.
‘‘म्हणावं तितकं... कशाविषयी पण?’’ मी विचारलं.
‘‘या ऐतिहासिक दिवसाची कायम स्मृती राहील असं...’’

क्षणभर डोळे मिटून त्यांनी विचार केला आणि पटकन घोषणाच केली: ‘‘पाहा आता, काहीही होवो- विलक्षण असं मोठे काम करून दाखवणार आहे मी!’’

अध्यक्षांनी म्युनिसिपाल्टीची एक विशेष सभा बोलावली. या सभेत त्यांचं मोठ्या जोशात भाषण झालं अन् चक्क ठराव झाला- स्वातंत्र्याच्या सन्मानार्थ गावातल्या सगळया रस्त्यांचं, उद्यानांचं नव्याने नामकरण करायचं. मार्केट स्क्वेअरच्या चौकापासूनच त्यांनी सुरवात केली. कॉरोनेशन पार्क अशा नावाने ते ओळखलं जायचं. कुणाचं कॉरोनेशन (राज्याभिषेक!) देव जाणे! तो राज्याभिषेक व्हिक्टोरिया राणीचा किंवा चक्रवर्ती अशोकाचा कुणाचाही असू शकतो! अन् कुणालाही त्याची ना खबर ना कुतूहल! आता तो जुना फलक उखडून टाकला गेला आणि बाजूला टाकून एकदम नवा फलक त्या जागी उभा राहिला. आता या पार्कचं नाव झालं होतं- हमारा हिंदुस्थान पार्क!

तथापि दुसरं नामपरिवर्तन मात्र एवढं सुलभरीत्या झालं नाही. महात्मा गांधी मार्ग हे सगळयात जास्त मागणी असलेलं नाव होतं. म्युनिसिपाल्टीचे वेगवेगळया आठ वॉर्डांचे सदस्य त्या नावामागे लागलेले होते. आणखी दहा सदस्य असे, की ज्यांची आपल्या घरासमोरच्या रस्त्याला नेहरू रोड किंवा नेताजी सुभाष बोस रोड असं नाव द्यावं अशी इच्छा होती. वाद एवढा वाढला, की आता गुद्दागुद्दी होते की काय अशी भीती मला वाटली. एक वेळ तर अशी आली, की सगळयांनी अगदी वेडेपणाचं टोक गाठलं. चार वेगवेगळया रस्त्यांना चक्क एकच नाव द्यायचं असं त्यांनी ठरवलं, पाहा आता! साहेब, सगळयांत मोठ्या लोकशाहीच्या अन् देशभक्तीने भारलेल्या या शहरात दोन रस्त्यांना एक नाव- हे व्यवहार्य आहे का? पाहता पाहता गावातल्या सगळया रस्त्यांची, बागांची नावं बदलली अन् पंधराच दिवसांत त्याचा परिणाम दिसू लागला की! या नवीन नावांमुळे गाव आता ओळखायलाच येईनासं झालं. मार्केट रोड, नॉर्थ रोड, चित्रा रोड, विनायक मुदाली गल्ली अशी सगळी नावं गायब झाली अन् त्यांच्या जागी नवीन नावं आली. चार रस्त्यांना एकच नाव- सगळे मंत्री, उपमंत्री यांची नावं, काँग्रेस वर्किंग कमिटी सदस्यांची नावं... अन् अर्थातच त्यामुळे मोठ्या अडचणी आल्या. जिथे जाऊ नये तिथे पत्रं पोचू लागली. आपण नेमकं कुठे राहतो हे लोकांना सांगता येईनासं झालं किंवा कुणाला पत्ता देता येईनासा झाला स्वत:चा. जुन्या खुणा, जुन्या ओळखी गेल्या आणि गावाला जणू जंगलाचं स्वरूप आलं!

अध्यक्षसाहेब आपल्या या कामगिरीवर भयंकर खूष झाले होते; पण ही खुशी काही जादा वेळ टिकली नाही. आता पुन्हा अस्वस्थ झाले आणि नवीन काही करून दाखवण्यासाठी पुन्हा बेचैन होऊ लागले.

लॉली एक्स्टेन्शन आणि मार्केटच्या कोपऱ्यात एक पुतळा होता. लोकांना या पुतळयांची एवढी सवय झालेली होती, की त्यांना हा पुतळा कुणाचा आहे याचा पत्ता तर नव्हताच. इतकंच काय, त्या पुतळयाकडे- वर बघायची तसदीही कुणी घेत नव्हतं. पक्षी मात्र विसाव्यासाठी त्याचा उपयोग करायचे. आमच्या अध्यक्षांच्या अचानक लक्षात आलं, की हा पुतळा सर फ्रेडरिक लॉली यांचा आहे. ही जागा त्यांच्या नावावरूनच लॉली एक्स्टेन्शन अशी ओळखली जायची. आता ही जागा गांधीनगर या नावाने ओळखली जाऊ लागली आणि त्यामुळे आता लॉलीसाहेबांचा पुतळा इथे अधिक काळ राहणं अशक्य दिसत होतं.

म्युनिसिपाल्टीने एकमताने निर्णय घेतला, की हा पुतळा इथून हलवायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी अध्यक्षांसोबत सगळे सदस्य या मोहिमेवर निघाले, त्यांनी विजयी मुद्रेने पुतळयाभोवती फिरून पाहिलं मग मात्र त्यांना त्यांची चूक लक्षात आली. हा पुतळा त्यांच्या वर वीस फूट उंचीचा होता! आणि वितळलेल्या शिशाच्या भक्कम पायातून उगवल्यासारखा उभा होता. त्यांना वाटलं होतं, की आपला दृढनिश्चय या पुतळयाला उलथवून टाकायला पुरेसा आहे. पण आता त्यांच्या लक्षात आलं, की तो पुतळा पर्वताच्या भक्कमपणाने उभा आहे आणि ब्रिटिशांनी इथे आपली मुळं मजबूत केली होती, ती ठिसूळ पायावर नव्हे हेही सगळया सदस्यांच्या लक्षात आलं; पण या परिस्थितीमुळे उलट त्यांनी आपला निर्णय अधिक पक्का केला- निर्धारच केला. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी गावाचा एवढा हिस्सा सुरुंगाने उडवायची वेळ आली, तरी त्यांनी मागेपुढे पाहिलं नसतं. यासंदर्भात त्यांनी बराचसा इतिहास आधी खोदून काढला- सर फ्रेड्रिक लॉलीचा इतिहास. त्यांच्या लक्षात आलं, की एटिला- हुणांचा आक्रमक राजा, निर्दयी नादीरशहा, धूर्त असा मेकियावली इतक्यांचं मिश्रण असलेला हा लॉली होता. तलवारीच्या बळावर त्याने भारतीयांना नमवलं होतं. जिथून कुठूनही विरोधाची कुणकुण लागली, तर तो सगळा इलाखा त्याने उद्ध्वस्त केला होता. ज्या भारतीयांनी लॉलीसमोर गुडघे टेकूनच आपली कैफियत मांडली, त्यांचीच तो दखल घेत असे.

आता गावातले लोक आपले काम-व्याप सोडून पुतळयाभोवती रेंगाळू लागले. त्यांना या गोष्टीचं भयंकर आश्चर्य वाटू लागलं, की इतकी वर्षं आपण या पुतळयाला सोसलंच कसं, अं!... कमरेला लोंबती तलवार घेऊन, रुबाबाने हात मागे घेऊन उभ्या असलेल्या या लॉलीकडे पाहिलं, की वाटायचं, हा सगळयांकडे मोठ्या तुच्छतेने पाहून हसतो आहे. तो मोठा जुलमीच असला पाहिजे यात शंका नाही. ती घोळदार विजार, सफेद जाकीट, गुंडाळीदार केसांचा टोप आणि ती उग्र, ठाम अशी नजर- भारतीय इतिहासाच्या ब्रिटिशपर्वातलं तिरस्करणीय असं ते प्रतीकच होतं. या माणसाचे अन्वनित जुलूम सहन कराव्या लागलेल्या आपल्या पूर्वजांच्या विचाराने गावातल्या लोकांच्या जिवाचा थरकाप उडू लागला. अशा जुलमी राजाच्या आधिपत्याखाली राहणं त्यांच्या नशिबी आलेलं होतं, नाही का!

त्यानंतर म्युनिसिपाल्टीने टेंडर बोलावलं. डझनभर कंत्राटदारांनी टेंडर्स भरली. हा पुतळा जागेवरून हलवून म्युनिसिपाल्टीच्या कार्यालयात वाहून नेण्यासाठी सर्वात कमी दराची बोली ही पन्नास हजारांची होती. तो पुतळा पुन्हा तिथे कुठे अन् कसा ठेवायचा हासुद्धा एक वैतागच होता. अध्यक्षांनी यावर थोडा विचार करून मला म्हटलं, "तू स्वत:च हा पुतळा का नाही नेत? पुतळा हलवण्यासाठीचा खर्च तू आम्हाला मागणार नसशील, तर हा पुतळा फुकटच देईन मी तुला!" त्या क्षणापर्यंत म्युनिसिपाल्टीच्या त्या सगळया सदस्यांना मी वेडे समजत होतो; पण आता मलाही कळलं, की मीसुद्धा त्यांच्याइतकाच वेडा होतो की! आता या व्यवहाराकडे मी निव्वळ गुंतवणूक या दृष्टीने पाहून हिशेबाला लागलो. जर हा पुतळा इथून काढून हलवायचा असेल, तर समजा मला पाच हजार रुपये लागतील. (कंत्राटदार फार वाढवून सांगत होते, हे मला माहीत होतंच) आणि मी तो विकला, तर त्या धातूचे मला सहा हजार रुपये मिळतील... जवळपास तीन टनांचं वजन असलेला तो माल,

त्यातून मला कितीही फायदा मिळू शकेल किंवा कदाचित मी हा पुतळा ब्रिटिश म्युझियमला किंवा त्यांच्या ‘वेस्ट मिनिस्टर अॅबी’ला विकला तर... मग तर मला वृत्तपत्राचा बातमीदार होऊन राहण्याची गरजच पडणार नाही असं वाटू लागलं.
मला हा पुतळा घेऊन जाण्यासंबंधी मंजुरी देण्याचा ठराव पास करण्यात त्यांना कसलीच अडचण आली नाही. आता मी या कामाची जंगी तयारी सुरू केली. भरघोस व्याजाच्या बोलीवर माझ्या सासऱ्याकडून मी पैसे उसने घेतले. पुतळयाचा पाया उखडून काढण्यासाठी मी पन्नास मजुरांची टीमच जमवली. गुलामांना राबवणाऱ्या मुकादमाप्रमाणे मी आता त्यांच्यावर खेकसू लागलो, सूचना देऊ लागलो. ही मजूर मंडळी संध्याकाळी सहाला आपलं काम संपवायची अन् भल्या पहाटेच या कामावर तुटून पडायची. हे मजूर खास कोप्पल गावातून मी आणले होते. तिथल्या मेम्फी जंगलातले सागवान कापायच्या- पिढ्यान् पिढ्या झालेल्या सवयीने त्यांचे अवयव अगदी भक्कम झालेले होते.
दहा दिवस आम्ही हा पुतळा उखडायच्या कामात होतो. चबुतऱ्याचे काही छिलके काढण्यात आम्हाला यश मिळालं, नाही असं नाही; पण ते तेवढंच. पुतळा हलायचं नाव घेत नव्हता. असं चालू राहिलं तर पंधरवड्यातच माझं दिवाळं वाजलं असतं. मग डायनामाईट लावून काम करायची परवानगी मी तालुक्याच्या मॅजिस्ट्रेटकडून मिळवली. सगळीकडे सुरक्षा कडं करून मी बार उडवला अन् काम झालं. कोणत्याही अवयवाला इजा होऊ न देता मी त्या सरदाराला खाली खेचण्यात यशस्वी झालो. माझी ही मिळकत घेऊन माझ्या घरी पोचण्यासाठी मला तीन दिवस लागले. लांबलचक पसरलेला तो पुतळा ओढून नेण्यासाठी खास गाडी तयार केलेली होती. अनेक बैलांच्या साह्याने ती ओढून, हा पुतळा घरी आणला गेला. मार्केट रोडने पुतळा आणताना झालेला गोंधळ काही विचारू नका. मी ओरडू लागलो, सूचना देऊ लागलो. ते पाहून लोक थट्टामस्करी करू लागले. दिवसभराचं ऊन, ती उष्णता, सर फ्रेड्रिकचं ते धूड प्रत्येक कोपऱ्यात, प्रत्येक उंचसखल जागेत रुतून बसू लागलं. अडकून बसू लागलं अन् असं अडकू लागलं, की पुढेही सरेना, मागेही जाईना. सगळ्या बाजूंनी रस्त्याची वाहतूक विस्कळीत होऊ लागली. घर आणखी दूरच होतं अन् अंधार पडू लागला. छे! एक भयंकर स्वप्नच होतं ते सगळं, त्याची आठवणसुद्धा नको वाटते. रात्रीच्या वेळेस रस्त्यावर बसून मग मी त्यावर पहारा केला. रात्री जमिनीवर असं पडून तारे मोजणाऱ्या त्या सरदाराकडे पाहून मला त्याची दया आली.
मी म्हणालो, “तुझ्या जुलमी राजवटीचं हे फळ तुला मिळालं. वाईटपणाचा शेवट असाच बरं का!”
यथावकाश हा पुतळा माझ्या लहान घरात-अर्थात आडवा- ठेवला गेला. त्याचं डोकं अन् बाहू माझ्या घराच्या पुढच्या हॉलमध्ये तर उर्वरित भाग दारातून चक्क रस्त्यावर आलेला. माझ्या कबीर गल्लीतल्या मंडळींनी ही गैरसोय स्वीकारली; मोठे समंजस लोक होते ते!
म्युनिसिपाल्टीने माझ्या या लोकसेवेचे आभार मानणारा ठराव मंजूर केला. मी लागलीच ही बातमी वायरलेसने माझ्या वर्तमानपत्राकडे पाठवली. पुतळ्याबद्दलचा वृत्तान्त असलेली दहा इंचाची बातमी होती ती. एका आठवड्यातच अध्यक्षमहोदय माझ्या घरी आले. तक्रारीचा नूर घेऊनच ते आले होते. मी त्यांना त्या जुलमी सरदाराच्या छातीवरच

बसवून घेतलं. ते म्हणाले, ''तुझ्यासाठी वाईट बातमी आणलीय. तू पुतळ्याची ती बातमी पाठवली नसतीस तर चांगलं झालं असतं. बघ काय झालंय ते.'' त्यांनी टेलिग्राम्सचा एक गठ्ठाच माझ्यासमोर धरला. हे सगळे टेलिग्राम्स भारतातल्या सगळ्या ऐतिहासिक संस्थांकडून आले होते. सर्व संस्थांनी पुतळ्याच्या या अशा हलवण्याबद्दल निषेध व्यक्त केला होता. सर फ्रेडरिकच्या संदर्भात आम्हा सर्वांचा भयंकर गैरसमज झाल्याचं आमच्या लक्षात आलं. आम्ही सांगत होतो, तो इतिहास होता वॉरन हेस्टिंग्जच्या काळातल्या वेगळ्याच लॉलीचा- हा नाही. हा पुतळेवाला फ्रेडरिक लॉली सैन्यातला गव्हर्नर होता. बंडाळीनंतर तो इथे येऊन स्थायिक झाला होता. त्याने इथलं जंगल साफ करून मालगुडी गावाची स्थापना केली होती, हे गाव वसवलं होतं. भारतातली पहिली सहकारी सोसायटी त्याने स्थापिली होती. शरयूचं पाणी वाया जायचं, ते थांबवून कालव्यांचं जाळं त्यानंच पहिल्यांदा उभारलं होतं, त्यामुळे शरयूच्या पाण्याने हजारो एकर जमिनीला लाभ झाला होता. त्याने अमुक केलं, तमुक केलं आणि शरयूच्या महापुरातून गावकऱ्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात या फ्रेडरिक लॉलीचा मृत्यू झाला होता. भारतीयांच्या प्रश्नांत, भारतीयांना विश्वासात घेऊनच निर्णय घ्यावेत असं ब्रिटिश सरकारला ठणकावून सांगणारा तो पहिलाच इंग्रज होता. इतकंच काय, आपल्या एका पत्रव्यवहारात त्याने असंही नमूद केलं होतं म्हणे, की ''स्वत:च्या हितासाठीच एक दिवस इंग्रजांना भारत सोडावा लागेल.''

अध्यक्ष म्हणाले, ''शासनाने आम्हाला, तो पुतळा पूर्ववत बसवण्याचे आदेश दिले आहेत.''

''ते शक्य नाही!'' मी ओरडलोच, ''हा माझा पुतळा आहे आणि राष्ट्रीय नेत्यांचे पुतळे मी गोळा करणार आहे.'' पण माझ्या या आवेशाचा काहीच परिणाम झाला नाही. आठवड्याभरातच देशातल्या सगळ्या वृत्तपत्रांत सर फ्रेडरिक लॉलीच्या बातम्या झळकल्या. लोकांमध्ये उत्साह संचारला. त्यांनी माझ्या घरासमोर निदर्शने केली. या पुतळ्याप्रीत्यर्थ झालेला माझा खर्च म्युनिसिपाल्टीने मला देईपर्यंत तुम्ही थांबावं अशी बाजू मी मांडली; पण सगळेजण माझ्याकडे शत्रूसारखं पाहू लागले. 'या माणसाने पुतळ्याचासुद्धा वापर करून पैसा उकळण्याचा प्रयत्न केलाय' असं प्रत्येकजण म्हणू लागला. मला धक्का बसला. माझ्या घरावर मग मी जाहिरातच लावली- 'पुतळा: विक्रीसाठी! उत्तम धातूचा, अडीच टनांचा पुतळा. देशभक्त मित्राला देण्यासाठी आदर्श भेटवस्तू! दहा हजार रुपयांपेक्षा जास्त असणाऱ्या बोलीचाच विचार केला जाईल!' हे पाहून तर सगळे संतापले. मला लाथा घालण्याच्या भावनेने ते प्रेरित झाले होते, पण अहिंसेच्या परंपरेचा मार्ग सगळ्यांसाठीच आखून दिलेला होता, तेच संस्कार होते; त्यामुळे त्यांचा नाइलाज झाला. मग त्यांनी माझ्या घरावर बहिष्कार टाकला. माझ्या घरासमोर ते पडून राहिले. निषेधाचे फलक घेऊन घोषणा देत राहिले. पुतळ्यासाठी जागा व्हावी म्हणून, माझ्या बायकोमुलांना यापूर्वीच मी गावाकडे पाठवून दिलेलं होतं; त्यामुळे अशा बहिष्काराने माझं काही बिघडलं नाही. मला आता मागच्या दारानेच पुष्कळ वेळा जाणं-येणं करावं लागलं, एवढंच. म्युनिसिपाल्टीने मला पुरातन स्मारक कायद्याअंतर्गत खटल्याची एक नोटीस पाठवली. मी अर्थातच त्यातले आरोप नाकबूल करून नोटिसीला उत्तर पाठवलं. आता कायद्यातल्या गुंतागुंतीच्या डावपेचांची लढाई सुरू झाली-

अक्कलहुशारीची लढाई; माझ्यात अन् म्युनिसिपाल्टीच्या वकिलांमध्ये. या प्रचंड पत्रव्यवहाराने, आधीच अडचणीच्या झालेल्या माझ्या घरातला एक हिस्साच व्यापून टाकला. या एवढ्या त्रासाशिवाय त्यातून आणखी काही निष्पन्न झालं नाही.

माझ्या पुतळ्याच्या मुद्द्याला मी चिकटून राहिलो; मात्र मनात हे प्रकरण केव्हा आणि कसं निकाली लागावं या चिंतेत होतो. माझ्या स्वत:च्याच या घरात, आपल्याला पाय ताणून झोपता यावं अशी तीव्र इच्छा माझ्या मनात उद्भवू लागली.

सहा महिने लागले पाहा, या प्रकरणातून सुटायला. पुतळाप्रकरण आणि अन्य अनियमिततेबाबत म्युनिसिपाल्टीकडून शासनाने अहवाल मागवला होता आणि त्याचबरोबर पालिका बरखास्त करून नव्याने निवडणुका का घेऊ नयेत याचंही स्पष्टीकरण मागवण्यात आलं होतं. मी अध्यक्षांना भेटलो आणि म्हणालो, ‘‘तुम्ही आता काहीतरी अद्भुत असं करून दाखवा... माझं घरच, राष्ट्रीय स्मारक म्हणून तुम्ही का ताब्यात घेत नाही?’’

‘‘आं! का बरं?’’ त्यांनी विचारलं.

‘‘कारण’’- मी सांगू लागलो, ‘‘सर फे्रड्रिक माझ्या घरात आहेत म्हणून! तुम्हाला तो पुतळा आता जुन्या जागेत नेऊन उभा करणं शक्य नाही. जनतेच्या पैशाचा अपव्यय होईल तो. नाही का! तो जिथे आहे, तिथेच उभा करून ठेवा ना! काय हरकत आहे? नाही तरी बऱ्याच काळापासून तो जुन्याच जागेवर होता ना! योग्य किमतीत मी माझं घर त्यासाठी विकायला तयार आहे.’’

‘‘पण आमच्या म्युनिसिपालटीकडे एवढा पैसा कुठे आहे?’’

अध्यक्षांच्या आवाजात मोठं दु:ख होतं.

‘‘अं! तुमच्याचकडे एवढा पैसा असणार निश्चितच. तुम्हाला म्युनिसिपालटीच्या फंडाची काय गरज आहे? तुमचं हे एवढं अलौकिक कार्य राहील पाहा... सगळ्या देशात एकमेव असं...’’ ब्लँकेट्सच्या ‘त्या’ उत्पन्नातून हा खर्च करायला काय हरकत आहे, असंही मी सुचवलं अन् म्हणालो... ‘‘आणि ... असं पाहा, जर तुम्हाला आता पुन्हा निवडणूक लढवावी लागली, तर त्याला किती खर्च येईल...’’ अन् हे मात्र अध्यक्षांना एकदम पटलं! घराचा सौदा झाला. काही दिवसांनंतर वर्तमानपत्रात आलेली बातमी वाचून अध्यक्षांना मोठा संतोष झाला होता-

‘राष्ट्राला भेट देण्यासाठी, मालगुडी म्युनिसिपाल्टीच्या अध्यक्षांनी सर फे्रड्रिक लॉलीचा पुतळा विकत घ्यायची तयारी केली असून या पुतळ्याची स्थापना लवकरच नवीन घेतलेल्या जागेत केली जाणार आहे. ही जागा एका उद्यानात रूपांतरित होणार असून, कबीर गल्लीच्या ऐवजी त्या रस्त्याचं नामकरण लॉली रोड असं करण्याचा ठराव म्युनिसिपाल्टीने केला आहे...’

♦♦♦

# हिरव्या ब्लेझरच्या मागावर

निरभ्र आकाश अन् दुपारच्या उन्हात तो हिरव्या ब्लेझरवाला माणूस अगदी उठून दिसत होता. त्या सगळ्या रेटारेटीच्या गर्दीतूनसुद्धा त्याच्याकडे दुर्लक्ष करता येत नव्हतं. सदरे-पागोटे घातलेले खेडूत, कोट-टोपी घातलेली शहरातली माणसं, उघड्या-अंगाचे भिकारी आणि रंगीत साड्या नेसलेल्या बायका यांची त्या थाटलेल्या दुकानांच्या अरुंद जागेत दाटी झाली होती. सगळीकडे दाटीवाटीच्या-गोंधळाच्या असलेल्या वातावरणातून तरीही तो हिरव्या ब्लेझरवाला लपू शकत नव्हता. बाजारात गडबड-गोंगाट होता. माणसं वाद करीत होती, घासाघीस करीत होती, एकमेकांना भेटत होती, बोलत होती. या सगळ्या वातावरणाला एका घुमणाऱ्या आवाजाने भारून टाकले होते- बायबल- प्रवचनकर्त्याच्या आवाजाने आणि जेव्हा या प्रवचनाच्या आवाजात थोडा विराम यायचा त्या वेळी ‘हेल्थ व्हॅन’मधून टीबी-मलेरिया या आजारांची माहिती ध्वनिक्षेपकावरून कानावर पडायची. तथापि, या सगळ्या गडबड-गोंगाट- गर्दीतून ते हिरवं ब्लेझर जणू लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत होतं! राजूला त्याकडे दुर्लक्ष करता येणं शक्यच नव्हतं. अर्थात अशा सतत आकर्षित करणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष करायची राजूची प्रकृतीच नव्हती. गर्दीपासून तसं त्यानं स्वत:ला थोडं अलिप्त ठेवलं होतं; पण पूर्णत: अलिप्त राहणं राजूला परवडणारंही नव्हतं आणि सगळयांचं लक्ष वेधून घेतल जावं असं तर राजूला बिलकूल नकोच होतं. तो कुठेही असला, तरी आपण पोलिसांच्या नजरेत येऊ अशा भीतीने पछाडलेला असायचा. आज त्याने कमरेला गुंडाळलेले असले तरी वर उघड्या अंगाने तो फिरत होता आणि वाजवीपेक्षा जादा असा फेटा त्याने डोक्याला गुंडाळलेला होता, ज्यामुळे त्याचा चेहरा बराच झाकला गेला होता आणि या अवतारामुळे आपल्याला सगळेजण खेडवळ समजतील अशी आशा बाळगून तो होता.

एका दुकानाच्या छताशेजारी, केळीच्या जाडजूड देठ-दांड्यांच्या फेकलेल्या ढिगावर राजू बसून होता. गर्दीचे निरीक्षण करीत होता. जेव्हा तो गर्दीकडे पाहत असतो, तेव्हा मोठ्या बारकाईने पाहत असतो. तो त्याचा व्यावसायिक सफाईचा धंदाच होता. मुळातच तो आळशी असा होता. त्याच्यात जो काही थोडा उत्साह शिल्लक होता, तो गर्दीत लक्ष ठेवून एखाद्याच्या खिशात हात घालण्यापुरताच होता. अर्थातच, तसं करणं हा एक जुगारच होता.

कधी, अशा जोखिमीतून काही हाताला लागायचे नाही- घातलेला हात सुरक्षित बाहेर आला, तरी पुरे अशी स्थिती असायची. कधी तो एखादी फाउंटन पेन मिळवायचा; पण म्युनिसिपाल्टीच्या मागे असणारा तो ‘खरेदीदार’ त्यासाठी चार आणेसुद्धा द्यायला तयार नसायचा आणि त्यावरून आपला ‘पत्ता’ लागायचाही धोका असायचा. राजूने स्वत:शीच शपथ घेतली होती, की फाउंटन पेन सोडून द्यायचे, इतकेच काय, कुणी एखाद्या ताटात ठेवून ते भेट म्हणून देऊ लागलं तरी घ्यायचं नाही. शिवाय त्याच्यात इतरही धोके होतेच. शाईचे, गळणाऱ्या पेनचे. त्यापेक्षा तो ‘खरेदीदार’ काय काय बोलायचा. घड्याळांबद्दलसुद्धा अशीच तक्रार असायची.

राजूला मनापासून आवडायचं, ते म्हणजे फुगलेलं पाकीट. असं कुठे त्याला दिसलं, की

मोठ्या सफाईने ते तो काढून घ्यायचा. त्यातले पैसे काढून ते पाकीट दूर फेकून द्यायचा आणि आजचं काम चांगल्या तऱ्हेनं केलं, या समाधानात तो घरी परतायचा आणि घरी आल्यावर तोंडावर पाणी मारून, केस नीटनेटके करून, एखाद्या सर्वसाधारण नागरिकासारखा पुन्हा तो बाहेर पडायचा. त्याने घरी येताना मुलांसाठी मिठाई, पुस्तकं-पाट्या आणलेली आहेत, इतकेच काय एखाद्यावेळी बायकोसाठी ब्लाऊज पीससुद्धा. ज्या वेळेस घरी येताना अधिक पैसे असायचे, तेव्हा प्रत्येक वेळेस ते पैसे लिफाफ्यात घालून छताच्या खाली कुठे कोंबून तो ठेवायचा- बायकोबद्दल तो कधी निवांत असा नसायचा. नाही तर ती फार प्रश्न विचारते, स्वत:ला त्रास करून घेते. नवऱ्याचं काम चांगलं आहे, तो सुधारलेला आहे आणि हा जो पैसा आणतो तो घरी, तो पैसा एका व्यवहाराचे कमिशन आहे, हे राजू सांगायचा अन् त्यावर त्याच्या बायकोचा विश्वास बसायचा. अर्थात हे कमिशन म्हणजे काय प्रकार असतो, हे विचारायची तसदी तिने कधी घेतली नव्हती. तिला फक्त वाटायचं, कमिशन म्हणजे काही तरी निर्दोष असे व्यवहार असावेत.

त्या ढिगावरून राजूने खाली उडी घेतली आणि त्या हिरव्या ब्लेझरच्या पाठीमागे तो गेला. अर्थात काही पावलं अंतर ठेवूनच तो त्याच्या मागावर होता. त्याला हे उपजत हुशारीने अन् सवयीने सहज जमायचं. हे अंतर एवढं मोठंही असून उपयोगाचं नसतं. ज्यामुळे त्या माणसाच्या हाताच्या हालचाली नजरेआड व्हाव्यात आणि इतकंही जवळ असू नये, ज्यामुळे काही संशय निर्माण व्हावा, कटकटी व्हाव्यात. अंतर अगदी किफायतशीर अन् हिशेबाचं असायला हवं. हे अंतर किती असावं, तर एखादा शिकारी ज्या अंतरावरून आपल्या सावजाच्या मागावर असतो, तेवढं अन् तसंच. शिकारी एवढ्या अंतरावरून शिकार करतो, सुरक्षित घरीही परततो; मात्र ही 'शिकार' त्यापेक्षा गुंतागुंतीची असते. आपली शिकार जमीनदोस्त झाली, की त्या शिकाऱ्याचा दिवस सार्थकी लागतो; पण इथे सावजाला कसलीही इजा न पोचविता त्याचं हृदय काढून घ्यावं लागतं!

जवळच्या दुकानात नारळाचं पाणी पिण्यासाठी त्या हिरव्या ब्लेझरनं एवढा वेळ घेतला, की राजूला बाजूच्या चटईच्या दुकानात चटया पाहण्यात मोठ्या धीराने वेळ घालवावा लागला. असं वाटू लागलं, की आता तो तिथनं हलणारच नाही. नारळातलं पाणी सगळं ओढून पिल्यावर आता त्यातलं खोबरं चाकूने खरवडून घेण्यासाठी जणू तो दिवसभर वाट पाहायलाही तयार होता. चमच्याने नारळातून काढलेलं ते पांढरं ओलं खोबरं अन् ते त्याच्या तोंडात गडप झालेलं पाहून राजूच्याही तोंडाला पाणी सुटलं; पण त्याने ती इच्छा दडपून टाकली. धंद्यामध्ये व्यस्त असताना, एखाद्यानं असं खाण्या-पिण्यात वेळ घालवायचा नसतो. सावज निसटायची अन् कायमचं हरपून जायची शक्यता असते यात...

राजूने पाहिलं, त्या हिरव्या ब्लेझरनं आपलं पाकीट काढलं होतं अन् तो नारळवाल्याशी पैशासाठी हुज्जत घालू लागला होता. त्याचा जाडसर अन् कर्कश आवाज राजूला अस्वस्थ करू लागला. एखाद्या वाघाच्या गुरकावण्यासारखा तो आवाज राजूला वाटू लागला; पण पट्टीच्या शिकाऱ्याने वाघाच्या अचानक डरकाळीला घाबरून पळ काढला असं कधी झालं काय! ज्या तऱ्हेने तो घासाघीस करत होता, ते पाहून राजूलाही काही विशेष वाटले नाही. त्यावरून तर त्याची हलकी आणि किरकोळ प्रकृतीच जाहीर होऊ लागली... पैशाची हाव ठेवणारा माणूस. अशी कोत्या मनाची माणसं आपलं पाकीट हरवलं, की एवढी कटकट

करीत राहतात, एवढा वैताग आणतात, की काही सोयच राहत नाही...
शेवटी एकदाचा तो हिरव्या ब्लेझरवाला निघाला. तो मग फुगेवाल्यासमोर जाऊन उभा राहिला. त्याही फुगेवाल्यासोबत सारखी घासघीस करून त्याने एक फुगा विकत घेतला- आणखी एक उदाहरण त्याच्या चेंगटपणाचे. तो म्हणत होता "हा फुगा एका आई नसलेल्या मुलासाठी. त्याला फुगा घेऊन देण्याचं मी आश्वासन दिलं आहे. हा फुगा जर फुटून गेला किंवा हरवला, तर तो रात्रभर रडत राहील आणि मला ते तसं आवडणार नाही."
आणि माणसं जेव्हा त्या अरुंद पायऱ्यांतून दाटीवाटीने, पेपर वाचणाऱ्या मेणाच्या महात्मा गांधींची प्रतिकृती पाहायला जाऊ लागली- त्यातून हिरवा ब्लेझरवालासुद्धा जाऊ लागला- त्याच वेळी राजूने संधी साधून हाथ साफ केला!
पंधरा मिनिटांनंतर राजू पाकिटातल्या वस्तू तपासू लागला होता. एका पडीत, निर्जन अशा विहिरीजवळ तो आलेला होता. या विहिरीचा पडका कठडा म्हणजे राजूच्या कामगिरीसाठी योग्य अशी जागा होती. पाकिटात दहा रुपयांची नाणी, वीस रुपयांच्या नोटा आणि काही आणे- चवल्या होत्या. राजूने ही चिल्लर नाणी कमरेला खोचली. "भिकाऱ्यांना टाकायला पाहिजे," मोठ्या मनाने तो म्हणाला. या बाजाराच्या बाहेरच्या तोंडालाच तो आंधळा माणूस मोठ्या आवाजात ओरडत असतो, कुणालाही त्याची दया येत नाही. आजकाल लोकांना काही दयामायाच राहिली नाही. त्याने तीस रुपयांच्या नोटा आपल्या फेट्याच्या टोकाला गाठ मारून पुन्हा व्यवस्थित फेटा बांधला. आता हे त्याला उरलेल्या महिनाभर पुरणार होते. किमान पंधरवड्यात उत्तम तऱ्हेने राहून बायको, मुलांना सिनेमाला घेऊन जाता येणार होते.
आता रिकामं झालेलं ते पोकळ पाकीट त्याच्या हातात होतं. आता हे पाकीट विहिरीत फेकून देऊन हात झटकायचे आणि मग मोठ्या लोकांमध्ये मोठ्या रुबाबाने वावरायचे होते. त्याने विहिरीत डोकावून पाहिले. विहिरीत उथळ असं थोडंच पाणी होतं. ते पाकीट कदाचित तरंगायची शक्यता होती आणि तरंगणारं पाकीट फारच मोठी समस्या निर्माण करणारं झालं असतं. पाण्यात पाकीट बुडविण्यासाठी त्याने त्यात खडे टाकायचे ठरविले. आता पाकिटाच्या आतल्या खिशात ठेवलेला, घडी केलेला फुगा त्याला दिसला. "अरे! हा खरेदी केलाय का त्याने..." आणि राजूला त्या माणसाचे बोलणे आठवले- पोरक्या पोराबद्दलचे.
"काय मूर्ख माणूस! पाकिटात ठेवलंय हे." राजूच्या मनात आले, "पालकांच्या अशा निष्काळजीपणामुळे पोरांना किती त्रास होतो..."
राजू आता त्याच्या विचाराने संतापला. क्षणभर त्याच्या डोळ्यासमोर ते दृश्य उभे राहिले: आई नसलेलं ते मूल दारात उभं राहून वाट पाहत आहे. त्याचा बाप कुरकुरत घरी परतला आहे. फुगा आणायचं वचन दिलेला बाप पाकीट गेल्याच्या विचारात परतला आहे... आणि अरेरे! काय दुःखद बाब आहे...
विरस होणाऱ्या त्या मुलाच्या विचाराने राजूला दयाच आली- आई नसलेलं ते बिचारं मूल... त्याची समजूत घालायला आता कुणीही नव्हतं. कदाचित, फुगा नाही हे पाहून रडत राहणाऱ्या त्या मुलाला हा रागीट माणूस मारसुद्धा देईल. मुलांबद्दल सहानुभुती

असणाऱ्यांपैकी हा हिरव्या ब्लेझरवाला वाटला नव्हता. त्या लहान मुलाच्या विचाराने राजूचे हृदय भरून आले. कदाचित आपल्या दुसऱ्या नंबरच्या पोराएवढाच असेल तो पोरगा... समजा, राजूचीच बायको मरण पावलेली असती... (खरं म्हणजे तसं झालं असतं, तर राजूची थोडी सोयच झाली असती म्हणा; कारण तसं असतं, तर राजूला त्याचे पैसे छताखाली लपवून ठेवायची गरजच पडली नसती की...) पण असा फालतू विचार त्याने चटकन् बाजूला सारला. त्याची बायको गेली, तर त्याला फारच दु:ख झालं असतं, प्रश्नच नाही. कारण मग पोरांना चांगलं ठेवण्यासाठी, त्यांच्या संगोपनाची राजूला भारीच किंमत मोजावी लागली असती... आई नसलेल्या त्या मुलाला कोणत्याही परिस्थितीत फुगा मिळायलाच पाहिजे; असं राजून ठरविलं. पण कशा तऱ्हेने? विहिरीच्या कठड्यावरून त्याने नजर लावली. दूरवरच्या जमावाचे अंतर लक्षात घेतले. फुगा परत करणं शक्य नव्हतं. एकच शक्य होतं- फुग्याची घडी पाकिटात व्यवस्थित सारून हे पाकीट त्या हिरव्या ब्लेझरच्या खिशात गुपचूप सारून टाकणे.

बायबल - उपदेशकाभोवती जमलेल्या, चर्चेला उधाण आलेल्या त्या जमावाला पाहत तो हिरव्या ब्लेझरवाला उभा होता. जमावाला एक प्रश्न विचारलेला होता, ‘‘तुमचा देव कुठे आहे?’’ तिथे गडबड-दाटीवाटी झालेली होती. राजू त्या दाटीवाटीतून हिरव्या ब्लेझरकडे सरकला. त्याच्या मुठीत घडी केलेलं अन् त्यात (फक्त) फुग्याची घडी असलेलं ते पाकीट होतं. हे पाकीट आता त्या ब्लेझरच्या खिशात सारायचं होतं.

एका क्षणात राजूला त्याची चूक लक्षात आली. हिरव्या ब्लेझरवाला त्याचा दंड पकडून ओरडला होता, ‘‘पॉकेट मार!’’ जमावातले, प्रश्नात गुंतलेले लोक आता त्या बायबलच्या प्रश्नातून बाहेर पडले आणि त्यांचं सगळ लक्ष राजूकडे केंद्रित झालं. राजू, जो मोठ्या स्वाभाविकपणे संतापून गेल्याचं दाखवीत होता, तो ओरडला, ‘‘सोडा मला!’’ तो काय सांगतो आहे त्याकडे लक्ष न देता हिरव्या ब्लेझरवाल्याने त्याच्या गालावर जोरदार ठोसा लगावला. राजूच्या डोळयासमोर अंधारी आली. क्षणार्धात तर त्याला आपण कुठे आहोत-कोण आहोत, याचाही विसर पडला. ‘अंधार’ उजळला, दृष्टी आली अन् समोरच साक्षात झाला तो हिरव्या ब्लेझरचा भयकारी वाटणारा चेहरा. दुसरा ठोसा मारण्यासाठी त्याने हात उगारलेला होता. राजू खाली वाकला. तो सांगू लागला... ‘‘मी... मी तुमचे पाकीट तुमच्या खिशात परत ठेवू लागलो होतो.’’ त्या माणसाने दात-ओठ खाल्ले. कर्कश आवाजात तो हसला. राजूला बेदम मारू लागला. सगळा जमाव त्याला हसू लागला, ‘हाणामारा’च्या आरोळयांनी गोंधळ झाला. कुणीतरी त्याच्या डोक्यावर पुन्हा मार दिला. इतकेच काय, न्यायाधीशापुढेही राजू सांगू लागला, ‘‘मी फक्त ते पाकीट परत ठेवू लागलो होतो’’ आणि प्रत्येकजण हसला. आता ते विधान पोलिस खात्यात विनोदाला कारण झाले. राजूची बायको त्याला तुरुंगात येऊन भेटली. म्हणाली, ‘‘तुमच्यामुळे आम्हाला तोंड दाखवायला जागा राहिली नाही’’ आणि ती रडू लागली.

राजूने उलट उसळून विचारले, ‘‘का? मी फक्त ते पाकीट परत ठेवू लागलो होतो...’’

राजूने अठरा महिन्यांची सजा भोगली आणि परत त्याच्या जगात दाखल झाला. आता काय करायला पाहिजे, याचा निश्चित निर्णय झाला नाही; पण राजू स्वत:लाच बजावू लागला, ‘‘आता जर का मी काही उचलून घेतलं, तर ते परत ठेवून द्यायची चूक मी

करणार नाही'' इथून पुढे त्याने लक्षात घेतलं, देवाने त्याला प्रसन्न होऊन 'सफाई' दिली ती एकाच बाजूने करायच्या कामासाठी. ही बोटं, घेतलेली वस्तू परत ठेवण्यासाठीची नाहीत.

♦♦♦

# बळीचा कोपरा

मार्केट रोड आणि मेडिकल स्टोअर्सकडे जाणाऱ्या रस्त्याच्या अगदी वळणावर त्याचा 'कारखाना' असायचा. जर का कुणाला त्याला 'कारखाना' म्हणायचं नसेल तर त्याने खुशाल दुसरं काही म्हणावं, काहीच हरकत नाही; कारण हवेतून अवतरल्यासारखंच ते दृश्य असायचं. आठ वाजता तर तुम्हाला तो दिसणार नाही आणि पुन्हा दहा वाजताही तुम्हाला तिथे काहीच दिसणार नाही; पण या आठ आणि दहाच्या दरम्यान त्याचं आगमन व्हायचं, त्याचा माल तो विकायचा अन् निघूनही जायचा.

ज्यांनी त्याला पाहिलं, ते म्हणायचे- ''काय नशीबवान माणूस! दिवसभरात फक्त तासाभराचं काम करणार अन् दहा रुपये कमविणार- ग्रॅज्युएट पोरांनासुद्धा जमणार नाही अशी कमाई- महिना तीनशे रुपये!'' असं कुणी उपरोधाने म्हटलं तर त्याला चीड यायची- ''भट्टीसमोर बसून माल तळायला, तयार करायला मला दिवसभर बसावं लागतं, यांना काय माहीत आहे?''

शेजारच्या घरातला कोंबडा जेव्हा आरवायचा, तेव्हा तो उठायचा. कधी कधी तर सकाळी तीनलाच बांग द्यायची त्याची सवय होती. या कोंबड्याची झोपमोड का झाली असावी बरं?... जाग आल्यावर रामाला आश्चर्य वाटायचं; पण आता त्याला ही सूचनाही असायची. आता तीन वाजले असोत वा चार. त्याच्यासाठी काही फरक नाही राहायचा. दिवसभराच्या कामासाठी त्याला उठावं लागायचं.

सव्वाआठच्या सुमारास तो आपला माल घेऊन यायचा. त्या वेळी त्याच्याकडे पाहून वाटायचं, याला चार हात आहेत; त्या हातांनी याने बऱ्याच गोष्टी आणल्या, सावरल्या आहेत. डोक्यावर सांभाळलेल्या भल्या मोठ्या थाळीत मांडलेले खाद्यपदार्थ, शिवाय खांद्यावर अडकविलेल्या बाकदार काठीत लोंबणारा स्टूल, एका हातात दिवा, थाळी मांडायची घडवंची असं त्याचं सामान असायचं. दररोज सहा पैशांच्या रॉकेलचा दिवा तो पेटवायचा, तो जवळच ठेवायचा. लाईटच्या प्रकाशात त्याला काम करायचं पटायचं नाही. कारण म्हणजे चिल्लरखुर्द्यावर लक्ष द्यायला, विविध प्रकारच्या खाद्यवस्तूंवर लक्ष ठेवायला विजेच्या दिव्याचं काही खरं वाटायचं नाही.

तो जेव्हा आपली थाळी दिव्याच्या प्रकाशात सजवून ठेवायचा, तेव्हा एखादा अपचनाचा रुग्णही त्यावर नजर टाकल्याशिवाय पुढे जायचा नाही... भज्यांचा शीग, जे दिसायला खुसखुशीत, मोठे असायचे; पण तोंडात विरघळून जायचे. पांढरे, पातळ आणि गोलाकार दोसे, जे मलमलसारखे नाजूक दिसायचे. चपात्या तर एवढ्या पातळ, की तुम्ही पन्नासेक, बोटांनी उचलून घ्याल. हस्तिदंतांचा ढीग वाटावा अशी बदकाची उकडून ठेवलेली अंडी आणि स्टोव्हवर उकळत असलेली कॉफी. बाजूला स्वतंत्र अॅल्युमिनियमच्या भांड्यात चटणी ठेवलेली असायची- प्रत्येक खाद्यपदार्थासोबत ती फुकट दिली जायची.

संध्याकाळच्या सिनेमाची गर्दी टॉकिजमधून बाहेर पडायच्या सुमारास तो वेळेवर तिथे पोचायचा. तो तिथे पोचेपर्यंत त्याच्या त्या राजेशाही जागेवर हक्काने बसून धंदा करणारा एक काटकुळा माणूस असायचा; पण आपल्या या मित्राला त्याचे काही वावगे वाटायचे नाही. उलट, मनाचा मोठेपणा ठेवून तो म्हणायचा, ''मी इथे नसताना, या गरीब उंदराला

करू दे की धंदा! काय हरकत आहे!" एवढी भावना पुरेशी असायची आणि अन्नसामुग्री व्यापाराचा हा राजा यायच्या एक मिनिट आधीच तो काटकुळा माणूस तिथनं बाजूला व्हायचा.

त्याच्या गिऱ्हाइकांत तो लोकप्रिय होता. ते मोठ्या कौतुकाने सांगायचे, "एका आण्यात चार चपात्या आणि सहा पैशांत कॉफी तुम्हाला दुसरीकडे कुठे मिळेल काय?" ते सगळे त्याच्या थाळीभोवती जमायचे. त्यांना जे पाहिजे ते उचलायचे. एकाच वेळेस डझनभर हात तिथे पुढे आलेले असायचे. कोणतीही वस्तू उचलायची, तपासायची, घ्यायची अशी मुभा त्या ग्राहकांना असायची.

खाद्यवस्तू हाताळणारे एवढे हात असले तरी कुणाला काय पाहिजे असतं ते त्याला लक्षात असायचं; एक प्रकारची असाधारण अशी क्षमता त्याच्याकडे होती. तो ओळखायचा, या क्षणाला कोणता टांगेवाला चपाती उचलतोय; इतकेच काय, त्याच्या टांग्याचा क्रमांकही त्याला सांगता यायचा. बुटपॉलिश करणाऱ्या पोरांचे रंगलेले-बरबटलेले हात कसे पुढे येतात आणि कष्टकरी- कामगारांचे, बदकाची अंडी निवडणारे हात नेमके कोणत्या वेळेला येतात, थाळीच्या कडेला अंडी टिचकावून खायला घेतात या सगळयांची स्पष्ट अशी जाणीव त्याला असायची.

त्याचा ग्राहकवर्ग हा फुटपाथवर घोंगावणाऱ्या- रेंगाळणाऱ्या जनतेतलाच होता. उदाहरणार्थ ब्रश आणि बॅग घेऊन सारखं 'पॉलिश-पॉलिश' असं ओरडत फिरणारी पोरं... रामाच्या मनात या गरीब बेघर पोरांबद्दल अनुकंपा असायची. अशा पोरांपैकी कुण्या पोराशी एखादं गिऱ्हाईक पैशासाठी हुज्जत घालायचं, त्या वेळी त्याला ओरडून सांगावं वाटायच- "त्या गरिबाला द्या की थोडे जास्त पैसे, काय हरकत आहे! त्याच्याबद्दल आकस ठेवू नका. तुम्ही एखादा आणा त्याला जादा दिला, तर तो दोसा-चपाती खाऊ शकेल. ही गरीब पोरं दिवसभर अर्धपोटीच असतात की!"

त्यांचे भुकेले-कोरडे डोळे पाहून रामाचे हृदय दु:खाने भरून यायचे. त्यांचे फाटके कपडे पाहून त्याला वेदना व्हायच्या आणि आपल्या बॅगा बाजूला सारून ज्या अधाशीपणाने ती पोरं त्याच्याकडे यायची, ते पाहून तर त्याला फार वाईट वाटायचं; पण तो तरी काय करणार? त्याचा धंदा हा काही दानधर्माचा कार्यक्रम थोडाच होता! ते शक्य नव्हतं. तो एवढंच करायचा- त्यांची अर्धा ग्लास कॉफी, एखाद्या इंचाने जादा भरायचा अन् ती पोरं मोठ्या चवीने शेवटच्या घोटापर्यंत ग्लास तोंडाला लावून ठेवायची.

त्या मोठ्या हॉटेलसमोर दिवसभर ओरडून भीक मागणारा तो आंधळा भिकारी, त्याच्या भिकेतला काही हिस्सा देऊन काही खायला मागायचा... आणि त्या चारा विकणाऱ्या बायका; त्याला या मजूर-बायकांचा राग यायचा. त्यांचा गोंगाट, कलकलाट मोठा वैताग आणायचा. आपल्या डोक्यावरच्या चाऱ्याच्या पेंढ्या व्यवस्थित विकल्यावर या बाया यायच्या... आणि तो धूर्त वाटणारा लंगडा माणूस- पलीकडच्या फुटपाथकडे झाडाखाली उभ्या राहणाऱ्या, वेश्येसारख्या बाईसाठी दररोज संध्याकाळी दोनचार खाद्यपदार्थ खरेदी करून जायचा...

दिवसभर विविध प्रकारची कामं-मजुरी करून या भागातले सगळे स्त्री-पुरुष कामगार दिवस सरला, की त्याच्याकडे यायचे. रात्रीचा दुसरा खेळ सुरू झाला, की जमलेला सगळा

गल्ला, खांद्यावर अडकविलेल्या, सदऱ्याखाली लोंबणाऱ्या कापडी पिशवीत तो भरायचा अन् घरी जायचा.
मार्केटच्या मागे दुसऱ्या गल्लीत तो राहायचा. बायको दार उघडायची अन् घरात भरून राहिलेला, तळलेल्या तेलाचा वास बाहेर यायचा. ती मग त्याच्या गळ्यातलं सगळं सामान घाईने उतरवून घ्यायची. सदऱ्याखालची पिशवी काढून पैसे काढून घ्यायची, मोजायला लागायची. "पाच रुपये सकाळी टाकले, त्याचे आणखी पाच रुपये आले..." त्यांना आनंद व्हायचा. अशा अद्भुत 'वाढी'बद्दल ते विचारात रमायचे. ती त्याच्या पिशवीत उद्यासाठी पुन्हा तेवढंच भांडवल टाकायची आणि अधिक उत्पन्नाचे पैसे मोठ्या काळजीपूर्वक वेगळे काढून छोट्या लाकडी पेटीत सुरक्षित ठेवून द्यायची. ही पेटी तिने तिच्या माहेराहून बऱ्याच वर्षांपूर्वी आणलेली होती.
रात्री जेवणानंतर तो पान लावायचा. तंबाखूसहित ते दाढेखाली ठेवून मग घराबाहेर ओट्यावर यायचा, झोपायचा. रात्री, त्याला ट्रॅफिक पोलिस बाजूला बसण्यासाठी सांगतो आहे, हेल्थ इन्स्पेक्टर त्याला, तुझ्यामुळे गावात रोगराई पसरून लोकसंख्येवर परिणाम होतो आहे असं सांगतो आहे- अशी स्वप्नं पडायची; पण सुदैवाने प्रत्यक्षात त्याला कुणी त्रास द्यायचं नाही. कधी तो ट्रॅफिक कॉन्स्टेबलला तर कधी तिकडून जाणाऱ्या हेल्थ डिपार्टमेंटच्या कामगारांना आपल्या पदार्थांचा एखादा पुडा द्यायचा.
अर्थातच हेल्थ ऑफिसर येऊन त्याला सांगायचा, "हे सगळे खाद्यपदार्थ तू प्लॅस्टिकच्या आवरणाखाली ठेवीत जा. नाही तर मी एखाद दिवशी सगळं फेकून देईन हं!" पण तो दयाळूच माणूस होता. त्याने प्रत्यक्षात तसं कधी केलं नाही; मात्र त्याला नेहमीच आश्चर्य वाटायचं "... याचे पदार्थ खाऊन गिऱ्हाईक जिवंत कसं राहतं, हेच समजत नाही मला... मला वाटतं, लोकांमध्ये असं विष पचविण्याची क्षमता तयार झाली असावी... सगळी धूळ पसरलेली, मागनं वाहणारं गटार, अशा वातावरणातलं हे खाणं... छे!"
अर्थातच स्वच्छता आणि आरोग्याबाबतचे सगळे नियम रामाने तोडलेले होते; पण तरीही त्याचं गिऱ्हाईक त्याचे पदार्थ खाऊन केवळ जिवंत राहिले असं नसून, त्यावर चांगलं पोसलेलं होतं... वर्षोन् वर्षे ते खाऊन त्यांना कसलीही बाधा झालेली नव्हती.
रामाचं आयुष्य तसं मोठं समाधानाचं राहिलं असं म्हणता येईल- कोणत्या तक्रारीशिवाय, कोणत्याही इजेशिवाय आणि आपलं आयुष्य साधेपणाने प्रामाणिकपणे तो जगला असं असेल तर पृथ्वीच्या अंतापर्यंत ते तसंच चालायला काय हरकत होती? कुणाला त्याच्या पैसे कमाविण्यामुळे त्रास झाला नव्हता आणि त्याचे पदार्थ खाऊन फार लोकांचे मृत्यू झाले असंही नव्हतं. म्युनिसिपाल्टीच्या गलथान कारभारामुळे जेवढे नुकसान झाले, त्याच्यापेक्षा जादा नुकसान रामाच्या व्यवसायामुळे झालेले नव्हते.
... पण मानवी अस्तित्वाला अशी सुरक्षा अप्राप्य असते. कुठंही अधिक असं सुखसमाधान दिसलं, की देवाला त्याची असूया वाटते आणि अचानक त्याची अवकृपा तो दाखवितो. एके दिवशी, तो नेहमीप्रमाणे आपल्या जागी आला, तेव्हा तो जिथे बसायचा तिथे आरडाओरड करणारा जमाव त्याने पाहिला. त्याने जरा अधिकारानेच आवाज दिला, "बाजूला व्हा, कृपा करून बाजूला व्हा!" पण त्याची कुणी दखल घेतली नाही. जवळच्या स्टेशनरी दुकानातल्या पोराने त्याची बाही ओढली अन् त्याने सांगितले, "संध्याकाळपासून त्यांचं

कुठल्यातरी मुद्द्यावरून भांडण चालू आहे.''
''कोणत्या मुद्द्यावर?'' रामाने विचारले.
''कशावर तरी...'' पोरगा म्हणाला, ''सेल टॅक्स ऑफिससमोर कुणीतरी, मतासाठी का कशासाठी, पॉम्प्लेट्स वाटत होतं, तर त्याला कुणीतरी भोसकलं म्हणे... ते कदाचित खासगी भांडणही असू शकेल... पण कुणाला त्याचं पडलंय? ज्याला भांडायचंय त्याला भांडू द्या!''
एकाने विचारले, ''आमच्याबद्दल असं बोलायची तू हिंमतच कशी केलीस?''
प्रत्येक जण त्या तरुण पोराकडे क्रोधाने पाहू लागला.
जमावातल्या कुणीतरी उलट विचारले, ''का? कुणी काही बोलू शकत नाही की काय?''
आणि त्याच्या शेजाऱ्याने त्याला थापड मारली. रामा डोक्यावर आपलं ओझं ठेवून हतबल होऊन उभा होता. ही मारलेली थप्पड भांडणाची ठिणगी पेटवायला पुरेशी होती. दुसऱ्या एकाने तिसऱ्याला मारले, तिसऱ्याने आणखी वेगळ्या माणसाला मारले आणि कुणीतरी घोषणा द्यायला सुरुवातही केली-
''...मुर्दाबाद!''
जमावातल्या दुसऱ्या भागातून कुणी ओरडलं, ''पहा! आपल्याला जी शंका होती, तेच झालं- आपल्याला चिरडून टाकायसाठी केलेला हा पद्धतशीर कट आहे-''
आरडाओरड वाढली. सोडा वॉटरच्या बाटल्यांचा हत्यारासारखा उपयोग होऊ लागला. प्रत्येक जण एकदुसऱ्याला मारू लागला. काहीजण रस्त्यालगतच्या दुकानांत घुसली आणि दुकानं बंद करायला सांगू लागली. ''का बरं?'' एका दुकानदाराने विचारले.
''एवढी दंगल चालू असताना तुझी हिंमतच कशी होते धंदा करायची?''
नागरी सभ्यपणाचे नियंत्रण अचानकच सुटले होते. प्रत्येक जण दुसऱ्यावर राग ठेवून होता. एखाद्या तासातच सगळा परिसर युद्धभूमीसारखा होऊन गेला. अर्थातच पोलिस ताबडतोब हजर झाले; पण त्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली; कारण आता या मारामारीला आणखी एक बाजू मिळाली होती. पोलिसांना तर तिहेरी काम पडलं : कायदा व सुव्यवस्था टिकविणे, स्वत:ला सांभाळणे आणि जे निरपराध जखमी झाले, त्यांना संरक्षण देणे. जी दुकानं बंद झाली नव्हती, ती लुटली गेली.
सिनेमा टॉकीज अचानक रिकामी झाली अन् त्यांतली गर्दी दंगलीच्या वेगवेगळ्या ठिकाणी पांगली. हातात सुरे घेतलेल्या लोकांची धावपळ, रक्ताळलेल्या शरीराने धावणारी-विव्हळणारी माणसं, अॅम्ब्युलन्सचा इकडे तिकडे वावर... असं वातावरण झालं. पोलिसांनी सुरुवातीला लाठीहल्ला केला, मग अश्रूधूर सोडला आणि शेवटी गोळीबार केला. पुष्कळजण त्यात ठार झाले. लोक सांगत होते, तीन हजार ठार झाले, तर सरकारी निवेदनानुसार पोलिस फायरिंगमध्ये पाच जण जखमी, तर चार जण ठार झाले होते! मध्यरात्रीच्या वेळेस जिथे बोगद्याखाली रामा लपला होता, तिथून बाहेर पडला आणि घरी परतला.
दुसऱ्या दिवशी रामा बायकोला म्हणाला, ''रोजच्या एवढा माल मी काही घेऊन जाणार नाही. तिथे कुणी असेल का नाही, मला शंकाच आहे. लोकांच्या डोक्यात कोणतं भूत संचारलंय देव जाणे! नुसत्या मतासाठी ते एकमेकांना ठार मारायला तयार झालेत!''

त्याचा अंदाज खरा होता. मार्केट रोडला माणसांपेक्षा पोलिस जास्त होते आणि त्याच्या नेहमीच्या कोपऱ्यावर तर सख्त पहाराच होता. पोलिसांच्या सूचनांनुसार त्याला आपलं दुकान दूरच्या ठिकाणी लावावं लागलं.
वर्तमानपत्रांनी या दंगलीची चौकशी व्हावी म्हणून ओरड केली. हा गोळीबार समर्थनीय होता का किंवा दंगल पेटू नये म्हणून त्यांनी काय खबरदारी घेतलेली होती वगैरे; आणि दहाबारा दिवसांत परिस्थिती पूर्वपदावर आली. पेपर विकणाऱ्या पोरांच्या ओरडण्यातून रामाने परिस्थितीचा अंदाज घेतला आणि यथावकाश तो आपल्या नेहमीच्या कोपऱ्यात येण्याच्या प्रयत्नाला लागला. ज्या क्षणाला त्याने घडवंची टाकून त्यावर थाळी ठेवली, आपली जागा घेतली, त्याच क्षणाला तिथे दोन माणसं त्याच्याकडे आली. त्यांच्या छातीवर बिल्ले लावलेले होते- ''तुला इथे दुकान लावता येणार नाही.''
''का लावता येणार नाही, साहेब?''
''त्या दिवशी आमचा नेता इथेच पडला, पवित्र जागा आहे ही.
पोलिसांनी त्याच्या छातीवर गोळी झाडली. आम्ही इथे स्मारक उभारणार आहोत. ही आमची जागा आहे. म्युनिसिपाल्टीने आम्हाला दिलीय.''
लवकरच या जागेवर एका समुदायाने किंवा तिथेच वावरणाऱ्या लोकांनी कडे केले. पैशांचे डबे फिरविले. लोकांनी नाणी टाकली, पैसे जमविले. पैसे गोळा करण्यासाठी ही जागा केवढ्या सोईची आहे, हे रामाच जाणून होता. स्मारकाचा चबुतरा बांधण्याएवढे पैसे त्यांनी गोळा केले आणि सुशोभित कुंपण, फुलांच्या कुंड्यांनी त्या जागेचे स्वरूपच बदलून गेले.
गंभीर- उग्र अशी दिसणारी मंडळी तिथे जमू लागली आणि आपसात बोलू लागली. रामाला तिथून दोनशे यार्डांच्या अंतरावर, रस्त्याच्या पार पलीकडे जाऊन बसावं लागलं. म्हणजेच, तो आता आपल्या गिऱ्हाइकांच्या नजरेच्या कक्षेबाहेर गेलेला होता- एक प्रकारच्या अंधाऱ्या जागीच. सिनेमाची गर्दी त्याच्यापासून दूर निघून जायची. ट्रॅफिक पोलिसाची नजर चुकवून टांगेवाले रस्त्याच्या बाजूला टांगे लावून घाईने काही खायला घ्यायचे; आता त्यांना तिकडे जाणे गैरसोईचे होऊ लागले. बूटपॉलिशची पोरं आता फुटपाथच्या विरुद्ध दिशेला, त्या हडकुळ्या माणसाकडे- जो रामाच्या आधी इथे येऊन बसायचा- जाऊ लागली; त्याचं भविष्य उजळू लागलं होतं.
अशात रामा थोड्याच प्रमाणात खायचे पदार्थ तयार करायचा. तरीही, त्याला शिल्लक पदार्थ घेऊनच परतावं लागायचं. त्यातलं काही घरीच खाल्लं जायचं अन् उरलेलं त्याच्या बायकोच्या सांगण्यावरून दुसऱ्या दिवशी पुन्हा गरम करून विकायला ठेवावं लागायचं. एक दोघांनी हे पदार्थ खाल्ले अन् खूप नाराज झाले. त्यांनी मग सांगायला सुरवात केली, की रामाच्या पदार्थांना आता ती चव राहिली नाही. एका रात्री जेव्हा पिशवीत केवळ दोन आणे घेऊन रामा घरी परतला, तेव्हा घराच्या ओट्यावर बसून त्याने बायकोला म्हटले, ''आपला धंदा आता संपला, असं मला वाटतं. आता यापुढे त्याचा विचार नको.''
आपली भांडी, ती थाळी, तो दिवा सगळं सामान त्याने बाजूला टाकलं आणि निवृत्त व्हायची स्वत:ची तयारी त्यानं केली. त्याची सगळी जमा रक्कम जेव्हा खर्चून गेली, तेव्हा दिवसभर लाऊड स्पिकरवरून किंचाळणाऱ्या कोहिनूर रेस्टॉरंट मध्ये नोकरीसाठी तो उभा

राहिला. वीस रुपये महिन्यावर, दिवसाच्या आठ तासांसाठी तो तिथे वेटर म्हणून राहिला. लोक यायचे, जायचे. रेडिओची गाणी वैताग आणायची; पण तो टिकून राहिला. त्याला पर्याय नव्हता. जेव्हा एखादं गिऱ्हाईक उद्धटपणाने बोलून त्याला ऑर्डर द्यायचं तेव्हा रामा म्हणायचा, ''सांभाळून बोला भाऊ... मी एकवेळ हॉटेलचा मालक राहिलेलो आहे...''

...आणि त्या तेवढ्याच आठवणीने रामाला मोठं समाधान वाटायचं...

♦♦♦

# बायकोची सुटी

झोपडीच्या दाराशी कानन बसून होता अन् रस्त्यावरची वर्दळ पाहत होता. आपल्या बैलाला पुढे घालून सामी-तेली त्याच्या पुढून गेला. जाताना तो म्हणून गेला, "नुसता आळसात काढणार आहेस का दिवस सगळा- मग दुपारी मन्टपम्कडे का नाही येत?" आणखी काहीजण घरापुढून गेले; पण त्यांच्याकडे कानन्ने लक्ष दिले नाही. सामी-तेल्याच्या शब्दांनी मात्र त्याला चाळवले होते. मन्टपम् म्हणजे एक उघड खांबी जुनाट इमारत. कानन अन् त्याच्या मित्रांसाठी ती इमारत म्हणजे एक क्लब हाऊस होते. तिथे दुपारी सगळे दोस्त जमून मोठ्या आवेशाने जुगाराच्या खेळात रंगून जायचे. कानन्ला केवळ जुगाराचा खेळच आवडायचा असं नसून, तिथला मातीचा वास, पडक्या इमारतीतून दिसणारं आभाळ, दूरच्या टेकड्या- सगळंच आवडायचं. नुसता मन्टपम्चा विचार जरी मनात आला, तर तो नकळत स्वत:शी गुणगुणायला लागायचा.
असं, दारात नुसतं मजेत बसून राहिलेलं पाहून लोक आपल्याला आळशी म्हणणार हे तो जाणून होता; पण त्याला याची फिकीर नव्हती. तो कामाला जाणार नव्हता अन् बायको घरी नसल्याने त्याला कामावर हाकलणारं आता कुणी नव्हतं. काही दिवसांपूर्वीच बायकोला त्याने मोठ्या आनंदाने बैलगाडीत बसवून पाठवून दिले होते. त्याला अशी आशा होती, की तिला किमान दहा दिवस तरी राहायचा, तिच्या माहेरी आग्रह होईल. अर्थात मुलाला सोडून राहायची चुटपूट होतीच मनात; पण बायकोच्या माहेरी जाण्याची किंमत म्हणून त्याने हे नुकसान सोसले होते. त्याला वाटले, बायको जर इथे असती, तर तिने मला असा आराम करू दिला असता का? नाहीतर या वेळी त्याला नारळाच्या झाडावर चढून, किडे-मुंग्या, पानं-फांद्या बाजूला सारून ते नारळ तोडावे लागले असते. त्या चेंगट मालकांकडून दिवसाची रुपयाची मजुरी मिळविण्यासाठी घासाघीस करीत बसावं लागलं असतं.
आता, दिवसभर घरी बसून त्याने बायकोच्या माहेरी जाण्याचा आनंद साजरा केला; त्यातली एक वाईट बाजू अशी होती, की आज त्याच्या हाती छदामही नव्हता. शिवाय, जोपर्यंत नारळाच्या झाडांवर तो चढणार नाही, तोपर्यंत पैसा नजरेला पडणार नव्हता. हातपाय ताणून तो त्या नकोशा विषयाचा विचार करू लागला. आता झाडांवर चढावं का कसं... अर्थात, त्या मोठ्या घरामागच्या दहा झाडांसाठी तो आताही गेला, तरी गरज होतीच; पण ते अशक्य होतं. त्याचे हातपाय मोठे जड पडले होते आणि फक्त मन्टपम्ला जाण्यापुरताच उत्साह त्याच्यात शिल्लक होता. पण तिथे रिकाम्या हाताने जाऊन काय उपयोग? जर त्याच्याकडे चार आणेही असते, तर तो तिथून रुपया घेऊन संध्याकाळी परतला असता. पण ती बया! त्याला बायकोची चीड आली. एवढी मेहनत करूनसुद्धा त्या मेहनतीचा एक आणाही जवळ बाळगायची आपली लायकी नाही, असं तिला वाटतं! आपले म्हणून म्हणायला चार आणेही नसावेत! इतक्या वर्षांपासून ही ढोरमेहनत करून आपण कमावितो, तेव्हापासून... त्याने विचार करायचा सोडून दिला. कारण हा विचार मग त्याला आकड्यांच्या राज्यात घेऊन जातो आणि मग हे हिशेब, हे आकडे मोठे कठीण वाटतात, गुंतागुंत वाढते... अपवाद फक्त जुगारातल्या मोजल्या जाणाऱ्या त्या पैशांचा.

एक कल्पना डोक्यात आली. चटकन् तो उठून उभा राहिला आणि आत वळला. कोपऱ्यात एक काळी लोखंडी, बऱ्याच वर्षांची जुनी पेटी होती- घरातली सर्वांत महत्त्वपूर्ण अशी मालमत्ता. त्याच्या बायकोची होती ती. पेटीसमोर तो बसला आणि पेटीच्या कुलुपाकडे निराशेनेच पाहू लागला. ते एक ओतीव लोखंडाचे टोकदार काठांचे कुलूप होते. त्याने हातात धरून ते ओढून पाहिले आणि आश्चर्याची बाब म्हणजे ते पटकन् उघडले. ''देवाने कृपा केली'' तो स्वत:शीच म्हणाला आणि त्याने पेटीचे झाकण धाडकन् उघडले. बायकोच्या मौल्यवान असलेल्या वस्तूंकडे तो पाहू लागला : काही ब्लाऊज, दोनतीन साड्या; त्यांपैकी एक त्याने लग्नात विकत घेतलेली. तिने ती एवढी वर्षं सांभाळून ठेवावी, याचे त्याला आश्चर्य वाटले. एवढी वर्षं... एवढी... किती... त्याने आकडेवारी आठवून तपासायचा प्रयत्न केला. ''ती सांभाळूनच ठेवणार; कारण ते वापरायची तिची लायकी कुठे आहे...'' त्याला वाटलं अन् अशा कडवट निष्कर्षावर तो हसला. उतावीळ होऊन त्याने सगळे कपडे बाजूला सारले आणि पैशासाठी तिची लाकडी पेटी त्याने शोधली. पण ती रिकामी होती. एक जुनं गुळगुळीत तांब्याचं नाणं त्यात शकुन म्हणून ठेवलेलं होतं. ''सगळी रोख कुठे गेली?'' त्याने रागातच प्रश्न केला. खोलवर विचार करून तो म्हणाला, ''सगळे पैसे तिने आपल्या भावासाठी नाही तर आणखी कुणासाठी नेले असणार. मी इथे एवढे कष्ट करून, मजुरी करून कमवितो, ते काय तिच्या भावासाठी, अं? तिचा भाऊ पुन्हा दिसला, तर गळाच दाबतो त्याचा!'' तो स्वत:शीच म्हणाला आणि या कल्पनेवर त्याला फार संतोष वाटला.

धांदलीने शोधताना त्याचे लक्ष लाकडी पेटीतल्या सिगारेटच्या पत्र्याच्या डब्याकडे गेले. त्याने तो डबा हलवून पाहिला. त्यातून चिल्लर पैशांचा चांगलाच आवाज आला. ते पाहून त्याला भरून आले. त्याच्या लहान मुलाचा, लाल रंगाचा सिगारेटचा डबा होता तो. त्याला आठवले- आपल्या पोराने डाकबंगल्याच्या मागच्या कचऱ्याच्या उकंड्यातून उचलून तो आणला होता आणि छातीशी धरून तो धावतच आला होता. त्यात माती भरून-रिकामी करून ते पोरगं गल्लीत दिवसभर सारखं खेळत होतं आणि मग कानगने जेव्हा त्याला, त्याचा पैशाचा डबा करू असं सुचविलं, त्या वेळी पोराने त्यासाठी मोठा तीव्र विरोध केला होता. पण काननने त्याला तपशीलवार कारणं देऊन पटविलं अन् असं पटविलं, की पोरगं मोठ्या आनंदाने त्यासाठी तयार झालं. मग पोरगं सांगू लागलं, ''जेव्हा हा डबा भरेल, तेव्हा त्या मोठ्या घरातल्या पोरासारखी मोटार कार मी विकत घेणार! मी एक (तोंडाने वाजवायची) सारंगी अन् हिरवी पेन्सिलसुद्धा नक्कीच घेणार!'' पोराच्या योजना ऐकून कानन मोठ्या कौतुकाने हसला होता. त्याने लोहाराकडे जाऊन त्या डब्याचे झाकण बंद करून घेतले होते आणि त्यावर पैशाचं नाणं जाईल इतपत फट करवून घेतली होती. पोरासाठी तो एक आनंदाचा ठेवा झाला होता आणि बापाने त्यात पैसा टाकावा म्हणून त्याने तो डबा काननसमोर धरला होता. आपल्या भुवया उंचावून त्याने पुष्कळदा विचारलेही होते, ''बाबा, भरला का हो आता? मी केव्हा उघडू हे?'' आईच्या ट्रंकेत, तिच्या साड्यांत तो डबा लपवून ठेवायचा आणि त्या ट्रंकेला व्यवस्थित कुलूप लावल्याची खात्री होईपर्यंत तर त्याला चैन पडायची नाही... त्याच्याकडे पाहून काननला मोठा अभिमान वाटायचा. तो म्हणायचा, ''फार काळजी घेणारं पोरगं आहे पहा! तो मोठं काम करेल.

त्याला आपण शहरातल्या शाळेत टाकूया.''
आता काननने तो पैशाचा डबा हलवून पाहिला, उजेडात त्या फटीतून किती पैसे त्यात आहेत हे पाहायचा प्रयत्न केला. बायकोबद्दलच्या संतापाच्या भावनेतून आता त्याच्या मनात लूटमारीचा विकृत विचार उद्भवला. तो डबा उलटा करून एवढ्या जोराने तो वाजवीत राहिला, की त्या चिल्लर-खुर्द्याच्या आवाजाने त्याच्या कानाला दडे बसले; पण एकही नाणं त्यातून बाहेर पडलं नाही. लोहाराने आपलं काम उत्तम केलं होतं- डब्याची फट, अगदी नाणं जाईल तेवढ्याच आकाराची अन् तेही एकाच बाजूने जाईल अशी - करून ठेवली होती. त्यातला पैसा कुठल्याही परिस्थितीत बाहेर येणार नव्हता. थोडं थांबून काननने स्वत:लाच विचारले, ''लहान पोराचे पैसे असं काढून घेणं योग्य आहे का?''
''का नाही?'' लोभीपणाने त्याच्या आतून हलक्या स्वरात आवाज आला, बाप आणि मुलगा वेगळे थोडेच असतात? आणि त्यापेक्षा, ''तू हे त्याचे पैसे दुप्पट-तिप्पट करून देशील की! तेव्हा ते पैसे पुन्हा डब्यात भरून ठेवता येतील की! त्या दृष्टीने पाहिलं तर हा छोटा डबा उघडून उलट तू पोराला मोठी मदतच करणार आहेस!' हे जमलं. मग आता ही फट मोठी कशी करायची हे तो पाहू लागला. तो उठला आणि त्याच्या धुंडाळण्यात काही निरर्थक वस्तूच त्याच्या हाती आल्या- तार, बाटलीची बुचं, बैलाची नाल अशा निरुपयोगी वस्तू... एकही धारदार अशी वस्तू नाही, त्या चाकूचं काय झालं- कुठंय तो? त्याच्या बायकोच्या विचाराने तो संतापला. कसलीही वस्तू गायब करायची त्या बाईची सवय... किंवा असं असेल, की तिने ही चीजसुद्धा भावासाठी नेली असेल सोबत! त्याने तो डबा हातात धरून काही वेळा जमिनीवर आपटून पाहिला. जोरदार तऱ्हेने. अशामुळे तो वाकडातिकडा झाला, विद्रूप झाला; पण त्यातून पैसा काही निघाला नाही. त्याने इकडेतिकडे पाहिले. भिंतीवर देवाची तसबीर खिळयाला अडकविली होती. त्याने तसबीर काढली आणि खिळा उपसून घेतला. जमिनीवर ठेवलेल्या देवाच्या तसबिरीकडे त्याने एकवेळ पाहिले, थोडा अस्वस्थ झाला अन् त्याने देवाच्या पायाशी थोडावेळ डोळे मिटून घेतले. त्याने दगड आणला. एका हाताने डब्यावर खिळा रोखून दुसऱ्या हाताने दगडाने मारू लागला; पण खिळा बाजूला निसटला आणि दगडाच्या माराने त्याचा अंगठा काळ-निळा झाला. वेदनेने तो विव्हळला आणि त्याने डबा फेकला. कोपऱ्यात फेकलेला डबा जणू बेरकीपणाने त्याच्याकडे पाहू लागला. 'च्यायला!' तो चिडला. थोडावेळ बसून त्याने अंगठ्याला चिंधी बांधली, पुन्हा त्या लाल डब्याकडे पाहून तो म्हणाला, ''आता दाखवितोच तुला'' स्वयंपाकघराच्या कोपऱ्यातून त्याने दोनही हातांनी पहार उचलून आणली. डब्यावर उंच उचलून दणकन् त्यावर ती मारली. तेवढ्याशा त्या डब्याला हा मार फारच मोठा होता. डबा फाकून सगळ्या बाजूंनी फुटून गेला. त्यात बोटं सारून त्याने त्यातली सगळी नाणी अधाशासारखी काढून घेतली. मोजली... सहा आणे आणि तीन पैसे-तांब्याचे. कमरेच्या धोतराला त्याने पैशाची गाठ मारली अन् घराला कुलूप घालून तो निघाला.
मन्टपम्ला त्याचं नशीब त्याच्यावर रुसून होतं. इतकंच काय त्याच्याजवळही ते फिरकलं नाही. थोड्याच वेळात तो सगळे पैसे हरला. काही वेळ उधारीवरही तो खेळत राहिला; पण कुणीतरी त्याला उठविलं अन् पैसेवाला त्याच्या जागी बसला. तो एकदम उठला अन्

घराकडे निघाला, त्यावेळी ऊन उतरलेलंही नव्हतं.

त्याच्या गल्लीतून तो वळला, तेव्हा गल्लीच्या त्या टोकाला त्याची बायको, एका हातात गाठोडे, दुसऱ्या हाती पोराचा हात धरून येत असलेली त्याला दिसली. कानन स्तब्ध उभाच राहिला. 'स्वप्नच असावं बुवा हे!' स्वत:शीच तो पुटपुटला. ती जवळ येत म्हणाली, ''एक बस इकडेच निघाली होती अन् मी परतले.'' ती दाराकडे जाऊ लागली. एका भयाने- अगतिकतेनेच तो तिच्याकडे पाहू लागला. तिची पेटी सगळी विस्कटलेली पडून होती, देवाची तसबीर जमिनीवर, तोडफोड केलेला तो लाल पत्र्याचा डबा- हे सगळं घरात पाऊल पडताच ती आता पाहणार. परिस्थिती निराशाजनक होती. यांत्रिकपणे त्याने दार उघडले. ''तुम्ही असे का दिसत आहात...'' आत जाताना तिने विचारले. त्याच्या मुलाने एकदोन नाणी त्याच्या समोर धरून म्हटले, ''मामाने हे दिले मला. त्या पेटीत टाकूया हे...'' कानन्च्या तोंडून अनाहूतपणे उसासा निघाला. ''तुम्ही ते काय केलं बाबा?'' मुलाने विचारले. काननने आपला अंगठा वर घेतला; म्हणाला, ''काही नाही. मी माझा अंगठा चिरडला.'' नशिबावर हवाला ठेवून आता येणाऱ्या वादळाला तोंड देण्यासाठी कानन त्यांच्यामागून आत गेला.

♦♦♦

# छाया

''मला उद्या सिनेमासाठी चार आणे तुला द्यावेच लागतील, सांगतो!''

संबू म्हणाला आणि त्याच्या आईला दडपण आले. सिनेमा यायच्या आधी सहा महिन्यांपासूनच ती एक प्रकारच्या दहशतीखाली वावरत होती. तो आता नाही, हे माहीत असतानाही त्याला पडद्यावर पाहणं लोकांना कसं सहन होतं? तिच्या भावना लक्षात घेऊन निर्माते आता हा सिनेमा प्रदर्शित करणार नाहीत अशी अंधूक आशा तिला होती; पण जेव्हा रस्त्यावर सिनेमाची जाहिरात वाजतगाजत जाऊ लागली, जाहिराती घेऊन, तिच्या नवऱ्याचे मोठे पोर्ट्रेट्स वाजतगाजत जाऊ लागले, तेव्हा काही दिवसांसाठी हे गाव सोडून जावं असंही तिला मनातून वाटलं. पण अशक्य आणि अव्यवहार्य असा तो मार्ग होता. आता सिनेमा आलेला होता. तिसऱ्या गल्लीपलीकडे असलेल्या त्या टॉकिजमध्ये दिवसाचे किमान सहा तास तरी तिचा नवरा आता बोलणार होता, हलणार होता, गाणारही होता.

संबूला मात्र आपले वडील परत आल्यासारखाच आनंद झाला होता.

''आई, सिनेमा पाहायला तू येणारसुद्धा नाहीस का?''

''नाही.''

''प्लीज, प्लीज तुला यायलाच पाहिजे.''

सिनेमाला येणं कसं अशक्य आहे, हे तिला स्पष्ट करावं लागलं होतं.

मुलाचा तर्क मोठा निष्ठुर वाटत होता- ''ते का अशक्य आहे? तू त्यांचे फोटो दररोज पाहत नाहीस का? अन् भिंतीवर लावलेला तो मोठा फोटो?''

''पण हे फोटो बोलत नाहीत, हलत नाहीत, गात नाहीत.''

''आणि तरीही, त्या जिवंत चित्रांपेक्षा तू यांनाच महत्व देतेस.''

दुसऱ्या दिवशी संबू दिवसभर उतावीळ झालेला होता. त्याच्या वर्गात जेव्हा सरांचं लक्ष दुसरीकडे जायचं, तेव्हा तो शेजारच्या मित्राकडे वाकून सांगायचा,

''त्या सिनेमासाठी माझ्या वडिलांना दहा हजार रुपये मिळाले आहेत. आज संध्याकाळी मी तो पहाणार आहे. तूसुद्धा येणार आहेस नं?''

'' 'कुमारी' पाहायला?'' उपहासाने मित्र विचारायचा. त्याला तामीळ सिनेमा आवडायचे नाहीत- ''मी त्या रस्त्यानेही जाणार नाही.''

''हा सिनेमा इतर तामीळ सिनेमांसारखा नाही. दररोज रात्री माझे बाबा, आम्हाला त्याची स्टोरी वाचून दाखवायचे. फार मनोरंजक अशी स्टोरी आहे त्याची. बाबांनीच ती सगळी स्टोरी लिहिलीय. लिहिण्याचे अन् अॅक्टिंगचे त्यांना दहा हजार रुपये मिळालेत. तू येणार असशील तर मी तुलासुद्धा घेऊन जाईन.''

''मी तामीळ सिनेमा पाहणार नाही.''

''तो काय इतर सिनेमांसारखा साधारण तामीळ सिनेमा नाही. तो एखाद्या इंग्रजी सिनेमाएवढाच चांगला आहे.''

...पण संबूचा मित्र ठाम होता. संबूला सिनेमा पाहायला एकटंच जावं लागलं. तामीळ सिनेमातला तो नवा असा प्रयत्न होता- कमीत कमी संगीताचा वापर असलेली आधुनिक

अशी कथा. ती कुमारीची एक कथा होती- एक तरुण मुलगी, जिने चौदाव्या वर्षी विवाहासाठी नकार दिला, जिला पुढं शिकायचं होतं, कमवायचं होतं आणि त्यामुळे तिच्या वडिलांनी (संबूचे वडील) तिला घालवून दिले होते आणि शेवटी तिला क्षमा केली होती.
चार आण्यांच्या क्लासमध्ये बसलेला संबू, सिनेमा सुरू होण्याची उतावीळ होऊन वाट पाहू लागला... सहा महिने झाले होते वडिलांना पाहून... घरी वडील नाहीत ही त्याच्यासाठी फार दु:खाची बाब होती.
अंधार झाला. ट्रेलर्स आणि जाहिराती संबू पाहत होता; पण कसल्याही उत्साहाशिवायच. शेवटी, त्याचे वडील पडद्यावर झळकले. घरी जसे घालायचे तेच धोतर आणि सदरा घालून ते होते; ते घरी जसे बसायचे, तसेच इथे टेबलासमोर बसले होते. मग तिथे एक मुलगी आली. त्यांनी तिच्या डोक्यावरून हात फिरविला आणि तिच्याशी बोलू लागले- अगदी तस्सेच; जसे ते घरी संबूशी बोलायचे आणि मग बाबांनी या मुलीला अंकगणित शिकविले. तिने आपल्या गुडघ्यावर पाटी घेतलेली होती आणि ते तिला सांगत होते - ‘‘एक गाडीवान एका मैलासाठी दोन आणे घेतो. रामाजवळ तीन आणे आहेत. गाडीवान त्याला तेवढ्या पैशात किती दूर घेऊन जाईल?’’ मुलगी दातात कलम धरून डोळयांची उघडझाप करीत विचार करू लागली. वडील विचारू लागले, ‘‘हं, कुमारी सांग!’’ संबू हळूच बोलू लागला, ‘‘सांग काही तरी, नाही तर तू थापड खाशील बरं! तुझ्यापेक्षा मी बाबांना अधिक ओळखतो.’’ तथापि, कुमारी अंकगणितात संबूपेक्षा अधिक हुशार होती. तिने बरोबर उत्तर दिले. वडील खूष झाले होते. संबू जेव्हा एखादं गणित अचूक सोडवून दाखवायचा, तेव्हा बाबा केवढे कौतुक करायचे! एकदा संबूने एक तोटी असलेल्या आणि गळणाऱ्या एका हौदाच्या गणिताचे उत्तर अनाहूतपणे काहीतरी सांगून दिले होते, तो प्रसंग संबूला आठवला. हौदाला पुन्हा भरण्यासाठी तीन तास लागतील, असं उत्तर ऐकल्यावर बाबा खुर्चीतून कसे उठले होते, शाबासकी देण्यासाठी!
सिनेमा संपला, थिएटरमधले दिवे लागले आणि संबूने प्रोजेक्टरच्या त्या खिडकीकडे वळून पाहिले... त्याचे बाबा जसं काही त्या खिडकीत अंतर्धान पावले होते. आता त्याच्या बाबांशिवायचे हे सगळे जग त्याला दरिद्री वाटू लागले. तो घराकडे धावला. त्याची आई वाट पाहत होती.
‘‘तुला उशीर झाला- नऊ वाजलेत.’’
‘‘सिनेमा आणखी लांबला असता तर किती चांगलं झालं असतं! तू विनाकारणच हटून बसलीस आई! तू का पाहत नाहीस?’’
जेवण सरेपर्यंत तो सांगत होता- ‘‘बाबा जसे गाणे म्हणायचे अगदी तस्संच, ते जसे चालायचे, अगदी तस्संच...’’ त्याची आई हे सगळं, मोठं उदास होऊन ऐकू लागली.
‘‘तू का बोलत नाहीस आई?’’
‘‘मी काय बोलू... माझ्याजवळ बोलण्यासारखं काही नाही...’’
‘‘तुला हा सिनेमा आवडत नाही का?’’
तिने काही उत्तर दिले नाही. तिने विचारले, ‘‘तू उद्यासुद्धा सिनेमाला जाणार आहेस?’’
‘‘हो, आई. सिनेमा असेपर्यंत मी जमल्यास दररोज तो पाहणार आहे. तू मला दररोज चार

आणे देशील?’’
‘‘बरं.’’
‘‘रोजचे दोनही शो मी पाहू का?’’
‘‘अंहं, नको. तसं करू नको. तुझ्या अभ्यासाचं कसं होईल मग?’’
‘‘तू सिनेमा पाहायला येणार नाहीस का आई?’’
‘‘नाही. ते जमणार नाही.’’
आठवडाभर संबू दररोज तीन तास बाबांच्या संगतीत राहिला आणि प्रत्येक शो संपताना त्याला मोठं उदास वाटू लागलं. प्रत्येक दिवस त्याच्यासाठी दुराव्याचा वाटू लागला. रात्रीचा शो पाहायसाठीसुद्धा त्याला जागं राहायचं होतं; पण आईला त्याच्या अभ्यासाची अधिक काळजी होती. वेळ महत्त्वाची होती; पण आईला ते समजत नव्हतं; अभ्यास थांबविता येईल; पण बाबांना थांबविता येणार नाही. रात्रीचा सिनेमा पाहणाऱ्यांबद्दल त्याला हेवा वाटू लागला.
त्याच्या सततच्या आग्रहाला तोंड देणे अशक्य झाल्याने शेवटच्या दिवशी सिनेमा पाहायला त्याची आई तयार झाली. बायकांच्या क्लासमध्ये ती बसली. सिनेमासाठी बसण्याकरिता तिला सगळा धीर गोळा करावा लागला. ट्रेलर आणि जाहिरातींच्या स्लाईड्स चालू होत्या तोपर्यंत ती मोठी निश्चिंत अशी होती. सिनेमा सुरू झाला आणि तिच्या छातीत जोराने धडधडू लागले. पडद्यावर तिचा नवराबायकोशी बोलत होता, गात होता, चालत-फिरत होता, पोशाखात वावरत होता... तोच पोशाख, तसाच आवाज, तसाच राग, तसाच लोभ... तिला वाटू लागलं, सगळया गोष्टी तिच्यावर क्रूरपणे आघात करीत आहेत...
तिने अनेकवेळा डोळे मिटून घेतले; पण ते दृश्य डोळ्यांपुढून काही जाईनासे झाले. त्यात एक क्लेशकारक असं बंधन होतं आणि ते दृश्य आलं- त्या दृश्यात तो खुर्चीत बसून पेपर वाचत होता. वर्तमानपत्र वाचण्यात तो केवढा तल्लीन होऊन जायचा! त्याच्या वैवाहिक जीवनात याच त्याच्या सवयीवर ती किती चिडायची, त्याच्याशी भांडायची! ...शेवटच्या दिवशीसुद्धा पेपर समोर धरून तो आरामखुर्चीत बसलेला पाहून तिला राग आवरला नव्हता- ‘‘तुम्ही आणि तुमचा तो पेपर! दिवसभर मीसुद्धा झोपून राहीन तर बरं!’’ आणि ती निघून गेली होती; पण नंतर तिने पाहिले, तेव्हा तिचा नवरा खुर्चीत मागे लवंडलेला होता, पेपरचं पान तसंच त्याच्या तोंडावर पडून होतं...
हे अगदी असह्य असं दृश्य होतं. तिला हुंदका फुटला.
पुरुषांच्या क्लासमध्ये बसलेल्या संबूला ते वर्तमानपत्राचे दृश्य आवडले होते- ती पोरगी अचानक येते आणि वडिलांना विचारीत राहते, ‘‘तुम्ही काय वाचायला असं...’’ तिच्या प्रश्नांनी-व्यत्ययाने आता तिला चांगलाच प्रसाद मिळणार : वडील ओरडणार - ‘‘कुमारी! बाहेर जातेस आता की मी तुला बाहेर काढू?’’ पोरीला माहीत नाही, बाबांशी कसं वागावं ते! संबूला तिचा फार मोठा राग आला.
पोरीचं असं क्रात्य वागणं संबू मोठ्या उत्सुकतेनं पाहत होता आणि तिकडून बायकांच्या क्लासमधून त्याला मोठ्याने दिलेले हुंदके ऐकायला आले; धावपळ अन् आरडाओरड अचानक सुरू झाली- ‘‘लाईट लावा! अपघात झाला!’’ सिनेमा बंद पडला. लोक

इकडेतिकडे धावू लागले. अशा व्यत्ययामुळे संबू चिडला आणि बाकावर उभं राहून काय झालं, ते पाहू लागला. आपल्या आईला उचलून नेत असल्याचे त्याने पाहिले. ''ती माझी आई आहे! तिचासुद्धा मृत्यू झाला का...'' तो आक्रोश करू लागला, तो उडी मारून तिकडे धावला. तो रडू लागला, हुंदके देऊ लागला. कुणीतरी त्याला सांगितलं : ''तिला काही झालं नाही. चक्कर आलीय फक्त, विनाकारण गोंधळ करू नको.'' ते तिला बाहेर घेऊन गेले. पुन्हा अंधार झाला. लोक आपापल्या जागांवर बसले आणि सिनेमा पुन्हा सुरू झाला. आईने डोळे उघडले. ती उठून बसली अन् म्हणाली, ''चल, निघून जाऊ...'' ''हो, आई चल...'' त्याने टांगा बोलाविला आणि त्यात तिला बसविले. टांग्यात तो चढून बसताना, थिअटरमधून त्याच्या कानावर त्याच्या ओळखीचा आवाज आला- ''कुमारी! बाहेर जातेस आता की मी तुला बाहेर काढू?'' संबूचे हृदय भरून आले आणि तो रडू लागला. त्याला दोनही बाजूंनी दु:ख होऊ लागलं- आईच्या आजाराचं आणि आता बाबांची ही शेवटचीच भेट होती, या भावनेचं... कारण दुसऱ्या दिवशी सिनेमा बदलणार होता.

♦♦♦

# इच्छेने झालेली गुलाम

घरात कुणालाही तिचं नाव माहीत नव्हतं; तिचं नाव अय्याशिवाय दुसरं काही असू शकेल, याचा कुणी क्षणभर विचारही केलेला नव्हता. मुलांपैकी कुणालाही आजवर माहीत नव्हतं, की कुटुंबात ती केव्हा आली? घरातला सर्वांत मोठा मुलगा केवळ सहा महिन्यांचा असताना, ती नोकर म्हणून आली. आता तो सतरा वर्षांचा असून, कॉलेजात शिकतो आहे; त्याच्या पाठीवर पाच मुलं आहेत अन् शेवटचं मूल चार वर्षांचं आहे.

या मुलांत, प्रत्येकाच्या वेळेस अय्याने आपल्या लहानपणचा अनुभव घेतलेला आहे. त्यांच्यासोबतीने ती वाढली; मग ते तिला मागे टाकून मोठे झाले- पुढे गेले, की ती दुसऱ्या लहान मुलासाठी मागे परत येऊन तिच्या किंवा त्याच्या सोबतीने मोठी झाली. असं म्हणता येईल, की तिची वयोमर्यादाच सहा वर्षांपर्यंतची आहे. त्याच्या पुढे ती गेली, की अय्या म्हणजे एक वैताग होऊन जायची. नसत्या उपद्व्यापामुळे होणारा वैताग. उदाहरणच द्यायचं झालं, तर नोकरमाणसांसोबत वावरताना तिला किती कठीण होऊन जायचं, त्याचं देता येईल. एक स्वयंपाकी, दोन नोकर, एक मजुरीण, एक माळी अन् त्याचा बिनपगारी मदतनीस अशा नोकर माणसांसोबत वावरताना, त्यांच्यातले विनोद-थट्टामस्करी तिला कळायची नाही. त्यांच्या चर्चेत तिला रुची नसायची; मात्र त्यांच्यातली प्रत्येक बाब ती मालकिणीच्या कानावर घालायची. एकदा माळ्याने मालकाबद्दल काही बोललं होतं, ते अय्याने सांगितल्यामुळे त्याची नोकरी जायची वेळ आली होती. नोकर लोक राहायचे, तिथं ती चांगलीच बदनाम होती. सगळयांच्या जाण्या-येण्यावर नजर ठेवायची जबाबदारी तिने स्वत: होऊन घेतलेली होती. कामावर उशिरा येणारा तिच्या नजरेतून सुटायचा नाही. उशिरा येणारा दिसला, की ही म्हातारी असा कांगावा करायची, की ते ऐकून मालकीण यायची अन् त्या नोकराला काही दंड लावायची.

हे जसं तिनं स्वत:वर लादून घेतलेलं काम होतं, अगदी तसंच तिचं काम म्हणजे, सकाळी मुलांची इंग्रजीची शिकवणी घेण्यासाठी घरी येणाऱ्या शिक्षकाकडे लक्ष ठेवणे. मुलांना हा मारतो की काय या शंकेने त्या शिकवणीच्या दरम्यान अय्या तिथेच रेंगाळायची. सगळया शाळा म्हणजे तुरुंग अन् सगळे शिक्षक म्हणजे तिचे शत्रू, अशीच तिची भावना होती. तिला वाटायचं, लोक मुलांना शाळेत पाठवितात म्हणजे एक प्रकारे क्रूर शिक्षाच देतात. तिची दोन मुलं (आता आजोबा झालेली) घरी येऊन औषध, मलम आणण्यासाठी कशी तीन पैसे मागायची, याची तिला आठवण आहे- दुसऱ्या दिवशी छड्यांच्या माराने उमटणाऱ्या वळांवर हे मलम लावणे अत्यंत गरजेचे असायचे. ती मुलं म्हणायची, शाळा तपासणीसच स्वत: पोरांना असं मलम खरेदी करायला सांगतात. शिकविण्यातला तो एक भागच असायचा.

एकदोन वेळा मुलांना तिने विचारले होते, "तुम्ही तिथे थांबून मार का खाता?"

"आम्हाला तसं करावंच लागंत." मुलं सांगायची- "आमच्या अभ्यासाचाच तो एक भाग आहे. असं वाटतं, एवढ्या एवढ्या छड्या दररोज आम्हाला मारल्याशिवाय त्यांना पगारच मिळत नसेल."

म्हातारीला याशिवाय शिक्षकांबद्दल अधिक काही माहिती मिळण्याचा प्रसंग आला

नव्हता आणि त्यामुळे ती घरी शिकवणीसाठी येणाऱ्यावर नजर ठेवून असायची. जर तो आवाज वाढवून शिकवू लागला- रागावू लागला, तर ती म्हणायची, ‘‘लहान मुलांवर तुम्ही काही जास्त शक्कल लावू नका. ही मुलं काही साधारण मुलं नाहीत अन् यांना तुम्ही काही कराल, तर आमचे मालक तुम्हाला जेलमध्ये टाकतील, सांगून ठेवते!’’ तिच्या, स्वत: होऊन घेतलेल्या जबाबदाऱ्या म्हणजे, ब्रेडवाला बागेतल्या लॉनवरून सायकल चालवीत नाही ना, हे पाहणे, पेपरवाला बागेतच पेपर टाकून निघून तर जात नाही ना यावर लक्ष ठेवणे आणि दुपारच्या वेळेस नोकर डुलकी तर घेत नाही हेसुद्धा पाहणे. घरी येणाऱ्या पाहुण्यांची पण ती सरबराई करायची, त्यांचे कपडे धोब्याकडून धुऊन घेण्यासाठी मदत करायची आणि याहीपेक्षा अधिक म्हणजे घरातले सगळे जण बाहेर गेलेले असले, की सगळी दारं लावून, कड्या लावून ती समोर व्हरांड्यात बसून घराची राखण करायची. अर्थात, ही सगळी तिची कामं म्हणजे दुय्यम स्वरूपाची कामं. तिचं मुख्य काम- ज्या कामाचे, तिला दोन वेळा जेवण, महिन्याला पंधरा रुपये आणि वर्षाला तीन साड्या असे मिळायचे, ते म्हणजे दिवसाचे बारा तास स्वत:ला गुंतवून ठेवणं.

घरातलं सगळ्यात लहान मूल, राधा- सकाळी सहा वाजताच माडीवरून आवाज द्यायची, ‘अय्या!’ अंथरुणातूनच तिने आवाज दिलेला असायचा आणि अय्याला आपलं शरीर सांभाळत शक्य तेवढ्या लवकर वर जावं लागायचं, कारण राधा आपल्या दोन हाकांमध्ये पंधरा मिनिटांपेक्षा जादा अंतर ठेवायची नाही आणि तेव्हा राधाचा प्रश्न असायचा - ‘‘तू कुठे गेली होतीस अय्या?’’

‘‘सगळा वेळ तर इथंच होते की बेटा!’’

‘‘रात्रभर तू इथेच होतीस?’’

‘‘हो, हो इथेच तर होते.’’

‘‘तू झोपली होतीस की जागी बसून होतीस?’’

‘‘वा! माझी राधा झोपलेली असताना, मी कशी निजेन बरं?

मी हातात सुरी घेऊन बसलेली होते. कुणी वाईट माणसं जर तुझ्याजवळ यायचा प्रयत्न करू लागली, तर मी त्यांची डोकीच उडविली असती.’’

‘‘ती सुरी कुठे आहे?’’

‘‘मी आताच खाली जाऊन ती ठेवून आले.’’

‘‘तू मला ती सुरी दाखविणार नाहीस का अय्या?’’

‘‘अंहं, नाही. मुलांनी ते पाहू नये. कधीच पाहू नये. जेव्हा तू मोठी मुलगी होशील, जेव्हा अलमारीच्या कुलुपापर्यंत तुझे हात पोहोचतील, त्या वेळी मी तुला ती सुरी दाखवीन. तू उंच होशील ना, मग?’’

‘‘हो, मग त्या वेळी मी स्वत: अलमारी उघडेन, त्यातले बिस्किट काढून घेईन, हो किनई अय्या?’’

‘‘हो, हो; पण तू सकाळपर्यंत असं अंथरुणात निजून राहशील, तर कधीही उंच होणार नाहीस. तुला लवकर उठून तोंड धुऊन दूध प्यावं लागेल आणि मग पहा किती वेगाने तू मोठी होशील! तीन दिवसांपूर्वी तू मला कसलाही त्रास न देता उठली होतीस ना, त्या वेळी तू केवढी उंच झाली होतीस!’’

ग्लासभर दूध प्यायल्यावर राधा बागेत पळते अन् आपण गाडी गाडी खेळू असा हट्ट धरते. अय्याला आता ती तीनचाकी सायकल अन् बाहुली बाहेर आणावी लागते; मग आपली बाहुली छातीशी धरून राधा सायकलवर बसते. अय्या मग पूर्ण वाकते अन् सायकल ढकलायला लागते. ही सायकल आगगाडी होते, फुलांच्या कुंड्या-गाडीची स्टेशनं होतात आणि वेलींचा गोलाकार मंडप म्हणजे- बेंगलोर स्टेशन. अय्या इंजिन ड्रायव्हर व्हायची, बाहुली म्हणजे राधा आणि राधा म्हणजे त्या बाहुलीची आई व्हायची. कधी ती आगगाडीला थांबविणारा- चालू करायला सांगणारा माणूस व्हायची. अधूनमधून अय्या थांबायची आणि बटव्यातून तंबाखूची चिमूट काढून तोंडात टाकायची; मग राधा आवाज द्यायची- ''गाडी का थांबली आहे?''

''तिचा स्क्रू ढिला झालाय. मी तो बसविते आहे.''

''तू काही खाते आहेस...''

''हो; पण तो तंबाखू नाहीय. ते डोकेदुखीचं औषध आहे. मी ते या स्टेशनवरच्या औषधाच्या दुकानातून घेतलं आहे.''

''इथं औषधाचं दुकान आहे?''

''हो, हो.'' अय्या म्हणायची अन् जास्वंदीच्या झुडपाकडे बोट दाखवायची. राधा त्या झुडपाकडे पाहून सांगायची, ''अहो दुकानदार, आमच्या या बिचाऱ्या अय्याला चांगलं औषध द्या ना. तिचं डोकं फार दुखत असतं, डॉक्टर...''

बेंगलोरला गाडी बराच वेळ थांबते, मग तिथे वाळूवर अय्याला झोपायला सांगण्यात येतं आणि राधा बाळाला घेऊन शहरात फिरायला जाते... राधाला तिची आई आंघोळीला बोलवायची, तोपर्यंत हा खेळ चालायचा आणि त्यानंतर अय्याला एखाद्या तासाची सवड मिळायची.

दुपारच्या वेळेस बागेत खेळण्यांच्या मध्ये अय्या गुडघ्यावर बसलेली असायची. त्या लहान हत्ती, घोड्यांमध्ये आपल्या स्थूल शरीराचं मुटकुळं करून बसलेली अय्या मोठी हास्यास्पद दिसायची. बाहुल्या आणि भातुकलीची भांडी सभोवार असायची. अय्या आणि राधा एकमेकींपासून यार्डाच्या अंतरावर असायच्या; पण आपापल्या-स्वत:च्या घरात बसलेल्या. त्या स्वयंपाक करायच्या, पूजा करायच्या अन् एकमेकींशी बोलायच्या. चटकन् उठून अय्याच्या घरी जाणं राधाला सहज शक्य होतं; पण तसंच राधाकडे येणं अय्यासाठी प्रचंड त्रासाचं होऊन जायचं; मग बसल्या जागीच ती पुढे वाकायची- त्याचा अर्थ राधाच्या घरी गेल्यासारखा व्हायचा. तासाभराच्या अशा खेळण्याने अय्या थकून जायची, तिला झोप यायची. ती म्हणायची, ''राधा, रात्र झाली, चल झोपू या लवकर म्हणजे सकाळी लवकर उठता येईल.''

''रात्र झालेली आहे?''

''हो. मी केव्हाच दिवा लावून ठेवला आहे.'' अय्या उत्तर द्यायची.

काहीतरी वस्तूकडे निर्देश करून ती दाटूमुटीचा दिवा करायची.

''गुड नाईट अय्या... तू आता निजून घे.''

स्वत:साठी जागा करून अय्या लवंडायची.

''तू झोपलीस का अय्या...?''

“हो. खोटंखोटं झोपलीय, खरी नाही...” दर पाच मिनिटांनी अय्या म्हणायची, अन् मग लवकरच राधा झोपून जायची.
चार वाजले, की अय्याची ड्युटी पुन्हा सुरू व्हायची. आठ वाजेपर्यंत राधा सारखं तिला धावाधाव करायला लावायची; मग त्यानंतर राधाला घेऊन जाऊन अंथरुणावर झोपवावं लागायचं. अंथरुणावर तिला गोष्टी पाहिजे असत. पलंगाच्या खाली जमिनीवर बसूनच मग अय्याच्या गोष्टी रंगायच्या : चुन्याच्या पावडरमध्ये लोळून एक काळं माकड पांढरं होतं-गोरं होतं आणि एका राजकुमारीशी त्याचं लग्न होतं. लग्न समारंभात कुणीतरी त्याच्यावर पाणी शिंपडतं आणि त्याचा खरा रंग दिसतो; मग त्याला बाहेर घालवून दिल जातं. इतक्यात एका धोब्याला त्याची दया येते. तो त्या माकडाला नीळ टाकून धुऊन काढतो, त्याची इस्त्री करतो; मग आता राजकुमारीचे पुन्हा त्याच्यावर प्रेम जडते... गोष्ट संपली, की राधा म्हणायची, “मला झोपायला आवडत नाही. चल, आपण काही खेळू या.” अय्या विचारायची “तो म्हातारा बागूलबुवा आत येऊ देत का?” बागूल बुवाचा उल्लेख मोठा परिणाम करायचा. नेहमीच पोरांवर बागुलबुवाची भीती असतेच. कम्पाउडमधल्या त्या कुत्र्याच्या घरात या बागुलबुवाला कोंडून ठेवलेलं असायचं. तो नेहमी अय्यावर ओरडायचा. इतकेच काय, त्या घराचे दार तोडून, बाहेर येऊन तिला पळवून घेऊन जायची त्याची नेहमीच तयारी असायची. त्याच्याबद्दल बोलताना अय्या नेहमीच दातओठ खावून आवेशाने बोलायची : “त्या गुंडाला मार देऊन मी त्याचा चेंदामेंदा करून टाकला! फार वाईट माणूस- जंगली माकड नुसता! मला क्षणभरही उसंत घेऊ देत नाही. तू जर का झोपली नाहीस तर त्याला मारून त्या कुत्र्याच्या घरात त्याला कोंडून ठेवायला मला वेळ कसा मिळेल बरं?”
तीन महिन्यांतून एका वेळी, अय्या डोक्याला तेल लावायची, केस विंचरायची, शुभ्र साडी नेसून घरातल्या सगळयांचा निरोप घ्यायची, नमस्कार करून सैदापेठसाठी ती निघायची. तिथं तिचं घर होतं. दर महिन्याच्या सुरुवातीला दोन उद्धट दिसणारी माणसं परसदारी येऊन उभी राहायची. अय्याच्या, फार दूर असणाऱ्या घराचा हा एवढा एकच पुरावा इतरांसाठी असायचा. अय्या त्यांच्याबद्दल सांगायची : ‘सैदापेठचे भामटे!’
“त्यांची एवढी दखल तू का घेतेस?” मालकीणबाई कधी विचारायच्या.
“मी काय करू शकते? नऊ महिने सांभाळ करून त्यांना जन्म दिल्याची ही किंमत मी मोजते आहे!” हिचा महिन्याचा पगार मिळाला, की त्यातला बराच हिस्सा या दोघांत वाटण्यात जायचा.
एवढी म्हातारी, बेढब आणि स्थूल अशी अय्या - ही त्या बसमध्ये चढत कशी असेल, सैदापेठला जात कशी असेल, परत कशी येत असेल, याचं सगळयांना नेहमीच आश्चर्य वाटायचं; पण ती संध्याकाळी परतायची. येताना राधासाठी एक गुप्त अशी भेट आणायची - पेपरमिंटच्या गोळयांची. गुप्त यामुळे म्हणायचं, की बाजारातली उघड्यावरची अशी मिठाई मुलांसाठी घेऊन यायची नाही, अशी तिला तंबी दिलेली असायची.
एकदा ती सैदापेठला गेली आणि संध्याकाळी परतलीच नाही. अंगणात उभं राहून राधा गेटकडे लक्ष ठेवून होती. दुसऱ्या दिवशीही तिचं परतायचं काही चिन्ह दिसेना. राधा रडू लागली. तिची आई आणि घरातले सगळे चिडले होते. “कदाचित तिला चक्कर आली असेल

अन् ती मेली असेल!'' सगळे सांगू लागले- ''अशी वेंधळी आणि आंधळी - मूर्ख बाई! आजपर्यंत असंकसं झालं नाही, याचंच आश्चर्य वाटायला पाहिजे! आपण सुटी घ्यावी असं परस्परच तिच्या डोक्यात आलं असेल नक्कीच. मी तिला काढूनच टाकेन, असं झालं तर! काही अडत नाही. ही जुनी नोकर मंडळी सगळं गृहीत धरतात. त्यांना धडा शिकवायला पाहिजे...''

तीन दिवसांनंतर अय्या परतली. घरमालकिणीसमोर उभी राहून तिला नमस्कार केला. मालकिणीला बरंही वाटलं अन् रागही आला. ''आता पुन्हा कधीच तुला जाऊ देणार नाही. जर का तू निघून गेलीस ना, तर कायमचीच जा!... तू वेळेवर का परतली नाहीस?''

अय्याला हसू आवरलं नाही. तिच्या काळया चेहऱ्यावर उजाळा दिसू लागला. डोळयांत चमक आली.

''मुर्खासारखं हसायला काय झालं तुला?''

तोंडावर पदर घेऊन अय्या सांगू लागली, ''तो आलाय...''

आणि ती हसली.

''कोण?''

''म्हातारा...''

''कोण आहे तो म्हातारा?'' मालकिणीने विचारले.

''मी नाव घेऊ शकत नाही...'' अय्याने लाजत म्हटले.

''तुझा नवरा?''

''होय.''

अय्या आता गदगदून बोलू लागली, ''मी त्याला जेवू घालावे, त्याची काळजी घ्यावी असं त्याचं म्हणणं आहे... मी घरी गेले, तेव्हा तो तिथे आलेला होता. असं बसून होता, की जसं काही त्याने घर सोडलंच नव्हतं. त्याने मला धमकीच दिलीय बाई! तो तिथे बागेत आहे. तुम्ही त्याला भेटून घ्या, की एकदा...'' मालकिणीने तिकडे जाऊन पाहिले- थकलेला असा एक म्हातारा माणूस तिथे निघण्याच्या तयारीत उभा होता.

''नुसतं पाहत राहू नकोस, आमच्या मालकीणबाईंना नमस्कार कर.'' अय्या म्हणाली. त्याने आपले हात सावकाश वर करून नमस्कार केला. तो म्हणाला, ''मला थाईची गरज आहे.'' अय्याचा तिच्या नावाने केलेला उल्लेख ऐकायला विचित्र वाटू लागला. ''मला थाईची गरज आहे. तिला माझ्यासाठी जेवायला करावं लागेल, तिला माझ्यासोबत जावंच लागणार'' तो कुत्सितपणाने बोलला.

''तुला जायचं आहे का, अय्या?''

अय्याने चेहरा वळविला आणि मान हलवून ती लाजली. ''पुष्कळ वर्षं झाली, तो दूर गेला होता. सिलोनच्या चहाच्या मळयात तो होता. तो परत येईल हे कुणाला माहीत होतं? सरकारनं त्याला परत पाठविलं. आता त्याची काळजी कोण घेईल?''

अर्ध्या तासाने अय्या घराबाहेर पडली. आपल्या गुलामाबद्दल रुबाब ठेवून जाणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या मागे. तिने सगळयांचा मोठ्या जड अंत:करणाने निरोप घेतला होता.

- अपवाद फक्त राधाचा होता. ती स्वयंपाकघरातून बाहेर यायलाच तयार नव्हती. स्वयंपाकघराबाहेर उभं राहून जेव्हा अय्या तिला बाहेर येण्याबद्दल विनवू लागली, तेव्हा

आतूनच राधाने विचारलं होतं : ‘‘तो म्हातारा बागूलबुवा तुला घेऊन जातो आहे का?’’
‘‘हो, बेटा. मोठा वाईट माणूस आहे.’’
‘‘कुत्र्याच्या घराचं दार कोण उघडं टाकलं होतं?’’
‘‘कुणी नाही. तोच दार तोडून बाहेर आला.’’
‘‘त्याला काय पाहिजे?’’
‘‘मला घेऊन जायचं आहे त्याला.’’
‘‘तो जाईपर्यंत मी बाहेर येणार नाही. ठिकंय तू जा- तो इथे यायच्या आत तू जा बरं!’’
अर्ध्या तासापर्यंत स्वयंपाकघराच्या दारासमोर उभं राहून मग अय्या, राधाच्या सांगण्यानुसार घराबाहेर पडली होती.

♦♦♦

# लीलाचा मित्र

व्हरांड्यासमोर शिवशंकर उभे होते. कामाला गडीमाणूस कसा मिळेल याचा विचार करीत होते, त्याच वेळेस गेटसमोर सिद्धा रेंगाळत असलेला त्यांना दिसला.
‘‘तुम्हाला गडी पाहिजे का साहेब?’’ सिद्धाने विचारले.
‘‘ये, आत तर ये’’ शिवशंकर म्हणाले. गेट उघडून सिद्धा आत येताना शिवशंकरांनी त्याचं बारकाईनं निरीक्षण केलं आणि स्वत:शीच ते म्हणाले, ‘‘तेवढा काही वाईट दिसत नाही... काही का असेना, दिसायला तर गडी भक्कम आहे.’’
‘‘काय रे, यापूर्वी कुठं होतास?’’ त्यांनी विचारलं.
‘‘जी, त्या तिकडे बंगल्यात-’’ अधांतरीच त्यानं दिशा दाखवीत म्हटलं- ‘‘डॉक्टरच्या बंगल्यात.’’
‘‘काय, नाव काय त्यांचं?’’
‘‘मला माहीत नाही मालक,’’ सिद्धा म्हणाला, ‘‘ते मार्केटजवळ राहतात.’’
‘‘का सोडलं त्यांनी तुला?’’
‘‘त्यांनी गाव सोडलं, मालक,’’ सिद्धानं ठरलेलं उत्तर दिलं.
शिवशंकर यांना काही निर्णय घेता येईना. त्यांनी बायकोला बोलावलं. तिने सिद्धाकडे पाहून घेतलं आणि म्हणाली, ‘‘अगोदरपेक्षा हा बरा दिसतोय.’’ त्यांची, पाच वर्षांची मुलगी लीला बाहेर आली, तिनंही सिद्धाला पाहिलं, आनंदाने ती ओरडलीच- ‘‘बाबा! ती सांगू लागली - याला आपल्या घरी ठेवूया. परत नका पाठवू. मला आवडला हा.’’ आणि ठरलं...
दररोज दोन वेळा जेवण आणि दरमहा चार रुपये एवढ्याशा बोलीवर सिद्धाला कामावर ठेवण्यात आलं. किरकोळ कामं करणं, कपडे धुणं, बागकाम करणं, लाकडं तोडणं अन् लीलाला सांभाळणं अशी त्याची कामं होती.
‘‘सिद्धा, खेळायला ये!’’ लीला ओरडायची आणि सिद्धाला हातातलं काम टाकून तिच्याकडं धावावं लागायचं. त्याची संगत तिला फार आनंददायी वाटायची. ती त्याच्याकडे चेंडू फेकायची, तो तिच्याकडे फेकायचा, ती म्हणायची, ‘‘आता चेंडू आभाळात फेक बरं!’’ सिद्धा चेंडू हातात पकडायचा, क्षणभर डोळे मिटायचा अन् तो उंच फेकायचा. चेंडू खाली आला, की तो म्हणायचा, ‘‘बघ, वर जाऊन, चंद्राला हात लावून आलाय् ! बघ- इथे पहा, इथे थोडा चंद्र लागला आहे...’’ लीला लक्षपूर्वक चेंडू पाहायची आणि म्हणायची- ‘‘मला तर काही दिसत नाही.’’
‘‘तू पटकन पाहायला पाहिजे होतं’’ सिद्धा सांगायचा,
‘‘- हे लागलेलं, परत जाऊन चंद्राला चिकटतं. आता पटकन् पहा हं’’ सगळा चेंडू सगळया बोटांनी सिद्धा झाकायचा, त्यात थोडी फट ठेवून त्यातून तिला पाहायला सांगायचा.
‘‘अरे, खरंच की!’’ लीला म्हणायची ‘‘पाहिला मी चंद्र. तो ओला असतो का?’’
‘‘होऽऽ ओलाच असतो.’’ सिद्धा सांगायचा.
‘‘आभाळात काय असतं सिद्धा?’’
‘‘देव!’’ तो सांगायचा.

“गच्चीवर जाऊन हात वर केले, तर आपल्या हाताला लागेल का तो?”
“इथं गच्चीवर उभं राहिल्याने नाही बरं,” तो म्हणायचा.
“नारळाच्या झाडावर तू उभं राहशील, तर तुला आभाळाला नक्की हात लावता येईल.”
“तू लावलास कधी?” लीला विचारायची.
“हो, खूप वेळा,” सिद्धा सांगायचा - “जेव्हा जेव्हा पौर्णिमा असते, तेव्हा मी नारळाच्या झाडावर चढून त्याला हात लावतो.”
“चंद्र तुला ओळखतो का?”
“हो,” तो म्हणायचा- “आता, ये माझ्यासोबत.” तो तिला मागे, परसदारी घेऊन जायचा. विहिरीपाशी थांबवून वर बोट दाखवायचा. चंद्र तिथेसुद्धा असायचाच. लीला टाळ्या वाजवून मोठ्या अचंब्याने ओरडायची, “चंद्र इथेही आहे, तो तिथेही होता- असं कसं?”
“आपल्या मागे मागे यायला मी त्याला सांगितलं होतं.”
लीला आत जाऊन आईला सांगायची, “आई, सिद्धा चंद्राला ओळखतो” संध्याकाळी तो तिला घेऊन घरात जायचा आणि त्याच्यासाठी जणू ती त्याची शिकवणी घ्यायची. बाराखडी- चित्रांची पुस्तकं यांनी भरलेली पेटी आणि पेन्सिलचे तुकडे तिच्याकडे होते. आपल्या या शिक्षकाला शिकविण्यात तिला मोठा आनंद वाटायचा. त्याला ती मांडी घालून बसायला सांगायची, त्याच्या बोटांत पेन्सिल धरायला लावून त्याच्यासमोर बाराखडीचं पुस्तक ठेवायची. एक पेन्सिल अन् एक पुस्तक आपल्याकडे ठेवून त्याला बजावायची, “हं, लिही आता,” आणि लीलाने तिच्या पुस्तकात जे काही लिहिलेलं असायचं ते पाहून तसं लिहायचा सिद्धा प्रयत्न करायचा. तिला दोनतीन मुळाक्षरं यायची अन् मांजर, कावळ्यासारखं दिसणारी चित्रं ती काढायची. बस; पण ते तेवढं सिद्धाला प्रयत्न करूनही जमायचं नाही. त्याचे प्रयत्न पाहून ती म्हणायची, “मी काढलेला कावळा काय असा आहे काय? ’B’ का मी असं काढते का -” तिला त्याची दया यायची अन् त्याला पुन्हा सगळं ती शिकवायला बसायची; पण चंद्राला कौशल्याने हाताळणारा तो भला माणूस- त्याला पेन्सिल चालवायला अजिबात जमायचे नाही. त्याचा परिणाम म्हणून आडमूठ अशा त्याच्या मनगटाला कळ लागेपर्यंत, लीला त्याला जागेवरून हलू द्यायची नाही. “तुझी आई तुला जेवायला बोलावीत आहे वाटतं” असं सांगून तो त्यातून सुटायची धडपड करायचा. पेन्सिल टाकून लीला खोलीतून धावायची अन् एकदाची ती शाळा सुटायची.
जेवणानंतर लीला झोपायला पळायची. सिद्धाला गोष्ट घेऊन तयार राहावं लागायचं. पलंगाशेजारी- खाली बसून तो अद्भुत गोष्टी सांगायचा : जंगलातल्या प्राण्यांच्या, स्वर्गातल्या देव-देवतांच्या, जादूने सोन्याचे किल्ले उभारणाऱ्या जादूगारांच्या गोष्टी - या किल्ल्यांत पाळलेल्या पशु-पक्ष्यांना घेऊन राहणाऱ्या राजकन्या...
दिवसेंदिवस ती त्याच्या अधिक सोबत राहू लागली. आपल्या जागेपणाच्या सगळ्या वेळेत तो तिला सोबतीला पाहिजे असायचा. बागेत काम करीत असताना किंवा लाकूडफाटा गोळा करताना आणि बाजारात खरेदीसाठी जाताना ती त्याच्यासोबतच असायची.
एका सायंकाळी सिद्धा साखर आणायला गेला, लीला त्याच्यासोबत होतीच. ते घरी आले, तेव्हा लीलाच्या आईच्या लक्षात आलं, की लीला घालायची ती सोन्याची चेन तिच्या

गळ्यात दिसत नाही.
''तुझी चेन कुठे आहे?''
लीलाने फ्रॉकमध्ये पाहून घेतलं. इकडेतिकडे पाहून ती म्हणाली,
''काय माहीत!'' तिच्या आईने तिच्या तोंडात मारलं आणि म्हणाली, ''ती पेटीत काढून ठेवीत जा म्हणून किती वेळा सांगितलं होतं मी तुला!''
''सिद्धा, सिद्धा!'' तिने मग मोठ्याने आवाज दिला. सिद्धा जसा आत आला, लीलाच्या आईने त्याच्याकडे नजर टाकली अन् तिला वाटले, सिद्धा गोंधळून गेल्याचं दिसतंय. तिने त्याला चेनबद्दल विचारलं. त्याच्या घशाला कोरड पडली. त्याने नजर टाळून म्हटले, ''मला माहीत नाही.'' ती त्याच्यावर ओरडली. पोलिसांची भीती घातली. मध्येच, ती स्वयंपाकघरात गेली, शेगडीवर काहीतरी ठेवलेलं होतं. लीला तिच्या मागे गेली. ती हट्ट करू लागली,
''आई, मला साखर दे, मला भूक लागलीय.'' त्या दोघी बाहेर आल्या आणि त्यांनी आवाज दिला ''सिद्धा, सिद्धा!''
उत्तर मिळालं नाही. रात्रीच्या काळोखात सिद्धा निघून गेला होता.
शिवशंकर तासाभराने घरी आले. घडलेली हकिकत ऐकून संतापले आणि पोलिस स्टेशनला जाऊन त्यांनी तक्रार नोंदविली.
जेवणानंतर लीला झोपायलाच तयार नव्हती. ''सिद्धानं येऊन गोष्ट सांगितल्याशिवाय मी झोपणार नाही... मला तू बोलू नकोस... तू नेहमीच सिद्धाला छळतेस, रागावतेस, तू केवढी दुष्ट आहेस!''
''पण त्याने तुझी चेन घेतली ना?''
''घेऊ दे! काही नाही होत! मला गोष्ट सांग...''
''झोप, झोप...'' लीलाला मांडीवर निजवून तिची आई तिला थापटू लागली.
''आई, मला गोष्ट सांग!'' गोष्टीचा विचारसुद्धा आता तिच्या आईला शक्य नव्हता. तिची मन:स्थिती विचलित झाली होती. सिद्धाच्या विचाराने तिची घबराट झाली होती. तिला वाटू लागलं, या माणसाला आता घरातली सगळी माहिती झालीय, तो आता रात्री येऊन चोरीसुद्धा करेल, काही नेम नाही. कसल्या गुंड माणसाला आपण घरात घेतलं होतं, या विचाराने ती घाबरली होती. देवाची कृपाच म्हणावी, की चेनसाठी त्या गुंडाने पोरीच्या जिवाला धक्का लावला नाही...
''झोप, झोपी जा लीला.'' तिची आई समजूत घालू लागली.
''तुला हत्तीची गोष्ट येत नाही का?'' लीलाने विचारले.
''नाही.''
लीला रडवेली झाली. तिने विचारले, ''सिद्धा आपल्या खुर्चीवर येऊन का बसत नाही, आई?'' आईने उत्तर दिले नाही. लीला पुन्हा सांगू लागली, ''आपण सिद्धाला आपल्यासारखं घरात झोपू देत नव्हतो, म्हणूनच सिद्धा निघून गेला. त्याला घराच्या बाहेरच का झोपायला द्यायचो आपण, आई? मला वाटतं तो आपल्यावर रागावलाय, आई!''
शिवशंकर परत येईपर्यंत लीला झोपून गेली होती. ते म्हणाले, ''त्या माणसाला लावून

आपण केवढा धोका पत्करला होता! तो सराईत गुन्हेगार आहे, असं दिसतंय. पोरांकडून असे दागिने हिसकावण्यावरून त्याला पाच-सहा वेळेस शिक्षा झाली होती, म्हणे. मी जी माहिती दिली, त्यावरून इन्स्पेक्टरने त्याला तत्काळ ओळखले.''

''तो आता कुठे आहे?'' बायकोने विचारले.

''पोलिसांना त्याचा पत्ता असतो. ते त्याला लवकरच पकडतील, काळजी करू नकोस. त्याला नोकरीवर ठेवण्यापूर्वी इन्स्पेक्टरांना सांगितलं नाही, म्हणून ते चिडले होते...''

चार दिवसांनंतर ऑफिसमधून शिवशंकर घरी आले, तेव्हाच इन्स्पेक्टर आणि कॉन्स्टेबलनी सिद्धाला धरून आणले. खाली मान घालून सिद्धा उभा होता. अत्यानंदाने लीला ओरडली, ''सिद्धा, सिद्धा!'' रडत रडतच ती पायऱ्या उतरून त्याच्याकडे धावली.

''त्याच्याजवळ जाऊ नकोस'' इन्स्पेक्टरने तिला अडवले.

''का बरं?''

''तो चोर आहे. त्याने तुझी सोन्याची चेन घेतली नाही का?''

''घेऊ दे! मी नवीन चेन आणून घेईन.'' लीला म्हणाली आणि सगळयांना हसू आलं आणि मग शिवशंकर सिद्धाशी बोलले; मग त्याला विश्वासात घेऊन त्यांची बायकोही त्याच्याशी बोलू लागली. त्याने ती चेन कुठे ठेवली, असं दोघं विचारू लागली.

''मी ती घेतली नाही,'' खाली पाहून सिद्धा पुटपुटला.

''मग आम्हाला न सांगता तू का पळून गेलास?''

लीलाच्या आईने विचारले. त्याला उत्तर नव्हतं.

लीलाचा चेहरा रडवेला झाला, ''पोलिसदादा, त्याला सोडून द्या; मला त्याच्याशी खेळायचंय.''

''बाळ,'' पोलिस इन्स्पेक्टर सांगू लागले, ''तो चोर आहे.''

''असू दे.'' लीला निग्रहाने सांगू लागली.

''अशा निरागस पोरीची चेन चोरायला तुला शरम कशी वाटली नाही!'' इन्स्पेक्टर म्हणाले- ''अजून उशीर झालेला नाही, परत कर आणि पुन्हा असं करणार नसल्याचं वचन देशील, तर मी तुला सोडून देईन.'' लीलाचे आईवडीलसुद्धा तेच सांगू लागले. लीलाला या सगळया गोष्टीचा वीट आला. तिने म्हटले, ''त्याला सोडून द्या. त्याने चेन घेतली नाही.''

''बाळ, तू काही अधिकृत साक्षीदार होऊ शकणार नाहीस, बरं!'' इन्स्पेक्टर हसून सांगू लागले.

''नाही, नाही, त्याने घेतली नाही!'' लीला किंचाळून सांगू लागली. तिचे बाबा म्हणाले, ''हे पहा, तू ऐकलं नाहीस, तर मी रागावेन हं तुझ्यावर!''

अर्ध्या तासानंतर इन्स्पेक्टर आपल्या कॉन्स्टेबलला म्हणाले, ''याला ठाण्यात घेऊन चला. मला वाटतं, आज रात्रभर याच्यासोबत मला बसावं लागेल.'' कॉन्स्टेबल सिद्धाला घेऊन निघाला. लीला त्यांच्यामागे रडत गेली- ''त्याला घेऊन जाऊ नका, त्याला इथे राहू द्या, इथे राहू द्या.'' तिने सिद्धाचा हात गच्च धरून ठेवला. सिद्धा मूक होऊन तिच्याकडे पाहू लागला, एखाद्या प्राण्याप्रमाणे... शिवशंकरांनी लीलाला घरात नेले. लीला रडत होती.

शिवशंकर घरी आले, की त्यांची बायको दररोज त्यांना विचारायची, ''चेनबद्दल काही कळालं का?'' आणि त्यांची मुलगी विचारायची, ''सिद्धा कुठे आहे?''

‘‘त्यांनी सिद्धाला लॉकअपमध्येच ठेवलं आहे. तरीही सिद्धा काहीच सांगायला तयार नाही.’’ शिवशंकर उत्तर द्यायचे.
‘‘बाप रे! काय उद्दाम माणूस असेल हा!’’ त्यांची बायको म्हणायची, तिचा थरकाप व्हायचा.
‘‘ही एक-दोन वेळा जेल भोगलेली माणसं, त्यांची भीती निघून गेलली असते, काही केल्या ती गुन्हा कबूल करीत नाहीत.’’
थोड्याच दिवसांनंतर, चिंचेच्या भांड्यात लीलाच्या आईच्या हाताला चेन लागली. तिने ती काढून नळाखाली धुऊन पाहिलं - प्रश्नच नाही. तीच चेन होती ती. लीलाची चेन. लीलाला ती दाखविल्यावर ती म्हणाली, ‘‘दे मला ती. मला गळयात घालायचीय.’’
‘‘त्या चिंचेच्या भांड्यात कशी काय पडली ती?’’ आईने विचारले.
‘‘मला माहीत नाही...’’ लीलाने उत्तर दिले.
‘‘तू टाकलीस काय ती भांड्यात?’’ आईने विचारले.
‘‘हो!’’
‘‘केव्हा?’’
‘‘किती दिवस झाले... त्या दिवशी...’’
‘‘मग तू का सांगितलं नाहीस तेव्हा?’’
‘‘मला माहीत नाही...’’ लीला म्हणाली.
शिवशंकर घरी आल्यावर त्यांना हे कळालं. ते म्हणाले, ‘‘पोरीला आता चेन घालायची नाही. ती एकदोन वेळा हातात चेन घेऊन फिरत होती, सांगितलं होतं ना मी तुला? तिने अशीच केव्हातरी ती चेन टाकली असेल त्या भांड्यात... हे सगळं प्रकरण तिच्यामुळेच सोसावं लागलं.’’
‘‘आता सिद्धाबद्दल काय करावं?’’ बायकोने विचारले.
‘‘मी इन्स्पेक्टरला सांगेन सकाळी... पण काही असो, त्याच्यासारख्या गुन्हेगाराला आपल्या घरात आपण ठेवून घेतलं नसतं.’’

♦♦♦

# आई अन् मुलगा

रात्री, अर्धं जेवण होईपर्यंत रामूची आई थांबली अन् मग त्याच्या लग्नाचा विषय तिने काढला. रामू सहजच म्हणाला, ''पुन्हा तुझं तेच!'' रागात बोलायच्या ऐवजी तो गमतीने बोलत आहे, हे लक्षात आलं आणि मग आपले ठेवणीतले मुद्दे ती एकानंतर एक पुढे मांडू लागली : तिच्या भावाची मुलगी आता चौदा वर्षांची झालीय, पोरगी दिसायला चांगली आहे अन् तिचा भाऊ चांगला हुंडा द्यायलासुद्धा तयार आहे. ती (रामूची आई) आता थकत चालली आहे आणि घरकामांतून तिला आता थोडी सुटकाही पाहिजे. ती कोणत्याही क्षणी आता देवाघरी जाऊ शकेल; मग रामूला कोण करून खाऊ घालणार अन् त्याच्याकडे पाहणार? आणि सगळ्यात निर्विवाद मुद्दा म्हणजे - माणसाचं नशीब लग्नासोबतच बदलत असतं, नांगर धरणाऱ्या हातावर पीक अवलंबून नसतं, तर भांडं सांभाळणाऱ्या हातावर ते अवलंबून असतं.

संध्याकाळीच तिने ठरविलेलं होतं, त्याने आता पुन्हा नकार दिला किंवा लग्नाच्या मुद्द्यावरून बोलायचं पुन्हा टाळू लागला, तर ती त्याच्या नशिबावर सोडणार होती. इतकंच काय, धावत्या रेल्वेसमोर त्याने उडी मारली, तरी ती त्याला वाचविणार नव्हती. आता ती त्याच्यात लक्षच देणार नव्हती. आपल्या करारी स्वभावाची तिला जाणीव झाली, त्याचा अभिमानही वाटला. असंच वागायला पाहिजे माणसानं. ठिकंय, आईचं हृदय वगैरे... पण आईच्या भावनांनाही काही मर्यादा असतात. आपण आई असलो, म्हणजे काय रामूने जे मनात आलं, ते करावं अन् आपण सोसावं? त्याची ती चूक आहे, हे दाखवून द्यायलाच पाहिजे. जर आपल्या सांगण्या-बोलण्याकडे तो दुर्लक्ष करीत असेल, तर तो समजतो तशी ती नाही, हेच आता ती स्वत: दाखवून देणार होती.

मोठ्या तयारीनेच तिने लग्नाचा हा विषय काढला होता आणि जोरदार कारणं पुढे केली होती; पण रामूने ती सगळी बाजूला सारली आणि तिच्या भावाची ती मुलगी कशी दिसते यावर उपहासाने तो बोलला होता. ''आता शेवटचं सांगते मी. आता यापुढे तू पाण्यात बुडू लागलास तरी मी विचारणारसुद्धा नाही, का बुडायलास ते, समजलं?''

''बरं!'' विचारात राहून रामूने उत्तर दिले. चौथ्या प्रयत्नानंतरही इंटरमिडिएट परीक्षेत तो पास झाला नव्हता. वीस रुपयांची नोकरीही त्याला मिळाली नव्हती आणि इथे आईला त्याच्या लग्नाची घाई झाली होती अन् तीसुद्धा कुणासाठी, तर त्याच्या मामाच्या मुलीसाठी! तिचे पुढे आलेले दात पाहून कोणताही माणूस चार हात दूरच राहील. त्या मुलीसोबत लग्न करावं अशी त्याच्याकडून अपेक्षा करणं अशक्य होतं. त्याला नेहमी वाटायचं, आपण लग्न करावं, ते दोनतीन हिंदी सिनेमांत पाहिलेल्या त्या रझियासारख्या मुलीशीच.''

आयुष्य कसं निरुपयोगी, नि:सत्त्व असं झालेलं होतं आणि रामू कायम उदास अशा मन:स्थितीत आपला वेळ कधी आळसात, कधी झोपेत, कधी मोफत वाचनालयातले शिळे पेपर्स वाचण्यात घालवायचा.

आता रामू पानावर बसून नुसताच विचार करीत बसला. क्षणभर त्याच्याकडे पाहून त्याची आई म्हणू लागली, ''मला तुझं तोंड पाहिलं, की चीड येते. कुणीही पानावर जेवायला

बसलं अन् असं तोंड करू लागलं, की संताप येतो. दहा दिवसांतली विधवा बाईसुद्धा जेवताना तुझ्यापेक्षा चांगल्या तोंडाने जेवत असेल!''
''तुझ्या भावाच्या पोरीला मी नकार दिला, म्हणूनच तू असं बोलतेस मला'' तो उत्तर द्यायचा.
''मला काय करायचंय? चौदा वर्षांची पोरगी आहे ती अन् तिला आणखी चांगला नवरा मिळेल.'' रामूच्या दुर्मुखलेपणाची त्याच्या आईला चीड यायची. माणसांच्या अशा स्वभावाचाच तिला संताप यायचा. सहन व्हायचं नाही. ती काही वेळ बोलत राहिली आणि रामूने विचारले, ''आता गप्प बसशील का नाही?''
''माझं आयुष्य सरत आलंय्'' त्याची आई म्हणू लागली-
''-काळजी नको करू, लवकरच मला कायमचं गप्प बसलेलं तू पाहशील. मला गप्प बस म्हणालास - एवढंच पाहिजे ना तुला?''
''मी एवढंच म्हणालो, मला शांतपणाने जेवू दे!''
''हो, आता तुला लवकरच तसं जेवता येईल बरं! मी जाईन, तेव्हा तुला खूऽप वेळ मिळेल बरे का- शांतपणाने जेवायला!''
रामूने उत्तर दिले नाही. शांत राहून तो जेवला. ''मला एवढंच म्हणायचं, की जेवताना तरी तू चांगल्या चेहऱ्याने जेवावं,'' ती म्हणाली.
''हे- असं जेवताना, चांगल्या चेहऱ्याने जेवता तरी येईल का?''
''तुला काय म्हणायचंय?'' आई त्याच्यावर ओरडली - ''एवढ्या चवीने खाणारा असशील, तर सगळ्यांसारखं काम करून कमावून दाखव की! पैसे टाकीत जा अन् पाहिजे तसं जेवत जा. स्वत: बेकार राहून असा अधिकार चालवू नकोस.''
जेवण झाल्यावर रामूने सँडल्स घातल्याचे दिसले.
''कुठे चाललास तू?'' आईने विचारले.
''बाहेर!'' तुसडेपणाने उत्तर देऊन रामू निघून गेला. जाताना बाहेरचे दार तसेच उघडे टाकून गेला.
तिची आजची कामं संपली होती. तिने स्वयंपाकघर झाडले, भांडी धुतली आणि लाकडी फडताळात ओळीने मांडून लावून टाकली. कोपऱ्यात झाडू ठेवून दिला आणि खिडकी लावून घेतली.
स्वयंपाकघराचे दार लावून, कंदील घेऊन ती बाहेरच्या खोलीत आली. बाहेरचं दार उघडं पाहून पोराच्या निष्काळजीपणावर ती संतापली. पोरगा एवढा बेजबाबदार अन् उद्धट आहे, की त्याला दार लावून जायचंसुद्धा भान नाही आणि इथे आपण रात्रन् रात्र झाडूनपुसून आपल्या हाताची सालतांडं निघत आहेत. त्याला जर एवढी जाणीव नाही, तर आपण एवढं गुलामासारखं का राबावं? आयुष्यातली आपली जबाबदारी समजण्याएवढा तो आता मोठा झाला आहे.
आपला लहाना लाकडी डबा काढून तिने लवंग, विलायची, थोडी सुपारी तोंडात टाकली. त्याच्यामुळे तिला थोडं निवांत वाटलं. दार लोटून ती झोपायला लवंडली.
रामू कुठे गेला असावा? तिला अस्वस्थ वाटू लागलं. तिने आपली चटई गुंडाळली आणि घराबाहेर ओट्यावर टाकून तिथे निजली. विचित्र विचार मनातून काढून टाकण्यासाठी ती

आता रामाचा जप करू लागली. पुटपुटू लागली, "सीताराम, सीताराम..." पण नकळत तिचा हा जप थांबायचा आणि तिचे विचार परत रामूवर यायचे. जाण्यापूर्वी तो काय म्हणाला होता? "मी थोडं फिरून येतो आई, काळजी करू नको, लवकरच परतेन..." नाही, असं नाही म्हणाला तो. आपल्या जाण्या-येण्याबद्दल हा एवढा गप्प का राहतो बरं... का सांगत नाही... ते सगळं उद्धटपणाचं अन् चीड आणणारं त्याचं असं वागणं... पण ती आता स्वत:ला बजावू लागली- त्याच्या तशा वागण्याला आपणच जबाबदार आहोत. आपलं असं रागिष्ट वागणं अन् कुजकं बोलणं यावर कुणीही असंच वागणार! जेवताना आपण खरंच, तिटकारा यावा असंच बोललो- वागलो होतो; शंकाच नाही. सगळ्या आयुष्यात तिची ही वाईट खोड राहिली होती. वाईट सवय- राग आला, की आपल्या बोलण्यावर कसलंही नियंत्रण राहत नाही. तिला एवढंही वाटलं, आपलं बोलणं-राग आपण आवरला असता, तर आपला नवरा चार दिवस अधिक जगला असता... जेवणाबद्दल- स्वयंपाकाबद्दल रामू काही तरी बोलला होता... उद्यापासून आपण चांगला स्वयंपाक करू, जादाची भाजी करू... माझा रामू...

तिला झोप लागली. कुठेतरी रात्रीचे टोल पडले अन् तिला जाग आली. एक वाजला? तिने आवाज दिला, "रामू, रामू..."

ती घाबरली. रामूने स्वत:चं काय बरंवाईट करून घेतलं की काय, या विचाराने तिला भय वाटू लागलं. हळूहळू तिला खात्रीच पटू लागली, की आपल्या तशा बोलण्यामुळेच रामू स्वत:चं बरंवाईट करायला निघून गेला. ती उठून बसली आणि हुंदके देऊन रडू लागली. मोठ्या आवेगाने तिचं रडणं होऊ लागलं. रडताना डोळे पुसू लागली आणि बंद डोळ्यांसमोर, कुकनहल्ली तलावात तरंगणाऱ्या तिच्या रामूचे शव तिला दिसू लागले... त्याचा अस्ताव्यस्त सदरा, जाडसर धोतर, भिजलेलं अन् अंगाला चिकटून बसलेलं... तलावाच्या पायऱ्यांवर त्याने आपल्या सँडल्स सोडून दिलेल्या... त्याचा भेसूर- फुगून आलेला, ओळखायला न येणारा चेहरा...

तिने मोठ्याने हंबरडा फोडला आणि ती ओट्यावरून उतरली. जुन्या अग्रहार गल्लीतून ती धावत सुटली. सगळी गल्ली निर्मनुष्य होती. खांबावरचे लाईट्स इथे-तिथे चमकत होते. दूरवरून टांग्याची खडखड ऐकू येत होती आणि टांगेवाल्याचं ते कानावर पडणारं गाणं सगळ्या वातावरणाला जणू व्यत्त्यय आणीत होतं. रात्रपाळीच्या शिपायाच्या शिटीचा आवाज ऐकू आला अन् धावता धावता ती थांबली. काही झालं तरी, आपले हे सगळे विकृत अन् विपरीत विचारच होते, हे तिच्या ध्यानात आलं. तो कदाचित नाटकाला गेलेला असेल, ही नाटकं सकाळच्या तीन वाजेपर्यंतही चालतात... ती निग्रहाने अन् जलदगतीने रामाच्या नावाचा जप करू लागली. कुकनहल्ली तलावाचे दृश्य मनातून झटकून टाकायचा तिचा प्रयत्न होता...

रात्रभर तिला स्वस्थ झोप नव्हती. अर्धवट झोपेत- जागृत स्थितीत ती होती. रात्रीचे टोल तासाला कानावर पडायचे अन् तिला जाग यायची. थंडीची सकाळ अन् सकाळच्या सहाचे टोल पडले.

गालावरून अश्रू ओघळत होते अन् ती कुकनहल्ली तलावाकडे निघाली. सकाळी सकाळी म्हैसूर शहर जागं होऊ लागलं. गाईंना घेऊन गवळी जाऊ लागले... म्युनिसिपाल्टीचे

कामगार लांब झाडू घेऊन सफाईच्या कामाला लागले होते. एकदोन सायकली जवळून गेल्या...
ती तलावाजवळ पोहोचली; पण पाण्याकडे नजर टाकायची तिची हिंमत झाली नाही. तलावाच्या बाजूला असलेल्या बाकांच्या रांगेत एका बाकावर रामूला झोपलेले तिने पाहिले. क्षणभर तिला वाटून गेलं, ते त्याचं शव तर नसेल...
''रामू'' अस्वस्थ होऊन ओरडतच तिने त्याला हलविले आणि तो जागा झाला, की तिने मोठ्या सुटकेचा असा नि:श्वास टाकला.
डोळे चोळत रामू उठला. ''तू इथे का आलीस आई?''
''हे असं, इथं झोपावं का?''
''अं... असंच निजलो अन् झोप लागली...''
''चल घरी.'' ती म्हणाली. ती निघाली. रामू निघाला; पण तलावाच्या पायऱ्या उतरू लागलेलं रामूला पाहताच तिने विचारले,
''कुठे चाललास तू?''
''आत्ता हातपाय धुऊन घेतो'' रामूने उत्तर दिलं.
तिने त्याचा हात धरला आणि मोठ्या आग्रहाने ती म्हणाली, ''नको, नको. पाण्यापाशी जाऊ नको.''
आईच्या त्या तशा वागण्या-बोलण्याचा रामूला किंचित विस्मय वाटला; पण रामूने आईची सूचना ऐकली. तो परतला.

♦♦♦

# नाग

पोराने नागाच्या त्या दुरडीचे झाकण काढले. त्यात वेटोळे घालून असलेल्या नागाकडे पाहत तो उभा राहिला अन् नागाला सांगू लागला, ‘‘तू मरशील तर बरं, असं वाटतंय बघ. म्हणजे तुझी चामडी मला बटव्यासाठी म्हणून विकता येईल, एवढातरी तुझा उपयोग होईल.’’ त्याने बोटांनी नागाला डिवचले. नागाने आपलं मस्तक उचलून क्षीण नजरेनं पाहिलं. ‘‘आपला फणा काढायलासुद्धा तयार नाहीस, एवढा आळशी झालायस तू. तुला नाग म्हणायच्या लायकीचा नाहीस - एखाद्या गांडुळासारखा होऊन बसलास! मी मदारी आहे अन् तुझे खेळ दाखवून पोट भरतो; पण मला आता आंधळ्याचं सोंग घेऊन बसस्टँडवर भीक मागावी लागेल, असं दिसतंय. तुला आता कुणी पाहायला तयार नाही. तुझ्याबद्दल आता ना कुणाला आदर राहिला, ना भीती. आणि या सगळ्याचा अर्थ काय होईल, माहिताय? - माझी उपासमार, बस!’’

ज्या ज्या वेळी पोरगा गल्लीतल्या कुण्या दारासमोर उभा राहायचा, त्याला घालवून दिलं जायचं. आपला बाप अशाच परिस्थितीतून गेल्याचं त्यानं पाहिलेलं होतं. त्याचा बाप, लोकांच्या अशा वागण्याची किंवा आपल्या अपमानाची पर्वा न करता, घराच्या पायऱ्या चढून जायचा, आपली दुरडी मांडून कोण काय म्हणेल, याची फिकीर न करता सुरू करायचा. आपली भोपळ्याची बीन पोतडीतून काढून नागाची धून वाजवायचा. सारखी वाजवून, शेवटी लोकांचे लक्ष वेधून घ्यायचा अन् आपलं बोलणं चालू करायचा : ‘‘माझ्या स्वप्नात साक्षात शिवशंकर आले. म्हणाले, ‘पुढे जा आणि माझ्या आसनाखाली वारुळात हात घाल.’ तुम्हाला तर माहीत आहे, शिवजी म्हणजे नागांचा राजा. त्याच्या जटांमध्ये नाग गुंडाळलेला असतो आणि नागाच्या फण्याचा मुकुट त्या देवाला असतो. देवांचा देव विष्णू; तो तर आदि-शेषाच्या आसनावर निजलेला असतो - तो तर सर्वांत शक्तिमान नाग आहे ना! आपल्या हजारो मस्तकांवर त्याने पृथ्वी तोलून धरलेली आहे. पार्वतीच्या हातांचे बाजुबंद पहा- नाजूक, लहान नागच आहेत ते! आपण देवांपेक्षा शहाणे आहोत असं म्हणता तरी येईल का? नाग हे देवदेवतांच्या दागिन्यांचाच भाग असतात, ते काही सामान्य प्राणिमात्र थोडेच आहेत! ... मग मी शिवाची आज्ञा मान्य केली - मध्यरात्री चालत गेलो आणि नागाच्या वारुळात हात घातला.’’

या वेळी ऐकणाऱ्यांच्या अंगावर काटा यायचा. एखादा विचारायचासुद्धा-

‘‘तुला चावला का?’’

‘‘हो, मला तो चावला; पण तरीही मी जिवंत आहे हा इथे! का- माहीत आहे? त्या देवाने मला आज्ञा दिली - त्या किल्ल्याच्या भिंतीवर वाढलेली वेल आहे बघ. नाही, नाही, ती कोणती वेल आहे, तिचं नाव नाही सांगणार मी तुम्हाला; तुम्ही मूठभर सोन्याची नाणी जरी मला दिली, तरी नाही!’’

‘‘त्या वेलीचं काय केलंस?’’

‘‘तिची पानं मी चावून घेतली. त्यानंतर कोणत्याही विषाची बाधा मला झाली नाही आणि माझ्या या दुरडीतलं हे भयंकर जनावर! एखाद्या आईच्या स्तनाला पोराने झोंबावं, तसं याने माझ्या दंडात आपले दात रुतविले की! पण हसत हसतच मी त्याला ओढले; ज्या

दातांमुळे तो एवढा पिसाळल्यासारखा वागत होता, ते दात दगड घेऊन मी पाडून टाकले! आणि मग त्याला कळून चुकलं, की मी त्याचा मित्र आहे, त्याचं भलं पाहणारा आहे, तेव्हापासून कसला त्रास त्याने दिला नाही. शेवटी साप म्हणजे तरी काय असतो, माहिताय का - प्रायश्चित्त भोगून स्वर्गलोकात जायची वाट पाहणारा पवित्र आत्माच ना! झालं तर!''

सगळ्यांसमोर असं भाषण देऊन त्याचा बाप, थापटी मारून दुरडीचे झाकण उघडायचा अन् पुन्हा बीन वाजवायचा. लागलीच नाग आपला फणा काढायचा, इकडे-तिकडे पाहत मागेपुढे डोलायचा. लोक घाबरून मागे सरायचे; पण प्रभावितही व्हायचे. खेळ संपला, की ते पैसे द्यायचे. तांदूळ द्यायचे. कधी एखादा जुना सदरासुद्धा द्यायचे. कुठे एखादी कोंबडी दिसली, की त्याचा बाप लबाडीने अन् हुशारीने अंडं मिळवायचा. नागाची मान धरून त्याच्या घशात ते अंडं सारायचा. पाहणाऱ्यांना मोठी खुशी व्हायची; मग तो आपला खेळ आवरायचा अन् पुढल्या गल्लीत किंवा बाजारात जायचा आणि पुरेसे पैसे, अन्न मिळालं, की उद्यानाच्या कुंपणाशेजारी असलेल्या, चिंचेखालच्या आपल्या झोपडीत तो परतायचा. भात शिजवून आपल्या पोराला तो खाऊ घालायचा आणि मग दोघं झोपडीबाहेर चांदण्यात झोपून जायचे.

पोरगा चालायला लागल्यापासूनच बापाच्या मागे होता आणि जेव्हा तो दहा वर्षांचा झाला तेव्हा त्याच्या बापाने नागाला स्वतंत्रपणे हाताळण्यासाठी अन् जमावासमोर त्याचा खेळ करण्यासाठी त्याला मुभा दिली. त्याचा बाप नेहमीच म्हणायचा, ''आपण नागाला आठवड्यातून दोन वेळा अंडी खाऊ घालायचं - अगदी न विसरता. जेव्हा नाग मोठा होईल, त्या वेळी प्रत्येक दिवशी तो लहान होत जाईल. एखाद्या दिवशी त्याला पंख फुटतील आणि तो उडून जाईल! आणि तुला माहितंय का- उडताना तो जो विषाचा फूत्कार करेल, तो असेल लखलखीत माणिक मोत्यांचा अन् तशी रत्ने बाळगणारा माणूस राजा होतो, माहिताय का?''

एके दिवशी झोपडीशेजारी असाच रेंगाळत असताना पोराचे लक्ष चिंचेच्या झाडाकडे गेले. झाडाच्या फाद्यांवर एक माकडाचं पिलू उड्या मारीत होतं. पोरगा मोठ्या आश्चर्याने त्याच्याकडे पाहत एवढा गुंतून गेला, की त्याचा बाप घरी आल्याचेही त्याच्या लक्षात आले नाही.

''पोरा, काय पाहत आहेस, आं? घे हे, खा!'' मिठाईचा पुडा त्याला देत बाप म्हणाला, ''त्या मोठ्या घरात मला त्यांनी दिलंय. तिथं काहीतरी समारंभ होता. माझ्या बीनवर आपला नाग नाही का, फार छान नाचला. आता त्याला आपलं बोलणं समजायलंय पहा. नाच संपता संपता तर तो आपल्या शेपटीवर सहा फूट उंच उभा राहिला बघ! फणा काढला- फूत्कार सोडले. सगळा जमाव घाबरून गेला! तरीही लोकांना मजा आली. त्यांनी मला पैसे दिले, मिठाई दिली!'' बापाला मोठी खुशी झाली होती. त्याने नागाच्या दुरडीचे झाकण काढले. नागाने फणा उचलला आणि पोराच्या बापाने नागाची मान धरून त्याच्या तोंडात मिठाईचा तुकडा सारला. मिठाईचा घास नागाने गिळल्याचे पाहून बाप म्हणाला, ''आता तो आपल्या घरच्यापैकीच एक झाला आहे. आपण जे खाणार तेच तोसुद्धा खाईल.'' अंगाची गुंडाळी करून नाग मग दुरडीत बसला. बापाने दुरडी बंद केली.

त्या माकडाच्या पिलावर नजर ठेवून पोरगा उभा होता. ‘‘बाबा, मला वाटतं, मी माकड व्हावं! मग मी झाडावरून खाली उतरणारच नाही. पहा, कसा चिंचा ओरबडून खातोय तो! ए माकडा, मला दे ना!’’ पोरगा ओरडला.

बापाला गंमत वाटली. तो म्हणाला, ‘‘त्याच्याशी मैत्री करायची ही अशी पद्धत नाही. त्याला आधी तू काही खायला दे. त्याला मागू नकोस.’’ मग पोराने तोंडातली मिठाई काढली, ती सदऱ्याने साफ करून हातात उंच धरली. ओरडला, ‘‘ये ये, माकडा ये!’’

बाप म्हणाला, ‘‘तू जर त्याला माकड म्हटलेस तर तो कधीच तुझ्याकडे येणार नाही. त्याला एखादं चांगलं नाव ठेव.’’

‘‘आपण काय म्हणूया त्याला?’’

‘‘रामा! माकडांचा देव- हनुमान. त्या हनुमानाच्या देवाचं हे नाव.

माकडांसाठी ते नाव आदराचं आहे.’’

पोराने हाक दिली, ‘‘रामा, ये! हे घे!’’ त्याने मिठाईचा हात पुढे केला. आपल्या चेष्टा थांबवून माकड पाहू लागलं. मग फांदी गच्च धरून पोरगा झाडावर चढला. झाडाच्या वर, फांदीच्या उथळ बोचक्यात मिठाई ठेवून खाली उतरला. आपल्या गोल डोळयांनी माकड त्याची कृती टकमका पाहू लागलं. त्याच्यासाठी ठेवलेली ही भेट माकड खाली येऊन घेऊन जाईल, याची उतावीळ होऊन पोरगा वाट पाहू लागला. पोराचं लक्ष होतं. माकड पुढे-मागे पाहत होतं अन् इतक्यात कुठूनतरी कावळा आला अन् मिठाई घेऊन उडूनसुद्धा गेला. पोराने खच्चून शिवी दिली.

बाप ओरडला, ‘‘अरे! कुठे शिकलास अशी भाषा? अशी भाषा बोलशील तर कोणतंही माकड तुझं ऐकणार नाही.’’ शेवटी, ते माकडाचं पिलू जेव्हा परत एकदा ठेवलेली मिठाई घ्यायला खाली आलं, तेव्हा मोठ्या कुशलतेने पोराच्या बापाने त्याला पकडले. ते चावणार-बोचकरणार नाही अशा काळजीने त्याला धरले.

पंधरा दिवस मग या माकडाला उपाशी ठेवून, दटावून-चुचकारून समोर एखादं फळ धरून, त्याला जसं पाहिजे तसं शिकविण्यात आलं. पहिल्यांदा त्याने चावणं-बोचकारणं थांबविलं. त्याला कळून चुकलं, की आता खेळ करून आपल्या मालकाला खूश ठेवणं एवढीच आपली जबाबदारी आहे. मालकाकडून शिकून घेतल्यावर त्याला आता, रामायणातल्या हनुमानाने पेटलेली शेपटी घेऊन लंका कशी पेटविली, हा खेळ करून दाखविता येऊ लागला. खेड्यातली एखादी सासुरवाशीण पोरगी डोक्यावरून पाणी कशी आणते, नवी नवरी आपल्या नवऱ्याला कशी बोलावते (बोलणे, डोळे मिचकावणे, भुवया उचलणे आणि हसणे); आणि शेवटी बांबूवर चढण्याची- उड्या मारण्याची कसरत, जी त्याच्यासाठी नैसर्गिक आहे, तो खेळ! रस्त्यावर खेळ दाखवायला रामा तरबेज झाल्यावर त्याच्या मालकाने शिंपी- मित्राकडून त्याचे मोजमाप घेतले, झालरीचं जाकीट शिवून घेतलं. (त्यातून त्याची शेपटी व्यवस्थित बाहेर यायची) आणि खास अशी टोपी, जी रबराने त्याच्या छोट्या हनुवटीला आवळून धरणारी! दिवसभर ही टोपी काढून टाकायचा रामा जेव्हा प्रयत्न करायचा, तेव्हा मालकाकडून टपली खायचा. मग त्याला लक्षात यायचं, की हा गणवेश त्याला दिवसभर घालावाच लागणार आहे आणि मग जेव्हा मालक रामाचे कपडे काढायचा, तेव्हा रामा उत्स्फूर्तपणे मोठ्या आनंदाने उड्या मारून घ्यायचा.

रामा लोकप्रिय झाला. शाळेतली पोरं त्याला पाहिलं, की आनंदाने बावचळून जायची. घरातली मंडळी, रडणाऱ्या मुलाला थांबविण्यासाठी त्याला आत बोलावीत. तो उत्तम खेळ करून दाखवायचा, मालकासाठी पैसे कमावून द्यायचा अन् स्वत:साठी शेंगा. पोरांनी टाकून दिलेले कपडे त्याला भेट म्हणून मिळायचे. पोरगा अन् त्याचा बाप दररोज खेळ दाखवायला निघायचे. पोराच्या खांद्यावर माकड असायचं, तर बापाजवळ नागाची दुरडी. नाग मध्येच फणा उचलून झाकण ढकलायचा, फूत्कार सोडायचा अन् त्याची माकडाला भीती वाटायची, ते ओरडायचं अन् निसटायचं. त्यामुळे नागाची दुरडी घेऊन बाप थोड्या अंतरावरूनच चालायचा. इकडे पोरगा आपल्या माकडाचे खेळ दाखवायचा, तर तिकडे काही अंतरावर त्याचा बाप; त्याची बीन ऐकू यायची. आठवडी बाजाराच्या दिवशी तर बाप-पोरांचे हे खेळ तालुक्यात लोकप्रिय झालेले होते. त्यामुळे आर्थिक स्थिती सुधारल्याने कधी ते बसमधून गावी परतायचे.

अशा वेळेस बसमधला एखादा भित्रा प्रवासी विचारायचा,

‘‘नाग बाहेर आला, तर कसं होईल रे?’’

‘‘काळजी करू नका. ही दुरडी दोरीने बांधलेली आहे.’’

प्रवाशांमध्ये आणखी कुणीतरी असायचा, तो म्हणायचा, ‘‘नागाच्या शेपटीवर पाय पडणार नाही, तोपर्यंत त्याच्याकडून काही धोका नसतो; पण ह्या माकडाचं काय! ते केव्हा गोंधळ करील देवाला ठावूक!’’

‘‘नाही नाही. तो शहाणा आहे अन् सभ्यही आहे.’’ बाप सांगायचा आणि कंडक्टरला त्यासाठी थोडी चिरीमिरीही द्यायचा.

दोघांनी भरपूर प्रवास केला. सगळ्या बाजारात खेळ करून पुष्कळ धंदा केला. एवढा, की कधी हॉटेलमध्ये जाऊन चांगल्या फराळाची चैनसुद्धा त्यांनी केली.

संध्याकाळी पोराला सोडून बाप निघून जायचा. जाताना सांगायचा, ‘‘थांब. माझं पोट दुखतंय, मी औषध घेतो अन् येतो’’ आणि रात्री उशिरा झुलत झुलत तो यायचा. पोराला अशा वेळी त्याची भीती वाटायची. काठीला बांधलेले माकड सोबत असायचे आणि झोपल्याचे सोंग घेऊन तो निजून असायचा. बाप त्याला लाथ मारायचा. म्हणायचा, ‘‘ऊठ! आळशी कुठला! दिवसभर तुझा बाप मजुरी करून येतो अन् तू झोपून राहतोस? हरामखोर लेकाचा!’’ पण पोरगा उठायचा नाही.

एका रात्री पोरगा खरोखरच झोपून गेला अन् सकाळी त्याच्या लक्षात आलं, की आपला बाप आपल्यासोबत नाहीय्. माकडसुद्धा नव्हतं. ‘‘दोघं नक्कीच बाहेर गेले असतील.’’ त्याला रडू आलं. तो इकडे-तिकडे धावला. ‘‘बाबा!’’ अनेक वेळा त्याने आवाज दिला. त्याने पुन्हा झोपडीत पाहिले, तर त्याला दिसलं, की नागाची दुरडी कोपऱ्यात तशीच आहे. त्यावर काही चिल्लर नाणी ठेवल्याचे त्याला दिसले. त्याने ती मोजली. ऐंशी पैशांची ती नाणी होती. त्याला थोडा आनंदही वाटला. ‘‘नक्कीच ही माझ्यासाठी असतील’’ तो स्वत:शीच म्हणाला. एवढी रक्कम हाताळल्याने त्याला मोठा झाल्यासारखं वाटलं, श्रीमंत झाल्यासारखंही वाटलं; पण बापाच्या अशा वागण्याने तो गोंधळलासुद्धा. त्याला आठवतं, तसं तो नेहमी बापासोबतच झोपेतून उठायचा. आता त्याला अंदाज आला, की आपली अन् बापाची आता भेट होणार नाही. त्याचा बाप त्याला न सांगता कधी कुठे गेला नव्हता -

गल्लीतल्या नळावर आंघोळीला जायचं असो, की पोटदुखीचं औषध आणायला जायचं असो किंवा काही खरेदी असो...
दुरडीचं झाकण उघडून, त्यात नाग तरी आहे का हे पोराने पाहिले. नाग होता. त्याने नागाकडे क्षणभर पाहिले - ''मी आता तुझा मालक आहे, लक्षात ठेव!'' याबद्दलची जणू जाणीव झाल्यासारखं मग नागाने आपली जिव्हा सर्रकन बाहेर काढली, आपला फणा अर्धवट उघडलाही. पोराने त्याला थोपटले. ''बस बस, आत्ता नाही.''
आता बाप परत येण्याची वाट पाहण्यात काही अर्थ आहे का? त्याला भूक लागली. या पैशात काही खायला घ्यावं का, या विचाराने त्याला थोडं अस्वस्थ वाटलं. अचानक बाबा आला अन् दुरडीवरचे पैसे काय केलेस म्हणून त्याने थापड मारली तर...
त्याने दुरडी झाकली. त्यावर पैसे परत ठेवून दिले आणि झोपडीच्या दारात येऊन बसला. चिंचेच्या झाडाकडे उदास नजरेने पाहू लागला, माकडासाठी उसासे सोडू लागला. त्याच्या वेगवेगळ्या माकडचेष्टांनी त्याची सकाळ मोठी छान जायची. त्याने माकडाची ती छोटी थैली शोधली. या थैलीत शेंगा, तळलेले चणे असायचे. थैली उघडून त्यातले मूठभर दाणे काढून पोराने तोंडात टाकले- ''छान लागत आहे... माकडासाठी तर हे फारच छान... पण बाबा आले, तर...'' माकडासाठी आणलेल्या शेंगा खाताना पोरगा दिसला, की बाप त्याला मारायचा. आज त्याला या शेंगा चवीने खाताना मोठं मोकळं वाटू लागलं; पण तरीही मनात धास्ती होती, की बापाला या थैलीची अचानक आठवण आली अन् तो परतला तर... बापाची ती बीन नेहमीच्या जागी छपरात अडकवून ठेवलेली पोराला दिसली. त्याने ती बीन काढली अन् वाजवून पाहिली. बीनवरून बोटे फिरवीत वाजविताना त्याला मोठं समाधान वाटू लागलं. त्याला वाटू लागलं, आपल्या अन् बाबाच्या वाजविण्यातला फरक लोकांना लक्षातही येणार नाही. मात्र तेवढ्याच वाजविण्याने पोराला खोकला आला अन् दमही लागला होता.
पण झोपडीपुढून कुदळी- फावडी घेऊन मजुरीला जाणारी माणसं, गाठोडी घेऊन जाणाऱ्या बायका, सगळ्यांनी ही बीन ऐकून दाद दिली - ''वा! बापाचा वारसा चालविणार पोरगा!'' प्रत्येक जण त्याच्याशी थोडं बोलला. मोठ्या कारंजाच्या शेजारी वसलेली ती सगळी झोपडपट्टी पोराला ओळखायची. ही झोपडपट्टी- म्युनिसिपाल्टीने कितीही काढून टाकली, तरी पुन्हा उभी राहायचीच. जेवढी उद्‌ध्वस्त केली जायची, तेवढी पसरायची; पण इथल्या वसाहतीचं मतदान ध्यानात घेतल्यावर म्युनिसिपाल्टीचे सभासद या अशा अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करायचे. अपवाद फक्त एका वेळेचा - जेव्हा दिल्लीहून कुण्या व्ही. आय. पी. ची भेट गावाला व्हायची तेव्हा. त्या वेळी, ती मोठी व्यक्ती निघून जाईपर्यंत त्या लोकांना पार्कच्या पलीकडे सारलं जायचं.
''अरे! तू बाहेर नाही गेलास?'' एका बाईने त्याला विचारले.
''माझे बाबा इथे नाहीत,'' पोरगा मोठ्या दु:खाने सांगू लागला- ''ते कुठे गेले, हेही मला माहीत नाही.'' त्याला हुंदका फुटला.
बाईने आपली टोपली खाली ठेवली. त्याच्या बाजूला बसून तिने विचारले, ''तुला भूक लागलीय का?''
''माझ्याकडे पैसे आहेत,'' पोरगा म्हणाला.

तिने सावकाश त्याच्या डोक्यावर थोपटले आणि म्हणाली, ‘‘अरेरे! बेटा, तुझी आई माहीत आहे मला. फार चांगली पोर होती ती. तुला असं असहाय स्थितीत टाकून ती देवाघरी गेली!’’ पोराला आपली आई आठवत नसली, तरी आता त्याच्या डोळयांतून अश्रू ओघळले. बाईने विचारले,

‘‘आता तू काय करणार आहेस?’’

‘‘मला माहीत नाही,’’ तो सांगू लागला- ‘‘बाबा येईपर्यंत वाट पाहणार आहे.’’

‘‘वेडा मुलगा! कमनशिबी आहेस - तुझे बाबा निघून गेले आहेत.’’

‘‘कुठे?’’ पोराने विचारले.

‘‘ते विचारू नकोस!’’ बाई सांगू लागली, ‘‘मला एका माणसाने सांगितले आहे - त्याने तुझ्या बापाला जाताना पाहिले आहे. सकाळच्या बसने तो जात असल्याचे त्याने पाहिले आणि त्याच्यासोबत निळया साडीतली ती कुलटा होती.’’

‘‘आणि माकड? ते पण परत नाही का येणार?’’

बाईकडे याचं उत्तर नव्हतं. दरम्यान, गल्लीच्या तिकडून एक इडली विकणारा चालला होता. लाकडी ट्रेमध्ये इडली घेऊन तो आवाज देत होता. बाईने त्याला हाक मारली - ‘‘या गरीब पोराला दोन इडल्या दे! आणि गरम गरम दे, कालच्या नको देऊस!’’

‘‘कालची इडली - तुम्ही सोन्याचं नाणं दिलं तरी मिळणार नाही.’’

‘‘त्याला पैसे दे,’’ पोराला बाईने सांगितले. पोरगा आत पळाला आणि त्याने पैसे आणले. इडलीवाल्याला बाई सांगू लागली, ‘‘त्याला थोडी जादा दे.’’

‘‘का म्हणून जादा देऊ?’’

‘‘गरीब, कमनशिबी पोरगा आहे हा...’’

‘‘असे तर पुष्कळ असतात. मी काय करू? तू स्वत: काहीतरी विकून त्याला मदत कर! मी असा धंदा करू लागलो तर दिवाळं वाजणार माझं!’’ त्याने पैसे घेतले व पुढे गेला. तो दुसऱ्यातिसऱ्या झोपडीकडे जाईपर्यंत पोराने इडलीचा चट्टामट्टा केला होता... अतिशय मऊ अन् लज्जतदार होती इडली... त्यावर चटणी टाकलेली.

आता पोराला अधिक निवांत वाटू लागलं. त्याने पुरेसं खाल्लं आहे हे पाहून ती बाई उठून निघाली. जाताना स्वत:शी बोलावं, तसं बोलू लागली, ‘‘सटवी मेली! पोराला तोडून टाकून त्याच्या बापाला भुरळ घातली रांडेनं!’’ पोरगा त्या बोलण्याचा विचार करीत बसून राहिला. तसं त्याने वरून दाखविलं नसलं, तरी त्या निळया साडीतली ती कुलटा कोण होती हे तो ओळखून होता. पार्कच्या पलीकडे असलेल्या वस्तीतल्या एका घरात ती राहायची आणि घराच्या दारातच खिळल्यासारखी ती नेहमी तिथेच दिसायची. ती दिसली, की पोराचा बाप सावकाश चालायचा. पोराला म्हणायचा, ‘‘तू हो पुढे, मी येतोच.’’ पहिल्या वेळेस जेव्हा हे घडलं, तेव्हा पोरगा पुढे गेला; त्याने वाट पाहिली होती. मग दिव्याच्या खांबाला माकड बांधून परत तिथे गेला होता; पण तिथे ती बाई नव्हती. बापही नव्हता. घराचं दार बंद होतं. मग तो पायरीवर इकडेतिकडे पाहत बसला होता. अचानक दार उघडून त्याचा बाप बाहेर आला. सोबत नागाची दुरडी होतीच. पोराला पाहताच तो चिडला होता. हात उगारून म्हणाला होता, ‘‘तुला पुढे जा म्हणून सांगितलं होतं ना?’’ मार चुकवून पोरगा पुढे वाकला होता; पण तरी त्या बाईचं बोलणं त्याच्या

कानावर आलं होतं... ''बेरकी दिसतंय कारटं! आगाऊपणा करणारं!'' नंतर बापाने त्याला सांगितलं होतं, जेव्हा मी पुढे जा म्हटलं, तेव्हा ते ऐकायचं, समजलं?''

''तू तिथं काय केलंस बाबा?'' पोराने शक्य तेवढ्या साधेपणाने विचारले.

''तू फालतू प्रश्न विचारू नकोस'' बापाने रागात म्हटले.

''ती कोण होती, तिचं नाव काय?''

''अरे, आपल्या नात्यात आहे ती. मी चहा प्यायला गेलो होतो अन् आता गप्प बस. आणखी बोलशील तर थोबाड फोडीन. लक्षात ठेव, ती एक चांगली अन् प्रेमळ बाई आहे.''

तिचं हे वर्णन पोराला पटलं नाही. तिने त्याला नावं ठेवली होती. त्याला वाटायचं, छतावर जाऊन ओरडावं, ''वाईट-वाईट बाई आहे, अजिबात प्रेमळ नाही;'' पण त्याने तसं केलं नाही. त्यानंतर जेव्हा केव्हा ते त्या रस्त्यावरून जायचे तेव्हा इकडेतिकडे न पाहता पोरगा पुढे निघून जायचा आणि गल्लीच्या टोकाला येऊन बापाची वाट पाहायचा. कधी कधी त्या दारात बाईच्या ऐवजी तिथे केसाळ छातीचा माणूस आपलं ढेरपोट कुरवाळीत उभा असायचा, त्या वेळी बाप तिकडे न पाहता पोरासोबत पुढे निघून जायचा.

पोराला लक्षात आलं, की आपण बीन वाजवू शकतो, नागाचे खेळ करू शकतो, त्याला खाऊ घालू शकतो - सगळं अगदी आपला बाप जसा करायचा, त्याच तऱ्हेने, इतकंच काय, त्याचे सुळे वाढू लागले तर ते काढतासुद्धा येऊ लागले. दररोज तो आता बऱ्यापैकी कमावू लागला; पण पोरगा जसजसा मोठा होऊ लागला, नाग मात्र सुस्त होऊ लागला. त्याची सळसळ कमी झाली, ढिलेपणा आला. माकडाची आठवण मात्र त्याला अस्वस्थ करायची. माकडाला पळवून घेऊन जाणं, हे त्याच्या बापाने केलेलं त्याचं मोठं असं नुकसान होतं.

काही कमाईशिवाय जेव्हा बरेच दिवस जाऊ लागले, तेव्हा पोराने ठरविले, की आता या नागापासून सुटका करून घ्यावी. ती भोपळ्याची बीन फेकून द्यावी आणि पोटापाण्यासाठी आता वेगळं काही करावं किंवा आणखी एखादं माकड पाळावं, त्याला शिकवावं. आपला बाप हे काम कसं करायचा, हे त्यानं पाहिलं होतं. त्याची माहिती होती. खांद्यावर माकड असलं, की त्याला कुठेही प्रवेश मिळायचा. एखाद्या राजवाड्यातसुद्धा. नंतर एखादा व्यवसाय मिळाला, तर माकडाला नुसतं पाळणंही जमलं असतं. रेल्वे-स्टेशनवर हमाल म्हणून सुरवात करावी- जिथे प्रत्येक तासाला कितीतरी गाड्यांची ये जा असते - आणि एखादे दिवशी एखाद्या गाडीत बसून हे बाहेरचं जग बघायला निघावं; पण पहिलं काम म्हणजे, या नागापासून सुटका. आता त्याच्यासाठी अंडी अन् दूध घेणं परवडणारं नव्हतं.

नागाची दुरडी घेऊन पोरगा निघाला. त्याला निर्जन जागी नागाला सोडायचं होतं. नदीकडे, माणसांची वर्दळ नसेल अशा निर्जन जागी, जिथे नाग अगदी निश्चिंतपणे निघून जाऊ शकेल, कुणी त्याला पाहिलं, की ठेचणार नाही अशा जागी... नालप्पा बागेच्या त्या निर्जन ठिकाणी बऱ्याच उंच सखल जागा होत्या. वारुळं होती. ''इथं तू कुठेही घर करू शकतोस आणि त्यांच्या जगात परत आल्याबद्दल तुझे भाऊबंद अगदी खूश होऊन जातील बघ,'' पोरगा नागाला सांगू लागला, ''तुझ्या घरात आता आनंदाने जगायला शीक. मला विसरून जा. तुझा आता काही उपयोग राहिला नाही अन् आपण आता वेगळं व्हायला पाहिजे. माझा बाप कुठे गेला, माहीत नाही. तुला पंख वगैरे फुटेपर्यंत बापाने तुला ठेवून

घेतलेही असते; पण मला त्याची पर्वा नाही.''
पोराने दुरडीचे झाकण उघडले. नागाला उचलून त्याला मोकळे सोडले. काही क्षण नाग सुस्त पडून होता; मग त्याने आपले मस्तक उचलले, कसल्याही कुतूहलाशिवाय त्याने भोवताली पाहिले आणि सुस्त अशा गतीने अस्ताव्यस्त सरपटू लागला. थोडं पुढे गेल्यावर तो परत आपल्या दुरडीकडे येऊ लागला. पोराने चटकन् ती दुरडी उचलून घेतली अन् नागापासून दूर फेकली, ''मी इथे जवळ असेपर्यंत तू निघून जाणार नाहीस.'' त्याने नागाला वारुळाच्या दिशेने वळविले, त्याला थोडे ढोसले आणि विरुद्ध दिशेने तो पळत सुटला. एका झाडामागे तो थांबला. तिथे लपून तो पाहू लागला. नाग आता वारुळाच्या चढाकडे जाऊ लागला होता. आता नाग त्या बिळात जाईल अन् आपल्या आयुष्यातून कायमचा निघून जाईल याबद्दल पोराला शंका राहिली नव्हती. नाग वारुळावर अर्धवट चढला अन् मागेपुढे पाहत खाली उतरून परत त्याच दिशेने पुन्हा वळला. पोराने शिवी दिली, ''अरे मुर्खा, तू तिकडे परत तुझ्या जगात जाऊन का राहत नाहीस? तू मला पुन्हा शोधू नकोस.'' असं म्हणून नालप्पा बागेतून पोरगा धावला आणि पुढे दम घेण्यासाठी थांबला. तिथूनच त्याने वळून पाहिले- नाग आता मैदानावरून व्यवस्थित सरपटत जाऊ लागला. सूर्यप्रकाशात तो एखाद्या चांदीच्या रिबिनीसारखा चमकत होता. पोरगा त्याला आता शेवटचा निरोप देण्यासाठी क्षणभर थांबला; पण वर नजर गेली आणि आकाशात एक ब्राह्मणी घार त्याला दिसली. स्तिमित होऊन तो ओरडला- ''अरे बापरे, गरुड!'' अनाहूतपणे त्याने डोळ्यांवर बोटं ठेवून प्रणाम केला. विष्णू देवाचे हे पवित्र असे वाहन. पोराने डोळे मिटले आणि प्रार्थना केली, ''तू देव आहेस, पण मला माहिती आहे, तू नागाची शिकार करतोस... पण माझ्या नागाला सोडून दे...''
पोराने डोळे उघडून पाहिले. घिरट्या घेऊन घार आणखी खाली येऊ लागली. त्याची सावली त्या सुस्त नागाच्या मागे पडू लागली. ''अं! मला माहिताय तुझा हेतू!'' पोरगा ओरडला. वारुळाचा निवारा नाकारणाऱ्या त्या मूर्ख नागाला आता तो गरुड एका भरारीत खाली येऊन आपल्या दणकट पंजात क्षणात उचलून घेऊन जाणार होता; त्याच्या दुपारच्या जेवणासाठी. पोरगा नागाकडे धावला. त्याने वाटेवरची दुरडी उचलली. दुरडी पाहिली, की नाग सरपटत तिकडे परतला; जणू काही मोठ्या परिश्रमाचा खेळ संपवून तो आपल्या जागी येत होता...
बागेच्या कुंपणाशेजारच्या त्या झोपडीतल्या कोपऱ्यात आता नाग पुन्हा स्थानापन्न झाला होता. पोरगा आता नागाला सांगू लागला- ''तुला लवकरच आता पंख फुटले नाहीत, तर इतर नागांसारखं बांबूच्या काठीनं तुझं मस्तक ठेचलं जाईल. लक्षात ठेव : मी आता तुझा सांभाळ करणार नाही. मी आता रेल्वे स्टेशनवर जाईन अन् जर का तू दुरडीच्या बाहेर येण्याचं आगावू धाडस दाखवशील, तर तुझा शेवट जवळ आलाच म्हणून समज. त्यानंतर मला कुणीही दोष देणार नाही.''

♦♦♦

# सेल्वी

संगीताचा कार्यक्रम संपला, की तिची स्वाक्षरी मागणाऱ्यांचा जमाव तिच्याभोवती गोळा व्हायचा; तिला वेढा घालून जणू स्टेजवरून तिला हलूच द्यायचे नाहीत. बाहेर पडण्याच्या प्रयत्नात असलेला मोहन, मग तिच्याकडे वळून हॉलच्या त्या जागेवरूनच हाक द्यायचा "सेल्वी, चल होऊ दे! तुला गाडी सोडून द्यायचीय् का?"
"गाडीला आणखी वेळ आहे, " सेल्वीला असं सांगताही आलं असतं; पण त्याला असा विरोध करायची तिची सवयच नव्हती आणि मोहनसाठी तर ही जणू सुवर्णसंधीच होती- सगळयांसमोर तिला सूचना देऊन आपला तिच्यावरचा अधिकार दाखवून द्यायची अशी संधी तो दवडणार नव्हताच. त्याला आणि सेल्वीला- विशेषत: सेल्वीला कारकडे घेऊन जाण्यासाठी संरक्षणाचं कडं करणाऱ्या तिच्या श्रोत्यांकडे वळून मग मोहन थट्टा करायचा - "तसंच सोडलं, तर ती इथेच बसेल अन् जगाच्या अंतापर्यंत सगळयांना स्वाक्षऱ्याच देत राहील ती! वेळेचं भान कसं म्हणून तिला नाहीच!"
ती एक अप्राप्य-स्वर्गीय देवताच आहे अशा दृष्टीने जनता तिच्याकडे पाहायची; पण स्वत:च्या स्वरूपाविषयीची जाणीव तिला एकटीलाच होती. "दिसायला तशी वाईट नाही-" तिला पहिल्यांदाच पाहिलं, तेव्हा तो स्वत:शीच म्हणाला होता, - "पण थोड्या ठाकठिकीची गरज आहे." तिच्या विस्कटलेल्या भुवया मग व्यवस्थित कोरण्यात आल्या. चांगला नाहीच; पण बऱ्यापैकी दिसणारा तिचा चेहरा- त्यावर त्वचेच्या रंगाचं योग्य असं क्रीम लावण्यात आलं. भुवया अन् गालाच्या वर्णाची तफावत स्पष्ट व्हावी, अशा रीतीने पावडरचा वापर करण्यात आला. इतकं असलं, तरी सौंदर्यप्रसाधनांचा फार सोस आहे असं कुणी म्हणू नये असं मोहनला वाटायचं. तो महात्मा गांधींचा शिष्य होता अन् बरीच वर्षं त्यानं तुरुंगात काढली होती. फक्त खादीचे कपडे वापरायचा अन् सगळया ऐषारामापासून दूर होता. त्यामुळे आपल्या बायकोचे व्यक्तिमत्त्व खुलविण्यासाठी कृत्रिम सौंदर्यप्रसाधने वापरणे किंवा तिने आधुनिक राहणे याचा प्रश्न त्याच्या बाबतीत उद्‌भवायचा नाही; पण सिंगापूरच्या कार्यक्रमादरम्यान सेल्वीच्या एका चाहत्याकडून त्याला असंच एकदा सौम्य प्रकारचं एक प्रसाधन मिळालं. हा सगळा पुरवठा व्यवहार कुणाला सांगायचा नाही, या अटीवर त्याने मोठ्या आनंदाने अन् नियमितपणे केलेला होता.
सेल्वी जेव्हा स्टेजवर यायची, तेव्हा ती सावळी, गोरी किंवा उजळ म्हणण्यापेक्षा, चमकदार दिसायची. त्यामुळे श्रोत्यांमध्ये तिच्या मूळ रंगाबद्दल पैजा पडायच्या, वाद व्हायचे. तिचे चाहते जेव्हा जमायचे- विशेषत: बोर्डलेस हॉटेलमध्ये, तेव्हा तिच्या आयुष्यातल्या सगळ्याच बाबींबद्दल प्रचंड तर्कवितर्क चालायचे. या हॉटेलमध्ये कॉफी-टेबलवर नेहमीच्या मित्रमंडळीत शहरातल्या विषयांच्या गप्पा व्हायच्या. खुद्द हॉटेलचा मालक वर्मा, यालाही या गप्पा ऐकण्यात रुची असायची. गल्ल्यावर बसून तो सेल्वीबद्दलच्या गप्पांत लक्ष द्यायचा. वर्मा, सेल्वीचा असाच एक भक्त; पण दूरवरून भक्ती व्यक्त करणारा. त्याला वाटायचं, 'माझ्यावर लक्ष्मी प्रसन्न आहे. आता मला संपत्तीसाठी, ऐश्वर्यासाठी काही नवस-प्रार्थना करायची गरजही नाही; पण मला दुसरी देवी प्रसन्न व्हावी, अशी तीव्र इच्छा आहे. ती म्हणजे सरस्वती देवी. आणि ही सरस्वती आज आहे, ती

सेल्वीच्या रूपात. दैवीस्वरूपाची गायिका. जर तिने माझ्या हातची कॉफी घेण्याचं औदार्य दाखविलं, तर माझ्यासाठी ते किती भाग्याचं राहील! पण काय करावं! ज्या ज्या वेळेस मी ही भेट घेऊन तिच्याकडे जातो, तेव्हा 'तो' मध्येच येतो, ती भेट घेऊन मला अंगणातूनच परत करतो. जुजबी आभार मानतो.' सेल्वीला भेटायची तीव्र इच्छा बाळगणाऱ्या हजारो लोकांपैकीच वर्मा एक होता; पण एका अदृश्य भिंतीपलीकडे सेल्वीला ठेवलेले होते. असं सांगितल जायचं, की एकतर एकांतवासाची शिक्षा किंवा जेलरसोबतचा बंदिवास हेच तिच्या नशिबात आहे. कुणाहीसोबत तिला क्षणभरासाठीही एकटं राहायची मुभा नव्हती. दोन दशकांपूर्वी तिचं मोहनशी लग्न झालेलं होतं आणि त्याच्या उपस्थितीशिवाय ती इतरांशी कधीही बोलली नव्हती.

सेल्वीच्या दर्शनासाठी दिवसभर दूर-दूरवरून लोक यायचे; पण फारच कमी जणांना तिच्या भेटीचा लाभ व्हायचा. काही जण खाली मैदानापर्यंत तर काही जण बागेच्या हिरवळीपर्यंत पोचायचे. काही जण वर पायऱ्यांपर्यंत जायची हिंमत करायचे; पण सेल्वी कुणाच्या दृष्टीलाही पडायची नाही. केवळ मोहनचा सेक्रेटरी किंवा त्याच्या सेक्रेटरीची भेट. बस. महत्त्वाच्या व्यक्तींचे स्वागत मात्र मोठ्या उत्स्फूर्तपणे व्हायचं. त्यांना वरच्या मजल्यावर, हॉलमध्ये सोफ्यावर बसविलं जायचं. सर्वसाधारण लोकांना जागा दिली जायची नाही; पण ते इकडे-तिकडे कुठेही पाहिजे तेवढा वेळ बसून राहायचे अन् निघून जायचे.

त्यांचं घर म्हणजे, इस्ट इंडिया कंपनीच्या दिवसांतला प्रचंड असा बंगलाच होता. कमानी, मोठे मोठे खांब, मोठी दालनं असलेला तो बंगला, एकेकाळी सर फ्रेड्रिक लॉलीचे निवासस्थान होतं; ज्याचा पुतळा शहराच्या चौकात उभारलेला होता. त्याच्याकडे चाळीस नोकर-चाकरांचा लवाजमा असायचा. हे नोकर, या दोनमजली बंगल्याच्या दालनांची, राजेशाही खिडक्यांची साफसूफ करायचे. शहरापासून पाच मैलांवर असलेल्या या बंगल्याचा विस्तार मेम्पी हिल्स-रस्त्यावर कितीतरी एकर परिसराचा होता. या जागेत प्रवेशद्वाराजवळ मोठे वृक्ष लावलेले होते. विशेषत: (एल्म किंवा ओक किंवा बीच - कुणी सांगूही शकणार नाही.) हे वृक्ष सर फ्रेड्रिकने इंग्लंडहून त्यांची बीजं मागवून इथे लावले होते. असं म्हटलं जायचं, की भारतात केवळ इथेच असे वृक्ष होते. सर फ्रेड्रिकचं भूत या बंगल्यात वावरत आहे असा समज असल्याने बंगला भाड्याने कुणी घेतला नव्हता आणि त्या अनुषंगाने कितीतरी गूढ अशा दंतकथा मालगुडीत त्यावेळी प्रचलित झालेल्या होत्या. 1947 मध्ये ब्रिटिश हा देश सोडून गेले, तेव्हापासून हा बंगला निर्जन होता. त्या वेळी मोहनने या बंगल्यासाठी बोली लावली. तो म्हणाला, ''गांधीजींच्या अहिंसेने देशाला ब्रिटिशांपासून मुक्त केले. मी महात्माजींचा एक नम्र पाईक आहे आणि त्याच अहिंसेच्या तत्त्वाने ब्रिटिशाच्या त्या भुतापासून हा बंगला मी मुक्त करायला समर्थ आहे.'' त्याच वेळी सेल्वीला सिनेमात पार्श्वगायनासाठी पैसे मिळाले होते, त्यातून हा बंगला विकत घेतला होता. सिनेमातल्या त्या फिल्मस्टारने केवळ ओठ हलविले होते अन् सेल्वीचा आवाज घेऊन सिनेमातल्या त्या नायिकेने मोठी प्रसिद्धी मिळविली होती; पण त्यानंतर मोहनने ठरवूनच टाकले, की यापुढे अशा फिल्मी ऑफर्स एकदम बंद : ''मी सेल्वीला एक स्वतंत्र गायिका म्हणून सिद्ध करून दाखविणार आहे- अशा प्रसाधनयुक्त डमीचा आवाज म्हणून

नाही!''

दिवसेंदिवस परिश्रमपूर्वक केलेली प्रसिद्धी, सांगण्या-बोलण्यातून केलेलं कौतुक आणि संगीतज्ज्ञ तसेच पत्रकारांची मर्जी संपादन करून मोहनने सेल्वीची प्रतिमा लोकप्रियतेच्या शिखरावर पोचविली होती. अनेक वर्षांचे ते कष्ट होते आणि या कष्टाची फळं मग मिळू लागली... तिच्या नावाला एक वलय प्राप्त झालं. प्रत्येक आठवड्यात तिची छायाचित्रे वर्तमानपत्रांत झळकू लागली. तिला सगळीकडून मागणी येऊ लागली. देशभरातून येणाऱ्या संगीत कार्यक्रमांच्या संयोजकांचा वेढा मोहनच्या कार्यालयाला पडू लागला. ''तुमचा प्रस्ताव माझ्या सेक्रेटरीकडे ठेवा आणि या तीन महिन्यांच्या कार्यक्रमांच्या तारखा निश्चित झाल्या, की आम्ही तुम्हाला कळवू,'' असं एखाद्या संयोजकाला मोहन सांगायचा; तर दुसऱ्याला सांगायचा, ''माझं शेड्यूल 1982 पर्यंत 'पॅक' आहे - जर यात काही बदल झाला, तर काय करता येईल, ते आम्ही पाहू. ऑक्टोबर 1981 मध्ये तुम्ही आठवण करा. मी तुम्हाला निश्चित सांगेन.'' केवळ सेल्वीचं दुर्मिळ असणं दाखवावं, याच कारणाने त्याने अनेक प्रस्ताव नाकारले होते. जेव्हा मोहन एखाद्या कार्यक्रमासाठी संमती द्यायचा, तेव्हा तो अर्जदार (खरं म्हणजे लाभार्थी!) कृतज्ञ व्हायचा. प्रचंड फीसची त्याला फिकीर नसायची- त्यातली अर्धी रक्कम तर त्याच वेळेस रोखीने अन् पावतीशिवाय त्याला द्यावी लागायची. कधी मोहन आपले डावपेच बदलायचा. एखाद्या कार्यक्रमाचे उत्पन्न विशिष्ट संस्थेला द्यायचे तो जाहीर करायचा. ही संस्था मोठी नामांकित असायची; या संस्थेचे आश्रयदाते- सभासद नामांकित असे असायचे. तो अशा कार्यक्रमाचे मानधन तर घ्यायचा नाही; मात्र अनुषंगिक खर्च करायला भाग पाडायचा, जो जवळपास त्याच्या नेहमीच्या मानधनाएवढाच असायचा. आर्थिक व्यवहारात तो चतुर होता, उत्पन्न वाढवायची चलाखी त्याला जमायची आणि त्याच वेळेस इन्कम टॅक्सला चार हात दूर कसं ठेवायचं, हे तो जाणून होता. लॉन्स आणि कॉरिडॉरमधून तो अस्वस्थ होऊन येरझारा घालायचा अन् त्याच वेळेस त्याचं मन, आपलं मनुष्यबळ आणि संपत्ती याचा मेळ कसा बसवावा, नियंत्रण कसं ठेवावं या विचारात गुंतलेलं असायचं. अचानकच तो थांबायचा. स्टेनोग्राफरला बोलावून त्याला डिक्टेशन द्यायचा किंवा फोन उचलून बराच वेळ बोलत राहायचा.

प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारासोबतच जनसंपर्क व्यवहारांकडेसुद्धा तो जातीने लक्ष द्यायचा. निवडक, अतिमहत्त्वाच्या अशा पार्ट्यांना तो जायचा. उच्चभ्रू, उच्चपदस्थ स्त्री-पुरुषांना आपल्या 'लॉली टेरेस'वर पार्टीसाठी निमंत्रित करायचा. या निमंत्रितांत कधी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यक्तीसुद्धा असत. बंगल्याच्या भिंतीवर, त्याच्या आणि सेल्वीच्या सोबतच काढलेले, मोठमोठ्या व्यक्तींचे फोटो लावलेले असायचे - या महनीय व्यक्तींमध्ये टिटो, बुल्गॅनिन, यहुदी मेनुहीन, जॉन केनेडी, नेहरू कुटंबीय, पोप, चार्ली चॅप्लिन, योगी, खेळाडू, राजकीय नेतेमंडळी असत. वेगवेगळ्या प्रसंगांत, कार्यक्रमांत काढलेले हे फोटो असायचे.

सेल्वीच्या पूर्वायुष्याबद्दल 'बोर्डलेस'वर नेहमीच तर्क-वितर्क चालायचे. अशा गप्पांतूनच वर्माला समजलं होतं, की विनायक मुदाली गल्लीच्या मागे एका लहान अशा घरात सेल्वी आईसोबत राहायची, या घराची स्थिती चांगली नव्हती. छताचे टवके खाली पडायचे, छतदुरुस्तीसाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नसायचे. अशा घरात, सेल्वी आईकडून संगीताचे धडे घ्यायची. गायनाचा रियाज करायची. तिचा भाऊ अन् बहीण तिला साथसंगत

करायचे.
त्या दिवसांत मार्केट रोडवर मोहनचा फोटो स्टुडिओ होता. एकदा, संगीत स्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले म्हणून सेल्वीच्या आईने तिला तिचा फोटो काढून घेण्यासाठी स्टुडिओत आणले होते. शाळेच्या मासिकात देण्यासाठी हा फोटो हवा होता. त्यानंतर अधूनमधून एक हितचिंतक म्हणून मोहन त्यांना भेटायला यायचा. घरातल्या एकमेव अशा खुर्चीवर बसून कॉफी घ्यायचा आणि त्या कुटुंबाचा एक सुहृद म्हणून त्यांना सल्ले द्यायचा, मार्गदर्शन करायचा. कधी तो सेल्वीला गाणं म्हणायची विनंती करायचा आणि मोठ्या नाटकीपणाने खुर्ची सोडून खाली मांडी घालून बसायचा. डोळे झाकून गाण्यात तल्लीन झाल्याचे दाखवायचा; असं दाखवायचा, की हे गाणं खुर्चीवर बसून ऐकलं तर अशा स्वर्गीय संगीताचा अनादर केल्यासारखं होईल.
हळूहळू मोहन त्या कुटुंबाला लहानसहान मदत करू लागला आणि मग सगळ्या व्यवहारांचा त्याने ताबाच घेतला. त्याने नक्की केव्हा अन् कुठे सेल्वीशी लग्न केले, सेल्वीला तो आपली बायको म्हणून नेमकं केव्हापासून संबोधू लागला, याबद्दल छातीठोकपणे 'बोर्डलेस'च्या गप्पांत कुणीही सांगू शकत नव्हतं. या सगळ्यांचा शोध लावायची कुणी हिंमतसुद्धा करायचं नाही.
मोहनने सिनेमातून मिळालेला पैसा 'लॉली टेरेस' बंगला खरेदीत गुंतविण्यात वेळ दवडला नव्हता. त्या बंगल्याची किरकोळ दुरुस्ती, भिंतींना रंगकाम करून एका मुहूर्ताला त्याने गफूरच्या टॅक्सीतून सेल्वी आणि कुटुंबीयांना या बंगल्यात आणले.
जेव्हा तिची आई, बहीण आणि भाऊ या बंगल्यातून फिरले, उंच छत, प्रशस्त हॉल त्यांनी पाहिले, त्या वेळी बंगल्याचा तो प्रशस्तपणा पाहून ते उत्तेजित झाले होते. अचंब्याने त्यांचे डोळे विस्फारले होते; मात्र सेल्वीने अशी कोणतीच प्रतिक्रिया दिली नव्हती. एखाद्या म्युझियमच्या हॉलमधून फिरावे तशी ती फिरली. ते पाहून मोहनचा थोडा विरस झाला. त्याने विचारले, "कशी वाटली ही जागा तुला?" या सगळ्यांवर तिने फक्त संक्षेपाने उत्तर दिले, "फारच मोठी आहे." सगळा बंगला फिरून झाल्यावर त्याने या बंगल्याचा सगळा इतिहास (भुताटकी वगळून) सांगितला; पण कसलीही रुची न दाखविता तिने तो ऐकला. तिचं चित्त जणूकाही इतरत्रच लागून होतं.
ते एका मोठ्या, राजेशाही अशा सोफ्यावर बसले होते. हे फर्निचर बंगल्यासोबतच मिळालेलं होतं; कारण त्यांच्या अवाढव्य स्वरूपामुळे ते हलविता आलं नव्हतं. सेल्वीनं आपण ज्यावर बसलो, त्या सोफ्याचं हे राजेशाही स्वरूपसुद्धा हिशेबात घेतलं नव्हतं. शेकडो संगीत दौरे केल्यानंतर मोहनच्या लक्षात आलं, की सेल्वीला तसं परिसराचं भान नसतंच. राजावाडा असो किंवा ऐषआरामाच्या खोल्या, नोकरवर्ग असलेलं पंचतारांकित हॉटेल असो; लहान शहर असो किंवा काहीच व्यवस्था नसलेलं गावातलं एखादं घर असो, सेल्वी सगळीकडे सारख्याच अलिप्ततेने किंवा समाधानी वृत्तीने राहायची. तयार व्हायची अन् संगीत कार्यक्रमासाठी संध्याकाळी दिलेल्या वेळेत तयार राहायची. कित्येकदा तर तिने याचीही चौकशी केली नव्हती, की आपला कार्यक्रम कुठे आहे, त्यांनी काय मानधन दिलं, वगैरे. तिला तशी माहितीही नसायची. ज्या ज्या वेळी तो सांगायचा, "चल, तयारी कर-निघायचंय!" तेव्हा कपडे, जुजबी सौंदर्यप्रसाधनं, टॉनिकच्या गोळ्या घेऊन ती ट्रंक

भरायची आणि तयार व्हायची. आपण कुठे जाणार आहोत याची विचारपूससुद्धा न करता. आरक्षित केलेल्या जागेवर तिला बसायला सांगितलं जायचं, ती बसायची आणि मोहन जेव्हा सांगायचा - येणाऱ्या स्टेशनवर आपल्याला उतरायचं आहे म्हणून- तर तयार होऊन बसायची. कसल्याही अपेक्षेशिवाय, कसल्याही तक्रारीशिवाय, कसल्याही चौकशीशिवाय ती राहायची. कुणाचीही, कशाचीही दखल न घेता ती राहायची - आपल्या विचारांत किंवा स्वरांच्या त्या रम्य संगतीत वावरायची.

पाव शतकाच्या कालावधीत सेल्वी, एक राष्ट्रीय व्यक्ती म्हणून प्रसिद्ध झाली. देशात आणि देशाबाहेर तिचा प्रवास झाला होता. स्वरांची देवी अशी तिची ख्याती झालेली होती. तिचं नाव जाहीर होताच कोणतंही सभागृह, थिएटर तुडुंब भरून जायचं. लोक जागेसाठी चक्क भांडायचे. स्टेजवर तिचा प्रवेश झाला, की एखादा साक्षात्कार व्हावा, तसं व्हायचं- लोक थरारून जायचे. उभे राहून टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने तिचं स्वागत करायचे. स्थानापन्न होऊन ती जेव्हा सावकाश आपला स्वर लावायची, वाद्यांच्या जुळवाजुळवीदरम्यान ती स्वर जुळवायला सुरवात करायची, तेव्हा पूर्ण सभागृहात एक अद्‌भुत अशी शांतता पसरलेली असायची. तिचा आवाज परिपूर्ण अन् संपन्न असा होता. श्रोत्यांना तिच्या स्वरांनी नेहमीच तृप्त केले होते. सर्वसामान्यांपासून जाणकार श्रोते, पंडीत, संगीतज्ञ अशा रसिकांपर्यंत तिचं गाणं लोकप्रिय असायचं. इतकंच काय, संगीतातलं ज्यांना काहीच कळायचं नाही, तेसुद्धा एक प्रतिष्ठेची बाब म्हणून तिच्या कार्यक्रमांत वावरायचे.

कार्यक्रम, मग तो मद्रास, दिल्लीला असो किंवा लंडन-न्यूयॉर्क, सिंगापूरला असो, कार्यक्रमात पुढच्या रांगेत-मध्यभागी, मोहनची जागा ठरलेली असायची. तिथे बसून तो सेल्वीकडे आपली नजर खिळवून असायचा. लोकांना आश्चर्य वाटायचं. त्यांना वाटायचं, हा तिच्या गाण्यात तल्लीन झालाय किंवा तिला दाद देतो आहे. पण त्याची नजर जरी सेल्वीवर खिळलेली असली, तरी त्याचं मन मात्र व्यावहारिक प्रश्नांमध्ये व्यस्त असायचं. कार्यक्रमाच्या ध्वनिमुद्रणाला त्याने परवानगी दिलेली नसायची. त्यामुळे कुणी चोरून ध्वनिमुद्रण करतो आहे का, यासाठी तो सतर्क असायचा. त्याचप्रमाणे आजुबाजूला बसलेल्या व्हीआयपींच्या प्रतिक्रियासुद्धा मोठ्या कावेबाजपणाने न्याहाळीत राहायचा.

प्रत्येक कार्यक्रम तपशिलाने व्यवस्थित तो आखायचा. दुपारच्या वेळेस तो सेल्वीसोबत बसायचा आणि मोठ्या सभ्यतेने; पण ठामपणाने सुचवायचा - ''आज तू सुरवातीला 'कल्याणी वर्णम' का नाही घेत?'' आणि ती म्हणायची, ''बरं.'' आयुष्यात तिने कधी वेगळा असा शब्द उच्चारला नव्हता. तो सांगत राहायचा - ''थायगाराजाची 'बेगाडा' रचना त्यानंतर घे. त्याच्यामुळे रागांतलं वेगळेपण आपल्याला आणता येईल, नाही का?'' आणि त्यानंतर चार तासांपर्यंत त्याचं असं सूचना देणं चालत राहायचं. ''इथल्या श्रोत्यांसाठी पल्लवी राग सादर करायच्या भानगडीत पडू नकोस; त्यापेक्षा तोडीच्या रचना थोड्या तपशिलाने घ्यायला काही हरकत नाही. त्याच्या नंतर तुला आवडेल ती रचना - भजन, ठुमरी किंवा एखादं लोकगीत घेवू शकतेस;'' पण तिला दिलेलं असं स्वातंत्र्य काही कामाचं नसायचं. कारण, कार्यक्रम चार तासांपेक्षा पुढे जाणार नाही, असा त्याचा कटाक्ष असायचा; ''पण माझ्या योजना अन् मार्गदर्शन नसेल, तर तिचा गोंधळच

होतो; कुणाला साधणार नाही ते.'' असं तो नेहमीच म्हणायचा.
सेल्वीशी जवळीक साधायला मिळेल, या आशेने मोहनची मर्जी आणि आस्था संपादन करण्यासाठी प्रत्येकजण त्याची खुशामत करायचा. 'लॉली टेरेस'च्या मुख्य हॉलमध्ये काही खास वर्गाला मोहन निमंत्रित करायचा. अशी कुणी मंडळी आली, की मोहन मोठ्या आवाजात सेल्वीला सांगायचा, ''हे आहेत अमुक अमूक'' आणि ही नावं साधीसुधी नसायची - ती असायची एखादा मंत्री, एखादा डायरेक्टर किंवा एखाद्या टेक्सटाईल मिलचा मॅनेजिंग डायरेक्टर किंवा एखाद्या वर्तमानपत्राचा संपादक; अशी. या कुटुंबीयांची - विशेषत: सेल्वीच्या निकट परिचयाची, म्हणवून घेण्यास ही मंडळी उत्सुक असायची. मोहनने तशी कृपादृष्टी दाखवावी म्हणून वाट पाहायची. सेल्वीला आवाज दिल्यानंतर दहा मिनिटांनी ती आपल्या कक्षातून बाहेर यायची आणि नेमून दिल्यासारखं वागायची. सुरेख हास्य आणि तळहात जणू एकमेकांना चिकटवून, तिचं ते 'नमस्ते' म्हणणं... पण त्यामुळे तिला भेटायला आलेल्या व्यक्तींमध्ये उत्साहाची एक लहर येऊन जायची. ते सहसा, तिच्या नुकत्याच झालेल्या एखाद्या कार्यक्रमाचा उल्लेख करायचे. तो कार्यक्रम ऐकून आपण किती भारावलो ते सांगायचे; विशेषत; त्या अमुक संध्याकाळचा तमुक राग आजही कानात कसा रेंगाळतो आहे... अशा प्रकारच्या स्तुतिपर वाक्यांना, सेल्वीजवळ ठरलेली आणि अनुरूप अशी उत्तरं तयार असायची - ''धन्यवाद. तुमच्यासारख्या महनीय व्यक्तीला माझे प्रयत्न आवडले हे पाहून मला धन्य वाटले.'' त्याच वेळेस स्वत:चं एखादं मत किंवा विनोद सांगून मोहन त्यात सहभागी व्हायचा. भेटीला येणारी व्यक्ती, मग ती कितीही मोठी असो, तिने सेल्वीचं लक्ष वेधून घ्यावं, हे मोहनला कधीच आवडलं नव्हतं. नेमक्या क्षणी त्या व्यक्तीचं लक्ष, तो आपल्याकडे वेधून घ्यायचा आणि शेवटी, आपण ठरविल्यानुसार सेल्वी बोलली-वागली, तिने ठराविक अभिनय केला, हे पाहून त्याला मोठा संतोष व्हायचा. एका कीर्तिवान अशा व्यक्तिमत्त्वात आपण तिला रूपांतरित केलं आहे, या विचाराने तो स्वत:वरच खूश व्हायचा; ''पण माझे प्रयत्न नसते, तर विनायक मुदाली गल्लीतल्या तिच्या आईसारखी, भावासारखी सेल्वीसुद्धा एक सामान्य रहिवासी होऊन राहिली असती, त्यापेक्षा अधिक नाही! तिला प्रशिक्षित करण्याइतका मी समर्थ आहे, याचा मला मोठा आनंद आहे...''
विनायक मुदाली गल्लीच्या त्या दरिद्री गल्लीतल्या, तिच्या आई, बहीण भावांपासून सेल्वीला वेगळं करण्यासाठी मोहनने मोठ्या पद्धतशीरपणे प्रयत्न केले होते. दिवस जात राहिले आणि घरच्यांशी तिची भेट कमी कमी होत गेली. सुरवातीला आठवड्यातून एकदा त्यांना आणायला कार पाठविली जायची; पण जसजसं सेल्वीचं कार्यक्रमात गुंतणं वाढू लागलं, तसतसं तिच्या आयुष्यातून घरची मंडळी दूर दूर जाऊ लागली. एकदोन वेळा आईबद्दल सेल्वीने विषय काढलाही होता; पण मोहन चिडायचा. म्हणायचा, ''ते खुशाल राहणारच, काळजी करू नकोस. मी त्यांना बोलावीनही; पण आता कुठे वेळ आहे? ज्या वेळी तीन दिवसांचा अवधी आपल्याला मिळेल इथे थांबायला; तेव्हा मी बोलावीन त्यांना इथे.'' एवढा अवधी त्यांना मिळणं शक्य नव्हतं. सहसा, ते कार किंवा रेल्वेने यायचे अन् चोवीस तासांच्या आतच परत दुसऱ्या कार्यक्रमाच्या दौऱ्यावर निघायचे. एखाद्या वेळेस त्यांना वेळ मिळाला आणि आईला भेटायसाठी सेल्वी फारच आग्रह धरू लागली, तर

मोहन तिला तोंडात मारायला कमी करायचा नाही- ‘‘मला माहित आहे! विनायक गल्लीत मी मणीला पाठवेनसुद्धा - पण नंतर केव्हातरी. गव्हर्नर साहेबांना मी उद्याच्या जेवणाचे निमंत्रण दिले आहे. त्यांची इच्छासुद्धा असू शकेल, तुझं गाणं ऐकण्याची. अर्थात हे सगळं अनौपचारिक असेल, तीस एक मिनिटांसाठी...’’
‘‘मग परवाच्या दिवशी?’’ सेल्वी घुटमळत विचारायची आणि तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत मोहन फोन करण्यासाठी उठायचा. सेल्वी समजून घ्यायची... अन् मग त्यानंतर तिने आईबद्दल कधीही उल्लेख केला नाही. ‘‘माझी आई- ती मला भेटूही शकत नाही!’’ सेल्वीच्या मनात सतत हेच विचार यायचे. तिच्या मनातलं हे दु:ख ती कुणालाही सांगू शकत नव्हती... तिच्या भावना कुठे व्यक्त करू शकत नव्हती.
आता आईच्या कारणावरून सेल्वी काही बोलत नाही - आईचं भूत आता उतरलं आहे, हे पाहून मोहनला आनंद व्हायचा. ‘‘हेच योग्य आहे, लहान मुलंच फक्त आईसाठी हट्ट करीत असतात,’’ पुन्हा एकदा तो स्वत:ची प्रशंसा करून घ्यायचा.
अशा तऱ्हेने महिने, वर्षं ओलांडली. तिला गायला- थांबायला लावून हा काळ यांत्रिक तऱ्हेने निघून गेला... सेल्वीच्या तो खिजगणतीत नव्हता.
कार्यक्रमाच्या एका मालिकेसाठी म्हणून ते कोलकत्त्याला आलेले होते आणि आईच्या निधनाची वार्ता सेल्वीला कळाली. जेव्हा सेल्वीला हे कळालं, तेव्हा मग ती हॉटेलच्या आपल्या खोलीतून बाहेर आलीच नाही. तिचे सगळे कार्यक्रम तिला रद्द करायचे होते. तिच्या खोलीत तिचं मन वळवायला म्हणून गेलेला मोहन, तिचं अश्रूभरलं रूप-विस्कटलेले केस पाहून निमूटपणे परतला. परतीच्या सगळया रेल्वेप्रवासात ती खिडकीतून बाहेर पाहत होती. तिला बोलण्यात गुंतवायचा मोहनने आटोकाट प्रयत्न करून पाहिला, तरी त्याच्याशी एक शब्दही ती बोलली नाही. तिचं असं वागणं पाहून तो गोंधळला. सेल्वी, तशी बोलकी नव्हतीच; पण कमीत कमी सांगणाऱ्याचं ऐकून घेणारी, अधूनमधून जुजबी प्रतिक्रिया देणारी अशा स्वभावाची होती. आता छत्तीस तासांच्या प्रदीर्घ प्रवासात ना तिने एक शब्द उच्चारला, ना त्याच्याकडे नजर टाकली. ते घरी पोचले तेव्हा मोहनने त्वरित तिला विनायक मुदाली गल्लीत घेऊन जाण्याची व्यवस्था केली आणि स्वत: तिच्यासोबत राहिला... मृतात्म्यासाठी शोक व्यक्त करण्याचा त्याच्या तऱ्हेने तो प्रयत्न करीत होता अन् त्यामुळे आपलं शोकाचं वागणं-बोलणं सेल्वीच्या लक्षात येईल, अशी त्याला खात्रीही वाटत होती. त्या सगळया वातावरणात त्यांची ती मोठी कार आणि पांढऱ्या सुती कपड्यांतला मोहन... विचित्र वाटत होते. सेल्वीची आई राहिली, त्या गल्लीत मोहनची कार अर्धी जागा अडवून उभी होती. सेल्वीच्या बहिणीने लग्न केलं होतं, तिला मुलंही होती आणि ती सिंगापूरला असल्याने येऊ शकली नव्हती. तिचा भाऊ कुठे होता, त्याचा पत्ता कुणालाही नव्हता. शेजारी आला आणि त्याने सविस्तर वृत्तांत कथन करायला सुरवात केली. तिच्या आईच्या मृत्यूची हकिकत, ती परिस्थिती अन् मग अंत्यविधी करण्यासाठी तिच्या मुलाची भूमिका कशी घ्यावी लागली वगैरे... सेल्वीशी त्याने उगीचच पाल्हाळीक बोलू नये म्हणून, मोहनने त्याला थोडक्यात बोलायला सांगून परत पाठविलं; पण ती मोहनला म्हणाली, ‘‘तुम्हाला टेरेसला परत जायचं असेल, तर जाऊ शकता. मी इथे थांबणार आहे.’’ अशा तऱ्हेने सेल्वी बोलेल अशी अपेक्षा मोहनने केली

नव्हती. तो गोंधळला आणि पुटपुटला, ‘‘हरकत नाही... मी कार परत पाठवीन... केव्हा पाठवू?’’
‘‘कधीच नको. इथे मी पूर्वी जशी राहिली होते, तशीच आता राहणार आहे.’’
‘‘कसं शक्य आहे? या गल्लीत?’’ सेल्वीने, मोहनच्या अशा आक्षेपाकडे दुर्लक्ष केले. ती म्हणाली, ‘‘माझी आई माझा गुरू होती. तिने इथे मला संगीत शिकविलं, इथेच ती राहिली आणि... गेली. मीसुद्धा इथे राहणार, इथेच मरणार. तिच्यासाठी जे चांगलं होतं, तेच माझ्यासाठीसुद्धा चांगलचं असणार...’’
सेल्वी इतकं फटकळ अन् तोडून बोलेल असं मोहनला कधीच वाटलं नव्हतं. एवढी वर्षं इतक्या सौम्य अन् सभ्यतेने वागणारी सेल्वी, आपण शिकविलेल्यापेक्षा अधिक काही बोलेल- वागेल, असं मोहनला अजिबात वाटलं नव्हतं. तिचा कल आता बदलेल या आशेने तो तिथे घुटमळला. त्याने वाट पाहिली. दरम्यान, तो शेजारी तपशिलाने वर्णन करीत होता- बारीकसारीक तपशिलाने. म्हातारीच्या शेवटच्या क्षणांबद्दल आणि अंत्यविधीसाठी आलेल्या अडचणींबद्दल... सगळं काही. ‘‘तुझ्याशी संपर्क कसा साधावा, कळेना झालं होतं. मग शेवटी नदीकाठी मी माझ्या हाताने तिला अग्नी दिला आणि शरयूमध्ये अस्थी विसर्जित केल्या... नाही तरी मी तिला माझ्या लहानपणापासून ओळखत होतो, तिला मावशी म्हणूनच हाक मारायचो - तुला आठवत असेलच... आणि तुझा रियाझ चालू असताना येऊन बसायचो... आता मात्र ते शक्य नाही. तुझ्या कार्यक्रमाचं तिकीट घेणंच काय; पण तुझं गाणं चालू असलेल्या हॉलजवळ फिरकायचीसुद्धा माझी ऐपत नाही.’’
आतामात्र मोहनची तारांबळ उडाली. त्याने लिहिलेल्या संवादांपेक्षा सेल्वीनं अधिक काही बोलल्याचं त्याला कधीच माहीत नव्हतं. त्याने निर्देश केल्यानंतर अधिक वेळ ती कुणाशी बोलली नव्हती किंवा तिथे थांबलीही नव्हती. आज मात्र ते काही चाललं नाही. तिनं मोहनच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याचे पाहून, विनायक गल्लीतला तो शेजारी आता अधिक उत्साहाने अंत्यविधीचा वृत्तांत पुन्हा पुन्हा तपशिलाने सांगू लागला. आपण अशा तऱ्हेने अशा प्रसंगी उपयोगी ठरल्याचा उन्माद त्याच्या चेहऱ्यावर होता.
अस्वस्थ होऊन वाट पाहिल्यावर मग मोहन जाण्यासाठी उठला.
‘‘तुझ्यासाठी काही पाठवू का?’’
‘‘काहीच नको,’’ तिने उत्तर दिले. तिने एक जुनी साडी नेसली होती आणि मेकप् - दागिने सगळं टेरेस बंगल्यात मागे ठेवून आली होती.
‘‘तुला काहीच लागणार नाही, असं म्हणायचं आहे काय?’’
‘‘मला कशाचीच गरज नाही.’’
‘‘तुला कसं जमेल सगळं?’’
तिने उत्तर दिलं नाही. आता त्याचा आवाज पडला होता. त्याने म्हटले,
‘‘तुला आता भोपाळच्या कार्यक्रमाची तयारी करायचीय. मी त्यांना तारीख बदलून देऊ का?’’ आज पहिल्याच वेळेस मोहन तिचा सल्ला घेत होता. सेल्वी एवढंच म्हणाली,
‘‘तुम्हांला जे वाटलं, ते करा.’’
‘‘तुला काय म्हणायचं आहे?’’
उत्तर नव्हतं. तो पायऱ्या उतरून निघून गेला. जमावाला कारचं आकर्षण होतं; आता कार

गेल्यावर जमाव सेल्वीकडे वळला. तिच्या दुर्लभ दर्शनासाठी धडपडू लागला. इतकी वर्षे अभेद्य अशा तटबंदीआड ती राहिली होती. एक दंतकथा- अद्‌भुत कथा म्हणून ती सगळयांसाठी राहिलेली होती.

कुणीतरी विचारलं, ''तू तुझ्या आईच्या मदतीला का आली नाहीस? ती तुझी फार आठवण करायची,'' आणि सेल्वीला रडू आवरलं नाही. अनावर हुंदक्यांनी तिची दातखीळ बसू लागली.

तीन दिवसांनंतर मोहन परत आला. त्याने जाहीर केले- ''तेरा तारखेला तुला दिल्ली विद्यापीठाची सन्माननीय पदवी स्वीकारायची आहे.'' सेल्वीने नकारार्थी मान हलविली.

''पंतप्रधान या समारंभाला हजर राहणार आहेत'' तो पुढे म्हणाला. फार आग्रह धरला, तसं ती म्हणाली, ''मला या सगळयांपासून बाहेर ठेवा, प्लीज. मला एकटं राहू द्या. इथून पुढे मला एकटं राहायचं आहे. कुणाची नजरसुद्धा आता मला सोसणार नाही.''

एवढा एकच कार्यक्रम! त्याच्यानंतर तुला जे वाटेल ते कर. नाही तर ते फारच कठीण होऊन जाईल बघ आपल्यासाठी. फक्त एक दिवस दिल्लीला; त्यानंतर आपण ताबडतोब परत येऊ आणि पुढल्याच महिन्यात ग्रामोफोन कंपनीशी केलेल्या करारानुसार ध्वनिमुद्रण...''

तिने उत्तर दिले नाही. तिच्या चेहऱ्यावरून दिसू लागलं, की तिचा याच्याशी काहीही संबंध नव्हता.

''तू मला अडचणीत टाकीत आहेस. कमीत कमी, जे ठरलेलं आहे, त्याबद्दल...'' त्यांच्या बोलण्यातला प्रत्येक शब्द भोवती जमलेला समुदाय ऐकायचा. त्यामुळे संवाद पुढे चालू ठेवणेही अशक्य झाले. त्याला वाटायचं, सेल्वीला एकांतात बोलावं थोडं; पण हे घर एकाच खोलीचं. इथे प्रत्येकजण येत होता- जात होता. कुणीही येऊन कुठेही बसत होता. सेल्वी क्वचित एकटी जरी असली, तरी समजुतीचं बोलणं किंवा खांद्यावर हात ठेवून सांत्वनादाखल वागणं याशिवाय काही शक्य नसायचं. मोहन वैतागून गेला. निराश झाला. अचानक उठून निघून गेला.

एका आठवड्यानंतर मोहन पुन्हा आला; पण त्याच्या भेटीतून काही निष्पन्न झाले नाही. तिनं त्याचं स्वागतही केलं नाही अन् निघून जायलाही सांगितलं नाही. या वेळी त्याने तिला कारपर्यंत येण्याबद्दल सुचविले. या वेळी त्याने लहान कार आणली होती. तिने त्याचे निमंत्रण स्वीकारले नाही.

''नाही तरी आईचं वय झालेलं होतं, तिच जाणं स्वाभाविक होतं,'' त्याने विचार केला- ''पण ही मूर्ख स्वत:चं आयुष्य नीरस करून टाकते आहे...''

सुतक आणि शोक सरण्यासाठी त्याने आणखी चार आठवडे जाऊ दिले आणि पुन्हा तिला भेटायला आला; पण तिच्या घरासमोर आता मोठी गर्दी जमलेली त्याने पाहिली. अगदी गल्लीतसुद्धा दाटीवाटी झालेली. तिच्या खोलीत भिंतीला टेकून ती बसली होती. हातात तंबोरा घेतलेला होता आणि प्रेक्षागृहात सादर करावे तशा तऱ्हेने ती गाणं म्हणत होती. व्हायोलिन आणि तबल्याच्या साथीला स्वत: होऊन आलेले दोघे सोबत होते. आपली सगळी गायनकला ही वाया घालवते आहे, असं मोहनला ते पाहून वाटलं.

''या बसा.'' तिने म्हटले. मोहन कोपऱ्यात बसला. थोडा वेळ त्याने गाणं ऐकलं अन् हळूच

तिथून निसटला. प्रत्येक वेळेस तो भेटायला यायचा आणि तिच्याभोवती श्रोत्यांची अशी गर्दी दिवसभर असलेली त्याला दिसायची. सेल्वीच्या अशा मोफत कार्यक्रमाची वार्ता सगळीकडे पसरली आणि आता त्यासाठी लोकांची प्रचंड गर्दी होऊ लागली. लोक गाड्या घेऊन येऊ लागले. कुणी सायकलीवर तर कुणी पायी, अशी दाटी होऊ लागली. 'बोर्डलेस'च्या वर्मांनी बेगडी कागदात मिठाईचा डबा आणला आणि नम्रतेने सेल्वीपुढे ठेवून मोठ्या संतोषाने ते परत फिरले. आपल्या देवीला भेटायची त्यांची मनोकामना पूर्ण झाली होती.

सेल्वी कधीच अनावश्यक बोलायची नाही. कोण आलं, कोण चाललं याकडे लक्ष न देता दिवसभर अलिप्त राहून ती चिंतनात मग्न असायची.

मोहनला वाटलं, कमीत कमी रात्रीच्या वेळेस तिला एकट्याने नक्कीच भेटता येईल. एका रात्री अकरा वाजता मार्केट रोडवर आपली कार सोडून तो विनायक मुदाली गल्लीत चालत आला. सेल्वीच्या घराचं दार ठोठावून हळूच त्याने आवाज दिला, "मी आहे- मला तुला काही तातडीचं बोलायचं आहे सेल्वी, प्लीज दार उघड, प्लीज!" अंधार असलेल्या त्या घरात मोठ्या अगतिकतेनं मोहनने आवाज दिला होता.

...पण सेल्वीनं घराच्या खिडकीचे दार अर्धवट उघडले आणि मोठ्या ठामपणाने तिने म्हटले, "निघून जा. या वेळी असं येणं योग्य नाही."

आवंढा गिळून मोहन मागे फिरला. दातओठ खात अर्धवट-मोठ्या आवाजात तो म्हणू लागला, "कृतघ्न! दळभद्री...!"

♦♦♦

# दुसरं मत

मांजरासारखा मी चोरून आत आलो. माझ्या दाराची कडी काढली. काडीपेटी घेऊन दिवा लावला. आईला जाग येणार नाही, याची काळजी मला घ्यावी लागली होती. एखादा शिकारी जंगलात माग काढीत जाताना, पायाखालच्या पाचोळयाचाही आवाज होऊ देत नसतो, तशा काळजीने अंगणातून, दुसऱ्या टोकाला असलेल्या खोलीपर्यंत मी जातो. हॉलच्या खिडकीच्या टोकाला असलेली माझी खोली. आठ बाय दहाची ही माझी खोली; पण मी आत प्रवेश करतो, त्या क्षणापासूनच मला मोठं मोकळं वाटतं. मी तेवढ्या जागेचा जणू राजा असतो. खोलीचं, जुनाट उतरतं छत हे कित्येक कोळी- कीटकांचं, किडे-पाकोळयांचं निवास आहे. भिंतीवर वर्षानुवर्षे लटकणाऱ्या कॅलेंडरच्या मागे राहून बारीकसारीक किडे-कीटक-जंतूंना खाऊन टाकणारे हे सगळे जण गुण्यागोविंदाने इथे नांदतात. एक जीव, दुसऱ्या जीवाला संपवून, त्याला त्वरित दुसऱ्या योनीत प्रवेश देऊन टाकायचा; मग अशाच जन्मोजन्मांनंतर उत्क्रांती होऊन वानर- मग माणूस अन् अंतिमत: त्या परम-आत्म्यात लीन होऊन जायचं, असा माझा दृष्टिकोन असल्याने मी कधी खोलीच्या साफसफाईच्या भानगडीत पडलो नाही किंवा कुणाला खोली झाडायची परवानगी मी दिली नाही.

-आणि खोलीबाहेर ठेवलेल्या जेवणाच्या डब्यालाही, फार भूक लागली असेल तरच मी हात लावला; अन्यथा नाहीच. आणि भूक लागणंच कसं शक्य आहे... दिवसभर त्या बोर्डलेस हॉटेलमध्ये पैसाही न देता कॉफीचे कपावर कप मी घेत असतो. वर्मा दर दोन तासांनी स्वत:साठी कॉफी मागवीत असतो. त्याच्या रेस्टॉरंटमधल्या कॉफीचा दर्जा कायम राहावा, अशी त्याची धडपड असते आणि मग अपरिहार्यपणे माझ्यासाठीही तो एक कप मागवायचाच. माझ्यासाठीची ही कॉफी म्हणजे, केवळ सौजन्याचा भाग नसायचा, तर माझ्या डॉक्टरच्या भाषेत सांगायचं झाल्यास 'दुसरं मत' घेण्यासाठी ती दिली जायची.

इथं थोडं विषयांतर करून मी मालगुडी मेडिकल सेंटरच्या डॉ. किशन यांच्याबद्दल सांगतो. त्या दिवसांत मी ज्या वेळी घरीच बसायचो, त्या वेळी आईला मी नेहमीच या डॉक्टरकडे घेऊन जायचो. या जुन्यापुराण्या वडिलोपार्जित मोठ्या अशा घराच्या कितीही गैरसोई असू द्या; पण या घराचं मोक्याच्या अशा ठिकाणी असणं फार महत्त्वाचं होतं. मार्केटरोडच्या समांतर अशी कबीर स्ट्रीट होती. तिला अनेक गल्ल्या जोडलेल्या होत्या आणि इथनं भाजीमंडईत किंवा डॉक्टरकडे सहजच चटकन जाता यायचं. मालगुडीचं हे मेडिकल सेंटर शहराच्या मध्यवर्ती भागात होतं; तथापि तपासणीदरम्यान, तुम्ही काही बोलला नाहीत, तरी डॉक्टर स्वत:च सांगायचे, "इतरांपेक्षा इथे जादा गर्दी का असते माहीत आहे का? कारण, तुम्ही पाहा- ही जागा सगळयांसाठी अगदी सोयीची-मध्यवर्ती अशी आहे."

पण हे निरीक्षण सांगितल्यानंतर डॉक्टर अगदी न चुकता हेही सांगायचे, "...असं माझं निदान आहे, जर तुम्हाला आवश्यकता वाटली तर तुम्ही 'दुसरं मत' घेऊ शकता..." वर्माचंसुद्धा असंच म्हणणं असतं, असं मला वाटतं. कॉफी घेतल्यावर नेहमीच तो संभ्रमात पडायचा अन् मग मला विचारून तो खात्री करायचा आणि अशाप्रकारे दिवसभर कॉफी

घेऊन, शिवाय संध्याकाळी सहा वाजता माझी मित्रमंडळी गप्पा मारायला कोपऱ्यात बसायची, तिथंही कॉफी व्हायची. मग त्याचा परिणाम असा व्हायचा, की रात्री ठेवलेल्या त्या टिफिन बॉक्समधल्या अन्नासाठी भूक शिल्लक नसायची.

सकाळीच घरकाम करणारी एक पोरगी हा डबा धुण्यासाठी घेऊन जायला यायची. दहा वर्षांची, सावळा रंग, गोबरे गाल, चमकदार डोळे अन् शुभ्र दातांची, रिबिनीचा शेपटा असलेली वीतभर वेणी... अशी. मला मोठी आवडायची अन् मी चित्रकार असतो तर तिचं अप्रतिम असं चित्र काढलं असतं. ती मला आवडायची, हे तिला माहीत होतं अन् त्यामुळे माझ्या खोलीत घुसायला तिला अजिबात संकोच वाटायचा नाही. डबा उचलून ती ओरडायचीच ''अं! तस्साच आहे!''

''एऽऽ'' मी म्हणायचो, ''... ओरडू नकोस,'' मग ती खट्याळपणे हसायची. ''हंऽऽ'' म्हणायची अन् मला लक्षात यायचं, की आता दुसऱ्याच क्षणात ही बातमी सगळीकडे पसरणार. थोड्याच वेळात खोलीच्या दाराशी माझी आई येऊन उभी राहणार आणि म्हणणार, ''हे असं होत राहिलं तर कसं व्हावं...? मी खास तुझ्यासाठी काकडीची भाजी केली होती अन् ती आता फेकून द्यावी लागणार. तुला त्याचं काहीच कसं वाटत नाही? कमीत कमी तुला काय आवडतं हे सांगत जा बाबा! सांगत नाहीस अन् नुसताच टाकून देतोस बस!'' दारातूनच ती असं बोलायची. मला काही वावगं वाटायचं नाही, भिंतीला टेकून मी चटईवर बसून राहायचो. ती जे काही बोलायची, ते गप्प बसून ऐकायचो आणि अलिप्त राहायचं तत्त्वज्ञान किती कठीण असतं, याचा विचार करायचो. सगळे झोपून गेलेले असताना, मध्यरात्री घर सोडून आत्मज्ञान मिळविण्यासाठी निघून जाण्याचा सिद्धार्थने मार्ग पत्करला होता, तो शहाणपणाचा होता. माझ्या तऱ्हेने मीसुद्धा असे आत्मज्ञान मिळवायचा प्रयत्न करीत होतो; पण सारखं बंधनांत अडकून पडत होतो. सगळ्यांसाठीचं एक घर, मग अर्थातच विवाह, परंपरा- उत्तराधिकार हे सगळे अडथळे... या परिस्थितीची जाणीव ठेवून मी पहिल्यांदा त्याग केला तो फर्निचरचा आणि एका तऱ्हेने सांगायचं झाल्यास असं म्हणता येईल, की एवढं मोठं घर, एकच छत असलेल्या या जागेत माझी एवढी खोली, स्वतंत्र- अलिप्तच होती. हे सगळं एवढं काही सोपं नव्हतं. आमच्या वडिलांचं हे घर भलं मोठं होतं अन् वाटायचं, की शेकडो लोकांसाठी हे बांधलंय, की काय? घराचा पुढला दरवाजा कबीर स्ट्रीटला, तर मागचा शरयू नदीकडे उघडायचा. ही नदी जेव्हा मेम्पी हिल्सवरून पावसाचे ओहोळ-ओढे वाहायचे, तेव्हा जोरदार वेगाने वाहायची. इतर वेळी मात्र संथ असायची. मागचं दार उघडून बसलं, की पूर्वी नदीचं मोठं सुंदर दृश्य दिसायचं. प्रवाहाचा मंजूळ असा स्वरही ऐकायला यायचा; पण कित्येक वर्षे झाली. हे दार कायमचं बंद झालेलं आहे. जुनाट झाल्याने. आणि आता काट्याकुट्यांमुळे, शेवाळ-जंगली वनस्पतींमुळे नदीचा मार्गही चांगला राहिला नाही. आई सांगायची, की पूर्वी कबीर स्ट्रीटच्या प्रत्येक घराचं मागचं दार नदीच्या पात्रात उघडायचं. नदीही जणू घराचा हिस्साच असायची. लोक स्नान करायचे, पाणी भरून घ्यायचे. घरातली वडिलधारी मंडळी सकाळ-संध्याकाळी नदीच्या पात्रात प्रार्थना वगैरे करायची. घराघरात विहिरी व्हायच्या आधीची ही स्थिती होती. ''त्या दिवसांत ही नदी आम्हाला फार जवळची अशी होती. पुढे ती दुरावली गेली. विहिरी खोदल्या गेल्या आणि लोक आळशी झाले नदीकडे

दुर्लक्ष झालं आणि मग ती स्वत: होऊन दूर झाली, यात काय आश्चर्य? त्या दिवसांत, मागच्या दारातून हात लांबविला तरी नदी हाताला लागायची; पण तू बघ, इलॅमन गल्लीला लागूनच ही नदी वाहते. का बरं? कारण ते लोक आजही तिची काळजी घेतात, पूजा करतात. त्यांनी नदीला पायऱ्या बांधल्या आहेत. कार्तिकाच्या महिन्यात ते नदीत दिवेही सोडतात... आणि आपल्या गल्लीतले लोक नुसते आळशी अन् विचित्र आहेत. त्या दिवसांत मी तुझ्या बाबांना सांगत होते, की विहीर खोदू नका, दुसरेसुद्धा खोदतील म्हणून...'' विहीर खोदणाऱ्यांवर आईचा नेहमी राग असायचा.

''पण आई, विहिरीतलं अन् नदीतलं पाणी सारखंच नाही का?''

''म्हणजे काय- कसं?''

आणि मला सगळं समजावून सांगावं लागायचं. जमिनीखालचा पाण्याचा साठा, त्याचे शास्त्रातले, काव्यातले हवाले देऊन मी सांगायचो, ''हे बघ, जमिनीखाली शेकडो हजारो घनफुटांचं एक पाण्याचं विस्तीर्ण असं पात्र आहे. सगळीकडे संबद्ध असलेलं- जसं तू म्हणतेस ना, सर्वत्र वेगवेगळ्या रूपात ब्रह्म आहे तसं...'' पण मध्येच मला थांबवून ती म्हणायची, ''मला ते काही कळत नाही. मी साधं पाण्याबद्दल म्हणते आहे अन् तू प्रवचन देतो आहेस...''

घराच्या मागे मोठे अंगण होते, स्वयंपाकघर, कोठीघराला समांतर अशी लांबलचक ओसरी होती. त्या दिवसांत बराचसा वेळ मी इथेच बसून असायचो. माझी आई दिवसभर इथेच असायची. इथं बसून राहण्याशिवाय मला त्या दिवसांत कामही नसायचं म्हणा. खांबाला टेकून बसायचं आणि आईला नव्या विचारांचे मार्ग सांगून तिला सुधारायचा प्रयत्न करायचा; पण तिला माझ्या या शास्त्रात काही रुची नव्हती. आम्ही जणू स्वतंत्र स्तंभ होतो. नदीच्याच बाबतीत नाही, तर प्रत्येक प्रश्नावर तिचं स्वतंत्र मत असायचं, जे माझ्या हिशेबात बसणारं नसायचं.

कधी कधी मला वैताग यायचा. आई मला स्वस्थ बसू द्यायची नाही. हॉलच्या पलीकडे घराच्या पश्चिम बाजूला माझी एक खोली होती. दुसऱ्या टोकाला होती बाबांची खोली. तिथे बाबा दिवसभर बसायचे. मला वाटायचं, मोठमोठ्या पुस्तकांच्या अभ्यासात ते गढून गेलेले आहेत. भिंतीला लागून असलेल्या त्या जाडजूड संस्कृत, तामीळ, इंग्रजी पुस्तकांची चळत पाहून कुणालाही वाटायचं, जगातल्या सगळ्या थोर अशा उपदेशकांनी लिहिलेली ती समीक्षा, उपनिषदे- शंकराचार्य, रामानुजम यांचे टीका-ग्रंथ यांत बाबा गढून गेलेले आहेत. प्लेटो, सॉक्रेटिस अशा तत्त्ववेत्त्यांचे, कापडी बांधणीचे ग्रंथसुद्धा होते. या सगळ्या ग्रंथांचा बाबांना किती उपयोग व्हायचा, काय व्हायचा हे मला कळायला मार्ग नव्हता. बाबांच्या या खोलीत मला प्रवेश नव्हता. लाकडी मेजासमोर दिवसभर बाबा मांडी घालून बसायचे. भली मोठी पुस्तकं असायची, जी मला लहान वयात पोथ्या-ग्रंथ आहेत असे वाटायचे; पण थोडं मोठं झाल्यावर माझ्या लक्षात आलं, की त्या सगळ्या हिशेबाच्या जाडजूड वह्या होत्या अन् बाबा दिवसभर त्यांत हिशेब करीत बसलेले असायचे. जमा-खर्च, गुणाकार, भागाकार... आमच्या गावाकडच्या शेतीतल्या- साळवणाच्या मजुरीचे हे किचकट हिशेब असायचे. व्याजबट्ट्याच्या व्यवहारांची आकडेवारी यात असायची, मंदिराच्या विश्वस्त निधीचे हिशेब आणखी काय काय... सगळ्या प्रकारची माणसं

घराच्या बाहेर ओट्यावर खोळंबून बसलेली असायची. बोलाविलं, की ते आत जायचे. वडिलांसोबत चर्चा व्हायची, कागदपत्रांवर सह्या व्हायच्या; मग मजबूत अशा तिजोरीतून पैसे काढून दिले जायचे. तीन फूट उंचींची ती भक्कम तिजोरी पाहिली, की बाबांच्या व्यक्तिमत्त्वाचीच आठवण व्हायची. या तिजोरीतून पैसा निघायचा अन् त्यात कागदपत्रे जमा व्हायची. बाबांच्या निधनानंतर मलाच ही तिजोरी अनेक खटपटी-लटपटीनंतर उघडता आली. ही कागदपत्रं पाहताना मला लक्षात आलं, की तत्त्वज्ञानाच्या त्या ग्रंथांचं भांडार एका गरीब विद्वानाने त्यांच्याकडे गहाण ठेवलेलं होतं. त्याला बिचाऱ्याला ते सोडवून घेता आलं नव्हतं; पण बाबांनी हा पूर्ण संग्रह केवळ धूळ झटकून अद्ययावत ठेवण्याशिवाय काहीच केले नव्हते. हेतू हा, की कधी हा साठा परत करायची वेळ आली, तर करारात काही बाधा पोचू नये. तथापि, ही माझ्यासाठी इष्टापत्तीच होती. बाबा जेव्हा विहिरीवर स्नानासाठी जायचे, त्या वेळी मला भरपूर वेळ मिळायचा अन् मी त्यांच्या खोलीत जाऊन या ग्रंथांची नावं पाहून घ्यायचो, ती चाळायचो, कित्येक दिवस बाबांनी या पुस्तकांना मला हात लावू दिला नव्हता. “त्यात काय सांगितलंय, हे तुला कळणार नाही,” ते म्हणायचे. काही काळानंतर मग एकावेळी एक पुस्तक हाताळायची त्यांनी परवानगी दिली. तीसुद्धा दटावून-“पानं दुमडू नको, पुस्तक पूर्ण उघडू नको, ती चांगल्या स्थितीत परत करायची आहेत, लक्षात ठेव.”

बाबांच्या आदेशानुसार मग मी एकावेळेस एक पुस्तक घ्यायचो. मला त्या पुस्तकांचा वास, वजनदारपणा मोठा छान वाटायचा. त्यांपैकी काही पुस्तकं एकाच विषयाची-सलग असायची. ‘लायब्ररी ऑफ वर्ल्ड थॉट’ अशी. जे वाचलं ते मला सगळं समजायचं असं नाही. मला तशी वाचनाची शिस्त नव्हती, ना मार्गदर्शन. तीन प्रयत्नानंतरसुद्धा मला मॅट्रिक होता आलं नव्हतं. बाबा गेल्यानंतर मी तो नाद सोडून दिला. मला ते मूर्खपणाचं वाटू लागलं. मी सक्षम आहे का नाही, हे ठरविणारे ते कोण? आणि चौथ्या प्रयत्नानंतर मी तो नादच सोडून दिला. सगळी पुस्तकं, वह्या बांधून, मी मग माळयावर टाकून दिली.

मध्यभागी असलेल्या हॉलमध्ये हा लाकडी माळा होता अन् त्या माळयावर अशाच वस्तू जमलेल्या होत्या. खालनं नेम धरून वर फेकायच्या, बस. तिथनं काही काढायचं झाल्यास शिडी लावून वर चढावं लागायचं. कितीतरी वर्षं तिथं सामान साचत राहिलं अन् वर तिथं जाणं मात्र कुणाचं झालं नाही. कधी कधी एखाद्या धडधाकट माणसाला हाताशी घेऊन आई त्याला या माळयावर पाठवायची. आपल्या लग्नाच्या वेळेस आणलेल्या तांब्या-पितळेच्या भांड्यांची साफसफाई करवून घ्यायची. त्याशिवाय या माळयावर असंख्य वस्तू पडून होत्या. हिशेबाच्या वह्या, खराब झालेले दिवे, फर्निचर्सचे भाग, कपड्यांची संदूक, चटया, ब्लँकेट अन् काय काय! आई जेव्हा या माळयाच्या सफाईचं काम हाती घ्यायची, तेव्हा मला भीतीच वाटायची. कारण त्या वेळी सहसा तिला माझी मदत लागायची; मग मी तिला मदत करायचो; पण ते काम टाळायचाच माझा प्रयत्न असायचा. मग ती तक्रार करायची- “‘ते’ होते, तेव्हा त्यांच्या इशाऱ्यासरशी सगळी कामं कशी पटापट व्हायची. आता मला एका एका कामासाठी केवढा आटापिटा करावा लागतो आहे.!” जेव्हा तिचं असं, हातवारे करून रागावणं- ओरडणं चालू असायचं, त्या वेळी मी निसटून जायचो. माझ्या खोलीचं दार लावून घेऊन ती तिथनं निघून जाईपर्यंत गप्प राहायचो. आई एका

ठिकाणी कधी स्वस्थ बसायची नाही. सतत इकडेतिकडे लक्ष ठेवीत फिरत राहायची. आपली मोलकरीण कुठे झोपून गेली की काय, अशी शंका मध्येच तिला यायची अन् मग या विशाल घरात आई तिला शोधत राहायची. ती एकापाठोपाठ एक अशा बाबतीत सतत अस्वस्थ असायची, मोलकरीण नाही तर मग परसातल्या विहिरीच्या पोहऱ्याचा दोर! तिला सतत असं वाटायचं, की मोलकरणीच्या निष्काळजीपणामुळे विहिरीच्या रहाटावरून दोर निसटून विहिरीत पडला की काय! ती मग तिकडे जाऊन, तो दोर नीट बांधून ठेवल्याची खात्री करायला जायची... ''जर दोर विहिरीत निसटून पडला तर...'' असं म्हणत मग, तो काढायला केवढं कठीण जाणार, या कामाला आता कुणी नाही, आधी कसं एखादा आकडे घेऊन यायचा, पोहरा, दोर काढून द्यायचा किंवा नवीन दोर घेऊन यायचा... अशा तपशिलाची लांबण लावीत बोलत राहायची.

त्या वेळी प्रत्येक दिवस म्हणजे माझ्या परीक्षेचा दिवस होता. मला ते सहन करणं अशक्य व्हायचं- आईचं ते मोलकरणीवर मोठ्या आवाजात ओरडणं, आदळआपट करीत राहणं... मी कडी लावून खोलीत गप्प बसून राहायचो. हातातलं पुस्तक वाचण्यासाठी मला स्वस्थपणा पाहिजे असायचा. 'लाईफ ऑफ रामकृष्ण' किंवा मॅक्समुल्लर यांचे काही उतारे, प्लेटोचं रिपब्लिक... हे सगळं वाचन, एक कष्टाचा; पण रोमांचक असा अनुभव असायचा. त्यांचे विचार वाचायचे, त्याचा अर्थ लावायचा यात मी गढून जायचो. त्याचा तपशीलवार अर्थ लागायचा नाही; पण हे जाणवायचं, की ते सगळं आत्मा आणि आत्म्याच्या उन्नतीबद्दलचं आहे. ते वाचून मला आत्मपरीक्षण करावं वाटायचं. मी स्वत:ला बजावायचो, ''संबू, तू कोण आहेस? गालावर दाढीचे खुंट असलेला, गुडघ्यावर जखमेचे व्रण असलेला, ज्याच्या अंगठ्याचे नख जाऊन तो काळा-निळा झाला आहे असा? छे! तू यापेक्षा वेगळ्या अशा तत्त्वांनी बनलेला आहेस...''

अंतराळात जणू फिरतो आहे, अशा कल्पनेत मी रंगून जायचो. त्यामुळे खोलीतलं हे बंदिस्त जग, या जुनाट भिंती, खिडकीबाहेर असणारा हा गोंगाट, धूळ- आरडाओरड याला, या सगळ्यांना ओलांडून स्वस्थ व्हायचा प्रयत्न मी करायचो; पण माझ्या या जागेपणाच्या स्वप्नात व्यत्यय यायचा- बाहेर आई, दारावर कडी वाजवीत ओरडत असायची, ''तू दार का लावून घेतलंस? आता घरात तुला त्रास द्यायला कुणी आहे का? आधीची गोष्ट वेगळी, आता असं का करतो आहेस?'' मी अगतिक होऊन पाहत राहायचो. ती भांडायला सज्ज आहे, याची मला जाणीव व्हायची, पण त्यासाठी माझी तयारी नसायची. केस पिंजारलेले अन् आग ओतणाऱ्या डोळ्यांनी ती पाहत असायची. मला मोठं भय वाटायचं. मला वाटून जायचं, की थोडीशी जरी आगळीक माझ्याकडून झाली, की आता स्फोटच होईल!

बाबांच्या निधनानंतर सहा महिन्यांत मात्र आईमध्ये कसा बदल झाला, कळालं नाही. सुरुवातीला त्या धक्क्यामुळे ती शोकात होती. जणू स्तब्ध झालेली! कितीतरी महिने ती देवघरातच बसून होती. पूजापाठ, स्त्रोत्र पुटपुटणं असं तिचं चालू होतं. कमी बोलायची. घर-व्यवहाराची पर्वा तिने केली नाही, त्यातून लक्ष काढून घेतलं. माझ्याकडे तिचं लक्ष एकदम कमी झालं असलं, तरी मी बी.ए. करावं असं अधूनमधून ती सुचवीत राहायची. त्या दिवसांत, वडिलांच्या कृपेने घरात नांदत असणारे बरेच लोक त्यानंतरही राहायचे. घरातली बरीच जागा त्यांच्यामुळे व्यापलेली राहायची. ते असायचे, तोपर्यंत आई

सगळ्यांशी अलिप्तपणे वागायची. अशा माणसांसोबत वागायची तिची एक खास तऱ्हा होती. मी एक एक करून सगळ्यांना जेव्हा घरातून काढून दिलं, तेव्हा तिचा श्वास मोकळा झाला आणि मग घराची सूत्रं तिने हाती घेतली. सर्वप्रथम तिने एक गोष्ट केली, ती म्हणजे, बाबांच्या खोलीचं दार लावून त्याला कुलूप घातलं. पुस्तकं घ्यायचा माझा मार्ग अशा तऱ्हेने बंद झाल्याचे पाहून मला धक्काच बसला. आई आपला दिवसभराचा वेळ घरात-ओसरीवरच काढायची. त्यामुळे मला पुस्तक पाहिजे असलं, की सारखं चावीसाठी तिला विनवावं लागायचं. सुरुवातीला तिने दाद दिली नाही. म्हणायची, ‘‘आधी अभ्यासाची पुस्तकं वाच अन् पास हो, डिग्री मिळाल्यानंतर तुला भरपूर वेळ राहणार आहे. तरीही तुला ती पुस्तकं समजणार नाहीत. तुझे बाबा काय म्हणत होते, माहिताय- त्यांना स्वत:लाच ती समजली नव्हती कधी, तर तुझं काय!’’

‘‘प्रश्नच नाही; त्यांना कशी समजतील ही पुस्तकं? त्या पुस्तकांना पाठ लावूनच ते बसायचे ना!’’ मी म्हणायचो.

आईला राग यायचा, ‘‘तुझं पालनपोषण करून तुला वाढविलं, त्यांच्याबद्दल असं बोलतोस काय?’’ असं म्हणून रागारागात ती निघून जायची.

तिच्या मागेच मी राहायचो- ‘‘आई, तेवढी चावी, प्लीज.’’ त्या दिवसांत तसा हट्ट करण्याएवढा मी लहान होतो. शेवटी ती तयार व्हायची. म्हणायची, ‘‘पुस्तकं अस्ताव्यस्त ठेवू नकोस. हट्टी आहेस नुसता! एवढा हट्ट तू अभ्यासासाठी धरला असतास तर?’’ अशा वेळी मला राग यायचा. तिने असं परीक्षा आणि डिग्रीलाच का चिकटून असावं बरं? जुनाट विचारसरणी- नाही तर काय! मद्रासच्या तिच्या बहिणीची सगळी पोरं ग्रॅज्युएट झालेली अन् त्यांच्यासमोर माझा विषय निघाला, की तिला मोठं अपमानित वाटायचं... ज्या ज्या वेळेस मॅट्रिकचा निकाल लागायचा, त्या त्या वेळी ती माझ्यावर संतापून ओरडायची, ‘‘पुन्हा नापास झालास! मूर्ख कुठला! तू म्हणजे कलंक आहेस.’’ मीपण ओरडायचो- ‘‘मी काय करू मग? तुला वाटतं का, की मार्कं बाजारातून विकत आणता येतात, अ’?’’ मग मी शिक्षणच सोडून दिलं.

अशा तऱ्हेच्या वादानंतर कधी कधी ती कोपऱ्यात रडत बसायची. घरातली कामं खोळंबून जायची. देवघरात दिवासुद्धा लावायची नाही. घरात एक विचित्र मरगळ भरून राहायची. आयुष्याची गतीच जणू निघून जायची. एवढ्या मोठ्या घरात आम्ही मग शापित अशा पुतळ्यांसारखे वावरायचो. अशा वातावरणात मग मी निराश व्हायचो. वैतागून जायचो. काहीच न बोलता मी घराबाहेर पडायचो. नगर वाचनालय, बाजार, कॉलेजचं मैदान अशी काही उत्साहवर्धक ठिकाणं शोधीत राहायचो. काहीच नसलं, तर मग बोर्डलेस हॉटेल होतंच. चार मित्रांसोबत वेळ घालवायला.

दररोज मी परतायचो ते अंधार पडल्यावर; पण आज बोर्डलेसमधून घरी परतलो तेव्हा पाहिलं, की हॉलमध्ये दिवा चालूच आहे. मी गोंधळलो. माझ्या खोलीच्या दिशेने मी गेलो अन् थोडं थांबलो. आत हॉलमधून आवाज येत होते. संवाद चालू होता. माझ्या आईचा आवाज मोठा अन् तिच्या मागच्या दिवसांतला असावा तसा होता. ती सांगत होती, ‘‘तसा तो काही वाईट मुलगा नाही, तो निष्काळजी आहे. आपण त्याला चांगलं बोललं, तर तो तसं वागेलसुद्धा.’’ मध्येच कुणी एक जण घोगऱ्या आवाजात अन् उपदेशाच्या तऱ्हेनं बोलू

लागला, "असं वागायची मोकळीक तू त्याला देऊ नकोस. तरुण पोरांना चांगलं काय, वाईट काय कळत नसतं. त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करायची आपल्यासारख्या मोठ्यांचीच जबाबदारी असते बरं!" आता मला, माझ्या खोलीपर्यंत कसं जावं, आवाज न होऊ देता, कडी कशी काढावी याची काळजी वाटू लागली. गोंधळही होऊ लागला. आवाज आला, तर नक्कीच त्यांचं लक्ष माझ्याकडे जाणार. व्हरांड्याच्या एका टोकाला माझ्या खोलीचं दार होतं आणि कुणाचं लक्ष न जाता खिडकी ओलांडणं मला जवळजवळ अशक्यच होतं. मी चांगलाच पेचात सापडलो. आता इथनं परत 'बोर्डलेस'ला जाणंही शक्य नव्हतं. घराच्या ओट्यावरच मी गप्प बसून राहिलो. चर्चेचा एकंदर सूर पाहता, ती काही लवकर आटोपायची शक्यता दिसली नाही; मग मी तिथेच खांबाला टेकून पाय ताणून दिले, रात्रभर तिथेच पथारी मारायच्या इराद्याने. आत हलक्या आवाजात चौकशी चालू होती- "याला एवढा वेळ का लागत असतो?" माझी आई सांगत होती- "अं! त्याचं बरं विचारता! तो दिवसभर वाचनालयात पुस्तकांतच वेळ घालवीत असतो. फार वाचन आहे त्याचं." मला आईचं हे बोलणं मोठं नवलाचं वाटलं. तिचं माझ्याबद्दल चांगलं मत असेल अशी शंकाही मला कधी आली नव्हती. काय गौडबंगाल आहे असं तिचं! - वरून तर कधी जाणवायचं नाही अन् मनात माझ्याबद्दल एवढं चांगलं मत! माझ्यासाठी तो एक साक्षात्कारच होता! मला चक्क उड्या माराव्या वाटल्या. ओरडावं वाटलं, "वा, वा! आई, माझ्याबद्दल एवढं कौतुक तुला वाटतं! अन् मला तसं कधीही म्हटलं नाहीस, अं!" पण मी उत्साह आवरला.

त्यांनी विचारलं, "काय करायची त्याची योजना आहे?"

"अं!" आई म्हणाली, "त्याच्या फार मोठ्या योजना आहेत. तो कुणाला त्याबद्दल सांगत नाही. मोठा संवेदनशील अन् खोलवर विचार करणारा आहे तो. मोठा विद्वान व्हायचं त्याचं स्वप्न आहे. तो अशा लोकांसोबतच आपला वेळ घालवतो."

"माझी मुलगीसुद्धा - तुम्हाला माहीत आहेच, फार शिकलेली आहे. तीसुद्धा नेहमी वाचत असते."

"संबूनेसुद्धा बरं का, त्याच्या बाबांनी दिलेली सगळी पुस्तकं वाचून काढली आहेत. मीच कधी त्याच्या हातून पुस्तक हिसकावून घेते अन् त्याला आंघोळीला, जेवायला सांगते! एखाद्या एम.ए.च्या पोरानंसुद्धा एवढं वाचलं नसेल."

"तो आयुष्यात पुढे काय करणार आहे, याची मला काळजी नाही; पण एखादं पद किंवा नोकरी असणं हे चांगल्या माणसाचं लक्षण आहे." त्यांनी म्हटलं अन् एक संस्कृतचं वचनसुद्धा म्हणून त्याचा पुरावा दिला. त्यांनी पुन्हा सांगितलं, "-तरी त्याबद्दल काही आग्रह धरायची गरज नाही, त्याने उत्तम पती व्हावं, माझ्या मालमत्तेतला माझ्या पोरीसाठीचा हिस्सा..." त्यांनी इथे आपला आवाज खाली घेतला आणि आपली चर्चा पुढे चालू ठेवली.

भल्या पहाटेच अंगण झाडायला- सडा टाकायला म्हणून आई आली अन् तिने मला ओट्यावर झोपलेलं पाहिलं. मला तिथं पाहताच तिला धक्का बसला. रात्री केव्हातरी मला झोप लागली असावी. मला वाटतं, ही मंडळी रात्रभर त्यांच्या गतकाळातल्या गमतीजमती, हकिकती-अनुभव सांगत, ऐकत बसली होती. माझ्या आईला एवढ्या

मोकळेपणाने हसलेलं मी कधीच पाहिलं नव्हतं. मला वाटतं, आपल्या जुन्या नातेसंबंधांसाठी तिने आपल्या व्यक्तिमत्त्वाची खास अशी बाजू जपली होती आणि माझ्यासाठी मात्र गंभीर, कडक अशा - डायरेक्टर जनरलसारखी! इथं आता असंच निजून राहणं मूर्खपणाचं आहे, हे माझ्या लक्षात आलं. सुदैवाने ते पाहुणे तिकडे मागच्या बाजूला स्नानासाठी गेलेले होते आणि त्यांनी मला पाहिलं नव्हतं. नाही तर मी दारू पिऊन आलो आणि मला इथं सोडून माझे मित्र निघून गेले असावेत अशी शंका त्यांना आली असती. मला असंही वाटून गेलं, की त्यांनी मला इथं पाहिलं असतं, तर रात्री माझ्याबद्दल आईने जे काही सांगितलेलं होतं, त्यातली हवाच निघून गेली असती. आईने मला घाईघाईतच उठविले, "वाटेतच झोपलास काय! लोक काय समजतील! तुझ्या खोलीत का नाही गेलास? रात्री उशिरा आलास की काय! अन् काय करीत होतास इतक्या उशिरापर्यंत?" तिच्या आवाजात वैताग होता, चीड होती. असा संशयही होता, की, मी दारू पिऊन काही वाह्यात अशी कामं केली की काय- शहरात 'किस्मत' नावाचं नाईट क्लब चालू झालं होतं, तिथं तरुण पोरं जात आहेत, अशी वार्ता पसरलेली होती. कुणीतरी नक्कीच हे तिच्या कानावर घातलं असावं. मला अर्धवट जाग आली होती आणि मला हलवून हळूच ती सांगत होती, "तुझ्या खोलीत जा बरं आधी!"

"का?" मी उठून बसलो.

"तू इथं बसल्याचं कुणी पाहिलेलं मला आवडणार नाही."

"तू कुणाशी तरी बोलत होतीस, म्हणून मी..." मी अर्धवट बोललो.

आईने माझ्या दंडाला धरून उठविले. तिला कदाचित वाटलं असेल, मला तिच्या मदतीची गरज आहे. मी उठलो. धाडकन् खोलीत येऊन दार लावून घेतलं अन् झोपेच्या अधीन झालो. तशाही स्थितीत मला वाटून गेलं, की चुकून 'मी 'किस्मत'मध्ये गेलो होतो...' असं तर नाही बोलून गेलो. मी रोजच्यापेक्षा लवकर उठलो. रात्रीच्या पाहुण्याचा काही मागमूस दिसेना. मला वाटलं, रात्री स्वप्न तर नाही ना पडलं होतं मला. मी कॉफी घ्यायला गेलो, तेव्हा आईने खुलासा केला- "तो सकाळीच निघून गेला. त्याला बस गाठायची होती." मीसुद्धा काही विचारलं नाही; पण मला संभाव्य धोक्याचा सुगावा लागला. तोंड वगैरे धुऊन मी नेहमीप्रमाणे कॉफी घेत बसलो होतो. अशा वेळेस सहसा आम्ही काही बोलत नाहीत. स्वयंपाकघराच्या दाराशी मला पाहिलं, की आई कॉफीचा कप पुढे करते. आमचा संपर्क असा, तेवढाच असायचा. कधी आईला घराच्या टॅक्सबद्दल किंवा सामान आणणाऱ्याबद्दल, तर कधी दूधवाल्याबद्दल तक्रार असायची, तेवढंच ती बोलायची. मी ते ऐकून घ्यायचो. कॉफी संपवायचो आणि कसलाही वाद न घालता कपडे करून मी बाहेर पडायचो- शक्य तो लवकर.

पण आज, कॉफी झाल्यावर आई म्हणाली, "अजून मोलकरीण आली नाही. आता उशिरा यायची त्या पोरीची सवयच झाली आहे." मी माझं मत दिलं नाही. कारण मला ती छोकरी आवडायची अन् तिचं कौतुक वाटायचं. आईकडून तिला चांगली वागणूक मिळायची नाही अन् त्यामुळे मला तिच्याबद्दल सहानुभूती वाटायची. यानंतर आई म्हणाली, "जाऊ नकोस, थांब." आणि ती थोडं समजुतीनं हसली. कधी नाही ते सौजन्याची वागणूक तिच्यात मला आज जाणवली. हा सगळा बदल मला तिच्या

बोलण्यात जाणवत होता, तो तिला शोभतच नव्हता. तिचं हसणं कृत्रिम वाटत होतं. मेणासारखं. मला तिचा थांग लागेना. खरं म्हणजे नाराजी-कुरबूर- कपाळाच्या आठ्या हेच तिच्या चेहऱ्यावर शोभायचं. मी म्हणालो, ''मला काम आहे. लवकर जायचं आहे.''

''कोणतं काम?'' तिने विचारले, अशा नजरेने तिने विचारले, की मला थोडी भीतीच वाटली. मला तशी डझनभर कारणं होती सांगायला. वर्माच्या गुप्तधनाच्या शोधाचं (दर सोमवारी तो प्लँचेटवर असे संदेश मिळवायचा- पहाडातल्या गुप्तधनाच्या मार्गाबद्दलचे संदेश. याच्यासाठी त्याला माझी गरज असायची.) किंवा कॉलेजच्या विद्यार्थ्याला जैन तत्त्वज्ञानाची टिपणं द्यायचीत किंवा म्युनिसिपाल्टीच्या सदस्याला, त्याच्या भाषणासाठी मुद्दे तयार करून द्यायचे आहेत. मला माहीत होतं, असं काही सांगितलं, की ती ऐकलं न ऐकल्यासारखं करणार. म्हणून मी म्हटलं- ''मला फार काम आहेत, तुला काही कळणार नाहीत ती.'' अशा वेळी ती चिडायची, ''हे बघ, मला कळणार नाहीत कशावरून? कधी सांगितलंस मला? तुझे वडील कधीच काही लपवायचे नाहीत माझ्यापासून, माहिताय का?''

पण आज आई एवढंच म्हणाली, ''ठीक आहे, मला सांगू नकोस.'' समजुतीच्या आवाजात ती बोलत होती. आता हे स्पष्टच होतं, की रात्रीच्या त्या पाहुण्याशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने वातावरणनिर्मिती ती आता करते आहे. मला विचित्र वाटलं. तिचं हे नाटक कशासाठी चाललं आहे, मला कळेनासं झालं.

अचानक ती माझ्यामागनं माझ्या खोलीत आली अन् म्हणाली, ''माझं एवढं ऐकून तू जाऊ शकतोस. तुझी कामं काही एवढ्यात खोळंबणार नाहीत.''

चटईवर बसून तिने मला पुढे बसायला सांगितले. मला कसंतरीच वाटू लागलं. असं बसून राहायची तिची ही वेळ नव्हती. या वेळी तर ती झाडझूड, सारवण अशा कामांत व्यग्र असते. मोलकरणीच्या मागे असते; पण आज ते सगळं थांबवायला एवढं महत्त्वाचं असं काय झालं होतं?

लवकरच त्याचं कारण कळालं. ''तुला माहितंय, कोण आलं होतं ते?'' मला लक्षात आलं, की आता मला कोपऱ्यात गाठायचं चाललं आहे. आईच्या एवढ्या जवळ बसल्याने मला अस्वस्थ होऊ लागलं. मला फार विचित्र वाटू लागलं; विशेषत: तिच्या हनुवटीवरचा एक पांढरा केस पाहून. तिला हे माहीत होतं का? तिला त्याची कल्पना नसेल, तर केवढं हास्यास्पद होईल ते? मला, आमच्या 'त्या' ग्रंथसंग्रहात वाचलेली अशीच एक विचित्र म्हण आठवून गेली. माझ्या उत्तराची वाट पाहून (त्याच वेळेस शेक्सपीअर का कॉलरीज-यांच्या ओळीवर मी विचार करीत होतो, नाही तर मी पटकन म्हटलं असतं- ''कोण, तो लांब नाकाचा, शेंडीवाला? मला काय माहीत!'') मग ती सांगू लागली, ''आमच्या गावातला सर्वांत श्रीमंत माणूस! शेकडो एकर साळवण, नारळीच्या बागा, केवळ नारळांच्या बागेतूनच त्याला लाखाचं उत्पन्न होत असेल. आणि गाई-म्हशी... आपल्या दूरच्या नात्यातले आहेत...'' आणि तिने नामावलीचे संदर्भ देत देत विविध नातेसंबंधांचा आधार घेऊन, त्यांच्याशी असलेलं नातं सांगितलं. याबाबतीत तिची माहिती अगदी आश्चर्य वाटावी, एवढी तपशिलाची होती. प्रत्येकजण कोण-कुठे, अगदी उत्तरेत हिमालयात असो की दक्षिणेत केपकॅमेरियन येथे, तो सध्या काय करतो, सगळं तिच्या लक्षात होतं.

त्या शेंडीवाल्याचं महत्त्व अन् मोठेपण सिद्ध करण्यासाठी आई ज्या तऱ्हेने तपशील खोदून काढीत होती, ते पाहून मी थक्क झालो. त्या 'द एनसिएन्ट मॅरिनर' मधल्या 'वेडिंग गेस्ट'चा सगळा प्रसंग माझ्या डोळ्यासमोर उभा राहू लागला. जेव्हा माझ्या डोक्यात त्या प्रसंगातले तपशील घोंघावू लागले, त्या वेळी आई आपल्या बोलण्याचा समारोप करून म्हणू लागली, "मुलगी बी.ए.पर्यंत शिकलेली आहे आणि त्यांना जूनमध्ये तिचं लग्न करायचं आहे. त्यांना आता विलंब करायचा नाही. शेवटचं अपत्य आहे हे अन् तिचं सगळं व्यवस्थित व्हावं, याची त्यांना काळजी लागून आहे आणि त्यांनी प्रस्ताव मांडला, त्यात कसल्याही अटी नाहीत... त्यांच्या फार अपेक्षा नाहीत." मी गप्प राहिलो. मला आईच्या बोलण्यातला मतलब समजला. ती म्हणाली, "लग्नपत्रिका चांगली जुळली आहे, ज्योतिषाने संमती दिल्यावरच ते इथे आले आहेत."

"त्यांना माझी पत्रिका कुठे मिळाली?" मी विचारले.

"फार फार वर्षांपूर्वी त्यांनी ती तुझ्या वडिलांकडून घेतली होती. आपल्या गावात ते दोघं अगदी जवळचे मित्र होते आणि शेजारीही," आई सांगू लागली, "ते एवढे जवळचे मित्र होते, की मुलगी जन्मली, तेव्हाच तुम्हा दोघांबद्दल त्यांनी आपसात हे नातं ठरवून टाकलं होतं. तिच्या जन्माच्या दिवशीच तुमचं लग्न जुळविलं होतं त्यांनी!" एखादी साधी बाब सांगावी तेवढ्या सौम्यपणाने तिने म्हटले.

"तू काय सांगते आहेस -पोरीच्या जन्माच्या काही तासांतच तुम्ही माझं लग्न जमविलं?"

"होय," ती पुन्हा तेवढ्याच स्थिरपणाने म्हणाली.

मला तिचे हे व्यवहार समजले नाहीत. अगतिकतेने मी विचारले,

"का-का पण? हे सगळं थोतांड आहे, कळत नाही का तुला?"

"तसं नाही. ते फार मोठे आहेत. चांगलं कुटुंब आहे अन् आपल्याशी त्यांचं फार जुनं नातं आहे."

"मूर्खपणा आहे सगळा!" मी ओरडलो. "मला अशा तऱ्हेने तू गुंतवते आहेस! मी केवढा असेन त्या वेळी?"

"त्याच्याने काय फरक पडतो?" आई सांगू लागली, "जेव्हा माझं लग्न ठरलं, तेव्हा तर मी नऊ वर्षांची अन् तुझे बाबा तेरा वर्षांचे होते आणि आमचा काय चांगला संसार झाला नाही?"

"तुम्ही काय केलं ते सांगू नकोस. त्या वेळी माझं काय वय होतं?"

"मोठा होतास. पाच-सहा वर्षांचा. त्याच्यामुळे काय झालं?"

"अन् माझं लग्न ठरविलंस! कसं ठरलं?"

"उगी कोर्टात विचारल्यासारखं बोलू नकोस," आता चेहऱ्यावरचा तो मोकळेपणा टाकून आई बोलली.

"मी वकील नसेन; पण लक्षात ठेव, मी काही गुन्हेगार नाही," मी म्हणून गेलो; पण मला आतून वाटू लागलं, की जरा जास्तच बोलून गेलो.

"मग काय, मी गुन्हेगार आहे-आरोपी आहे?" माझाच शब्द धरून तिने विचारले.

काही क्षण मी शांत राहिलो. मग माझी बाजू मांडू लागलो, "आई, माझं ऐक. अशा पद्धतीनं लग्न कसं होऊ शकेल, सांग! स्वत:ची निर्णयशक्ती असणारे, स्वतंत्र विचाराचे

दोघेजण आयुष्यभरासाठी असं एकत्र बांधले जाणं कसं शक्य आहे?''
''कसं काय म्हणजे?'' पुन्हा माझा शब्द धरून आई सांगू लागली,
''आयुष्यभरासाठी म्हणजे? अर्थातच लग्न हे आयुष्यभरासाठीच असतं. कुणीही दर महिन्यात लग्न करीत नाही.''
मी वैतागलो. चिडून बोलू लागलो, ''काय मूर्खपणा! काहीतरीच बोलू नकोस. मी काय म्हणतो आहे, जरा समजून घे.''
आणि आता आई चिडली. ''पुन्हा तू माझा अपमान केलास बघ! ही दुसरी वेळ आहे! त्याच्यासाठीच तुझ्या बाबांच्या माघारी मी राहिले का? त्यांच्यासोबतच मी चितेवर चढले असते, तर सुटले असते! पोटच्याच पोराकडून अशी भाषा ऐकण्यापेक्षा गेलेलं चांगलं!'' ती आपलं डोकं एवढ्या जोराने बडवून घेऊ लागली, की तिचं डोकं फुटेल की काय अशी मला भीती वाटली. तिचा चेहरा बदलला, अश्रू ओघळू लागले. माझ्याकडे ती पाहू लागली. तिच्या तशा बघत राहण्याचं मला भय वाटलं अन् तिथनं पटकन् उठून पळून जावं वाटलं. ती त्याच तऱ्हेने बोलू लागली आणि इथून कशा प्रकारे निघून जाता येईल याचा मी विचार करू लागलो; पण तिने मला अशा तऱ्हेने कोपऱ्यात गाठलं होतं अन् अशा तऱ्हेच्या तिच्या हालचाली होत्या, की गप्प राहावं लागलं. मला वाटलं, की खरंच आपण काही विपरीत शब्द वापरला होता का आता... मी पुन्हा माझं बोलणं आठवून पाहिलं. माझा शब्द होता - मूर्खपणा. त्यात वावगं असं काही नव्हतं. नेहमीच वापरला जातो हा शब्द. हां, 'मूर्ख' हा शब्द 'मूर्खपणा' पेक्षा वाईट. 'मूर्खपणा' हा शब्द मैत्रीत अगदी मोकळेपणाने वापरला जातो. त्याचं काहीही वाटत नसतं. या माझ्या शब्दापूर्वी आई म्हणाली होती, ''कुणीही दर महिन्यात लग्न करीत नाही.'' यावर 'ते करतात' असं मी अजिबात म्हटलं नव्हतं. 'टोचून बोलणारी सभ्यता!' एका लेखकाने अशा बोलण्यासंदर्भात म्हटलेलं होतं. नकळत मला अशा विचारांनी हसू आलं आणि त्यामुळे आई भडकली. साडीच्या पदराने डोळे, तोंड पुसून ती आता बोलू लागली, ''तू हसतोस मला! बरोबरंय, तू हसणारच! हसण्यासारखंच मी केलंय ना सगळं - तुला वाढविलं, पालनपोषण केलं, हे घर तुझ्यासाठी सांभाळलं. तुझ्या वडिलांनी एवढ्या मेहनतीने मिळविलेली, त्या खोलीतली पुस्तकं वाचून तुला गर्व चढलाय! स्वत:ला फार शहाणा समजतो आहेस!''
''पण ती पुस्तकं बाबांची नव्हती... कर्जासाठी ती गहाण ठेवलेली होती.'' मला माझी प्रतिक्रिया लपविता आली नाही.
यावर ती म्हणाली, ''अन् एवढं सगळं वाचून तू साधं बी. ए. होऊ शकला नाहीस! कोणतीही साधारण पोरगी आज ग्रॅज्युएट होते आहे...'' रागाने, आरडाओरड करून बोलल्याने आता तिचा आवाज घोगरा झाला होता.
अचानक उठून हाताला आला तो कुर्ता -पायजमा मी घातला अन् बाहेर पडलो. मला खरं म्हणजे असा राजकारणी लोकांसारखा पोशाख आवडत नव्हता. निळा बुशशर्ट, धोतर किंवा पँट असा पोशाख मला आवडायचा; पण ते आता, आई जिथे उभी होती, तिच्या मागे हँगरला लावून ठेवलेले होते. जसा मी बाहेर पडलो, तसं आईचं बोलणं माझ्या कानावर पडलं. ''... आपण सांगू त्या तारखेला ते येणार आहेत आणि आपल्याला घेऊन जाणार आहेत, मुलगी दाखवायला...''

असंच होतं तर! सामानसुमान आवरून, गावाला जाणाऱ्या बसमध्ये आई मला घेऊन जाणार होती. तिथं ते पाहुणे म्हणून आमचं स्वागत करणार होते आणि आमच्यासमोर त्या मुलीला सोन्याने अन् सिल्कने मढवून फिरविणार होते, माझ्या होकाराची वाट पाहणार होते. 'मूर्ख!' रस्त्याने जाताना माझ्या तोंडून उद्गार आले.
मार्केट रोडने जाताना, स्कूटरवरून येणाऱ्या एमएमसीच्या डॉक्टर कृष्णन यांच्याकडे माझे लक्ष गेले. त्यांचा दवाखाना, त्यांचा मदतनीस रामूने उघडलेला असायचा. हा रामू स्वत:ला अर्धा डॉक्टर असल्याचे दाखवायचा. जीभ तपासून, नाडी तपासून औषधही द्यायचा, अर्थात डॉक्टरच्या माघारी. डॉक्टरांना त्याचं काही वाटायचं नाही. कारण रामू प्रामाणिक होता, त्यांचे हिशेब तो व्यवस्थित ठेवायचा. मला पाहताच डॉक्टर म्हणाले, "ये, ये. इकडे ये." काही खोळंबलेले पेशंट बाटल्या घेऊन त्यांची वाट पाहत होते. औषधाच्या गोळ्यांवर भरवसा नसणाऱ्यांपैकी हे डॉक्टर होते. ते नेहमीच औषधाची मात्रा वगैरे लिहून देत, त्यानुसार रामू मग औषधांचे मिश्रण तयार करून बाटल्या भरायचा. डॉक्टर नेहमी म्हणायचे, "प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्र अशा औषध उपचाराची गरज असते. एवढ्या मोठ्या प्रमाणात तयार होणाऱ्या गोळ्या सगळ्यांसाठीच कशा लागू होतील? कागदावर अगदी तपशिलाने ते औषधोपचाराचा भरगच्च मजकूर लिहायचे. कागदाच्या मागेसुद्धा आणि शिवाय दावाही करायचे, "सगळ्या देशात माझ्यापेक्षा कुणी जादा लिहून दाखवावं, जो कुणीही यापेक्षा जादा लिहिलेली चिठ्ठी आणून दाखवील, त्याचा उपचार मी मोफत करायला तयार आहे." आणि भोवतालच्या गावांतून आलेले त्यांचे पेशंट गुपचूप मान हलवायचे.
जेव्हा डॉक्टरांनी मला आवाज दिला, मी फक्त चालण्याचा वेग कमी केला; पण थांबलो नाही. "गुड मार्निंग डॉक्टर! ठीक आहे!" पण डॉक्टर मध्येच म्हणाले, "माहिताय, माहिताय तुझी तब्येत उत्तम आहे, डॉक्टरसाठी तू काही उपयोगाचा नाहीस; पण तरीही मला तुझ्याशी बोलायचं आहे. ये, आत ये. त्या खुर्चीवर बस. ती खुर्ची माझ्या तंदुरुस्त मित्रांसाठी आहे. रुग्ण त्या तिकडे बसतात." भिंतीला लागून असलेल्या लाकडी बाकाकडे अन् दोन लोखंडी खुर्च्यांकडे डॉक्टरांनी हात केला. ते पडद्याच्या पार्टिशनमागे गेले आणि आपला शुभ्र अॅप्रन चढवून आले. भिंतीवरच्या आपल्या पाटीवरची खूण बदलून, 'डॉक्टर आहेत. कृपया बसा' अशी सूचना त्यांनी ठेवली. टेबलावर औषधांच्या जाहिरातींच्या फोल्डर्सकडे क्षणभर पाहून ती त्यांनी बाजूला सारली. "ही सगळी औषधं उत्पादकांच्या मल्टिनॅशनल कंपन्यांच्या फायद्याची आहेत, झालं! देशातल्या दरिद्री लोकांसाठी नाहीत. या शर्ट-टायवाल्या एजंटांना माहिती सांगायला पाच मिनिटांपेक्षा जादा वेळ मी देत नाही! इतर डॉक्टर्स पाहा, यांच्या हातचं खातात, यांनी दिलेल्या सॅम्पल्सवरच धंदा करून बंगले बांधतात!" रामू बाहेर गेला अन् त्याने बेंचवर बसलेल्या लोकांकडून बाटल्या गोळा केल्या. "तू मला चेकच देऊन टाक ना!" डॉक्टर म्हणाले.
मला वाटलं, डॉक्टर विनोद करीत आहेत; म्हणून मीही म्हटलं, "हो. हो. का नाही,- देतो की! कितीचा देऊ- दहा हजारांचा?"
"एवढा काही नको," डॉक्टर म्हणाले, "त्यापेक्षा कमीच..." त्यांनी ड्रॉवरमधून एक लहान डायरी काढली अन् त्यातली पानं उलटू लागले. याच वेळी, खोकल्याची जोरदार उबळ

आवरीत- खोकलत एक म्हातारा माणूस आत आला. डॉक्टरने त्याच्याकडे पाहिलं अन् बेंचकडे त्याला हात दाखविला. म्हाताऱ्याने ते काही ऐकलं नाही. तिथंच उभा राहून तो सांगू लागला, “सगळी रात्र...” डॉक्टर म्हणाले, “ठीक आहे, ठीक आहे... बस तिथे. तुला रात्री झोप येईल अशी सोय करतो मी...” म्हातारा बेंचवर वाकून बसताना पुन्हा काही सांगू लागला; पण त्यापूर्वीच त्याला खोकल्याची उबळ आली.
डॉक्टर पुढे म्हणाले, “गेल्या आठवड्यापर्यंतचे दोनशे पंचेचाळीस रुपये... या आठवड्यात काही नाही.” मला आता लक्षात आलं, की ही थट्टा नाही. मला ही रक्कम ऐकूण धक्काच बसला. त्यांनी त्यांची डायरी माझ्याकडे सारली आणि म्हणाले, “वीस वेळा व्हिजिट दिली. दहा रुपये एका व्हिजिटचे. साध्या व्हिजिटचे मी काही लावले नाहीत आणि औषध उपचाराची रक्कम...” तिकडनं खोकलणारा माणूस खाकरून घसा मोकळा करायचा प्रयत्न करू लागला आणि काहीतरी सांगायचा प्रयत्न करू लागला. डॉक्टरने त्याला नजरेनंच थांबविलं. रडत्या पोराला घेऊन एक बाई पुढे आली, “डॉक्टर, पाजविलेलं सगळं हा ओकतोच पाहा.” डॉक्टरने रागावून तिच्याकडे पाहिलं व म्हटलं, “मी कामात आहे, दिसत नाही का? मी काही चार तोंडांचा देव आहे का... एकेक होऊ दे. थांब!”
“तो उलट्या...”
“थांब, मला काही सांगू नकोस आता...” या व्यत्ययानंतर डॉक्टर मला सांगू लागले,
“मी सहसा किरकोळ व्हिजिटचे पैसे घेत नाही. सहसा घराकडून येता-जाता तिकडे येऊन जातो. फक्त महत्त्वाच्या-तातडीच्या व्हिजिटचे पैसे लावतो. तुमच्या बाबतीत किरकोळ व्हिजिटचा हिशेब मी लावला नाही.”
मला विस्मय वाटला. मी म्हटले, “तुम्ही मला एवढं तंदुरुस्त प्राणी म्हणता अन् हे काय आहे सगळं?”
“तुला माहीत नाही? तुझ्या आईनं सांगितलं नाही का तुला?”
“नाही, अजिबात नाही! मला कधी वाटलंही नाही... माझ्या लग्नाबद्दल ती काळजीत आहे. मलाही नेहमीच वैताग आणते...” मी पुढे म्हणालो, “डॉक्टर तुमच्याकडे तिच्यासाठी एखादं औषध आहे का, ज्याच्यामुळे माझ्या लग्नाबद्दलचं तिचं फॅड कमी होईल...”
“हो हो, तेच सांगतोय मी. तिच्या मनावर हाच ताण आहे. तिला हे प्रकर्षाने वाटत आहे, की तिच्यामागे घर चालविणारं कुणी यायला पाहिजे आता.” डॉक्टर मोठ्या गूढ तऱ्हेने सांगत होते. आजचा माझा दिवसच विचित्र उगवला होता.
“तिची ही अवस्था तिने तुला सांगितली नाही का?” मी त्यांना उत्तर देणार, इतक्यात, तो खोकलणारा म्हातारा खोकत खोकत पुढे आलाच आणि डॉक्टर त्याच्याकडे पाहत उठले, तर त्याच वेळेस ती बाईसुद्धा मुलाला घेऊन पुढे आली - “एक थेंबही त्याच्या पोटात राहत नाही पाहा...”
डॉक्टर मला म्हणाले, “जाऊ नकोस, बस. या दोघांचा उपचार करतो मी आधी” आणि मग त्यांनी त्या रडणाऱ्या पोराला, म्हाताऱ्याला एकानंतर एक टेबलवर घेऊन तपासले. प्रत्येकासाठी तपशीलवार प्रिस्क्रिप्शन लिहून दिले आणि रामूकडे पाठवून दिले. डॉक्टर माझ्याकडे बोलायला पुन्हा वळणार, इतक्यात त्या पेशंट्सनी विचारणा करायला सुरुवात केली, “ही औषधं केव्हा घ्यावीत, कशी घ्यावीत?” डॉक्टरांनी पुन्हा त्यांना समजाविले

आणि मग मला सांगू लागले, ‘‘तेच तेच प्रश्न विचारीत राहतात. जेवायच्या आधी का नंतर... काय फरक पडतो? पण त्यांना आमच्याकडून उत्तर पाहिजे असतं अन् आम्हाला सांगावं लागतं. कारण या वैद्यकीय व्यवसायानेच ही परंपरा निर्माण करून ठेवली, हाऽ हाऽऽ.’’
याच वेळी, बराच वेळ वाट पाहून खोळंबलेले पेशंट डॉक्टरच्या टेबलजवळ आले. डॉक्टरांनी त्यांना नजरेनेच बसायला सांगितले अन् मला म्हणाले, ‘‘या इकडे - इथं आपल्याला सवड मिळणार नाही.’’ आतल्या खोलीमध्ये आम्ही गेलो. उंच टेबलाची, कॅलेंडर्स वगैरे लावलेली ती छोटी खोली. त्यांनी मला - मी पेशंट असल्यासारखं वर टेबलवर बसायला सांगितलं. ‘‘ही एवढीच एक जागा अशी आहे जिथे मी निवांत बोलू शकतो,’’ ते म्हणाले.
डॉक्टरांनी आईबद्दल मला जे सांगितले, त्यामुळे खरं म्हणजे मी काळजीत पडलो होतो. डॉक्टर सांगू लागले, ‘‘तुझी आई आता निवृत्त व्हायच्या मन:स्थितीत आहे.’’ मला धक्का बसला. माझ्या आईला असं काही वाटेल याची मी कधीच कल्पना केली नव्हती. तिला कधी स्थिर पायांवर उभं राहिलेलं कुणी पाहिलं नव्हतं. घरात सतत वेगवेगळ्या कामांत गुंतलेली, मोठ्या कर्कश आवाजात बोलणारी माझी आई अन् डॉक्टर म्हणतात, ‘‘निवृत्त होणार.’’ आई तिचं हे सगळं विश्व कसं सोडेल? हे सगळं अशक्य असं वाटणारं, न पटणारं होतं. माझ्या घशाला कोरड पडली आणि आणखी काही खुलासा विचारावा म्हटलं, तर छाती धडधड करू लागली. पडलेल्या आवाजात मी विचारले, ‘‘कसली निवृत्ती? ती बनारसला जाण्याच्या विचारात आहे का?’’
‘‘नाही. त्याच्याही पुढे...’’ डॉक्टर म्हणाले आणि सिगारेट पेटवून त्यांनी वर स्वर्गाकडे बोट दाखविले. ते छोटं केबिन धुराने भरलं. मला धुराने ठसका लागला अन् डोळ्यात पाणी आलं. ते पाहून डॉक्टर मोठ्या आस्थेने म्हणाले, ‘‘रडू नको, परिस्थितीचा शांत चित्ताने विचार कर. आता पुढली कृती करताना स्वस्थ चित्ताने निर्णय घे’’ आणि सिगारेटची वलयं सोडीत, बाहेरच्या पेशंट्सची जराही पर्वा न करता डॉक्टरांनी मला तटस्थतेच्या शास्त्राचं प्रवचनच दिलं. डॉक्टरला असं खोळंबून ठेवणं मला प्रशस्त वाटेना; पण मला डॉक्टरच्या अशा अर्धवट विधानांतून माझ्या आईबद्दल जाणून घ्यायचं होतं. त्यांनी अचानक विचारलं, ‘‘ती तुझ्याशी याबद्दल का बोलली नाही?’’ मला त्यांना सांगायचं होतं, की दररोज मी घरातून लवकर बाहेर पडतो अन् उशिरा येतो. आमचं सविस्तर बोलणं होत नाही. डॉक्टरांनी तिरस्काराने ‘चक्’ केलं अन् विचारलं, ‘‘दिवसभर तू कुठं हरवतोस? फार निष्काळजी आहेस!’’
‘‘अं! काही नाही- मला लोकांना भेटावं लागतं, कामं करावी लागतात. शेवटी प्रत्येकाला आपलं आयुष्य असतं ना!’’ मी थोडं चिडूनच बोललो.
‘‘कसले लोक अन् कसलं आयुष्य?’’ डॉक्टरांनी मोठ्या तिरसटपणाने विचारले. मी दिवसभर काय करतो, याबद्दल मला काही सांगता आलं नाही आणि मी सांगितलेलं ते बाजूला सारून देणार हेपण कळू लागलं. म्हणून त्यांच्या प्रश्नांना उत्तर न देता गप्प राहून आईबद्दल ऐकावं असा विचार मी केला आणि इथं तर आईबद्दल एक रहस्य निर्माण करून, ते सिगारेट ओढीत, धूर काढीत फिरू लागले होते. काय अव्यवस्थित माणूस होता हा! ही

धूळ, सिगारेट, धूर अशा गोष्टी तर आजाराला कारणीभूत ठरतात. एवढा निष्काळजी डॉक्टर मी कधी पाहिला नव्हता. रुग्णांची गर्दी झालेली होती आणि रामूने आत डोकावून म्हटले, ''पेशंट खोळंबले आहेत.'' त्यामुळे जरा गती आली. डॉक्टरांनी सिगारेट खाली टाकून थोटूक पायाने रगडले, म्हणाले, ''चार महिन्यांपासून मी तुझ्या घरी व्हिजिट देतो आहे. कधी कधी एकाच दिवशी दोनतीन वेळा. ती लहान पोरगी येते माझ्याकडे अन् म्हणते, 'डॉक्टर, लवकर चला, अम्मा फार आजारी आहे.' असं बोलावणं आलं, की मी कधी दुर्लक्ष करीत नाही. हातातलं काम टाकून मी धावतो. पेशंटला त्वरित आराम पडावा, असं काही करतो. कधी कधी तर पोरगी दोन वेळा आली आहे.''
''आईला काय आजार होता?'' उतावीळ होऊन मी विचारले.
''हंऽऽ तो आजार नेमका कोणता, हे शोधावं लागणार आहे. मी सारखा लक्ष ठेवून आहे. काही जुजबी पाहून, काहीतरी सांगून टाकायचा माझा स्वभाव नाही...'' पण डॉक्टर ज्या तऱ्हेने पेशंट हाताळतात, ते पाहून मला वाटू लागलं, ते स्वत:चीच फसवणूक करीत आहेत. बरीच बडबड करून ते मुद्द्यावर आले... ''तिला चकरा येत आहेत. अचानक चक्कर... पण ती औषधाला प्रतिसाद देते आहे... मला वाटतं, हृदयविकाराशी ते संबंधित असावं. वयोमानानुसार होतं असं... आपण औषधोपचार करूया... पण किती दिवस हे सांगू शकणार नाही...''
''तिला हे माहीत आहे का?'' मी अडखळत विचारले.
''हो. मला ते एका तऱ्हेने स्पष्टच सांगावं लागलं आणि तिला ते व्यवस्थित समजलं. तिला फार चांगली समज आहे सगळ्यांची. तू कदाचित बोलशील तर...'' मी गप्प राहिलो. डॉक्टरांचं असं निरीक्षण माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला जणू धक्का देऊन गेलं. मी माझ्या आईकडे, तिच्या इच्छा-आकांक्षा, तिच्या स्थितीकडे लक्षच दिलं नव्हतं. जणू काही तिला कशाची गरजच नव्हती!
''तिला एकाच गोष्टीची आजकाल काळजी वाटते आहे, ते म्हणजे, तू एकटं राहशील की काय, याची... ती मला म्हणाली, की मुलगा जर लग्नाला तयार होईल तर...''
असं होतं तर! मला लक्षात आलं. आईला दिवसभर हे कामच होतं. घरच्या त्या पोरीला पोस्टात पाठवून पोस्टकार्ड आणायचे, ते लिहून गावाकडे पाठवायचे, लग्नासाठी स्थळं सांगा म्हणून... अन् अशा मार्गाने तिने हे 'स्थळ' निवडलं होतं, शेंडीवाल्या माणसाचं, बाप रे! अशी प्रकृती असताना, तिला याचा किती ताण पडला असेल... रोजची कामं करायची आणि ती सारून ही कामं... माझं रात्री बोर्डलेसमध्ये बसून राहणं, गप्पा मारणं याचा वैताग लपवून ती माझ्यासमोर जेव्हा बोलायची, तेव्हा तिला केवढा ताण पडत असेल! मला माझ्या आत्मकेंद्री वृत्तीबद्दल मोठं अपराधी वाटू लागलं. मी निघण्यापूर्वी डॉक्टरने आवर्जून परत तेच सांगितले- ''बघ, हे माझं निदान आहे. जर तुला वाटलं, तर दुसरं मत घे. मला काही वाटणार नाही... तू उद्या मला चेक देशील का?''
मी तपासणी-खोलीतून बाहेर आलो, तेव्हा बाहेर वाट पाहणारी माणसं निश्चिंत झाल्याचे दिसले. बाहेर पडल्यावर माझी थोडी घालमेल झाली आणि नेहमीप्रमाणं सवयीनुसार बोर्डलेसकडे न जाता, माझी पावलं घराकडे वळली.
मी घरी जाऊन आईसमोर उभं राहिलो. मला पाहून आई चकित झाली. या वेळी मी घरी

कधीच नसायचो ना! तिला मी नेहमीसारखंच कामात व्यग्र असलेलं पाहिलं आणि डॉक्टरने जे सांगितलं ते चुकीचं आहे की काय, असं वाटलं. अर्थात आईच्या हालचालीत थोडा थकवा, डोळे थोडे क्षीण... असे मला वाटले. माझ्या पाहण्यामुळे तीसुद्धा गोंधळली. मला अचानक विचारावं वाटू लागलं, "कसं वाटतंय आता? काही चक्कर-बिक्कर येत आहे असं वाटतं का?"

...पण माझ्याकडून तसं विचारणं झालं नाही. तिने माझ्यापासून ते लपविलं असेल, तर मी तरी ते का म्हणून विचारावं? कदाचित तिला आवडणार नाही. असू द्या. तिला विचारायचं असेल, "तू या वेळी घरी कसा?" पण तिने विचारले नाही. मला बरं वाटलं. मनातले प्रश्न तसेच ठेवून आम्ही एकमेकांकडे पाहिले; पण घरातल्या पोरीनं मोठ्याने विचारले, "तुम्ही या वेळी घरी कसे आला? जेवायचं का? पण अम्माने स्वयंपाक केला नाही."

आई तिच्यावर ओरडली, "एऽ तू गप्प बस!" आणि मला म्हणाली, "मी चूल पेटवीतच होते, आज ही पोरगीच उशिरा आलीय! तुझ्यासाठी काय करू?" आमच्यात एकदम केवढा बदल झाला! सकाळची घटना लक्षात घेता, आता माझा कानांवर-डोळयांवर विश्वासच बसेना! माझ्या खोलीत जाऊन आता मी चिंतेत पडलो, की आता आईला जर अचानक काही झालं, तर काय करावं! ती तशी चांगली वाटत होती; पण तरीही आता खोलीत आल्यावर मला अस्वस्थ वाटू लागलं. मी दार उघडं ठेवून वाचत बसलो; पण वाचनात माझं लक्ष नव्हतं. इतरत्र भरकटत होतं. समजा, तिला असा झटका आला आणि मी तिच्या सुखासाठी त्या भयंकर लग्नासाठी तयार होतो, हे समजायच्या आधीच ती गेली तर? मला ते विचित्र वाटलं; पण मरणोन्मुख आईच्या सुखासाठी मला ते करावं लागणार होतं. माझ्यासाठी स्थळ पाहायचे तिचे एकहाती प्रयत्न फार दयनीय होते. दुसऱ्यासाठी आपल्याला, मनात नसलं तरी करणं भागच असतं. दशरथाचं मन राखण्यासाठी रामानं चौदा वर्षांचा वनवास पत्करला नव्हता का? रामाच्या त्या चौदा वर्षांच्या भटकंतीच्या तुलनेत माझा त्रास तर काहीच नव्हता ना! माझ्यासाठी, तर मला न आवडणाऱ्या मुलीशी विवाह करणं- त्याची सवयही होऊन जाईल नंतर- मृत्युशय्येवर असणाऱ्या आईला सुखाने मरायला सोईचं होत असेल, तर हरकत नव्हती.

मी कुणी महत्त्वाचा पाहुणा असल्याप्रमाणे आईने माझ्यासाठी खास स्वयंपाक केला होता. जेवण उत्तम होतं. तिने केळीचं पान मांडलं होतं, पाट टाकला होता. पुन्हा तिने खुलासाही केला, "आत फार धूर होतो. तुझ्या वडिलांनी सगळं काही चांगलं बांधलं; पण स्वयंपाकघरात धुराडं ठेवलं नाही; ना खिडकी. लाकडं ओली असली, की एवढा धूर होतो, की डोळे जातात की काय वाटतं. एखाद्याचे डोळे अशा धुराने खरंच जातील बघ. मला सवय आहे म्हणून ठीक; पण माझ्यानंतर जी कुणी...!" आईचं असं बोलणं म्हणजे, तिची प्रकृती आणि स्वयंपाकघरात तिच्यानंतर येणारी याबद्दल सूचनाच होती. मला ते कळालं, पण काय बोलावं, ते कळेना. मी गोंधळून गेलो. वैतागून म्हणालो, "आपण त्यासाठी काहीतरी करूया."

आईच्या स्वयंपाकाने मी चकीत झालो होतो. मी खरं म्हणजे अचानकच घरी आलो होतो; पण दोन तासांच्या अवधीतच तिने एवढा सुरेख स्वयंपाक केला होता! तिने नक्कीच त्या पोरीला मदतीला घेतले असेल. खरं म्हणजे मी असा अचानक घरी कसा काय आलो, हे

तिला अनेक वेळा विचारावं वाटलं असेल आणि मलासुद्धा तिच्या प्रकृतीबद्दल विचारावं असं सतत वाटू लागलं; पण आम्ही दोघंही इतर विषयांवरच बोललो. जेवणानंतर मी खोलीत जाऊन आराम करायचा प्रयत्न केला; पण ते शक्य झालं नाही. मग मी सगळ्या घरातून-वाड्यातून पुढे-मागे फिरलो. कितीतरी महिन्यांनंतर मी सगळ्या घरात अशी चक्कर टाकली होती. वेगळं असं न दाखविता मी आईच्या हालचालींकडे लक्ष ठेवून होतो. तिचं जेवण झालं होतं, ती नेहमीच्या सवयीनुसार पान-सुपारी खात बसली होती.

आईने मग ओसरीवर चटई अंथरली आणि पाटावर डोकं ठेवून लवंडली. तिची ही नेहमीची जागा. मी बाजूने गेलो तर ती उठून बसली. तिने विचारले, ‘‘काही पाहिजे का?’’

‘‘नाही, नाही. तू आराम कर. मी पेलाभर पाणी घेतो, बस!’’ मी स्वयंपाकघरात गेलो. माठातलं थंड पाणी तहान नसतानाही पिलं अन् माझ्या खोलीत परत गेलो. घरातली ही वेळ माझ्या सवयीची अशी नव्हती. त्यामुळे मला कसं अपरिचितासारखं वाटू लागलं. आई आता निवांत वाटू लागली अन् मला मोठं सैल वाटू लागलं. मी पुन्हा तिकडे गेलो, तेव्हा आईने कॉफी करून दिली. आता मला कंटाळा येऊ लागला आणि माझ्या नेहमीच्या ठिकाणांकडे-वाचनालय, टाऊन-हॉल, नदीकाठच्या नल्लप्पाच्या बागेत आणि शेवटी बोर्डलेस हॉटेल. सहसा बोर्डलेस हॉटेलपासूनच माझा दिवस सुरू व्हायचा अन् रात्री पुन्हा तिथेच मी यायचो.

आई व्यवस्थित असल्याचे पाहून मला समाधान वाटले आणि विहिरीवर जाऊन मी हात-पाय धुतले, कपडे घातले अन् निघालो. जाण्यापूर्वी आईला सांगावं म्हणून मी मागे गेलो, तेव्हा ती फरशी धुऊन काढीत होती. मी विचारलं, ‘‘ती पोरगी कुठे गेली? अन् तू का करतेस हे सगळं?’’

आईने उत्तर दिलं, ‘‘तिला सुटी पाहिजे होती अन् फरशी बघ किती चोपडी झालीय! अन् हात-पाय धड आहेत तोपर्यंत करणं चांगलंच, नाही का!’’

मी आता मोठ्या धीराने; पण साधेपणाने आईला म्हटलं, ‘‘... तुला योग्य वाटलं, तर त्यांना तू सांग अन् गावाला जायची तयारी कर. तू त्यांना तसं कळव अन् केव्हाही या म्हणावं...’’ आणि पुढे काही बोलणं व्हायच्या आत मी चटकन बाहेर पडलो.

सगळी संध्याकाळ माझं मन विविध विचारांनी भरलेलं होतं. माझी वैयक्तिक सुखदु:खं कुणाला सांगत बसायची माझी सवय नव्हती आणि म्हणूनच जेव्हा बोर्डलेसमध्ये वर्माच्या शेजारी बसलो आणि त्यांनी विचारले, ‘‘आज फार उशीर झाला तुला. काही विशेष?’’ तेव्हा मी काही जुजबी कारणं दिली आणि विषय बदलला. मग सहाचा ग्रुप आला. त्यात एक पत्रकार होता, ज्याचा असा कोणता पेपरच नव्हता, म्हणून मी त्याला ‘दुनियेचा वार्ताहर’ म्हणायचो, त्या ग्रुपमध्ये आणखी एकजण बँकेतला लेखापाल होता, एक शाळा मास्तर होता अन् एक-दोघं असे होते, ज्यांच्या व्यवसायाबद्दल किंवा इतर अशी माहिती मला नव्हती. आम्ही सगळेजण इथे जमायचो. आमच्या चर्चा नेहमीप्रमाणे दिल्लीच्या राजकारणावर असायच्या. इंदिरा गांधींचं काय चुकलं, काय नाही- यावर अगदी तावातावाने बोलणं व्हायचं. मी सहसा या चर्चेत भाग घ्यायचो, ते माझी असहमती स्पष्ट करण्यासाठीच. कधी प्लेटो तर कधी टॉयनबी यांचे संदर्भ मी त्यांच्यासमोर फेकायचो; पण मी त्यांचं नुसतं ऐकत होतो. पत्रकाराने मग मला विचारलेच, ‘‘आज तुझी बडबड कुठे

गेली?'' मी सांगितलं, ''माझा घसा खरखरतो आहे, सर्दी होतेय...''
एका तासाने मी तिथून निसटलो. इलॅमन स्ट्रीट ओलांडून मी शरयूच्या वाळूत फिरलो. वाहत्या पाण्याचा आवाज ऐकत बसलो. त्या सगळया वातावरणात माझ्या वैयक्तिक चिंता बाजूला राहून गेल्या, एवढा मी भारावून गेलो. माणसं बसलेली होती, पोरं खेळत होती. मी स्वत:शीच म्हणू लागलो, ''माझी स्वत:ची काळजी काहीही असो, जगात केवढ्या चांगल्या गोष्टी चालू आहेत! माझ्या मनावरचं ओझं फेकून देऊन असं राहणं किती चांगलं होईल! इथं कितीतरी माणसं आनंदी होती. गप्पा मारीत, हसतखिदळत होती. त्यांना आईची किंवा लग्नाची कसलीच काळजी नव्हती... देवा! मला काही तरी मार्ग दाखव.''
नदीच्या कठड्यावर बसून मी बराच वेळ विचारात गढून गेलो होतो. असं वाटू लागलं, सकाळी त्या एमएमसीच्या डॉक्टरची गाठच पडली नसती तर आईची प्रकृती आणि माझं लग्न तसंच सोडून, मी माझ्या कामाला लागलो असतो, तो शेंडीवाला गेला खड्ड्यात! मला लग्नाचं काही देणं-घेणं नव्हतं, मला आईचा मृत्यू नको होता. लोकांच्या सांगण्या-बोलण्यातून माझा गोंधळ होऊ लागला. निर्णय होत नव्हता. मी कात्रीत सापडलो होतो. कुणीही मला सांगितलं नव्हतं, की मी लग्न करावं, नाही केलं तर मी आईला मुकणार. आईच्या प्रकृतीला खरं म्हणजे मीच जबाबदार नव्हतो. तिची प्रकृती बिघडायला पूर्वीपासूनच सुरुवात झाली असावी. मी आता लग्नाचा निर्णय एवढ्यासाठी घेतला होता, की तिला आता स्वस्थपणे मृत्यू यावा. मी स्वत: होऊन घेतलेला हा निर्णय- आता कोणत्याही प्रकारचा संभ्रम नव्हता. एवढा स्थिर विचार झाला अन् थोडं मोकळं वाटू लागलं. आता मी सगळया परिसरात स्वत:ला छानपैकी गुंतवून घेतलं. नदीचा खळखळाट, पक्ष्यांचा किलबिलाट...
वाळूत बोलत बसलेली ती माणसं कपडे झटकीत उठली. त्यांचं काहीतरी महत्त्वाच्या विषयावर बोलणं चालू होतं. माझ्याजवळून ते गेले आणि त्यांच्यापैकी एकजण सांगत होता, त्याकडे माझे लक्ष वेधले गेले. ''कुणाच्या एकाच्याच सल्ल्याने निर्णय घेऊन नाकासमोर चालणाऱ्यांपैकी मी नाही. प्रत्येकाने कोणत्याही समस्येवर निर्णय घेण्यापूर्वी आणखी दुसरं मत घ्यायला पाहिजे.'' ती दोन माणसं पेन्शनर होती आणि कदाचित कौटुंबिक किंवा कार्यालयीन मुद्द्यावर बोलत असावीत. त्यांच्या बोलण्यातले 'दुसरं मत' हे शब्द जणू माझ्यासाठी साक्षात्कार होता! आणि माझ्यासाठी मार्ग देणारे! माझे डॉक्टर नेहमी सांगायचे ना 'दुसरं मत' घ्यायला! आता माझ्या आईच्या प्रकृतीसाठी त्या एमएमसीच्या डॉक्टरवर अवलंबून राहायची गरज नव्हती. आता माझ्या आईसाठी मी डॉ. नटवर यांचे मत घेईन. त्यांच्याकडून तपासून घेईन. ते कार्डियॉलॉजिस्ट आणि न्यूरोसर्जन होते. नवीन एक्स्टेन्शनमध्ये त्यांचं हॉस्पिटल होतं. तातडीच्या उपचारासाठी प्रत्येकजण त्यांच्याकडे जायचा. वेगवेगळया देशांतून डॉक्टरसाहेबांनी डिग्र्या मिळविल्या होत्या आणि देशातल्या अनेक ठिकाणांहून त्यांच्याकडे रुग्ण यायचे. आता त्यांच्याकडे जाऊन मी त्यांना स्पष्ट विचारणार होतो, की माझी आई काही वर्षे हयात राहणार आहे का नाही आणि त्यांच्या निर्णयावर माझ्या लग्नाचं ठरणार होतं.
जड पावलांनी मी जेव्हा घरी निघालो, तेव्हा प्रार्थना करू लागलो, की सकाळच्या माझ्या तशा सांगण्यामुळे आईने कोणतीही कार्यवाही-ते पत्र वगैरे- सुरू केली नसावी. अर्थात मला

खात्री होती, की पोस्टाचं काम एवढ्या तातडीने तिच्याने झालं नसावं.
सकाळी मी लवकर उठलो आणि एमएमसीच्या डॉक्टरांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. त्यांची दाढी-आंघोळ झालेली नव्हती. विस्कटलेले त्यांचे केस अन् त्यांच्या अवतारावरून ते शहरातले मोठे डॉक्टर वाटायच्याऐवजी चक्क मार्केटमधले हमाल वाटत होते. असा हमाल, ज्याच्या खांद्यावर आपल्या जीवन-मरणाचं ओझं लोक टाकतात... त्यांच्या घरात कॉफी घेताना माझ्या मनात असे विचार आले. डॉक्टर माझ्याशी मोठ्या आस्थेने बोलू लागले. कारण त्यांचा असा समज झाला होता, की आईचा आजार पुन्हा बळावला आहे आणि मी त्यासाठी आलो आहे- ''अरे, काळजी नको करूस, मी येतो आणि पाहतो. नक्कीच पुन्हा चक्कर आली असेल, ठीक होईल'' आणि डॉक्टर जेव्हा पुढे सांगू लागले, ''मला माझी कामं आटोपायला चाळीस मिनिटांपेक्षा जादा वेळ लागणार नाही. आधी तुझ्याच घरी येईन मी. खरं म्हणजे त्यापेक्षा एक गंभीर केस आहे टेम्पल स्ट्रीटमध्ये; पण असो-'' तेव्हा मी भानावर आलो आणि इतरांचं ऐकून घ्यायची सवय नसलेले ते डॉक्टरसाहेब टेम्पल स्ट्रीटमधल्या त्या पेशंटच्या आजाराबद्दल तपशिलाने सांगू लागले. सांगताना जेव्हा ते क्षणभर थांबले, तेवढ्याच वेळात मी त्यांना विचारून घेतले, ''मी माझ्या आईच्या केसमध्ये सेकंड ओपिनियन घेऊ शकतो का?''
''का नाही? वा! योग्य गोष्ट आहे ही. मीसुद्धा तुझ्यासारखाच माणूस आहे की! मी काही ब्रह्मदेव नाही; थोडं थांब...'' त्यांनी मला वाचायला पेपर दिला आणि ते घरात अंतर्धान पावले! चाळीस मिनिटांनंतर ते आता नेहमीच्या वेशात बाहेर आले. त्यांनी माझ्याकडे, डॉ. नटवर यांना लिहिलेले पत्र दिले, म्हणाले, ''चांगला पोरगा आहे तो. स्वभावाने थोडा अबोल आहे; पण चांगला आहे. हे पत्र घेऊन जा, त्याची वेळ घे, आईला दाखव अन् मला सांग.''
नवीन एक्स्टेन्शनमधल्या डॉ. नटवर यांच्या कन्सल्टिंग रूममध्ये त्या दिवशी सगळी सकाळ मी घालविली. एक नोकर माझं पत्र आत घेऊन गेला होता आणि बाहेर जुन्या मासिकांचा ढीग वाचत मी बसलो. मग थकून मागे टेकून बसून राहिलो. दरवाजा अर्धवट उघडायचा, सोबतीला घेऊन कुणी पेशंट आत जायचा, बाहेर यायचा. जवळपास दोन तासांनी तो नोकर माझ्याकडे आला. मी दिलेल्या पत्रावर लिहिले होते, ''मंगळवार- 11 वाजता.'' मंगळवार आणखी पाच दिवसांवर होता. समजा, तो शेंडीवाला माणूस त्यापूर्वीच आला तर? नोकराला मी विचारले, ''डॉक्टरांना भेटून, मी जरा जवळची तारीख घेऊ का?'' त्याने मान हलविली अन् तो निघून गेला. हा दृष्टीस न पडणारा डॉक्टर म्हणजे देवासारखाच होता. दिसायचा नाही अन् त्याच्या इच्छेशिवाय तो ऐकणारही नाही आपलं.
आईच्या सध्याच्या मन:स्थितीत तिला डॉक्टरकडे घेऊन जाण्यासाठी तयार करणं मला अवघड गेलं नाही. तरीही मी डॉ. किशनच्या तपासणीचा विषय तिच्याकडे काढला नाही. मला एवढंच सांगावं लागलं, की या वयात चांगलं असतानाच तपासून घेणं किती सोयीचं आहे, ते फार चांगले डॉक्टर आहेत. अर्थात डॉक्टरची फीस शंभर रुपये लागली, हे काही तिला मी सांगितले नाही. गफूरची टॅक्सी पंधरा रुपयांत उपलब्धही होती- डॉ. नटवर यांच्या दवाखान्यात घेऊन जायला.

डॉ. नटवर यांच्या दवाखान्यात, वेगवेगळी इलेक्ट्रिक आणि अद्ययावत वैद्यकीय उपकरणं वेगवेगळ्या रूम्समध्ये बसविलेली होती. व्हीलचेअरवरून आईला प्रत्येक विभागातून तपासलं जाऊ लागलं, तेव्हा मी तिच्याकडे पाहिलं. आई मोठी प्रसन्न होती, कारण ती आज सगळ्या नर्सेसच्या- उपकरणांच्या देखरेखीत होती. सगळयांचं लक्ष तिच्याकडेच होतं नं! या हॉलमधून, त्या हॉलमध्ये जाताना ती माझ्याकडे पाहायची अन् मला असं वाटून गेलं, की मी तिच्याबद्दल एवढी काळजी घेतो आहे, हे पाहून तिला कृतज्ञता वाटते आहे.
तो देवाचा दूत- ज्याने त्या दिवशी माझं पत्र घेतलं होतं, तो आला अन् आपल्या मागे यायचा इशारा केला. मी त्याच्यामागे गेलो. आता तिथे काहीच नव्हतं. ट्रॉली, खुर्ची, तिथले अटेन्डंट, इतकेच काय माझी आईसुद्धा. सगळी एखाद्या जादूच्या दृश्याप्रमाणे नाहीशी झाली होती. या मोठ्या हॉस्पिटलमध्ये सगळीजणं कठपुतळयांसारखी हालचाल करीत होती. तिथे मी त्या नोकराच्या मागे जात राहिलो. डॉक्टरांच्या एका शब्दावर माझं- भविष्यातलं स्वातंत्र्य अवलंबून होतं. मला डॉ. नटवर यांच्यासमोर सादर करण्यात आलं. डॉक्टर चांगले तरुण होते. किरकोळ प्रकृती आणि गंभीर चेहरा, ओठ मिटलेले- असं वाटायचं, की महत्त्वाच्या सूचनांसाठीच ते उघडतात. कर्मचाऱ्यांसोबत त्यांचा संवाद संक्षेपाने असायचा. मान हलवायचे किंवा बोटांच्या हालचाली, बस.
‘‘मि. संबू, तुमच्या आईला काहीही झालं नाही.’’ त्यांनी एका फोल्डरमध्ये काही कागदपत्रं, फोटोग्राफ्स् माझ्यापुढे केले. ‘‘संदर्भासाठी ही कागदपत्रं ठेवून घ्या. काळजीची अजिबात गरज नाही. चेकअप्चीसुद्धा गरज नव्हती. रक्त, लघवी, ब्लडप्रेशर, हृदय, फुप्फुसं सगळं सगळं एकदम नॉर्मल आहे. साध्या चकरा या कधी थकव्यामुळे, दीर्घ उपवासामुळे येऊ शकतात. उपचाराची गरज नाही. थोड्या-थोड्या अंतराने भरपूर खावं त्यांनी. बस, काही नाही!’’ मी त्यांचे आभार मानले व तिथून निघालो. बेल वाजवायच्या तयारीत डॉक्टर होते; पण परत वळून मी त्यांना विचारले, ‘‘ती किती वर्षे जगणार आहे?’’
एक कोरडं असं हसू डॉक्टरांच्या चेहऱ्यावर दिसलं, त्यांनी बेल वाजविली आणि म्हणाले, ‘‘या प्रश्नाचं उत्तर कोण देऊ शकेल...’’ दुसऱ्या पेशंटने आत प्रवेश केला, तसं ते साधेपणाने म्हणाले, ‘‘तुमच्या-माझ्यापेक्षाही जास्त दिवस ती जगणार... मला त्यात काही आश्चर्य वाटणार नाही.’’
माझ्या अन् त्या डॉक्टरपेक्षाही जादा आयुष्य माझ्या आईचं असेल तर... मला घरी परतताना वाटू लागलं- तर आईला मी सरळच का सांगू नये मग - तो शेंडीवाला नातेवाईक अन् त्याची पोरगी, यांचा विचार डोक्यातून काढून टाक, म्हणून! घरी जाताना आई एवढ्या आनंदात होती, की मला तिच्या आनंदावर विरजण घालावसं वाटेना. आणि तिने तर आताच लग्नाच्या तयारीच्या गप्पा करायला सुरुवात केली होती. मी मात्र रस्त्याच्या वर्दळीकडे नजर लावून बसलो होतो. माझं लग्न झालेलं पाहायची तिची इच्छा- केवढा हट्ट हा! आई सांगत होती, ‘‘भावाला अन् त्याच्या बायकोला मला बोलवावंच लागणार आहे आता, मदतीसाठी. पत्रिका छापायच्यात, कपडे खरेदी, चांदीची भांडी, काय काय... मला तेवढं माहीत नाही; पण भावाला व्यवहार माहीत आहेत.’’ ती रस्त्याने हेच सांगत राहिली. माझं लक्ष नव्हतं. ‘बॉम्ब’ टाकायला अजून वेळ आहे...
मी विचार करू लागलो... गाडीचा वेग आणि तोंडावर येणारं वारं यामुळे तिची उत्तेजना

वाढू लागली. प्रकृतीबाबत आता निश्चिंती झाल्यावर विवाह समारंभात गुंतून जायच्या तिच्या योजना सुरू झाल्या. मला हे समजेना, की माझं स्वातंत्र्य हिरावून आईला असं कोणतं समाधान मिळणार आहे? संसारात मी पांगळं होऊन, बायकोच्या इशाऱ्यावरून बाजारातून भाज्या आणायच्या, खरेदी करायची, बाळाचे कपडे बदलायचे... या विचारांनी माझ्या अंगावर काटा आला.

आम्ही टॅक्सीतून उतरलं, की घरातली ती पोरगी हातात पोस्टकार्ड घेऊन धावत आली, ‘‘पोस्टमननं दिलं हे पत्र!’’

‘‘हंऽऽ पत्र आलंय बघ!’’ आईला आनंद झाला. तिथेच पायऱ्यांवर उभं राहून मोठ्या अधीरतेने तिने पत्र वाचले आणि म्हणाली, ‘‘तो एकच्या बसने येत आहे आजच- इतक्या लवकर येईल, असं वाटलं नव्हतं...’’

‘‘कोण- तो शेंडीवाला?’’

माझ्या तिरकस बोलण्यावर तिने चमकून पाहिले, ‘‘नाही, नाही, असा त्यांचा अपमान करायचा नाही! काय होतं- एखाद्याला शेंडी असली तर? त्या दिवसांत प्रत्येकाला शेंडी असायची.’’ आपला राग लपवीत आई सांगू लागली. मी टॅक्सीचे पैसे देत असताना ती पायऱ्या चढून गेली. टॅक्सी निघाली, तसं परत येऊन तिने आवाज दिला, ‘‘अरे, गाडी का परत धाडलीस? मला वाटलं, गाडी घेऊन त्यांना आणायला जाशील. ते चांगलं झालं असतं. असू दे, आता जा बस स्टँडवर. त्यांना वाट पाहायला लावू नकोस. बस यायच्या आधीच तू जा. ती फार मोठी माणसं आहेत. किती श्रीमंत अन् प्रसिद्ध आहेत, कल्पना नाही तुला. तू त्यांच्याकडे गेलास तर तुझ्यासाठी मोठ्या गाड्या आणतील... त्यांच्या शेतात सगळी पिकं ते घेतात. तांदुळापासून ते मोहरीपर्यंत! सगळं धान्य, सगळ्या भाज्या! रॉकेलशिवाय त्यांना बाजारातून काही खरेदी करायची गरजच पडत नाही. तू जायच्या आधी मला अंगणातून केळीची मोठी पानं तोडून देऊन जा.’’ तिने सांगितल्यानुसार मी केळीची पानं तोडून दिली. दुकानातून फराळासाठी लागणाऱ्या वस्तू आणून दिल्या. आई फार घाईत होती, उत्साहात होती. घरातल्या पोरीला कामं सांगत होती. मला आता याचं वाईट वाटू लागलं होत, की आता जे मी सांगणार त्यामुळे आईचा सगळा उत्साह मावळणार आहे. स्वयंपाकघराच्या दाराशी उभं राहून मी आईच्या हालचाली पाहू लागलो. माझं बोलणं सौम्य कसं राहील, त्याचा विचार करू लागलो. चुलीसमोरून ती वळली अन् म्हणाली, ‘‘आता जा, उशीर करू नकोस. बस आधी आली अन् त्यांना वाट पाहावी लागली, तर ते विचित्र वाटेल.’’

‘‘त्या दिवशी रात्री जसे आले, तसे येऊ शकत नाहीत का? त्या वेळी त्यांना कुणी आणायला गेलं नव्हतं.’’

‘‘आताची गोष्ट वेगळी आहे-आता वेगळं नातं झालं आहे.’’

‘‘नाही... मला तुझं हे पटत नाही. ते गावाकडले तुझे नातेवाईक आहेत, एवढंच आणि माझं विचारशील, तर माझे कुणीही नाहीत!’’

आईच्या हातातलं भांडं खाली पडलं, ती पुढे आली अन् विचारू लागली, ‘‘तुला काय झालंय?’’

‘‘तो शेंडीवाला माणूस खुशाल येथे येऊ दे. फराळ करू दे आणि जाऊ दे. मी बसस्टँडवर

त्याच्यासाठी जाणार नाही अन् इथे थांबणारही नाही.''
''त्यांच्या मुलीला पाहायला बोलावण्यासाठी ते येथे येत आहेत.''
''त्याच्याशी माझा काही संबंध नाही. मी माझ्या कामाला जातो आहे. तुला पाहिजे तेव्हा त्याला बोलाव, जेवू घाल अन् पाठवून दे. मी चाललो...''
मी खोलीत जाऊन कपडे बदलले आणि आता आईला काय वाटले असेल, असा विचार ठेवूनच मी दुसऱ्या दाराने बाहेर पडलो- बोर्डलेससाठी.
मला तिच्याबद्दल वाईट वाटू लागले, स्वत:चा रागही येऊ लागला. घराच्या ओट्यावरून उतरून मी जसा रस्त्याला लागलो, तसं आई एकदम समोरचं दार उघडून धावत आली अन् माझ्यासमोर येऊन उभी राहिली. डोळयांत अश्रू आणून ती मला विनवू लागली.
''तू त्या पोरीशी लग्न करू नकोस किंवा तिच्याकडे पाहूही नकोस. मी एवढीच भीक मागते तुला, की तू जाऊन त्यांना घेऊन ये. काही झालं तरी ते माझ्या बोलावण्यावरून येथे येत आहेत. ते आपल्या नात्यातले आहेत. नाही तर त्यांचा अपमान होईल अन् गावात ते सगळयांना सांगत राहतील- शंभर वर्षे सांगत राहतील!- आणि आम्हाला बोलावलं अन् आमचं स्वागतही केलं नाही, त्या विधवेनं, असं काही ते म्हणू लागले, तर मी मरूनच जाणार! आपल्या कुटुंबाचा मान राख बाबा, तुला हात जोडते!''
''पण ते त्या वेळी स्वत:च घरी आले होते नं?''
''आज आपण त्यांना बोलावलेलं आहे. निमंत्रण दिले आहे.'' साध्या आवाजात सांगायला आता आईला कष्ट पडत होते. शेजाऱ्यांच्या कानावर काही जाऊ नये, ही तिची धडपड होती. तिची निराशा मला जाणवली. ती पदराने डोळे पुसत होती.
मला सगळया प्रसंगाचे गांभीर्य ध्यानात आले. मला पश्चात्ताप होऊ लागला. शेवटी या निमंत्रणाला मीच जबाबदार होतो ना! आता मी काय करावं असा प्रश्न पडला. आई विनवू लागली, ''त्यांना भेट. त्यांना घरी आण. त्यांच्या सोबत जेव, त्यांच्याशी बोल अन् मग तुला वाटेल तिथे जा. मुलीच्या सोयरिकीचं तो काही उपस्थित करणार नाही, याची काळजी मी घेते. लग्नाची काळजी तू करू नकोस, तुला काय करायचे ते कर. संन्याशी राहा का काही कर. हो, मी दखल देणार नाही. ही शेवटची वेळ. यापुढे जिवात जीव असेपर्यंत हा विषय काढणार नाही, आता शपथ घेते. घरात नातवंडं यायची स्वप्नं पाहिली होती मी... पण...''
वाक्य संपायच्या आधीच आई रडू लागली. तिचं बोलणं, तिचं स्वप्न ऐकून मी आतून गलबलून गेलो. मी तिला घरात वळवून म्हणालो- ''जा, आत जा. कुणी पाहील. मी जातो बसस्टँडवर आणि त्यांना घरी आणतो. मी त्यांना त्या दिवशी व्यवस्थित पाहिलं नव्हतं; पण हरकत नाही. त्यांच्या शेंडीवरून मी त्यांना ओळखेन- नक्कीच.''

♦♦♦

# मांजर-घरात

विनायक मुदाली गल्लीतल्या त्या वाड्याच्या मोकळया जागेतून मागे जाता यायचं, तिथे चिंचेच्या झाडाखाली एक विहीर आणि एक शौचालय होतं - वाड्यात राहणाऱ्या भिन्न प्रकृतीच्या भाडेकरूंसाठी तेवढी ती सुविधा असायची. या जागेच्या मालकाने उपलब्ध जागेला अनेक पार्टिशन्स टाकून विभागलं होतं. असहाय अशा भाडेकरूंना स्वतंत्र निवाऱ्याचा असा एक देखावाच करून जास्तीत जास्त घरभाडं प्रत्येकाकडून तो वसूल करायचा. तो स्वत: गल्लीच्या तोंडाला असलेली जागा बाळगून होता. इथे त्याचे एक दुकान होते. जिथे विविध प्रकारच्या वस्तूंसोबतच - पलीकडच्या गल्लीतल्या म्युनिसिपल शाळेच्या पोरांचा घोळका यायचा, त्यांच्यासाठी बिस्किट-गोळया, पेन्सिली, रिबिनी असायच्या. रात्री जेव्हा तो दुकान बंद करायचा, तेव्हा दारातच झोपायचा; ज्यामुळे कुणा आगंतुकाला - त्याला ठेचकाळल्याशिवाय आत जाता येऊ नये. त्याने मोठ्या धूर्तपणाने रॉकेलच्या रिकाम्या डब्यांची उतरंड आत अंधारात मांडून ठेवलेली होती; त्यामुळे कुठे लहानसा धक्काही लागला, तर त्या डब्यांचा खडखडाट म्हणजे, त्याला धोक्याची घंटाच असायची.

एकदा, एका मध्यरात्री दुकानातल्या धान्यांच्या पोत्यांतून उंदराचा पाठलाग करताना, एका मांजराला मध्येच पितळेचा चंबू दिसला. कुतूहलाने, मांजराने त्यात डोके घातले. चंबूचं तोंड त्या मांजराचा श्वास कोंडावा एवढं छोटंही नव्हतं आणि त्यातून डोकं सहज बाहेर काढता यावं एवढं मोठंही नव्हतं. एकाच वेळी, डोक्यावर मुकुट यावा अन् त्याच वेळेस डोळयांवर झापड यावी असं झाल्यानं, मांजर गोंधळून गेलं. हैराण झालं. इकडे-तिकडे उड्या मारायला-धावायला त्याने सुरवात केली आणि असं करताना भिंतीवर, सामानावर त्याचं चंबूचं डोकं आपटून आवाज होऊ लागला. आपल्या नेहमीच्या जागेवर झोपलेला दुकान-मालक या आवाजाने खडबडून उठला. आतल्या अंधारात त्याने फटीतून नजर टाकली अन् पटकन डोकं मागे घेतलं आणि तो ओरडला,

‘‘चोर! चोर! धावा!’’

त्याने चटकन् हातात काठीसुद्धा घेतली आणि जमिनीवर आपटायला सुरवात केली. काठी आपटली, की आत चंबूत डोकं घातलेलं ते मांजर उड्या मारायचं आणि त्याचं अडकलेलं डोकं ठिकठिकाणी आपटायचं. प्रत्येक स्थिर वस्तूचे आवाज होऊ लागले, गोंधळ होऊ लागला. दुकानदाराच्या ओरडण्याने त्याचे भाडेकरू जागे झाले अन् त्याच्याभोवती गोळा झाले. त्यांनीसुद्धा फटीतून दुकानात नजर टाकली. आत भांड्यांचे आवाज झाले अन् तेसुद्धा घाबरले. आत अंधारात पुन्हा पुन्हा नजर टाकून त्यांनी त्यात असणाऱ्या विचित्र प्रकरणाचा अंदाज लावायचा प्रयत्न केला आणि निष्कर्ष काढला, ‘‘बाप रे! काहीतरी भुताटकीचा प्रकार असावा, नक्की काय ते सांगता येत नाही, बरं!’’ कुणीतरी धीर करून सुचविलं, त्या मांत्रिकाला उठवा! या सगळया वेगवेगळया प्रकारच्या भाडेकरूंमध्ये एक मांत्रिकही राहायचा. आता तो गाढ झोपलेला होता, कारण त्याची खोली वाड्याच्या शेवटच्या टोकाला होती.

तो तांत्रिक घरबसल्या दिवसाकाठी पंधरा रुपये कमवायचा. त्याच्या दारासमोर नेहमीच

गरजू लोकांची गर्दी दाटलेली असायची. असं म्हणायचे, की त्याचे हे रुग्ण-ग्राहक दूर दूरवरून - पाँडेचरी, सिलोन, सिंगापूरहून - यायचे. कधी कधी तर एवढे लोक यायचे, की त्यांच्यामुळे इतर भाडेकरूंना त्यांचा ताप होऊ नये म्हणून त्याला मागच्या बाजूला- आपल्या अशा रुग्णांना घेऊन बसायला सांगण्यात यायचं. तिथे, अंगात आलेल्या डझनभर बायका, वेडसर माणसं- त्यांच्या घरच्यांकडून धरून आणलेल्या अवस्थेत बसून असायची. व्यवसायासाठीचा आवश्यक असा पेहराव-वेशभूषा केल्याशिवाय मांत्रिक आपल्या खोलीतून बाहेर पडायचा नाही. त्याच्या उंच जटा, भरघोस वाढलेली, व्यवस्थित विंचरलेली, छातीवर रुळणारी दाढी, कपाळावर भस्म, भगवा टिळा, चंदनाचा लेप आणि हिमालयातून आणलेल्या विविध टपोऱ्या मण्यांच्या, गळयातल्या माळा... त्याच्या हातात जुनी- जीर्ण चोपडी असायची. असं म्हणायचे, की या चोपडीत प्रत्येकाच्या आयुष्याचे सार, गूढ अशा काव्यमय भाषेत लिहिलेलं आहे. विशिष्ट असा मंत्रविधी करून तो रुग्णासमोर मैदानात बसायचा. हातातल्या चोपडीतून त्या रुग्णाशी संबंधित तपशील विशिष्ट हेल काढून वाचायचा. हजार वर्षांपूर्वी रचलेल्या त्या प्राचीन अशा तामीळ काव्यपंक्तीचा अर्थ, मांत्रिकाशिवाय कुणालाही सांगता यायचा नाही. तो रुग्णाला सांगायचा, "मागच्या जन्मात तू जे कृत्य केलंस, त्याची फळं आता भोगतो आहेस. त्याच्याशिवाय दुसरं काय असणार? हे भोग आहेत. पुढल्या पौर्णिमेच्या सत्तावीस दिवसांनंतर दहाव्या तासाला यातून तुझी सुटका होईल. हे सगळे भोग... तू यापूर्वी केव्हा..." तो समोरच्या माणसाकडूनच बहुतेक माहिती काढून घ्यायचा. "तुझ्या जीवनात अशी कोणती वृद्ध स्त्री आलीय् का - जी तुझ्यासोबत नीट वागली नाही, अशी? खरं सांग!"
"हो, खरं आहे..." विचार करून एखादा सांगायचा. ते मग आपसात बोलून विचार करायचे आणि मग तो रुग्ण कबूल करायचा, "हो हो, ती बाई- कामूच असेल... हो.."
मांत्रिक मग त्याने काय करावं हे सगळं सविस्तर सांगायचा "- तिनेच करणी केलेली आहे. तुझ्या गावातल्या मोठ्या झाडाखाली एक खड्डा कर आणि तिथे एखादं हाड सापडेल. ते घेऊन ये आणि ते मी नदीमध्ये फेकून देईन; तेव्हा कुठे तुला आराम पडेल. मग मार्गोसा झाडाची डहाळी हवेत मारून मांत्रिक ओरडायचा, "निघून जा, निघून जा! भूत पिशाच्चा, निघून जा!"
आता, अशा रात्री हा दुकान-मालक मांत्रिकाच्या खोलीसमोर येऊन आवाज देऊ लागला -
"बाहेर ये! मला मदत कर बाबा! फार विचित्र काही तरी व्हायलंय, बाहेर ये!"
मांत्रिकाने घाईघाईने आपल्या माळा गळयात घातल्या, आपली पेटी घेतली आणि बाहेर आला. मुख्य जागेवर येऊन त्याने विचारले,
"हं सांगा, काय होत आहे, काय झालं?"
"एका चंबूत प्राण आलेत वाटतं आणि तो चंबू खाली-वर होतो आहे, आजूबाजूला आपटून त्याचे आवाज होत आहेत, पहा!"
"हं... चंबूतलं भूत! नक्कीच. ते भूत रिकाम्या चंबूत येऊन बसतं, मग चंबूत असा जीव येतो! म्हणून तर आपली वडिलधारी माणसं सांगायची, की भांडं कधीही उपडं ठेवायचं नसतं- पालथं घालायचं असतं, माहीत आहे? ही अशी भूत-पिशाच्चं अशी भयानक आवाज काढून आपल्याला भीती दाखवितात आणि आपण घाबरून गेलो, की आपल्या कवटीवर मारतात

... पण आता पाहतो मी ते सगळं...''
घाबरलेला दुकानमालक सारखा म्हणू लागला, ''मी आजवर एवढं सरळ जगलो. कुणाच्या अध्यात ना मध्यात, कुणाचंही वाईट केलं नाही मी कधी अन् माझ्याच नशिबाला हे का यावं...''
''अं! काही मोठी गोष्ट नाही. घाबरू नकोस. हे सगळे भोग असतात. मागच्या जन्माचे... मागच्या जन्मात तुझ्याकडून काही घडलं असेल...''
''काय घडलं असेल?...'' थरथर कापत दुकान मालकाने विचारले.
मांत्रिक आता हे शास्त्र सविस्तर सांगायच्या मन:स्थितीत नव्हता. बाकीच्या भाडेकरूंप्रमाणे मांत्रिकालासुद्धा या घरमालकाबद्दल राग होता; पण आता तपशिलाने त्याच्यावर आरोप ठेवायला तसा वेळ नव्हता. आता तो मोठ्या मवाळ आवाजात सांगू लागला, ''हे केवळ खोड्या करणारं भूत आहे, आणखी काही नाही; पण कमकुवत हृदयाची माणसं भीतीने घाबरतात, इतकेच काय, रक्ताच्या उलट्यापण करू लागतात...'' हा सगळा संवाद चालू असताना दुकानातून भांड्यांचे आवाज येतच होते. गर्दीतला कुणी तरी ओरडला, ''हे सगळं, तुम्ही लाईट कनेक्शन घेतलं नाही, त्याच्यामुळे झालंय! शहरात सगळीकडे लाईट घेतलेत. आपल्याच एका वाड्यात नसल्याने आपल्याला असा त्रास होतो!''
''तुम्ही कंदील का नाही आणत?''
''अं! तीन दिवस झाले, रॉकेलचा पत्ता नाही. आम्ही रात्री चांदण्याच्या उजेडात जेवत आहोत.''
''थांबा, थांबा,'' घरमालक सांगू लागला, ''मी लाईटसाठी अर्ज केला आहे, आपल्याकडे येईलच लवकर.''
''आपल्याकडे लाईट असती तर आपण खटका लावून त्याला पाहिलं असतं, कमीत कमी काय प्रकार आहे, ते लक्षात आलं असतं.''
''होईल, होईल- सगळं होईल. आता ही तक्रार करायची वेळ नाही.'' त्याने मांत्रिकाला दुकानाच्या दारापाशी नेले. कुणीतरी हातातली बॅटरी चालविली; पण सेल गेलेले असल्याने, त्यातला बल्ब क्षीण तऱ्हेने चालू झाला, त्यातून काही निष्पन्न झाले नाही. दरम्यान बाहेरच्या जमावाची चाहूल लागलेलं ते मांजर काही क्षण थांबलं; पण त्यानंतर दुप्पट वेगाने गोंधळ घालायला त्याने सुरवात केली. प्रत्येक भिंतीवर, खिडकीच्या गजाळ्यांवर त्याच्या धडका होऊ लागल्या. आवाजासरशी दुकानमालकाची भयाने गाळण उडू लागली आणि भोवतालची माणसं विस्मयाने मागे सरू लागली. मांत्रिकसुद्धा तसा घाबरून गेला होताच. दुकानातल्या अंधारात तो नजर लावायचा आणि भांड्याचा आवाज आला, की पटकन मोठ्या कुशलतेने डोकं मागे घ्यायचा. कुजबुजत; पण दटावून दुकानमालकाला तो म्हणाला, ''अरे, कमीत कमी मेणबत्ती तरी लाव! सगळं गाव उजेडात चमकत आहे आणि तू- स्वत: अन् भाडेकरूंना अंधारात दडपून टाकतोस की! काय माणूस म्हणावा हा!'' त्यातच कुणीतरी म्हटलं,
''अन् एवढ्या वीस कुटुंबांसाठी फक्त एक विहीर अन् एकच संडास आहे!''
कुणीतरी मस्करी केली, ''अं! रात्री बायकोजवळ झोपतो तेव्हा आमची थोडी कुजबुजसुद्धा

सगळ्यांना ऐकू येते!'' यावर कुणीतरी टोमणा मारला, ''पण तुझं लग्न कुठं झालंय!''
''अं! त्याच्यात काय? दुसरी कुटुंबं आहेत नं इथं!''
''त्यांची वकिली तू का करतोस? ते आपापली काळजी घेतातच.''
''ठाणऽ, ठाण!''
कुणीतरी दुकानमालकाकडे निर्देश करून म्हटलं, ''याचंच हे पाप आहे, ज्याच्यामुळे आपल्या सगळ्यांना ते भोगावं लागतंय!''
''तुम्हांला एवढी गैरसोय वाटत असेल, तर जा की सोडून!''
दुकानमालकाने असं म्हटलं अन् सगळ्यांचा नाइलाज झाला; कारण इतर शहरांप्रमाणे या शहरातही राहण्यासाठी घरांची प्रचंड अडचण होती.
आता मांत्रिकाने परिस्थिती ताब्यात घेतली. त्याने सगळ्यांना गप्प राहण्याची खूण केली.
''ही तक्रारीची वेळ नाही. तुम्ही सगळेजण झोपा जा आता. आतलं हे भूत आता बाहेर काढायचं आहे. ते जेव्हा बाहेर पडेल, तेव्हा इथं कुणी नसायला पाहिजे. नाहीतर ते तुमच्या शरीरात प्रवेश करणार पहा!''
''हरकत नाही. आमच्या घरमालकापेक्षा तर वाईट असणार नाही आणि हे भूत माझ्या अंगात संचारलं तर चांगलंच होईल. मग तर मी वाड्याच्या सगळ्या भिंतींना दणके देऊन सगळा राडा, जो कुणी मालक असेल, त्याच्या डोक्यावर ओतून देईन!'' कुणीतरी टोमणा मारला. ते ऐकून मांत्रिक सगळ्यांना सांगू लागला, ''नाही, नाही कुणीही आगाऊ बोलायचं नाही. मीसुद्धा तुमच्यासारखाच भाडेकरू आहे, मीपण परेशान आहे सगळ्यांसारखा; पण मी काही आता असं काही बोलणार नाही. वेळ आल्यावर पाहू. आता मला एक मेणबत्ती द्या...'' तो दुकानमालकाकडे वळला- ''तुम्ही मेणबत्त्या विकता का नाही? काय दुकानदारी आहे तुमची - आं! दुकानात मेणबत्त्या नाहीत? आता दुकानदारावर ठपका ठेवायची संधी कुणीही सोडली नाही; पण दुकानमालक म्हणाला, ''तुम्ही आत गेला, की उजव्या बाजूलाच शेल्फमध्ये मेणबत्त्यांचा बॉक्स आहे. तुम्ही नुसता हात लांबविला, की हाताला लागतील पाहा.''
''म्हणजे मी आत जाऊन पाहू म्हणता? ठीक आहे; पण भुतापर्यंत जायची मी फीस घेईन- नाहीतर मी सहसा दूर राहूनच काम करीत असतो.'' दुकानमालक 'स्पेशल फी' द्यायला तयार झाला आणि मांत्रिकाने आपला घसा खाकरला, जटा सावरल्या आणि दुकानासमोर उभं राहून तो मोठ्याने दरडावू लागला, ''अरे भुता! मी तुला काही भीत नाही! तुझे सगळे धंदे चांगलेच ओळखून आहे मी! तुला माहीत असेलच, मी कोण आहे ते! चल...''
मांत्रिकाने अर्धवट दार उघडून सावधपणाने आत पाय टाकला. काही पावलं तो आत गेला; त्या वेळी खिडकीच्या काचांवर तो चंबू आदळला आणि काचेचा चुरा झाला. त्याच्यामुळे मांजराचा त्रास आणि भय आणखी वाढलं, त्याने गोंधळून कोलांटी उडी घेतली आणि त्यामुळे त्या अंधाऱ्या खोलीत अनेक धातूंच्या आवाजांचा ठणाणा होऊ लागला. मांत्रिकाचे पाय अडखळले. आता पुढे काय करावं किंवा आपल्याला काय करायचं आहे हे त्याला क्षणभर कळालेच नाही. अशा स्थितीत रॉकेलच्या रिकाम्या डब्यांच्या उतरंडीला त्याचा धक्का लागला आणि गडगडाट करीत डबे खाली पडले. त्याच्यामुळे मांजराचा उच्छाद आणखी वाढला. मांत्रिक धडपडत बाहेर आला- ''बाप रे! हे काही साधसुधं प्रकरण नाही!

एखाद्या तुफानासारखं त्यानं मला झपाटलं होतं की... आता ते सगळ्या भिंती पाडून टाकणार असं दिसतंय!''
''अय्यो!'' दुकानमालक विव्हळू लागला.
''मला खास संरक्षण पाहिजे... मी त्याशिवाय आत जाऊ शकणार नाही... मेणबत्ती नाही, लाईट नाही... आपल्याला अंधारातच त्याचा बंदोबस्त करावा लागणार. मी घाई केली नसती, तर मी तुम्हाला दिसलोच असतो की नाही कोण जाणे!''
''अय्यो! आता माझ्या दुकानाचं अन् मालमत्तेचं काय होणार होऽऽ''
''आपण पाहू! आपण पाहू! आपण काहीतरी करूया'' मांत्रिक मोठ्या धैर्याने सांगू लागला. गल्लीतल्या खांबावरच्या लाईटचा अर्धवट प्रकाश मांत्रिकावर पडलेला होता. या प्रकाशात तो फार भ्यालेला व विचित्र दिसू लागला होता.
मांत्रिकाचा भेसूर चेहरा, गरगरणारे डोळे, डोळ्याशेजारचे भस्माचे पट्टे अशा अवतारामुळे दुकानमालकाला त्याच्याकडे बघायला भीती वाटू लागली. त्याला वाटू लागलं, दोन भुतांमध्ये आपण सापडलेलो आहोत, त्यांपैकी अधिक भयंकर भूत कोणतं- आतलं का बाहेरचं- त्याला ठरविता येईना. बंद दारासमोर ठाण मांडून बसलेला मांत्रिक जोर देऊन बोलू लागला- ''इथं बसायला मला कशाची भीती?'' आणि त्याने आज्ञा केली- ''मला एक तांब्याचं भांडं, तांब्याचा लोटा आणि तांब्याचा चमचा आणून दे. महत्त्वाचं आहे ते!''
''तांब्याचं - का बरं?''
''प्रश्न विचारू नकोस... बरं, मी सांगतो- तांबं हे एक चांगलं वाहक आहे. डोक्यावरून गेलेल्या लाईटच्या तांब्याच्या तारा पाहिल्यास का?''
''पण आता त्या काय वाहून आणणार आहेत?''
''फालतू प्रश्न विचारू नकोस! बरं, मी सांगतो - त्या आतल्या भयंकर प्रकरणाकडे माझे मंत्रं पोचविण्यासाठी मला अशा माध्यमाची गरज आहे.''
पुढचे प्रश्न थांबवून दुकानमालकाने कुठून तरी आणून एक अॅल्युमिनियमचे भांडे पुढे केले.
''तांब्याचं तर नाही... पण अॅल्युमिनियमचं आहे...''
''अं! आपल्या देशात अगदी गरिबातला गरीब माणूस असला तरी, त्याच्याकडे तांब्याचं भांडं असतंच... अन् इथे तू स्वत:ला सावकार म्हणवून घेतोस आणि तुझ्याकडे काहीच नाही- ना मेणबत्ती, ना लाईट, ना तांबं... छे!''
''माझ्या गावाकडे आहेत तांब्याची, चांदीची भांडी...''
''पण आता त्याचा काय उपयोग? तुझ्या गावातल्या घरात भुताटकी झालीय का... त्या घरातसुद्धा हे भूत जाऊ शकेल - सांगता येत नाही म्हणा... असू दे. मी आता पाहतो...''
मांत्रिकाने अॅल्युमिनियमचं भांडं उचललं आणि जमिनीवर आदळलं. ताबडतोब आतून तो चंबू कशा-कशावर आपटल्याचे आवाज आले. ''ते भांडं फोडशील!'' दुकानमालक त्याही स्थितीत ओरडला. त्याच्याकडे दुर्लक्ष करून मांत्रिक ते भांडं सारखं जमिनीवर वाजवू लागला.
''हंऽऽ बरोबरंय ! आता ते भूत बोलणार बघा. आता आमच्याकडे आमची सांकेतिक भाषा आलीय.'' आता आपल्या बोटांच्या पेरांनी तो मांत्रिक - टेलिफोनच्या कड किट्ट् कड किट्ट् अशा सांकेतिक तऱ्हेने आवाज काढू लागला. दुकान मालकाला त्याने म्हटले, ''मोठ्याने

बोलू नका अन् श्वासही घेऊ नका मोठ्याने- मला त्याचा 'निरोप' येतो आहे : कुणाचा तरी आत्मा आहे, त्याला आपलं ठिकाण बदलायचं आहे- त्यानेच सांगितलंय् मला तुला सांगण्यासाठी... आयुष्यात कुणाशी वाईट वागला आहेस का तू...?''

''छे, छे!'' दुकानमालक वैतागाने सांगू लागला, ''नाहीच. मी नेहमीच धार्मिक वृत्तीने राहत आलो आहे-''

त्याला मध्येच थांबवून मांत्रिक म्हणाला, ''मला काही ते सांगू नकोस. ते आतल्या भुताला सांग अन तुझ्याबद्दल बोल... तू कधी कुणाचे पैसे किंवा थांब, थांब - मला निरोप येतो आहे...''

त्याने ते अॅल्युमिनियमचे भांडे कानाला लावले. पुन्हा विचारू लागला- ''तू कधी कुणाचे पैसे किंवा कुणाची बायको कधी वापरलीस का?''

दुकान-मालक घाबरला. ''छे, छे! नाही. नाही कधीच नाही!''

''मग मी हे काय ऐकतो आहे, तू एका विधवेची मालमत्ता सांभाळतोस म्हणून...''

दुकानमालक विचारात पडला तेव्हा ते मांजर खिडकीतून बाहेर पडण्यासाठी धडपड करीत होतं. आता मालक चिडला. तो म्हणाला, ''कोणती मालमत्ता? असं काही मी केलं तर मला आत्ताच मरण येऊ दे! देवाने मला जगायला पुष्कळ दिलं आहे.''

''मी तुला सांगितलं ना, अनावश्यक बोलू नकोस म्हणून? तू कोणत्या स्त्रीला त्रास दिलास का - किंवा दया येऊन तिला ठेवून घेतलंस का? लहानपणी काही वाईट घडलं का तुझ्या हातून... कधी त्याचं प्रायश्चित्त घ्यावं लागलं का...''

''कसं?''

''ते नंतर सांगतो. आधी कबूल कर.''

''का?''

''तू प्रामाणिक राहून कबुलीजवाब दिलास तर, त्याच्यामुळे भुताची शक्ती कमी होऊन जाईल बघ.''

दुकानात चंबूचे पुन्हा आवाज येऊ लागले. दुकानमालकाचा चेहरा उतरला. तो म्हणाला, ''कृपा करून थांबव बाबा हे सगळं! आता मला काही सहन नाही होत...'' मांत्रिकाने त्याच्या पेटीतून कापूर काढून पेटविला आणि सगळ्या दिशांनी तो ओवाळला. ''त्या दयाशील अशा पवित्र आत्म्याला मी ओवाळतो; आमच्या मदतीला धाव रे...''

त्या दयाशील अशा पवित्र आत्म्याबद्दल आता दुकान-मालकाला तेवढीच भीती वाटू लागली. चांदण्या रात्रीच्या त्या क्षीण प्रकाशात त्याला आता असं वाटू लागलं, की आता इथे चांगल्या किंवा वाईट- कोणत्याच आत्म्यानं राहू नये. आभाळात ओरडत उडणाऱ्या-गडप होणाऱ्या पाकोळ्यांचा चीत्कार, ते वातावरण पाहून- ऐकून दुकानदाराला वाटू लागलं, या मानवी-स्थिर अशा जगातून आपण वेगळे पडलो आहोत... त्या न पाहिलेल्या, न दिसलेल्या भूत-पिशाच्च यांच्या जगात वाहत चाललो आहोत...

आता मांत्रिक सांगू लागला, ''तुझी सदसद्विवेक बुद्धी आता कशी मानससरोवरासारखी स्वच्छ असायला पाहिजे. तर, आता मी जे म्हणतो, त्याच्या मागोमाग तू म्हणायला सुरू कर. यात काही खोटंनाटं करशील तर कवटी फुटून जाईल- तुझी. डोक्यातला मेंदू बाहेर काढायला ते भूत मागे-पुढे पाहत नसतं-''

“सांग, सांग. मी काय करू?”
“मी म्हणतो तसं म्हण- हं, मी चांगलं अन् प्रामाणिक आयुष्य जगलो आहे...” दुकान-मालकाला या वाक्याचा उच्चार करायला काहीच अडचण आली नाही. अर्थात भोवती असलेल्या भाडेकरूंना स्पष्ट ऐकू येणार नाही अशा हलक्या आवाजात तो पुटपुटला. मांत्रिक म्हणाला, “मी कुणालाही कधीच फसविलं नाही...”
“फसविलं नाही.” दुकानमालकाने मागोमाग म्हटले.
“कुणाचीही मालमत्ता बळकाविली नाही...”
दुकानमालक म्हणणारच होता; पण क्षणभर थांबला-
“कोणती मालमत्ता म्हणता?”
“मला माहीत नाही” मांत्रिक म्हणाला आणि त्याने कानाला भांडे लावले... “हं, मला काहीतरी गडबड दिसते आहे...”
“नाही, नाही, ती काही माझी चूक नाही.” दुकान-मालक कळवळून सांगू लागला, “त्यात माझी काहीच चूक नव्हती. ती मालमत्ता फक्त माझ्याकडे सोपविलेली होती, बस...”
“ती कुणाच्या मालकीची होती?”
“होनप्पा. माझा मित्र आणि शेजारी. मी त्याच्या कुटुंबीयांच्या फार जवळचा होतो. आमची शेतीवाडीही शेजारीच होती. त्याने एक मृत्युपत्र लिहून ठेवलं आणि त्यानंतर तो गावात कधी दिसलाच नाही.”
‘तुझ्या नावे मृत्युपत्र?”
“मी तसं सांगितलं नव्हतं; पण माझ्यावर त्याचं फार प्रेम होतं...”
“त्याचा मृतदेह सापडला?”
“मला कसं माहीत असणार?”
“आणि त्या विधवेचं काय झालं?”
“ती हयात असेपर्यंत मी तिचा सांभाळ केला.”
“एकाच घरात?”
“इथं नाही... माझ्या गावी...”
“तुझी-तिची सलगी होती?”
दुकान-मालक गप्प बसला, “हं, तिला सांभाळणं गरजेचं होतं...”
“तिचा मृत्यू कसा झाला?”
“मी आता एक शब्द बोलणार नाही- मला शक्य आहे तेवढं मी सांगितलं; एवढ्यावरून तू त्या भुताला घालवणार नसशील, तर बघ, तुलासुद्धा दुसऱ्याचं पाप लागेल...”
दुकान-मालक अचानक मांत्रिकावर धावला. त्याचा गळा धरून त्याला त्याने दरडावले, “माझ्याकडून एवढं वदवून घेतलंस आता त्या भुताला बाहेर काढ-नाही तर -” मांत्रिकाला मागे ओढून त्याने त्याला अंधाऱ्या दुकानात ढकलले. अचानक केलेल्या अशा धक्काबुक्कीने घाबरून तो ओरडू लागला. त्याच्या ओरडण्यात भांड्यांचा आवाजसुद्धा बुडून गेला. दुकान-मालक दारात उभा आणि मांत्रिक आतल्या अंधारात धडपडत असतानाच त्याच्या पायात चंबू अडखळला. तो मोठ्या भयाने किंचाळला, मेलो, मेलो! आणि बाहेरचा सुगावा लागलेल्या मांजराने डोक्याच्या चंबूसहित उसळी घेतली, गल्लीतल्या त्या रस्त्यावर उडी

मारून वाकडंतिकडं पळूनसुद्धा गेलं!
स्तिमित होऊन अन् टक लावून दोघांनी त्याच्याकडे पाहिले.
‘‘अरे! मांजर होतं तर!’’ दुकानमालक म्हणाला.
‘‘हो, ते मांजरासारखं दिसू शकतं; पण त्या मांजरामध्ये काय होतं हे तुला कसं कळणार?’’ मांत्रिक म्हणाला.
दुकानमालक विचारात पडला. त्याचा थरकाप झाला, ‘‘ते पुन्हा येईल का काय?’’
‘‘सांगता येत नाही,’’ मांत्रिक म्हणाला, ‘‘पुन्हा आलं, तर मला बोलाव’’
आणि खोलीकडे जाताना मांत्रिक म्हणाला, ‘‘आणि माझ्या दक्षिणेची काळजी करू नकोस आता. मी सकाळी घेईन.’’

♦♦♦

# धार

जेव्हा त्याला त्याच्या वयाबद्दल विचारलं जायचं, आग्रह धरला जायचा, तेव्हा रंगा सहसा उत्तर द्यायचा - ''पन्नास, साठ किंवा ऐंशी.'' तुम्ही जर वेगळया तऱ्हेने त्याला विचारलं, ''की किती वर्षांपासून तू हे काम करतो आहेस,'' तर तो विचारणार- ''कोणतं काम?''
''हेच- हे एवढं चाक गळयात घेऊन चाकूला धार देत फिरायचं?''
''केवळ चाकूच नाही- कात्री, मोठ्या कैच्या, प्रत्येक प्रकारचे वस्तरे, स्वयंपाकाच्या विळया, ब्रेड कापायची सुरी, एवढंच नाही जेव्हा मी धार देण्याचा मोठा दगड वापरायचो, तेव्हा तर खाटकाची ती सुरी, महाराजांच्या तलवारींनासुद्धा धार द्यायचो.'' (त्याची अत्यंत आवडती कल्पना होती- सैन्यातल्या लोकांनी तलवारी वापरायच्या ठरविलं तर आपण करोडपती होऊ की!)
तुम्ही त्याचं चऱ्हाट थांबवून पुन्हा तोच प्रश्न जर विचारला,
''हे चाकू अन् इतर हत्यारांना धार द्यायचं काम तू केव्हापासून करतो आहेस?'' तर ओठावर बोट ठेवून तो सांगेल-
''इथं मिशीची रेघ उमटायला लागली, तेव्हापासून'' पण त्याच्या गाला-ओठांवर करड्या भुऱ्या केसांची दाटी पाहून, तुम्हाला काहीच पत्ता लागणार नाही. खरं म्हणजे त्याने कधी कॅलेंडर पाहिलं नाही, घड्याळ नाही का पंचांग नाही- आरसासुद्धा नाही. अशा मुक्त अवस्थेतला त्याचा पेहराव असायचा तो धोतर, खाकी सदरा आणि पटका असा. आणि अर्थातच, मालगुडीच्या गल्लीबोळांतून, ''चाकूसुऱ्यांना धार लावून घ्याऽऽ'' अशी उंच ललकारी देत घराघरांसमोरून फिरणारा, ही त्याची खरी ओळख.
धार द्यायच्या त्या चाकाच्या घडवंचीत तो हात सारायचा आणि ती खांद्यावर घ्यायचा. तसं हे साधंसुधं असणारं; पण चमत्कारिक वाटणारं यंत्र जुन्या सायकलच्या चाकाने फिरविलं जायचं; त्याला पायडल लावलेलं असायचं. मार्केटरोडच्या वेड्यावाकड्या रहदारीतून तो फिरायचा आणि शिंप्याच्या किंवा न्हाव्याच्या दुकानासमोर उभा राहायचा- ओरडून सांगायचा. पण ही मंडळी लहरी अन् भरवसा ठेवावा अशी नसायची. ती त्याच्याशी नुसतंच गोड बोलायची आणि नंतर यायला सांगायची. जर हजामतीचं गिऱ्हाईक नसलं किंवा शिलाईच्या कामातून सवड असली, रिकामपण असले, (विशेषत: शिंपी लोक, ज्यांना कधीच सवड नसायची. सांगितलेली वेळ निघून गेलेलं काम ते करीत बसलेले नेहमी दिसायचे.) की दुकानाला कुलूप ठोकून ते पसार झालेले असायचे. रंगा त्यांच्यावर लक्ष ठेवून त्यांना गाठायचा. हरतऱ्हेने प्रयत्न करायचा. आपली विविध अवजारं धारदार ठेवणं किती आवश्यक आहे, हे लोकांना पटविणं, खरंच मोठं थकवा आणणारं प्रकरण असायचं. लोकांचा कंटाळा आणि आळस याला आधी ओलांडून जावं लागायचं. त्याला पाहिलं, की लोक म्हणायचे, ''पुढे जा. आम्हाला धार लावून घ्यायची नाही;'' पण रंगा नेट लावून तिथेच रेंगाळू लागला, की मग कुटुंबातल्या कुणातरी माणसाला एखादा गंजलेला का होईना, चाकू काढून द्यावा लागायचा आणि मग एकामागून एक अडगळीतून जुन्या, विसरलेल्या वस्तू बाहेर यायच्या, त्यांना धार लावून घ्यायची घाईही व्हायची. पण त्यासाठी रंगाला फार फार प्रयत्न करावे लागायचे, लाडीगोडी करावी लागायची; इतकंच

काय, थोडं आक्रमकही व्हावं लागायचं. तो म्हणायचा, "तुम्ही आताच जर धार लावून नाही घेतली, तर पुन्हा तुम्हाला संधी मिळणार नाही बरं! कारण मी जाणार आहे आता तीर्थयात्रेला!"

कुणी यावर म्हणायचं, "जा! काही फरक नाही पडणार. आम्ही दुसऱ्याला बोलावून घेऊ."

हा दुसरा जो असायचा त्याची फार वाईट परिस्थिती होती. त्याचं यंत्र म्हणजे, हाताने फिरवून धार द्यायचं. एकदा काम करून पैसे घेतले, की पुन्हा तो त्याच्याकडे फिरकायचा नाही. तो असा एक माणूस होता, की त्याची ना कुणाला ओळख, ना कुणाला त्याचे नाव ठाऊक. त्याच्या चाकावर कधी ठिणग्याही उडायच्या नाहीत. त्याच्या उलट रंगाच्या चाकावर सुरेख दारूकाम दिसावं तशा ठिणग्यांचा खेळ दिसायचा, रस्त्याने जाणारी पोरं पाहत राहायची. "ठीक आहे, त्याच्या नशिबाने त्याला खाऊ द्या. माझी हरकत नाही; पण मी सांगतो, तो तुमच्या चाकूला अंड्यासारखी धार करून ठेवेल अन् मग मला काही करता येणार नाही पाहा. लोखंडाची वस्तू कुणीही आणि कशीही हाताळेल असं समजूच नका तुम्ही. अशा माणसांना चाकूची धार आणि हातोडीचं डोकं यातला फरक कळत नाही."

रंगाच्या ग्राहकांना रंगाची अशी उपहासाची भाषा अन् त्याचं काम आवडायचं. आपल्या कामाबद्दल नेहमीच तो साठ दिवसांची गॅरंटी द्यायचा. "जर त्यापूर्वी त्याची धार बोथट झाली, तर मला खुशाल तुम्ही रांडलेक म्हणा... माफ करा! आगाऊ बोलून गेलो बघा...!"

जर त्याच्या कामाबद्दल तक्रार उपस्थित झाली, तर तो परत यायचा. अवजाराच्या धातूची प्रत, ऊन-पाऊस आणि वापर; या सगळयांवर ते कसं अवलंबून असतं हे सांगायचा; पण अधिक प्रतिवाद न करता दुसऱ्या भेटीत त्या चाकूला मोफत धार लावून द्यायचा. गिऱ्हाइकाला, आपण जिंकलो, असं समाधान वाटायचं अन् रंगा स्वत:शीच म्हणायचा, "अं! नाही तरी काय, त्याला थोडाच खर्च येणार आहे! एक-दोन पायडल्स मारले अन् चार लोकांना दिपवून टाकणाऱ्या ठिणग्या काढल्या, की झालंच!" पण अशा वेळी तो न चुकता आपल्या कामाचा मोबदला वेगळया स्वरूपात वसूल करायचा. थोडा ताक-भात किंवा इतर काही खायला, विशेषत: मुलंबाळं असलेल्या घरातून तो मिळवायचा- पोटभरून नाही; पण तात्पुरती भूक मिटवून कामाला लागण्यासाठी एवढं पुरेसं असायचं. नाही तरी भूक ही अशी एक तात्पुरती स्थिती असते; तिच्याकडे दुर्लक्ष केलं, की ती आपोआपच कमी होते. रंगाला जेवणाची तजवीज करून ठेवायची गरज वाटायची नाही. त्याला दिवसभराच्या जेवणासाठी जास्तीत जास्त एखादा रुपया खर्च करावा लागायचा. एका रुपयात त्याला अॅल्युमिनियमचा एक वाडगा भरून भात मिळायचा. त्या भातात कधी बटाटे, कधी चिकन, मटन, लिंबाचं लोणचं टाकलेलं असायचं. कधी नशीब चांगलं असलं, तर रसगुल्लाही मिळायचा. त्याच्या ओळखीचा एक माणूस हॉटेलमधलं उरलेलं- खरकटं विकायचा. रात्री दहाच्या सुमारास हे उरलेलं सगळं एका बकेटमध्ये घेऊन तो नालीशेजारी उभा राहायचा आणि एका रुपयाला चांगलं दोन पळया भरून वाढायचा. रात्री गल्लीच्या पलीकडे पर्ल थिअटरचा सिनेमा सुटला, की त्याच्याभोवती गर्दी व्हायची; म्हणून त्यासाठी लक्ष ठेवून लवकरच यावं लागायचं; तथापि रंगा तिथे सर्वांत आधी पोहोचलेला असायचा. पोटभर खाऊन नळावर तोंड धुऊन तो मग 'कृष्णा हॉल' वर मुक्कामाला यायचा. ही जागा तीन पिढ्यांपासून कोर्टाच्या दाव्यात अडकलेली इमारत

होती आणि या कोर्टाच्या निकालाची शक्यता दिसत नव्हती.
रंगा जेव्हा या शहरात आला व निवाऱ्याची जागा शोधू लागला, तेव्हा त्याला त्याच दिवशी अगदी योगायोगाने ही आरामदायी अन् निवांत जागा मिळाली होती. या जागेची रखवाली करणारा म्हणून बऱ्याच काळापासून एक म्हातारा राहायचा, त्याच्या दयेने रंगाला एका छोट्या कोपऱ्यात जागा मिळाली होती. आपल्या मर्जीतल्या माणसाला हा म्हातारा असं राहायला द्यायचा.
रंगा तसा शरीराने या शहरात तर राहायचा; पण त्याचं मन त्याच्या गावी- घराकडे लागून राहिलेलं असायचं. घरी त्याची पोरगी अन् जरा विक्षिप्त असलेली बायको असायची. त्यांच्यासाठी-रंगा महिन्याला काही पैसे पाठवायचा. विशेषत: शाळेत जाणाऱ्या पोरीच्या खर्चासाठी म्हणून हे पैसे असायचे. शाळेच्या दिशेने पाऊल टाकणारी त्याची पोरगी- घराण्यातली पहिलीच. त्यामुळे रंगाला तिच्याबद्दल मोठा अभिमान वाटायचा; पण त्याच्या बायकोला हे पटायचे नाही. तिला वाटायचे, 'मुलीचा जन्म घरात राहण्यासाठी, लग्न करून मुलांना जन्म घालण्यासाठीच झालेला आहे;' पण रंगाने अशा गोष्टींचा तीव्र विरोध केला होता. विशेषत: घरी ओट्यावर बसून पोरांना शिकविणाऱ्या शाळामास्तराने त्याला सांगितलं होतं - ''तुझी पोरगी फार हुशार आहे. तिच्या अभ्यासाकडे चांगलं लक्ष दे आणि पाम्बनच्या मिशन स्कूलला तिला पाठवून दे.'' हे जवळचं शहर होतं, तिथं बसने जाता यायचं.
फार पूर्वी, आपल्या गावाकडे चिंचेच्या झाडाखाली बसणाऱ्या लोहारासोबत रंगाने आपला धंदा केला होता. त्याच्या बाजूलाच आपले धार द्यायचे चाक त्याने बसविले होते. इथे आसपासच्या गावांतून येणारे बरेच शेतमजूर आपल्या हत्यारांची दुरुस्ती करायला गर्दी करायचे. मग रंगाकडे पाहून आपली कोयती, विळे, कुंपण कापायच्या मोठ्या कात्र्या शेवटून घ्यायचं त्यांच्या लक्षात यायचं; पण हा लोहार मोठा लोभी आणि धूर्त होता. रंगाच्या प्रत्येक रुपयाच्या कमाईतून तो चार आणे मागायचा. त्याच्या दिवसभराच्या गिऱ्हाइकांकडे लक्ष ठेवून असायचा. दररोज संध्याकाळी हिशेबासाठी भांडायचा आणि रस्त्यापलीकडच्या अड्ड्यावर दारू पाजव म्हणून मागे लागायचा. याचा अर्थ असा असायचा, की रंगानेही त्याच्यासोबत दारू घ्यावी आणि घरी मग रंगाला आपल्या बायकोच्या रागाला तोंड द्यावे लागायचे. ती ओरडायची, गोंधळ करायची- जेवायला वाढायची नाही. बायकोने याचा एवढा राग का करावा हे रंगाला कळायचे नाही. कारण, घोटभर दारू घेतल्याने काही फार बिघडत नाही, असं त्याला वाटायचं. उलट, त्यामुळे दिवसभराचे श्रम जाऊन कसं हलकं वाटायचं; पण हे बायकोला सांगून तिला पटवायचं कसं? एकदा धुंदीतच त्याने बाटली घरी आणली होती आणि बायकोला पिण्यासाठी सांगू लागला; पण त्या वासानेच तिला हुलकी आली आणि तिने ती बाटली त्याच्या हातातून काढून फेकली होती. सगळी दारू जमिनीवर सांडून गेली होती. एरवी बायकोचं ऐकून असणारा रंगा त्या दिवशी बेभान झाला होता. नेहमीपेक्षा जादा दारू घेतली असल्याने संतापून जाऊन त्या भरात तो तिला मारायला धावला होता; पण त्यावर बायकोने कोपऱ्यातली केरसुणी घेऊन रंगाला चांगलेच झोडपले होते. त्यानंतर त्याला बाहेर काढून दार लावून घेतले होते. त्या तशा धुंद अवस्थेतही, आपली पोरगी गाढ झोपलेली आहे, याचे

समाधान रंगाला वाटले होते. कुठेतरी बाहेर तो झोपला होता, सकाळी उठल्यावर या प्रकरणाचा त्याला पश्चात्ताप झाला होता. बायकोने येऊन तावातावाने विचारले होते, ‘‘उतरली का नाही तुमची नशा?’’
या समस्येनंतर रंगाने ठरविले, की लोहाराची संगत सोडायची अन् आपला धंदा हिंडून-फिरून करायचा. भल्या पहाटेच उठून मूठभर रागी- कांदा मिरची सोबत खाऊन आपलं धार द्यायचं चाक घेऊन तो निघायचा. लोहाराची संगत सोडल्यापासून बायकोच्या वागण्यात चांगलाच फरक झाल्याचे त्याच्या लक्षात आले होते. ती पहाटेच उठून चुलीवर रागी उकळायला ठेवायची. सारखी ढवळून ढवळून ती घट्टसर होईपर्यंत रंगा विहिरीवर स्नान करून यायचा. चिंचेच्या झाडाखाली बसलेल्या लोहाराला टाळूनच तो फेरी मारायला निघायचा. गावातल्या वाकड्या- तिकड्या बोळांतून हिंडत घराघरांसमोरून आवाज देत फिरायचा - ‘‘चाकू-विळयांना धार करून घ्या!’’ रात्री परत येऊन बायकोच्या हातावर सगळी कमाई ठेवायचा. तर बायको मोठ्या लोभीपणाने विचारायची, ‘‘फक्त दोनच रुपये? तुम्ही त्या आठवडी बाजारात गेला होता का?’’
‘‘हो, मी गेलो होतो; पण तिथे माझ्यासारखे दहाजण होते!’’
गावातल्या एका मोठ्या वाड्यात काम करून त्याची बायको पैसे कमवायची आणि काटकसरीने घर चालवायची. असं असूनही घरात तंगी राहू लागली आणि तिच्या चेहऱ्यावर सतत काळजी दिसू लागली. त्या लोहाराकडे जादा गिऱ्हाईक मिळायची शक्यता असल्याने, तिकडे पुन्हा जावं का असं रंगाने बायकोजवळ सुचविलं, तेव्हा तिने उसळून म्हटलं होतं, ‘‘तुम्हाला त्या नशेबाजीत राहायची हुक्की आली वाटतं पुन्हा!’’ त्याच्यात धडाडी नसल्याचं सांगून ती म्हणाली- ‘‘मला वाटतं तुम्ही गल्लीबोळात मोठ्याने ओरडत नसाल आणि सावकाश- रेंगाळत जात असाल...’’ यावर रंगा नाराज झाला; अचानक एवढ्या मोठ्याने ओरडला, की त्याची बायको दचकली आणि चिडून म्हणाली,
‘‘वेड लागलं की काय तुम्हाला, काय झालं?’’
रंगाने उत्तर दिले- ‘‘मी रस्त्यावरून जाताना कसे ओरडतो ते तुला दाखविलं. एक जण तर म्हणाला, माझं ओरडणं खाटकाच्या दुकानापलीकडे ऐकायला जातं!’’
‘‘मग, मला वाटतं, तुमचा आवाज ऐकून गिऱ्हाईक घाबरून जात असतील आणि चाकू-सुऱ्या लपवून ठेवीत असतील!’’
आणि मग दोघेही या थट्टेवर हसले.
पाम्बनच्या मिशन स्कूलमध्ये पाठविण्याएवढी मुलगी आता मोठी झाली होती. आता तिची पुस्तकं, गणवेश, शाळेची फीस आणि पुन्हा बसखर्च या सगळयांसाठी रंगाला पैशाची व्यवस्था करावी लागणार होती. त्याच्या उलट, पोरीला आता शाळेत पाठवू नये, असा बायकोचा आग्रह राहू लागला. कारण तिचं वय झालं होतं, तिला आता कामाला मदतीची गरज पडू लागली. जमीनदाराकडे मजुरीसाठी माणसांची आवश्यकता असायची आणि आता पोरीला हाताशी धरून ही कामं करावीत, तिला कामात तयार करावं असं बायकोला वाटायचं. तिच्या अशा शहाणपणाचा रंगा तीव्रतेने विरोध करायचा. तो इतर बाबींसाठी बायकोसमोर नमतं घ्यायचा; मात्र मुलीचा विषय असला, की अगदी ठाम

राहायचा. आपल्यापेक्षा मुलीला वेगळं आयुष्य लाभावं हे रंगाला पटलेलं होतं. अशा वेळेस त्याच्या ठामपणाचा अचंबा वाटून बायको गप्प व्हायची. रंगा टोमणा मारायचा, ''तुला फक्त पैसे पाहिजेत; नाही का?''

''हो; मी पाहतेच आता - तुम्ही पैशासाठी काय जादूटोणा करून दाखवाल ते!''

''तू पोरीचा विचार करू नको. मी काढतो मार्ग...''

''तुमच्यामुळे ती उथळ वागते आहे...'' केसाला रिबिन बांधून श्रीमंतीचे नखरे ती करते आहे... जर ती बिघडली तर मला दोष देऊ नका. सांगून ठेवते! ती आतापासूनच उलट बोलते आहे, स्वत:च्या मनासारखं वागते आहे...''

लवकरच मालगुडीला जाऊन रंगा पाहणी करून आला. केवळ पंचवीस मैलावर असलेलं ते गाव. तिथनं तो घरी परतला आणि सांगू लागला : ''काय शहर आहे ते! पंडित-ब्राह्मणांनी सांगितल्याप्रमाणे इंद्रदेवाचं ते गाव! प्रत्येक गोष्ट तुला तिथे मिळेल. शेकडो-हजारो माणसं शेकडो घरांघरांतून राहणारी! किती तरी बसगाड्या, मोटारगाड्या रस्त्यावरून धावणाऱ्या... आणि किती तरी शिंपी-न्हावी रात्रंदिवस आपल्या कात्र्या-वस्तरे परजून कामात व्यस्त असतात आणि त्याहीपेक्षा घराघरांत असलेल्या अगणित विळया, चाकू, सुरे... माझ्यासारख्या दोनएकशे माणसांना पुरेल एवढं काम आहे तिथं आणि कामाची मजुरीही अगदी हात सोडून दिली जाते. तिथली माणसं मोठी सज्जन आणि उदार आहेत. अशी नाहीत, इथल्यासारखी!''

''वा! तुम्ही आत्ताच मोठ्या गोष्टी करताय आणि असं सांगताय, की त्यांनी तुम्हाला दत्तक घेऊन टाकलंय.''

बायकोच्या या टोमण्याकडे दुर्लक्ष करून रंगा आपलं स्वप्न रंगवू लागला- ''आपल्या शाळामास्तरांना विचारून मी एखाद्या शुभदिवशी मालगुडीला माझं नशीब काढायला जाईन आणि जम बसला, की मी आपल्यासाठी तिथं घर घेईन. मग आपण तिकडे जाऊ. तिथे पुष्कळ शाळा आहेत अन् आपल्या पोरीला तिथे प्रवेश मिळेलच.''

पण मध्येच त्याला थांबवून बायको म्हणाली, ''तुम्हाला जायचं असेल तर जाऊन राहा तिकडे; पण आपण इथनं घर न्यायचं नाही. इथल्या आपल्या घराला कुलूप लावून जाणं मला पटत नाही आणि वाढत्या वयाच्या पोरीला तसं शहरी वळण अन् फॅशन मी लावूच देणार नाही. आम्ही नाही येणार. तुम्हाला काय करायचं ते करा. आम्हाला ओढू नका.''

रंगाला वाईट वाटले. थोडा वेळ तो विचारात पडला; पण नंतर त्याच्या लक्षात आले : 'शेवटी ते माझ्यासाठी चांगलंच राहील की. देवाला माझी दया आली अन् देवाला वाटतंय, की मी त्या शहरात मोकळं अन् स्वतंत्र राहावं... जर तिला इथंच राहावं वाटलं, तर फारच चांगलं की...'

''तुम्ही स्वत:शीच काय बोलता -'' बायकोने न राहवून विचारले,

''मोठ्याने सांगा की!''

''नाही नाही, तुझ्या बोलण्यात तथ्य आहे बरं! तू पुढचा विचार करतेस.'' त्याने उत्तर दिले आणि यावर बायकोला मोठं समाधान वाटलं.

त्यानंतर एक एक महिन्याच्या अंतराने रंगा आपल्या गावाला तीनचार दिवसांसाठी येत राहिला. त्याचं धार मारायचं मशीन व्यवस्थित तरटात बांधून तिथेच 'कृष्णा हॉल'मध्ये

ठेवून तो यायचा. मार्केट गेटपासून तो बस पकडायचा. आपलं घरी येणं मोठं आनंददायक असतं, असं त्याला वाटायचं. असं असलं, तरी या तीन-चार दिवसांत त्याला बायकोचं टोचून बोललेलं ऐकून घ्यावं लागायचं. बायको सतत कुरबुर तरी करायची किंवा तक्रार करीत राहायची. एका काळजीतून दुसऱ्या काळजीत ती सतत असायची. पैशाची काळजी नसली, तर तिच्या नाही तर पोरीच्या प्रकृतीची काळजी... ती नसली, तर शेजारणीच्या भांडणाची तक्रार, ती नसली तर शाळेतून उशिरा येणाऱ्या पोरीबद्दल तक्रार...

तीन दिवस रंगा घरी राहिला, की बायको विचारायची, ‘‘तुम्ही जर इथे असंच मजेत बसून राहिलात, तर पुढल्या महिन्यात आपलं घर कसं चालावं?’’ मग तो आपल्या स्वतंत्र आयुष्याकडे जायला मोठ्या आनंदाने तयार व्हायचा; पण पोरीला सोडून चालल्याची चुटपूट त्याला असायची. या तीन दिवसांत, पोरगीशाळेसाठी जी लगबग करायची; हिरव्या-पिवळ्या स्कर्टचा गणवेश घालून शाळेत जायची, शाळेतून आल्यावर शाळेचा सगळा वृत्तांत सविस्तर सांगायची, हे सगळं मोठ्या आस्थेने रंगा अनुभवायचा. गणवेश धुण्यासाठी ती विहिरीवर गेली, की रंगा तिच्या पाठोपाठ जायचा; तिचे कपडे वाळत घालायचा. तिच्याकडे दोन गणवेश होते आणि शाळेत अगदी ‘टीप-टॉप’ तऱ्हेने जाता यावं म्हणून ती या गणवेशांची मोठी काळजी घ्यायची. तिच्या अशा काळजीने रंगाची बायको चिडायची. तिला वाटायचं, पोरगी स्वत:तच नेहमी मग्न राहते. पोरीच्या गणवेशाबद्दल, पुस्तकांबद्दल ती तक्रार करायची. रंगा या तक्रारी ऐकायचा; पण त्याचबरोबर त्याला याचाही भरवसा वाटायचा, की आपली पोरगी, आईच्या तक्रारींना जादा महत्त्व न देता तिचा स्वत:चा बचाव करायला समर्थ झालीय.

एकदा गावाकडून परतताना, रंगा गाडीसाठी उभा होता.

हायवेवर, नारळाच्या झाडांच्या बाजूला हातात रुमाल घेऊन तो गाड्यांना हात दाखवू लागला. रुमाल पाहून बस-ट्रक थांबवावी अन् शहराकडे जाता यावं अशा हेतूने तो उभा होता. त्याने फार वेळ वाट पाहिली; किती वेळ पाहिली ते- त्याला वेळेचं कधी भान नसल्याने- त्याच्या लक्षात आलं नाही. एकदोन भरगच्च ट्रक समोरून निघून गेले. त्यांच्यामागे एक बसही वेगात निघून गेली.

‘‘बाप रे! बरं झालं, या बसमध्ये मी गेलो नाही. जमिनीला पाय न लावता अशा वेगात गेली, की चंद्रावर चालली का काय, वाटलं!’’ धुरळयाचे ढग उडवीत बस निघून गेली तेव्हा रंगा स्वत:शीच म्हणाला. नशिबाने कधी एखादी बस अशी मिळायची, की त्याला इथनं घेऊन सरळ ‘कृष्णा हॉल’समोर सोडायची. कधी त्याला दीर्घ काळ वाट बघावी लागायची. त्याला आपल्या पोरीचं कौतुक वाटलं. ती दररोज बसने जायची. तिच्या वयाच्या मानाने केवढी हुशार आहे! त्याच्या बायकोने पोरीला त्रास देऊ नये अशी तो मनोमन प्रार्थना करू लागला. पुन्हा, स्वत:शीच हसत रंगा म्हणाला - ‘‘पण पोरगी खरंच फार हुशार आहे अन् तिच्या आईला जुमानणारी नाही.’’ तो कल्पनेनंच प्रसंग पाहू लागला, रंगवू लागला... त्याची पोरगी आईशी कधी रागाने, कधी लोभाने वागते आहे, समजाविते आहे आणि पटविते आहे; मग कधी आईसुद्धा तिच्या अशा आत्मविश्वासाचं कौतुक करते आहे... आणि या बाईला वठणीवर आणायचा हाच एक मार्ग होता. असं जर आपल्याला जमलं असतं तर..., रंगाला वाटलं; पण देवाला दया आली अन् त्याने आपल्याला हा

‘कृष्णा हॉल’चा बदल करून दिला. पोरगी असल्यामुळे नाइलाज होतो; नाहीतर तीन वर्षांतून एकदाही तो गावाकडे फिरकला नसता. पोरीने अभ्यास करावा अन् तिने डॉक्टर व्हावं - लेडी डॉक्टर; ती कशी महाराणीसारखी असते. त्याला आठवायचं, बायकोच्या निमित्ताने कधी दवाखान्यात जावं लागलं, की तिथल्या डॉक्टरबाईचा रुबाब... टॉक टॉक करीत ती यायची तेव्हा सगळेजण कसे चपापून बसायचे.

रस्त्याच्या वळणावरून एक वाहन येत असलेलं रंगाने पाहिलं. पिवळया रंगाची, वैशिष्ट्यपूर्ण असलेली आणि श्रीमंताची वाटावी अशी ती जीप. तिला हात दाखवायची त्याची हिंमत झाली नाही आणि सफाईने ती पुढे निघून गेली तेव्हा त्याच्या लक्षात आलं, की त्या गाडीवर काही चित्रंही रंगविली होती. पण थोडं पुढे गेलं, की ती जीप थांबली आणि मागे येऊ लागली. आता रंगाच्या लक्षात आलं, की गाडीवर स्त्री-पुरुषाचं अन् दोन पोरांची चित्रं रंगविली होती आणि काही मजकूर लिहिलेला आहे. रंगाला वाचता येत नसलं, तरी त्याला कळालं, ‘दोन मुलं पुरेत’ची ही कुटुंबनियोजनाची जाहिरात आहे. मार्केट रोडचा त्याचा एक खाटीक-मित्र रोज पेपर वाचायचा अन् त्याला याबद्दल माहिती द्यायचा. गाडीतल्या, निळया बुशशर्टच्या माणसाने त्याला विचारले, ‘‘कुठे जायचं आहे तुला?’’

‘‘शहरात,’’ रंगा म्हणाला.

त्या माणसाने गाडीचं दार उघडून म्हटलं, ‘‘आत ये. आम्ही तुला शहरात सोडू.’’

रंगा आत बसला. खिशातून त्याने रुपया काढला, तेव्हा तो माणूस म्हणाला, ‘‘राहू दे.’’ ते निघाले. समोर बसल्याचा रंगाला आनंद झाला. नाही तर नेहमीच बसमध्ये त्याला उभं तरी राहावं लागायचं, नाही तर खाली बसून राहावं लागायचं... आता, मऊ सीटवर बसल्यावर त्याला वाटू लागलं, की बायकोने हे पाहायला पाहिजे - माझा रुबाब!

गाडीने वेग घेतला अन् खिडकीतून येणाऱ्या गार वाऱ्याने रंगाला मस्त वाटू लागलं. नारळाच्या बागांतून ती गाडी एका कॅम्पवर आली. बांबू अन् नारळाच्या पानांनी बनविलेल्या झोपड्यासारख्या त्या खोल्या होत्या. ही जागा रंगाच्या नेहमीच्या मार्गावरची नव्हती. शहराबाहेरच्या वाडी-तांड्यासारखा तो परिसर होता. रंगाने, त्याला घेऊन येणाऱ्या माणसाला विचारले-

‘‘आपण कुठे आहोत?’’ त्या माणसाने उत्साहाने उत्तर दिले - ‘‘घाबरायचं कारण नाही. तुझी सगळी काळजी घेतली जाईल. चल, कॉफी घेऊ या.’’ तो गाडीतून उतरला आणि कुणाला तरी त्याने आवाज दिला. केळीच्या पानावर थोडं फराळाचं आणि कॉफीचा कप रंगाला देण्यात आला. रंगाला हुशारी आली. ‘रागी’ खाल्ली अन् तेव्हापासून काहीच खायला मिळालं नव्हतं. त्याने मग विचारलं, ‘‘हे सगळं कशासाठी आहे साहेब?’’

माणसाने मोठ्या आस्थेवाईकपणाने सांगितले, ‘‘खा, खा. तुला भूक लागली असेल, आधी खाऊन घे.’’

रंगाला कुणाकडून असं अगत्य कधी माहीतच नव्हतं. हा माणूस स्वत:ला अगदी देवमाणूस समजून वागतो आहे. रंगाला वाटलं, एवढा फराळ झाला, की पुन्हा पुढचा प्रवास सुरू करायचा; पण तो दयाळू परमेश्वर चटकन् उठला अन् रंगाला म्हणाला, ‘‘माझ्यासोबत चल.’’ त्याने बाजूला घेऊन रंगाला हळूच सांगितले, ‘‘कशाचीच काळजी करू नको. आम्ही

आहोत सगळं पाहायला. तुला तीस रूपये कमवायचे आहेत का?''
''तीस रुपये?'' रंगा ओरडला - ''त्याच्यासाठी मला काय करावं लागेल, सांगा! मी माझी मशीन नाही आणली पण!''
''आता तू मला चांगला ओळखतोस. हे पहा, माझ्यावर भरवसा ठेव. मी काय सांगतो, तसं. काही विचारू नकोस आणि आम्ही सांगतो, ते ऐकलंस तर तुला तीस रुपये मिळतील. तुला आम्ही भरपूर खायला देऊ आणि मी तुला शहरात घेऊन जाईन. कुणाशी बोलू नकोस अन् कुणाला काही सांगूही नकोस. त्यांना तुझा हेवा वाटेल आणि तीस रुपये कमवायची तुझी संधी जाईल बघ... तुला एक ट्रान्झिस्टर रेडिओसुद्धा मिळणार आहे! तुला आवडेल न रेडिओ घ्यायला?''
''पण मी शिकलेलो नाही. रेडिओ कसा चालवायचा मला माहीत नाही...''
''अं! फार सोपं आहे ते. फक्त बटन दाबायचं की झालं. गाणी लागतात!''
त्याने मग रंगाला कॅम्पच्या आतल्या भागात घेतले. रंगाला तो सविस्तर बोलला. (त्यातले बरेचसे रंगाला समजले नाही) आणि तो निघून गेला. रंगा आता झाडाखाली मैदानावर निजून राहिला. भरपूर खाणं झाल्याने त्याला मोठं आरामदायी वाटू लागलं. तीस रुपयांच्या मिळकतीची ही शक्यता मोठी आनंदाची वाटत असली, तरी रंगाचा थोडा गोंधळ उडाला होता आणि थोडी शंकाही येत होती; पण त्या निळ्या शर्टवाल्यावर भरवसा ठेवावा लागणारच होता. तो देवासारखा दिसला. तीस रुपये! दहा दिवसांच्या भरपूर मेहनतीच्या कमाईएवढी रक्कम! हे पैसे तो त्याच्या पोरीला - तिला हवे तसे खर्च करण्यासाठी देणार होता. त्यात तिच्या आईचा कसलाही हस्तक्षेप राहणार नव्हता. तो पोरीला रेडिओपण देऊन टाकणार होता. ती शिकलेली होती, तिला रेडिओ कसा लावायचा ते माहीत होतं. बायकोला न कळविता पोरीकडे पैसे कसे ठेवायचे याचं त्याला फार कोडं पडलं होतं. शाळेच्या पत्त्यावर पाठवावेत का... पोस्टाजवळ बसणारा तो माणूस पंचवीस पैशांत मनीऑर्डर लिहून देईल आपल्याला. तो रंगाचा चांगला मित्र होता आणि बेंगलोरहून जेव्हा धार द्यायच्या नव्या चाकाची मागणी करायची होती, तेव्हा रंगाला त्याने फुकटच पत्र लिहून दिले होते. काही माणसं जवळून गेलेली त्याने पाहिली, त्या वेळी त्यांच्याकडे पाहून रंगाला भयही वाटले; पण त्याने डोळे झाकले. त्याला ग्लानी आली.
निळ्या शर्टच्या त्या माणसाने रंगाला उठविले आणि तो त्याला कॅम्पच्या दुसऱ्या एका भागात घेऊन गेला. एका मोठ्या तंबूत डेस्कसमोर एक माणूस बसलेला होता. ''ते इथले मुख्य आहेत.'' माणसाने हळूच सांगितले. ''त्यांनी विचारल्याशिवाय तू काही बोलू नकोस. फक्त विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दे. आदराने वाग. साहेब आहेत ते आमचे.'' आणि रंगाला एवढं सांगून तो निघून गेला. पुन्हा त्याला दिसलाच नाही.
त्या अधिकाऱ्याचं रंगावर दडपण आलं. समोर एक कागद घेऊन त्या अधिकाऱ्याने विचारले, ''तुझं नाव?'' त्याने नाव लिहून घेतलं.
''वय?''
रंगाला प्रश्न समजायला वेळ लागला. त्याला लक्षात आलं आणि मग त्याने आपलं पाल्हाळ सुरू केलं. ''पन्नास किंवा सत्तर नक्कीच असेल. कारण मी...'' रंगाने आता अगदी तपशिलाने सांगायला सुरुवात केली - ओठावर मिशीची रेषा उमटली तेव्हा त्याने कशी चाकूला

पहिल्यांदाच धार लावून धंद्याला सुरवात केली होती... अधिकाऱ्याने त्याला मध्येच थांबविले -
''मला ते सगळं सांगू नको. पंचावन्न लिहू का?''
''हो, हो, लिहा. तुम्ही शिकलेले आहात अन् तुम्हाला सगळं माहीत आहेच.'' मग अधिकाऱ्याने विचारले, ''तुझं लग्न झालंय का?''
मग यावर रंगाने त्याच्या घरगुती समस्या सांगायला सुरवात केली. आताच्या बायकोचा स्वभाव... ती खरं म्हणजे त्याची दुसरी बायको होती. त्याला या बाईशी - नातेवाइकाच्या दडपणामुळे कसं लग्न करावं लागलं... रंगा म्हणाला, ''माझे काका आणि इतर नातेवाईक म्हणायचे- 'तू मरायला टेकल्यावर तुला गरम पाणी अन् लापशी कोण करून देणार?' ती सगळी इश्वराची मर्जी होती साहेब. त्याच्या मनात काय आहे ते कुणी सांगावं?'' अधिकारी वैतागून गेला; पण प्रश्न विचारून रंगाला मूळ पदावर आणू लागला, ''किती मुलं?''
''ईश्वराने आयुष्य दिलं असतं तर माझ्या पहिल्या बायकोला दहा मुलं झाली असती; पण ती आजारी पडली आणि डॉक्टरीण बाई म्हणाली...'' आणि रंगाने पहिल्या बायकोचं आजारपण, तिचा मृत्यू याबद्दल सविस्तर हकिकत सांगितली. त्याने आपली आणखी खासगी दु:खं सांगितली अन् अचानक त्याने विचारले, ''माझं एवढं रडगाणं तुम्ही का विचारीत आहात साहेब?'' अधिकाऱ्याने चिडून जाऊन आपली चौकशी थांबविली. रंगाला आठवलं, की विचारलं तेवढंच सांग, अशा त्याला सूचना देण्यात आल्या होत्या. कदाचित ही सविस्तर विचारपूस म्हणजे आपल्याला पैसे आणि रेडिओ देण्यापूर्वीची प्रस्तावना असावी ही, असं त्याला वाटलं. अधिकाऱ्याने पुन्हा विचारलं, ''किती मुलं?''
''सहा मुलं तर वर्षाच्या आधीच गेली. तुम्हाला त्यांची नावं सांगू का? आता एवढे दिवस झाले, आठवत नाहीत; पण तुम्हाला हवी असतील तर प्रयत्न करतो... सातव्या वेळी, डोक्याचं मुंडण करून उघड्या अंगाने प्रदक्षिणा घालतो, असा नवस मी टेकडीवरच्या देवीला केला होता आणि देवीच्या कृपेने सातवं मूल वाचलं आणि तेवढीच एक मुलगी आहे आणि माझ्या बायकोला हे समजत नाही, की किती गुणाची मुलगी आहे ही आणि ती शिकावी, असं बायकोला वाटतच नाही; तिला वाटतं आपल्यासारखंच पोरीने मोलकरणीसारखं काम करावं; पण पोरगी म्हणजे गजब आहे! ती दररोज शाळेत जाते आणि तिला डॉक्टर व्हायची इच्छा आहे. आपल्या आईच्या नाकावर टिच्चून ती राहते...''
'मुलांची संख्या' यासमोर अधिकाऱ्याने 'सात' लिहिले आणि रंगाला दटावून तो म्हणाला, ''यापुढे तुला अजिबात मूल नको; समजलास?'' रंगा ओशाळवाणं हसला. अधिकाऱ्याने लोकसंख्या, अन्नधान्य समस्या यांवर भाषणच द्यायला सुरवात केली आणि सांगू लागला, की शासनाने आता दोनच मुलं असावीत असा कायदा केला आहे... त्याने एक कागद पुढे करून रंगाला आज्ञा केली, ''सही कर इथे'' यावर काय बोलावे ते न कळल्याने रंगा थांबला; मग सांगू लागला, ''जर मला लिहितावाचता आलं असतं तर...''
मग अधिकाऱ्याने दटावून म्हटले, ''अंगठा पाहू'' आणि शाईच्या पॅडवर रंगाचा अंगठा घासून त्या कागदावर लावून टाकला. एवढं सारं झाल्यावर आता आपलं बक्षीस घेऊन जाण्यासाठी रंगा तिथेच थांबला. तो आता हा कॅम्प सोडून पुन्हा हायवेवर जाणार होता. बस धरून शहराकडे येणार होता. बससाठी त्याच्याकडे पैसे होतेच; पण अधिकाऱ्याने

त्याच्याकडे कागदाचा चिठोरा देऊन आवाज दिला, ‘‘नेक्स्ट!’’ आणि गणवेशातल्या एका माणसाने एका मध्यमवर्गीय गरीब माणसाला पुढे ढकलले. दुसऱ्या गणवेशधारी माणसाने रंगाला कॅम्पच्या दुसऱ्या भागात नेले. त्याच्या हातातला चिठोरा घेऊन आणि रंगाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून तो निघूनपण गेला. अचानकच आपलं बखोटं धरून कुणीतरी आपल्याला आतल्या खोलीत घेऊन चालल्याचं रंगाच्या लक्षात आलं. आत एक डॉक्टर, त्यांच्या सहकाऱ्यांसोबत टेबलजवळ उभे होते. तिथे एका पांढऱ्या ट्रेमध्ये वेगवेगळे चमकदार चाकू पद्धतशीरपणे लावून ठेवल्याचे रंगाने पाहिले. ही हत्यारं किती चांगल्या तऱ्हेने धार लावलेली आहेत, हे त्याच्या सराईत नजरेनं ओळखलं. डॉक्टरने विचारले,‘‘किती जण आहेत?’’ कुणीतरी उत्तर दिलं, ‘‘फक्त चारच आहेत, डॉक्टर!’’ रंगाला एका उंच बेडवर निजायला सांगण्यात आले. रंगाला भीती वाटली. त्यांनी त्याला सावकाश ढकलत बेडवर घेतले. एकाने त्याचे डोके धरून ठेवले, तर दुसऱ्या दोघांनी पाय धरून ठेवले. थोड्याच वेळात त्यांनी रंगाचे कपडे काढले अन् त्याच्या अंगावर पांढरी चादर ओढली. अशा तऱ्हेने नागवं झाल्याच्या जाणिवेने रंगाला मोठं लाजल्यासारखं झालं; पण आपल्याला श्रीमंतीकडे घेऊन जाणारा हा एक टप्पा आहे, या जाणिवेने त्याने हेही सहन केलं. निळया शर्टवाल्याने त्याला नम्रतेने राहायला सांगितले होते; पण इथे त्याच्यावर लक्ष ठेवून असलेल्या कर्मचाऱ्यांकडे पाहून, रंगाच्या मनातल्या शंकेने मूळ धरले. त्याला आपल्या खाटीक-मित्राची आठवण झाली. मित्र पेपर वाचायचा अन् रंगाला सांगायचा, की शासनाने सगळीकडे कसे कॅम्प उभारले आहेत - स्त्रीपुरुषांना धरून, त्यांना मुलं होणार नाहीत अशी ऑपरेशन्स चालू आहेत... तर हे तेच आहे तर! शस्त्रक्रियेच्या संभाव्य घटनेची त्याला कल्पना आली अन् भयाने त्याचं मन गारठलं.

‘‘हलू नको, गप्प राहा...’’ कुणीतरी सावकाश म्हटलं आणि त्याला बरं वाटलं. त्याही स्थितीत त्याला आशा वाटली, की आपली सगळी तपासणी करून ते सोडून देतील. त्या निळया शर्टवाल्याने तसं सांगितलंच होतं, ‘‘की त्याच्यासारख्या वडिलधाऱ्या माणसाला कुणी कसलाही त्रास देणार नाही.’’

... असे विचार रंगाच्या मनात सरकत असतानाच कापसाचा बोळा धरलेला हात पुढे येत असलेला त्याने पाहिला. जेव्हा त्याच्या शरीरावरचं आवरण बाजूला सारून रंगाच्या गुप्त इंद्रियाकडे त्याची बोटं गेली, तेव्हा रंगाने आपले डोके सोडवून घेतले आणि तो किंचाळला, ‘‘हात काढा, सोडा मला!’’ जवळ उभ्या असलेल्या माणसाला डोक्यानेच धडक मारून रंगाने आपली सुटका करून घेतली. चाकू, सुरे ठेवलेल्या ट्रेवरून धडपडत तो सावरला.

दवाखान्यातला तो कपडा तसाच गुंडाळून तो जीव घेऊन बाहेर धावला. सगळं आवार ओलांडून धावताना, तो मोठ्याने किंचाळत होता, ‘‘नाही, नाही. मी कापून घेणार नाही...’’ त्याच्या आवाजाचे प्रतिध्वनी दूर दूर उमटू लागले. घशातून निघणारा रंगाचा आवाज -

आयुष्यभर जोपासलेला-कमावलेला, इतर आवाजांना ओलांडून गल्ली बोळांतून घुमणारा- ‘‘चाकू सुऱ्यांना धार लावून घ्याऽऽ’’ अशा आरोळीचा रंगाचा आवाज सगळीकडे घुमू लागला.

♦♦♦

# ईश्वर आणि चांभार

मार्गोसा फुलांच्या झाडाची फांदी भिंतीवरून वाकलेली असायची. त्यामुळे त्याच्यावर दिवसभर लहान-लहान पिवळसर-पांढऱ्या फुलांचा वर्षाव होत राहायचा. 'केवळ स्वर्गातल्या देवदेवतांनाच फुलांच्या वर्षावाचं असं भाग्य लाभत असावं.- देवळाच्या पायऱ्यांवर बसून त्याच्याकडे पाहत राहणाऱ्या हिप्पीला असं वाटलं. काल संध्याकाळपासूनच हिप्पीने तिथे मुक्काम टाकलेला होता. हिप्पी कोण होता, हे सांगायची गरज नाही. स्वत:ची, स्वत:च्या प्रदेशाची ओळख सोडून देण्यापासूनच हिप्पीपणाची सुरवात होत असते. तो बर्कले किंवा मंगोलिया अशा कुठल्याही देशाचा असू शकतो. जर तुम्ही दाढी-मिशा-जटा वाढविल्या तर तुम्हाला असा मुखवटा लाभेल. जर तुम्ही दिवसभर उघड्यावर राहिलात, उन्हातान्हात भाजून निघालात, तर तुमच्या चेहऱ्यावर असं वैश्विक-आध्यात्मिक तेज येईल; अशी छाप पडेल, की त्यामुळे तुम्हाला कुठल्याही देश-प्रदेशात मुक्त फिरता येईल. त्याशिवाय, जर तुम्ही गुडघ्यापर्यंत धोतर-बंडी अंगात घालून कुठेही धुळीत निश्चिंत बसून राहिला, की आपोआपच तुमच्या कपड्यांना अशी कळा येईल, तुम्ही संन्यासी आहात असे वाटेल. अशा तऱ्हेची वैश्विक पातळी जेव्हा तुम्ही मिळवाल, त्या वेळी तुम्ही कोण आहात, कसे आहात या प्रश्नांना अर्थ राहणार नाही. तुम्ही जसे आहात तसे स्वीकारले जाल- क्षणभर पाहत राहावं असं व्यक्तिमत्त्व. बस! अगदी अशाच नजरेने रस्त्यावर बसलेल्या त्या चांभाराने हिप्पीकडे पाहिले होते. हा हिप्पी आपल्या सँडल्सचे बंद शिवून घेण्यासाठी त्याच्यासमोर उभा होता.

चांभाराने वर नजर टाकली अन् त्याला वाटले, या लोंबणाऱ्या जटा पाहून हा शिवशंकरच वाटतो. फक्त गळयाभोवती नागाच्या गुंडाळीचीच तेवढी कमतरता आहे.' देवमाणसाला करावा, तसा चांभाराने हिप्पीकडे पाहून नमस्कार केला. त्याच्या सँडल्स, सँडल्सला बांधलेल्या चिंध्या पाहून चांभाराला वाटले, साक्षात हिमालयातून-शिवाच्या निवासातूनच हा इथे अवतरला की काय! हिप्पीच्या सँडल्स चांभाराने काढून घेतल्या. भिंतीच्या पोस्टरचा फाडलेला कागद त्याने हिप्पीपुढे टाकला आणि म्हणाला,

“याच्यावर पाय ठेवा. जमिनीवर चिखल आहे” चांभाराजवळ बरीच पोस्टर्स होती. त्याच्या मागची भिंत चांगलीच भक्कम होती- रामनगर आणि काली वेस रस्त्याच्या चौकावर आणि पूर्वेच्या हाय-वेसमोर असलेली. या रस्त्यावर सतत वर्दळ असायची आणि भिंतीची जागा सतत वेगवेगळ्या सूचनांच्या पोस्टर्सने झाकलेली असायची. ते रात्री यायचे, पोस्टरच्या मागे खळ लावायचे आणि नवीन सिनेमांची, भाषणांची किंवा निवडणूक उमेदवारांची पोस्टर्स भिंतीवर चिकटवायचे. दुसरी माणसं, जी रात्री उशिरा यायची, ती या पोस्टरवर पुन्हा आपली पोस्टर्स लावायची. पोस्टरवर कुठला का संदेश असेना, तिथे उभी राहणारी, तिथून जाणारी गाढवंमात्र निरपेक्षपणे त्यांचा फडशा पाडायची. विशेषत: पोस्टर्सला लावलेल्या खळीच्या चवीला चटावलेली ती गाढवं, पोस्टर्स मोठ्या चवीने चघळायची. चांभार सकाळी यायचा. ही पोस्टर्स तो फाडून घ्यायचा. या पोस्टर्सचा अनेक प्रकारे त्याला उपयोग व्हायचा. कोपऱ्यातल्या टपरीतून तो जेव्हा काही खायला आणायचा, तेव्हा ते गुंडाळून ठेवण्यासाठी त्याला या पोस्टरचा

उपयोग व्हायचा. गिऱ्हाईक जेव्हा आपल्या पायताणांच्या दुरुस्तीसाठी उभी राहायची, त्या वेळी त्यांच्यासाठी लाल गालिचा अंथरावा तसं हा पोस्टरचा कागद टाकला जायचा आणि दुपारच्या उन्हाच्या वेळेस याच पोस्टरच्या कागदावर तो पथारीही मारायचा. हिप्पी त्याला अशा स्थितीत पाहून कौतुकाने स्वत:शीच म्हणायचा,''... हा कशाचीही मागणी करीत नाही आणि सगळं त्याला मिळून जातं.'' हिप्पीला या चांभारासारखं बनावं, स्वावलंबी असावं असं वाटलं.

कालच हा हिप्पी मंदिरासमोर भीक मागणाऱ्यांसोबत बसला होता. या भिकाऱ्यांत काही धडधाकट, काही लुळे-पांगळे, काही अंध असे होते; पण सगळेजण भुकेले असले तरी कसे निश्चिंत वाटले अन् याचाच हिप्पीला हेवा वाटला होता. संध्याकाळी दर्शनाला येणारी मंडळी प्रवेशद्वाराजवळ बसलेल्या या भिकाऱ्यांकडे पैसे फेकायची. हे पैसे कधी कुणाच्या हातात-कटोऱ्यात पडायचे, कधी खाली पडायचे. हे सगळं प्रत्येकाच्या नशिबानं मिळायचं; फक्त अंध भिकाऱ्याचं नाणं जर खाली पडलं, तर ते त्याला उचलून द्यायचे. अशा वातावरणात मिसळून जायची कला हिप्पीला जमायची. त्यामुळे त्याचं वेगळेपण कुणाच्या लक्षात आलं नाही. काल संध्याकाळी पुजारी खुशीत होता. तांदूळ-गुळाच्या खिचडीच्या नैवेद्याचा प्रसाद त्याने वाटला. तो चांगला पोटभर होता. मग नळावर पाणी पिऊन मंदिराच्या प्रवेशद्वारालगतच हिप्पी झोपून गेला होता.

पहाटे हिप्पीने पाहिले : खांद्यावर गोणपाटाची पिशवी घेऊन चांभार आला होता; अन् मार्गोसाच्या फांदीखाली बसलाही होता. देवळाच्या भिंतीसमोर बसलेला, झाडावरून खाली उतरलेल्या सूर्यप्रकाशातला तो चांभार हे दृश्य हिप्पीला मोठे प्रसन्न वाटले. या जागी कसल्याही गोष्टीची कुणालाही बाधा नसायची. धूळ, कर्कश्श आवाज, धोकादायक अशा वाहनांची वर्दळ, स्कूटर्स-ट्रक्स यांच्यामधून येणारीजाणारी वाहने - चित्रविचित्र आवाज काढीत अशी धावायची, जसे काही वन्य पशू, भूत-पिशाच्च चीत्कार करीत एकमेकांचा पाठलाग करीत आहेत. कुणी जाणारा माणूस खाकरून पचकन् थुंकणारा, तर एखादा कुणाचीही पर्वा न करता लघवी करणारा... जीवनाला जसंच्या तसं स्वीकारणारं हे सगळं वातावरण पाहून हिप्पी खिळून राहायचा.

चांभार आपलं डोकं झुकवून कामात मग्न असायचा. चामड्यामध्ये जाडसर सुई खुपसून त्यात मेण लावलेला दोरा ओढून घ्यायचा. अशा तऱ्हेची शिवण वहाणांवर अशी संगतदार उमटायची, की ती पाहत राहावीशी वाटायची. समोर एका टोपल्यात पाणी असायचं अन् त्यात चामड्याचे तुकडे नरम करण्यासाठी टाकलेले असायचे. त्यावर मग त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण हातोड्याने ठोकून हे चामडं तो लवचीक करायचा. तो रिकामा असायचा, त्या वेळी रस्त्यावरून जाणाऱ्यांच्या पावलांकडे नजर लावून तो असायचा. प्रत्येकाच्या वहाणांची अवस्था पाहत असायचा. कुणाच्या चपलेचे तळवे, कुणाची बक्कल, बंद, अंगठे पाहत राहायचा. या वेळी काम नसल्याने त्याची बोटं जणू खाजायची. तो आपली हत्यारं मग धार द्यायच्या दगडावर घासून तयार ठेवायचा. चांभाराचं असं सतत कार्यमग्न असणं हिप्पीच्या लक्षात यायचं. हिप्पीला वाटायचं, पोट भरण्यासाठीच म्हणून नाही, तर या सगळ्या कामामुळे चांभाराला अलौकिक आनंद वाटत असावा. त्याच्यासाठी जेवणसुद्धा दुय्यम आहे असं वाटायचं. पलीकडच्या टपरीवरच्या पोराला चहासाठी किंवा पावासाठी

तो हाक द्यायचा. त्याच्याशिवाय त्याला जास्त काही लागायचं नाही. कधी तो बराच वेळ रिकामा असायचा, त्या वेळी पाठीमागे टेकून तो समोरच्या फांदीवर नजर लावून निश्चिंत झालेला असायचा. कसलीही परिस्थिती असो, चांभार स्वस्थचित्त असायचा - ना लोभ, ना खंत, असा त्याचा चेहरा. समोर आलेलं काम घिसाडघाईने त्याने उरकलं किंवा नाकारलं, असं क्वचितच व्हायचं. पैशासाठी त्याने कधी घासाघीस केलेली नव्हती. समोर टाकलेलं पायताण तो पाहून घ्यायचा. गिऱ्हाइकाच्या पायाखाली पोस्टर द्यायचा. अंगठा किंवा तळवा, जे काही असायचं, दुरुस्त करून पैशासाठी थांबायचा. गिऱ्हाईक आपलं पाकीट काढून पैसे मोजून द्यायला वेळ करायचं; पण चांभाराला घाई नसायची. पैसे कमी दिले तर हात उघडा ठेवून तो तसाच बघायचा. कधी गिऱ्हाइकाला वाटलं, तर तो आणखी द्यायचा किंवा तसाच पुढे निघून जायचा.

आपले सँडल्स दुरुस्त करवून घेताना, समोर अंथरलेल्या पोस्टरवर हिप्पी बसून राहिला. रंगीत पोस्टरच्या नटाच्या डोक्यावर आपण बसलो, हे पाहून त्याला गंमत वाटली. चांभाराला काही वाटू नये म्हणून तो पोस्टरवर बसला होता; नाही तर त्याला बसायसाठी कागदाची गरज नव्हती. त्याला उघड्या जागी बसायची सवय होती. इतकेच काय काही काळानंतर काटेरी शय्येवर बसण्याची सिद्धी त्याने प्राप्त करून घेतली असती. एखाद्या गुरूचा शोध घेऊन त्याला ते मिळविताही आलं असतं. त्याच्या भटकंतीमध्ये बनारसला त्याने काटेरी शय्येवर ध्यानस्थ बसलेले योगी पाहिलेले होते. गयेमध्ये असा हटयोगी होता, ज्याने आपल्या गालात खिळे घुसवून घेतले होते; त्याला काही झाले नव्हते. तो स्तब्ध बसून होता. कुंभमेळ्याच्या वेळेस अलाहाबादला गंगा-यमुनेच्या संगमावर लाखो साधू प्रार्थना करताना, स्नान करताना हिप्पीने पाहिलेले होते. या साधूंमध्येच, सोबत वाघाला बाळगून असलेला एक साधू होता. तो म्हणायचा ‘‘हा वाघ म्हणजे गेल्या जन्मातला हरवलेला माझा भाऊ होता.’’ काही जण भयंकर असे नाग दोरखंडाप्रमाणे बाळगून असत. तिथे अग्नी भक्षण करणारे, खिळे गिळून दाखविणारे, काटा-काचेचे तुकडे चावून दाखविणारे अनेक जण भेटले होते. काही योगी जळत्या चितेची पर्वा न करता शेजारी दिवसरात्र बसून राहायचे. एक प्रकारच्या धुंदीत, उपाशीपोटी हालचाल न करता... नेपाळमध्ये एका योग्याने त्याच्यासमोर हवेत हात फिरवून चार हातांच्या एका देवीची प्रतिमा काढून दाखविली होती. हिप्पीने ती प्रतिमा आपल्या थैलीत जतन करून ठेवली होती. अशा प्रत्येक प्रसंगात हिप्पीला अचंबा वाटायचा अन् तशी सिद्धी प्राप्त करून घ्यायची त्याची तीव्र इच्छाही व्हायची. इतकेच काय, केवळ थोडी भांग किंवा अफूच्या मोबदल्यात हिप्पीला हे शिकवायला काहीजण तयारही होते; पण शेवटी तो स्वत:शीच विचारू लागला, ‘‘ही अशी सिद्धी मिळवून मी काय करू? थोडक्या खर्चात चंद्रावर जाण्यासारखं आहे, त्यापेक्षा काही नाही!’’ त्याचं समाधान होईल अशी उत्तरं त्याला मिळाली नव्हती. मोठ्या रस्त्यांवर, खेड्यात-शेतात राबणारे स्त्री-पुरुष त्याने पाहिलेले होते. हे सगळे जण आपापल्या कामात विनातक्रार मग्न असायचे. हिप्पीला वाटायचं, यांच्याकडे असं काही तत्त्वज्ञान असावं, जे आपण शोधायला हवं. रेल्वे, बस, ट्रॅक्टरने हिप्पीने प्रवास केला. गाड्याने फिरला पायी भटकंती केली... कशामुळे? त्याला स्वत:लाही कळाले नव्हते.

चांभाराशी बोलायची त्याची इच्छा झाली. त्याने विडी पुढे केली. (सिगारेटमुळे माणसांत अंतर राहतं. त्याच्याउलट विडी ही अशी चीज आहे, जी माणसा-माणसांत हितसंबंध निर्माण करते.) चांभाराला थोडा संकोच वाटला. हिप्पी म्हणाला, ''घे, घे. तुला आवडेल. पोपट छाप विडी आहे...'' आपल्या बॅगेतून हिप्पीने काड्याची पेटी काढली. आता त्यांनी शांतपणे विडीचे झुरके मारले. विडीचा वास, धुराचे वेटोळे हवेत पसरले. रिक्षा, सायकली जवळून जात होत्या. आईस्क्रिमच्या गाडीवाल्याने आपला गाडा तिथून पुढे नेला; शाळेतल्या पोरांसाठी तो आपला रबरी पोंगा वाजवीत होता. विषयाला सुरवात करण्यासाठी म्हणून हिप्पीने झाडाकडे निर्देश करून त्याला म्हटले, ''तुझ्या अंगावर फुलांचा पाऊस पडतोय.'' चांभाराने ते पाहून आपला कोट झटकला. डोक्याचं पागोटं झटकून घेतलं. हे पागोट आता जीर्ण झालं असलं, तरी उन्हापावसापासून त्याचं संरक्षण व्हायचं. डोक्यावर पागोटं असलं की रुबाबही यायचा. हिप्पी पुन्हा म्हणाला, ''या पुष्पवर्षावाची कृपाच आहे तुझ्यावर दिवसभर; नाही का?'' चांभाराने वर पाहिले आणि कडवटपणाने त्याने विचारले, ''फुलांनी माझं पोट भरणार आहे का? ही फुलं घरी घेऊन जाऊन, बायकोला स्वयंपाक कर असं मी सांगू शकेन का? भरल्या पोटी जर फुलं पडत असतील तर ते वेगळं; त्यांच्यावर देव फुलं उधळू शकतो. माझ्यावर नाही...''

''तुझा देवावर विश्वास आहे का?'' हिप्पीने विचारले. प्रश्न ऐकून चांभाराला आश्चर्य वाटले... असा प्रश्न कसा काय पडू शकतो? कदाचित हा अगम्य माणूस आपल्याला चाचपीत असावा... याला सांभाळूनच उत्तर द्यायला हवे. चांभाराने समोरच्या देवळाकडे दृष्टिक्षेप टाकला. हातवारे करून तो बोलू लागला, ''कधी कधी तो आपल्याला दिसू शकत नाही. कसं शक्य असणार त्याला? त्याला नक्कीच भरपूर कामं असणार.'' देवाच्या मूर्तीकडे नजर टाकून चांभार गप्प झाला. मंदिरासमोर भाविकांची चांगलीच वर्दळ होती, त्याचे लक्ष विचलित होऊ लागले. चांभार सांगू लागला... ''आता आपल्या मोठ्या साहेबांचंच पाहा ना - कलेक्टर साहेबांचं; ते साहेब दिसतात सगळ्यांना; पण प्रत्येकाकडे ते लक्ष देऊ शकतात का- प्रत्येकाचं गाऱ्हाणं ऐकू शकतात का? सांगा ना! जर साहेबांची भेट एवढी कठीण असेल तर त्या देवाचे काय! त्याला तर केवढी कामं आहेत...'' चांभाराने वर पाहून चोहीकडे आपले बाहू फिरविले. हिप्पीच्या मनात ईश्वराची अगाध लीला आणि ईश्वराची करणी याबद्दल भावना दाटून आल्या. चांभार पुन्हा सांगू लागला, ''-आणि तो झोपूसुद्धा शकत नाही! आपले पंडित सांगतात ना, की देव आपले डोळे कधी मिटत नाही आणि ते देवाला कसं शक्य आहे? अहो, पापणीच्या एका उघडझापेमध्ये काहीही घडू शकतं, माहिताय का? ग्रह तारे एकमेकांवर आदळतील, आभाळातून आग- लाव्हारस पडेल किंवा पिशाच्चं-राक्षसं जागी होऊन सगळी मानवजात गिळंकृत करतील, बाप रे-सर्वनाश!''

देवाच्या नजरेची एकच उघडझाप अन् सर्वनाश! बाप रे! हिप्पीला त्या कल्पनेने अस्वस्थ वाटले. चांभार सांगू लागला, ''मी दररोज देवाला सांगत असतो. प्रत्येक तासाला सांगत असतो. जेव्हा त्याला क्षणभर उसंत मिळेल तेव्हा तो माझं गाऱ्हाणं ऐकेल. तोपर्यंत मला थांबावं लागणार आहे...''

''कशासाठी थांबायचं...'' हिप्पीने न राहवून विचारले.

''हा जन्म. इथनं मला घेऊन जाण्याची मी त्याला प्रार्थना करतो आहे; पण त्याची वेळच

यावी लागते. येईलच.''
''का... तुला इथे राहावं वाटत नाही का...''
''मला तुमचं एक समजत नाही'' असं म्हणत असतानाच चांभाराचे लक्ष रस्त्यावर एकाच्या पावलाकडे गेले. त्याने आवाज दिला- ''हे बघा, तुमच्या सँडल्सचं बक्कल निघालं आहे, थांबा!'' एका विद्यार्थ्याला चांभाराने आवाज दिला होता. त्याची पावलं रेंगाळली, तशीच निघून गेली. चांभाराने त्याच्याकडे वैतागाने पाहिले.
''पहा, ही तरुण पोरं! त्यांना फिकीर नाही. वाईट सवयी! तो घरी जाईपर्यंत त्याचं बक्कल निघून जाईल पाहा, मी सांगतो! तो पोरगा मग ती सँडल फेकून नवी घेईल.'' उसासा टाकून चांभार म्हणाला, ''विचित्र वागणं आहे पोराचं! पाच पैशांत दुरुस्त करून खरं म्हणजे वर्षभर ती वापरता येईल...'' बाजूच्या गोणपाटावरच्या वहाणा दाखवून तो म्हणाला, ''फेकून दिलेल्या वहाणा मी गोळा केल्या आहेत. अशाच पोरांनी फेकलेल्या. एखाद्या वेळी शाळेच्या रस्त्यावर अशा पायताणांचा खच राहील पाहा. तुटलेल्या चपला घरी घेऊन जायला त्यांना लाज वाटते का तेवढा धीर नसतो, देव जाणे! या वहाणा वेगवेगळ्या रंगाच्या आहेत अन् जोडीचीही नाहीत. त्यांना रंग देऊन, छाटून मी जोडी बनवितो त्यांतून.'' वेगवेगळ्या पायताणांचा एक जोड करण्याच्या आपल्या कसबीपणाचा चांभाराला अभिमान वाटला.
''ही पायताणं घेण्यासाठी देव एखादं गिऱ्हाईक पाठवितोच. घासाघीस करून त्याचे जे पैसे मिळतात, ते पुरेसे आहेत मला...''
''कोण घेतं असे जोडे?''
''अं! कुणीही. बांधकामाचे मजूर तर घेतातच. कसंही का होईना, मला दररोज पाच रुपये तरी कमवावे लागतातच. घरी जाण्यापूर्वी चुरमुरे किंवा तांदूळ घेऊन जावे लागतात. दोन भुकेली तोंडं वाटत बघत असतात घरी. काय दिवस आले पाहा- दोन वेळच्या जेवणाची मारामार. साधी विड्याची पानं पैशाला दोन मिळतात. ती आधी पैशाला वीस यायची आणि माझ्या बायकोला- जेवण नसलं तरी चालेल; पण पान खायला पाहिजेच... देव शिक्षा करतोय आम्हाला... मागच्या जन्मात मी नक्कीच व्याज-बट्ट्याचा व्यवसाय करून गरिबांना लुटलं असावं किंवा मी नफ्यासाठी तांदळाचा साठा गडप करून ठेवणारा दुकानदार असेन! माझा सगळा हिशेब चुकता होईपर्यंत देव मला इथे ठेवणार. मला फक्त वाट पाहायची आहे, बस!''
''तुला पुढला जन्म कोणता मिळावा असं वाटतं?''
अचानक चांभाराचं वागणं-बोलणं असं झालं, की तो जणू देवाला किंवा देवदूताला बोलतो आहे. थोडा वेळ विचार करून तो सांगू लागला, ''मला या जगात पुनर्जन्म नकोच आहे. कुणी सांगावं, मला ते नरकातही टाकून देतील; पण नरकही मला नको आहे.'' त्याने स्वर्गातलं ते चित्रच उभं केलं; जिथे माणसाच्या पापापुण्याचा ताळेबंद मांडला जातो.
''तू काय केलं आहेस?'' हिप्पीने विचारले.
देवाशीच बोलतो आहोत अशा आविर्भावात चांभार सांगू लागला, ''तुम्ही जेव्हा दारू पिलेली असता, तेव्हा आपण काय करतो आहोत याचं भान राहत नसतं.'' तो बोलण्यात मग्न झाला. -'' आता माझे हातपाय थकले आहेत; पण एखाद्याच्या तरुणपणीच्या

दिवसांत, तो आपल्या दुष्मनाची झोपडी पेटवून देऊ शकतो. त्या झोपडीत त्याची पोरं झोपलेली असली तरी त्याची पर्वा तो करीत नाही, माहिताय का? एखाद्या भांडणाचा शेवट असा होऊ शकतो पाहा! त्या माणसाने माझे पैसे लुबाडले. माझी बायको पळवून न्यायची धमकी त्याने दिली आणि संशयाने मी माझ्या बायकोला मारले होते, त्यात तिचा डोळा गेला! त्यावेळी आमच्याकडे पैसा होता आणि एका रुपयात तीन बाटल्या ताडी मिळायची. मला एक मुलगा होता; पण त्याच्या मृत्यूनंतर मी बदललो... आता जो मुलगा आमच्याकडे आहे, तो त्याचा आहे...''

''मला आता काही विचारायचं नाही.'' हिप्पी सांगू लागला,

''- पण मीसुद्धा गावं पेटविलेली आहेत. ज्यांना मी पाहिलं नव्हतं, ज्यांना ओळखत नव्हतो त्यांच्यावर बॉम्ब टाकले.''

चांभाराने चमकून विचारले, ''कुठे? केव्हा? कसे?''

हिप्पीने म्हटले, ''वेगळ्या रूपात- वेगळ्या जन्मात... आता पुढल्या जन्मी काय वाढून ठेवलं आहे, ते सांगू शकतोस का मला?''

चांभार म्हणाला, ''देवळाचा पुजारी येईपर्यंत तू थांबशील, तर तुला कळेल...ज्ञानी माणूस आहे तो, तो सांगेल आपल्याला...''

हिप्पी सांगू लागला, ''तू ज्याची झोपडी जाळून टाकलीस, त्याच्यावर तुझा राग तरी होता. मला तर हेही माहीत नव्हतं, की मी कुणाच्या झोपड्या जाळल्या... मी त्यांना पाहिलंही नव्हतं...''

''का, का केलंस मग हे...?'' तपशील सांगायला हिप्पी तयार नव्हता, तसं मग चांभार म्हणाला, ''त्या दिवसांत आपली भेट झाली असती, तर आपण दोघांनी दारू पिऊन जेवणही केलं असतं...''

''पुढच्या वेळेस...'' हिप्पी म्हणाला आणि निघण्यासाठी उठला. त्याने सँडल्स घातल्या. ''मी पुन्हा येईन,'' तो म्हणाला... खरं म्हणजे तो कुठे जाणार, कुठे थांबणार हे त्यालाही माहीत नव्हते. ठरल्याप्रमाणे त्याने चांभाराला पंचवीस पैसे दिले. त्याने मग आपल्या पिशवीतून ती चांदीची मूर्ती काढली आणि चांभारापुढे धरली. ''हे घे तुझ्यासाठी...''

चांभाराने ती हातात घेतली अन् तो आश्चर्याने म्हणाला, ''अरे! ही तर दुर्गामातेची मूर्ती! ती तुझं संरक्षण करेल. तू ही मूर्ती चोरलीस का काय...''

हिप्पीला चांभाराचा हा प्रश्न मोठा आवडला. स्वत:ची प्रतिष्ठेची प्रतिमा आता केव्हाच पुसून गेली हे दाखवून देणारा हा प्रश्न. त्याने उत्तर दिले, ''कदाचित, ज्याने ही मूर्ती मला दिलीय, त्याने चोरली असावी...''

''तुझ्याकडेच ठेव. ती तुझं संरक्षण करेल.'' चांभाराने ती चांदीची मूर्ती त्याला परत देत सांगितले... हिप्पी निघून गेल्यावर चांभाराने स्वत:शीच म्हटले,

''हूं! संधी मिळाली, तर देवसुद्धा चोरी करतो...''

❖ ❖ ❖

# भुकेला पोरगा

म्युनिसिपाल्टीच्या अतिउत्साही कमिटीने लेव्हल क्रॉसिंगच्या पलीकडे फुटबॉल ग्राउंडवर भरपूर लाईट्सची व्यवस्था करून, ओळीने दुकाने थाटून दिली आणि त्या जागेचं रूपांतर 'एक्स्पो 77-78' अशा प्रदर्शनात करून टाकलं. त्यांनी जाहिरात केल्याप्रमाणे या एक्स्पो मध्ये टाचणीपासून ते मोटारगाडीपर्यंत तुम्हाला काहीही मिळणार होतं. अर्थात मोटारगाडी म्हणून एकमेव असं 1930 चं फोर्ड मॉडेल तिथे होतं. तेसुद्धा लाईटच्या रंगीत माळांनी सजविलेलं आणि 'लकी' नंबरच्या तिकिटाला बक्षीस म्हणून देण्यासाठी ठेवलेलं होतं. या 'एक्स्पो'च्या बाजूला विशेष बसमधून माणसांची गर्दी दिवसभर उतरायची. प्रत्येक यार्डावर उभ्या केलेल्या खांबांवर लाऊड स्पीकर्स लावलेले होते आणि त्यांतून दिवसभर माणसांच्या गर्दीत फिल्मी गाण्यांचे, विक्रेत्यांचे कर्कश आवाज कालवले जायचे. आवाज, गोंगाट, कचरा-धुरळा याचं एक विचित्र जग तयार करण्यात ही 'एक्स्पो जत्रा' चांगलीच यशस्वी झाली होती.

रामनला या गर्दीचा कंटाळा आला होता अन् कानावर आदळणाऱ्या त्या आवाजांनी कानठाळया बसायची वेळ आली होती. आवाज बंद करण्यासाठी कानाला झडपा असत्या तर किती चांगलं झालं असतं, असं त्याला वाटलं - "अहाहा... मग मी किती मजेत हिंडलो फिरलो असतो. या टायगर बँड अंडरवेअरच्या जाहिरातीचं ओरडणं, हे कुणा मुर्खाचं घायाळ हृदय ओरडून सांगणारं फिल्मी गाणं - या सगळयातून मला मुक्ती मिळाली असती..." त्याला पुन्हा वाटू लागलं, मी इथे आलो ते आपला कंटाळा घालविण्यासाठी; पण ही गर्दी, हा वैताग, छे! इलॅमन स्ट्रीटकडून आपण इकडे आलो ती चूकच झाली आपली, असं त्याला वाटू लागलं; पण आता इथनं निघून जाणंही नको वाटू लागलं; कारण या गर्दीतला उत्साह त्याला स्वत:तून बाहेर काढू लागला होता; ज्याची फार गरज होती त्याला. तो आता गर्दीच्या रेट्यातून जणू वेडावाकडा वाहत चालला होता. एखाद्या बोर्डाकडे, एखाद्या पोस्टरकडे सराईत अन् व्यावसायिक नजरेने पाहत तो उभाही राहायचा. एका मोठ्या बोर्डावरच्या चित्राने त्याचे लक्ष वेधले होते - एका स्टॉलबाहेर लावलेल्या त्या बोर्डावर एक बाई रंगविलेली होती, तिचं अर्धं शरीर मासोळीचं होतं. हे चित्र आणि आणखी काही पोस्टर्स काढायला मिळाले असते, तर हे 'एक्स्पो' प्रदर्शन आपण अधिक सुरेख केलं असतं, असं त्याला वाटलं. एखादा दाता शोधला असता, तर चार पैसेही आपण कमावले असते... पण रामन अशात निराशेच्या मन:स्थितीत राहू लागला होता. कोणत्याही कामात त्याला रस वाटेनासा झाला होता. कित्येक महिने मार्केट गेटच्या आपल्या पेन्टिंगच्या दुकानाकडे तो फिरकलाही नव्हता. त्याच्यामुळे त्याचा प्रतिस्पर्धी जयराज खूश होता. "कमावू दे बिचाऱ्याला!" रामनला वाटायचं - "नाही तरी त्याची कलादृष्टी ही चिम्पांझी माकडाची आहे!" बोर्डावरच्या त्या मत्स्यकन्येकडे तो थोड्या नाराजीने, थोड्या आकर्षणाने पाहत उभा राहिला, त्या वेळी त्या बोर्डाखाली, 'शो'वाला माणूस हातात भोंगा घेऊन ओरडत होता- "या या! स्वर्गीय जलपरीला पाहायची संधी सोडू नका. पाण्यात उभी असलेली जवान पोरगी! तिच्याशी बोला, तुम्ही विचारा- ती उत्तर देईल, या या!"

‘‘कोणता प्रश्न विचारायचा तिला,’’ रामनने स्वत:लाच विचारले- तिला असं विचारावं का, की पाण्यात राहून तुला सर्दी कशी होत नाही; का तिच्या खवल्यांच्या शरीरावर कोणते कपडे शोभतील? आत जावं का नको अशा विचारात असतानाच सगळया गोंगाटाला ओलांडून केलेलं जाहीर आवाहन त्याच्या कानावर आलं ‘‘पाच वर्षांचा पोरगा! आपलं नाव गोपू असं सांगतो आहे, त्याच्या आईवडिलांसाठी रडतो आहे, सेंट्रल ऑफिसमध्ये संबंधितांनी ताबडतोब येऊन पोराला घेऊन जावे.’’ लाऊडस्पीकरवरून हे आवाहन चौथ्या वेळेस करण्यात येत होतं. मत्स्यकन्येच्या तंबूभोवती लावलेले अडथळे पार करून रामन तिकडे निघाला. हरवलेल्या पोराला पाहायचे ठरवून तो तिकडे जाऊ लागला, ‘‘हरवलेलं ते पोरगं कसं आहे ते पाहूया. त्याचे निष्काळजी आईबाप कसे आहेत... का त्यांनी जाणूनबुजून पोराला सोडून दिलं... कदाचित पोराला आईवडील नसतील किंवा क्रात्य पोरापासून सुटका करून घेण्यासाठी...’’ सेंट्रल ऑफिसमध्ये तो जाऊ लागला. वाटेत भली मोठी रांग होती. हे एक प्रदर्शन होतं. इथे काचेच्या भांड्यात ठेवलेले मानवी अवयव - हृदय, किडनी, फुप्फुस होते; तर एक जिवंत माणसाचा एक्स -रे पाहायला मिळणार होता. या प्रदर्शनाची रांग ओलांडून रामनला जावं लागलं.

रस्त्यात त्याने पाहिलं-चाकावर फिरत राहणाऱ्या एका वेटोळया भांड्यातून तयार होणारी, गुलाबी कापसासारखी मिठाई. त्याने ती विकत घेतली. आकाराने एवढी मोठी, पण वजन नसलेली, चवीला मोठी छान अशी ती मिठाई होती. थोडं खायला गेलं, की लागलीच तोंडाला चिकटू लागली - ‘‘पब्लिकमध्ये खायला विचित्रच आहे...’’ त्याला वाटलं. त्याने ती उंच अशी धरून ठेवली. जसं काही दुसऱ्यासाठी ती मिठाई आहे; पण मध्येच मोठ्या संतोषाने तो थोडं थोडं खाऊही लागला. ‘‘वा! भलतीच गोड!’’ त्याला आवडली. हातात पुष्पगुच्छ धरावा, तसं धरून, तोंडाला चिकटलेल्या मिठाईमुळे लोकांना ते विचित्र वाटत आहे, हे लक्षात घेऊन ‘एक्स्पो’च्या दक्षिणकडे तोंड करून असलेल्या सेंट्रल ऑफिसमध्ये त्याने प्रवेश केला. कार्यालयात माणसांची वर्दळ होती. टायपिस्ट आपल्या कामात मग्न होते. त्यांच्यामध्येच एका बाकावर बसलेलं पोरगं रामनला दिसलं. खालीवर पाहू लागलेलं, पाय हलवीत बसलेलं ते पोरगं. त्याच्या अशा हालचालीमुळे त्या बाकाचा आवाज होऊ लागला. शिवाय बाकाचे पाय व्यवस्थित नव्हते. त्या आवाजाने जवळ टेबलवर बसलेला कारकून वैतागून गेला होता. तो सारखा सांगत होता, ‘‘गप्प बस, गप्प बस. आवाज करू नकोस!’’ आणि गोबऱ्या गालाचं ते शेंबड पोरगं तात्पुरतं ऐकायचं आणि आपल्या, समोरच्या दातांची रांग-ज्यात दोन कमी झालेले-दाखवायचं. ‘‘पाच वर्षांचा नाही, सात वर्षांचा असेल हा’’ पोराकडे पाहून रामनला वाटले. त्याच्यासमोर रामनने अर्धवट खाल्लेली मिठाईची कांडी धरली आणि गुलेरमधून निसटलेल्या खड्याप्रमाणे पोरगं तिकडे धावलं. कांडी हिसकावून घेऊन त्या गुलाबी ढगात त्याने तोंड घातले. पोराच्या अशा उत्साहाचे रामनला कौतूक वाटले. त्याने पोराच्या डोक्यावर थोपटले. ऑफिसच्या त्या उद्धट कारकुनाने वर पाहून विचारले, ‘‘याला घेऊन जात आहात का तुम्ही?’’

‘‘होय’’ मागचापुढचा विचार न करता रामन पटकन् म्हणाला.

‘‘सही करा इथे!’’ एक रजिस्टर समोर धरून कारकून म्हणाला.

रामनने त्यावर गिचमीड अक्षरांत सही ठोकून दिली.
''तुम्ही तर अनाऊन्स करीत होता, तो रडतोय म्हणून?''
''पोरगा तसा नाहीय; पण आम्ही तसं अनाउन्स केल्याशिवाय आईवडील लवकर येत नाहीत. त्यांची सगळी कामं सारून, घरी जायची वेळ झाल्यावरच ते घेऊन जायला येतात. म्हणजे, तोपर्यंत ही कार्टी आम्ही सांभाळत बसावं, अशी त्यांची युक्ती असते! याची आई कुठे आहे?''
''तिकडे बाहेर आहे. वाट पाहत बसलीय.'' रामन म्हणाला अन् त्याने हात पुढे केला. पोराने लागलीच पकडला. ते दोघं बाहेर पडले आणि गर्दीत मिसळून गेले. पोराला घेऊन फिरवीत असताना रामनच्या मनात एकच शब्द घोळत होता, 'पोराची आई... ' त्या शब्दाने रामनला चाळवले. बाहेर आपली बायको वाट पाहत आहे, या कल्पनेने तो अस्वस्थ झाला. त्या उद्धट कारकुनाला ते खरेही वाटले होते. ''साहजिकच आहे,'' रामन स्वत:शीच म्हणाला, ''मी दिसतोच तसा-विवाहित, बायको असलेला. त्यात काही गैर नाही - एक असामान्य साईनबोर्ड पेंटर, बँकेत पुरेशी शिल्लक बाळगणारा, शरयूच्या किनाऱ्यावर स्वत:ची प्रॉपर्टी असलेला, एका दुकानाचा मालक असा...''
या स्वीकारलेल्या पोराखेरीज, त्याचं स्वत:चं मूल डेजीच्या पोटात असायलाच पाहिजे होतं. कुणी सांगावं, या क्षणीसुद्धा ती दावा करीत असेल, ''तुम्हीच मला गरोदर केलंत!'' आणि कुटुंबनियोजनाचा प्रचार करणाऱ्या, घराघरांत जाऊन त्यांच्या खासगी व्यवहारात लक्ष घालून, 'मुलं होऊ देऊ नका' असं सांगत फिरणाऱ्या बाईला हेच योग्य होतं. ती या बाबतीत कमालीची आग्रही होती अन् आपण मुर्खासारखे तिच्यामागे लागलो होतो! खरंच, तिची चूक नव्हती. गावातल्या भिंतीभिंतीवर कुटुंबनियोजनाच्या जाहिराती रंगविण्यासाठी ती आपल्या किती मागे लागायची! स्वत:बरोबर प्रवास करून राहायचा आग्रह धरायची आणि एवढ्या दुर्गम भागात प्रवास करणारी - तिच्यासारखी, अशा स्थितीत आपलं कौमार्य कसे काय सांभाळून ठेवणार होती! आणि तिचे असे प्रयत्न, तिचा असा प्रचार... खबरदारी घेऊनसुद्धा तिला दिवस गेलेच - तिला रामनच्या मदतीची गरज भासली, ही सगळी या शतकातली म्हणावी अशी केवढी विटंबना!... या विचारांनी रामन विचलित झाला. स्वत:शीच तो हसला. त्याचं बोट धरून चालणाऱ्या पोराने वर पाहिले अन् तोसुद्धा हसला. त्याच्या उत्साही चेहऱ्याकडे पाहून रामनने विचारले, ''काय झालं तुला हसायला?''
''मला नाही माहीत!'' पोरगा म्हणाला अन् पुन्हा हसला.
गर्दीतून पुढे जाणे अवघड झाले होते - विशेषत: या पोराच्या पावलांनी चालायला. शिवाय प्रत्येक खाद्यपदार्थाच्या स्टॉलसमोर पोराची पावलं रेंगाळत होती. या एक्स्पो प्रदर्शनात खाद्यपदार्थ-पेयांचे स्टॉल्स ठिकठिकाणी मांडलेले होते. भजे-पकोडे यांचे ढीग, वेफर्स-पापड तळत असलेली दुकाने... उकळत्या तेलात पाहता पाहता मोठा आकार घेणारी पापडं, शिवाय पाकाच्या कढईत दिसणारी सोनेरी जिलेबी या सगळ्या पदार्थांनी जाणाऱ्या-येणाऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. खमंग वासांनी चित्त आकर्षित करून घेतलं होतं.
आपल्यासोबत सारखं फिरत राहणाऱ्या या पोराबद्दल रामनला अचानक उमाळा दाटून

आला. ‘‘तुला काही खायचं का?’’ त्याने विचारले. ‘‘हो!’’ पोराने ताबडतोब उत्तर दिले. त्याने कापसासारख्या फुग्याच्या त्या गुलाबी मिठाईकडे बोट दाखविले. पोरगा गर्दीत पुन्हा हरवू नये म्हणून रामनने त्याचा एक हात धरून ठेवला होता अन् पोरगा दुसऱ्या हाताने काही खात तरी होता, नाही तर काही दाखवीत होता, हातवारे करीत होता. पोराने मिठाईला तोंड लावले अन् सगळ्या प्रदर्शनातून त्याचे लक्ष उडाले. मिठाई संपताच रामनने विचारले, ‘‘आईस्क्रिम?’’ पोराने लागलीच अधाशीपणाने मान हलविली आणि रामनने चॉकलेट-आईस्क्रिमचे दोन कोन आणले. पोरासोबत तो खाऊ लागला.

स्वत:चे कष्ट, वैताग याचा रामनला आता विसर पडला. सकाळ, दुपार, संध्याकाळ या कंटाळयाच्या चक्रात तो अडकलेला होता. त्यातून तो बाहेर आला. त्याने आता स्वत:लाच विचारले, ‘‘याला खूश झालेलं पाहिलं, की मलाही का बरं खुशी होते आहे? कोण आहे हा?... कदाचित मागच्या जन्मातला माझा मुलगा...’’ पोराला आता आणखी कसं खुशीत ठेवावं याचा रामन विचार करू लागला. ‘‘तुला आकाशपाळण्यात बसायचं का?’’ करकर आवाज करणाऱ्या, उंच आभाळात घेऊन जाऊन खाली फिरवत आणणाऱ्या त्या आकाशपाळण्याकडे पाहून पोरगं ताबडतोब तयार झालं. रामनने आकाशपाळण्यातल्या एका खुर्चीवर त्याला आपल्यासोबत बसवून घेतलं- ‘‘याला खाण्यापासून दूर ठेवायची ही चांगली आयडिया आहे...’’ रामनने विचार केला. त्याला पोराच्या प्रकृतीचाही विचार पडला होता. कारण पोराने पोट दुखायची तक्रार केली, तर त्याला अधिक खाऊ घातल्याबद्दल मोठा पश्चात्तापच झाला असता. आकाशपाळणा सुरू व्हायला वेळ होता आणि रामनला आता उदभवलेल्या परिस्थितीबद्दल विचार करायला सवड मिळाली. पोराला आपल्या आईबापांची काही फिकीर वाटल्याचे किंवा आठवण झाल्याचे दिसले नव्हते. कदाचित हा अनाथ पोरगा असावा, जो या प्रदर्शनाच्या गर्दीत भरकटला असावा... पण आता हा अनाथ नाही, ही कल्पनाच किती छान आहे! आता त्या मुलाला तो ‘बाबा’ किंवा ‘अप्पा’ म्हणायला शिकविणार होता. आकाशपाळणा जसा उंचावर गेला, तसे त्याचे विचारसुद्धा उंचावर गेले. पोराने त्याचे दंड गच्च धरून ठेवले होते. रामन त्याला सांगू लागला, ‘‘भिऊ नकोस, मी आहे ना! मजा वाटते ना?’’ लोकांनी जर त्याला विचारलं असतं, की हे पोरगं कोण आहे, तर तो त्यांना उत्तर देणार होता- ‘‘माझा मुलगा... तुम्हाला ती डेजी आठवते का? तिने याला तिच्या त्या विचित्र देशाच्या शाळेत घातले होते; पण मी त्याला तिथनं काढलं. पोरगं नेहमी घरच्याच वातावरणात वाढवायला पाहिजे; नाही का?’’ ‘‘त्याची आई कुठाय?’’ कुणी असं विचारणार... तो सांगेल - ‘‘मला नाही माहीत, ती कुणासोबत तरी पळून गेलीय.’’ डेजीने रामनला जो मन:स्ताप दिला होता, त्याचा बदला म्हणून तो असं सांगणार होता... इतके दिवस माझ्यासोबत ती झोपली अन् लग्नाच्या दिवशीच पळून गेली. रामनने अचानक पोराकडे पाहून त्याला विचारले, ‘‘तुझं वय काय आहे?’’ पोराने डोळ्यांची उघडझाप केली अन् मान हलविली. रामनने म्हटले, ‘‘सात वर्षांपेक्षा तुझं वय कमी नाही...’’ पण डेजी शहर सोडून गेल्याला दोनतीन वर्षंच झाली असताना, तिला सात वर्षांचं पोर कसं असू शकेल असं कुणी विचारलं तर... या प्रश्नावर त्याने स्वत:च मोठ्याने उत्तर दिले -

‘‘त्याचं उत्तर मला शोधावंच लागेल, बस!’’ यावर पोराने गोंधळून पाहिले आणि

विचारले, ‘‘हा पाळणा जोराने केव्हा फिरणार आहे?’’ रामणला हेच बरं वाटू लागलं होतं; पण पोरगं उतावीळ होऊ लागलं होतं. त्याचं लक्ष इतरत्र वेधण्यासाठी रामनने विचारलं -
‘‘माझ्यासोबत घरी येशील का तू?’’
‘‘मला भूक लागलीय.’’ पोरगं सांगू लागलं - ‘‘मला काहीतरी खायला पाहिजे.’’
पोराच्या भुकेचं आश्चर्य वाटून रामन म्हणाला, ‘‘तू माझ्यासोबत घरी आलास तर तुला सगळं काही खायला मिळेल.’’ पोरगा सावरून बसला. त्याने विचारले,
‘‘चॉकलेट, आईस्क्रिम, बबलगम - सगळं?’’
‘‘हो सगळं आणि भरपूर जिलेबीसुद्धा!’’
‘‘मला जिलेबी फार आवडते...’’ पोरगा म्हणाला. जिलेबीच्या विचाराने त्याला मोठा आनंद झाला. त्याने विचारले, ‘‘माझं मला घेऊन खाता येईल नं, का पुन्हा पुन्हा मागावं लागेल?’’
‘‘ते सगळं तुझ्यासाठीच राहील, बरं! तुला केव्हाही घेऊन खाता येईल!’’ रामन म्हणाला.
पोराच्या तोंडाला आता पाणी सुटले. ‘‘माझे बाबा म्हणतात, मी खाल्लं तर आजारी पडेन.’’
‘‘कुठायत ते?’’ पोराने नुसतीच मान हलविली.
‘‘या जत्रेत ते आहेत का इकडेतिकडे?’’
पोराला हा विषय काही आवडेनासा झाला. त्याला भीती वाटू लागली- हे सगळं अचानक संपेल, चॉकलेट, बबलगमचा साठा सोडून आता आपल्याला घरच्यांच्या हवाली करतील... रामन म्हणाला, ‘‘खरंच, तू जास्त खाऊ नकोस. तुझं पोट दुखेल.’’ ‘‘नाही, नाही, मला काही होत नाही.’’ पोरगा निग्रहाने बोलू लागला. ‘‘माझे काका येतात, तेव्हा मी किती खातो माहिताय का?’’ पोराने आपले दोनही हात पसरून दाखविले. पोराची अशी तब्येत पाहून रामनला बरं वाटलं. कारण जर का पोराला त्रास झाला असता, तर त्याला मालगुडीच्या दवाखान्यात डॉ. कृष्णाकडून इलाज करवून घ्यावा लागला असता. बाप रे! पोराच्या तशा आजाराची कल्पना रामनला सहन झाली नाही. कारण त्याच्याकडे पाहायला रामनच्या घरी कोण होतं? अर्थात रामनला पोरासाठी एक खोली स्वतंत्र ठेवावी लागणार. ती खोली, जी डेजीसाठी तयार करून ठेवली होती. डेजी या खोलीत दुसऱ्याच दिवशी राहायला येईल असं त्याला वाटलं होतं; पण ती आलीच नाही. आता या खोलीत पोरगा राहील. त्याचे कपडे, पुस्तकं, खेळाचं साहित्य... आणि तिथेच त्याचं अंथरूण-पांघरूण असेल. त्याला वाटू लागलं, पोरगं एकटं झोपेल, रात्री रडणार नाही, त्याला तसं शिकवावंच लागणार. स्वत:च्या दप्तराची, कपड्यांची काळजी घ्यायला शिकवावं लागणार. कला प्रायमरी स्कूलला या पोराला तो पाठविणार होता. शाळा तेवढी चांगली नसली, तरी शाळेची मुख्याध्यापिका रामनच्या ओळखीची होती. कारण रामनने त्या शाळेचा बोर्ड फुकटात करून दिला होता त्यांना. दोन बाय सहाचा बोर्ड, प्लास्टिक इमल्शन अन् चंदेरी पावडर वापरून तयार केलेला तो बोर्ड होता. रस्त्याच्या पलीकडे देवळापाशी ती शाळा होती. शाळेत एकटंच जायला अन् यायला त्याला तयार करावं लागणार होतं. दुर्दैवाची गोष्ट अशी राहील, की शाळा सुटल्यावर त्याला रिकाम्या घरीच परतावं लागणार होतं...

रामनच्या हृदयातून एक कळ निघाली. हे सगळं डेजीमुळे झालं होतं. नाही तर रामनची मावशी त्याच्यासोबत राहिली असती. तशी ती रामनच्या लहानपणापासूनच त्याच्याजवळ राहायची. ती अखेरपर्यंत त्याच्या सोबत राहिलीही असती; पण डेजीला अडचण वाटू नये म्हणून मावशीला बनारसला पाठवून देण्यात आलं होतं. खरंच... जेव्हा मावशी घर सांभाळायची, तेव्हा रामनला कसलीच काळजी राहायची नाही. जेवायला, फराळाला तो म्हणेल तेव्हा तयार करून द्यायची. दिवसभर घरी बसून राहायची. दिवस-रात्री केव्हाही रामन परतायचा, तेव्हा दार उघडायची. आता रामन बऱ्याच वेळा अर्धपोटी राहायचा. कॉफी करून घ्यायचापण त्याला कंटाळा यायचा. 'बोर्डलेस' हॉटेलमध्ये जाणंही त्याला नको वाटायचं. कारण तिथे त्याच त्याच गप्पा अन् कुत्सित बोलणं व्हायचं. जसं काही सगळी चूक रामनचीच होती. खरं म्हणजे डेजीच्या संशयखोर वागण्यातून, कुत्सित बोलण्यातून रामनने धडा घ्यायला पाहिजे होता.
दिवसामागून दिवस जात राहिले - कंटाळयाचे, रिकामपणाचे, कसलीच इच्छा नसलेले, निराशेचे असे... सकाळी जाग आली, की सगळा दिवस जणू गिळायला उभा राहायचा. रिकामं, भकास घर... या घरात कधी भरलेल्या तांदूळ-धान्यासाठी चिमण्यांचा घोळका यायचा, चिवचिवाट राहायचा. आता त्या सगळया उडून गेल्या, निघून गेल्या... घरात केवळ रिकामपण. कधी रामनला वाटायचं, आपलं हे जिवंत घर पाहता पाहता पुराण-वास्तू होत आहे, विराण होत आहे अन् आपण त्याचे साक्षीदार आहोत...
आता या पोरामुळे सगळी परिस्थिती बदलणार. त्याच्यामुळे सगळं घर उजळून निघणार. सगळया खोल्यांत तो आता भक्क दिवे लावणार होता. बरेच बल्ब निकामी झालेले होते. आता पित्याच्या भूमिकेत तो स्वत:ला उत्साहाने झोकून देणार होता आणि घरी येणाऱ्या पोराला एक सन्माननीय नागरिक घडविण्यासाठी त्याचं संगोपन करणार होता. डेजी गेल्यापासून त्याचे धंद्याकडे दुर्लक्ष झाले होते. आता तो त्याच्या नेहमीच्या ग्राहकांना भेटणार होता. साईन बोर्ड रंगविणार होता. सगळी कमाई पोरासाठी खर्च करणार होता. पुढे, पोराला उटीच्या लव्हडेल बोर्डिंगमध्ये ठेवायची त्याची तयारी होती. तो पोराला म्हणाला, ''तू शाळेत मग... तिथे तुला बरेच मित्र मिळतील... ती फार छान जागा आहे...'' हे ऐकलं, की पोराचा चेहरा उतरला. तो निग्रहाने सांगू लागला, ''मी नाही जाणार शाळेत. मला नाही आवडत!''
''का?''
''का म्हणजे - ते मला मारतील म्हणून'' त्याची भीती घालवावी म्हणून रामन समजावू लागला; पण पोरगा हट्टी होता आणि रामन सांगू लागला तसं डोळयात पाणी आणून तो म्हणाला, ''नाही, नाही, शाळा नको!'' ''बरं बरं, तू शाळेत जाऊ नको! आता चल आपण चॉकलेट खाऊ.'' पडतं घेऊन रामन म्हणाला आणि चेट्टीयार स्टोअर्समधून त्याने चॉकलेट्स घेतली. रामनने मग स्वत:चीच समजूत घातली- ''वेळ लागेल त्याच्यासाठी. असं घाई करणं योग्य नाही. त्याला त्याच्या सोईने वळविता येईल. आपल्यालासुद्धा कुठे शाळेची गोडी होती लहानपणी...''
आकाशपाळण्यानंतर आता पोराला आगगाडीत बसायची इच्छा झाली. मैदानात वर्तुळाकार फिरणारी आगगाडी. एक चक्कर झाल्यावर गाडी थांबली; पण पोरगा खाली

उतरायला तयारच नव्हता. आणखी एक चक्कर- आणखी एक चक्कर असं त्याचं चालूच होतं. चार चकरा झाल्या, तरी गाडीतून उतरायला पोरगा तयार नव्हता. रामनलासुद्धा त्याच्यासोबत गाडीत बसून फिरायला छान वाटलं होतं. त्यामुळे काहीवेळ का होईना, डेजीचा विसर पडला होता. आगगाडीतून फिरल्यावर आणि आणखी खाणं झाल्यावर रामनला खरं म्हणजे पोराचे आभार मानावे वाटले. कारण सकाळपासून रामनने काही खाल्ले नव्हते आणि पोराच्या निमित्ताने आता हे -ना-ते तो खातच राहिला होता. रामन आता मोठ्या खुशीत आला होता. ‘‘पोराची संगत म्हणजे एक प्रकारचं टॉनिकच झालं की मला; चांगलाच उत्साह वाटत आहे’’ तो स्वत:शीच म्हणाला आणि आता तर त्याच्यासोबत राहायचं म्हणजे केवढी आनंदाची बाब! आता कामातून उरलेला सगळा वेळ रामन या पोरासोबत खर्च करणार होता. त्याला आता पोरासाठी गोष्टीची पुस्तकं वाचून दाखवायची होती. रामायणातल्या गोष्टी सांगायच्या होत्या.

एका मोठ्या कढईत तळत असलेल्या भज्यांच्या दुकानासमोर पोराची पावलं थांबली अन् रामन निग्रहाने म्हणाला, ‘‘नको, नको बेटा...’’ त्याला भीती वाटू लागली, की आता त्याच्या पोटात काही पडलं तर याला उलट्या होतील. त्याचा घसासुद्धा खरखर करू लागला होता. थोडी मळमळ वाटत होती. भजे घ्यायच्या ऐवजी रामनने त्याला काही शो दाखविण्यासाठी नेले : सर्कस करणारा पोपट किंवा पिसलेल्या पत्त्यांतून पत्ते काढणारा कुत्रा, मृत्युगोलात फिरणारा फटफटीवाला... पोरगा आनंदाने ओरडू लागला.

संधी मिळाली, की पोरगा वेगवेगळ्या खोड्या करून दाखवू लागला : त्याने फुलांच्या कुंड्यांना धक्का मारला, पोस्टर्स फाडली, मोकळी जागा मिळाली, की कोलांटउड्या मारू लागला, येणाऱ्या-जाणाऱ्या पोरांवर कारंजाचं पाणी उडवू लागला, कधी स्वत: हात सोडवून घेऊन त्याच्या वयातल्या पोरांना पायात पाय टाकून खाली पाडायचा, तर कुण्या पोरीच्या वेणीची शेपटी ओढायचा. रस्त्याचे खडे उचलून लाईट बल्बकडे तो फेकू लागला. रामनने तसे त्याच्यावर नियंत्रण ठेवले होते; पण तरीही पोराच्या खोड्या पाहून मनातून त्याला मजाही वाटू लागली. या लहानग्या पोराचे असे विविध उच्छाद आणि खोड्यांचे त्याला कौतुक वाटतानाच, याच्या अशा खोड्यांमुळे आपल्याला मार खावा लागतो की काय, याची चिंताही वाटू लागली. तो स्वत:ला बजावू लागला, ‘‘पोरांचा हा नैसर्गिक उत्साह असतो. याला शाळेत घातलं, की वळण लागेल. आपल्या देशात पोरांच्या नैसर्गिक वृत्तीला बाधा न आणता कसे वळण लावावे, हे कुणाला माहीतच नाही.’’

आता हे दोघे ‘मेरी-गो-राउंड’जवळ आले होते. ‘‘मला त्या घोड्यावर बसायचं आहे.’’ इतर पोरं त्या झूल लावलेल्या घोड्यांवर बसलेली पाहून पोराने म्हटले. रामनला आता त्याची काळजी वाटू लागली - हा एकटा त्या घोड्यावर कसा काय बसेल? त्याला ते आवडले नाही. तो म्हणाला, ‘‘आताच तू त्या आकाशपाळण्यात बसला होतास ना, तसंच आहे हे.’’

‘‘नाही’’ पाय आपटत हट्टाने पोरगा बोलू लागला - ‘‘मला त्या घोड्यावर बसायचे आहे.’’

आता रामनला पेच पडला. त्याला कळेना, काय करावे. त्यातून पोराचे लक्ष इतरत्र वेधावे म्हणून रामनने त्याला काही खाण्याचे आमिष दाखविले. पण पोरगा म्हणाला, ‘‘खाऊ घेऊ या - पण घोड्यावर बसल्यानंतर!’’

‘‘अरेए बघ बघ, तिकडे सिनेमा दाखवीत आहेत, चल!’’ रामन एकदम उत्साहाने ओरडला

आणि माणसांच्या गर्दीकडे पोराने कटाक्ष टाकून मान हलविली. रामनने म्हटले, "तुला मी उचलून घेईन, म्हणजे तुला सगळयांपेक्षा चांगलं पाहता येईल."

पोरगा हट्ट करीत होता, "मला त्या घोड्यावर बसायचे आहे..." पण रामनने त्याला अधिक बोलू न देता, खांद्यावर घेतले. म्हणाला, "नंतर पाहू. आता हे बघ. किती वाघ आहेत, माकडं आहेत त्या सिनेमात... आधी हे पाहा..."

पोरगा चांगलाच धडधाकट होता. वहाणा नसलेल्या त्याच्या पायांच्या धुळीने रामनचे कपडे मळू लागले. इतकेच काय पोरगं हातपाय झाडू लागलं; पण रामनने निग्रहाने त्याला 'मेरी गो राउंड'पासून दूर घेतले अन् सिनेमासाठी त्याला उंच धरून ठेवले. एवढ्या श्रमाने रामनला दम लागला. समोरच्या माणसांच्या दाटीतून रामनला केवळ सिनेमाच्या दृश्यांचे तुकडे दिसू लागले. सिनेमा कोणता आहे याचा त्याला अंदाज आला नाही; पण आपण म्हटल्याप्रमाणे यात वाघ-माकडं असतील असं त्याला वाटलं. पोराला आपल्याबद्दल विश्वास वाटायला पाहिजे. "काय दिसतंय तुला?" त्याने पोराला विचारले. पोराने त्या उंचीवरून म्हटले, "माकड नाही. एक माणूस बॉल खेळतोय. मला बॉल घेता का?"

"हो, तुला मी घेऊन देईन" रामन म्हणाला- "आपण इथून निघताना बॉल घेऊया" जत्रेत कुठेतरी रामनने प्लास्टिकच्या खेळण्यांनी गच्च भरलेले दुकान पाहिलेले होते. ते दुकान शोधून तो दोन बॉल्स खरेदी करणार होता; एक हरवला तर दुसरा असावा म्हणून.

पण जेव्हा उंचावरून पोराने काहीतरी पाहिले आणि मोठ्याने तो ओरडला, "अम्मा!" तेव्हा रामनच्या सगळया योजनांना जणू धक्का बसला. पोराने धडपड करून स्वत:ची सुटका करून घेतली, रामनच्या खांद्यावरून तो उतरला आणि गर्दीत गोळी सुटल्यासारखा तो धावला. जत्रेतल्या लाईफ इन्श्युरन्सच्या स्टॉलजवळ गर्दी नव्हती; तिथेच हिरवळीवर बसून राहिलेल्या लोकांत पोरगा मिसळला. रामन त्याच्या मागे धावला. त्या लोकांत एक उंच-धडधाकट वाटावा असा एक माणूस होता, करड्या रंगाच्या साडीतली एक मध्यमवयीन बाई आणि तिच्यासोबत दोन पोरी होत्या. त्यांच्यासोबतचं सामान, गाठोडी पाहून ध्यानात येत होतं, की जत्रेची सहल करून आता रात्रीच्या मुक्कामाच्या बसने ते आपल्या गावाकडे जाण्यासाठी निघाले आहेत. एखाद्या बाणाप्रमाणे धावत पोरगा त्यांच्यात मिसळला. सगळयांनी पोराला घेरले, जवळ घेऊन विचित्र तऱ्हेने त्याला विचारू लागले, बोलू लागले. त्या माणसाने रागात पोराला विचारले, "तुझ्यामुळेच आमची बस चुकली, हरामखोर! कुठे होतास तू?" आणि रामनने पाहिले, पोराचा कान पिळून त्या माणसाने पोराला थप्पड मारली. "अरे, अरे," म्हणत रामन धावला. "मारू नका," तो त्यांच्यावर ओरडला. माणसाने पुढे मारायच्या आधीच पोराची आई मध्ये पडली आणि त्याच्यावर ओरडत तिने पोराला बाजूला घेतले.

रामनच्या लक्षात आले- हा आपल्या स्वप्नाचा शेवट आहे. तो बाहेर पडला आणि शरयूच्या किनाऱ्यावर असलेल्या आपल्या घराकडे तो परतला.

❖ ❖ ❖

# एमडेन

ते जेव्हा शहरातले सर्वांत वृद्ध गृहस्थ म्हणून प्रसिद्ध झाले, तेव्हा राव यांचे वय नव्वद ते एकशे पाच या दरम्यान हिशेबात घेतले गेले होते; तथापि त्यांनी आपल्या वयाची मोजदाद करणं आपल्या ऐंशीव्या वयानंतर सोडून दिलं होतं. ऐंशीवा वाढदिवस म्हणजे एक वैतागाचा समारंभ झालेला होता त्यांच्यासाठी. त्या वेळेस सगळीकडून रावांच्या नातेवाइकांचे जणू मोहोळ जमलेले होते; त्या धार्मिक समारंभात ते सहभागी झाले होते. त्यांचा हा वाढदिवस समारंभ बँड लावून वाजतगाजत साजरा करण्यात आला होता. त्यातला, धार्मिक म्हणवला जाणारा भाग एवढा थकविणारा होता, की त्यानंतर पंधरा दिवस तापेमुळे राव अंथरुणाला खिळून होते.

...त्या दिवशी त्यांना थंड पाण्याने डोक्यावरून स्नान घालण्यात आलं होतं. हे पाणी म्हणे पवित्र नद्यांचं एकत्रित केलेलं असं होतं आणि त्यांना उपवास करण्यासाठी भाग पाडण्यात आलं होतं; नातेवाइकांनी स्वत: मात्र मेजवानीवर ताव मारला होता. दिवसभराच्या या श्रमांनी राव एवढे थकून गेले होते, की ग्रूप फोटोच्या वेळेस त्यांना हवी तशी पोज देता आली नव्हती. खुर्चीवर एवढ्या मरगळलेल्या अवस्थेत ते बसून होते, की फोटोग्राफर वैतागून गेला. आपल्या कॅमेऱ्याच्या त्या काळ्या बुरख्यातून तोंड बाहेर काढून तो सारखा सूचना देत होता, सांगत होता - ''स्टेडी प्लीज्.'' शेवटी तर म्हाताऱ्याला व्यवस्थित बसविलं नाही, तर निघून जातो - अशी धमकी त्याने दिली. राव यांच्याशी इकडून-तिकडून नाते असणारे, वंशावळीचे एकूण पंच्याहत्तर जण फोटोसाठी जमले होते. फोटोग्राफरची धडपड होती, की हा जमाव दोन भागांत घेऊन फोटो काढावेत. नाही तर एकाच फोटोत सगळ्यांचे चेहरे एवढे लहान लहान असतील, की ओळखायला येणार नाहीत. म्हणजे, याचा अर्थ असा झाला, की म्हातारबुवांना आपल्या त्या खुर्चीत दोन वेळा बसवावं लागणार होतं. राव जेव्हा याची तक्रार करायला लागले, तेव्हा सगळयांनी समजूत घातली, ''हा मोठा अन् महत्त्वाचा समारंभ आहे - तुम्हाला दीर्घायुष्य लाभावं म्हणून...''

''मला तर असं वाटायलंय, की म्हाताऱ्याला लवकर संपवायचाच हा कार्यक्रम आहे...'' राव असं पुटपुटू लागले, त्यावर त्यांची मोठी कन्या - जी स्वत:च साठीच्या पुढे गेलेली होती, तिने दटावले होते, की जेव्हा सगळीजणं एवढी मदत करीत आहेत, तेव्हा असं अभद्र बोलू नये...

वाढदिवस सोहळा आटोपून दोन भागांतले ग्रूप फोटो भिंतीवर स्थानापन्न होईपर्यंत सगळं घर शांत झालेलं होतं, सुरळीत झालं होतं. एकूण वीस जणांचं कुटुंब असलेलं हे घर; यात रावांची तीन मुलं, त्यांचे कुटुंबीय आणि भाचे, पुतणे यांचा एकत्र असा गोतावळा दाटलेला होता. उजव्या बाजूला रावांची एक स्वतंत्र खोली होती, जी त्यांनी मागच्या शतकातली वाटावी अशी बांधून काढलेली होती. विनायक स्ट्रीट भागातली ही एवढी लांबलचक जागा खरेदी करणारे राव हे पहिलेच गृहस्थ होते. त्या दिवसांत ही खरेदी धाडसाचीच होती. कारण हा सगळा जमिनीचा पट्टा जंगलातलाच होता. चोरी, मारामारी करणारे, अगदी दिवसाच्या उजेडातसुद्धा अगदी सहज जंगलात निसटून जायचे. ही जागा मग विकसित

करून इथे घरं बांधण्यात आली आणि या जागेला रत्नापुरी असं नाव देण्यात आलं - रत्नांचं गाव.
रावांनी सुरवातीची वर्षं कबीर स्ट्रीटमध्ये काढली होती. जेव्हा ते स्वत:च्या पायावर उभे राहिले; तेव्हा त्यांनी प्रतिष्ठेत राहायचं ठरविलं आणि तिकडची जुनी जागा विकून ते रत्नापुरीला आले. तोपर्यंत त्यांच्या दुसऱ्या बायकोने चार मुलींना जन्म दिलेला होता अन् चौथी मुलगी लग्न होऊन निघूनही गेलेली होती. आपल्या पहिल्या बायकोचं सगळं लटांबर घेऊन ते आले होते. त्यात वेगवेगळ्या वयाची आठ पोरं होती. लग्नसंबंधांसाठी रावांचे ग्रह ठीक नव्हते. त्यांच्या चुलत्यांनी सगळ्या कुटुंबाची पत्रिका तयार केलेली होती, ती वाचून ते सांगायचे, रावांना सातव्या स्थानातला मंगळ आहे अन् त्या मंगळाची शांती करणारा कोणताही ग्रह त्यांच्या कुंडलीत नाही आणि त्यामुळे त्यांना पत्नीसुख नाही. तिसरं लग्न आणि आणखी अपत्यं; यानंतर मंगळाच्या वक्रदृष्टीतून राव मुक्त झाले. घरातल्यांची मोजदाद रावांनी कधी ठेवली नाही. ते त्यांचं कामही नव्हतं. घरातला गोतावळा आवरणं, घर चालविणं रावांच्या पोरांकडेच असायचं. सगळ्या व्यवहारांपासून त्यांनी स्वत:ला एवढं बाजूला करून घेतलेलं होतं, की दोन वर्षांपूर्वी साजऱ्या झालेल्या त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवस समारंभात त्यांना पोरांची नावं कळेना झाली. कोण कोणाचे अन् घरातले कोण, काहीच समजले नव्हते.
ऐंशीवा वाढदिवस रावांच्या आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा होता. शारीरिक क्षमता मंदावत चालल्या होत्या, तरी ते व्यवस्थित आणि स्वयंपूर्ण असे राहायचे. प्रकृतीच्या तक्रारीबद्दल त्यांना चांगली समजही आलेली होती. ‘‘मला दिसायला-ऐकायला कमी आले तरी हरकत नाही. काही बिघडणार नाही. माझे पाय मला घेऊन जायला समर्थ आहेत आणि मी स्वत: कुणाच्या मदतीशिवाय तोंड धुऊ शकतो, आंघोळ करू शकतो... मी चांगलं जेऊ शकतो, पचवूही शकतो.’’ त्यांच्या घरी डायनिंग टेबल होता, तरी त्यावर जेवायला बसायचं राव नाकारायचे. खाली पाटावर बसून- केळीच्या पानावर बसून जेवायची त्यांची जुनी सवय त्यांनी कधी सोडली नाही. घरात त्यांची देखभाल अगदी विनासायास व्हायची. न सांगता-सवरता. घरात सतत सुनबाई किंवा नात-नातू असं कुणी ना कुणीतरी त्यांची विचारपूस करायचं, काही कमी पडू द्यायचं नाही. स्वत: रावांनी कधी कशावर प्रतिक्रिया दिली नाही किंवा कधी काही विचारलं नाही - विशेषत: प्रश्न केले नाहीत. कारण, त्यांना माहीत होतं, विचारलेल्या प्रश्नाला उत्तर म्हणून ते रावांच्या डाव्या कानाजवळ येऊन, घसा खरवडून मोठ्याने सांगतील किंवा कानाजवळ येऊन सांगतील, तर कळेलसुद्धा; पण त्याची त्यांनी कधी फिकीर केली नाही. एक समर्थ आयुष्य जगून त्यांनी निवृत्ती घेतलेली होती. त्या दोन भागांतल्या फोटोतल्या प्रत्येकासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे रावांनी कष्ट घेतले होते. आयुष्यभर कष्ट करून जम बसविला होता. त्यांच्या नातवंडांपैकी काहीजण एका वेळी त्यांच्या फार लाड-कौतुकातले होते; पण ते आता मोठे झाले होते, नेमके कोण होते हेही लक्षात नव्हतं आणि त्यांची नावं- बाप रे! त्यामुळेच तर रावांच्या बोलण्यात अडथळा यायचा. नावं जिभेवर असायची; पण उच्चार करायला गेलं - बोलायला गेलं, की नेमकं दगा द्यायची. अशा प्रकृतीमुळे माणूस घाईने बोलतो, तोतरं बोलतो, अर्धवट बोलतो; पण ही अशी स्थिती रावांना सोईची झाली होती - उतारवयात

निश्चिंत करणारी मन:स्थिती.

दुपारी राव मोठ्या निवांत स्थितीत विचार करीत बसायचे. या वेळी त्यांची वामकुक्षी झालेली असते. मोठ्या कपात दिलेली कॉफी संपविलेली असते (जी बरोबर तीन वाजता घरात त्यांची देखभाल करणाऱ्यांपैकी कुणीतरी दारामागे टीपॉयवर आणून ठेवलेली असते.) कॉफी घेऊन तरतरी यायची; मग पश्चिमेकडच्या खिडकीसमोर आपल्या इझी चेअरवर बसून, सकाळी आणून ठेवलेला पेपर उघडायचे - सगळ्यांनी वाचून झाल्यावर तो इथे आणून ठेवला जायचा. पेपर जवळ धरून ते वाचायचे. खुर्चीच्या हाताला बांधलेल्या सिल्कच्या कपड्याने ते चष्मा पुसायचे. अशा तऱ्हेने, मोठ्या सैलमानाने अर्धवट वाचन, अर्धवट चिंतन व्हायचं. पेपरमधल्या सगळया राजकीय किंवा कुरापतखोर चर्चा-कृती, सगळया त्यांना शिळया वाटायच्या- जगाच्या सुरवातीपासूनच त्यांचं हे असं चालत आहे असं रावांना वाटायचं. त्यांची नजर इतरत्र फिरायची. कधी एखाद्या जाहिरातीकडे त्यांचं लक्ष जायचं. (जाहिरात म्हणजे काय - सगळया छछोर गोष्टींसाठी पैसा वाया घालविण्यासाठीचं ते निमंत्रणच असायचं.)... किंवा कुणाच्या निधनाचे वृत्त. (त्यातसुद्धा कुणी ओळखीचं नसायचं.) तथापि, पेपरच्या शेवटच्या पानावरच्या कॉलमकडे मात्र त्यांचं लक्ष असायचं. इथे दररोज मद्रासला झालेल्या आध्यात्मिक / धार्मिक उपक्रमाचा वृत्तांत असायचा. संक्षिप्तच असायचा; पण ईश्वराबद्दलचे विचार, त्याची कृपा, पाप-पुण्याच्या गोष्टी घासूनपुसून ठेवण्यासाठी तेवढं पुरेसं असायचं. यावर थोडा विचार करून, मग राव तो पेपर पुन्हा जिथे होता, तिथे ठेवून द्यायचे.

घड्याळात चाराचे टोल पडले, की मग राव धडपडून खुर्चीतून उठायचे. बाहेर फिरायला निघण्यासाठी त्यांची तयारी व्हायची. दिवसाची ही वेळ रावांसाठी मोठी रोमांचक असायची. तोंड धुऊन ते तयार व्हायचे. गुडघ्याच्या खालपर्यंत येणारा झब्बा घालायचे. धोतर बदलायचे. खांद्यावर वेलबुट्टीची शाल घ्यायचे आणि आपली काठी अन् छत्री घेऊन ते बाहेर पडायचे. हॉलमधून जाताना कुणीतरी त्यांना पाहायचं अन् मोठ्या काळजीने त्यांना सांगायचं, ‘‘काळजी घ्या. तुम्ही टॉर्च घेतला का? रोजच्याएवढंच फिरा. लवकर परत या.’’ राव मान हलवायचे अन् निघायचे. एकदा बाहेर पडलं, की मोठ्या काळजीने ते चालायचे. काठीने चाचपत जमिनीच्या चढउताराचा अदमास घेत त्यांचं चालणं व्हायचं. आता त्यांच्या आयुष्यातलं एकमेव उद्दिष्ट राहिलं होतं, ते म्हणजे, पडायचं नाही. एखादं पाऊल निसटून पडलं, की मग झालं. संपलं! शरीर, मनाचा समतोल अन् ताठपणा जोपर्यंत शाबूत आहे, तोपर्यंत दीर्घआयुष्य शक्य आहे. या अशा नियंत्रणाने त्यांना गोगलगाईसारखी चाल अन् निश्चित अंतराची चक्कर रोज सायंकाळी करावी लागायची. गेटच्या बाहेर पडलं, की अगदी डावी बाजू धरून राव चालायचे- विनायक स्ट्रीटकडून कबीर गल्ली अन् तिथनं मार्केट रोड. रावांना वर्दळ आवडायची. मार्केटरोडची ती गर्दी, ती वाहतूक आवडायची. दुकानांत येणाऱ्या-जाणाऱ्या स्त्री-पुरुषांकडे पाहत ते उभे राहायचे. क्वचित खरेदीही करायचे. अशात त्यांनी केलेली खरेदी म्हणजे घरातल्या कुणातरी पोरासाठी घेतलेले रंगीत खडू आणि ड्रॉइंगची वही होती. स्वत:साठी म्हणून ते विशिष्ट छापाचे दंतमंजन घ्यायचे. (अजूनही त्यांचे बरेच दात शाबूत होते.) त्यासाठी ते मार्केटरोडच्या कडेला असलेल्या चेट्टीयारच्या दुकानात जायचे. तिथून इलॅमन स्ट्रीटसाठी रस्ता फुटायचा. दुकानासमोरून

राव जायचे तेव्हा दुकानदार हमखास विचारायचा, ‘‘कसे आहात?’’ ‘‘आज काही घ्यायचंय?’’ राव मान हलवायचे आणि दुसऱ्या बाजूसाठी रस्ता ओलांडायचे - इथनं त्यांचा परतीचा मार्ग सुरू व्हायचा. घराकडे नेणारा. हे सगळं फिरून व्हायला रावांना दोन तास लागायचे. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ते घरी गेटवर पोचायचे. अचानक अंधार पडला किंवा असं काही झालं तर सोबत राहावा म्हणून टॉर्च घेतलेला असायचा; पण त्या टॉर्चचा वापर करायची कधी वेळ आली नाही. मार्केट गल्लीचा रस्ता तसा वर्दळ नसलेला, निवांत राहायचा; पण तिथनं रस्ता ओलांडणं रावांना नेहमीच नकोसं वाटायचं. कारण, आपल्या लहानग्या फोटो प्रेमच्या दुकानातून जयराज हमखास आवाज द्यायचा, ‘‘काय ग्रॅन्ड मास्टर! मी येऊ का मदतीला?’’ राव सौम्यपणाने; पण निग्रहाने ‘नाही’ म्हणायचे अन् सावकाश निघायचे. मार्केट गेटपाशी ठेच लागू नये म्हणून काळजी घ्यावी लागायची अन् अशा वेळेस जयराजसारख्यांशी बोलायला सवड नसायची. राव निघून गेले, की वायफळ बोलायची आवड असलेला जयराज मग आपल्या दुकानातल्या गिऱ्हाइकाला त्यांच्याबद्दल सांगत राहायचा - ‘‘पाहा! या वयात गर्दीत अशा तऱ्हेने हा माणूस असा फिरतो, जसं काही तो अगदी जवान आहे! यांचं वय नक्कीच एकशे दहा असावं! बघा, कसे बेफिकीर वाटतात! या वयात त्यांना असं फिरणं चांगलं नाही. विचित्रच माणसं आहेत यांच्या घरातली. या दिवसांत असं फिरणं सुरक्षित नाही बरं! या लॉरी, सायकली, रिक्षा... एखादे दिवशी गचकायचे - मी सांगतो!’’

‘‘कोण आहेत ते?’’ कुणी क्वचित विचारायचा- या शहरात नवीनच आलेलं ते गिऱ्हाईक असायचं. त्याने फ्रेमसाठी काम आणलेलं असायचं. आम्ही त्याला एमडेन म्हणायचो. आम्ही लहान होतो, तेव्हा त्यांना फार भ्यायचो. कबीर स्ट्रीटला कुठेतरी ते राहायचे. भक्कम, उंच आणि आक्रमक अशी त्यांची तब्येत होती. खाकी गणवेश, डोक्यावर लाल फेटा आणि छातीला लावलेली सगळ्या प्रकारची पदकं अशा रुबाबात ते सायकलवरून जायचे. आम्हाला तर त्यांच्या ड्रेसवरून ते पोलिस इन्स्पेक्टर वाटायचे. त्यांचा हा युनिफॉर्म एक्साईज डिपार्टमेंटचा आहे, हे आम्हाला कुठे माहीत होतं? ते वागायचेही पोलिसासारखेच. त्यांना न आवडणारं असं काही कुणी करू लागलं, की ते गल्लीतून त्याचा पाठलाग करायचे, पाठीवर छडीने मारायचे! आम्ही पोरंसोरं मार्केटमध्ये जमलेलं पाहिलं, की ते आमच्यावर रागवायचे. घरी जायला सांगायचे. एकदा अॅडम स्ट्रीटच्या शाळेच्या पाठभिंतीकडे आम्ही लघवीला उभे होतो, तर आम्हाला यांनी धरलं की! आम्ही नेहमीच तिथे लघवी करायचो ना! पण हे रागारागात ओरडतच आमच्यावर धावले. आमच्यातल्या चौघांना धरून आम्हाला अगदी हाडं खिळखिळी होईपर्यंत हलवून काढलं; आम्हाला धरून हेडमास्तरकडे त्यांनी नेलं आणि दरडावून त्यांना विचारलं, ‘तुम्ही काय करताहात हेडमास्तर? पोरांना हेच शिकविता का? का त्यांना गटारातली गलीच्छ पोरं करायचा तुमचा इरादा आहे? त्यांच्यावर तुम्ही लक्ष का ठेवीत नाहीत अन् पोरांसाठी स्वतंत्र मुतारी का नाही बांधून घेत, आं!’

हेडमास्तर जागेवरून उठले. हातात छडी घेतलेल्या या भयंकर माणसाजवळ जायला ते चक्क घाबरू लागले. बाप रे! त्यांच्या जवानीतल्या अशा कितीतरी हकिकती आहेत! लोक यांना घाबरायचे. त्यांच्या या अशा भक्कम आणि आडदांड प्रकृतीमुळे खरं तर यांनी पोलिस

ऑफिसर व्हायला हवं होतं; पण त्यांचं काम फक्त दारूच्या दुकानाची तपासणी करायचं होतं आणि तुम्हाला माहिताय् का - दररोजची त्यांची कमाई किती असायची ते? पाचशे रुपये! त्यापेक्षा कमी नाही. गव्हर्नरचं उत्पन्नसुद्धा एवढं नसेल. मग काय, रत्नापुरीला एवढा मोठा रंगीत बंगला अन् पोरांना थाटात वाढविणं, ही काही नवलाची बाब नाही! बाप रे! काय त्यांच्या घरातल्यांचा शिष्टपणा असायचा! खरं म्हणजे यांच्यावर केस व्हायची- थोडक्यात बचावले! जर लाच घेण्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार द्यायचा ठरला असता, तर तो यांनाच मिळाला असता! त्यांना नोकरीतून काढून टाकलेलं आहे बरं का; पण त्यांनी सांगितलं, की मुदतपूर्व सेवानिवृत्ती त्यांनी घेतली; पण त्यामुळे त्यांचं काहीच नुकसान झालं नाही - दहा पिढ्यांपर्यंत पुरेल एवढी कमाई त्यांनी करून ठेवलीय! एमडेन! खरंच, त्यांनी बऱ्याच स्त्रियांशी लग्न केलं. त्यांना एकानंतर एक वापरलंच म्हणा ना! अन् त्याशिवाय त्यांच्या कितीतरी बाहेरच्या भानगडी होत्या! आम्ही लहान असताना, त्यांच्याबद्दल गावात चर्चा असायची. आमच्यापैकी कुणीतरी रात्री, त्या अंधाऱ्या गल्लीत गुपचूप त्यांच्यावर पाळत ठेवायचे अन् मग आम्हाला फार मजा यायची! शाळेच्या शिक्षिका, नर्सेस अशांबद्दल यांची विशेष भूक होती. एखादा सांड लागावा तसा हा त्यांच्या मागावर असायचा. एमडेन ! खरंच!''

... हातातल्या फोटोफ्रेमच्या कामात जयराज मग्न असायचा, करवत चालवायचा, खिळे मारायचा अन् त्याची जीभमात्र त्या वेळी अशा तऱ्हेने चालूच असायची. हातातलं काम पुरं होईपर्यंत त्याचं बोलणं-सांगणं चालू राहायचं. काम संपलं, की बोलणंही थांबायचं; मग तो गिऱ्हाईकाला समारोपाचं बोलायचा : ''पाच रुपये! तुमच्यासाठी स्पेशल-कमी रेट लावलाय; कारण तुम्ही कृष्णाच्या फोटोला फ्रेम करून घेतलीय! आमचं दैवत आहे हे- फोटोला अडकवायच्या जादा रिंगा लावल्यात नं, त्याचे पैसे घेत नाही मी...''

राव आपली सगळी कागदपत्रं एकत्र बांधून कपाटात व्यवस्थित ठेवायचे. या कपाटाला लॉक केलेलं असायचं. या कपाटाची चावी दुसऱ्या कपाटात कागदाखाली लपविलेली असायची. या कपाटात रावांचे कपडे अन् इतर किरकोळ सामान असायचे आणि या कपाटाची चावी अशीच कुठेतरी लपविलेली असायची. अशा तऱ्हेने त्यांच्या आयुष्याचं रहस्य बाळगणाऱ्या या कपाटांचा मार्ग कुणालाही सापडायचा नाही.

क्वचित दुपारी, अशा वेळेस निवांत असताना, राव आपल्या इझी चेअरमधून उठायचे. आतनं दार लावून घ्यायचे आणि कपाट उघडायचे. त्यात कागदाखाली ठेवलेली - दुसऱ्या कपाटाची चावी घ्यायचे आणि मग दुसरं कपाट उघडायचे. या कपाटात असायची त्यांची महत्त्वाची कागदपत्रं, खरेदीखत, डायऱ्या... आणि मृत्युपत्र.

आज रावांनी दहा मिनिटांतच पेपर वाचणं संपविलं अन् शेवटच्या आपल्या आवडीच्या कॉलमवर नजर टाकली. जन्म-पुनर्जन्म यांवरच्या व्याख्यानाचा तो वृत्तांत होता...

आपण जगात का आलो, कोण आहोत, आपलं कर्म-प्रारब्ध वगैरे... रावांना ते कंटाळवाणं वाटलं. अशा तऱ्हेचं तत्त्वज्ञान अन् उपदेश आता सवयीचा झालेला होता. अजून चार वाजले नाहीत अन् वाचणं एवढ्या लवकर संपलं! आता पेपर वाचल्यानंतर फिरायच्या वेळेपर्यंत अर्ध्या तासाचा जो रिकामा अवधी आहे, त्याची जाणीव रावांना झाली. ते खुर्चीतून उठले. पेपरची नीट घडी करून त्यांनी दाराजवळच्या स्टुलावर ठेवली आणि

सावकाशपणे आवाज होऊ न देता आतून दार लावलं. कारण, दार लावल्याचा आवाज झाला, की घरातले लोक येऊन बजावतात, ''बोल्ट लावू नका'' त्यांना हीच काळजी असायची, की रावांचा आत मृत्यू झाला, तर मग दार तोडावं लागणार! सगळयांना त्यांच्याच मृत्यूची काळजी; जसं काही इतर सर्वजण अमरत्व घेऊन आलेले...

रावांनी कपाट उघडलं आणि क्षणभर सगळ्या कागदपत्रांकडे त्यांनी पाहिले. व्यवस्थित बांधलेली कागदपत्रं. ही सगळी कागदपत्रं म्हणजे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. अगदी सुरवातीपासून ते त्यांच्या स्वेच्छा निवृत्तीपर्यंतची. वरच्या खान्यातली ही कागदपत्रं. कपाट एवढं बंद ठेवूनसुद्धा धूळ यायचीच. कागदं पिवळसर, जीर्ण झालेली. धुळीचा त्रास होईल या भीतीने त्यांनी या कागदपत्रांना हात लावला नाही. ही कागदपत्रं नष्ट करायला कुणातरी माणसाची गरज होती. सगळयांत चांगलं म्हणजे कागदपत्र जाळून टाकणं; पण कुणावर विश्वास ठेवावा? या कागदपत्रांतले ते मेमो- चौकशीची कागदपत्रं कुणी वाचावीत, हे रावांना अजिबात पटायचं नाही. नोकरीच्या शेवटच्या टप्प्यातला हा पत्रव्यवहार. नोकरी सोडायच्या पूर्वीची ही चौकशी-विचारणा करणारी कागदपत्रं, ऑफिसच्या भानगडी- कुणी वाचू नयेत असं त्यांना वाटायचं. शासनाचा सेक्रेटरी तर भुतासारखा त्यांच्या मागे लागलेला होता. चिथावून देण्यामुळे - निनावी पत्रांमुळे सेक्रेटरी पिसाळला होता. या सगळ्या गदारोळात रावांचा एक जुना सहकारी हाच एकमेव त्यांच्यामागे उभा असलेला माणूस होता. रावांना तीव्रतेने त्याची आठवण झाली. काय बरं होतं त्याचं नाव... कुठे असेल तो आता - चांगला माणूस. तो जर असता, तर रावांनी कपाटातली कागदपत्रं जाळून टाकायची कामगिरी त्याच्यावर सोपविली असती. तो एवढा विश्वासू होता, की त्याला सांगितलं तर त्या कागदपत्रांची राखसुद्धा त्याने आणून दाखविली असती; पण तो कोण होता? रावांनी डोके खाजविले, आठवून पाहिले... त्यानंतर त्यांची नजर कपाटाच्या खालच्या खान्याकडे वळली. मोठ्या आस्थेने त्यांनी त्या कागदपत्रांकडे पाहिले... सगळी कागदपत्रं ही मालमत्तेबाबतची आणि त्यांच्या मृत्यूनंतर केल्या जाणाऱ्या विल्हेवाटीबद्दलची. घरातल्या ना कुणाला त्याबद्दल माहिती होती - ना कुणी त्याबद्दल विचारायची हिंमत केली होती. वकिलाला बोलावून (काय नाव बरं त्याचं...) त्याला हे सगळं एकदा सांगायला पाहिजे होतं. तो वकीलसुद्धा हयात नसेल... कुणीही सद्गृहस्थ आता शहरात शिल्लक राहिलाय की नाही कोण जाणे... काही असो, जर तो हयात असेल तर कुणाला तरी पाठवून त्याला बोलावून घ्यावं लागेल अन् सगळं काम गुप्तपणाने करावं लागेल. कसं करावं... कसंतरी करून टाकायला पाहिजे.

कपाटातल्या शेल्फमधल्या पावत्या, बिलांची पाकिटे, डायऱ्यांकडे रावांचे लक्ष गेले. बरीच वर्षं रावांनी आपल्या दैनंदिन घटनांबाबत नियमित डायऱ्या लिहिलेल्या होत्या. ते नेहमी एकाच ब्रँडची डायरी विकत घ्यायचे. मॅचलेस डायरी. चांगल्या आकाराची, रेघांची पृष्ठे असलेली आणि सहजासहजी उघडता येऊ नये अशी बटनाची - बंद करून ठेवता येणारी ही डायरी असायची. मार्केटमधल्या मॅचलेस स्टेशनरी मार्टमधून दर वर्षी डिसेंबरच्या शेवटच्या दिवशी त्यांची ही खरेदी असायची. थोडी महागाची असायची; पण उत्तम. कपाटात अशा तीस डायऱ्यांचीच चाळत मांडलेली होती. यात दैनंदिन घटनांचा संक्षेपाने केलेला उल्लेख अन् त्या दिवसांचे विचार लिहून ठेवलेले होते. अर्थात या सगळ्या डायऱ्या

आपल्या मृत्यूपूर्वी अग्निदेवतेला अर्पण करायच्या होत्या... डायऱ्यांच्या विचारात राव गढून गेले. त्या चळतीतून एक डायरी रावांनी ओढली. सहज म्हणून. त्यावरची धूळ टॉवेलने झटकून टाकली आणि खुर्चीवर बसून ते डायरी चाळू लागले. एक्कावन्न वर्षांपूर्वीची ती डायरी होती. काही पानं पाहिल्यावर त्यांच्या लक्षात आलं, की आपलं काळया शाईतलं हस्ताक्षर वाचायला कठीण होत आहे आणि ती परत ठेवून देण्यासाठी ते उठले. कारण आता फिरायला निघायची वेळ झाली होती. तथापि, ते स्वत:शीच म्हणाले, ''पाहूया तर- त्या वर्षाच्या याच दिवशी आपण काय केले ते...'' रावांनी भिंतीवरचं कॅलेंडर पाहिलं. वीस मार्च ही तारीख होती. त्यांनी डायरी उघडली. या दिवसाचे पान काढून, आयुष्यातला तो दिवस कसा नोंदविला याचे कुतूहल घेऊन ते पाहू लागले... सकाळपासून रात्रीपर्यंत घरातल्या, ऑफिसच्या अन् खासगी कामांची केवढी गर्दी!... रावांचे डोळे चमकले. मोठा परिच्छेद ओलांडून डायरीतल्या त्या संक्षिप्त परिच्छेदावर त्यांनी नजर फिरविली... एकावन्न वर्षांपूर्वी, याच दिवशीच्या पृष्ठावर शेवटच्या चार ओळी लिहिल्या होत्या- ''...एस'बद्दल जरा जास्तच आस्था दाखविली आहे... तिला धडा शिकवायला पाहिजे...' रावांनी आठवून पाहिले आणि त्यांना आपल्याच ओरडण्याचे प्रतिध्वनी जणू ऐकायला येऊ लागले. कुणावर तरी ओरडण्याचे प्रतिध्वनी ... आणि डायरीच्या पुढच्या ओळींतून त्यांना आपली कृती लक्षात आली '-तिच्या अशा वागण्यामुळे तिला चांगलाच मार दिला आणि निघालो... तिचे तोंड पुन्हा पाहणार नाही. मी का म्हणून जबाबदारी घ्यावी? तिचं नक्कीच प्रेमप्रकरण झालेलं आहे - शेवटी नाचणारीच बाई ती! खरं म्हणजे तिला घरात बंद करूनच मी बाहेर जायला हवं होतं.' रावांनी हा मजकूर निर्विकारपणे वाचला. ती कोण होती असा त्यांना आता प्रश्न पडला. केवळ आद्याक्षर पुरेसं नव्हतं. 'एस' पासून सुरू होणाऱ्या नावाचं कुणी त्यांना माहीत नव्हतं. त्या दिवसांत रावांना ज्या आवडायच्या, त्यांपैकीच कुणीही असू शकेल... पण नाव आठवणं कठीण आहे.

या प्रश्नावर मोठ्या प्रयत्नाने राव विचार करू लागले. एवढा, की कपाळावर आठ्या पडू लागल्या, ताण येऊ लागला. तथापि, नाव जरी आठवलं नाही, तरी त्यांना हळूहळू ती जागा लक्षात येऊ लागली. चेट्टीयार स्टोअर्सपासून... हां, त्यांना आठवले... मार्केट रोड... आणि लक्षात आलं, रात्री उशिरा ते परतायचे तोपर्यंत दुकानावर तिथे लाईट असायचे... म्हणजे मार्केट रोडपासून जाणारी लहान गल्ली, ती नंतर एका समांतर गल्लीला जाऊन मिळते... तिथनं असंच पुढे गेल्यावर मग वळायचं, मग त्या गल्लीतून पुढे गेलं, की आपण त्या घरी पोचतो. चार पायऱ्या चढावं लागतं. शिसवीच्या लाकडाच्या दारावर पितळी चकत्या लावलेल्या... दारावर थाप पडली, की लगेच दार उघडायचं, जसं काही ती वाटच पाहत असायची; पटकन आत घेऊन दार लावून घ्यायची. पायांच्या आवाजाने शेजाऱ्यांना चाहूल लागू नये, कुणी पाहू नये याची काळजी घ्यायची. खरं म्हणजे, आठवड्यातून एकदोन वेळा, पुरेशी सवड असल्यावरच राव तिथे जायचे... तिचं नाव... नाही, काही आठवत नाही; पण त्यांना ती साधारणपणे आठवली- थोडीशी स्थूल- चांगली, देखणी आणि जास्मिनच्या सुवासाची... रावांना खात्री झाली, की याच स्त्रीबद्दल आपण लिहिले आहे, दुसऱ्या कुणाबद्दल नाही... रागारागात तिच्या तोंडात थापड मारून, संतापाने आपण निघून गेल्याचं त्यांना आठवलं. तरुणपणातला तापटपणा अन् शीघ्र संतापी प्रकृती...

नक्कीच दुसरं कुणी असावं ते. आपण नाही, नाही. रावांना ते घर आठवू शकलं नाही; पण त्या घरासमोर नारळाचं झाड होतं अन् गल्लीतली ती विहीर त्या घरासमोरच होती... अन् क्षणार्धात रावांना त्या गल्लीचं नाव आठवलं - 'गोकुलम.'

राव उठले. डायरी ठेवून नेहमीसारखं कपाट कुलूपबंद केलं. हातपाय धुतले. कपडे घातले आणि काठी, छत्री घेतली. सँडल्स घातले. एका रोमांचक अशा स्थितीत त्यांनी सगळं आटोपलं. त्यांनी आज ठरविलं, की आपल्या फिरण्याच्या नेहमीच्या कक्षेच्या बाहेर आज आपण जायचं. वर जाऊन, ते पितळी फुल्याफुल्याचं शिसवी दार पाहायचं... त्या बोळातल्या विहिरीशेजारचं घर... चेट्टीयार स्टोअर्सपासून त्यांची पावलं उजव्या बाजूने आपोआप वळणार होतीच आणि जर 'एस.' तिथे असेल - तिथेच उभी असेल, तर ती आपलं स्वागत करेल... आता ते चार पायऱ्या चढू शकणार नाहीत; पण ते तिला तिथूनच एक छोटीशी भेट देतील. विचारपूस करतील. ती खाली येऊन भेट स्वीकारेल. तिला आपण मारायला नको होतं... आपण क्रूर झालो होतो, राग आवरला नव्हता... आपण अशा मत्सराने वागायला नको होतं. रावांचं मन पश्चात्तापाने भरून आलं. तिने खरं म्हणजे आपल्याबद्दल अपार असा जिव्हाळा दाखविला होता. कसली अपेक्षा न करता आपल्याला भरभरून प्रेम-आनंद दिला होता... नाही तर आपण असे मध्यरात्रीपर्यंत थांबलो असतो का तिथे...अं...

घराबाहेर पटपट चालून जाताना, कुणीतरी नेहमीप्रमाणे विचारलंच, "टॉर्च घेतला का? उशीर झाला वाटतं आज... काळजी घ्या..." राव उत्तेजित झाले होते. नेहमीच लक्ष ठेवणाऱ्या, बोलणाऱ्या त्या दुकानदाराने रावांची लगबग पाहिली. "वा! नमस्कार साहेब!" सायकलच्या दुकानातून मणीने आवाज दिला - "आज कशाची एवढी घाई? सावकाश जा; रस्ता जागोजागी उखडलेला आहे." रावांनी वर पाहून फक्त मान हलविली. त्यांना सगळं काही ऐकायला आलं नाही; पण मणी काय म्हणत असावा याचा त्यांना अंदाज आला. राव त्याला ओळखत होते - अल्बर्ट मिशन स्कूलमध्ये रावांसोबत शिकलेल्या त्या माणसाचा हा नातू... त्याचं नाव? नेहमीप्रमाणे या मणीच्या आजोबांचं नाव लक्षात नाही राहिलं... रामू किंवा शंकर असंच काही तरी... छे! काय कटकट आहे! त्यांनी तो नाद सोडला अन् पुढे निघाले. त्यांनी रस्त्याच्या कडेनं चालणं सुरू केलं. मणीची सूचना लक्षात ठेवली; सावकाश चालू लागले. नाही तरी त्यांची लगबग कुणाच्या लक्षात नको यायला आणि स्वत:ला तेवढं घाईघाईत चालवून दमछाक करून घेणं बरं नाही.

जगनच्या मिठाईच्या दुकानासमोर राव थांबले. काउन्टरवर कुणी नवा माणूस होता. पोरांची गर्दी होती. गडबड होती. त्या पोरांनी रस्ता अडवून टाकला होता. अधीर होऊन राव थोडावेळ थांबले. मग त्यांनी काठी वाजवून लक्ष वेधायचा प्रयत्न केला, तेव्हा काउन्टरच्या माणसाने विचारले, "काय साहेब, काय पाहिजे?" हातातल्या काठीने रावांनी पोरांना बाजूला सारले. काउन्टरजवळ येऊन त्यांनी मिठाईच्या परातींवर नजर टाकली. वेगवेगळ्या रंगाच्या... आकाराच्या मिठाईचे ढीग. क्षणभर भरपूर मिठाई खायचा मोह झाला. तरुणपणात खाल्ल्यासारखं- खाण्याचा मोह; पण आता ते कदाचित जिवावर बेतणारं राहील... त्यांच्या दीर्घायुष्याचं हेच रहस्य होतं. कष्टाचं, काटेकोर अन् व्यवस्थित राहणीमान. त्यांनी विचारलं, "आज काय ताजं- गरम आहे?" काउन्टरवरच्या माणसाने

सांगितले, ‘‘कालचे काहीच नाही. आम्ही दररोज ताजंच तयार करतो.’’ रावांना, तो काय सांगतो आहे, याचा अर्धवटच अंदाज आला; पण तसं न दाखविता ते म्हणाले, ‘‘तीन रुपयांची जिलेबी बांधून द्या.’’ काळजीपूर्वक पैसे मोजून जिलेबीचा पुडा घेऊन त्यांनी तो नाकाजवळ काही क्षण धरला. (मिठाईचा वास काही हानिकारक नसतो.) काही वेळ त्या वासाने त्यांचे मन उत्तेजित झाले आणि परत मग राव आपल्या मार्गाला लागले. चेट्टीयार स्टोअर्सच्या ठिकाणी आल्यावर ते क्षणभर थांबले. उजवीकडे वर नजर टाकली - होय, ही तीच गल्ली होती, त्यांच्या माहितीतली...

तिथे रेंगाळत असलेले पाहून, दुकानदाराने आवाज दिला, ‘‘अरे! साहेब, तुम्हाला काही पाहिजे का?’’ राव वैतागून गेले. आपल्याला कुणी एकटं का सोडीत नाही? अन् पुन्हा त्या दुकानातला पोरगा पुढे आला, विचारण्यासाठी. त्याच्याकडे पाहून रावांनी पलीकडल्या रस्त्याकडे बोट दाखवून विचारले, ‘‘हा रस्ता कुठे जातो?’’

‘‘दुसऱ्या रस्त्याकडे’’ पोरगा म्हणाला अन् राव तिथेच थांबले. पोराने विचारले, ‘‘काय आणू- काय पाहिजे?’’

‘‘अरे! कुणी माझा पिच्छा सोडेल की नाही?’’ वैतागून रावांनी स्वत:ला विचारले. यांना वाटतं, की मला नेहमीच काहीतरी लागत असतं. छातीशी जिलेबीचा पुडा गच्च धरून, सोबत हातावर छत्री अडकविलेल्या स्थितीत ते होते. पोराच्या तशा विचारण्यावर राव म्हणाले, ‘‘सॅन्डलवूड साबण आहे का?’’ त्यांना आठवलं. ‘एस.’ किंवा जे काय नाव असेल तिचं, तिला हा साबण आवडायचा. पोराने तो साबण त्वरेने आणून दिला. साबणाच्या वासाने रावांच्या काही स्मृती चाळवल्या. त्यांना वाटले होते, की ‘एस’ च्या शरीराला जास्मिनचा वास होता; पण आता त्यांना लक्षात आले, की तो वास सॅन्डलवूडचाच होता. त्यांनी साबणाचा सुगंध दीर्घ श्वासाने भरून घेतला आणि खिशात साबण ठेवून दिला.

‘‘आणखी काही पाहिजे?’’ पोराने विचारले. ‘‘नको. जा,’’ राव म्हणाले अन् मार्केट रोड ओलांडून ते दुसऱ्या बाजूला गेले.

राव मग क्रॉस रोडने चेट्टीवार स्टोअर्सच्या पुढे गेले. तो रस्ता नंतर समांतर रस्त्याला लागला होता. तिथेच ते डावीकडे वळले; एका आवेगानेच आणि मग उजव्या गल्लीत. पुन्हा डावीकडे अन् पुन्हा मागे फिरले; पण तिथे कुठेही ‘गोकुलम’ची ओळख दिसेना. टॅप टॅप करीत काठी आपटत जाताना त्यांना रस्त्याच्या कडेला बसलेला चांभार दिसला. रावांनी त्याला विचारले, ‘‘गोकुलम गल्लीसाठी कोणता रस्ता आहे?’’ चांभाराने उगीचच एका गल्लीकडे निर्देश केला अन् आपल्या कामाला लागला. रावांनी त्याला पुन्हा विचारले, ‘‘या गल्लीत नारळाचं झाड आहे का?’’ चांभाराने विशेष प्रतिसाद दिला नाही, तसं रावांना मोठं असहाय वाटून गेलं. ‘‘हरामखोर! ते दिवस असते, तर मी... ’’ असं पुटपुटत त्यांनी आता मोठ्या आशेने गल्ली ओलांडली. त्यांनी आणखी एकदोघांना पत्ता विचारला; पण काही उपयोग झाला नाही. कुठेच ते नारळाचे झाड दिसले नाही. त्यांना राहून राहून वाटू लागलं होतं, की इथेच कुठेतरी आहे; पण आता प्रत्येक गोष्ट बदललेली होती. गोकुलम गल्ली अन् नारळाचं झाड माहीत असलेली स्त्री-पुरुषांची सगळी पिढी आता हयात नव्हती. आताच्या नवीन पिढीला तर परिसराचं भानच नव्हतं... एकटे रावच होते - हयात असलेले...

सायंकाळ होऊ लागली, तसं राव आता काळजीने चालू लागले. त्यांना आता थोडं नैराश्य असं आलं होतं अन् प्रत्येक पावलावर आता ते हातातली काठी आपटत चालत होते. कुठल्या खड्ड्यात पडू किंवा कुठे ठेच लागेल, या भीतीने ते चालू लागले. अशा पद्धतीने चालताना, मोठा थकवा येऊ लागला आणि आता मार्केट रोडपर्यंत पुन्हा आपण पोचू का नाही याची त्यांना काळजी पडली. काही भलंबुरं झालं, तर घरची मंडळी त्यांना दोष देणार. थकव्यापेक्षा खरं म्हणजे अशा विचारांनीच ते विचलित झाले होते; पण अडखळत का होईना, ते चालत राहिले. त्यांच्या अशा रेंगाळत चालण्याने रस्त्यावरचे लोक त्यांच्याकडे गमतीने पाहू लागले. एका ठिकाणी त्यांची काठी मऊ अशा जागेत रुतल्यासारखी वाटली अन् लागलीच त्या धुळीत मिसळून बसून राहिलेल्या कुत्र्याने उडी मारली. केकाटत तो भुंकला अन् रावांनी ताडकन उडीच मारली- गेल्या कित्येक वर्षांत त्यांनी अशी हालचाल केली नव्हती. नशीब, ते धडपडून पडले नाहीत; पण त्यांच्या हातातला जिलेबीचा पुडा निसटून खाली पडला, तो सरळ त्या बेवारशी कुत्र्यासमोर! कुत्र्याने तो पुडा चटकन् तोंडात धरला अन् शेपूट हलवीत तो पळाला.
रावांनी त्या कुत्र्याकडे मोठ्या असहायतेने पाहिले आणि ते घराकडे परतले. चालता चालता ते विचार करू लागले अन् मग स्वत:शीच ते म्हणाले, ‘‘एस’नेच हा नवा जन्म घेतलेला असावा, काय सांगावं...’’

❖ ❖ ❖